संपन्न समाज

म. ग्रं. सं. ठाणे
विषय निबंध
सं. क्र. २०९१

जॉन केनेथ गॅलब्रेथ

गंगाधर गाडगीळ

REFBK-0014387

विवेक
७५५७९
२०।३।७१
२०९७



संपन्न समाज

जॉन केनेथ गॅलब्रेथ

*

अनुवादक

प्रा. गंगाधर गाडगीळ

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्र.
अनुक्रम ७५५७८ वि: निबंध
क्रमांक 2009 नों: दि: 26/3/60

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १४३८७
ग्रंथ शाखा स्थळ प्रत

REFBK-0014387



वोरा ऍण्ड कंपनी पब्लिशर्स प्रा. लिमिटेड,
३, राउण्ड बिल्डिंग, काळबादेवी रोड, मुंबई - २.

© 1958 by John Kenneth Galbraith
'The Affluent Society'
By John Kenneth Galbraith
Published by Houghton Mifflin Co., Boston

मूल्य : रु. ५·००

*

प्रथम आवृत्ति
१९६५

*

प्रकाशक :
अ. ल. गाडगीळ,
वोरा अँण्ड कंपनी
पब्लि. प्रा. लि. करितां,
३, राउण्ड बिल्डिंग,
मुंबई २.

*

मुद्रक :
अनन्त जे. शाह
लिपिका प्रेस, कुर्ला रोड,
अंधेरी, मुंबई ५९.

प्रास्ताविक निवेदन

१९५५ सालच्या उन्हाळ्याच्या सुरवातीला मीं बोटींत चढलों आणि हें पुस्तक लिहिण्यासाठीं स्विटझर्लंडला प्रयाण केलें. त्यानंतरच्या काळांत अनेकविध लोकांनीं मला सहाय्य करून खूपच ऋणी करून ठेवलें आहे. गुगेनहिम अभ्यासवृत्तीमुळें मला सुलभपणें प्रवास करता आला. तसेंच या बाबतींत माझी पत्नी कॅथरिन ए. गॅलब्रेथ हिचें देखील मला सहाय्य झालें. शिवाय तिनें मजकूर टंकलिखित केला, मीं निर्देशिलेल्या आधारांची तपासणी केली, मुद्रितांत सुधारणा केल्या आणि जेव्हा मीं उपस्थित केलेल्या अनेक प्रश्नानां उत्तरें देणें मला फारच अवघड जाऊं लागलें तेव्हां माझ्या चुका टाळण्यासही तिनें मला मदत केली. पॅले द नेशन्स् व हार्वर्ड येथील ग्रंथपालानीं जें मला सहाय्य केलें त्याबद्दल देखील मीं कृतज्ञ आहे. या पुस्तकांतील प्रमुख विचारांची चांचणी करण्यासाठीं मीं ते पहिल्यानें जिनिव्हा येथील विश्वविद्यालयांतील विद्यार्थ्यांपुढें मांडले तेव्हां त्या विद्यार्थ्यांच्या ऋणाचा देखील निर्देश करायला हवा. त्याच प्रमाणें कॅलिफोर्निया इन्स्टिटचूट ऑफ टेक्नॉलॉजी या शिक्षणसंस्थेंत हेन्स फाउन्डेशनच्या विद्यमानें मीं १९५७ च्या जानेवारीत जीं व्याख्यानें दिलीं त्यांत देखील या पुस्तकांतील अनेक विचार मीं मांडले आणि त्यांची पुन्हां एकदां चांचणी केली. ही संधी दिल्याबद्दल व या पुस्तकाच्या रूपानें माझे विचार मांडण्यास परवानगी दिल्याबद्दल मीं वर निर्देशिलेल्या दोन संस्थांचा व माझे अनेक वर्षांचे स्नेही ॲलन स्वीझी यांचा आभारी आहे. पुस्तकाच्या शेवटीं शेवटीं दारिद्र्याच्या समस्येवर जें प्रकरण आहे तें लिहितानां मीं एका विशिष्ट संशोधनाचा खूपच उपयोग केला आहे. कार्नेजी कॉर्पोरेशननें दिलेल्या अनुदानामुळें हें संशोधन करणें शक्य झालें. छपाईसाठीं पुस्तकाचा अखेरचा मसुदा तयार करण्याची किचकट जबाबदारी संपूर्णपणें माझ्या सहाय्यक व स्नेही रुथ एम्. पार्कस यानीं पार पाडली. त्याबद्दल मीं अत्यंत कृतज्ञ आहे.

प्रकाशक हीं देखील माणसेंच असतात. निदान तसें मानलें जातें. असें असून ते लेखकांवर वैतागत का नाहींत तें मला कधींच नीटसें समजलेलें नाहीं. मला वाटतें कीं ते लेखकांवर वैतागत नाहींत असें नाहीं. पण आनंदाची गोष्ट अशी कीं माझा ज्यांच्याशी संबंध आला ते प्रकाशक मात्र हा वैताग लेखकांच्या दृष्टोत्पत्तीस येऊं नये अशी दक्षता मोठ्या कौशल्यानें व सद्भावनेनें घेतात.

आर्थर एम्. श्लेशिंजर, ज्यूनिअर आणि कार्ल केसेन या माझ्या दोन सहकाऱ्यांनीं या पुस्तकाचा मूळ मसुदा व मुद्रितेंही वाचलीं. आणि त्यानीं ज्या सूचना केल्या त्या जवळजवळ संपूर्णपणें मीं मान्य केल्या. ज्यांच्या अस्तित्वाची मला पूर्वी जाणीव नव्हती अशा समस्यांकडे व त्यांच्या उलगड्याकडे माझें लक्ष वेधण्याचें कार्य अनेक लोकांनीं केलें आहे व त्या सर्वांचा मीं ऋणी आहे. माझे सहकारी सेमुर इ. हॅरिस त्यांपैकीं एक. ते एक अत्यंत उद्योगी व उपयुक्त कार्य करणारे अर्थशास्त्रज्ञ आहेत. सरकारी वित्तव्यवहारांवद्दल ज्या चालू साचेवंद कल्पना आहेत त्यांवद्दल गेलीं अनेक वर्षें ते शंका उपस्थित करीत आहेत. ह्या शंका त्यानीं उपस्थित केल्या नसत्या तर विक्रीकराचा खूपच व्यापक प्रमाणावर उपयोग केला जावा अशी सूचना मीं या पुस्तकात केली नसती आणि मग उदारमतवाद्यांचीं एक डोकेदुखी टळली असती. ग्राहकोपयोगी वस्तूंचें अधिकाधिक उत्पादन करण्यावरच लक्ष केंद्रित करणें कितपत शहाणपणाचें आहे यावद्दल माझ्या मनांत पहिल्यानें शंका उपस्थित करण्याचें गव्हर्नर लुई म्युनॉझ-मारिन याना आहे. असेच अनेक लहान मोठे मुद्दे मला माझ्या सहकाऱ्यानीं, मित्रांनीं व विद्यार्थ्यांनीं सुचविले. मनुष्य लेखन करतो तेव्हां तो आपल्या अहंभावनेचें फाजील लाड पुरवीत असतो. त्यावर उतारा म्हणून आपण इतरांचे किती ऋणीं आहोत याचा विचार लेखकानें अवश्य करायला हवा.

केंब्रिज, मॅसॅच्युसेटस्
मार्च १९५८

जे. के. गॅलब्रेथ

भाषातरकाराचें निवेदन

दारिद्र्य हा आपल्या समाजापुढचा सर्वांत मोठा प्रश्न आहे. असें असता संपन्न समाजाच्या समस्यांचें विवेचन करणाऱ्या या पुस्तकाचें भाषांतर करण्यात औचित्य काय असा प्रश्न कदाचित् वाचकांनां पडेल. परंतु या पुस्तकाचें सर्वांत मोठें व स्पृहणीय वैशिष्ट्य असें कीं सांकेतिक कल्पनांच्या आहारी गेल्यामुळें समाजाचे प्रश्न सोडवणें किती अवघड होतें तें त्यांत दाखवलेलें आहे. आपण देखील आज असेच सांकेतिक कल्पनांच्या आहारीं गेलों आहोत. इतकेंच नव्हे तर ह्या कल्पना क्रांतिकारक आहेत असा घोष करीत आहोत. आणि त्या जसजशा गैरलागू व निरूपयोगी ठरत आहेत तसतसे त्याना छातीशीं अधिकच कवटाळीत आहोत. आपल्या पूर्वजांच्या अंधश्रद्धेला एका बाजूनें हसतानां दुसऱ्या बाजूनें त्यांच्यापेक्षां देखील आंधळेपणानें वागत आहोंत. ह्या सांकेतिक कल्पनांमुळें आपले प्रश्न आधींच अत्यंत बिकट असलेले प्रश्न सोडवणें आपल्याला जवळ जवळ अशक्य झालें आहे. आणि आपल्या समाजाचें अस्तित्वच धोक्यात आलें आहे. या सांकेतिक कल्पनांपासून मुक्त होण्यास हें पुस्तक अप्रत्यक्षपणें आणि म्हणूनच कदाचित् अधिक परिणामकारकपणें मदत करील असा मला विश्वास वाटतो. आणि म्हणूनच त्याचें हें भाषांतर मीं वाचकांच्यापुढें ठेवीत आहे.

शिवाय आपण जरी आज दरिद्री असलों तरी उद्यां संपन्न होणार आहोंत आणि म्हणून संपन्न समाजाला कोणत्या प्रश्नांना तोंड द्यावें लागतें त्याची जाणीव आपल्याला असणें इष्ट आहे. त्यामुळें आपले आजचे प्रश्न सोडवतांनां उद्यांचे प्रश्न टाळण्याचा किंवा निदान सोपे करण्याचा प्रयत्न आपल्याला करता येईल. मागासलेल्या समाजांना इतिहास एक खास सवलत देतो. ती म्हणजे पुढारलेल्या समाजांच्या अनुभवानें शहाणे होण्याची. त्या सवलतीचा फायदा आपण घ्यायला हवा आणि त्या संदर्भांत हें पुस्तक फार उपयुक्त ठरेल असा मला विश्वास वाटतो.

गंगाधर गाडगीळ

अनुक्रमणिका

विषय		पृष्ठ
१	संपन्न समाज	९
२	सांकेतिक शहाणपण	१४
३	अर्थशास्त्रांतील नैराश्यग्रस्त परंपरा	२६
४	डळमळित दिलासा	३८
५	अमेरिकेची मनःस्थिती	५०
६	मार्क्सवादाचे मळभट	६५
७	विषमता	७८
८	आर्थिक सुरक्षितता	९६
९	उत्पादनाचें सर्वोच्च स्थान	११६
१०	ग्राहकांच्या मागण्यांचीं हुकमत	१३२
११	गरजांचें परावलंबित्व	१४४
१२	राष्ट्रीय सुरक्षिततेबद्दलचा भ्रम	१५२
१३	उत्पादनांत गुंतलेले हितसंबंध	१७०
१४	बिल कलेक्टर दार ठोठावतो	१८४
१५	मुद्रास्फिती	१९६
१६	द्रव्याविषयीचे भ्रम	२११
१७	उत्पादन आणि किंमतींचें स्थैर्य यांतील विरोध	२२४
१८	सामाजिक समतोलाची उपपत्ति	२३६
१९	भांडवलाच्या निवेशांतील समतोल	२५४
२०	संक्रमण	२६४
२१	उत्पादन आणि सुरक्षितता यांची फारकत	२७५
२२	समतोलाची स्थापना	२९०
२३	दारिद्र्याचें समाजजीवनांतील नवें स्थान	३०३
२४	काम, फुरसत आणि नवा सामाजिक वर्ग	३१४
२५	संरक्षण आणि बचाव	३२७

• • •



प्रकरण पहिलें

संपन्न समाज

[१]

श्रीमंताचेही कांहीं फायदे असतात. आणि नको ती क्लेशदायक संपत्ती अशी विचारसरणी लोकांच्या मनावर ठसविण्याचा प्रयत्न जरी अनेकदां झाला असला तरी ती भूमिका कधींच फारशी लोकप्रिय झालेली नाहीं. एवढें मात्र निःसंशय खरें कीं संपत्ती ही माणसाला गोंधळात टाकते. त्याचें जीवन गुंतागुंतीचें करते. आपली अडचण काय आणि तिच्यावर तोडगा काय यावद्दल गरीब माणसाच्या मनात कधींच संदेह नसतो. त्याचें उत्पन्न पुरेसें नसतें ही त्याची अडचण आणि अधिक उत्पन्न हा तिच्यावरचा तोडगा ! परंतु आपल्या अडचणी कोणत्या यावद्दल श्रीमंत मनुष्य अनेक प्रकारच्या कल्पना रचूं शकतो आणि त्यांचें निराकरण कसें करायचें यावद्दल त्याच्या मनांत तितक्याच प्रमाणात अधिक अनिश्चितता असते. शिवाय जो पर्यंत आपल्या संपत्तीवरोबर गुण्यागोविंदानें नांदायला तो शिकत नाहीं तोंपर्यंत ती नको तिथें खर्च करण्याची चूक तरी तो करतो किंवा अन्यप्रकारें आपल्या पदरीं मूर्खपणा घेतो.

जी गत व्यक्तींची तीच राष्ट्रांची. आणि राष्ट्रांचा संपत्तीशीं असलेला परिचय तर फारच अल्प आहे. आतांपर्यंतच्या त्यांच्या समग्र इतिहासात दारिद्र्याची संगतच त्यांना बहुतांशीं लाभलेली आहे. जगाच्या ज्या लहानशा कोपऱ्यात युरोपियन लोक रहातात तेथेंच काय ती गेल्या कांहीं पिढ्यांत संपत्ती नांदली आहे. मानवाच्या समग्र इतिहासाच्या संदर्भात हा अपवादात्मक कालावधी अगदींच अल्प ठरतो.

ज्या तत्वांच्या आधारानें जगाच्या या भाग्यशाली प्रदेशातले लोक आपल्या जीवनाचा अर्थ लावतात आणि आपल्या वर्तनाचें नियमन करतात तीं तत्वें कांहीं सधनतेच्या पार्श्वभुमीवर घडवलेलीं नाहींत. ज्या वेळीं या तत्वांची जडणघडण झाली त्यावेळीं दारिद्र्य ही माणसाची नित्याची अवस्था होती आणि ह्या परिस्थितींत कांहीं फरक पडेल अशी कल्पना करणेंही अशक्यप्राय होतें. दुसऱ्या एखाद्याची सुस्थिती पाहून मनाला भरल्या पोटीं देखील ज्या यातना होतात त्या स्वरूपाचें हें दारिद्र्य नव्हतें. उपासमार, रोगराई आणि कडाक्याची थंडी यामुळें माणसाची केविलवाणी कुतरओढ करणारें असें तें दारिद्र्य होतें. त्याच्या कचाट्यातून जरी

एखाद्याची अल्पकाळ मुक्तता झाली तरी त्याचा तडाखा पुन्हां कधीं वसेल याची शाश्वती नसे. कारण उपासमार टळली तरी माणसाला जेमतेम चार घास मिळत इतकेंच आणि ते देखील क्वचितच. शिवाय जरी त्या काळीं कांहीं लोक वैभवात लोळत असले आणि ह्या लोकांच्याच जीवनाची आणि कृत्यांची नोंद बहुतांशीं आपल्याला इतिहासाच्या ग्रंथात आढळत असली तरी त्यांच्या वैभवामुळें जनतेला आपलें दारिद्र्य अधिक सुसह्य झालें असेल असें मानायला फारशी जागा नाहीं.

दुःसह दारिद्र्यानें ग्रासलेल्या या जीवनाचा अर्थ लावण्यासाठीं ज्या विचारधारा निर्माण झाल्या त्या आजच्या अमेरिकन जीवनाला तितक्याच प्रमाणात लागू पडतील अशी भूमिका घ्यायची इच्छा कांहीं कोणाला व्हायची नाही. त्या जगात दारिद्र्यानें अवघें जीवन व्यापलेलें होतें. पण आमची (अमेरिकेची) स्थिती तशी नाही हें अगदीं उघड आहे. एका शतकापूर्वी श्रीमंतांना देखील जी सौख्यसाधनें, (अन्न, करमणूक, प्रवासाचीं साधनें, वहात्या पाण्याचे नळ इत्यादि) उपलब्ध नव्हतीं तीं ज्या समाजात आज सामान्य माणसाला देखील मिळूं शकतात, त्या समाजाच्या बाबतींत दारिद्र्यातून स्फुरलेल्या विचारधारा गैरलागू ठराव्या हें सहाजिक आहे. परिस्थिती इतकी पालटली आहे कीं आपल्या पुष्कळशा गरजांचें अस्तित्व देखील आतां माणसाला स्पष्टपणें जाणवत नाहीं. जाहिराती आणि विक्रीची कला यांच्या सहाय्यानें जेव्हां ह्या गरजा कृत्रिमपणें निर्माण केल्या जातात आणि जेव्हां त्यांच्यावर भर देऊन त्यांची जोपासना केली जाते तेव्हां त्यांचें अस्तित्व माणसाला जाणवतें. आणि ह्यामुळेंच जाहिरात आणि विक्रीची कला हे आजचें अत्यंत महत्वाचे आणि कौशल्यपूर्ण व्यवसाय झाले आहेत. आपल्याला काय हवें आहे हें जाहिरातदारानें सांगण्याची गरज एकोणिसाव्या शतकाच्या आरंभी फार थोड्या लोकांना भासत असे.

दारिद्र्यानें ग्रासलेल्या जगांत ज्या आर्थिक विचारधारा निर्माण झाल्या त्यांत सध्यांच्या संपन्नतेच्या संदर्भात कांहींच फेरफार झालेले नाहींत असें म्हणणें चुकीचें ठरेल. असे फेरफार बरेच झाले आहेत आणि त्यांत असे ही कांहीं आहेत कीं ज्यांची नीटशी अगर मुळींच दखल घेतली गेलेली नाहीं. पण एकंदरीत हे फेरफार फार माफक प्रमाणात झाले आहेत. आणि परिस्थिती मूलतःच पूर्णपणें पालटली आहे ह्या सत्याला रोखठोकपणें तोंड देण्याचें आपण टाळलें आहे. ह्यामुळें एक निराळ्याच जगाला लागू पडणाऱ्या विचारधारांच्या आधारानें आपण अंशतः तरी आपल्या जीवनाची दिशा ठरवीत आहोंत. आणि ह्याचा परिणाम असा होतो कीं आपण करतो त्यापैकीं पुष्कळशा गोष्टी अनावश्यक असतात, कांहीं असमंजसपणाच्या असतात आणि थोड्या तरी खुळेपणाच्या असतात. आर्थिक मंदीचा धोका आपण कितीतरी वाढवतो आणि आपली संपन्नताच धोक्यांत आणतो.

[२]

आतांपर्यंत जें लिहिलें त्यावरून या पुस्तकामागचा हेतु विशद होईल. भूतकालीन दारिद्र्य, विषमता आणि आर्थिक संकटें यांतून आपले आजचे आर्थिक दृष्टिकोन कसे निर्माण झाले आहेत त्याचा शोध घेणें हें या पुस्तकाचें पहिले कार्य आहे. त्यानंतर आजच्या संपन्नतेच्या संदर्भात ह्या दृष्टिकोनांत अंशतः आणि अप्रत्यक्षपणें कसा फेरफार झाला आहे त्याची तपासणी केली आहे. दारिद्र्यानें ग्रासलेल्या भूतकालीन जगांत निर्माण झालेल्या कल्पना आजही मूलतः आपण उराशीं बाळगल्या आहेत. आणि तसें करण्यासाठीं ज्या युक्त्यांचा आणि युक्तिवादांचा अवलंब केला आहे. त्यातले कांहीं मोठे चमकदार आहेत, कांहीं पल्लेदार आणि सूक्ष्म आहेत आणि कांहीं धोकादायक आहेत. त्या सर्वांचा मागोवा घेणें हें आपलें पुढलें कार्य आहे. कारण आपला समाज संपन्न आहे हें मान्य करणें सोइस्कर व सुखकारक आहे असा गैरसमज करून घेणें इष्ट नाहीं. उलट ही गोष्ट मान्य केली तर अनेकांचीं स्थानें आणि प्रतिष्ठा धोक्यांत येतील. शिवाय त्यामुळें आपल्यापैकीं अनेकांना नवे विचार स्वीकारावे लागतील. आणि त्याचीच तर माणसाला जबरदस्त धास्ती वाटते. माणसाच्या मनावर सत्ता चालवणाऱ्या विचारांइतका प्रभावी सत्ताधारी गट जगांत दुसरा कोणताही नाहीं.

अखेर दारिद्र्याशीं निगडीत असलेल्या गैरलागू आणि कृत्रिम दृष्टिकोनांची झांपड डोळ्यावरून दूर झाली कीं आपलीं नवीं कामें आणि नव्या संधी कोणत्या त्यांचें आपल्याला पहिल्यानेंच दर्शन घडतें. ही गोष्ट वाटते तितकी सुखकारक नाहीं. कारण आधींच उरकलेलीं कामें नंतरही मनोभावें करीत राहिल्याचा बहाणा करणें हा आवश्यक आणि तांतडीचीं नवीं कामें टाळण्याचा एक उत्कृष्ट मार्ग आहे.

ह्या पुस्तकांचें स्वरूप व हेतु हा असा आहे. परंतु आधीं थोडी पूर्वतयारी करायला हवी. आमच्या समाजाविषयींच्या जुन्यापुराण्या व अप्रस्तुत कल्पनांना जे आपण इतके चिकटून राहिलों आहोंत तें काहीं केवळ अज्ञान अगर मंदपणा यांमुळें नव्हे. या दोहोंचा प्रभाव मोठा असला तरी निर्णायक नाहीं. उलट, सामाजिक प्रश्नांच्या संदर्भात अशा इतर कांहीं जागृत व जीवनांत मुरलेल्या शक्ती आहेत कीं ज्या भूतकाळाशीं आपल्याला जखडून ठेवतात. इतकेंच नव्हे, तर त्यांमुळें कांहीं कलेवरें पुन्हा चालतीं बोलतीं करण्याचा आपण प्रयत्न करतो. ह्या शक्तींचे आपण कसे गुलाम आहोंत त्याची आधीं स्पष्ट जाणीव झाली तरच त्यांच्या तावडींतून आपल्याला नंतर मुक्त होतां येईल. ह्या गोष्टीचा परामर्श पुढील प्रकरणात घ्यायचा आहे.

[३]

त्वेष अगर अधिक्षेप हा कांहीं या पुस्तकाचा स्थायीभाव नव्हे. मात्र सामाजिक टीका करतांना जो फॅशनेवल आणि फसवा विनय पांघरलेला असतो त्याचा अभाव कांहींना इथें जाणवेल. अर्थशास्त्रांतल्या कांहीं मध्यवर्ती कल्पनांविषयीं मला फारसा आदर नाहीं हें वाचकांच्या लौकरच दृष्टोत्पत्तीस येईल. पण असें असलें तरी ज्या विचारवंतांनीं या तत्वांना जन्म दिला त्यांच्याविषयीं मात्र मला अतिशय आदर आहे. अर्थशास्त्रांतल्या उणीवा मुळांतच चुकीचीं प्रमेयें मांडल्यामुळें निर्माण झालेल्या नाहींत. जुन्या व गैरलागू कल्पनांचा त्याग न केल्यामुळें त्या निर्माण झाल्या आहेत. जे विचार विशिष्ट परिस्थितींत उपयुक्त होते त्यांना सनातन तत्वांचें स्थान दिल्यामुळें हें असें झालें आहे. अशा तत्वांना स्थानभ्रष्ट करूं पहाणारा लेखक भांडखोर आणि कांहींसा उद्दाम आहे असें कोणालाही वाटण्याची शक्यता आहे. परंतु असा निर्णय उतावळेपणानें घेतला जाणार नाहीं असा विश्वास मीं बाळगतो. कमकुवत दरवाजावर रेलल्यामुळें जो मनुष्य अभावितपणें एखाद्या ठिकाणीं प्रवेश करतो तो आडमुठा आहे असा प्रवाद सुरू होतो. पण खरें म्हणजे या बाबतींत दोष काहींसा त्या कमकुवत दरवाजाचाही असतो.

स्वतःच्या पुस्तकाच्या मौलिकतेबद्दल लेखकांच्या कल्पना अतिरेकीं असणें स्वाभाविक आहे. मीं मात्र असें म्हणेन कीं इतर अर्थशास्त्रज्ञांना सुचले नसतील असे फारच थोडे विचार या पुस्तकांत आहेत. उपलब्ध माहितीमुळें आधींच अनेकांना हे विचार सुचले असतील आणि या पुस्तकांत केलेला त्या विचारांचा विस्तार त्यांना स्वागतार्ह वाटेल. पण आजकाल परिस्थितीच अशी आहे कीं सौम्य स्वरूपाची टीका करणारा मनुष्य देखील सिंहासारखा उग्र व घातक वाटावा. आजकाल सर्व प्रकारचे समाजशास्त्रज्ञ व सर्व राजकीय मतप्रणालीचें पुरस्कर्ते जें सोईस्कर व सर्वमान्य आहे त्याचा आश्रय करतात. वाद उपस्थित करणारा माणूस समाजाचें स्वास्थ्य विस्कळीत करणारा आहे असें आज मानलें जातें. स्वतंत्र प्रज्ञा ही अस्थिरतेची द्योतक ठरते. आणि संतुष्ट व परिटघडीचीं माणसें आपल्या सारख्याच इतरांना मार्गदर्शन करतात. आजचें हें वातावरण ज्यांना पसंत आहे त्यांना हें पुस्तक पचणार नाहीं. त्यांनीं तें न वाचतांच बाजूला ठेवावें हें बरें. कारण या पुस्तकात कांहीं उलटच्या दिशेला नेणारे विचार आहेत. आणि रुढ विचार जेथें सर्वमान्य आहेत अशा जगात ते बदसूर वाटणें स्वाभाविक आहे.

[४]

जे प्रश्न आपण हाताळतो त्यांचे अस्तित्वच किती क्षणभंगुर आहे हें समाज जीवनाच्या सर्वच अभ्यासकानां आजकाल जाणवल्याशिवाय रहात नाहीं. आतांपर्यंत जें

दारिद्र्य त्याच्या नशिबीं लिहिलेलें होतें त्याच्या मगरमिठींतून पाश्चात्त्य माणूस ह्या क्षणीं तरी मुक्त झाला आहे. पण थोड्याशा आण्विक स्फोटांचा अमानुष चकचकाट त्याला पुनश्च भुकेकंगाल करूं शकेल – अर्थात् तो जगलावांचला तर. हें भीषण भवितव्य कसें टाळता येईल त्यावर हें पुस्तक थोडाफार प्रकाश टाकील अशी मला उमेद वाटते. भ्रामक कल्पना हा एक सर्वव्यापी दोष आहे. एखादा श्रीमंत मनुष्य भ्रामक कल्पनांच्या आहारीं जाऊन जर भटक्या वैराग्यासारखा वागूं लागला तर त्यामुळें त्याची संपत्ती शिल्लक राहील हें खरें, पण त्याला सुख लागणार नाहीं. त्याचप्रमाणें कोण्या एका दारिद्र्यानें ग्रासलेल्या कालखंडाला लागू पडणाऱ्या नियमांनुसार जर एखादा संपन्न समाज आपल्या जीवनाची आंखणी करूं लागला तर तो अनेक संधींना मुकेल आणि अडचणींच्या वेळीं स्वतःविषयींच्या गैरसमजामुळें तो हटकून चुकीच्या उपाययोजना करील. आपण आज हेंच नको तितक्या प्रमाणांत करीत आहोंत हें या पुस्तकाच्या वाचकाच्या निदर्शनास येईल.

पण म्हणून फार विषण्ण होणें चुकीचें ठरेल. स्वतःचें स्वरूप ज्याला समजलें नाहीं अशा संपन्न समाजाचे प्रश्न गंभीर स्वरूपाचे असूं शकतात. इतकेंच नव्हे तर त्याची संपन्नताही ते विनाकारण धोक्यात आणूं शकतात. पण गरीब देशांच्या प्रश्नांइतके कांहीं ते सहसा गंभीर नसतात. या गरीब देशांचें दारिद्र्य इतकें उग्र असतें कीं त्यांना भ्रामक कल्पनांत गुरफटून रहाण्याची चैन अजिबात परवडत नाहीं. आणि दुर्दैव असें कीं त्यांच्या प्रश्नांवर तोडगे देखील सांपडत नाहींत.

प्रकरण दुसरें

सांकेतिक शहाणपण

आजच्या आर्थिक व सामाजिक जीवनाचें स्वरूप जर समजून घ्यायचें असेल तर चालू घडामोडी व त्यांचा अर्थ लावणाऱ्या विचारधारा यांचे परस्पर संबंध आपण तपासले पाहिजेत. कारण या दोन्हीं गोष्टींना स्वतःचें असें स्वतंत्र अस्तित्व असतें आणि दीर्घकाल त्या परस्परांशीं फटकून राहूं शकतात. हें विधान वदतोव्याघाता सारखें असलें तरी सत्य आहे.

हें असें का तें शोधून काढणें कांहीं अवघड नाहीं. समाज जीवनाच्या इतर अंगाप्रमाणेंच त्याच्या आर्थिक अंगाचें स्वरूपही साधें व सुसंगत नसतें. उलट तें विस्कळीत, अर्धस्फुटित व आणि अगम्य आहे असेंच बहुधा भासतें. परंतु तरी माणसाच्या आर्थिक आचरणाची कारणमीमांसा करणें व तिचा अर्थ लावणें आवश्यक असते. कारण आपल्या जीवनाच्या या महत्त्वाच्या अंगाविषयीं इतकें विनघोरपणें अजाण असणें माणसाला रुचत नाहीं. त्याचें कुतूहल व नैसर्गिक अहंभाव त्याला स्वस्थ राहूं देत नाहींत.

आर्थिक व सामाजिक घटनांचें क्षेत्र असें दुर्गम आहे. प्रत्यक्षांत आहे काय आणि नाहीं काय तें ठरविण्याचें ठाम असें निकष त्या क्षेत्रांत फार थोडे आहेंत. पण त्यामुळेंच माणसाला निसर्गविज्ञानाच्या क्षेत्रांत न मिळणारी अशी एक सवलत या क्षेत्रांत मिळते. ती म्हणजे आपल्याला जें रुचतें तें खरें मानण्याची. आपल्याला रुचेल अशी कोणतीही बरीवाईट भूमिका तो या क्षेत्रांतल्या जीवनाविषयीं घेऊं शकतो.

याचा परिणाम असा होतो कीं सामाजिक जीवनाच्या केवळ लोकांना रुचणाऱ्या मीमांसा आणि वस्तुनिष्ठ मीमांसा या दोहोंत सारखी न संपणारी चुरस लागलेली असते. या चुरशींत वस्तुनिष्ठ मीमांसा एकंदर रणनीतीच्या दृष्टीनें वरचढ असतात हें खरें. परंतु लढाईच्या तत्कालीक डावपेचांत लोकप्रिय मीमांसांचाच वरचष्मा होतो. कोणताही श्रोतृवृंद आपल्या पसंतीस जें उतरतें त्याचेंच टाळ्यांच्या गजरांत स्वागत करतो. आणि सामाजिक मीमांसेच्या क्षेत्रांत सत्यापेक्षां लोकप्रियताच मीमांसकांवर अधिक प्रभाव पाडते. कठोर, व विदारक सत्यच आपण सांगणार अशी जाहीर प्रतीज्ञा करणारा वक्ता अगर लेखक देखील अखेर लोकाना जें रुचतें त्याचेंच विवरण करतो.

सत्य हें जरीं सरते शेवटीं एकवाक्यता निर्माण करीत असलें तरी तात्पुरती एकवाक्यता लोकप्रियतेंतून देखील साधली जाते. जें एकंदर समाजाला अगर त्यांतील विशिष्ट गटांना रुचतें त्याच्या पायावरच विचारांचें इमले उभे रहातात. आणि प्रयोगशाळेंतला संशोधक ज्याप्रमाणें शास्त्रीय सत्याच्या शोधांत मग्न असतो त्या प्रमाणेंच भाडोत्री लेखक आणि जनतासंपर्क अधिकारी लोकप्रिय काय आहे त्याचा मागोवा घेत असतात. जर त्यांच्या गिऱ्हाइकानां टाळ्या मिळाल्या तर हे कारागीर कसबी ठरतात. नाहीं तर अपयश त्यांच्या पदरीं येतें. पण श्रोत्यांच्या प्रतिक्रियांचे कांहीं नमुने आगाउच पारखून किंवा लेख, भाषणें इत्यादींचीं पूर्व तपासणी करून अपयशाचा हा धोका आतां पुष्कळसा टाळता येतो.

कोणतेही विचार लोकांच्या पसंतीस उतरण्यास अनेक गोष्टींचें सहाय्य होतें. जें सोईस्कर असतें, स्वहिताशीं अधिकांत अधिक जुळणारें असतें, ज्यामुळें अवघड परिश्रम किंवा जीवनातील त्रासदायक विक्षेप टाळता येतात, तें सत्य असें मानण्याकडे आपलः बहुतांशीं कल असतो. त्याचप्रमाणें आपलें आपल्यालाच ज्यामुळें अधिक कौतुक वाटतें तें चटकन आपल्या पसंतीस उतरतें. युनायटेड स्टेटस् चेंबर ऑफ कॉमर्समध्यें भाषण करणारे वक्ते उद्योगपतींच्या आर्थिक कर्तृत्वाचा अधिक्षेप क्वचितच करतात. आणि ए. एफ्. एल.–सी. आय्. ओ. सारख्या मजूर संघटनेत जे लोक वक्तव्य करतात ते समर्थ मजूर संघटना हें सामाजिक प्रगतीचें गमक आहे असेंच गृहित धरतात. पण सर्वांत अधिक महत्वाची गोष्ट कदाचित् ही असेल कीं लोकांना जें नीटपणें समजतें तें त्यांना सर्वांत जास्त आवडतें. आपण आतांच पाहिलें कीं सामाजिक व आर्थिक व्यवहार गुंतागुंतीचे आणि समजायला अवघड असतात. त्यामुळें जे विचार आपल्या आकलनाच्या आवाक्यातले असतात त्यांना आपण चिकटून रहातो. ही गोष्ट प्रस्थापित हितबंधांच्या अस्तित्वाची निदर्शक आहे. कारण बौद्धिक क्षेत्रातले जे प्रस्थापित हितबंध असतात त्यांची जपणूक माणसें फार अटीतटीनें करतात. जें आपण प्रयत्नपूर्वक शिकलों त्याचें रक्षण करण्यासाठीं माणसें जेव्हां पुढें सरसावतात तेव्हां तीं अनेकदां जणुं धर्मप्रेमानें झपाटल्यासारखीं वागतात. मानवी व्यवहाराच्या कांहीं क्षेत्रांत अतिपरिचयामुळें अवज्ञा होते हें खरें. पण हा अतिपरिचय सामाजिक विचारधारांना मान्यता मिळण्यासाठीं अत्यंत आवश्यक असतो.

असें असल्यामुळें समाजानें एकदां मान्य केलेल्या विचारधारा अगदीं दृढमूल होतात. आणि त्या विचारधारा कशा वहातील ह्याचा अगदीं अचूक अंदाज बांधणें शक्य असतें. अशा प्रकारच्या मान्यता पावलेल्या विचारधारांना स्वतंत्र नांव देणें

आपल्याला सोईचें पडेल. तें नांव असें असायला हवें कीं त्यावरून या विचारधारा ठरीव स्वरूपाच्या असतात हें स्पष्ट व्हावें. या दृष्टीनें या विचारधारांना यापुढें मीं सांकेतिक शहाणपण असें नांव देणार आहे.

[२]

सांकेतिक शहाणपण ही कांहीं एका विशिष्ट राजकीय गटाची मालमत्ता नसते. पुष्कळशा आधुनिक सामाजिक प्रश्नांवावत् कमालीची एकवाक्यता आहे हें या पुस्तकात पुढें स्पष्ट होणारच आहे. ज्यांना आपण उदारमतवादी म्हणतो त्यांच्यांत आणि परंपरावाद्यांत तसा फारसा भेद नाहीं. स्वीकारार्ह काय या बाबतचे दोघांचे निकष जवळ जवळ एकच आहेत. कांहीं प्रश्नांच्या संदर्भात मात्र विशिष्ट गटाच्या राजकीय कलानुसार संबंधित विचारधारांत फेरफार करावे लागतात. असे फेरफार जाणुनबुजून अगर अजाणता करण्याची प्रवृत्ती वेगवेगळ्या राजकीय गटात साधारणपणें सारख्याच प्रमाणात असते. परंपरावाद्याचा स्वभावधर्म जें परिचित आणि स्थानापन्न असतें त्याला चिकटून रहाण्याचा असतो. आणि असें करण्यात बहुधा त्याचा आर्थिक फायदाही असतो. स्वीकार्यतेचा त्याचा निकष हा असा असतो. परंतु जो उदारमतवादी असतो तो आपल्या परिचित व आवडत्या विचारधारांना तीव्र नैतिक भावनेची जोड देतो. त्याला शिरोधार्य वाटणाऱ्या विचारधारा परंपरानिष्ठांच्या विचारधारांहून वेगळ्या असतात हें खरें. पण त्या परिचित वळणाच्या आहेत म्हणून स्वीकारार्ह आहेत अशीच त्याचीही ठाम भूमिका असते. जर कोणी मौलिक व म्हणून वेगळे विचार मांडले तर उदारमतवादी त्याला तत्वच्युत आणि अंगचोर ठरवतो. ज्याचे विचार विशिष्ट आडाख्यानुसार चालतात तोच चांगला, सच्चा किंवा तावूनसुलाखून निघालेला उदारमतवादी असें मानलें जातें. याचाच अर्थ असा कीं स्वतंत्र प्रज्ञेनें विचार करण्याचा गंभीर असा प्रयत्नच करायचा नाहीं असें उदारमतवाद्यानें ठरवलेलें असतें. अलीकडे अमेरिकेच्या उदारमतवाद्यांनीं आणि ब्रिटनमधील तत्सम डाव्या गटाच्या मंडळींनीं आपण नव्या कल्पनांच्या शोधात आहोत असा पुकारा केला आहे. आणि अंशतः तरी या पुकाऱ्यानेच त्यांची नवविचारांची गरज भागल्यासारखी झाली आहे.

तेव्हां आवश्यक तेथें परंपरावाद्यांचें सांकेतिक शहाणपण आणि उदारमतवाद्यांचें सांकेतिक शहाणपण असें शब्दप्रयोग आपण करायला हरकत नाहीं.

हें सांकेतिक शहाणपण युक्तिवादाच्या सर्व पातळ्यांवर व्यक्त होतें. समाजशास्त्रीय विद्वत्तेच्या सर्वोच्च पातळीवर मांडणींतल्या अगर निवेदनांतल्या नाविन्याला विरोध तर नसतोच. उलट चिरपरिचित सत्य नवीन स्वरूपात मांडणें हें कौतुकास्पद

समजलें जातें आणि एखाद्यानें वारीक सारिक मतभेद धिटाईनें व्यक्त केले तर त्याची वाहवा होते. शिवाय ज्या जोषानें मामुली वादगें लढवलीं जातात त्यामुळेंच प्रस्थापित विचारधारांच्या मूलभूत प्रमेयांवद्दल शंका घेण्याचें टाळतां येतें. आणि तरी आपली भूमिका अशास्त्रीय व संकुचित ठरण्याचा धोका रहात नाहीं. पुन्हां वादगांमुळें प्रस्थापित विचारधारा अधिकाधिक गुंतागुंतीच्या व विस्तृत होत जातात. त्यांच्यावर लिहिलेल्या ग्रंथांची यादी लांबलचक होत जाते. त्यांच्याभोवतीं एक गूढ वलय निर्माण होतें. यामुळें सांकेतिक शहाणपणावर कोणी टीका करूं लागला तर त्याला त्यातील सूक्ष्मातिसूक्ष्म विचार समजलेलेच नाहींत असा युक्तिवाद त्या शहाणपणाचे पुरस्कर्ते करूं शकतात. खरें म्हणजे या विचारधारा परंपरानिष्ठ, थंड व धिम्या वृत्तीच्या माणसालाच समजूं शकतात. थोडक्यांत म्हणजे सांकेतिक शहाणपण ज्याच्या अंगी मुरलेलें आहे त्यालाच तें कळूं शकतें. शिवाय जेथें गाढ विद्वत्ता असते तेथें सांकेतिक शहाणपण देखील असतेंच असा समज निर्माण केला जातो. आणि त्यामुळें सांकेतिक शहाणपणाला स्थानभ्रष्ट करणें जवळ जवळ अशक्यच होतें. जो स्वतंत्रप्रज्ञ असतो त्याची वृत्ती जुनें डावलून बेधडकपणें नव्याकडे जाण्याची असते. आणि या वृत्तीमुळेंच तो नालायक ठरवला जातो. कारण तो विद्वान असता तर सांकेतिक शहाणपणाला चिकटून नसता का राहिला ?

असें असूनही सांकेतिक शहाणपणाच्या ज्या उच्च पातळ्या असतात तेथें स्वतंत्रप्रज्ञा तत्वतः फार मोलाची समजली जाते. तत्वतः म्हणजे तिनें मूर्त स्वरूप घेतलें नाहीं तोंपर्यंत. आणि त्यामुळें सांकेतिक शहाणपण पुष्कळदां स्वतंत्र प्रज्ञेचा जोरदार पुरस्कार करून त्याच्या द्वारें खुद्द स्वतंत्र प्रज्ञेची उणीव भरून काढतें.

[३]

सांकेतिक शहाणपणाचें प्रमुख लक्षण हें कीं तें सर्वांना रुचणारें असतें. ज्यांच्यासाठीं तें उच्चारलें जातें त्या सर्वांना तें पसंत असतें. आपल्याला जें रुचतें तें शब्दांकित व्हावें असें जें लोकांना वाटतें त्याला अनेक कारणें असतात. त्यामुळें आत्मश्लाघेची इच्छा तृप्त होते. आपलीं जीं मतें आहेत तींच इतर प्रख्यात मंडळींचीं आहेत असें दिसून आले कीं माणसाला समाधान वाटतें. शिवाय त्यांचीं मतें ऐकून स्वतःविषयीं अधिक खात्री वाटूं लागते. विचारांच्या क्षेत्रांत आपण एकटेच कुठें तरी मागे पडलेलो नसून आपल्याला मान्यवरांचें पाठबळ आहे असें त्याला दिसून येतें व संतोष वाटतो. शिवाय माणसाची जी स्वमत प्रचाराची ओढ असते तिची तृप्ती देखील सांकेतिक शहाणपण करीत असतें. कारण सांकेतिक शहाणपणाच्या द्वारें त्यांचे विचार इतर लोकांच्या कानावर पडत असतात. त्यानीं ते प्रभावित होत असतात.

एक परीनें सांकेतिक शहाणपणाचा उच्चार हें धर्मकृत्य आहे. पोथ्यांचें पठण करून अगर मंदिरांत जाऊन आपल्या श्रद्धेचा पुनः पुनः उच्चार करण्यासारखेंच तें आहे. दुपारच्या खान्याच्या वेळीं खाजगी उद्योगधंद्याचें गुणगान आणि वॉशिंग्टनच्या सरकारचें दोषदर्शन करणारें भाषण ऐकणाऱ्या उद्योगाचालकांना त्या भाषणातले मुद्दे आधींच पूर्णपणें पटलेले असतात. आणि जरी एकाग्रतेचा देखावा करणें आवश्यक असलें तरी तें भाषण खरोखर ऐकण्याची कांहीं त्या चालकांना गरज नसते. पण ह्या कर्मकांडात सहभागी होऊन ते आपल्या देवतांना खात्रीनें संतुष्ट करतात. आणि त्या भाषणाला उपस्थित राहून, तें एकाग्रपणें ऐकून अखेर टाळ्यांचा गजर केल्यामुळें त्या चालकांना आपण अधिक सुरक्षित आहोत असें वाटतें. आपली अर्थव्यवस्था अधिक मजबूत झाल्यासारखें वाटतें. याच कारणास्तव, ज्ञानाचे साधक देखील विद्वत्सभा भरवतात आणि तेथें पूर्वपरिचित विचारांची देखण्या शब्दांत केलेली उजळणी ऐकतात. मात्र हें कर्मकांड क्षुल्लक मानण्याचें कारण नाहीं कारण नवें ज्ञान देणें हा मुळीं त्याचा हेतूच नसतो. ज्ञान आणि ज्ञानाचे साधक यांना प्रतिष्ठा प्राप्त करून देण्यासाठीं त्याची योजना असते.

सांकेतिक शहाणपणाच्या उच्चाराला एवढी मोठी मागणी असल्यामुळें आपलें सामाजिक वावतींतलें मतप्रदर्शन बहुतांशीं ही मागणी पुरविण्याचें कार्यच करीत असतें. कांहीं अंशी त्याला आतां एका व्यवसायाचें स्वरूप प्राप्त झालें आहे. आपल्या श्रोतृवर्गाला जें रुचतें तें नेटकेपणानें आणि अगदीं मनोभावानें कसें सांगावें त्याचा अभ्यास करणें हा अनेकांचा आज व्यवसाय झाला आहे–विशेषतः टेलिव्हिजन व रेडिओ यांच्या द्वारें वक्तव्यें करणाऱ्यांचा. परंतु सामान्यतः सांकेतिक शहाणपणाचा उच्चार करण्याचा खरा अधिकार निरनिराळ्या क्षेत्रांतील उच्चपदस्थांचा असतो. उदाहरणार्थ, कोणतीही व्यक्ती एखाद्या कॉलेजच्या अगर विश्वविद्यालयाच्या अध्यक्षपदावर विराजमान झाली कीं सांकेतिक शहाणपणाचीं सूत्रें सांगण्याचा अधिकार तिला प्राप्त होतो. विद्येच्या क्षेत्रांत उच्च स्थान प्राप्त केल्यावद्दलचें तें पारितोषिक असतें. आणि गंमत अशी कीं सांकेतिक शहाणपणाची सूक्ष्म व सफाईदार मांडणी करणारीं प्रवचनें दिल्यामुळेंच हीं उच्च स्थानें प्राप्त होतात.

सांकेतिक शहाणपण विशद करणारीं वक्तव्यें करणें ही मुळीं सरकारी क्षेत्रांतील उच्चपदस्थाची जवाबदारीच असते. अधिकारस्थान ग्रहण करण्यापूर्वी त्याला कोणी फारसें महत्त्व देत नाहीं. पण एकदां कां तें स्थान त्याला मिळालें कीं तो मोठा मर्मज्ञ आहे असें गृहीत धरलें जातें. तो आपलीं भाषणें अगर लेख स्वतः क्वचितच लिहितो. आणि जे कोणी ती तयार करतात ते तीं लोकांना रुचतील अशी डोळ्यांत

तेल घालून काळजी घेतात. ही एकच कसोटी त्यांना लावली जाते. आर्थिक अगर राजकीय परिस्थितीचें साधें सत्यदर्शन त्यांच्या द्वारें व्हावें अशी कसोटी जर कोणी तेथें लावूं लागला तर तो कमालीचा विक्षिप्त आहे असें मानण्यांत येईल.

त्याचप्रमाणें उद्योगधंद्यांच्या क्षेत्रात जो यशस्वी होतो त्याला देखील सांकेतिक शहाणपण विशद करण्याचा खास अधिकार प्राप्त होतो. युनायटेड स्टेटस् स्टील कॉर्पोरेशन, जनरल मोटर्स किंवा रेडिओ कॉर्पोरेशन ऑफ अमेरिका यासारख्या कोणत्याही मोठ्या कॉर्पोरेशनच्या प्रमुखाला हा अधिकार प्राप्त होतो. आणि उद्योगधंद्यांचें धोरण आणि अर्थशास्त्र या विषयांवर तो जितक्या अधिकारानें बोलूं शकतो तितक्याच अधिकारानें राजसत्तेचें समाजांतील स्थान, परराष्ट्रीय धोरणाचीं मूलतत्त्वें आणि उदार शिक्षणाचें स्वरूप या विषयांवरही बोलूं शकतो. अलीकडे तर असें प्रतिपादन केलें जातें कीं सांकेतिक शहाणपण विशद करणें हा उद्योगचालकांचा केवळ खास अधिकार नसून ती त्यांची जबाबदारी देखील आहे. या दृष्टीनें पुढील अवतरण पहाण्यासारखे आहे. 'उद्योगचालकानीं भाषणें केली पाहिजेत आणि लेख लिहिले पाहिजेत अशी आतां माझी खात्री पटली आहे. त्या योगानें स्वतंत्र उद्योग-धंद्यावर आधारलेल्या जीवनांवर आमची जी निष्ठा आहे तिचा स्फूर्तिदायक संदेश आम जनतेला देतां येईल...जर अमेरिकन उद्योगधंद्यांच्या क्षेत्रातून सुबुद्ध आणि द्रष्ट्या विचारांचा प्रचंड ओघ बाहेर पडूं लागला तर माणसांचीं मनें जिंकण्या-साठीं जो झगडा चाललेला आहे त्यावर त्याचा केवढातरी परिणाम होईल.'[१]

[४]

नवे विचार नव्हे तर घटनांची दौड हा सांकेतिक शहाणपणाचा खरा शत्रू असतो. सांकेतिक शहाणपण ज्या परिस्थितीचा अर्थ लावायचा असतो तिच्याशीं इमान राखत नाहीं. तर त्या परिस्थितीविषयी लोकांचा जो दृष्टिकोन असतो त्याच्याशीं इमान राखतें. आणि जग बदलत असलें तरी त्याविषयींच्या रूढ व सोईस्कर भूमिकेलाच लोक चिकटून रहात असल्यामुळें, सांकेतिक शहाणपणा जुनाट व टाकाऊ होण्याचीच शक्यता असते. ही गोष्ट कांहीं तावडतोब घातक ठरत नाहीं. ज्यावेळीं एखादें आकस्मिक संकट पुढें उभें रहातें आणि जुनाट व निरुपयोगी झालेलें सांकेतिक शहाणपण जेव्हां त्याला तोंड देण्यास असमर्थ ठरतें तेव्हां त्या शहाणपणाचें मरण ओढवतें. प्रत्यक्षांतल्या जगापासून ज्यांची फारकत झालेली आहे अशा विचारधारांचा अंत हा केव्हांना केव्हांतरी असाच होतो. ही वेळ ठेपली कीं

---

[१] क्लॅरेन्स बी. रँडल. अ क्रीड फॉर फ्री एन्टरप्राइज (बॉस्टन, ॲटलँटिक-लिटल ब्राउन १९५२) पृ. ३,५.

एखादी व्यक्ती पुढें सरसावते आणि प्रस्थापित विचारधारांचा टाकाऊपणा नाट्यपूर्णपणें लोकांसमोर मांडते. सांकेतिक शहाणपणाला पदच्युत करून त्याच्याजागीं नव्या विचारधारांना स्थानापन्न करण्याचें श्रेय अशा व्यक्तीला मिळतें. पण खरें म्हणजे परिस्थितीनें जें स्पष्ट केलें तें शब्दांकित करण्याचें कार्यच केवळ त्या व्यक्तीनें केलेलें असतें. अर्थात् ही कामगिरी देखील कांहीं लहानसहान नव्हे. इतकें झालें तरी सांकेतिक शहाणपण मात्र शरण येण्यापेक्षां मरण पत्करतें. आणि त्याचे जे एकेकाळीं शहाणे ठरलेले प्रवक्ते असतात त्यांना समाज निष्ठूरपणानें बुरसटलेले थेरडे म्हणूं लागतो.

घटनांचा हा क्रम कसा अपरिहार्य आहे तें अनेक नवीजुनीं उदाहरणें घेऊन सिद्ध करता येईल. १७७६ पूर्वी कित्येक दशकें लोक उदारमतानुवर्ती राज्याचीं स्वप्नें पहात होते. सरकारनें संरक्षण व मार्गदर्शन यांची पराकोटी करण्याऐवजीं आपल्या व्यवहारात कमीतकमी ढवळाढवळ केली तर त्यामुळेंच आपलें खरें हित होईल हें इंग्लंड, युरोपांतले सकल देश व अमेरिकन वसाहती येथील व्यापाऱ्यानीं कधींच ओळखलें होतें. त्याचप्रमाणें देशाचें सामर्थ्य सांकेतिक कल्पनानुसार सोन्याच्या सांठवणुकीवर अवलंबून नसतें तर खुल्या व्यापारउदीमांतून निर्माण होतें हें देखील तेव्हां स्पष्ट झालें होतें. डर स्वतंत्रप्रज्ञानीं हा विचार मांडून टाकला होता. व्हॉल्टेरनें त्यावेळीं म्हटलें होतें 'इंग्लिश लोक व्यापारात पडल्यामुळेंच लंडन पॅरिसपेक्षां विस्तारानें आणि लोकसंख्येनें मोठें शहर झालें आहे; (आणि त्याच कारणानें) इंग्रज दोनशें युद्धनौका समुद्रात उभ्या करूं शकतात व दोस्त राष्ट्रांना आर्थिक सहाय्य देऊं शकतात.'[१] अमेरिका ज्या वर्षी स्वतंत्र झाली त्यावर्षी ॲडम स्मिथनें हे विचार अखेर सुसूत्रपणें मांडले. पण जुन्या सूत्रपणात मुरलेल्या मंडळींना ॲडम स्मिथचा 'वेल्थ ऑफ नेशन्स' हा ग्रंथ नापसंत होता, धोकादायक वाटत होता. अलेक्झँडर हॅमिलटन १८०४ सालीं वारला तेव्हां जेम्स केन्टनें एक शोकपर कविता लिहिली. तींत जेम्स केन्टनें ॲडम स्मिथच्या भोंगळ विचारांना विरोध केल्याबद्दल हॅमिल्टनचा गौरव केला होता. खुल्या समाजव्यवस्थेची कल्पना वेछूटपणाची आहे असे गंभीर इशारे आणखी एक पिढी जाईपर्यंत पश्चिम युरोपांत दिले जात होते.

नंतर एकोणिसाव्या शतकात अभिजात स्वरूपातल्या उदारमतवादाला सांकेतिक शहाणपणाचें स्थान मिळालें. आणि मग कारखान्यांचे कायदे, मजूर संघटना, सामाजिक विमायोजना व इतर सामाजिक कायदे कसे अत्यंत विघातक ठरतील

---

[१] 'टेन्थ फिलॉसॉफिकल लेटर' हेन्रि से यानें 'मॉर्डर्न कॅपिटॉलिझम' या ग्रंथात उद्धृत केलेलें (न्यूयॉर्क, ॲडेलफी १९२८) पृ. ८७.

त्यावद्दल गंभीर इशारे दिले जाऊं लागले. पण तरी लोकांना संरक्षण व सुरक्षितता या गोष्टी फार तीव्रतेनें हव्या होत्या. तसेंच सौदे करण्याच्या सामर्थ्यांत थोडा बहुत तरी समतोलपणा हवा होता. आणि या त्यांच्या इच्छा दडपणें अशक्य झालें. अखेर सांकेतिक शहाणपण या परिस्थितींतून मार्ग काढण्यास असमर्थ ठरलें. मग वेब पतिपत्नी, लॉइड जॉर्ज, लाफॉलें, रूझवेल्ट, वीव्हरिज् इत्यादि मंडळींनी सत्य परिस्थिती समाजाला मान्य करायला लावली. आणि त्यातून आजचें कल्याणकारी राज्य निर्माण झालें. वरील कायद्यानीं भांडवलशाहीला सभ्य आणि सौम्य केलें व त्यामुळें ती टिकून राहूं शकली अशी भूमिका आतांचें सांकेतिक शहाणपण घेतें. तरीपण अभिजात उदारमतवादापासून समाजानें घेतलेली फारकत विघातक ठरेल असे इशारे अजून ऐकूं येतातच.

अर्थसंकल्प संतुलित असावा या सांकेतिक शहापणाच्या कल्पनेला प्रत्यक्षातल्या घटनानीं असाच तडाखा हाणला. संघटित सरकारांच्या उदयकाळापासून आयव्ययाची बरोबरी असावी हें तत्व प्रस्थापित झालें होतें. सार्वजनिक तिजोरीचे व्यवहार शहाणपणानें करायचे असतील तर ह्या तत्वाचा भंग करता कामा नये हें सर्वमान्य झालें होतें. उघळपट्टी करण्याची जी राजांची आणि प्रजासत्ताकांचीही प्रवृत्ती असे तिला ह्या तत्वामुळें आळा बसे. हा नियम मोडला तर त्याचे दीर्घकालीनच नव्हे तत्कालिक परिणाम देखील हानिकारक असत. अशा परिस्थितींत पूर्वीची राज्यें चलना नाण्यांचा आकार लहान करीत अगर त्यांत हीण मिसळत व अशा तऱ्हेनें शिलकीत पडलेलें सोनें अर्थसंकल्पातील तूट भरून काढण्या करितां वापरीत. असें केलें कीं किंमती अपरिहार्यपणें वाढत असत व राष्ट्रांची प्रतिष्ठा कमी होत असे. त्या नंतरच्या काळांत कागदी नोटांचा पुरवठा वाढवून अगर बँकांकडून स्वल्प दरानें कर्ज घेऊन अशा प्रकारची तूट भरून काढण्यात येत असे आणि ह्याचे परिणाम तितकेच वाईट होत असत. त्यामुळें दर वर्षीचा अर्थसंकल्प संतुलित ठेवण्यावर सांकेतिक शहाणपण अत्यंत भर देत असे.

दरम्यान् वस्तुस्थिती मात्र हळुहळु बदलत होती. अर्थसंकल्प संतुलित असावा हा नियम आर्थिक बाबतींत नित्य अगर वारंवार बेजबाबदारपणें वागणाऱ्या सरकारांकरितां घालून दिलेला होता. गेल्या शतकापर्यंत सारींच सरकारें अशीं असत. मात्र नंतर युनायटेड स्टेटस्, इंग्लंड आणि ब्रिटिश राष्ट्रकुल या राष्ट्रांत व अन्यत्रही सरकारें आपलें व्यवहार हिशोबीपणानें करूं लागली. असें झाल्यावर आर्थिक सुरक्षिततेसाठीं त्यांना अप्रस्तुत नियमांच्या चौकटींत जखडून ठेवण्याची आवश्यकता नाहींशी झाली.

त्याच सुमारास जबरदस्त मंदीचे तडाखे जगावर बसूं लागले. ह्या मंदीच्या काळात उत्पादनांचीं साधनें व मजूर यांच्यात प्रचंड प्रमाणांत बेकारी माजत असे. त्यामुळें तुटीचें अर्थसंकल्प करून सरकारी खर्च वाढवला—नाणीं लहान करून त्यामुळें शिल्लक राहिलेलें सोने खर्च करण्यासारखाच हा प्रकार—तरी त्यामुळें केवळ किंमतीच वाढत नसत, तर बेकार मजूर व उत्पादनाचीं साधने यांना पुन्हां काम मिळत असे. म्हणजेच या जादा खर्चामुळें किंमतींची उंची वाढण्यापेक्षां उत्पादनाचा विकासच अधिक प्रमाणात होत असे. ह्यामुळें किंमतींची वाढ ही एक इष्टापत्तीच ठरायची, घसरगुंडीला लागलेल्या अर्थव्यवस्थेला ती पुन्हां वर खेंचायची.

असें असलें तरी सांकेतिक शहाणपण संतुलित अर्थसंकल्पाचे गोडवे गात राहिलें, तुटीच्या अर्थसंकल्पामुळें केवढचा प्रचंड आपत्ती ओढवतील यावद्दल गंभीर इशारे देत राहिलें. आणि लोक त्याना माना डोलवीत राहिले. अखेर १९२९ सालच्या महामंदीचा तडाखा बसला तेव्हां हें शहाणपण जमीनदोस्त झालें. या मंदीमुळें मध्यवर्ती सरकारचें उत्पन्न एकदम घटलें. आणि त्याचवेळीं सरकारनें संकटग्रस्त जनतेला सहाय्य करण्यासाठीं वेगवेगळ्या मार्गांनीं अधिक खर्च करावा अशा मागणीचा दबाव वाढूं लागला. अशावेळीं अर्थसंकल्प संतुलित ठेवला असता तर त्यासाठीं कर वाढवावे लागले असते व सरकारी खर्च कमी करावा लागला असता आणि त्यामुळें सरकारी व खाजगी मागणी आणखी घटली असती. किंमती अधिकच कोलमडल्या असत्या, आणि बेकारी वाढली असती. थोडक्यांत म्हणजे जनतेवरील आपत्तींत भर घालण्याचा याहून अधिक चांगला मार्ग शोधूनही सांपडला नसता. पण तरी अर्थसंकल्प संतुलित ठेवणें ही सर्वोच्च महत्वाची गोष्ट आहे असाच आग्रह सांकेतिक शहाणपणाचे प्रवक्ते धरीत होते. १९३० च्या सुमारास प्रेसिडेंट हूव्हर असें म्हणत होते कीं 'अर्थसंकल्प, संतुलित ठेवण्याची आवश्यकता अगदीं निरपवाद आहे'...'मंदीतून मुक्त होण्याची ती गुरुकिल्ली आहे'...'तो अत्यंत आवश्यक आणि तांतडीचा उपाय आहे'....'त्याला पर्याय नाहीं'...'राष्ट्राची ती सर्वश्रेष्ठ गरज आहे'...'खाजगी व सरकारी क्षेत्रांतील आर्थिक स्थैर्याचा तो पाया आहे.'[१] आणि ही त्यांची भूमिका अर्थशास्त्रज्ञ व सामाजिक जीवनाचे व्यावसायिक भाष्यकार यानीं निखालसपणें मान्य केली. मंदीच्या सुरुवातीच्या वर्षात ज्यांचा ज्यांचा म्हणून सल्ला घेण्यांत आला त्या सर्वांनीं सांकेतिक शहाणपणाच्या आधारानें अशा कांहीं योजना सुचवल्या कीं त्यामुळें परिस्थिती अधिकच विकट व्हावी. उदारमतवादी व

[१] आर्थर एम् श्लेशिजर ज्यू. द क्रायसिस् ऑफ द ओल्ड ऑर्डर (बॉस्टन, हैटन मिफलिन १९५६) पृ. २३२.

परंपरावादी या दोघांचीही यावावतींत एकवाक्यता होतीं. १९३२ सालीं रूझवेल्ट निवडून आले ते देखील खर्च कमी करून अर्थसंकल्प संतुलित ठेवण्याचें आश्वासन देऊन. १९३२ सालीं उमेदवारीला मान्यता देतांना आपल्या भाषणांत रूझवेल्ट म्हणाले, 'कोणत्या ना कोणत्या मार्गानें खर्चाइतकेंच उत्पन्न आपण उभें करायला हवें. कोणतेंही कुटुंब काय किंवा सरकार काय एखाद्या वर्षी उत्पन्नापेक्षां थोडा अधिक खर्च करूं शकेल. पण हा प्रकार सारखा चालू राहिला तर अखेर अनाथाश्रमात आसरा घ्यायची पाळी येते.' सत्तारूढ झाल्यावर त्यांच्या सरकारानें काटकसरीची मोहीम सुरू केली व त्यासाठीं सरकारी नोकरांच्या पगाराला कात्री लावली. मिस्टर लेविस डब्ल्यू. डग्लस हे सांकेतिक शहाणपणाचे आदरणीय पुरस्कर्ते होते. आणि त्यानीं जणुं आपण धर्मयुद्ध लढवीत आहोत अशा अटीतटीनें अर्थसंकल्प संतुलित ठेवण्याचा प्रयत्न केला. अखेर ह्या मुद्यावर मतभेद झाला तेव्हां त्यानीं सरकारशीं असलेला आपला संबंध तोडून टाकला.

पण खरें म्हणजे परिस्थितीनें सांकेतिक शहाणपणावर केव्हांच मात केली होती. हूव्हर यांच्या अध्यक्षीय काराकिर्दीच्या दुसऱ्या वर्षातच अर्थसंकल्प संतुलित ठेवणें पूर्णपणें अशक्य झालें होतें. १९३२ सालीं सरणाऱ्या संकल्पवर्षातलें उत्पन्न खर्चाच्या निम्म्यानें देखील नव्हतें. मंदीच्या कालावधीत अर्थसंकल्प कधींच संतुलित नव्हता. पण १९३६ पर्यंत अर्थसंकल्पात तूट येणें कसें आवश्यक आणि हितकारकही आहे याला वैचारिक क्षेत्रांत मान्यता मिळाली नव्हती. त्या वर्षी जॉन मेनर्ड केन्स यानीं 'द जनरल थिअरी ऑफ एम्प्लॉयमेंट, इंटरेस्ट अँड मनी' या आपल्या पुस्तकाच्या द्वारें सांकेतिक शहाणपणावर विधीपूर्वक हल्ला चढविला. आणि त्यानंतर कोणत्याही परिस्थितींत व तेजीमंदीच्या कोणत्याही अवस्थेत अर्थसंकल्प संतुलित ठेवलाच पाहिजे ही सांकेतिक कल्पना मागे पडूं लागली. अर्थात् केन्सनें देखील सांकेतिक शहाणपणाचीं नवीं प्रमेयें निर्माण केलीं. त्यांपैकीं कांहीं आतां कशीं जुनाट व गैर-लागू होत आहेत तें आपण पुढें पाहूंच.

[५]

या पुढील पृष्ठांत सांकेतिक शहाणपण म्हणजेच मान्यता पावलेल्या विचारांची चौकट आणि तिचे प्रवक्ते यांचा पुन्हां पुन्हां उल्लेख येईल. हें उल्लेख केवळ अधिक्षेपाच्या भावनेनें केलेले आहेत असें मानणें अयोग्य ठरेल. (हा इशारा देण्याचें एक कारण असें कीं आपण विचारांतील नाविन्य फार मोलाचें समजतो पण प्रत्यक्षात मात्र त्याला प्रतिकार करतो. आणि म्हणून सांकेतिक कल्पनांना कसोशीनें चिकटून रहाणें आपल्याला महत्वाचे वाटते. पण या गोष्टीची वाहवा मात्र आपण करीत

नाहीं.) फार थोडीं माणसें पूर्णपणें निरुपयोगी असतात आणि सांकेतिक शहाणपणाचा पुरस्कर्ता देखील केवळ निरुपयोगी नसतो. साऱ्या विचारधारांना अगदींच मुक्तद्वार देणें समाजाच्या दृष्टीनें इष्ट नाहीं. सामाजिक विवेचनाच्या क्षेत्रांत नवीन विचार धोधों वहात असतात आणि त्या सर्वांचीच जर समाज गंभीरपणें दखल घेऊं लागला तर तें अनर्थकारक ठरेल. माणसें एकदां एका बाजूला झुकतील तर एकदां दुसऱ्या बाजूला. आणि आर्थिक व राजकीय जीवन सुकाणू नसलेल्या नांवेसारखें कोठेंतरी भरकटूं लागेल. कम्युनिस्ट देशांतील पद्धती अशी कीं अधिकृतपणें शिक्कामोर्तब केलेल्या सिद्धांतांना औपचारिकपणें चिकटून रहायचें आणि त्या योगें समाजाचे विचार व उदिष्टें यांना स्थीरता प्राप्त करून द्यायची. आपल्या समाजात या प्रकारची स्थीरता प्रस्थापित करण्याचें कार्य सांकेतिक शहाणपण अधिक औपचारिकपणें करतें. समाजाचा अवरोध व प्रतिकार यांच्यावर परिस्थितीच्या सहाय्यानें विजय मिळविण्याची ताकद ही कोणत्याही नव्या विचारधारेची एक कसोटी आहे. आणि ह्या कसोटीसाठीं लागणारा अवरोध व विरोध सांकेतिक शहाणपणांतून निर्माण होतो.

सांकेतिक शहाणपणाचा पुरस्कर्ता ही एक दयनीय व्यक्ति असते असें मानणें देखील चुकीचें आहे. तो उपयुक्त असें सामाजिक कार्य तर करतोच पण त्याचबरोबर जीवनाशीं त्यानें चांगल्या प्रकारें जमवून घेतलेलें असतें. आपण समाजाग्रणी आहोत असें तो रास्तपणें मानूं शकतो. कारण समाजाला रुचेल अशा प्रकारें त्यानें आपल्या विचारांची जुळणी केलेली असते आणि म्हणून समाज खरोखरच त्याची वहावा करीत असतो. ह्या प्रशंसेच्या बळावर त्रासदायक विरोधी विचारांना तो खंबीरपणें तोंड देऊं शकतो. भविष्यकाळांत मामुली ठरलों तरी चालेल पण त्याच्या बदल्यांत आज मात्र सत्ता व प्रतिष्ठा हवी असा सौदा त्यानें जीवनाशीं केलेला असतो. चालू काळांत काँग्रेसच्या कमिट्या त्याची वारकाईनें नव्हे तरी आदरानें साक्ष घेतात, विश्वविद्यालयी मिरवणुकींत तो अग्रभागीं असतो, परिसंवादांना तो भाग घेत असतो; अमेरिकन असेंब्लीत तो आदरणीय मानला जातो आणि त्याच्या सन्मानार्थ मेजवान्या दिल्या जातात. विरोधी वस्तुस्थिती आपल्याला नामशेष करील हा धोका त्यानें पत्करलेला असतो. पण तसें व्हायच्या आधींच तो कालवश होण्याची शक्यता असते. सांकेतिक शहाणपणाच्या पुरस्कर्त्याची अवहेलना फक्त पुढली पिढी करते. आणि ती पिढी देखील त्याच्याकडे दुर्लक्ष करण्यापलीकडे वेगळें कांहीं करूं शकत नाहीं. इतकेंच असतें तर ठीक होतें. पण या संदर्भात अधिक गंभीर स्वरूपाचे प्रश्न उद्भवतात.

मराठी ग्रंथ संग्रहालय, डाण. स्थलम
अनुक्रम ७५५५१०९ दि: निबंध
जतांक २०९१ दि: 20/3/07

[६]

एखादा समाज पुनरुक्तीला अगदीं कंटाळला आहे असें आढळून आलेलें नाहीं. नित्य परिचित गोष्टींची मोठ्या डामडौलानें केलेली अखंड पुनरुक्ति पचवायची ताकद माणसानें कमावली आहे हें अगदीं स्पष्ट आहे. सामाजिक विचार व आचार यांतील सातत्याचें संरक्षण सांकेतिक शहाणपण या मार्गानें करीत असतें. आणि हें सातत्य किती दीर्घजीवी आहे तें आपण पुढील प्रकरणांत पाहूंच. परंतु जी विचार-धारा स्वभावतःच बदलत्या परिस्थितीशीं जुळतें घेत नाहीं आणि नाट्यपूर्ण धक्के देऊनच जिच्यांत बदल होऊं शकतात अशा विचारधारेंत कांहीं दोषच नव्हे तर धोकेही असतात. आर्थिक जीवनाच्या फार मोठ्या क्षेत्रांत बदलत्या वस्तुस्थितीमुळें–मुख्यतः आपल्या संपत्तींत व जनतेच्या जीवनमानांत झालेल्या वाढीमुळे–सांकेतिक शहाणपण अगदींच जुनाट व टाकाऊ ठरलें आहे. मानवी सुखसमाधानाच्या मार्गात तें आडवें येत आहे. इतकेंच नव्हे तर मानवी संस्कृतीच्या जीवनमरणाच्या व्यापक प्रश्नांवर तें आपला प्रभाव पाडत आहे. त्यामुळेंच या पुस्तकांत त्या सांकेतिक शहाणपणावर हल्ला केलेला आहे. खरें म्हणजे त्या शहाणपणाचा उच्चार करणें अधिक सुखकारक (आणि खूपच फायदेशीरही) झाले असतें. उलट त्यावरचा हल्ला बहुधा अपेशी ठरतो. असें असूनही हा हल्ला केलेला आहे. अर्थात् मीं अगदींच कांहीं निराशेच्या आधीन झालेलो नाहीं. कारण सांकेतिक शहाणपणावर वस्तुस्थिती जबरदस्त तडाखे हाणीत आहे. आणि अशा तडाख्यांनी तें शहाणपण खिळखिळें केलें कीं मगच नव्या विचारांना वाव मिळतो हें आपण आधींच पाहिलेलें आहे.

'आपल्यावर स्वामित्व असतें तें मुख्यतः विचारांचें, दुसरें कशाचेंच फारसें नसतें,' असें केन्सचें एक प्रसिद्ध वचन आहे. तात्कालिक दृष्टीनें हें खरें आहे. आणि आर्थिक हितसंबंधापेक्षां विचारधारा अधिक प्रभावी असतात हें त्याचें विधान विशेषच खरें आहे. पण विचारांचें साम्राज्य स्थितिशील समाजातच अबाधित रहातें. कारण विचार हे स्वभावतःच परंपरानिष्ठ असतात. ते नामोहरम होतात ते अन्य विचारांच्या हल्ल्यापुढें नव्हे तर वस्तुस्थितीनें केलेल्या जबरदस्त, दुर्दम्य आणि झंझावाती चढाईपुढें.

प्रकरण तिसरें

अर्थशास्त्रांतील नैराश्यग्रस्त परंपरा

पाश्चिमात्य मानवाच्या इतिहासांत ज्या वेळीं एक महत्वाचें मन्वंतर घडत होतें त्या वेळीं अर्थशास्त्राच्या सखोल अभ्यासाला सुरुवात झाली. आणि हें कांहीं केवळ यदृच्छेनें झालें नाहीं. कारण ह्याच काळांत पहिल्या प्रथम राष्ट्रांच्या संपत्तीची सातत्यानें वाढ होऊं लागली. इंग्लंड व हॉलंड यांसारख्या प्रगत देशांत संपत्तीची ही वाढ अठराव्या शतकांत केव्हांतरी सुरू झाली आणि त्यामुळें मानवी इतिहासांत एक नवा मनु निर्माण झाला. 'संबंध ज्ञात इतिहासाच्या काळात, म्हणजे ख्रिस्तपूर्व दोन हजार वर्षांपासून तों अगदीं अठराव्या शतकापर्यंत, जगातील सर्व सुसंस्कृत समाजांतील सामान्य माणसाचें जीवनमान पुष्कळसें स्थिर होतें. त्यांत चढउतार खात्रीनें झालें. युद्ध, दुष्काळ आणि रोगांच्या सांथीनीं त्याला वेळोवेळीं खाली खेंचलें. आणि कांहीं सोनेरी काळखंडात तें सुधारलेंही. पण त्यांत झपाटयाची वाढ अशी कधीं झालीच नाहीं.'[1]

वर निर्देशिलेल्या सोनेरी कालखंडांतील काहीं खंड तसे विस्तृत होते. उदाहरणार्थ, मध्ययुगीन इंग्लंडमध्यें अदमासें १३८० ते १८१० या काळांत कारागीरांची किंवा निदान कुशल कारागीरांची चांगलीच भरभराट झाली. परंतु नित्याप्रमाणें हा भरभराटीचा काळ संपुष्टांत आला. सोळाव्या शतकाच्या अखेरीस कारागिरांचा वेतनाची क्रयशक्ती निम्म्याहून अधिक घटली. यादवी युद्धाच्या स्वास्थ्यहीन काळांत ती अशी घटलेलीच होती. आणि त्यानंतर बराच काळपर्यंत तींत निश्चित अशी वाढ झाली नाहीं. त्यानंतर मात्र गेल्या शतकाच्या सुरुवातीच्या वर्षांतच कामगारांच्या वेतनांत वाढ होऊं लागली. आणि ती वाढ कांहीं खाचखळगे सोडल्यास आजतागाईत चालू आहे.[2]

---

[1] जे. एम्. केन्स, 'एसेज् इन परस्वेजन' आपल्या नातवंडांचें आर्थिक भवितव्य (लंडन, मॅकमिलन, १९३१) पृ. ३६०

[2] इ. एच. फेलप्स ब्राउन आणि शेला व्हि हॉपकिन्स, 'सेव्हन सेंचरीज ऑफ द प्रायसेस ऑफ कंझुमेबल्स, कंम्पेअर्ड विथ् विल्डर्स वेज रेटस्' इकॉनॉमिका, न्यू सीरीज्. व्हॉ. २३. क्र. ९२ (नव्हेंबर १९३६)

शतकानुशतकें ठाण मांडून वसलेल्या दारिद्र्यामागें कांहीं कारणपरंपरा होती. होती. आणि त्यानंतर जें मन्वंतर झालें त्यालाही तशींच कारणें होतीं. शेती व कुटीरोद्योग यांवर आधारलेल्या अर्थव्यवस्थेच्या उत्पादनक्षमतेला कांहीं नैसर्गिक मर्यादा असतात. आणि राष्ट्रीय राज्यें स्थापन होण्यापूर्वी या अर्थव्यवस्थेंत जी कांहीं शिल्लक पडत असे ती वेगवेगळे शस्त्रधारी हल्लेखोर लुटून फस्त करीत असत. खरें म्हणजे थोडी संपत्ती सांठली कीं ह्या हल्लेखोरांचा तावडतोव तिच्यावर डोळा जाई.

अठराव्या शतकाच्या उत्तरार्धांत कुटीरोद्योगांची जागा कारखाने घेऊं लागले. प्राथमिक अवस्थेंतलें तंत्र, तुटपुंजें भांडवल आणि यांत्रिक शक्तीचा अभाव यामुळें माणसाच्या उत्पादन क्षमतेवर ज्या मर्यादा पडत असत त्या दूर झाल्या. नवीं राष्ट्रीय राज्यें आपल्या प्रदेशांत सुव्यवस्थेचा अंमल यशस्वीपणानें करूं लागलीं. अजूनही सैन्यें राष्ट्रांच्या सीमा ओलांडत होतीं आणि जेथें जातील तेथें खूपशी नासधूस करीत होतीं. पण आधींच्या शतकात सामंतांचीं, लुटारूंचीं अगर धर्म-रक्षणासाठीं सिद्ध झालेलीं सैन्यें जो विध्वंस करीत असत त्यामानानें राष्ट्रीय सैन्यानीं केलेलें आर्थिक नुकसान फारच अल्प होतें दोन्ही जागतिक युद्धांनंतर पश्चिम युरोपांतील देशांचें जीवनमान पूर्वी कधींहीं नव्हतें इतकें वाढलें आहे. आणि उध्वस्त व पराभूत देशही याला अपवाद नाहींत. या उलट चंगीझखानानें अत्यंत कल्पकतेनें व सुसूत्रपणें जो विध्वंस, जी लुटालूट व ज्या कत्तली केल्या त्यांमुळें मध्यपूर्वेतले देश कायमचे नेस्तनाबूत झाले. आणि त्रिदशवार्षिक युद्धांत जो विध्वंस झाला व जी अव्यवस्था माजली त्यातून वर यायला जर्मनीला एक शतक लागलें. गेल्या महायुद्धांतला जर्मनीचा अनुभव याहून वेगळा आहे हें कांहीं मुद्दाम सांगायला नको- मात्र यापुढें जें आंतरराष्ट्रीय युद्ध होईल तें प्राचीन युद्धांइतकेंच विनाशक ठरण्याची शक्यता आहे.

अठराव्या व एकोणिसाव्या शतकांत जीवनमानात जरी क्रमशः सुधारणा होत गेली तरी तेवढ्यामुळें मानवानें ती सुधारणा अक्षय स्वरूपाची आहे असें मानलें नाहीं अगर पूर्वकालीन अनुभवांचे धडे तो चटकन विसरलाही नाहीं. तसें त्यानें केलें असतें तर ती नवलाची गोष्ट झाली असती. त्यानें तसें करूं नये याला आणखी एक कारण होतें. तें असें कीं औद्योगिक क्रांतीच्या प्रथमावस्थेत वाढत्या उत्पादन-क्षमतेपासून मिळणाऱ्या उत्पादनाची विभागणी फारच विषमतेनें होत होती. तेव्हां सर्वत्र गाजत असलेली संपत्ती नव्यानें उदयाला आलेल्या उद्योगपतींची होती; त्यांच्या कामगारांची नव्हे. कारखाने, कच्चा माल, लोहमार्ग आणि बँका यांचे जे

मालक होते ते भव्य प्रासादांत रहात होते, आणि हे प्रासाद त्या शतकाचें वैशिष्ट्य म्हणून आजही ओळखले जातात. ह्या उलट गलिच्छ व धूळभरल्या रस्त्यांच्या दुतर्फा दाटीवाटीनें उभ्या राहिलेल्या कोंदट व ओंगळ घरठाणांत त्या उद्योगपतींचे कामगार रहात असत. आणि अशा त्या वस्त्यांत जायचें म्हणजे धर्मप्रचारकांना आणि समाजसेवकांना आपला जीव मुठींतच घ्यावा लागे. खुद्द कारखान्यांत म्हाताऱ्या माणसांना तसेंच कोवळ्या पोरांना देखील पहाटेपासून अगदीं रात्रीपर्यंत खपावें लागे आणि ह्या श्रमांचें मोल कवड्यानींच होत असे. एकोणिसाव्या शतकांच्या पूर्वार्धांत इंग्लंडमध्यें एकंदर उत्पादन जसें वाढत होतें तसेंच दरडोई उत्पादनही झपाट्यानें वाढत होतें. मातवर माणसांची संख्या वाढत होती आणि एकोणिसावें शतक जेव्हां आपला मध्य गाठण्याच्या वेतांत होतें तेव्हां वस्तूरूप मजूरी देखील वाढत होती. पण उद्योगपतींच्या व व्यापाऱ्यांच्या संपत्तीतील वाढ जशी डोळ्यांत भरत होती तशी जनतेच्या परिस्थितीत होणारी सुधारणा काहीं जाणवत नव्हती. गरीबांचें दारिद्र्य कमी होत होतें हें खरें पण त्या मानानें गरीब व श्रीमंत यांच्या परिस्थितींत फार मोठी तफावत पडत होती.

अठराव्या शतकाच्या अखेरीस व एकोणिसाव्या शतकांच्या सुरवातीस आर्थिक विचारांना आधुनिक स्वरूप प्राप्त झालें. शतकानुशतकांचें दारिद्र्य, त्यानंतर झालेली संपत्तीची वाढ व तिची विषम विभागणी या पार्श्वभूमीवर नव्या आर्थिक विचारांची घडण झाली व ते लोकांसमोर मांडण्यांत आले. अशा परिस्थितींत जर अर्थशास्त्रज्ञानीं जनतेच्या उपासमारीकडे दुर्लक्ष केलें असतें तर इतिहास व वस्तुस्थिती यांजकडे त्यानीं पाठ फिरवली असाच त्याचा अर्थ झाला असता. आर्थिक क्षेत्रांत दुर्दैव आणि अपयश या नित्याच्या गोष्टी होत्या. मूठभर व्यक्तींहून अधिकाना यश मिळणें तर नवलाची गोष्ट होती व तिचा खुलासा करणें अवश्य होतें. हें यश चिरकालीन ठरावें हें अनपेक्षित होतें. साऱ्या इतिहासाची साक्षच मुळीं त्या विरुद्ध होती. परिस्थितीनें विचारांना वारसा दिला होता तो हा असा. हा वारसा कसा दीर्घकाल टिकला आहे तें आपण आतां पाहूंच.

[२]

आर्थिक विचारांच्या मध्यवर्ती परंपरेतला पहिला थोर विचारवंत म्हणजे ॲडम स्मिथ (१७२३-९०[१]) तो आशावादी होता असें मानलें जातें. आणि एका

१ 'मध्यवर्ती परंपरा' हा शब्द ॲडम स्मिथ पासून निर्माण झालेला मुख्य विचार प्रवाह या अर्थानें मीं वापरला आहे. या प्रवाहाला 'अभिजात परंपरा' असें म्हणण्याचा प्रघात आहे. पण एका बाबतींतल्या काहींशा क्षुल्लक मतभेदामुळें मीं तो

महत्त्वाच्या अर्थानें तें खरेंही आहे. कारण त्याच्या नजरेसमोर चित्र होतें तें प्रगतिशील राष्ट्रांचें, जागच्या जागीं थांबलेल्या अगर अधोगति होत असलेल्या राष्ट्रांचें नव्हे. 'राष्ट्रांच्या संपत्तीचें स्वरूप व त्याची कारणमीमांसा' (ॲन इन्क्वायरी इंटु द नेचर अँड कॉजेस ऑफ द वेल्थ ऑफ नेशन्स) असेंच मुळीं त्याच्या ग्रंथाचें शीर्षक होतें आणि तें संपन्नता व सुख यांजकडे बोट दाखविणारें होतें. आर्थिक प्रगतीचा जवळ जवळ खात्रीशीर मार्गच त्यानें लोकांसमोर मांडला. हा मार्ग म्हणजे खुली अर्थव्यवस्था निर्माण करणें. या अर्थव्यवस्थेचें नियमन व्हायचें तें स्पर्धा व खुला बाजार यांच्या द्वारें—राजसत्तेच्या द्वारें नव्हे. ह्या अर्थव्यवस्थेंत प्रत्येक माणसाला आपल्या पायावर उभें रहावें लागतें आणि त्यामुळें समाज संपन्न व्हावा म्हणून तो परिश्रम करतो.

पण स्मिथला अभिप्रेत होती ती राष्ट्राची एकंदर संपत्ती. एका बाजूला व्यापारी, उद्योगपती व जमीनदार आणि दुसऱ्या बाजूला श्रमिक जनता यांत त्या संपत्तीची योग्य विभागणी होईल व श्रमिक जनतेची स्थिती त्यामुळें सुधारेल अशी त्याला फारशी आशा नव्हती. ही विभागणी मुख्यतः आर्थिक रस्सीखेच करण्याच्या ताकदीवर अवलंबून असते असें स्मिथचें मत होतें. आणि ह्या रस्सीखेचींत साधारणतः कोणात्या पक्षाची सरशी होईल त्याचा अंदाज बांधणें अवघड नाहीं असें त्यानें म्हटलें आहे. अठराव्या शतकांत आर्थिक सामर्थ्याच्या बाबतींत कोणाचें पारडें जड होतें तें त्यानें थोडक्यांत आणि बिनचूकपणें मांडलें आहे. तो म्हणतो मजूरी कमी करण्यासाठीं एकजूट करण्याविरुद्ध आपल्या पार्लमेंटनें कायदे केलेले नाहींत, पण ती वाढविण्यासाठीं एकजूट करण्याविरुद्ध मात्र पुष्कळ कायदे केलेले आहेत.[२] ह्यामुळें सामान्यतः मजूरांचें वेतन कमी कमीच होत जाणार असें दिसत होतें. अर्थात् तें एका किमान पातळीच्या खाली उतरणें शक्य नव्हतें. 'माणसाला आपल्या श्रमांवरच

शब्द प्रयोग केलेला नाहीं. जॉन स्टुअर्ट मिल व जे. ए. केर्नस् यांच्यानंतर हें 'अभिजात अर्थशास्त्र' संपुष्टांत आलें कीं नाहीं याबद्दलचा तो मतभेद आहे. वर निर्देशिलेल्या विचारप्रवाहाला सनातनी परंपरा असेंही म्हणता येईल. पण हा शब्दप्रयोग केला तर त्या प्रवाहातून केन्स सारख्यांना वगळावें लागेल. कारण जरी त्यानीं त्याच प्रवाहात राहून आपलें कार्य केलें असलें तरीं प्रस्थापित तत्वांवर त्यानीं जोराचा हल्ला चढवला.

२ वेल्थ ऑफ नेशन्स प्रकरण ८ (ह्या प्रसिद्ध ग्रंथाच्या इतक्या वेगवेगळ्या आवृत्त्या आहेत कीं आपल्या हातीं असलेल्या आवृत्तीतील संबंधित पृष्ठांचा उल्लेख करणें उपयुक्त ठरेल असें वाटत नाहीं.)

अखेर जगावें लागतें. आणि म्हणून त्याची मजूरी निदान त्याचा उदरनिर्वाह चालण्यास पुरेशी असावीच लागते. खरें म्हणजे सामान्यतः ती याहून थोडी अधिक असावी लागते. तसें नसलें तर त्याला आपल्या कुटुंबाचें पोषण करणें अशक्य होईल. आणि मग एक पिढी गेली की तिच्याबरोबर मजूरवर्गाचें अस्तित्वच संपुष्टात येईल.' [१]

मजूरीची ही किमान मर्यादा अगदींच तोटकी असणार हें उघडच आहे खरें म्हणजे ॲडम स्मिथच्या या विवेचनातून सामाजिक मीमांसेच्या इतिहासातील एका अत्यंत प्रभावी व नैराश्यपूर्ण विचारधारेचा उगम झाला. ॲडम स्मिथचा संबंध या विचारधारेशीं क्वचितच जोडला जात असला तरी ही वस्तुस्थिती आहे. ही विचारधारा अशी : शेतावर अगर कारखान्यात पोटासाठीं खपणाऱ्या मजूरवर्गाचें म्हणजेच बहुसंख्य जनतेचें वेतन उदरनिर्वाहासाठीं लागणाऱ्या किमान उत्पन्नाहून फारसें अधिक असूंच शकणार नाहीं. तें वाढलें तरी पुन्हां लौकरच ही किमान पातळी गांठेल. हाच तो प्रख्यात पोलादी नियम. रिकार्डोनें तो मजबूत केला, मार्क्सनें त्याची वेगळी जुळणी केली आणि मग भांडवलशाहीवरच्या सैद्धान्तिक चढाईत प्रमुख शास्त्र म्हणून त्याचा उपयोग करण्यात आला.

स्मिथनें हा पोलादी नियम काहीं ठामपणें मांडला नाहीं. खरें म्हणजे कोणत्याच बाबतीत त्यानें ठाम भूमिका घेतली नाहीं. आणि ह्याबाबतींत अर्थशास्त्रज्ञानीं जेव्हां जेव्हां त्याचा कित्ता गिरवला तेव्हां तेव्हां त्यांच्या हातून उत्कृष्ट कामगिरी झाली. कामगारांचा तुटवडा असला तर त्यांची मजूरी निर्वाहाच्या किमान पातळीहून अधिक असूं शकेल आणि ती देखील दीर्घकालपर्यंत हें स्मिथनें मान्य केलें. आर्थिक विकास झपाट्यानें होत असेल तर तेव्हां देखील मजुरी वाढूं शकेल. संपत्तीच्या पुंजीपेक्षां विकासाची गतीच मजुरीच्या पातळीवर अधिक परिणाम करते. कामगारांच्या वेतनांत वाढ होते ती संपत्तीच्या मोठ्या सांठ्यामुळें नव्हे तर तींत होणाऱ्या सतत वाढीमुळें...उत्तर अमेरिकेच्या कोणत्याही भागापेक्षां इंग्लंड सध्यां खात्रीनेंच कितीतरी अधिक संपन्न आहे. तरी देखील उत्तर अमेरिकेतील मजूरांचें वेतन इंग्लंडच्या कोणत्याही भागांतील वेतनापेक्षां पुष्कळच जास्त आहे' [२]

---

१ वरील प्रमाणेंच.

२ वरील प्रमाणेंच. स्मिथ म्हणतो कीं त्यानें हें विधान १७७३ सालीं म्हणजे अमेरिकन क्रांतीच्या निमित्तानें 'अलीकडील दंगली सुरू होण्यापूर्वी' केलें होतें.

[३]

अर्थशास्त्राच्या मध्यवर्ती परंपरेतले स्मिथचे दोन थोर वारस म्हणजे डेव्हिड रिकार्डो (१७७२-१८२३) आणि थॉमस रॉबर्ट माल्थस (१७६६-१८३४). ॲडम स्मिथ आणि हे दोघे यांना अर्थशास्त्र निर्माण करणारी त्रिमूर्ती असें मानलें जातें. निदान इंग्रजीभाषिक देशात ज्या अर्थशास्त्राचा अभ्यास होतो तें त्यानीं निर्माण केलें आहे. रिकार्डोनें अर्थशास्त्राची आधुनिक स्वरूपात रचना केली. किंमती, जमिनीचा खंड, मजुरी आणि नफा यांचें प्रमाण कोणत्या आर्थिक घटकांमुळें निश्चित होतें त्याची त्यानें नुसती मीमांसा केली नाहीं तर त्या मीमांसेची एक पद्धत निर्माण केली. आणि ह्या पद्धतीचा उपयोग अर्थशास्त्रज्ञ आजही करीत असतात. ज्ञानवृक्षाची फांदी वाकवून फळ हातीं येणें त्यानें अशा प्रकारें सुकर केलें म्हणून त्याचा मान विशेष मोठा आहे. मार्क्सवादी आणि बिगर-मार्क्सवादी हे दोघेही त्याचे सारखेच ऋणी आहेत.

तीव्र स्वरूपाची विषमता आणि बहुसंख्य जनतेची उपासमार ह्या गोष्टींना रिकार्डो व माल्थस यांच्या विचारांत मूलभूत गृहिततत्वांचें स्थान प्राप्त झालें. हीं गृहिततत्त्वें त्यानीं अगदीं निरपवाद स्वीकारलीं होतीं असें नव्हे. पण हे जे अपवाद होते ते अपवाद भूतच होते. कार्लाइलनें १८५० सालीं 'नैराश्यग्रस्त शास्त्राचे माननीय आचार्य' असा जेव्हां उल्लेख केला तेव्हां त्याच्या डोळ्यासमोर रिकार्डो व माल्थस हे दोघे होते. आणि त्यावेळीं 'नैराश्यग्रस्त शास्त्र' हें जें नांव त्यानें अर्थशास्त्राला दिलें ते त्याला अजून चिकटलेलें आहे. कारण तें अगदींच कांहीं गैरवाजवी नव्हतें.

माल्थसबद्दल कांहीं फारसें सांगायला नको, सबंध एकोणिसाव्या शतकांत आणि आजही त्याचें नांव त्याच्या लोकसंख्येवरील निबंधांशी (एसे ऑन पॉप्युलेशन) निगडीत झालेलें आहे. त्यानें अर्थशास्त्रांत इतरही महत्वाचे विचार मांडले. आणि त्यांचा आतां पुन्हां नव्यानें शोध घेण्यांत आला आहे. पण लोकसंख्येबाबत त्यानें जें विचार मांडले त्यामुळेंच तो लोकांच्या कायमचा स्मरणांत रहाणार आहे.

जितक्या लोकांना पोटभर अन्न देणें शक्य आहे तितकेच लोक या जगात जगूं शकतील हें उघडच आहे. माल्थसचें मत असें कीं अन्नाचा पुरवठा वाढला कीं तितक्याच प्रमाणांत लोकसंख्येतही वाढ होईल. लोकसंख्येच्या वाढीला मर्यादा एकच आणि ती म्हणजे जगण्यासाठीं आवश्यक असलेल्या किमान अन्नाचा. ह्यामुळें माणसें नेहमींच उपासमारीच्या छायेंत आपलें जीवन कंठतील. 'लोकसंख्येवरील निबंधा'च्या पुढील आवृत्त्यांत माल्थसनें आपल्या भूमिकेत कांहीं पर्यायांना जागा करून दिली.

अन्नोत्पादनाच्या पाठोपाठ वाढणाऱ्या लोकसंख्येला 'नैतिक संयमामुळें' आणि तसेंच माणसांच्या 'दुर्गुणां'मुळें देखील आळा बसूं शकेल हें त्यानें मान्य केलें. ह्याचा अर्थ असा कीं निर्वाहाच्या पातळीच्यावर देखील माणूस आपलें जीवनमान ठेवूं शकेल, आणि संयम व दुर्गुण यांना संतती नियमनांच्या खात्रीलायक साधनांची जोड मिळाली कीं तें अधिकच प्रमाणांत शक्य होईल. पण रिकार्डोच्या बाबतींत जें झालें तेंच माल्थसच्या बाबतींतही झालें. त्याच्या मुख्य सिद्धांताच्या व्याप्तींत हे पर्याय लुप्त होऊन गेले. आणि जनतेच्या दारिद्र्यावर कोणताही तोडगा नाहीं हाच त्याचा मुख्य सिद्धान्त होता. एक महत्वाची गोष्ट अशी कीं हा सिद्धान्त जगाच्या मोठ्या भागाला लागूं पडणारा होता आणि त्याच्या पर्यायांना त्या प्रदेशात कांहींच महत्व नव्हतें. अशी परिस्थिती त्या वेळीं आशिया खंडात होती आणि आज तागाईत ती कायम आहे. ह्या संदर्भांत लक्षांत घेण्यासारखी गोष्ट ही कीं माल्थस हेल्सबरी कॉलेजांत अर्थशास्त्राचा प्राध्यापक होता. आणि हिंदुस्थानात ज्यांची पुढें नेमणूक व्हायची होती अशा आपल्या नोकरांना शिक्षण देण्यासाठीं ईस्ट इंडिया कंपनीनें हें कॉलेज चालवलें होतें.

बहुसंख्य माणसांच्या नशिबीं दारिद्र्य हें तोंपर्यंत नित्याचेंच होतें. त्यामुळें माल्थस आपल्या निष्कर्षामुळें एकंदरीत फारसा अस्वस्थ झाला नाहीं. आणि ह्या परिस्थितीवर कांहीं तोडगा सुचविण्याची देखील त्याला गरज भासली नाहीं (त्यानें फक्त दोनच सूचना केल्या. एक अशी की लोकांनीं लग्नें पुढें ढकलावीं. आणि दुसरी अशी कीं लग्नविधींतच एक इशारा दिला जावा. तो असा कीं त्या लग्नामुळें झालेल्या संततीची जबाबदारी सरकार वहाणार नाहीं. नवऱ्याला ती पत्करावी लागेल. आणि पोरवडा फार वाढला तर उपासमारीची शिक्षा आईबापानां भोगावीं लागेल.) एकोणिसाव्या शतकांतील आर्थिक विचारप्रणालींवर जी नैराश्याची आणि विपण्णातेची छाया पसरली आहे तिचें लोण पुष्कळसें माल्थसपासूनच आलेलें आहे.[१]

[४]

ॲडम स्मिथ व माल्थस या दोघांचें लक्ष राष्ट्राच्या एकंदर संपत्तीबाबतच्या प्रश्नावर केंद्रित झालेलें होतें. राष्ट्रीय संपत्तीत वाढ झाली कीं वेलगाम वाढणारी लोकसंख्या ती कशी फस्त करील हें दाखविण्याकडे माल्थसचें लक्ष केंद्रित झालें होतें हें खरें. पण अर्थव्यवस्थेंतील उत्पादनाची विभागणी निरनिराळ्या व्यक्तींत आणि सामाजिक वर्गांत कशी होते या प्रश्नाला वरील दोघाही अर्थशास्त्रज्ञांच्या विचारांत

[१] अलेक्झँडर ग्रे. द डेव्हलपमेंट ऑफ इकॉनॉमिक डॉक्ट्रिन (लंडन, लाँगमन्स ग्रीन, १९३१) पृ. १६३.

मध्यवर्ती स्थान नव्हतें. डेव्हिड रिकार्डोनें मात्र याच प्रश्नात आपलें लक्ष घातलें. जमीनमालक, उद्योगयोजक आणि कामगार यांच्यात त्यांच्या समाईक उत्पादनाची वा उत्पन्नाची विभागणी कोणत्या नियमांनुसार होते हा प्रश्न त्याच्यापुढें होता. 'अर्थशास्त्र म्हणजे संपत्तीचें स्वरूप व तिच्या निर्मितीची कारणें यांची मीमांसा अशी तुमची कल्पना आहे. मला मात्र असें वाटतें कीं उद्योगामुळें जें उत्पादन होतें त्याची विभागणी त्याच्या निर्मितींत भाग घेणाऱ्या वर्गांत कोणत्या नियमानुसार होते त्याची मीमांसा म्हणजे अर्थशास्त्र असें मानलें पाहिजे'[1]. हे नियम रिकार्डोनें ज्या स्वरूपात मांडले त्या स्वरूपात ते अगदीं क्रूरपणें विषमता निर्माण करणारे होते.

लोकसंख्या हा एक अन्यावलंबी चल घटक आहे असें माल्थस प्रमाणेंच रिकार्डोचेंही मत होतें. रोजगारी देण्यासाठीं जें भांडवल उपलब्ध असतें त्यानुसार लोकसंख्येचें नियमन होतें. आणि त्यामुळें भांडवल जसें कमी अधिक होतें त्यानुसार लोकसंख्या नेहमीं वाढत अगर घटत असते. संपत्ती व उत्पादनक्षमता यांत वाढ झाली कीं लोकसंख्याही वाढते. पण लोकसंख्या वाढली तरी तिच्यासाठीं अन्न उपजवणाऱ्या जमिनीचें क्षेत्रफळ कांहीं वाढत नाहीं. त्यामुळें जमीन अधिकाधिक अपुरी पडूं लागते आणि तिच्या मालकांचें उत्पन्न सारखें वाढतच जातें. उत्पादनाच्या उरलेल्या भागासाठीं नफा आणि मजुरी यांची सरळसरळ रस्सीखेंच चाललेली असते. बाकी परिस्थिती तशीच राहून जर नफ्यांत वाढ झाली तर मजुरी घटते. आणि मजुरींत वाढ झाली तर नफा कमी होतो. उलट नफ्यांत होणारी प्रत्येक वाढ भांडवलांच्या साठवणुकीला उपकारक असते. त्यामुळें मग लोकसंख्येंत अधिक वाढ होते आणि बहुधा त्याची परिणती म्हणून अखेर जमिनीचा खंड वाढतो.[2] ह्या बांधीव परस्पर संबंधाचा एकंदर परिणाम काय होतो तें सहज ध्यानांत येण्यासारखें आहे. देशाच्या भांडवलांत व उत्पादनांत जर वाढ होत रहायची असेल तर भरपूर नफा मिळायला हवा. पण उत्पादन वाढलें कीं लोकसंख्याही वाढेल. ह्या लोकसंख्येच्या अन्नाच्या गरजांचा भार उपलब्ध जमिनीवर अधिकाधिक प्रमाणात पडेल. त्यामुळें जमिनीचा खंड वाढेल आणि जमीनमालकांचा फायदा होईल. त्याचा अर्थ असा कीं प्रगती हवी असेल तर भांडवलदारांची भरभराट व्हायला हवी आणि या भरभराटीचा फायदा जमीनमालकांच्या पदरांत पडणें अपरिहार्य आहे. ह्या अपरिहार्य विधि-

१ माल्थसला लिहिलेलें पत्र, ऑक्टोबर ९, १८२०. द वर्क्स ॲंड कॉरस्पाँडन्स ऑफ डेव्हिड रिकार्डो. संपादक पिएरो स्राफा. केंब्रिज युनिव्हर्सिटी प्रेस. व्हॉल्युम ८. पृ. २७८. यापुढें या ग्रंथांचा उल्लेख वर्क्स व कॉरस्पाँडंस असा केला आहे

२ वर्क्स ॲंड कॉरस्पाँडन्स खंड १ पृ. ४११

घटनेचे दुष्परिणाम मात्र सामान्य जनतेला भोगावे लागतात. त्यांचें भवितव्य रिकार्डोनें पुढील प्रख्यात उताऱ्यात साररूपानें सांगितलें आहे. 'ज्या गोष्टींची खरेदीविक्री होते आणि ज्यांचा सांठा कमी अधिक होऊं शकतो अशा सर्व वस्तूंप्रमाणेंच मजूराच्या श्रमांनाहीं स्वत:ची अशी एक नैसर्गिक किंमत आहे आणि बाजारांतली किंमतही आहे. कामगारांना निर्वाहासाठीं आणि आपली संख्या वाढ व घट न होतां पुढेंही तितकीच रहावी म्हणून वंशवृद्धि करण्यासाठीं जेवढें उत्पन्न आवश्यक असतें तेवढीच त्यांच्या श्रमांचीं नैसर्गिक किंमत.'[1]

मजुरीचा पोलादी नियम तो हाच. स्मिथप्रमाणेंच (आणि लोकसंख्येच्या बाबतींत माल्थसनें केलें त्याप्रमाणें देखील) रिकार्डोनें आपला मुख्य सिद्धांत मांडल्यावर त्याला जरतरची पुस्तीं जोडली. प्रगतीशील समाजांत मजूरांचें बाजारांतलें वेतन त्यांच्या नैसर्गिक वेतनापेक्षां दीर्घकाळपर्यंत अधिक असूं शकतें हें त्यानें मान्य केलें. आणि आज जर रिकार्डो जिवंत असता तर १९ एप्रिल १८१७ पासून म्हणजे त्याच्या 'ऑन द प्रिन्सिपल्स ऑफ पोलिटिकल इकॉनॉमि अँड टॅक्सेशन' (अर्थशास्त्र व करवसुली यांचीं तत्वें) या ग्रंथांच्या प्रकाशनाच्या दिवसापासून आजतागाईत पोलादी नियमाला अपवादात्मक अशी परिस्थिती कशी अस्तित्वांत आहे तें त्यानें सहज दाखवून दिलें असतें. असत्याबरोबरची शर्यत सत्य क्वचितच जिंकतें हें अगदीं खरें. पण एखाद्या ठांशीव सिद्धान्तामागून धावणारा त्याचा अपवाद त्याहूनही मंदगती असतो. त्यामुळें मजुरीचा पोलादी नियम आपल्या निर्भेळ व ठसठशीत स्वरूपातच जगाच्या बौद्धिक संचितांत जमा झाला.

शिवाय ह्या परिस्थितीवर कांहींही उपाय नाहीं अशी माल्थस प्रमाणेंच रिकार्डोचीही भूमिका होती. आपल्या विवेचनाचीं समाप्ती त्यानें पुढील ठाम विधानानें केली. 'मजूरी ज्यांनुसार निश्चित होतें तें नियम हे असे आहेत. ह्याच नियमांनुसार प्रत्येक समाजातील बहुतेक लोकाना आयुष्यांत किती सुख (ह्या शब्दाची दखल घ्यायला हवी) मिळणार तें निश्चित होतें. इतर सर्व करारांप्रमाणेंच मजुरीची निश्चिती देखील बाजारांतील खुल्या व निःपक्षपाती स्पर्धेच्या द्वारेंच व्हावी आणि विधिमंडळानें ह्या बाबतींत नियंत्रण अगर ढवळाढवळ कधींहीं करूं नये'[2] तसेंच या बाबतींत कोणाला दोषही देऊं नये. रिकार्डोनें अशी अनेकदां तक्रार केली कीं आपण जमीनमालकांचे विरोधक आहोत असा अन्याय्य आरोप माल्थस आपल्यावर करीत असतो. 'त्याच्या भाषेवरून कोणाला असें वाटेल कीं

१ वरीलप्रमाणेंच पृ. ९३

२ वरीलप्रमाणेंच पृ. १०८

मीं त्याना राज्याचें शत्रूच मानतो.'[1] जमिनीच्या मालकांना नशीब अतिशय अनुकूल होतें आणि त्याचा फायदा ते वसल्या जागीं घेत होते इतकेंच. निसर्गक्रमाचा तो एक भाग होता. रिकार्डोनें दिलेला वैचारिक वारसा हा असा होता.

ॲडम स्मिथच्या विचारांत अनेक विसंगती होत्या आणि द्वयर्थीपणा देखील होता. त्याचप्रमाणें रिकार्डोची तर्कशृंखला देखील तत्कालीन परिस्थितीला नीटशी लागू पडणारी नव्हती. भांडवल व नफा यांचें त्यानें केलेलें विवेचन पुष्कळच दोषपूर्ण होतें. आणि इतिहासात ज्यावेळीं नव्या जगाची (अमेरिका खंडाची) वाट मोकळी झाल्यामुळें शेतजमिनीचें पुरातन महत्व कमी होऊं लागलें होतें त्याचवेळीं रिकार्डो त्या शेतजमिनीच्या प्रश्नात गुंतून राहिला. तरी देखील असें म्हणावें लागतें कीं स्मिथ, रिकार्डो व माल्थस यानीं आपल्या समकालीन परिस्थितीचें निदान जितकें योग्य प्रकारें केलें तितकें नंतरच्या अर्थशास्त्रज्ञांनीं कधींही केलें नाहीं. या तिघांपैकीं कोणीही प्रस्थापित सिद्धांतांत अडकून राहिला नाहीं. परंपराप्रधान व व्यापाराधिष्ठित (मर्कंटिलिस्ट) समाजाच्या सांकेतिक शहाणपणाला त्यानीं निर्णायकपणें दूर सारलें होतें. लोकमताची खुशामत त्यानीं केली नाहीं. त्याचा परिणाम असा झाला कीं आपल्या समकालीन जगाची एक मूलगामी आणि प्रभावी उपपत्ती त्यानीं मांडली आणि त्या जगाच्या दृष्टीनें योग्य धोरण कोणतें तें देखील आंखून दिलें.

शतकानुशतकें जें जग दरिद्री होतें त्यांत संपत्तीच्या संचयाइतकें दुसऱ्या कशालाच महत्व नव्हतें. त्यासाठीं या अर्थशास्त्रज्ञानीं असें धोरण सुचवलें कीं मध्ययुगीन व व्यापाराधिष्ठित समाजाच्या निर्बंधांतून व संरक्षणांतून माणसांना मुक्त करा आणि त्यांचें भवितव्य त्यांच्यावरच सोंपवा. हें धोरण अगदीं योग्य होतें. नव्हे तें योग्य असल्याचें प्रत्यक्षात सिद्ध होत होतें. तत्कालीन जग कांहीं सहृदय नव्हतें. बाजार आणि स्पर्धा यांच्या कठोर व अनिश्चिततापूर्ण अधिराज्यात अनेक माणसें पिळून निघालीं, अनेकांचा नाश झाला. पण तोपर्यंत नेहमींच या ना त्या कारणानें अनेकांचीं जीवनें उध्वस्त होत आली होतीं. आतां निदान कांहींची भरभराट होत होती. आणि हीच गोष्ट महत्वाची होती. संकटें व आपत्ती ह्यांची मोजदाद करण्यात अर्थ नव्हता. कारण त्या नित्याच्याच गोष्टी होत्या. महत्व होतें तें नव्या संधींचें. शिवाय विषमतेवर कांहीं इलाज करणें मुळीं शक्यच नव्हतें. कारण ती कांहीं परिवर्तनीय समाजव्यवस्थेंतून निर्माण झाली नव्हती. प्राणीजीवनाच्या नियमांतूनच तिचा उगम झाला होता. हें सारें एकपरीनें इष्टच होतें. कारण राजसत्तेनें उद्योग स्वातंत्र्याला आधींच मान्यता दिल्यामुळें तिला आर्थिक जीवनाचें नियमन करण्यास वांव नव्हता.

---

१ वरीलप्रमाणेंच. खंड २ पृ. ११७

समकालीन अर्थव्यस्थेच्या बहुतेक सर्व प्रश्नांचा उलगडा या उपपत्तीनें केला. ती उपपत्ती अगदीं परिपूर्ण, व्यवहार्य आणि वास्तवतेच्या कसोटीला उतरणारी होती. निदान तशी ती भासत होती. त्यामुळें माणसांच्या मनांवर तिचा चिरकालीन प्रभाव पडावा हें सहाजिकच होतें.

[५]

रिकार्डोच्या मृत्यूनंतर तीस वर्षेपर्यंत अर्थशास्त्राचा विकास त्यानें आंखून दिलेल्या मार्गानेंच होत होता. जॉन स्टुअर्ट मिलसारख्या अत्यंत साक्षेपी व गाढचा विद्वानानें आणि इतरांनी रिकार्डोच्या मीमांसेंत अधिक बारकाई आणली, तिचा विस्तार केला आणि तिची व्यवस्थित मांडणी देखील केली. ज्या अर्थव्यवस्थेंत आर्थिक जीवनाचें नियमन राजसत्ता करीत नाहीं तर बाजारातील मागणी व पुरवठा करतात त्या खुल्या अर्थव्यवस्थेलाच या अर्थशास्त्रज्ञांच्या विचारांत केंद्रस्थान होतें. युरोपखंडात समाजवादाबद्दल चर्चा होत असे. पण इंग्लंडमध्यें आणि एकंदर अँग्लोसॅक्सन जगांत बाजाराचें सार्वभौमत्व जवळजवळ गृहीतचं धरलें जात होतें.

नंतर एकोणीसाव्या शतकाच्या मध्यावर रिकार्डोपासून चालत आलेल्या आर्थिक विचारधारेला दोन मोठे फाटे फुटले. या विचारधारेची मध्यवर्ती परंपरा आपल्या मार्गानें पुढ जात राहिली. आणि अगदीं कालपरवांपर्यंत या परंपरेनें घालून दिलेल्या चौकटींतच आर्थिक विचारांचा विकास होत राहिला. यामुळें आर्थिक विचारांत सलगपणा आणि सुव्यवस्थितपणा आला आणि आर्थिक जीवनाचें आकलन होण्यास त्याची फार मदत झाली. पण याचवेळीं रिकार्डोच्या विचारांचेंच लोण घेऊन विचारांचा एक फाटा डाव्या बाजूला वाहूं लागला. कार्ल मार्क्सची क्रांतिकारी परंपरा अशा प्रकारें निर्माण झाली. ह्यापुढें आर्थिक जीवनाविषयींचा दृष्टिकोन घडविण्याच्या कार्यांतही मार्क्सवादी परंपरा मध्यवर्ती परंपरेशीं जबरदस्त स्पर्धा करूं लागली आणि तिच्यावर फार मोठा प्रभावही पाडूं लागली.

विशिष्ट विचारसूत्रांच्या विकासांचा आलेख काढणें हा कांहीं या प्रकरणांचा उद्देश नव्हे. तें कार्य दुसऱ्या ग्रंथांचें आणि विशेषतः दुसऱ्या लेखकांचें आहे. सर्वसामान्य माणूस आणि त्याचें भवितव्य या विषयीं अर्थशास्त्रानें सुरुवातीला कोणतीं गृहीततत्वें स्वीकारलीं होतीं त्याच्याशीं इथें आपल्याला कर्तव्य आहे. आणि रिकार्डो व मार्क्स या दोघांचा या गृहीत तत्वांच्या बाबतींत मतभेद नव्हता. समाजांतल्या मूलभूत प्रेरक शक्ति जर अप्रतिहतपणें कार्य करीत राहिल्या तर माणसाचें भवितव्य खडतर व अंधकारमय आहे अशींच दोघांचीही धारणा होती. फरक हा कीं प्रस्थापित अर्थव्यवस्था तशीच टिकून राहील अशी रिकार्डो व त्याचे अनुयायी यांची

अपेक्षा होती आणि मार्क्सची तशी नव्हती. पण चालू अर्थव्यवस्था सामान्य माणसाला हितकारक असल्यामुळें टिकून रहाणार होती असें मात्र रिकार्डोचें म्हणणें नव्हतें. ती अशी हितकारक नव्हती हें तर उघडच होतें. ती टिकणार होती याचें कारण तिला दुसरा पर्याय दिसत नव्हता—आणि अधिक चांगला पर्याय तर खात्रीनेंच दिसत नव्हता. ती सुधारण्याचा प्रयत्न केल्यास ती कमी कार्यक्षम होत होती इतकेंच.

कालांतरानें खुल्या अर्थव्यवस्थेचें समर्थन वेगळ्या प्रकारें केलें जाऊं लागलें. ती अधिक कार्यक्षम आहे असा युक्तिवाद तर केला जातच होता. पण हळुहळु जवळ जवळ नकळतच असाही युक्तिवाद केला जाऊं लागला किंवा निदान असें सूचित केलें जाऊं लागलें कीं ती अर्थव्यवस्था सुसह्य होती. त्या अर्थव्यवस्थेंत सामान्य माणसाला देखील थोडीबहुत सुस्थिती प्राप्त होणें शक्य होतें आणि विशेष कर्तृत्ववान माणसाला तर तींत अधिकच वाव होता. माणसाचें आर्थिक भवितव्य आशादायक आहे असें मानणाऱ्या युगाची ही नांदी होती असें सामान्यपणें त्यावेळीं मानलें गेलें. पण आतां आपण जी अधिक बारकाईनें छाननी करणार आहोत तिच्यावरून असें आढळून येईल कीं मुळचें नैराश्य नंतरही बरेंचसें शिल्लक राहिलें.

प्रकरण चौथें.

इलमलीत दिलासा

माल्थस आणि रिकार्डो यांच्या विचारसरणीनुसार सामान्य माणसाचें आर्थिक भवितव्य फारच विटकें होतें. उपासमारीच्या कांठावर कसेंबसें जगायचें हेंच सामान्यपणें त्याच्या नशिबीं होतें. त्यापेक्षां चांगल्या स्थितींत जगणें अपवादभूत होतें. प्रगतीमुळें संपन्न होणार होते तें बहुतांशीं आधींच श्रीमंत असलेलें लोक, सामान्य जनता नव्हे. ह्याला कांहीं उपाय नव्हता. आणि हे काहीं केवळ दोन माणसानीं सहजगत्या काढलेलें निष्कर्ष नव्हते. हे विचार म्हणजे आधुनिक आर्थिक मीमांसेचा पायांच होय असें मानायला हवें.

साधारणतः असें मानलें जातें कीं एकोणिसाव्या शतकाच्या मध्यानंतर अर्थशास्त्रज्ञ अधिक, नव्हे बरेचसे आशावादी झाले. त्यावेळीं प्रभावी असा आर्थिक विचारविनिमय मुख्यतः इंग्लंडमध्येंच होत होता. आणि त्यावेळीं त्या देशांत व्यापारी व औद्योगिक विकासाचा महान कालखंड चालू होता. वस्तुरूप मजूरी वाढत होती. पश्चिम युरोप आणि अमेरिका या प्रदेशांची देखील माल्थसनें निर्देशिलेल्या भीषण समस्येच्या छायेंतून सुटका होत होती. अर्थात् असें म्हणणें शक्य होतें कीं परिस्थितींतील ही सुधारणा अल्पजीवी होती. उत्तर अमेरिकेतील गवताळ व सपाट प्रदेश, न्यूझिलंडमधील कुरणें आणि ऑस्ट्रेलियांतील अफाट रानें कांहीं दशकांच्या अवधींत वसाहतींसाठीं खुलीं झाल्यामुळेंच ही सुधारणा होऊं शकली. ह्या मार्गानें जगाच्या अडचणी एकदां दूर होऊं शकतील, दुसऱ्यांदा नाहीं. हे नवे प्रदेश लोकवस्तीनें एकदां व्यापले कीं अन्नाच्या पुरवठ्यावर लोकसंख्येचें दडपण पुन्हां पडूं लागेल. चालूं शतकांत मात्र वस्तुरूप उत्पन्न आणि लोकसंख्येच्या वाढीची गती यांत निश्चित असा परस्परसंबंध नाहीं हें स्पष्ट झालें आहे. त्यामुळें माल्थसच्या सिद्धान्ताचें भूत पुन्हां मानेवर बसेल ही भीती आशियांतील खेडचांपाडचांत जरी अजून कायम असली तरीं पाश्चात्य देशांतून ती नष्ट झाली आहे.

अर्थशास्त्राच्या मर्यादित क्षेत्रापुरतें पहावयाचें म्हटलें तर एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धांत मजुरीचा पोलादी नियम त्याज्य ठरविण्यात आला. नंतर कांहीं दिवस असा समज होता कीं मजूरांचें उत्पन्न त्यांना शेतांवर व कारखान्यांत रोजगारी देण्यासाठीं जें खेळतें भांडवल उपलब्ध असतें त्यानुसार निश्चित होतें. हाच

तो जॉन स्टुअर्ट मिलनें पहिल्यानें मांडलेला आणि नंतर त्याज्य ठरविलेला प्रसिद्ध वेतननिधि सिद्धान्त (वेजिस् फंड थिअरी). त्यानंतर मजुरीच्या प्रश्नाचा खुलासा एकाच सिद्धान्तानें होऊं शकेल काय याबद्दल शंका उपस्थित होऊं लागल्या. शिक्षण व विशेष स्वरूपाचें कसब यांसाठीं उत्पादनखर्च करावा लागतो आणि त्याची भरपाई मजुरीच्या द्वारें करावी लागते असा विचार मांडला जाऊं लागला. विशेष स्वरूपाच्या उत्पादनक्षमतेबद्दल जमिनीच्या खंडासारखें ज्यादा उत्पन्न मिळतें असाही निष्कर्ष काढण्यांत आला. आणि एकोणिसाव्या शतकाच्या अखेर कामगाराचें उत्पन्न, म्हणजेच सर्वसामान्य जनतेची मिळकत, त्याच्या सीमागत उत्पादनावर अवलंबून असते असा सिद्धान्त पुढें येऊं लागला. ह्या सिद्धान्ताचा अर्थ असा कीं कामगार मालकाच्या उत्पादनाच्या मूल्यांत जितकी भर घालतो तितकें वेतन त्याला मिळतें. ह्याहून जर त्याला कमी वेतन दिलें तर स्पर्धक कारखानदार त्याला अधिक वेतन देऊन आपल्याकडे ओढून घेऊं शकेल. कारण स्पर्धाधिष्ठित अर्थव्यवस्थेंत असे दुसरे कारखानदार असणारच कीं ज्यांच्या उत्पादनांत तो मजूर आपल्या वेतनाहून अधिक भर घालूं शकेल. ह्या चढाओढीचा परिणाम असा होईल कीं वेतन व सीमागत उत्पादन यांची बरोबरी होईल आणि मजूरांच्या वतीनें चांगल्या प्रकारें सौदा पटवायला जर एखादी मजूर संघटना असली तर ही बरोबरी अधिक लौकर होईल. वर निर्देशिलेलें सीमागत उत्पादन अर्थातच कमी अधिक असूं शकतें. मजूरांची संख्या अपुरी असली आणि ते चांगले उत्पादनक्षम असले तर हें सीमागत उत्पादन जास्त असेल. उलट मजूरांची संख्या अतिरिक्त असलीं आणि ते ढिलाईने काम करणारे असले तर हें सीमागत उत्पादन कमी असणार. एकंदरीत सीमागत उत्पादनाचा हा सिद्धान्त मजुरीच्या पोलादी नियमाहून फारच वेगळा होता. आणि मजुरी वाढून सुस्थिती आली कीं मजुरांचा पोरवडा वाढून ते पुन्हां उपासमारीच्या कांठावर येतात असें म्हणणें जेव्हां परिस्थितीनुरूप अवघड झालें तेव्हां मजुरीचा पोलादी नियम पूर्णपणें बाजूला पडला.

सीमागत उत्पादनाच्या सिद्धान्ताची उभारणी झाल्यावर उत्पादनाच्या विभागणीचा सर्वंकष सिद्धान्त मांडण्याचें कार्य जवळ जवळ समाप्त झाले. मजुरानीं नेहमी दरिद्रीच असावें असा कांहीं निसर्गक्रम नाहीं हे एकदां सिद्ध झाल्यावर अर्थशास्त्रज्ञ इतर प्रश्नांकडे वळले. पुष्कळसें अलीकडचें संशोधन मजूरसंघटना आणि त्यांची घासाघीस करण्याची ताकद यांवद्दलचें आहे. गंमत अशी कीं हाच प्रश्न खरा महत्वाचा आहे असें दूरदर्शी ॲडम स्मिथनें पूर्वीच म्हणून ठेवलेलें आहे.

मात्र ह्यावरून अर्थशास्त्राची मध्यवर्ती परंपरा आपल्या पूर्वपीठिकेच्या कचाट्यातून मुक्त झाली आहे असें कोणी मानलें तर ती फार मोठी चूक ठरेल. कारण

एकतर सर्वसामान्य जनतेच्या उत्पन्नाला काहीं एक कमाल मर्यादा असते ही विचार-सरणी फार वेळ जीव धरून होती. हें उत्पन्न अगदीं उपासमारीची पातळी गांठेल ही भूमिका सोडून देण्यांत आली. पण त्या उत्पन्नाला कांहीं एक कमाल मर्यादा असणार हें गृहीतच धरलें जात होतें. ज्याच्या प्रिन्सिपल्स (अर्थशास्त्राची तंत्वें) या ग्रंथावर सध्यांच्या अर्थशास्त्रज्ञांतील ज्येष्ठ पिढी पोसली गेली तो आलफ्रेड मार्शल (१८४२–१९२४) गेल्या शतकाच्या अखेर हीच भूमिका मांडत होता. त्याचें म्हणणें असें: 'देशाची आर्थिक स्थिति जर पुरेसा काळ स्थिर राहिली...(तर) यंत्रांची देखभाल व मजूरांचें पालनपोषण, शिक्षण आणि किमान व सांकेतिक गरजांचें समाधान, यांसाठीं जेवढां खर्च लागेल तेवढेच उत्पन्न साधारणतः त्यांना मिळेल'[1] ह्याचा अर्थ असा कीं मुलांच्या पालनपोषणासाठीं साधारणतः समाजाच्या रिवाजांनुसार जो खर्च येतो त्याची भरपाई करण्याइतपत मजुरीची पातळी असेल. त्याहून अधिक असणार नाहीं. मजुरी किमान पातळी गांठील असें मानण्याकडेच रिकार्डो प्रमाणें मार्शलचाही कल होता. युनायटेड् स्टेटस्मध्ये चालू शतकाच्या सुरुवातीच्या दशकांत हार्वर्ड विद्यापिठाचे फ्रँक् डब्ल्यू. टॉसिग ह्यांना प्राध्यापक म्हणून फार मान होता आणि अर्थशास्त्रांतील मध्यवर्ती परंपरेचे ते अध्वर्यू होते. सामान्य माणसाच्या भवितव्याविषयींची त्यांची भूमिका साररूपानें पुढीलप्रमाणें होती (ही भूमिका मांडणाऱ्या आपल्या ग्रंथाची त्यानीं १९३६ सालीं नवी आवृत्ति काढली!): 'युनायटेड् स्टेटस्मध्यें विसाव्या शतकाच्या पहिल्या दशकांत सामान्य मजूराचें वार्षिक वेतन आठशें डॉलर्सच्या आसपास होतें. रानटी अवस्थेपेक्षां ही स्थिति पुष्कळच वरी हें खरें.....(परंतु).....जर तें वेतन आणखी वाढणार नसेल तर एक सामाजिक संस्था या नात्यानें खाजगी मालमत्ताही उणी ठरत आहे असाच त्याचा अर्थ होतो. इतकेंच नव्हे तर तिचें समर्थन करणेंही अशक्यप्राय होतें. पण खरें पाहिलें तर परिस्थिति अधिक चांगली असणें या (भांडवलशाही) अर्थव्यवस्थेंत काहीं अशक्य नाहीं.'[2] पण भांडवलशाही अर्थव्यवस्थेच्या चौकटींत देखील याहून चांगली परिस्थिती असणें अगदी पूर्णपणें शक्य आहे असें ठामपणे म्हणाल्याची मात्र त्यांची तयारी नव्हती.

---

[1] आलफ्रेडमार्शल. प्रिन्सिपल्स ऑफ इकॉनॉमिक्स (८ वी आवृत्ति लंडन. मेकमिलन १९२७) पृ. ५७७. ही अतीशय वेंगरूळ शब्दयोजना अपवादात्मक आहे.

[2] एफ्. डब्ल्यू. टॉसिग प्रिन्सिपल्स ऑफ इकॉनॉमिक्स (तिसरी आवृत्ति. न्यूयॉर्क मॅकमिलन, १९३६) पृ. २२३. पुस्तकाची पहिली आवृत्ति १९११ सालीं प्रसिद्ध झाली.

[२]

सारांश जनतेची आर्थिक स्थिति अगदीं दुःसह रहाणार नसली तरी ती फारशी सुखदायक देखील होणार नाहीं अशीं धारणा अर्थशास्त्रज्ञात अगदीं कालपरवा पावतों होती. इतक्या प्रमाणांत रिकार्डोचा प्रभाव अजूनही कायम होता. पुन्हां असाही समज होता की लोक दरिद्री राहिले तर त्यावाबत फारसे काहीं करणें शक्य नाहीं. अर्थात शिक्षण घेऊन आणि कसब व कार्यक्षमता वाढवून माणसाला आपलें सीमागत उत्पादन व त्याबरोबरच वेतनही वाढवणें शक्य असतें. दारिद्र्याच्या कचाट्यांतून निसटण्याचा माणसाला उपलब्ध असलेला हाच एक मार्ग त्यावेळीं नजरेंत भरत होता. आणि या गोष्टीचा आर्थिक भूमिकांवर फार मोठा परिणाम झाला. ह्या गोष्टीचा विचार पुढेंही आपल्याला करायचाच आहे. पण सध्या लक्षांत घ्यायचें तें हेंच कीं मजूरी कमी असते ती मजुराचें सीमागत उत्पादन कमी असल्यामुळें. त्याची मजुरी जर ह्या सीमागत उत्पादनाच्यावर चढवली तर ती त्यानें उत्पादनात घातलेल्या भरीपेक्षां अधिक होईल. आणि त्यामुळें त्याला कामावरून कमी करणें मालकाला फायदेशीर होईल. तेव्हां कमी मजुरी स्वीकारायची नसेल तर बेकारी पत्करायला हवी. पुन्हां ही विचारसरणी काहीं जुनीपानी नाहीं. 'चढाओढीच्या जगात प्रत्येक मजूराला त्याच्या सीमागत उत्पादनाइतके वेतन मिळतें. तेव्हां किमान वेतन जर ठरवून देण्यात आलें तर त्याचा पुढील दोहोंपैकीं एक कोणता तरी परिणाम होणें अपरिहार्य आहे. एक तर ज्या मजूरांचें उत्पादन किमान वेतनाहून कमी असेल त्यांना कामावरून कमी करण्यांत येईल (आणि त्यामुळें त्यांना नियमनाच्या कक्षेबाहेरील क्षेत्रात रोजगारी करावी लागेल किंवा बेकार रहावें लागेल...) किंवा कमी कार्यक्षम मजूरांच्या उत्पादनक्षमतेंत वाढ होईल.'[1] यांपैकी दुसरा पर्याय असंभाव्य ठरवण्यात आला आणि निष्कर्ष असा काढण्यात आला कीं ज्यांच्या भल्यासाठीं किमान वेतन कायदे करण्यात येतात त्यांचेंच ते नुकसान करतात. ही मीमांसा एका तरुण व बुद्धिमान अभ्यासकानें १९४६ सालीं मांडली.

रिकार्डोनें रेखाटलेल्या अर्थव्यवस्थेच्या चित्रानुसार श्रीमंत हे अधिक श्रीमंत होत जातात. ही अनिष्ट प्रवृत्ती रोंखली जाईल असा दिलासा देखील सीमागत उत्पादनाच्या सिद्धांतानें दिला नाहीं. मजूराच्या वेतनाप्रमाणें भांडवलाचें वेतन

[1] जी. जे. स्टिग्लर 'द इकॉनॉमिक्स ऑफ मिनिमम वेज लेजिस्लेशन' (किमान वेतनाच्या कायद्यांचें अर्थशास्त्र) अमेरिकन इकॉनॉमिक रिव्हयू. खंड. २६ अंक ३.

(म्हणजे व्याज) देखील त्याच्या सीमागत उत्पादनाइतकें असतें आणि असें होणें कितीही न्याय्य असलें तरी त्याचा परिणाम कांहीं समाधानकारक नसतो. कारण थोडया व्यक्तींच्या हातीं जर खूप भांडवल असेल तर त्याचें उत्पन्न त्या व्यक्तींनाच मिळणार. आणि प्रत्यक्षांत असें घडत होतें. युनायटेड स्टेटस्‌मध्यें यादवी युद्धानंतरच्या अर्धशतकात कांहीं माणसानीं अफाट संपत्ती कमावली. १८९५ ते १८९९च्या काळात रॉकिफेलरला स्टँडर्ड ऑइल कंपनीकडून तीन ते चार कोटी डॉलर त्याच्या मालकीच्या भागांवरचा नफा म्हणून मिळाले. १९०० सालीं अँड्रयू कार्नेजीला त्याच्या पोलाद कंपन्यांकडून दोन कोटी तीस लाख डॉलर्सचें उत्पन्न मिळालें. ह्या उत्पन्नांवर कर द्यायचा नव्हता आणि त्या काळात डॉलरची क्रयशक्ती आजच्यापेक्षां कांहींशी अधिक होती. तेलाच्या व पोलादाच्या उद्योगांप्रमाणेंच लोहमार्ग, जमीन व इमारती, तांबें, बँकिंग इत्यादि धंद्यांत देखील अफाट नफा मिळाला. ह्यापैकीं कांहीं नफा म्हणजे भांडवलावरचें व्याज होतें हें खरें. पण निसर्गतःच सुपीक असलेलीं जमीन आणि खनिज द्रव्यें या उत्पादनाच्या आवश्यक साधनांवर कब्जा वसवल्यामुळें देखील त्यापैकीं कांहीं नफा मिळाला होता. आणि नेमक्या ह्याच साधनांपासून अफाट संपत्ती मिळूं शकेल असें रिकार्डोनें म्हणून ठेवलेलें होतें.

अर्थशास्त्रांतील मध्यवर्ती परंपरेच्या पुरस्कर्त्यानां या विषमतेनें अस्वस्थ करून सोडलें. वारसा हक्कानें मिळणाऱ्या संपत्तीमुळें तर ते विशेषच अस्वस्थ झाले. ज्यानें स्वतः संपत्ती कमावली त्याच्या कौशल्याचें, उद्योगीपणाचें, दूरदर्शीपणाचें आणि चतुराईचें तें फळ होय असें समर्थन करणें एक वेळ शक्य होतें. पण यदृच्छया त्याच्या पोटीं जन्माला येणाऱ्या मुलाला त्या संपत्तीचा वारसा मिळावा या गोष्टीचें समर्थन करणें अशक्य होतें. तसेंच मक्तेदारी हा देखील त्यांच्या दृष्टीनें गंभीर आशंकेचा विषय होता. कारण मक्तेदारींत नफा मिळत होता तो उत्पादन केल्यामुळें नव्हे तर उत्पादनाला मर्यादा घातल्यामुळें. शिवाय स्पर्धा हा मुळीं त्या अर्थव्यवस्थेचा पायाच होता. ती सुरळितपणें चालणें अगर न चालणें अगदीं पूर्णपणें स्पर्धेवर अवलंबून होतें. आणि मक्तेदारीमुळें म्हणजेच स्पर्धेच्या अभावामुळें निर्माण झालेली विषमता असें सूचित करीत होती कीं त्या अर्थरचनेंतच कांहीं मूलभूत स्वरूपाचे दोष होते.

समतेचा रूळ ज्यांच्या डोक्यावरून फिरण्याचा संभव असतो ते समतेचा पुरस्कार करतांना क्वचितच दिसतात. त्यामुळें समतेबाबतची चर्चा पूर्वीपासून गुळमुळीतपणें होत आली आहे. तरी देखील मध्यवर्ती परंपरेचा पुरस्कार करणाऱ्या अर्थशास्त्रज्ञानीं समतेबद्दलची आपली भूमिका कांहीशी स्पष्टपणें मांडली आहे. मार्शलनें म्हटलें आहे, कीं विपुल संपत्तीच्या मांडीला मांडी लावून अठरा विश्वे दारिद्र्य वसलेलें असावें. या गोष्टीचें नैतिक समर्थन करणें अशक्य आहे. संपत्तीची विभागणी पुष्कळदा

म्हटलें जातें तितकी विषम नसली तरी हीं विषमता हा आपल्या अर्थव्यवस्थेतला एक गंभीर दोष आहे.'[१] युनायटेड स्टेटस्‌मध्यें टॉसिगनें या बाबतींत आपलें मत अधिक ठामपणें मांडलें. 'महत्वाकांक्षेचा अंकुश, दुसऱ्याची बरोबरी करण्याच्या प्रयत्नांतली चविष्ट गंमत, एकलांचीपणाची रुचिहीनता वगैरे गोष्टींचें मानसशास्त्रीय विश्लेषण कितीही ताणलें तरी त्यामुळें सर्वांना मनोमन पटणाऱ्या एका तत्वाला झळ पोहोंचू शकत नाहीं. तें तत्व असें कीं कधींच नष्ट न होणाऱ्या विकट विषमतेच्या द्वारें मानवजात सौख्याचें परमोच्च शिखर कधींही गाठूं शकणार नाहीं.'[२]

[३]

मध्यवर्ती परंपरेला अभिप्रेत असलेली अर्थव्यवस्था स्पर्धेवर आधारलेली होती. आणि ह्यामुळें देखील शंकाकुशंका निर्माण होत होत्या. त्या शंकाकुशंकांवर ऐसपैसपणें पांघरूण घालण्यात येत असलें तरीं त्या चांगल्या बोंचऱ्या होत्या.

मध्यवर्ती परंपरेच्या सिद्धान्तांत स्पर्धेला मध्यवर्ती स्थान होतें आणि तिच्या कार्याची चिकित्सा अधिकाधिक बारकाईनें केली जात होती. जेथें किंमतींवर कोणतेंही बंधन नव्हतें अशा बाजारपेठांना माल पुरविण्यासाठीं खूपशा व्यापारीसंस्था स्पर्धा करीत असत. त्यांतल्या ज्या कार्यक्षम आणि पुरोगामी असत त्या स्पर्धेत टिकून रहात आणि त्यांचा विकास होई. ज्या तशा नसत त्या नष्ट पावत. चालकांचा जो नफा अगर नुकसान होई त्याची आंच कामगारांनाही पोंहोचत असेच; आणि त्यामुळें कार्यक्षमता वाढवण्यासाठीं मालकांना जीं आमिषें असत तींच कामगारांवर देखील प्रभाव पाडीत.

स्पर्धेच्या द्वारें आवश्यक ते फेरबदलही घडून येत. अर्थव्यवस्थेतला राजा जो ग्राहक त्याच्या आवडीनिवडीतील फेरबदलांनुसार कांहीं वस्तूंचीं मागणीं वाढत असे आणि म्हणून त्यांच्या किंमतीही वाढत. उलट ग्राहकांच्या मर्जीतून उतरलेल्या वस्तूंची मागणी आणि किंमतीही उतरत असत. जेथें मागणीची वाढ झालेली असे त्या क्षेत्रातल्या उद्योगिकांचा विकास होई आणि इतर उद्योगिका त्या क्षेत्राकडे आकर्षिल्या जात. उलट जेथें मागणी घटत असे, त्या क्षेत्रातल्या अर्थसंस्था बंद तरी पडत किंवा कामगाराना कमी करून उत्पादनाचा संकोच तरी करीत. त्यातल्या कांहीं शक्यतेनुसार वाढत्या मागणीच्या क्षेत्रात प्रवेश करीत. ह्याच पद्धतीनें भांडवल, मजूर व संयोजक यांची आवश्यक ती फेरवांटणी होत असे.

---

[१] मार्शल प्रिन्सिपल्स ऑफ इकॉनॉमिक्स (अर्थशास्त्राचीं तत्वें) पृ. ७१४
टॉसिग पृ. २०७

गेल्या शतकाच्या अखेरच्या दशकांत आणि विसाव्या शतकाच्या सुरुवातीच्या वर्षांत अर्थशास्त्रज्ञानीं स्पर्धानिष्ठ समाजाचा एक नमुना कल्पनेनें तयार केला आणि तो कशाप्रकारें कार्य करतो त्याचा ते अधिकाधिक अभ्यास करूं लागले. त्या नमुन्याचा जसजसा विकास झाला व त्याला जसजसें आदर्श स्वरूप देण्यात आलें तसतसा तो रेखीव, तोलवद्ध आणि सुंदर दिसूं लागला. त्या नमुन्याचा माणसांचा मनावर किती पगडा वसला त्याचें विवेचन अनेकदां करण्यात आलें आहे.[1] परंतु या नमुन्याचा माणसांच्या मनावर जरी पगडा वसला तरी अशा स्पर्धानिष्ठ समाजांत माणसाना अनिश्चिततेला फारच तोंड द्यावें लागतें या गोष्टीची मात्र पुरेशी दखल घेण्यात आली नाहीं. कार्यक्षमता वाढविण्याच्या शर्यतींत जें हार खात त्यांचें दिवाळें निघत असे. आणि कार्यक्षम असून देखील दुर्दैवानें ज्याच्या मालाची मागणी बदलत्या आवडीनिवडीमुळें घटत असे त्याच्यावर देखील हाच प्रसंग येई. शिवाय कामगारांचें उत्पन्न जें कमी अधिक होत असे त्यात तर कार्यक्षमतेपेक्षां दैवाचाच वाटा अधिक असे. अत्यंत कामसू मजूरावर देखील नालायक योजकाच्या पदरीं काम करण्याचा प्रसंग येणें शक्य असे. आणि त्यामुळें मालकाला रास्तपणें भोगाव्या लागणाऱ्या नुकसानीची झळ त्याच्या कामगारालाही विनाकारण लागत असे. आपल्याच नव्हे तर इतरांच्याही दोषांमुळें त्याची नोकरी जाण्याची व उपासमार होण्याची शक्यता असे. आणि वार्धक्य, दुबळेपणा, उपजत नालायकी किंवा काम करतांना झालेला अपघात यांमुळें ज्यांची उत्पादनशक्ती मर्यादित झाली असेल त्यांना स्पर्धेच्या जगांत स्थान नव्हतें हें उघडच आहे.

स्पर्धानिष्ठ समाजातले हे दोष अगदींच कोणाच्या निदर्शनास आले नाहींत असें नव्हे. त्याच समाजरचनेचा तो एक आवश्यक भाग आहे असें नेहमींच म्हणावें लागे. आणि स्पर्धानिष्ठ समाजाच्या भविष्यदर्शी पुरस्कर्त्यानीं असा तर्कनिष्ठूर इशारा देऊन ठेवला कीं त्या अर्थव्यवस्थेतील धोके व अनिश्चितता कमी करण्याचा कोणी प्रयत्न केला तर त्यामुळें तिचा पायाच डळमळीत होईल. कार्यक्षमता वाढवण्याच्या शर्यतींत जे हार खात त्यांचें नुकसान होणें आवश्यक होतें. ग्राहकांच्या आवडीनिवडी जर निर्णायक ठरावयाच्या असतील तर त्यांच्या प्रवाहावरोवर धाव-

[1] माझ्या 'अमेरिकन कॅपिटॉलिझम: द कन्सेप्ट ऑफ काउन्टरव्हेलिंग पॉवर' (बॉस्टन: हौटन मिकलिन १९५२) या पुस्तकात मीं तसें विवेचन केलें आहे—विशेषत: दुसऱ्या प्रकरणात. दुसऱ्यांचें म्हणणें पुन्हां मांडण्यापेक्षां देखील आपलें म्हणणें पुन्हां-पुन्हां उगाळीत राहाणें हा अपराध अक्षम्य आहे. म्हणून स्पर्धानिष्ठ समाजाच्या नमुन्याबद्दल मी इथें त्रोटकच विवेचन केलें आहे.

णाऱ्या उत्पादकांचा फायदा व्हावा आणि इतरांचें नुकसान व्हावें हें अपरिहार्य असतें. हा नुकसानीचा धोका कमी करूं म्हटलें तर त्या अर्थव्यवस्थेंतील आमिषें कमजोर होतील. गाढवापुढें नुसतें गाजर धरून भागत नाहीं. हातात काठीही असावी लागते.

स्पर्धेतला अटीतटीचा भाग जर कमी केला तर तें कदाचित् अन्यायाचें व अयोग्यही ठरेल. आपला स्पर्धक आपल्याला पुरेसा फायदेशीर ठरणार नाहीं इतक्या किंमतीला माल विकतो आहे असें ज्या नव्या व्यापाऱ्यांना व उत्पादकांना आढळून येतें त्यांना त्या स्पर्धकाच्या धृष्टपणाचा राग येतो आणि आपल्यावर अन्याय झाला आहे अशी ते तक्रार करतात. परंतु ज्यांना तो माल कमी किंमतीला मिळतो ते या उत्पादकांपेक्षां अधिक गरजू असण्याची शक्यता असते. आणि त्यांच्या स्पर्धकाचा उत्साह व हरहुन्नरीपणा समाजाच्या दृष्टीनें फायदेशीर असतो[1] आतां खरी गोष्ट मात्र अशी दिसते कीं क्रमिक पुस्तकांतल्या स्पर्धानिष्ठ समाजाच्या नमुन्यात जेवढे धोके व अनिश्चितता होती तेवढी प्रत्यक्षातल्या स्पर्धेमुळें कधींच कोणाला भोगावी लागली नाहीं. प्रत्यक्षांत रीतिरिवाज, मक्तेदारी, मजूर संघटना, निरुत्साह व कायदे यांमुळें आणि इतकेंच नव्हे तर दयाबुद्धीमुळें देखील स्पर्धेला लगाम घातला जाई. त्यामुळें चढाओढींत मागे पडण्याबद्दल प्रत्यक्षांत जें नुकसान सोसावें लागे तें पुस्तकातल्यापेक्षां सौम्य असे.

ह्या विभ्रमाचा होरा स्पष्ट आहे. मध्यवर्ती परंपरेनें ज्या अर्थव्यवस्थेचें चित्र रेखाटलें होतें ती धोक्यानीं भरलेली होती. म्हणजे एकंदर आर्थिक जीवनच तसें होतें. पण या अर्थव्यवस्थेंतील अविच्छेद्य अशी ही अनिश्चितता मनांत शंका निर्माण करणारी होती. समाजातलीं दुबळीं माणसें ह्या अनिश्चिततेमुळें उघडीं पडताच इकडें दुर्लक्ष करणें शक्य नव्हतें. एखादी अर्थव्यवस्था प्रकृतिधर्मानेंच इतकी निष्ठूर असावी, दुबळेपणाला झिडकारणारी असावी ही गोष्ट मन अस्वस्थ करणारी होती. कारण अगदीं उच्चतम कार्यासाठीं देखील दयाबुद्धीचा त्याग करणें अवघड असतें. अस्वस्थ करणारी दुसरी गोष्ट अशी कीं व्यापारी, कारखानदार, शेतकरी, कामगार, समाजसुधारक इत्यादि सर्वच मार्गांसें स्पर्धेचे हे धोके पत्करायला नाखूष होतीं. पावलोपावलीं त्यांचा प्रयत्न असा होता कीं आपण संघटित होऊन किंवा सरकारच्या मदतीनें ही अनिश्चितता दूर करण्यासाठीं उपाययोजना करायची. आणि समजा जरी स्पर्धानिष्ठ अर्थव्यवस्थेच्या नमुन्यातली अनिश्चितता हा जरी मोठा दोष नसला तरी ती दूर करण्यासाठीं जे प्रयत्न चालले होते ते मात्र त्या अर्थव्यवस्थेला तडा पाडणारे होते.

---

[1] मार्शल, प्रिन्सिपल्स ऑफ इकॉनॉमिक्स. पृ. ८.

शिवाय प्रत्यक्ष जीवनात ही स्पर्धा खरोखर अस्तित्वात होती कां ही शंका मन कुरतडत होतीच. एकोणीसावें शतक जसजसें उलटत गेलें तसतसा उद्योगिकांचा पसारा आणि संपत्तीचा संचय यांत वाढ झाली. आर्थिक जीवनाचीं सूत्रें थोड्या लोकांच्या हातीं एकत्रित होऊं लागली. आणि ह्या घटनेतच भांडवलशाही अर्थव्यवस्थेच्या नाशाचीं बीजें आहेत असा मार्क्सनें पुकारा केला. स्पर्धेविषयींचें बौद्धिक विश्लेषण जसजसें अधिक काटेकोर झालें तसतसा अर्थव्यवस्थेत प्रत्यक्ष घडणाऱ्या घडामोडी आणि स्पर्धानिष्ठ अर्थव्यवस्थेचें चित्र यांतला संबंध दुरावत चालला. त्या चित्रानुसार बाजारातल्या उद्योगकांची संख्या वाढायला हवी होती. पण प्रत्यक्षांत ती कमी होत होती. त्या चित्रानुसार कोणतीही उद्योगिका मालाची किंमत नियंत्रित करूं शकत नव्हती. पण प्रत्यक्षांत कांहीं उद्योगिका मर्जीनुरूप किंमती वऱ्याचशा काबूंत ठेवत होत्या. पुन्हा मजूर संघटनांच्या हातीं नियंत्रणाचें सामर्थ्य होतें तें वेगळेंच.

विसाव्या शतकात मध्यवर्ती परंपरेतले अर्थशास्त्रज्ञ स्पर्धानिष्ठ अर्थव्यवस्थेच्या त्यांच्या चित्रात प्रत्यक्ष परिस्थितीशीं मिळते जुळते असे फेरबदल करूं लागले. अर्थव्यवस्थेंत शुद्ध स्पर्धेऐवजीं अपुरी स्पर्धा किंवा मक्तेदारीमिश्रित स्पर्धा असते हें त्यानीं मान्य केलें. पण मक्तेदारी व स्पर्धा यांचे मिश्रण समाजाला हितकारक ठरेल अशी हमी देणें कसें शक्य होतें? अशा विजोड मातापितरांची संतती व्यंगपूर्ण असणें अशक्य कोटींतले नव्हतें.[1]

[४]

मध्यवर्ती परंपरेच्या पुरस्कर्त्यांच्या मनांत आशंका निर्माण व्हायला आणखी एक महत्वाचें कारण होतें. तें म्हणजे गंभीर स्वरूपाची आर्थिक मंदी. एकोणिसाव्या शतकांत आणि विसाव्या शतकाच्या पहिल्या कांहीं दशकांत मंदीनें इतकें गंभीर स्वरूप धारण केलें होतें कीं तिकडे दुर्लक्ष करणें अशक्य होतें. अमेरिकेंतील यादवी युद्धानंतर एकोणिसाव्या शतकाच्या सत्तरींत जेव्हां सुवर्णमान पुन्हां प्रस्थापित करण्यात आलें तेव्हां आर्थिक उलाढालींत जबरदस्त घट झाली. त्यानंतर नव्वदीच्या काळांत प्रगती खुंटल्यासारखी झाली. पुन्हा १९०७ सालच्या वैत्तिक घबराटीनंतर आर्थिक प्रगतींत अल्पकाळ अडथळा निर्माण झाला. पहिल्या महायुद्धानंतरही अल्पजीवी पण उग्र मंदीचा धक्का अर्थव्यवस्थेला बसला आणि मग विसाव्या शतकाच्या तिशींत महामंदीचें अरिष्ट कोसळलें. पुन्हां पुन्हां कोसळणाऱ्या या संकटांचा स्पर्धा-

[1] मध्यवर्ती परंपरेच्या पुरस्कर्त्याच्या मनांत आशंका निर्माण करणाऱ्या ह्या अत्यंत महत्वाच्या गोष्टीबद्दल देखील मीं माझ्या अमेरिकन कॅपिटॅलिझम या ग्रंथात विवेचन केलें आहे.

निष्ठ अर्थव्यवस्थेच्या भवितव्यावर कोणता परिणाम होणार होता ? माल्थसच्या सिद्धांतातील उपासमारीला माणसें कदाचित् वळी पडणार नसतील. पण त्यांच्या क्रयशक्तीच्या आंवाक्याबाहेर असलेल्या विपुलतेंतच उपाशी रहाण्याचें त्यांच्या नशिबीं कशावरून नव्हतें ? या ना त्या मार्गानें त्यांची गांठ अखेर दारिद्र्याशींच पडणार असा निष्कर्ष काढणें अयोग्य कां होतें ?

अर्थशास्त्राच्या मध्यवर्ती परंपरेनें तथाकथित अर्थरहाटीची जी मीमांसा केली तिच्याइतकी कुतुहलजनक गोष्ट सामाजिक विचारांच्या क्षेत्रात दुसरी कोणतीही नसेल. अर्थरहाटीच्या अभ्यासाचा एक वेगळा कप्पाच करण्यात आला. (कांहीं अंशी ही आरोग्यकर अजूनही चालू आहे.) किंमती, मजुरी, खंड आणि व्याज या सर्वांवर खरें म्हणजे मंदीचा फार मोठा प्रभाव पडतो. पण मंदी येतच नाहीं असें गृहीत धरून त्यांचा अभ्यास केला जात होता. आर्थिक स्थिती नेहमींसारखी आहे असें गृहीत धरलेलें होतें. आणि नेहमींची स्थिती म्हणजे न डळमळणारी भरभराट अशी व्याख्या करण्यांत आली होती. अर्थरहाटीच्या स्वतंत्र अभ्यासांत भर देण्यात येत असे तो मंदीला कारणीभूत होणाऱ्या अपवादभूत गोष्टींवर. उदाहरणार्थ, १८७३ च्या मंदीपूर्वी ग्रीनबॅक नोटा चलनांतून काढून घेण्यात आल्या ही घटना, पहिल्या महायुद्धानंतर आर्थिक जीवनांत झालेली फेरजुळवणी, १९२९ सालीं शेअर बाजारांत झालेली किंमतीची घसरगुंडी आणि आंतरराष्ट्रीय व्यापार व भांडवलाची गुंतवणुक यांना वसलेला पायबंद. मात्र त्याच वेळीं आर्थिक जीवनांतले चढउतार नित्य घडणारे आणि तालबद्ध असतात असेंही तितक्याच ठळकपणें प्रतिपादन केलें जाई. अर्थरहाटी हा शब्दच मुळीं लयबद्धता सूचित करणारा होता. अभ्यास केला जात होता तो केवळ मंदीचा नव्हे तर अर्थरहाटीचा. आणि ही गोष्ट असें स्पष्ट करीत होती कीं आर्थिक भरभराटीनंतर जशी पिछेहाट होते त्याचप्रमाणें पिछेहाटीनंतर भरभराट ही होणारच. मंदी ह्या शब्दाचा उपयोग देखील अर्थपूर्ण होता. तो शब्द प्रत्यक्षातल्या गंभीर परिस्थितीला सौम्य स्वरूप देणारा होता. गेल्या शतकांत 'प्राणसंकट' (क्रायसिस्) हा शब्द 'मंदी' ऐवजीं वापरला जात असे. पण कालांतरानें तो फारच अन्वर्थक झाला. आणि मार्क्सनें जेव्हां 'भांडवलशाहीतील प्राणसंकट' असा शब्द प्रयोग केला तेव्हां त्या शब्दाची लोकांनी धास्ती खाल्ली. पन्नास वर्षांपूर्वी 'घबराट' हा 'प्राणसंकट' याला पर्यायी शब्द होता. पण तो देखील फारसा धीर देणारा नव्हता. आणि म्हणून हळुहळु 'मंदी' या शब्दाची योजना करण्यांत आली. हा शब्द सौम्य होता. तो असें सुचवायचा कीं अर्थव्यवस्थेचा कपाळमोक्ष झाला नसून तिला कांहीं मामुली आजार झाला आहे. पण महामंदीच्या काळात तिच्या

तीव्रतेमुळें 'मंदी' या शब्दालाच गंभीर अर्थ प्राप्त झाला. त्यामुळें त्याच्या जागीं 'ओहोटी' हा शब्द वापरण्यात येऊं लागला. कारण आर्थिक उलाढालीत झालेली घट तशी भीतीदायक नाहीं असें तो सुचवितो. पण कालांतरानें ह्या शब्दाला देखील चिंतेचा वास चिकटला आणि त्यामुळें १९५३-५४ सालच्या मंदीला आर्थिक जीवनाची फेरजुळणी असें संबोधण्यात आलें. आतां ह्यापुढें जर खरोखरच गंभीर स्वरूपाच्या 'फेरजुळणीला' आपल्याला तोंड द्यावें लागलें तर तो शब्द देखील त्याज्य ठरेल.

अर्थरहाटीचे हा आर्थिक जीवनातला नित्याचा चढउतार आहे असें मानलें तर ती स्वतःच स्वतःला आंवर घालते असा त्याचा अर्थ होतो. त्यामुळें तिच्यावर उपाय योजणें आवश्यक ठरत नाहीं. रोगी जर आपणहून बरा होणार असेल तर रोगावर इलाज करणें अनावश्यक व वेडेपणाचें ठरतें. जोसेफ ए. शुम्पिटर आणि वेस्ले सी. मिचेल हे अर्थरहाटी या विषयावरील जगातले दोन सर्वश्रेष्ठ तज्ञ होते. त्यांपैकीं शुम्पिटर यानीं गेल्या शतकांतल्या घडामोडींचा आढावा घेऊन १९३४ सालीं पुढील निष्कर्ष काढला : 'सर्वच (अर्थरहाटींच्या) बाबतींत...पिछेहाट संपून भरभराट सुरू झाली ती आपसुखच....पण एवढ्यावर संपत नाहीं. ३.मच्या विश्लेषणावरून आमचा असा ग्रह झाला आहे कीं जी भरभराट आपसुख सुरूं होते तिचाच पाया पक्का असतो. कारण जी भरभराट केवळ कृत्रिम उपायांनीं सुरू होते ती मंदीला आपलें कार्य पुरें करूं देत नाहीं. शिवाय आधींच बाकी राहिलेल्या अर्थ-व्यवस्थेतल्या दोषांत ती नव्या दोषांची भर घालते.[१]

मंदीचें स्वरूप जर नेहमींच सौम्य राहिलें असतें तर अर्थव्यवस्थेतील नित्याच्या तालबद्ध चढउतारांचा तो एक भाग आहे आणि त्याबाबतींत हस्तक्षेप न करणेंच शहाणपणाचें आहे ह्या भूमिकेनें लोकांना दिलासा दिला असता. पण मंदी जसजसें उग्र रूप धारण करूं लागली तसतसा ह्या भूमिकेमुळें दिलासा न मिळतां उलटाच परिणाम होऊं लागला. मजूर बेकार झाले, शेतमालाच्या किंमती पडल्या, काहीं शेतकरी आपली शेतें गमावून बसले, उद्योगधंद्यांत भांडवल ओतणाऱ्यांची बचत गडप झाली. आणि काहीं धंदेवाल्यांची, विशेषतः त्यांपैकीं छोट्यांचीं, दिवाळीं वाजलीं. आणि हा सगळा नित्यक्रमाचा भाग आहे असें बेफिकीरपणें सांगितलें जात होतें. ह्यातून अपरिहार्यपणें निष्कर्ष निघत होता तो असा कीं ज्या अर्थव्यवस्थेंत

१ जे. ए. शुम्पिटर. एसेज्. संपादक रिचर्ड व्ही. क्लेमेन्स (केंब्रिज, मॅस. ॲडिसन-वेस्ले १९५१) पृ. ११७ हा निबंध १९३४ सालीं पहिल्यानें 'द इकॉनॉमिक्स ऑफ द रिकव्हरी प्रोग्रॅम' (न्यू यॉर्क, व्हिटलसे हाउस, मॅग्रॉ-हिल) या पुस्तकांत प्रकाशित झाला. ठळक ठसा मुळचाच आहे.

असलीं संकटें नित्यक्रम म्हणून कोसळतात ती अर्थव्यवस्थाच मुळांत अत्यंत दोषपूर्ण असली पाहिजे. विशेषतः विसाव्या शतकाच्या तिशीच्या पहिल्या कांहीं वर्षांत मध्यवर्ती परंपरेनें जे विचार मांडले त्यांतून ह्या शंका फारच फोंफावल्या. आणि ज्यांच्या मनात अशा शंका आल्या नाहींत ते एका वेगळ्या कारणामुळें अस्वस्थ झाले. मंदीवर उपाययोजना करणें जरी चुकीचें असलें तरी अज्ञान व लोकांचा रोष यांमुळें काहींतरी कृती करणें अपरिहार्य ठरण्याची शक्यता होती. आणि ह्यामुळें परिस्थिति अधिकच विघडली असती. तीव्र मंदीचा फटका वसल्यावर अर्थरहाटी स्वतःचा तोल स्वतःच सांवरते ही भूमिका कोणालाच समाधानकारक वाटणें शक्य नव्हतें.

ह्या एकंदर प्रकाराचे परिणाम विशद करण्याची विशेष आवश्यकता नाहीं. दारिद्र्य ही आर्थिक जीवनातील नित्यावस्था असते ही आधींपासूनची भीती शिल्लक होतीच. विषमता अपरिहार्य आहे अशी अधिकाधिक खात्री पटत होती. पुन्हां वैयक्तिक असुरक्षितता हा स्पर्धानिष्ठ अर्थव्यवस्थेचा अंगभूत गुणविशेष आहे असें दिसून येत होतें. आणि त्यांत अर्थरहाटीवरच्या परंपरानिष्ठांच्या भूमिकेची भर पडली. त्यामुळें एकंदरच फार अस्वस्थता निर्माण झाली. तुझ्या घराला आग लागणें आणि तुझी मालमत्ता अंशतः किंवा पूर्णपणें खाक होणें हा नित्यक्रमाचा एक भागच आहे असें एखाद्या घराच्या मालकाला सांगितलें तर तो जसा अस्वस्थ होईल त्याच प्रकारची ही सार्वत्रिक अस्वस्थता होती. आग विझवता अगर थोपवता येणार नाहीं कारण तिच्या द्वारें काहीं एक कार्य घडायचें असतें. आगप्रतिबंधक खातें निर्माण करावें म्हटलें तर आगींत पेट्रोल ओतून ती विझवण्याचा प्रयत्न करण्यासारखे तें होईल.

अर्थशास्त्रातील मान्यवर अशा मध्यवर्ती परंपरेचा वैचारिक वारसा हा असा होता. त्यांतल्या आशावादाच्या मागें दारिद्र्य, विषमता व असुरक्षितता यांची भीती दबा धरून वसलेली होती. प्रस्थापित अर्थव्यवस्थेवरच्या वर निर्देश केलेल्या शंका लोकांच्या मनांत बीजरूपानें होत्या. पण महामंदीसारखें संकट कोसळल्यावर त्या वर उसळून यायला वेळ लागला नाहीं.

इथें वाचक असा प्रश्न विचारील कीं ह्याहून अधिक आत्मविश्वासयुक्त अशा विचारधारांचा एखादा वेगळा प्रवाह नव्हता का—असा प्रवाह कीं ज्यांत रिकार्डोच्या नैराश्याचा मागमूसही राहिलेला नव्हता ? अमेरिकन लोकांना हा प्रश्न विशेषतः पडेल. कारण अमेरिकन परंपरेत असा पूर्णपणें आशावादी सूर उमटणें स्वाभाविक होतें. निदान ह्या देशात तरी असे काहीं लोक असतील कीं ज्यानीं शंकानां दूर लोटलें असेल आणि ह्या भूमींत रूजणाऱ्या उदंड आत्मविश्वासानें त्यांचे विचार नटलेले असतील. कदाचित् निरक्षर लोकांत असा आत्मविश्वास किंवा आशावाद असेलही. परंतु अमेरिकेंतल्या विचारवंतांजवळ मात्र असा आत्मविश्वास होता असें म्हणता येत नाहीं.

प्रकरण पांचवें

अमेरिकेची मनःस्थिती

अमेरिकेत अर्थशास्त्रीय विचाराची एक स्वतंत्र परंपरा होती असें म्हणणें फारच मर्यादित अर्थानें खरें आहे. विचार राष्ट्रांच्या सरहद्दींचा मुलाहिजा ठेवत नाहींत. आणि जेथें भाषा आणि अन्य परंपरा एकच असतात तेथें ही गोष्ट विशेषच खरी असते. मध्यवर्ती परंपरेचे दंडक जसे इंग्रजानीं मान्य केलें तसे अमेरिकन लोकांनीं देखील मान्य केले. अमेरिकेतील आर्थिक विचारधारांचा उगम आपल्याला स्मिथ, रिकार्डो, मिल आणि मार्शल यांच्या ग्रंथांत सापडतो. त्यांचे विचार अमेरिकन लोकानीं आपल्या क्रमिक पुस्तकांत समाविष्ट केले, आणि त्यांत किरकोळ भर घातली किंवा फेरफार केले. पण गेल्या शतकांत अमेरिकन विचारवंतांनीं काहीं त्यांत फारशी भर घातली नाहीं. आणि दोन्हीं देशांतले विचार जसे एकच होते त्याच प्रमाणें त्या विचारांतून उद्भवलेल्या शंका व आशंका देखील समानच होत्या.

ह्याचा अर्थ असा नव्हे कीं खास अमेरिकन पिंडाचे असे अर्थशास्त्रज्ञ झालेच नाहीत पण मध्यवर्ती परंपरेला जी राजेशाही प्रतिष्ठा होती तिच्या मानानें या अमेरिकन विचारवंतांचा प्रभाव फार मर्यादित होता. ह्या विचारवतांपैकीं सर्वांत प्रभावी असे तीन कोण या बाबत फारसें दुमत होणार नाहीं असें वाटतें. अमेरिकेतला सारा अर्थशास्त्रीय विचार या तिघानीच केला असें म्हणता येणार नाहीं. पण त्या विचाराचें प्रतिनिधित्व यांच्याकडे द्यायला फारसा प्रत्यवाय नाहीं. दारिद्र्य अपरिहार्य आहे आणि माणसाचें आर्थिक भवितव्य खडतर आहे ह्या कल्पनांची जी छाया मध्यवर्ती परंपरेवर पडलेली होती ती ज्यामुळें दूर होईल असें या तिघां विचारवंतांपैकीं दोघांनीं तरी काहींच केलें नाहीं. उलट ही छाया त्यानीं अधिकच गडद केली.

ह्याला अपवाद म्हणजे हेन्री चार्लस् कॅरे (१७९३-१८७९). त्यानें मात्र या नव्या प्रजासत्ताकाच्या प्रकृतीला अनुरूप असा ओसंडता आशावाद व्यक्त केला. त्याचें म्हणणें असें कीं एखादें नवें गांव वसतें आहे आणि भराभर वाढतें आहे ही गोष्ट रिकार्डोला कधीं पहायला मिळाली नाहीं. त्याला ती पहायला मिळाली असती तर मानवजातीच्या भवितव्याविषयीं त्यानें अगदीं वेगळी भूमिका घेतली असती. रिकार्डोचें म्हणणें असें कीं जसजसा काळ लोटतो तसतशी माणसांना अधिकाधिक

मराठी ग्रंथ संग्रहालय, दादर, मुंबई
क्रमांक ७५५५७९ दि: निरंक
दिनांक २०१२ दि: २०/३/०१

नापीक जमीन कसावी लागते. मग त्यांच्या श्रमांचा मोबदला कमी कमी होत जातो आणि जमीनमालकांना द्यायच्या खंडात मात्र सारखी वाढ होत जाते. पण कॅरेनें नव्यानें वसणाऱ्या गावांचा विकास स्वतःच्या डोळ्यांनीं पाहिला होता आणि म्हणून रिकार्डोची ही मीमांसा त्याला अमान्य होती. उलट त्याचें म्हणणें असें कीं माणसें डोंगरमाथ्यावरची कमी कसाची जमीन पहिल्यानें नांगरतात. कारण तेथें दाट झाडी नसते. आणि असे काहीं दिवस गेल्यावर मग माणसें दाट झाडीनें झाकलेल्या खालच्या खोऱ्यांकडे आपला मोर्चा वळवतात. ते झाडी तोडून काढतात आणि तिच्या खालची अधिक कसदार जमीन लागवडीखाली आणतात. त्यामुळें त्यांच्या श्रमांपासून मिळणारा मोबदला कमी न होता वाढतो. आपला पहिला ग्रंथ त्यानें १८३८ सालीं लिहिला. आणि आपल्या इंग्लिश समकालीनांप्रमाणेंच त्यांत त्यानें मजूरीच्या प्रश्नाला मध्यवर्ती स्थान दिलें. मग अपरिहार्यपणें जनतेच्या नशिबीं दारिद्र्य लिहिलेलें आहे कीं सुवत्ता या प्रश्नाची चर्चा आलीच. या संदर्भात त्यानें असें प्रतिपादन केलें कीं गेल्या चाळीस वर्षांत वस्तुरूप मजुरीत वाढ होत गेली होती. म्हणजे रिकार्डोनें जें भविष्य वर्तवलें होतें त्याच्या अगदीं उलटा प्रकार घडत होता.

पण कॅरेचा आशावाद देखील निरपवाद नव्हता. माणसाची वीण फार झपाट्यानें वाढते हें माल्थसचें मत त्याला अंशतः मान्य होतें. अशीं एक वेळ येईल कीं जेव्हां 'धड उभें रहायला देखील जागा उरणार नाहीं'[1] असा कयास त्यानें आपल्या सुरुवातीच्या ग्रंथातून व्यक्त केला होता. पण एकंदरींत आशावादी म्हणून असो किंवा निराशावादी म्हणून असो कॅरेचा प्रभाव असा फारसा पडलाच नाहीं. त्याला स्वतःलाच ह्याची जाणीव होती. आपल्या स्वतःच्या देशांत आपल्या विचारांकडे कोणी धडपणें लक्ष देत नाहीं अशी तो अगदीं चिडून तक्रार करीत असे. त्याचें म्हणणें असें कीं युरोपमध्यें आपल्या विचारांची अधिक दखल घेतली जाते. आणि तसें असणें अगदीं शक्य आहे.[2] आर्थिक मीमांसेच्या अमेरिकन परंपरेत मात्र कॅरेच्या विचारानां जवळ जवळ कहींच स्थान मिळालें नाहीं. त्याचीं पुस्तकें जागच्या जागीं कुजून अक्षेर विस्मृतींत गडप झालीं. गेल्या पन्नास वर्षांत त्याचा उल्लेख झाला असेल तर तो एक विचित्र वल्ली म्हणून. खुल्या व्यापाराच्या फायदेशीरपणाबद्दल ॲडम स्मिथशीं आणि जमिनीच्या खंडाबाबत रिकार्डोशीं मतभेद व्यक्त करायचें ज्यानें धाडस दाखवलें असा पहिलावहिला अमेरिकन अर्थशास्त्रज्ञ इतकेंच त्याला महत्व दिलें जातें.

---

[1] ग्रेनें उद्धृत केलेलें. द डेव्हलेपमेंट ऑफ इकॉनॉमिक डॉक्ट्रिन पृष्ठ २८६

[2] पहा—जोसेफ डॉर्मनचें द इकॉनॉमिक माइंड इन अमेरिकन सिव्हिलिझेशन, १६०६ १८६८ (ल्यूयॉर्क, व्हायकिंग, १९४६) पृष्ठ ८०४

[२]

खास अमेरिकन पिंडाचे असे जे इतर दोन अर्थशास्त्रज्ञ होऊन गेले त्यांचा प्रभाव मात्र अधिक चिरस्थायी होता. हेन्री जॉर्ज व थॉर्नस्टिन व्हेब्लेन हे ते दोघे अर्थशास्त्रज्ञ. पण विस्तारणाऱ्या सीमांच्या देशाला अनुरुप असा ओसंडता आशावाद तर त्यानीं व्यक्त केला नाहींच, उलट रिकार्डोनें रंगवली नव्हती इतकीं भावी काळाचीं काळीकुट्ट चित्रें त्यानीं रंगवलीं. हेन्री पार्क (१८३९-९७) हा मार्क्स प्रमाणेंच एका पंथाचा जनक होता. आणि आपल्या आद्यपुरुषाला आदरांजली वहायला अजूनही त्याचे अनुयायी एकत्र जमतात. 'प्रगती आणि दारिद्र्य. औद्योगिक मंदी आणि वाढत्या संपत्ती बरोबर वाढणारें दारिद्र्य यांची मीमांसा' हे त्याच्या नांव घेण्यासारख्या पुस्तकाचें नांव. ॲडॅम स्मिथ प्रमाणेंच हेन्री जॉर्जनें देखील आपल्या पुस्तकाच्या नांवाच्या द्वारें समाजाच्या भवितव्याविषयींची आपली भूमिका व्यक्त केली. या पुस्तकाच्या पहिल्याच प्रकरणात त्यानें आपल्या मनातले मूलभूत प्रश्न उपस्थित केले. ते असे : सर्वांगीण आर्थिक प्रगतीच्या काळांत–१८७३ नंतरच्या मंदीच्या वर्षांत तो लिहीत होता—इतक्या मजुरांवर बेकार रहाण्याची पाळी कां यावी ? आणि मजूर वर्गाला इतकें दारिद्र्य, दुःख आणि चिंता कां सहन करायला लागावींत? [१] आणखी पुढें जाऊन असेंही विचारता येईल कीं उत्पादनाचें सामर्थ्य वाढलें असून देखील त्याचा फायदा गरीब जनतेला इतक्या अल्प प्रमाणात कां मिळावा ? किंवा खरें म्हणजे या वाढत्या उत्पादनाच्या सामर्थ्यामुळें गरीबांची अधिकच दुःस्थिती कां व्हावी ? [२]

प्रगतींच्या या उरफाट्या परिणामांचें मूळ आपल्याला रिकार्डोकडून चालत आलेल्या वैचारिक लोणात सापडतें. मजूर आणि भांडवल यांची उत्पादनक्षमता वाढत होती. पण जमिनीचा पुरवठा आणि कस मात्र तितकाच राहिला. त्यामुळें जमिनीचा खंड प्रमाणाबाहेर वाढला आणि प्रगतीचें फळ अनाहूतपणें जमीनमालकांच्या पदरात पडलें. खंडात वाढ होणार ही अपेक्षा आणि त्यामुळें झालेली जमिनीच्या किंमतीबाबतची सट्टेबाजी, या गोष्टी देखील मंदी ओढवून घ्यायला कारणीभूत झाल्या होत्या. (इथें हें ध्यानांत घ्यायला हवें कीं एकोणीसाव्या शतकांत जमिनीच्या बाबतीत सट्टेबांजीच्या लाटा पुन्हां पुन्हां उठल्या. अमेरिकेच्या पश्चिम भागांत हा प्रकार विशेष करून झाला. आणि हेन्री जॉर्जनें आपल्या आयुष्याचे पुष्कळसें दिवस कॅलिफोर्नियात म्हणजें या पश्चिम भागांतच काढले. आर्थिक विचारांचें भोंवतालच्या परिस्थितीशीं नेहमींच निकटचें नातें असतें.) एकंदरीत जमीन हीं जोंपर्यंत खाजगी मालकीची होती तोंपर्यंत दारिद्र्य व मंदी यांतून सुटका नव्हती.

---

[१] हेन्री जार्ज, प्रोग्रेस अँड पॉव्हर्टी (अर्धशताब्दी निमित्त प्रसिद्ध झालेली आवृत्ती; न्यू यॉर्क राबर्ट शॅलकेनवाच फाउन्डेशन, १९३३) पृष्ठ ८.

[२] वरीलप्रमाणें पृ. ९

आणि आर्थिक प्रगतीवरोवर ह्यावावतींतली परिस्थिती अधिकच विकट होणार होती.

मात्र एका वावतींत रिकार्डोच्या मानानें हेन्री जॉर्ज हा जवरदस्त आशावादी होता. त्याच्या पुस्तकाच्या मुखपृष्ठावर आणखी एक शब्द होता. तो म्हणजे 'उपाययोजना'. ह्या शब्दाला रिकार्डोच्या कोशांत स्थान नव्हतें. जमिनीच्या वापरामुळें होणाऱ्या उत्पन्नाइतकाच—यांतून जमिनीत सुधारणा केल्यामुळें मिळणारें उत्पन्न वजा करायचें—कर जर जमिनीवर वसवला आणि या मार्गानें जर जमिनीचें उत्पन्न आणि किंमत शून्यावर आणली तर आर्थिक प्रगती व्यवस्थितपणें होईल आणि तिच्यापासून होणाऱ्या लाभाची न्याय्य वाटणी होईल, हा उपाय फार जालीम होता हें उघडच आहे. या उपायवावत जमीन मालकाची प्रतिक्रिया कोणती झाली असती हें लक्षांत घेतलें तर तो अंमलांत आणला जाण्याची शक्यता नव्हतीच आणि जर तो अमलांत आणेंला गेला नसता तर दारिद्र्य कायम राहिलें असतें शिवाय वाढत्या विषमतेनें आणि अनिश्चिततेनें त्याला साथ केली असती. अमेरिकेनें रंगवलेलें स्वप्न जर हेंच असेल तर मध्यवर्ती परंपरेनें केलेल्या आर्थिक भाकितापेक्षां तें काहीं फारसें समाधानकारक नव्हतें. आणि प्रत्यक्षांत हेन्री जॉर्जच्या अनुयायांच्या जहालपणाला विफलतेनें आणि कटुतेनें ग्रासून टाकलें.

[३]

अमेरिकन जहाल मतवादी परंपरेत हेन्री जॉर्जइतकेच प्रभावी असे इतरही विचारवंत होऊन गेले. हेन्री डेमारेस्ट लॉइड आणि एडवर्ड वेलॉमी यांची नावें या संदर्भात विशेषकरून नजरेपुढें येतात. हें गेल्या शतकाच्या अखेरच्या दशकांत चमकले. त्यानीं काढलेले निष्कर्ष स्थूलमानानें सारखेच होते. जर मोठ्या प्रमाणांवर सुधारणा केल्या नाहींत. तर तीव्र विषमता व दारिद्र्य यांपासून सुटका नाहीं असें त्यांचें मत होतें. मात्र हेन्री जॉर्जच्या वावतींत जें झाले नाहीं तें त्यांच्या वावतींत झालें. त्यांच्या वरोवरच त्यांच्या मीमांसेला देखील मूठमाती मिळाली. राहता राहिला थॉर्नस्टिन व्हेब्लेन (१८५७-१९२८). आणि अनेकांच्या मतें तोच एकटा खऱ्या अर्थानें अमेरिकन अर्थशास्त्रज्ञ होता.[1]

---

१ मध्यवर्ती परंपरेत ज्या सामान्यपणें वसत नव्हत्या अशा आणखी तीन व्यक्ती होऊन गेल्या असे म्हणता येईल त्यांचीं नावें अशीं: सायमन एन्. पॅटन (१८८२-१९२२). जॉन आर कॉमन्स (१८६५-१९४५) आणि वेस्ले सी मिचेल (१८७४-१९४८). परंतु पॅटनचें व्यक्तिमत्व जरी वैशिष्ट्यपूर्ण आणि चित्तवेधक असलें तरीं अमेरिकन पाखंडयांच्यां नशीवीं जी उपेक्षा येते तिनें करेप्रमाणें त्यालाही ग्रासलें आहे. कॉमन्स आणि मिचेल यानीं माणसाच्या भवितव्यावद्दल सर्वंकष असा सिद्धान्त मांडण्याचें एकंदरीत टाळलेंच. मग तें तात्विक कारणांसाठीं असो कीं तांत्रिक कारणासाठीं असो यामुळें ज्या वैचारिक भूमिकांशीं इथें आपल्याला कर्तव्य आहे त्या घडविण्यात त्यांचा काहीं वाटा आहे असें म्हणता येणार नाहीं.

रिकार्डोनें निर्माण केलेल्या नैराश्यावर उतारा म्हणून काहीं आशेचीं किरणें शोधण्याचा जो प्रयत्न चालू होता त्यांत व्हेब्लेन सामील झाला नाहीं. त्या ऐवजीं त्यानें मूर्तिभंजकाची भूमिका स्वीकारली. बहुसंख्य माणसांचें भवितव्य खडतर आहे असें भाकित रिकार्डोनें करून ठेवलें होतें. त्याचे अनुयायी तसें होणार नाहीं अशी वांझोटी आशा मनाशीं बाळगत होते. ह्या वादविवादाच्या गलबल्याच्या वर व्हेब्लेन नें आपलें वैचारिक आसन मांडलें. मनुष्याच्या भवितव्याशीं आपल्याला काहीं कर्तव्य नाहीं अशी भूमिका त्यानें निदान ह्या आसनापुरती तरी घेतली. पण त्या वरोवर त्यानें असेंही स्वच्छपणें सांगितलें कीं जे प्रगतीच्या गोष्टी करतात ते वहुधा मूढ तरी असतात नाहीतर लुच्चे तरी असतात.

मध्यवर्ती परंपरेत संकटांची आपल्याला चाहूल लागते तीं व्हेब्लेननें अधिक ठळकपणें मांडलीं. त्याची भूमिका अशीः दारिद्र्य किंवा अधिक काटेकोरपणें वोलायचें झालें तर माणसाची नैतिक व आर्थिक अधोगती ह्या सध्यांच्या अर्थरचनेचा अपरिहार्य भाग आहेत. आणि जसजशी प्रगती होईल तसतशी ही अधोगती अधिक होत जाईल. कारखाने आणि नफ्यासाठीं चाललेले आर्थिक व्यवहार यांत एक प्रकारची तेढ असणें अपरिहार्य आहे. कारण कारखान्यांची संख्या व उत्पादनक्षमता या दोहोंत झपाट्यानें वाढ होते आणि त्यामुळें अतिरिक्त प्रमाणात उत्पादन होतें आणि ह्यामुळें नफा करणें हा जो आर्थिक व्यवहाराचा मूळ हेतु तोच निष्फळ व्हायचा प्रसंग येतो.[1] ह्या झगडयात अखेर नेहमीच आर्थिक व्यवहाराचा विजय होतो. तांत्रिक दृष्ट्या ज्या क्षेत्रात विपुल उत्पादन होणें शक्य आहे त्या क्षेत्रात मक्तेदारीचे निर्वंध घातले जातात, ह्यामुळें कारखान्याच्या मालकांचें उत्पन्न वाढतें. पण त्याची किंमत वाढत्या दारिद्र्यांच्या स्वरूपात जनतेला द्यावी लागते.

प्रगतीसाठीं ही जी आर्थिक किंमत द्यावी लागते त्यापेक्षां तिचे सांस्कृतिक परिणाम अधिक गंभीर स्वरूपाचे असतात. यंत्रावर चालणाऱ्या कारखान्यात रावणाऱ्या मजूरानां वुद्धि कर्मा वापराची लागतें अशातलाच कांहीं भाग नाहीं. पण यंत्रावर काम करताना एका संकुचित आणि यांत्रिक पद्धतीनें विचार करावा लागतो आणि विचार करण्याच्या अन्य मार्गापासून माणसाला परावृत्त केलें जातें. त्याचप्रमाणें प्राचीन कालापासून कायदा व सुव्यवस्था यांचे जे आधारस्तंभ ठरले आहेत त्या कुटुंव व सामाजिक संस्थांच्या मुळावरच हे कारखाने घाव घालतात. (हें करण्यात मजूर संघटना प्रामुख्यानें भाग घेतात.) मोठ्या प्रमाणावर मजूर एकत्र आले कीं त्यामुळें समाजवादी मूर्तिभंजनाला फार मोठी चालना मिळते आणि ह्यामुळें अराजकाला आमंत्रण मिळाल्यासारखें होतें.

---

[1] थॉर्नस्टिन व्हेब्लेन, द थिअरी ऑफ विझिनेस एंटरप्राइज (१९३२ ची आवृत्ती न्यू यार्क, सिक्रवनेर) पृ. २३४

तीव्र मंदीचीं संकटें पुन्हां पुन्हां कोसळतात तीं कांहीं केवळ यदृच्छेनें नव्हे. कारखाने आणि आर्थिक व्यवहार यांत जी तेढ असते तिच्यातून तीं उद्भवतात. प्रस्तुत अर्थव्यवस्थेंत तीं अंगभूत असतात आर्थिक व्यवहाराच्या नित्यक्रमाचा एक भाग म्हणून तीं कोसळत असतात.[1]

'द थिअरी ऑफ लिझर क्लास'[2] (निरुद्योगी वर्गांवद्दलची मीमांसा) या आपल्या अमर ग्रंथात व्हेब्लेननें विषमतेचें जें नाट्यपूर्ण चित्रण केलें आहे तें केवळ अपूर्व आहे. जे श्रीमंत आणि यशस्वी झालेले असतात त्याच्याकडे महत्वाचें असें आर्थिक कार्यच नसतें. त्यामुळें त्यांच्यावर चेवानें हल्ला चढवणें आवश्यक नव्हतें. उलट अलिप्तपणें, सूक्ष्मशा तिरस्कारानें आणि कांहींसें दिङ्मूढ होऊन त्यांचें निरीक्षण करण्यात आलें खुराडचातल्या कोंवड्या आपल्याकडे मोठेपणा असावा म्हणून जेव्हां झगडतात तेव्हां आपण त्यांच्याकडे कुतूहलानें पहातो. पण तसें पहातांना आपण त्या कोंवड्यांच्या सामाजिक मूल्यांचा कांहीं स्वीकार करीत नाहीं. श्रीमंतांच्या बाबतींत व्हेब्लेनची भूमिका अशीच होती.

संपत्ती आणि दारिद्र्य या दोन्हीं गोष्टी भांडवलशाही अर्थव्यवस्थेचाच अंगभूत भाग आहेत असें रिकार्डोप्रमाणेंच व्हेब्लेनचेंही मत होतें. आणि या दोन्होंचीं जीं विशेष अनाकर्षक अंगें होतीं त्यांपासूनही सुटका नव्हती. श्रीमंतांचा भपका, उधळपट्टी, निरुद्योगिपणा आणि अनाचार या मार्गे कांहीं एक हेतु असतो, संपत्तीनिष्ठ संस्कृतींत मिळवलेल्या यशाच्या त्या विजयपताका असतात. उलट श्रम हे समाजातले कनिष्ठ स्थान दर्शविणाऱ्या टिळ्यासारखे असतात. 'ह्या लुटारू संस्कृतींत श्रम हे दुर्बळेपणाचें आणि गुलामगिरीचे द्योतक असतात अशी लोकांची भावना होते. ते सामाजिक कनिष्ठतेचे निदर्शक असल्यामुळें उच्च कोटीच्या माणसांनीं श्रम करणें कमीपणाचें मानलें जातें.'[3]

ही परिस्थिती पालटेल अशी आशा करायलाही जागा नव्हती. संपत्तीनिष्ठ संस्कृतीचा ती एक अविभाज्य भाग होती. क्रांती होईल आणि नंतर समाजाची पुनर्रचना होईल असा विश्वास मार्क्सला वाटला असला तरी व्हेब्लेनला वाटला नाहीं. उतार वयांत त्याला एकाच गोष्टीचा दिलासा वाटायचा ती अशी कीं ही उत्क्रान्त होणारी अर्थव्यवस्था स्वतःलाच नव्हे तर साऱ्या मानवी संस्कृतीला विनाशाप्रत नेत होतें. अमेरिकेच्या सीमाप्रदेशातल्या सर्वश्रेष्ठ अर्थशास्त्रज्ञाची भूमिका ही अशी होती.

---

[1] वरीलप्रमाणेंच. पृ. १८३. वर साररूपानें दिलेली मीमांसा मुख्यतः 'द थिअरी ऑफ बिझिनेस एंटर प्राइज्' या पुस्तकात केलेली आहे.

[2] १८९९ सालीं प्रसिद्ध झालें. मॉडर्न लायब्ररीनें याची आवृत्ती काढलेली आहे.

[3] द थिअरी ऑफ लिझर क्लास. पृ. ३६

विचारवंत या नात्यानें व्हेब्लेन हा खरोखर किती प्रभावी ठरला हा नेहमींच वादाचा विषय राहील. अमेरिकेतील अर्थशास्त्रीय विचाराच्या क्षेत्रात खास अमेरिकन पिंडाचा असा विचारवंत तोच होता हें निःसंशय. अर्थशास्त्रातील प्रमाणित परंपरेचा प्रभाव किती जबरदस्त होता याची कांहीं लोक दखल घेत नाहींत आणि अमेरिकन वैचारिक क्षेत्रांतलें पुढारीपण अमेरिकन विचारवंताकडेच असणार असें ते गृहीत धरतात. अशा माणसांना व्हेब्लेनचें विशेष कौतुक वाटतें.[1] खरें म्हणजे आशावादी व बहिर्मुख वृत्तीचा माणूस असें जें अमेरिकन माणसाचें ठसावंद चित्र रंगवलें जातें त्याच्याशीं व्हेब्लेनचें बिलकूल साम्य नव्हते. आणि तरी अशी भूमिका घेतली जाते. प्रत्यक्षांत व्हेब्लेनच्या खास अर्थशास्त्रीय सिद्धान्तांचें वाचन अगर पठण फारसें झालेंच नाहीं. मध्यवर्ती परंपरेच्या सिद्धान्तांच्या जोडीला क्रमिकपुस्तकांत त्याना कधींच स्थान मिळाले नाहीं. पण कॅरेइतकी मात्र त्याची उपेक्षा झाली नाही. अभ्यासकांच्या, लेखकांच्या, आणि शिक्षकांच्या एका पिढीवर त्यानें प्रभाव पाडला आणि त्यानीं त्याची मूर्तिभंजक वृत्ति उचलली आणि कांहीं प्रमाणात तिचा संस्कार तत्कालीन विचारांवर केला. व्हेब्लेनचा ज्यांच्यावर प्रभाव पडला ते शिक्षक मध्यवर्ती परंपरेचे सिद्धान्तच शिकवीत असत. पण आर्थिक प्रगतीमुळें जनतेचें फार भलें होईल किंवा आर्थिक प्रगती नांवाची कांहीं गोष्ट खरोखरच अस्तित्वात आहे या कल्पनांकडे ते केवळ अविश्वासानेंच नव्हे तर कांहींशा तिरस्कारानेंही पहात असत अशा रीतीनें मध्यवर्ती परंपरेत ज्या शंका व जें नैराश्य अभिप्रेत होतें तें व्हेब्लेननें उघडें करून दाखवलें. महामंदीपूर्वीच्या अमेरिकन विचारांत असा एक सूर होता कीं भांडवलशाही अर्थरचनेंत कांहीं सुधारणा अगर प्रगती होईल, या गोष्टीवर सावध विचारवंत कधींही विश्वास ठेवणार नाहीं. अशा कल्पना दिखाऊ, फसव्या किंवा भ्रममूलक असतात आणि त्यांचें पितळ लौकरच उघडें पडतें असा समज होता. न्यू डीलचा कार्यक्रम अंमलात आल्यानंतर हा समज मागें पडला. पण तसें होण्यापूर्वी रूझवेल्टनें न्यू डीलच्या द्वारें केलेल्या सुधारणा निरर्थक आहेत असा निष्कर्ष पुन्हां काढण्यात आला होता. ह्या दृष्टिकोनाच्या मागें व्हेब्लेनकडून आलेलें वैचारिक लोण होतें.

[४]

खास अमेरिकेचें असें ज्याला म्हणता येईल तें विचारधन हें असें होतें. इथें आपण एका अन्य प्रकारच्या सामाजिक विचारधारांची दखल घ्यायला हवी. ह्या

---

[1] मला वाटतें कीं ही टीका प्रा. कोमँगर यांना लागू पडते. संदर्भः द अमेरिकन माइन्ड (न्यू हॅवन, येल युनिव्हर्सिटी प्रेस, १९५०) पृष्ठ २२७-४६. या ग्रंथात त्यानीं व्हेब्लेनबद्दल विवेचन केलें आहे.

विचार धारा मुळांत अमेरिकन नव्हत्या. पण इथें आल्यावर मात्र त्यानीं अगदीं पक्कें मूळ धरले. गेल्या शतकाच्या अखेरीस व चालू शतकाच्या सुरुवातीस सामान्य माणसाच्या भवितव्याबद्दलच्या कल्पनांवर या विचारधारांचा सखोल परिणाम झाला. ह्या सामाजिक विचारधाराना सामाजिक डार्विनवाद (अगर उत्क्रान्तिवाद) असें म्हणतात.

आपण ज्या जगाबद्दल लिहितो तें झगडयावर आधारलेलें आहे ही गोष्ट रिकार्डो किंवा माल्थस यांनीं झांकून ठेवली नाहीं. ह्या झगडयांत कांहीं माणसें किंवा कदाचित बरींच माणसें चिरडलीं जात असत आणि अश्या माणसांचें जीवन सुसह्य व्हावें यासाठीं समाज काहीं करूं शकेल अशीं मुळींच आशा नव्हती. त्या काळांत उघडयावर पडलेल्यांच्या निर्वाहाची सोय करण्यासाठीं गरीबीविषयक कायदे (पुअर लॉज्) होते. त्यांनुसार होणारा खर्च भागावा म्हणून दर गांवाला कांहीं पैसा द्यावा लागत असे. या कायद्यांबाबत रिकार्डोनें असा निष्कर्ष काढला कीं त्यांत सुधारणा करण्यांच्या कोणत्याही योजनेकडे यत्किंचित्ही लक्ष देण्यात अर्थ नाहीं. ते रद्द करणें हा ज्या सुधारणेचा अंतिम उद्देश असे तिची गोष्ट वेगळी. तो पुढें असें म्हणाला कीं ह्या कायद्यांमुळें संपत्ती व सत्ता यांच्या जागीं दारिद्र्य दुबळेपणा हीं स्थानापन्न होतात आणि ही गोष्ट गुरुत्वाकर्षणाच्या सिद्धान्ताइतकीच निरपवाद आहे [1]

मात्र, साऱ्या गोष्टी बाजारयंत्रणेवर सोंपवाव्या आणि आर्थिक प्रक्रियांत दयाबुद्धीला लुडबुड करूं देऊं नये ही जी रिकार्डोची भूमिका होती ती कार्यानुरूप होती. निरुद्योगीपणाला जर आर्थिक कुबडीचा आधार दिला नाहीं आणि धनाचा अपव्यय टाळला तर उत्पादन वाढेल व एकंदर सुबत्ता वाढेल. झगडा व आपत्ती ह्या स्वभावतःच स्वागतार्ह आहेत असें काहीं त्याचें म्हणणें नव्हतें.

सामाजिक डार्विनवाद्यांची भूमिका वेगळी होती. त्यांच्या दृष्टीनें अर्थरचनेच्या पटांगणात माणसें जमतात ती एकमेकांशीं चढाओढ करण्यासाठीं ह्या चढाओढीचे नियम बाजारयंत्रणा निश्चित करते. या चढाओढीत जे यशस्वी होतात त्याना जगण्याची संधी मिळते. आणि त्यानीं दिपविणारें यश मिळवलें तर तें धनवान होतात. पण या स्पर्धेत जे हरतात त्याना (अपेशी रोमन ग्लॅडिएटर्सप्रमाणें) सिंहांच्या भक्ष्यस्थानीं पडावें लागतें. या चढाओढीमुळें समर्थ कोण तें ठरतें. इतकेंच नव्हे तर या समर्थांच्या शक्तींचा विकास होतो आणि त्यांचीच वंशवृद्धी होईल अशी व्यवस्था

१ प्रिन्सिपल्स ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी पृ. १०७-८.

होते. आणि दुर्बळांचें जेव्हां उच्चाटन होतें तेव्हां ते स्वत:सारखी प्रजा निर्माण करणार नाहींत अशीहि व्यवस्था होते. अशाप्रीतीनें हीं चढाओढ व झगडा समाजाला उपकारक ठरतो. आणि जितका तो अधिक निष्ठूर तितका दुर्बळांचा अधिक प्रमाणांत नि:पात होतो आणि समाजाचें अधिक भलें होतें.

ह्या विचारधारेचा उगम एकोणीसाव्या शतकांत इंग्लंडमध्यें झाला आणि तिची निर्मिती व पुरस्कार मुख्यत: कोणी केला असेल तर तो हर्बर्ट स्पेन्सरनें (१८२०-१९०३) 'लायकांचाच टिकाव लागतो' (Survival of the fittest) या सूत्राचा जनक चार्लस डार्विन नसून स्पेन्सर हा होता आणि पहिल्यानें लागू करण्यांत आलें तें अन्य प्राण्यांना नव्हे तर मनुष्य प्राण्यांना. वंश परंपरेनें आलेलें व तसेच स्वप्रयत्नानें जोपासलेले स्वाभावविशेष पुढल्या पिढ्यांतहि उमटतात अशी स्पेन्सरची कल्पना होती.

स्पेन्सर हा एका एकांतिक विचारसरणीचा अगदीं एककल्ली पुरस्कर्ता होता. टपालखातें आणि टांकसाळ ह्यांच्यावर देखील सरकारची मालकी असण्यास त्याचा विरोध होता. सरकारतर्फे शिक्षणांची व्यवस्था करण्यास देखील त्याचा विरोध होता. कारण त्यामुळें मातापित्यांना आपल्या मुलांसाठीं शाळेची निवड करण्याचें स्वातंत्र्य रहात नाहीं. इतकेंच नव्हें तर त्यामुळें मुलांना शिकवावें कीं अज्ञ ठेवावें यासंबंधचा निर्णय घेण्याच्या स्वातंत्र्यालाहि बाध येतो असा स्पेन्सरचा दावा होता. फार काय ज्यांना निर्वाहांचें साधन नाहीं त्यांना सरकारनें मदत करावी किंवा सांडपाण्या बद्दलची व्यवस्था सार्वजनिक रित्या व्हावी यालाहि त्याचा विरोध होता. कारण काय तर म्हणे त्यामुळें दुर्बळांना जिवदान मिळतें.

'ज्यांचा विकास अत्यल्प प्रमाणांत झालेला आहे त्यांना निसर्ग वेणून काढतो आणि त्यातून जे वाचतात त्यांना सतत अनुभवाच्या शिस्तीच्या धारेवर धरतो. आणि त्यामुळें ज्यांना जीवनाविषयींच्या सत्य परिस्थितीचें ज्ञान आहे आणि त्या ज्ञानानुसार वर्तन करण्याची ज्यांच्या अंगीं कुवत आहे अशीच माणसें टिकून रहातात व एक सकस प्रजा निर्माण होते. अज्ञानाचें प्रायश्चित माणसाना भोगायला लागूं नये अशी व्यवस्था करून जर निसर्गाची ही शिस्त ढिली केली तर तितक्याच प्रमाणात माणसाची प्रगतीहि अटळपणें खुंटेल. अज्ञान हें जर शहाणपणा इतकेंच निर्धोक झालें तर शहाणपण मिळविण्याची तसदी कोणी घेणार नाहीं.'[1]

दुबळ्या माणसाना फोलपटासारखीं उडवून देण्याच्या मार्गांत खाजगी धर्मदायामुळें अडथळा येतो म्हणून हर्बर्ट स्पेन्सरनें त्यालाहि विरोध केला असता. त्यानें तसें

१ सोशल स्टॅटिक्स (न्यू यॉर्क, डी अॅपलटन १८६५) पृ. ४१३

केलें नाहीं याचें कारण इतकेंच कीं त्यामुळें दात्याच्या स्वातंत्र्यावर बंधन पडलें असते. दुःख आणि दुर्दैव हीं कांहीं केवळ दुःख आणि दुर्दैव नसतात. माणसाच्या विकासाच्या शिडीच्या त्या पायऱ्याही असतात. त्यामुळें दुःख कमी करण्याचा कोणी प्रयत्न केला तर प्रगती घडवून आणण्याच्या नैसर्गिक योजनेंत विघ्न आलें असतें. सामाजिक जीवनाच्या मूलभूत नियमाचाच भंग करून त्या जीवनांत सुधारणा करूं पहाणें ह्याच्यासारखीं अर्थशून्य आणि हास्यास्पद गोष्ट दुसरी कोणतीहि नसेल.'[1]

स्पेन्सर हा जरी इंग्लंडांतला असला तरी त्यांच्या सामाजिक डार्विनवादाला सर्वांत घवघवीत यश मिळालें तें अमेरिकन संघराज्यांतच. इथल्या येलचे विल्यम ग्रॅहॅम सुम्नर् (१८४०-१९१०) हे त्या तत्वज्ञानाचें महान् प्रवर्तक झाले. आणि त्या तत्वज्ञानाला इतर अनेक दुय्यम पुरस्कर्तेही येथेंच लाभले. एकोणीसाव्या शतकाच्या अखेरच्या आणि चालू शतकाच्या सुरवातीच्या दशकांत इथें स्पेन्सरच्या पुस्तकांचा खूप प्रसार झाला—निदान त्यांच्यावर चर्चा तरी खूप झाली. स्पेन्सरनें १८८२ सालीं जेव्हां अमेरिकन संघराज्याला भेट दिली तेव्हां एखाद्या धर्मप्रवर्तकाला साजेसें त्याचें स्वागत करण्यात आलें त्याच्या विचारांचा प्रभाव त्या वेळीं न्यायालयांवर देखील पडला होता असें दिसतें. कारण रोटी बनविणाऱ्या कामगारांचे कामाचे तास दिवसाला दहाहून अधिक असूं नयेत असा जो कायदा न्यूयॉर्क राज्यानें केला होता तो सर्वोच्च न्यायालयानें घटनाबाह्य ठरवला. त्यावेळीं न्यायमूर्ती होम्सनीं असें उद्गार काढले मीं "चौदाव्या घटनादुरुस्तीनें हर्बर्ट स्पेन्सरच्या 'सोशल स्टॅटिक्स' या ग्रंथाला काहीं कायद्याचें स्वरूप दिलेलें नाहीं.[2] पण न्यायालयाच्या निर्णयाला जोडलेली ही केवळ मतभेदाची पुस्ती होती.

या नव्या प्रजासत्ताक देशांत स्पेन्सरला ही जी लोकप्रियता लाभली तिच्यामागें अनेक कारणें होतीं. स्पेन्सरच्या काळांत खुद्द इंग्लंडमध्यें अनिर्बंध स्पर्धेच्या तत्वाला मुरड घातली जात होती. कामगार संघटना, कारखान्यांची तपासणी, बायका व मुलें यांच्या कामाच्या तासांवर निर्बंध वगैरे गोष्टींचा स्वीकार करण्यात आला होता. पण अमेरिकन संघराज्यात मात्र मानववंशांत सुधारणा करण्याचें कार्य निघृणपणें चालू होतें.

आणि हें कार्य असेंच चालूं रहावें व जीवनाच्या झगडघात जे यशस्वी झालें आहेत त्यांची पर्यायानें अशीच चलती व्हावी अशी पुष्कळांची इच्छा होती. १८६६

१ प्रिन्सिपल्स ऑफ एथिक्स खंड २ (न्यूयॉर्क, डी. ॲपलटन ॲंड कंपनी, १८९७) पृ. २६०.

२ लॉचनेर विरुद्ध न्यूयॉर्क, १९०४

सालीं हेन्री वॉर्ड बीचर यानें स्पेन्सरला असें सांगितलें कीं अमेरिकन समाजाच्या विशिष्ट स्थितीमुळें तुमच्या लेखनाचा युरोपांत झाला त्याहून इथें अधिक परिणाम होत आहे.[1] खरें म्हणजे परिस्थिती व विचार यांचा इतका अनुकूल मिलाफ कधीहि झाला नसेल.

ज्या वेळीं अमेरिकेत धनिकांच्या हातीं अफाट संपत्तीचा संचय होत होता त्याच वेळीं सामाजिक डार्विनवादाचा उदय झाला. त्या वेळीं विषमतेला सुमार राहिला नव्हता आणि संपत्तीच्या प्रदर्शनाला धरबंध राहिला नव्हता. न्यूयॉर्कमध्यें भव्य दगडी प्रासाद उभारले जात होते. आणि त्याहूनही बादशाही आरामगृहें न्यूपोर्टला बांधलीं जात होतीं. १८८३ सालीं विल्यम केव्हँडरबिल्ट यांच्या पत्नीनें एका नृत्यसमारंभावर अडीच लाख डॉलर खर्च केले. १८९७ सालीं ब्रँडले मार्टिन यानीं जो नृत्यसमारंभ घडवून आणला तो इससे भी जादा होता. या समारंभासाठीं वॉलडॉर्फ अॅस्टोरियातला नृत्यमहाल असा सजविण्यांत आला होता कीं तिथें गेल्यावर व्हर्सेल्सच्या राजवाड्यात आहोत असा भास व्हावा. त्या समारंभाला हजर राहिलेल्या एका निमंत्रितानें सोन्याचें नक्षीकाम केलेलें चिलखत चढविलें होतें. त्याची किंमत दहा हजार डॉलर होती. त्याच्या आधीं काहीं दिवस डेलमॉनिको येथें—या ठिकाणीं स्पेन्सरला देखील पाहुणचार करण्यात आला होता—निमंत्रितानां शंभर डॉलरच्या नोटांत गुंडाळलेल्या सिगरेटी देण्यांत आल्या होत्या. आणि त्या त्यानीं श्रीमंती रुबाबानें ओढल्याहि होत्या.

ह्याच काळात समाजातल्या बहुसंख्य लोकानां दारिद्र्य आणि अधोगति यांचे चटके सहन करावे लागत होते. ज्या कामगारांच्या जिवावर हें वैभव पोसलें जात होतें ते तिकडे दूर गलिच्छ वस्त्यांतल्या गोंगाटात रहात होते. आवतीभोवती भिकाऱ्यांचें तांडें उभे होते. पुन्हां ह्या संपत्तीच्या कमाईखातर इतरानां काहीं तोशीस पडत नसे अशातलाहि भाग नव्हता. ती मिळवण्याच्या हिकमती काहीवेळां अगदीं आडमुठ्या असत. पण ह्याबद्दल कोणी आपल्या मनाला टोंचणी लावून घ्यायची गरज नव्हती. निसर्गाच्या निवडीचें कार्य चालू होते. निसर्गानेंच आपली निवड केली असा टेंभा श्रीमंत लोक मिरवू शकत होते. न्यूयॉर्कमध्यें अशा यशवंताच्या एका थाटाच्या मेजवानीच्या वेळीं चॉन्स डिप्यू यानीं या गोष्टीचें निमंत्रितानां स्मरण करून दिलें होतें. आणि विशेष महत्वाची गोष्ट ही कीं हें यश त्या श्रीमंताच्या पुत्रांच्याहि वांट्याला येणार होतें. कारण त्यानां यशवंत करणारे त्याचे

---

१ रिचर्ड हॉफस्टॅडटर यानीं उद्धृत केलेलें. सोशल डार्विनिझम इन अमेरिकन थॉट (बॉस्टन, बीकॉन प्रेस, १९५५) पृ. ३१

गुणविशेष वंशपरंपरेनें त्या पुत्राच्या अंगीं उतरणार होते. अशा रितीनें वारसा हक्कानें मिळालेल्या संपत्तीचें समर्थन केलें जात होतें. कारण जे जगण्यास अधिक लायक त्यांचाच हातीं ती संपत्ती जात होती. दरम्यान् दारिद्र्याचा प्रश्न सोडवण्याचें जें एकमेव साधन होतें तें आपलें कार्य करीत होतें. नालायकांना वेणून काढलें जात होतें. एरवी भूतदयेमुळें त्यानां खाजगी किंवा सार्वजनिकरित्या काहीं मदत करावी लागली असती आणि ती खिशाला अंमळ जडच पडली असती. पण आतां तशी करण्यावरच मुळीं बंदी पडली होती. आणि तो देखील स्वार्थीपणामुळें नव्हे तर निसर्गक्रमात अडथळा आणणें इष्ट नाहीं या सूज्ञ जाणिवेमुळें. लायकांचाच टिकाव लागतो हा नियम काहीं मनुष्यनिर्मित नाहीं. आणि त्या नियमानुसार चाललेल्या निसर्गक्रमात जर आपण अडथळा आणला तर त्यामुळें नालायक मात्र तग धरून रहातील.[१] ह्यापेक्षां कर आणि दान यानां विरोध करणें किती तरी चांगलें. शिवाय त्यामुळें खिशाला गळती लागणें देखील टळतें. आज देखील जेव्हां एखादा मनुष्य भिकाऱ्याला भिक्षा देण्याचें नाकारतो आणि भिक्षा देण्याइतकी वाईट गोष्ट दुसरी कुठची नाहीं. असें म्हणून आपल्या कृतीचें सात्विक समर्थन करतो तेव्हां तो स्पेन्सर आणि सुम्नर यांच्या विचारसूत्राचाच आधार घेत असतो.

पुन्हां संपत्ती कशी मिळवली आणि विकास कोणत्या मार्गानें साधला त्याचीहि शहानिशा करण्याची आणि त्यामुळें मन अस्वस्थ करण्याची गरज नसते. ह्याबाबत जॉन डी. रॉकफेलर यानीं रविवारच्या शाळेतल्या एका भाग्यवान् वर्गापुढें जें विवरण केलें तें असें 'उद्योगधंद्यांतील मोठ्या मक्तेदाऱ्यांचा विकास होत आहे तो लायकांचाच टिकाव लागतो या तत्वानुसार...अमेरिकन ब्यूटी हें गुलाबपुष्प इतकें सुगंधी आणि दिमाखदार आहे कीं त्यामुळें पहाणाऱ्याचें मन प्रसन्न होतें. पण तें फुलण्यासाठीं त्यांच्या आंवतीभोंवतीच्या खुरटचा कळघा खुडून टाकाव्या लागतात ! जीं गोष्ट गुलाबपुष्पाची तीच स्टॅंडर्ड ऑईल कंपनीची. उद्योगधंद्याच्या क्षेत्रातली हीं प्रवृत्ती काहीं अनिष्ट नव्हे. एका निसर्ग नियमानुसार व परमेश्वरी दंडकानुसार घडणारी ती घटना आहे.'[२] अशा रितीनें रेल्वेवहातुकीच्या दरातील खास सवलती, तेलाच्या नळांवरील एकतंत्री कबजा, दुहेरी किंमतींचा पद्धतशीर उपयोग आणि अशाच अन्य आक्रमक आर्थिक क्लृप्त्या या सर्वांचीं आणि अमेरिकन ब्यूटी गुलाबपुष्प व परमेश्वर याची सांगड घालण्यात आली.

---

१ विल्यिम ग्रॅहॅम सुम्नर एसज् इन पोलिटिकल ॲंड सोशल सायन्स (न्यू यॉर्क, हेन्री हॉल्ट, १८८५) पृ. ८५.

२ हॉटफसॅडटर, सोशल डार्विनिझम इन अमेरिकन थॉट. पृ. ४.

[५]

१९८९ सालीं नॅशनल ॲसोसिएशन ऑफ मॅन्युफॅक्चरर्स या संस्थेच्या अध्यक्षपदाचा निरोप घेताना मिस्टर कोला जी. पार्कर यानीं हर्बर्ट स्पेन्सरचें नांव घेऊन असें आवाहन केलें कीं मजुरानीं कामगारसंघटनांचीं गुलामगिरी झुगारून द्यावी आणि उद्योगपतीनीं सरकारच्या मालकत्वातून आपली सुटका करून घ्यावी. या मालकत्वांच्या संदर्भात त्यानीं पुढें असें म्हटलें, "आपल्या अर्थरचनेतला हा कमकुवत भाग काढून टाकल्याशिवाय आपल्या उज्वल भवितव्याचीं आपल्याला भक्कम पायावर उभारणी करता येणार नाहीं. इतके दिवस ज्यांचा आधार घेतला त्या सरकारी कुबड्या टाकून देतानां उद्योगपतीनां तीव्र वेदना होतील हें खरें. पण तरी असें करायला हवें." हें आवाहन मोठें स्फूर्तीदायक होतें ! पण त्याला प्रतिसाद देण्यासाठीं कामगारानीं काय किंवा उद्योगपतीनीं काय काहींहि हालचाल केली नाहीं.

पण एकंदरीत स्पेन्सर आणि सुम्नर या दोघांचेंहि लोकांवरचें वजन आतां नाहींसें झालें आहे. लोकशाही आणि आधुनिक वळणाची कॉर्पोरेशन यानीं त्या दोघांची मतःप्रणाली खिळखिळी करून टाकली आहे. आपल्याला नालायक म्हणून जीवनांतून उठवणाऱ्या आत्मघातकी घोरणानां मतांच्या द्वारें पाठिंबा देण्यास सर्वसामान्य जनतेनें नकार दिला आहे. जगण्यासाठीं चालणारा झगडा टाळता कसा येईल तें दाखविणाऱ्या नव्या नव्या कल्पना काहीं लोक समाजपुढें मांडत होते आणि त्यांच्या आधारें निवडणुकी जिंकत होते. एकंदरीत लोकशाहीत काटछाट केल्याशिवाय सामाजिक डार्विनवाद क्रियान्वित होणें अशक्य दिसत होतें. पुन्हां जीवनाच्या झगडघामुळें उद्भवणाऱ्या आपत्ती लोकांनां मुकाटघानें सहन करायला भाग पाडण्यासाठीं पोलिसदलाची आवश्यकता होती. आणि ह्या पोलिसदलाची निष्ठा अबाधित रहावी म्हणून त्यांच्यासाठीं सामाजिक विमायोजना आखणें व ऊपवार वढती देणें आवश्यक होतें. (पण ह्या दोन गोष्टीं सामाजिक डार्विनवादाला हरताळ फासणाऱ्या होत्या.)

आधुनिक कॉर्पोरेशननें ह्या विचार प्रणालीवर जो आघात केला तो वेगळघा प्रकारचा होता. स्पर्धेच्या द्वारें दुबळघांचें उच्चाटन व्हावें व समर्थानीं टिकून रहावें हा न्याय वेगवेगळघा व्यक्तीनीं चालविलेल्या उद्योगवंद्याच्या जगाला लागू पडतो. आणि ज्या कणखरपणामुळें जीवनाच्या झगडघात त्याचां टिकाव लागतो ते भावी पिढघांत संक्रांत होतात असा निदान दावा करता येतो. पण हाच न्याय जनरल इलेक्ट्रिक अगर जनरल मोटर्स या कॉर्पोरेशनानां कसा लागू करणार ? त्या जमुं

अमरच असतात. आणि निसर्गानें टिकण्यास योग्य म्हणून निवडलेलें स्वभाव विशेष पुढील पिढ्यांत संक्रांत होतात हें इथें कसें दाखवायचें ? ह्या कॉर्पोरेशना आपल्या स्वभाव विशेषांनीं युक्त अशा तरण्यावांड कंपन्यांना जन्म देतात असें थोडेंच म्हणता येईल ? फार तर असा युक्तिवाद करता येईल कीं झगडा व त्यांतून होणारी (या तत्वानुसार या कॉर्पोरेशनात अधिक लायक लोकांनां बढती मिळते.) बढती मिळविण्यासाठीं जो कणखरपणा, जी कल्पकता आणि डावपेंचातली जी वाकबगारी अंगीं असावी लागते ती ज्यांच्यापाशीं आहे तेच तग धरून वर चढतात. पण असें जर असेल तर सामाजिक डार्विनवाद सरकारी नोकरशाहीच्या क्षेत्रात देखील कार्य करील व तेथें बढतीसाठीं जो तीव्र झगडा चालतो त्यात लायक माणसानांच यश मिळवून देईल. पण सामाजिक डार्विनवाद ही गोष्ट मान्य करीत नाहीं.

एवढें मात्र खरें कीं अमेरिकन लोकांनीं जे दृष्टिकोन उराशीं बाळगून आजच्या संपन्नतेच्या युगांत प्रवेश केला आहे ते घडवण्यातला सामाजिक डार्विनवादाचा वांटा महत्वाचा आहे. हा असा देश होता कीं जेथें संपत्तीचा संचय झपाट्यानें होत होता. मध्यवर्ती परंपरेनें दिलेला दिलासा पटण्यासारखा वाटावा अशी इथली परिस्थिती होती. कुठें नव्हे ती सामान्य माणसाला इथें संधी मिळत होती. पण त्याबरोबरच आर्थिक जीवन हा जीवनमरणाचा झगडा आहे ह्या कठोर सत्याला त्याला तोंड द्यावें लागत होतें. कदाचित यश मिळेल पण अपयश मिळण्याची शक्यता देखील तेवढीच. आणि अपयश आलें तर त्याचें उपासमार, मृत्यू आदि सारे परिणाम भोगण्याची तयारी त्याला ठेवावी लागे. तत्कालीन समाजरचनेचा तो आवश्यक भाग होता. आणि त्यामुळें त्यांतल्या त्यांत भाग्यवान् अशा या देशाच्या आर्थिक जीवनांतही दारिद्र्य व असुरक्षितता यानां अपरिहार्य असें स्थान होतें. त्या बरोबरच विषमतेला देखील तेथें स्थान होतें, आणि पुन्हां ती समर्थनीय मानली जात होती. कारण विषमतेमुळें ज्यांचा फायदा होत होता ते मुळीं श्रेष्ठच होते. असो. प्रत्यक्ष निरीक्षणातून कदाचित् असा निष्कर्ष निघाला असता कीं युनायटेड स्टेटस् मधील आर्थिक जीवनाचा खडतरपणा कमी होत जाणार आहे. पण सामाजिक डार्विनवादानें मात्र अगदीं उलटी भूमिका हिरीरीनें मांडली.

सामाजिक डार्विनवादाचा आणखी एक चिरस्थायी परिणाम झाला. खुल्या बाजाराभोंवतीं अमेरिकन विचारवंतानीं एक पूजनीयतेचें वलय निर्माण करून ठेवलेलें होतें. मागणी आणि पुरवठा यांचो रस्सीखेंच निरंकुशपणें व्हावी अशी त्यांची भूमिका होती. आणि केवळ कार्यक्षमता वाढावी म्हणून ते असें म्हणत नव्हते. इतर मूल्यांचें जतन देखील खुल्या बाजारावर अवलंबून होतें. सामाजिक डार्विनवाद्यानीं

खुला बाजार आणि राष्ट्रातील लोकांचें चैतन्य यांचीं सांगड बांधून टाकली, त्यांची ही कल्पना पुढें लोप पावली, नष्ट झाली. पण त्यामुळें खुल्या बाजाराची आणि अन्य तितक्याच असंबद्ध मूल्यांची सांगड घालणें इतरांना सोपें झालें. आणि समाजाच्या हितासाठीं किंवा गरिबांविषयींच्या सहानुभूतीमुळें केलेल्या कोणत्याही उपाययोजनेमुळें जर बाजाराच्या खुलेपणाला बाध आला तर त्याचे परिणाम फार व्यापक होतील असे इशारे ही अप्रस्तुत सांगड घालणारे लोक देऊं लागले. व्यक्तीच्या आर्थिक जीवनांतील खांचखळगे भरून काढल्यामुळें प्राणीजीवनाची प्रगतीच खुटते असें आतां कोणी म्हणत नाहींत. पण त्यामुळें व्यक्तिस्वातंत्र्य धोक्यात येतें असा युक्तिवाद मात्र केला जातो. तसें कशाला, हें खांचखळगे नाहींसे केल्यामुळें खिश्चन धर्म धोक्यात येतो आणि चिरमुक्तीला माणूस पारखा होतो असे काहीं लोकांचें मत आहे. आणि हे लोक काहीं अगदींच मूठभर नाहींत. खुल्या बाजाराचें हें जें इतकें प्रस्थ माजलें त्याला पुष्कळसा हा सामाजिक डार्विनवाद जबाबदार होता. आणि त्यामुळें माणसाची दारिद्र्यांतून अगर आर्थिक जीवनातल्या असुरक्षिततेतून मुक्तता करण्यासाठीं समाजानें जे उपाय योजायचे त्यांच्या कक्षा या सामाजिक डार्विनवादानें संकुचित केल्या.

अमेरिकन लोकांचे आर्थिक दृष्टिकोन घडविण्यास ज्या गोष्टींनीं व शक्तींनीं हातभार लावला त्या सर्वांचा उल्लेख ह्या प्रकरणात आलेला आहे असा दावा प्रस्तुत लेखकाला करायचा नाहीं. सरहद्दीवर आणि पश्चिम भागांत रहाणाऱ्या लोकांची दृष्टी आशावादी होती आणि गेल्या शतकाच्या उत्तरकाळात व चालू शतकाच्या सुरुवातीच्या दशकात अमेरिकेत जे राजकीय वाद झाले त्यांत देखील एकंदरीत हाच आशावाद दृष्टोत्पत्तीस येतो. ह्यामागे असा एक ठांशीव विश्वास होता कीं कोणीहि अमेरिकन नागरिक स्वत:च्या परिश्रमानीं आर्थिक सुस्थिती प्राप्त करून घेऊं शकतो. निदान अँग्लो-सॅक्सन वंशाचा आणि प्रॉटेस्टंट पंथाचा कोणताहि उत्साही अमेरिकन तसें करूं शकतो. पण जे अर्थशास्त्रीय वाचले आणि शिकवले जात होते व जे तज्ज्ञांनीं मार्गदर्शक म्हणून स्वीकारलें होते ते काहीं आशेनें भारलेले नव्हते. या विचारांचे प्रभावी टीकाकार एकतर जगाकडे पाठ फिरवून बसलेले होते किंवा त्यानीं प्रचंड प्रमाणांवर समाजसुधारणा करण्याचें कंकण बांधलेलें होतें. पण जे मानांचीं स्थानें अडवून बसलेले होते आणि प्रस्थापित समाजव्यवस्थेचे पुरस्कर्ते होते ते आर्थिक क्षेत्रातल्या या झगडचाची प्रशंसा करीत होते; रिकार्डोनें ज्या झगडचाचें चित्र रंगवलें त्याहून हा भव्य आणि रोमांचकारी आहे असें म्हणत होते आणि दुर्बळांची जी ससेहोलपट चालली होती तिचें स्वागत करीत होते.

प्रकरण सहावें

मार्क्सवादाचें मर्मभेद

रिकार्डोपासून पुढें वहात आलेल्या अर्थशास्त्रीय विचाराच्या प्रवाहात सामाजिक डार्विनवादानें उजव्या बाजूला एक भोंवरा निर्माण केला. उलट मार्क्समुळें डाव्या बाजूला एक प्रचंड स्फोटच झाला. पण तरी मार्क्सवादाची मुळें मध्यवर्ती परंपरेत खोलवर गेलेलीं होतीं. मार्क्सच्या आधीं समाजवादी होते आणि नंतरही पुष्कळ झाले. पण मार्क्सचें महत्व विशेष आहे. याचें एक कारण असें कीं रिकार्डोनें आर्थिक विचारांची जी सुसंगत मांडणी केली होती तिच्या पायावर मार्क्सनें समाजवादाची इमारत उभी केली. आणि विशेष म्हणजे उत्पन्नाच्या विभागणीच्या प्रश्नाची त्यानें अगदीं स्वतंत्र मांडणी केली. आणि कांहीं अंशीं यामुळें त्याच्या विचाराना एक विशेष वजन प्राप्त झालें. ते अधिक सयुक्तिक ठरले. त्याच्या आधींच्या समाजवाद्यांच्या विचारानां असें महत्व कधींच मिळालें नव्हतें.

रिकार्डोवर रस्किननें आणि इतरानीं असा आरोप केला होता कीं तो शेअर-बाजारातला दलाल असल्यामुळें त्याच्या हृदयांत माणुसकीचा ओलावा नव्हता. आणि त्याच्या भाकितानुसार जें दुःख लोकानां अनंतकालपर्यंत भोगावें लागणार होतें त्याबद्दल तो अगदीं पूर्णपणें निर्विकार होता. रिकार्डोच्या मृत्युनंतर पाउणशें वर्षें त्याचे चहाते हा आरोप खोडून काढण्याचा प्रयत्न करीत होते. हा आरोप कदाचित् त्याच्यावर अन्याय करणारा असेल. पण रिकार्डो उसळत्या रक्ताचा मनुष्य होता असें मात्र कोणीहि म्हटलेलें नाहीं. उलट कार्ल मार्क्सचें (१८१८-८३) रक्त मात्र उसळतें होतें. त्याचा क्रोध अनावर होता. आणि ही गोष्ट अत्यंत महत्वाची आहे. रिकार्डोनें निष्कर्ष काढले होते ते असे : बहुसंख्य जनता दारिद्र्यात अधिकाधिक बुडत जाणें अपरिहार्य आहे, ज्यांच्या हातीं उत्पादनाचीं निसर्ग निर्मित साधनें आहेत ते चढत्या श्रेणीनें श्रीमंत होत जाणार आहेत, मजुरी आणि नफा यांचें परस्पराशीं वाकडें असणें अढळ आहे आणि प्रगती व्हायला हवी असेल तर नफ्याचा वरचष्मा होणें आवश्यक आहे. आतां हे निष्कर्ष तापट माणसाच्या हातीं लागले तर तो क्रांति करायला धावेल मार्क्सची भांडवलशाहीबद्दलची कल्पना रिकार्डो व माल्थस यांच्या कल्पनेइतकीच नैराश्यपूर्ण होती ह्याचा उल्लेख वर आलेलाच आहे पण रिकार्डोनें व माल्थसनें जें केलें नाहीं तें मार्क्सनें केलें. दोष कोठें आहे तें शोधून काढणें, त्याबद्दल जबाबदार कोण तें ठरवणें, परिस्थितींत सुधारणा व्हावी असा

आग्रह धरणें आणि त्यासाठीं मुख्य म्हणजे शिस्तबद्ध अनुयायी निर्माण करणें हें आपलें जीवितकार्य आहे असें मार्क्सनें ठरवलें. आणि अनुयायी निर्माण करण्यात त्याला जें यश मिळालें तितकें महंमदानंतर दुसऱ्या कोणालाही मिळालें नव्हतें.

[२]

मजुरीच्या पोलादी नियमाला मार्क्सवादातहि स्थान होतें पण त्याचें स्वरूप मात्र पालटलें होतें. मजूर जो नेहमीं उपासमारीच्या सीमेवर असतो तो कांहीं मुख्यतः झपाटयानें होणाऱ्या प्रजोत्पतीमुळें नव्हे तर भांडवलदार मालकाशीं व्यवहार करतानां तो अगदीं दुबळा ठरतो म्हणून. शिवाय त्याला जर चांगली मजुरी दिली तर भांडवलशाही अर्थव्यवस्था चालूंच शकणार नाहीं क्वचित् त्याला अगदीं किमान मर्यादेपेक्षां थोडी अधिक मजुरी मिळते हें खरें. पण अधिक चारा घातला तर दूध अधिक मिळतें म्हणून जसा गवळी गाईला अधिक चारा घालतो त्यांतलाच हा प्रकार असतो. आणि गाईला गवळ्याशीं चाऱ्यांसाठीं हुज्जत घालणें जितपत शक्य असतें तितपतच मजुराला मालकाशीं अधिक मजुरीसाठीं हुज्जत घालणें शक्य असतें.

ह्याचें एक कारण असें कीं काळ जसजसा लोटतो तसतशी मजुरांच्या समुदायात स्वतंत्र कारागिरांची व शेतकऱ्यांची भर पडत असते. बेकारी कधीं कमी होते तर कधीं जास्त होते पण ती कधीं पूर्णपणें नष्ट होत नाहीं. भांडवलशाही अर्थव्यवस्थेचा तो एक अंगभूत भाग आहे. आणि कामगारांच्या या राखीव फौजेच्या अस्तित्वामुळें कामगार भांडवलदारापुढें नेहमींच असहाय्य ठरतो. कोणत्याहि क्षणीं कामगार बेकार होऊन या राखीव फौजेत फेकला जाऊं शकतो. आणि त्यामुळें तो कधीं अडवणूक करूं शकत नाहीं आणि दिलेली मजुरी मुकाटयानें स्वीकारतो.

तांत्रिक प्रगती आणि भांडवलाचा संचय यांचा सामान्य माणसाला काहींच फायदा होत नाहीं. मार्क्सच्या खास गद्यशैलीत सांगायचें झालें तर उलट त्यामुळें '...मजूर हा माणसाचा एक कापून वेगळा काढलेला भाग होतो. यंत्राला जोडलेली एक वस्तू इतकीच त्याला किंमत रहाते आणि त्याच्या कामातलें सगळें स्वारस्य नाहींसें होऊन त्याला केवळ द्वेषजनक कावाडकष्टाचें स्वरूप येतें....त्याचीं वायकोमुलें या चरकात पिळून निघतात...दुःख, अंग पिळवून काढणारे कष्ट, गुलामगिरी, अज्ञान, मानसिक अधोगति ह्या गोष्टी त्याच्या वांटयाला येतात.'[१]

इतर अनेकांनीं परिणामकारकपणें वापरलेल्या एका कल्पनेचा मार्क्सनें आपली बाजू सजवण्यासाठीं उपयोग केला. डस्टुट ड ट्रेसी या प्रमुख परंपरानिष्ठाचें, म्हणजे

१ कॅपिटल (लंडन, ग्लीशर १९१८) पृष्ठें ६६०-१.

आपल्या विरोधकाचें पुढील विधान त्यानें उद्धृत केलें: 'गरीब देशांतले लोक सुखांत असतात. सधन देशात मात्र ते सामान्यतः दरिद्री असतात.'

शिवाय या अर्थव्यवस्थेवर भयानक मंदीचें गंडांतर पुन्हां पुन्हां कोसळत असतें. आणि अंतीम परिणामांच्या दृष्टीनें ही गोष्ट सर्वांत अधिक महत्वाची असते. सिसमॉन्डी नांवाचा एक थोर इतिहासकार, तत्वज्ञ आणि अर्थशास्त्रज्ञ होऊन गेला. त्यानें एकोणिसाव्या शतकाच्या सुरुवातीस जो ग्रंथ लिहिला त्यांत ॲडम स्मिथचा आशावाद पुष्कळसा प्रतिबिंबित झाला होता. त्यानंतर पश्चिम युरोपांत खूप प्रवास करून सोळा वर्षांनंतर तो पुन्हा अर्थशास्त्राकडे वळला. त्यावेळीं औद्योगिक मंदीचें महत्व त्यांच्या मनावर खूपच बिंबलें होतें आणि ही मंदीचीं संकटें अधिकाधिक तीव्र होत जाणार अशी त्याची खात्री पटली होती. अडचण ही होती कीं कामगारांची क्रयशक्ति त्यांच्या उत्पादनाच्या वरोवरीनें वाढत नव्हती. आणि त्यामुळें उत्पादन केलेल्या मालाचा उठाव होत नव्हता आणि मंदीचें संकट अटळपणें कोसळत होतें. आर्थिक मंदीविषयींच्या आपल्या विचाराची मांडणी करीत असतांच मार्क्स मरण पावला. पण त्याच्या आणि सिसमाँडीच्या विचारांचा तोंडवळा स्थुलमानानें सारखाच होता. खरें म्हणजे त्या विषयावरील इतर बहुतेकांचे विचार त्याच वळणाचे आहेत.

परंतु मार्क्सनें मंदीच्या इतर कारणानांहि महत्व दिलें. भांडवलाचा संचय जसा वाढेल तसतसा त्यापासून मिळणाऱ्या लाभाचा दर कमी होत जाईल. त्यामुळें आर्थिक अभिप्रांचा प्रभाव कमी होईल. आणि त्यामुळें आर्थिक जीवनांत सुस्ती येऊन तें जागच्या जागीं खितपत राहील. पुन्हां तेजीच्या काळात औद्योगिक राखीव फौजेचें म्हणजे बेकारांच्या तांडयाचें संख्याबळ कमी होईल. त्यामुळें कामगार मिळविण्यासाठीं चढाओढ होऊन मजूरीचे दर वाढतील. परिणामतः उत्पादनचा खर्च वाढेल आणि तेजीचा डोलारा कोसळेल.[२] भांडवलशाहीतील कामगाराच्या भवितव्याविषयींचा मार्क्सचा दृष्टिकोन किती ठामपणें नैराश्यपूर्ण होता तें वरील युक्तिवादावरून फार चांगलें दिसून येतें. ज्या गोष्टीमुळें त्याच्या परिस्थितीत तात्पुरती सुधारणा होते तीच ताबडतोब त्याला खड्डयांत लोटते. मंदीचीं संकटें जशीं काम-

१ वरीलप्रमाणेंच पृ. ६६४

२ मार्क्सनें दिलेली अर्थचक्राची उपपत्ती त्याच्या पुस्तकात जागोजागीं विखुरलेली आहे. आणि प्राध्यापक शुम्पिटरनीं म्हटल्याप्रमाणें तीं काहींशीं जुजबी स्वरूपाची आहे. त्या उपपत्तीचा हा सारांश तयार करण्यात मिसेस् जोन रॉबिन्सन यांच्या ॲन एरो ॲन मार्क्सियन इकॉनॉमिक्स (लंडन, मॅकमिलन, १९८२) या पुस्तकाची फारच मदत झाली आहे.

गारांच्या दारिद्र्यामुळें (आणि त्यांच्या अपुऱ्या क्रयशक्तीमुळें) कोसळतात तशींच त्यांच्या परिस्थितीत झालेल्या तात्पुरत्या सुधारणेमुळें देखील कोसळतात.

सरकार हें भांडवलदारांचें हस्तक असतें असें मार्क्सचें मत होतें. त्यामुळें रोजगारी निर्माण करून तें बेकारांच्या मदतीला धावेल अशी फारशी शक्यता नव्हती. पण समजा जरी त्यानें तसें केलें असतें तरी त्यामुळें औद्योगिक राखीव फौजेचें संख्यावळ कमी झालें असतें. मग मजूरीवर होणारा खर्च वाढला असता आणि त्यामुळें मंदीचें संकट पुन्हां कोसळलें असतें. क्रयशक्तीतला हा तुटवडा—ज्यामुळें कामगारानां आपल्या श्रमानीं तयार केलेला माल विकत घेणें शक्य होत नव्हतें असा हा तुटवडा दूर करण्यासाठीं सरकारी उपाययोजना करणें शक्य आहे. सार्वजनिक बांधकामांवर खर्च करून अगर अन्य मार्गानें लोकांच्या हातीं अधिक क्रयशक्ती देता येते. पण वरील कारणांमुळेंच त्याचाहि काहीं उपयोग होणार नाहीं. 'उत्पादन व पुनरुत्पादन' या प्रक्रियेत असे कांहीं मूलभूत दोष आहेत कीं ते अशा जुजवी उपायानीं दूर होणें शक्य नाहीं. आणि म्हणून ते उपाय परिणाम शून्य ठरतात.[१] हा मुद्दा मार्क्सच्या आणि विशेषतः त्याच्या अनुयायांच्या दृष्टीनें फारच महत्वाचा आहे सरकारी खर्चानें जर मजुराच्या क्रयशक्तीतली तूट भरून काढता आली आणि त्यामुळें मंदी टाळता आली तर भांडवलशाही अर्थव्यवस्था टिकून राहूं शकेल. क्रांती होण्याएवजीं फक्त अंदाजपत्रकात तूट येईल. प्रत्येक मार्मिक मार्क्सवाद्यानें आपल्या विचारप्रणालीला असलेला हा धोका ओळखला आहे आणि इतक्या सहजपणें मंदीच्या संकटातून सुटका होणें शक्य नाहीं असें प्रतिपादन केलें आहे. आणि गंमत अशी कीं ह्यावावतींत पक्या परंपरानिष्ठांची भूमिका मार्क्सवाद्यांसारखीच आहे. अर्थशास्त्रांत अनेकदां अशीं भलतींच माणसें एका दाव्याला बांधलेलीं आढळून येतात.[२]

---

१ इथें वाचकाच्या निदर्शनाला असें आणायला हवें कीं मार्क्सच्या भूमिकेचीं वैशिष्ट्यें आणि तिचा आर्थिक दृष्टिकोनांवर झालेला परिणाम यांच्याशींच मला इथें कर्तव्य आहे. मार्क्सवादाची मला इथें बारकाईनें तपासणी करायची नाहीं. अशा तपासण्या फारच लांबत जातात.

२ प्रश्न : मग तूट भरून काढण्याच्या खर्चावर तुमचा विश्वास नाहीं म्हणता ?
सेक्रेटरी हंफ्रे : या आपल्या प्रश्नाचा अर्थ काय ?
प्रश्न : दुसऱ्या शब्दांत सांगायचें म्हणजे ज्या काळांत आर्थिक मंदी असेल त्यावेळीं सरकारच्या खर्चात वाढ करणें.....
सेक्रेटरी हंफ्रे: नाहीं, जो ! मला तसें वाटत नाहीं. खर्च वाढवून श्रीमंत होता येतें असें मला वाटत नाहीं.

—भूतपूर्व सेक्रेटरी ऑफ द ट्रेझरी, जॉर्ज एम्. हंफ्रे यानीं घेतलेल्या वृत्तसभेच्या टिपणातला उतारा, कॉंग्रेशनल रेकॉर्ड, जानेवारी १७, १९५७ पृ. ६९५

मार्क्सनें केलेलें दीर्घकालीन भाकित सर्वांच्या परिचयाचें आहे. भांडवल वाढलें तरी भांडवलदारांची संख्या कमी कमी होत जाते. कारखाने व उत्पादनाचीं साधनें यांची मालकी अधिकच सधन अशा थोडया लोकांच्या हाती केंद्रित होत जाते. मार्क्सनें रंगवलेला भांडवलदार सर्व बाबतींत अत्यंत धूर्त आणि कावेबाज असतो. पण अखेर आपलें अस्तित्वच टिकून राहील कीं नाहीं या बाबतींत मात्र तो मूढ असतो असें दिसतें. ह्याबाबत तो कांहीं शिकायला तयार नसतो. आणि हट्टीपणानें व अचूकपणानें तो विनाशाच्या रस्त्यानें पुढें जात असतो. उलट हा भांडवलदार ज्यांची अवहेलना करतो व ज्याला अगदीं ठेचून टाकतो. तो कामगार मात्र मोठा डोळस असतो. शिकून शहाणें होण्याची त्याला अक्कल असते. पुन्हां '...भांडवलाच्या मालकांच्या संख्येत होणाऱ्या घटीमुळें सत्ताधारी वर्गातून बाहेर फेकल्या गेलेल्या व्यक्तींपैकीं सूज्ञ व प्रागतिक विचारसरणीचीं माणसें'[1] कामगारवर्गात सामील होऊन त्याला बळकटी आणतात. अखेर उत्पादनाच्या आत्यंतिक केंद्रीकरणामुळें भांडवलशाही अर्थव्यवस्था अगदीं खिळखिळी होते. आणि त्याला विरोध करणाऱ्या असंख्य कामगारांचें शिस्तबद्ध औद्योगिक फौजेत रूपांतर होतें. मग विनाशाच्या भेरी वाजूं लागतात आणि लुबाडणारेच सर्वस्व गमावतात. ह्या प्रक्रियेच्या पुढल्या पायरीवर मात्र मार्क्स आशावाद्यांत सामील होतो. रिकार्डोने देखील कल्पिले नसेल इतकें निर्बंधरहित जीवन जगण्याचा मार्ग मोकळा होतो. कारण भांडवलशाहीच्या गरजांतून आणि तिनें निर्माण केलेल्या संचयी मनोवृत्तीतून राजसत्ता निर्माण झालेली असते. पण समाजवादाची स्थापना झाल्यावर जनतेवर संगिनींचा पहारा ठेवण्याची अगर संचयी मनोवृत्तीतून निर्माण झालेल्या दरोडेखोरीला आळा घालण्याची आवश्यकता रहात नाहीं. आणि मग राजसत्ता अनावश्यक ठरते, वाळून-सुकून जाते. पण त्याच्या आधीं क्रांती करण्याची दुःखद आवश्यकता असते. आणि ह्या अस्वस्थ करणाऱ्या आवश्यकतेच्या पलीकडे काय आहे त्याची कल्पनाच बहुसंख्य लोकानां करता आली नाहीं. मार्क्सच्या शब्दांत सांगायचें म्हणजे '...प्रचलित समाजव्यवस्था संपूर्ण-उलथून टाकायला पाहिजे. सत्ताधारी वर्गाला कापरें भरलें पाहिजे...'[2] हा सगळा प्रकारच घाबरवून सोडणारा होता.

[३]

मार्क्सचा समाजजीवनावर कोणता परिणाम झाला याबद्दल जितक्या विपरीत कल्पना आहेत तितक्या अन्य कोणत्याही गोष्टीबद्दल नसतील. त्यानें लक्षावधी लोकांचीं

१ कम्युनिस्ट मॅनिफेस्टो
२ कम्युनिष्ट मॅनिफेस्टो.

मनें भारून टाकली हें सर्वांनाच मान्य आहे. पण ह्या निष्ठावंताच्या कडव्यापलीकडे मार्क्सचा प्रभाव पसरला नाहीं असा अनेकांचा समज आहे. त्याचे विचार म्हणजे जणुं देवीच्या साथीसारखी एखादी लागण आहे अशी सांकेतिक शहाणपणाची भूमिका आहे. एकतर माणसानां ही लागण लागते आणि त्यांच्या अंगावर कायमचे व्रण रहातात किंवां प्रतिबंधक लस टोचल्यामुळें ते वचावतात आणि त्याना काडीचाही वक्का पोंहोचत नाहीं. पण हा समज अगदीं चुकीचा आहे. ज्याना त्याचीं मीमांसा पटली नाहीं त्यांच्यावर देखील मार्क्सचा सखोल परिणाम झाला आणि आपण त्याच्या प्रभावापासून पूर्णतः मुक्त आहोत अशी ज्यांची कल्पना होती तें देखील त्या प्रभावातून सुटले नाहींत.

ह्याचें एक कारण असें कीं मार्क्सनें सामाजिक जीवनाच्या मीमांसेचा जो भव्य इमला उभारला तो अगदीं मन थक्क करून टाकणारा होता. मानवी व्यवहाराचीं इतकीं वेगळालीं सूत्रें हातीं घेऊन त्यांपासून विचारांचें एकात्म वस्त्र विणायचें ही जी कामगिरी मार्क्सचें केली तशी इतर कोणीहि आधीं केली नव्हती आणि तसेंच पाहिलें तर नंतरहि कोणी केलेली नाहीं. सामाजिक वर्ग, माणसाची आर्थिक वागणूक राजसत्तेचें स्वरूप, साम्राज्यवाद आणि युद्ध या सर्वांचें मिळून एक भव्य भित्तीचित्र त्यानें रेखाटलें आणि त्याच्या द्वारें अगदीं प्राचीन काळापासून तो दूरवरच्या भविष्यकाळापर्यंतच्या विकासक्रमाचें दर्शन घडवले. वर्गविग्रह असो, साम्राज्यवाद असो किंवां राष्ट्रीय युद्धाची कारण मीमांसा असो, त्या बाबतींत मार्क्सचें मत प्रभावी ठरावे हें अपरिहार्यच होतें. कारण तोच असा एक मनुष्य होता कीं ज्यानें या गोष्टीचें विवरण करतानां त्यांचा संदर्भ मानवी जीवनाच्या अन्य सर्व अंगांशीं जोडून दाखविला. ह्यामुळेंच साम्राज्यशाहीबद्दलच्या अमेरिकन दृष्टिकोनांवर मार्क्सनें केलेल्या मीमांसेची दाट छाया पडलेली आहे. तसें न होगें अशक्यप्राय होतें. ब्रिटिश साम्राज्यापासून अमेरिकेची फारकत झाली ती आर्थिक प्रश्नांवरून. आज देखील साम्राज्यशाहीची आर्थिक हितसंबंधांच्या संदर्भात केलेली मीमांसा स्वीकारायचीं नसेल तर पोंचट युक्तिवादाचा आश्रय करावा लागतो: साम्राज्यशाही राष्ट्राची परोपकारी वृत्ती, गोऱ्या माणसावरील जबाबदारीचें ओझें वाहण्याबद्दलची त्याची निष्ठा किंवा वसाहतीतले रहिवासी स्वतंत्र होण्यास अजून पात्र झालेले नाहींत अशी त्याला वाटणारी शंका इत्यादि कारणें मग साम्राज्यशाहीचीं मीमांसा करतानां पुढें आणावीं लागतात आणि हीं कारणें जर एखाद्या साम्राज्यशाही राष्ट्रानें पुढें आणलीं तर त्यांकडे सर्वांत अधिक साशंकपणें पहातो तो रिपब्लिकन पक्षाच्या उजव्या गटांचा प्रतिनिधी. कारण कोणत्याही युक्तिवादामागचा आर्थिक हेतु कोणता तें शोधून काढण्यांकडे त्याचा कल असतो. आणि हा माणूस मार्क्सवादाचा कट्टर विरोधक असतो.

'आर्थिक जीवनाचा मीमांसक या नात्यानें कार्ल मार्क्स हा फार व्यासंगी मनुष्य होता हें प्रथम ध्यानांत घ्यायला हवें' [१] त्याचीं उद्दिष्टें क्रांतिकारक होतीं पण त्याची कार्यपद्धती होती व्यासंगी शास्त्रज्ञाची. त्यामुळें त्याचीं विचारवीजें सगळ्याच समाज-शास्त्रज्ञानां वस्तुस्थितीचें आकलन करण्याच्या दृष्टीनें उपयुक्त ठरलीं. जें जग बहुतांशीं दारिद्र्यानें ग्रासलेलें होतें आणि ज्यांत संपत्तीला फार महत्व होतें, तेथें बहुतेक संघर्षाच्या पाठीमागें आर्थिक कारण असावें हें अपरिहार्य होतें, ज्या करितां भांडावें अशी अधिक मोलाची गोष्ट त्या जगात नव्हती. आणि प्रेम, प्रतिष्ठा, देशप्रेम व धर्म हीं कारणें एखाद्या संघर्षामागें आहेत असे जरी प्रथमदर्शनीं वाटलें तरीं अधिक खोलांत जाऊन निष्ठूर नजरेनें पाहिलें कीं त्या संघर्षामागें देखील एखादा आर्थिक हेतुच आहे असें आढळून येतें. मार्क्सनें केलेलीं इतिहासाची जडवादी मीमांसा स्थूल-मानानें ही अशी आहे. ह्या मीमांसेचें जनकत्व मार्क्सकडे नाहीं हें त्यानेंच स्पष्ट केलें आहे. पण त्यानें तिला प्रतिष्ठा प्राप्त करून दिली. आधुनिक भांडवलदार ती सहज-गत्या मान्य करतो. स्वदेशात अगर परदेशात परिस्थितीत बदल व्हावा म्हणून कोणी चळवळ करतानां जेव्हां त्याला आढळतो तेव्हां तो जवळ जवळ यांत्रिकपणें असा प्रश्न विचारतों कीं त्यांत त्या चळवळ करणाऱ्याचा काय फायदा आहे ? त्याला नेहमीं अशी शंका येते कीं सुधारक, समाजसेवक, उदारमतवादी राजकीय कार्यकर्ते आणि सरकारी अधिकारी जेव्हा नैतिक धर्म युद्धें सुरू करतात तेव्हां त्यांच्या बुडाशीं त्या लोकांचा काहींतरी स्वार्थ असतो. मग उच्च हेतूंचा ते कितीही कांगावा करेनात का. त्या भांडवलदारांचा प्रश्न नेहमीं हा असतो: 'इथें पाणी कुठें मुरतंय तें सांगा.'

समाजाच्या भांडवलाचें नियंत्रण क्रमशः मूठभर लोकांच्या हातीं कसें जातें व त्यामुळें भांडवलशाही केंद्रीकरण कसें होतें तें मार्क्सनें ओळखलें होतें. आणि मानवी हेतूंची जडवादी मीमांसा जशी अमेरिकन परंपरा वादाच्या मुळांशीं आहे त्याचप्रमाणें भांडवलाच्या केंद्रीकरणाचा सिद्धान्त हें अमेरिकन उदारमतवादाचें एक मूलतत्व आहे. मक्तेदारी विरोधी कायद्याची अंमलबजावणी व्हावी म्हणून प्रतिवर्षी जी चळवळ होते तिचा प्रमुख स्फूर्तिदाता जर कोणी असेल तर तो मार्क्स.

भांडवलदार, मध्यमवर्ग, मजूरवर्ग इत्यादि सामाजिक वर्गांचें अस्तित्व अर्थशास्त्रा-च्या मध्यवर्ती परंपरेनें उघडपणें कधींच मान्य केलें नव्हतें. पण सामाजिक वर्ग तर अस्तित्वात होते; आणि ज्याला वर्गविग्रह म्हणता येईल असें इतर काहीतरी देखील

१ जोसेफ ए. शुम्पिटर-कॅपिटॅलिझम, सोशलिझम अँड डेमॉक्रसी (दुसरी आवृत्ती; न्यूयॉर्क, हार्पर १९४७) पृ. २१

अस्तित्वात होतें. आणि ह्या गोष्टींचें आकलन करण्यासाठीं देखील लोकानां मार्क्सकडेच वळावें लांगत होतें.

मार्क्सचा प्रभाव वाढण्याचें आणखी एक कारण असें कीं त्यानें अत्यंत भयानक अशा मंदीची पूर्वसूचना देऊन ठेवली होती. अर्थशास्त्राच्या मध्यवर्ती परंपरेनुसार मंदी हें एक नित्याचें पण मामुली दुखणें होतें. पण मार्क्सच्या दृष्टीनें मात्र भांडवलशाही जीवनातली ती एक अधिकाधिक विनाश करीत जाणारी घटना होती. अखेर एक मंदीच भांडवलशाही अर्थव्यवस्थेचा नाश करणार होती (किंवा निदान त्या नाशाची सूचना देणार होती) आणि निदान ह्याबाबतींत तरी मार्क्स चूक होता असें म्हणणें अवघड होतें. कारण १९३० च्या सुमारास मंदी हें काहीं मामुली आणि नित्याचें दुखणें राहिलेलें नव्हतें, १९३४ सालीं म्हणजे महामंदीच्या तिसऱ्या वर्षी जॉन स्ट्रॅची या तत्कालीन इंग्लिश मार्क्सवाद्यानें आर्थिक सद्यःस्थितीची पहाणी केली आणि असा (त्याच्या दृष्टीनें) समाधानकारक निष्कर्ष काढला कीं 'एकंदर भांडवलशाही अर्थव्यवस्था आतां विनाशाकडे चालली आहे.'[1] आणि गंमत अशी कीं अगदीं पक्क्या परंपरावादी इंग्लिश अर्थशास्त्रज्ञानीं त्या वर्षी काढलेला निष्कर्षहि याहून वेगळा नव्हता. फरक इतकाच कीं त्यामागें खेदाची भावना होती. सर आर्थर स्लेटर यांनीं तेव्हां असा निष्कर्ष काढला होता कीं 'भांडवलशाही अर्थव्यवस्थेतील दोषांमुळें तिच्यापासून मिळणाऱ्या फायद्यानां आपण अधिकाधिक पारखे होत आहोंत. त्या दोषांमुळें आतां तिचें अस्तित्वच धोक्यात आलें आहे.'[2]

[४]

मार्क्सचीं मीमांसा जर एकंदरीत चुकीची असती, तर त्याचा प्रभाव चटकन् ओसरला असता. त्याच्या चुका दाखवून देण्यांत जे हजारो लोक गुंतले होते त्यानीं मग आपलें लक्ष इतर गोष्टींत घातलें असतें. पण अनेक बाबतींत त्याची मीमांसा बरोबर होती. आणि त्याच्या काळाच्या संदर्भांत तर ती विशेषच समर्पक होती. वरील विधानाला जोडलेल्या या पुस्तीवर विशेष भर द्यायला हवा. बहुतेक अर्थशास्त्रज्ञाचे विचार समकालीन परिस्थितीला लागू पडणारे असावेत एवढीच त्यांच्या बाबतींत अपेक्षा असे. समाईक भांडवलांच्या कंपन्या टिकून रहाणार नाहींत ह्या अंडम स्मिथच्या ठाम समजुतीचें आतां कोणी समर्थन करीत नाहीं. पण मार्क्सवाद्यांचा

१ जॉन स्ट्रॅची, द कमिंग स्ट्रगल फॉर पावर (चौथी आवृत्ती; लंडन, गोलँक्झ, १९३४) पृ. ८.

२ आर्थर स्लेटर, रिकव्हरी, द सेकंड एफर्ट (लंडन, जी. बेल अँड सन्स, १९३४), पृ. २०९

आग्रह मात्र असा कीं मार्क्सची मीमांसा यावत्काल सत्य ठरावी. ही कसोटी फारच जबरदस्त आहे असें म्हटलें पाहिजे.

आणि मार्क्सची मीमांसा काहीं बाबतींत इतकी बिनचूक ठरल्यामुळेंच बहुतेकांनां असा प्रश्न पडला कीं इतर बाबतींतही–आणि यांत भांडवलशाहीच्या भवितव्याचाही समावेश होतो—त्याची मीमांसा कशावरून बरोबर नसेल ? मार्क्सनें सत्य परिस्थितीकडे डोळे उघडून पाहिलें आणि इतरानीं मात्र स्वप्नरंजनात्मक विचारांचा फसवा आश्रय घेऊन सत्याकडे डोळेझाक केली असा तर प्रकार झाला नसेल ? एका बाजूला ह्या शंका आणि दुसऱ्या बाजूला त्याच्या अनुयायांची ठाम निष्ठा या दुहेरी माऱ्यानें मार्क्सच्या प्रभावांचा आपल्याला आढावा घेता येतो. जे त्याची भूमिका मान्य करायला तयार नव्हते त्याच्या मनांत देखील संदेह निर्माण करायचें अतुलनीय सामर्थ्य त्याच्या अंगीं होतें. मार्क्सला न मानणाऱ्या प्रत्येकाच्या–निदान त्यापैकीं जे विचारी होते त्याच्या–मनांत असा एक प्रश्न दडलेला असे कीं मी म्हणजे दुसरा डॉ. पॅनग्लॉस तर नव्हे ?

आणि मार्क्सच्या अनुयायानीं या संदेहात भर घातली. अर्थशास्त्राच्या मध्यवर्ती परंपरेचे अनुयायी बुचकळ्यांत पडले होते पण मार्क्सवाद्यांच्या मनांत कोणतीच शंका नव्हती. ते निश्चयात्मे होते. सुखदायक आणि शांततापूर्ण भविष्यकाळाची अपेक्षा त्यांच्या मनांत नव्हती आणि त्या अपेक्षेच्या अनुरोधानें ते विचारही करीत नव्हते. जनतेचें वाढतें दैन्य, उग्रतर होणारी आर्थिक मंदी आणि सरते शेवटीं रक्तलांच्छित क्रांति यानां तोंड द्यायला ते सिद्ध होते. हें भवितव्य इतकें उद्वेगजनक असूनही मार्क्सवादी त्याला तोंड द्यायला तयार होते यावरून ते वास्तवदर्शी होते आणि कोणत्याहीं कविकल्पना त्यानीं उराशीं बाळगलेल्या नव्हत्या असा निष्कर्ष काढला जात होता. आणि ह्या वस्तुनिष्ठेला नैतिक संतापाची जोड मिळाली होती. 'मार्क्सवादाला हें जें धार्मिक निष्ठेचें स्वरूप आहे...त्यामुळें कट्टर मार्क्सवादी प्रतिस्पर्ध्यांकडे एका विशिष्ट दृष्टीनें कां पहाता त्याचा खुलासा होतो. इतर कोणत्याही धर्मनिष्ठाप्रमाणें त्यालाही असें वाटतें कीं आपला विरोधक केवळ चूक करीत नसून पाप करीत आहे. मतभेदाचा तो केवळ बौद्धिक पातळीवरूनच नव्हे तर नैतिक पातळीवरूनही धिक्कार करतो.'[१] मार्क्सवाद्याशीं वादविवाद करणें म्हणजे दगडी किल्ल्यावर रवराच्या काठीनें हल्ला चढवण्यासारखें आहे.

---

१ शुम्पिटर, 'कॅपिटॅलिझम, सोशलिझम अँड डेमॉक्रसी', पृ. ५. याच्या उलट मध्यवर्ती परंपरेची अशी भूमिका होती कीं इतकी भावनाकुल निष्ठा शास्त्रीय बुद्धिवादाशीं विसंगत आहे. मात्र केवळ मध्यवर्ती परंपरेचीच भूमिका अशी होती असें नव्हे. मार्क्सनें ह्याबाबतींत एकदा काहींशा रास्तपणें असें म्हटलें होतें कीं 'अर्थशास्त्रज्ञ हे धर्मचिकित्सकांसारखे असतात...त्यांचा धर्म सोडल्यास इतर प्रत्येक धर्म मनुष्यनिर्मित असतो. त्यांचा विशिष्ट धर्म मात्र ईश्वरप्रणीत असतो.' (हा उतारा 'द मिझरी ऑफ फिलॉसॉफी' या ग्रंथातून स्ट्रॅची यानीं आपल्या 'द कमिंग स्ट्रगल फॉर पॉवर' या पुस्तकात उद्धृत केलेला आहे.)

आणि पुन्हां मार्क्स चुकला आहे असें मानणाऱ्यानां मार्क्स समजलाच नाहीं असें म्हणून त्यानां उडवून लावणें सहज शक्य होतें. कारण मार्क्स समजायला अवघड आहे. उदाहरणार्थ, भांडवलाचा जसा संचय होत जातो तसा नफ्याचा दर घटत जातो आणि त्यामुळे भांडवलाचा निवेश आणि उत्पादन यांसाठीं नफ्याची गरज असते असें एखादा नॅशनल ॲसोसिएशन ऑफ मॅन्युफॅक्चरर्सचा (कारखानदारांची राष्ट्रीय संघटना) अध्यक्ष जितक्या हिरीरीनें सांगतो तितक्याच हिरीरीनें मार्क्सही सांगत असे. नफ्याचा दर घटला कीं त्यामुळें आर्थिक विकासांत पुन्हां पुन्हां खंड पडतो आणि ह्या अडथळ्यांची कालमर्यादा व उग्रता उत्तरोत्तर वाढत जाते.

चालू शतकांत नफ्याच्या दरात घट होण्याचें लक्षण मुळींच दिसलेलें नाहीं आणि भांडवलाचा संचय अविरतपणें होत आहे. त्यामुळें नफ्याच्या दरातली घट हें मंदीचें कारण असतें असें गंभीरपणें मानता येणार नाहीं. ह्या बाबतींत मार्क्सवादावरच्या एका आधुनिक व सहानुभूतीपूर्ण वृत्तीच्या भाष्यकारानें असें म्हटलें आहे कीं 'नफ्याच्या दरात होणाऱ्या घटीचें त्यानें केलेलें स्पष्टीकरण खरोखर काहींच स्पष्ट करीत नाहीं.'[1] पण अशी कबुली फारच थोडे मार्क्सवादी देतात. त्यांचें म्हणणें असें असतें कीं मार्क्सची कांहीं चूक नव्हती; किंवा गेल्या शतकात नफ्यात जी घट होत होती तिच्या आधारानें त्यानें हें विधान केलें आणि म्हणून तें चुकलें असेंही नाहीं. खरें म्हणजे मार्क्सच्या युक्तिवादातले बारकावे आणि व्यावर्तता यांचें विरोधकाला पूर्णपणें आकलन झालेलें नाहीं. मार्क्सची भूमिका फारच बालबोध आणि ढोबळ आहे असा त्यांचा गैरसमज झालेला आहे.

विचारवंताना मार्क्सवादाचें इतकें आकर्षण कां वाटतें याबद्दल पुष्कळ लिहिलें गेलें आहे. तीच गोष्ट कम्युनिझमबद्दल वाटणाऱ्या आकर्षणाची. मार्क्सवादाला एखाद्या धर्मतत्वाचें स्वरूप प्राप्त झालें असूनही त्याची शोधक व विवेचक बुद्धीच्या माणसांवर मोहिनी कां पडते असा हा प्रश्न आहे. त्याचें उत्तर अनेक पदरी आहे. एक गोष्ट अशी कीं मार्क्सवाद्यांच्या दृष्टीनें मार्क्सचें तत्वज्ञान हेंच सांकेतिक शहाणपण आहे आणि म्हणून ते त्याला चिकटून रहातात. शिवाय मार्क्सवाद हा वस्तुनिष्ठ आहे असें निदान भासतें, त्यांत ढळढळीत सत्याचा बराच अंश आहे आणि त्याच्या समर्थकांचा त्याच्यावर अढळ विश्वास आहे. शिवाय त्यांचा असा दावा असतो कीं मार्क्सला चूक म्हणणारे लोक मंदबुद्धीचे, आणि बालबोध वृत्तीचे असतात. जें लिहिलेलें असतें त्याचा ते शब्दशः अर्थ लावतात. आणि त्याच्या समर्थकांच्या या आत्मविश्वासपूर्ण दाव्यातच मार्क्सची पुष्कळशी ताकद सामावलेली आहे. कारण हे आरोप फार जबरदस्त आहेत आणि ते आपल्या-

१ जोन रॉबिन्सन, ॲन एसे ऑन मार्क्सियन इकॉनॉमिक्स पृ. ४२.

वर ओढवून घ्यायला असंख्य विचारवंत कचरलेले आहेत. ह्यापेक्षां पृष्ठभागाच्या खालीं खोलवर आपण पाहूं शकतो अशी स्वतःची व इतरांची खातरजमा करणें त्यानां अधिक पसंत पडलें. ह्यामुळें मार्क्सनें जें म्हटलें नव्हतें तें त्यानें म्हटलें असें या विचारवंतानां कबूल करावें लागलें. पण आपण मठ्ठ नाहीं याचा तो पुरावाच आहे असें त्यानीं मानलें. यामुळें मार्क्सवादाचा स्वीकार म्हणजे चुकीच्या व वस्तुस्थितीचा विपर्यास करणाऱ्या धर्मतत्वाचा स्वीकार अशी परिस्थिती राहिली नाहीं. तर एखादा मनुष्य मार्क्सच्या लेखनाचा शब्दशः अर्थ लावतो कीं त्याचा सूक्ष्म व विपरीत अर्थ लावण्याचें धाडस करायला तो तयार आहे असें स्वरूप त्या प्रश्नाला प्राप्त झालें. विचारवंतानां (चतुर ठरवण्याची व मठ्ठपणाचा आरोप टाळण्याची) ही संधी दवडणें फार अवघड वाटलें आणि त्यामुळें देखील मार्क्सच्या प्रभावात भर पडला.

[५]

इतकें सांगितल्यावर आतां सारांश काढायला हवा. चालू शतकाच्या तिसऱ्या दशकाच्या मध्यकालापर्यंत आर्थिक विचारांचा समजावर कोणता परिणाम झाला तें स्पष्टपणें कळूं शकतें. त्या विचारांच्या संदर्भात माणसाला असें जाणवलें कीं आर्थिक प्रश्न हा बिकट व सर्वस्पर्शी आणि दडपून टाकणारा आहे. व तो समाधानकारकपणें सोडवणें जवळ जवळ अशक्य आहे. डॉ. जॉन्सननें असें म्हटलें आहे कीं 'एका पंधरवड्यांत आपण फांसावर लटकणार आहोत असें माणसाला कळलें कीं त्याच्या मनाला विलक्षण एकाग्रता प्राप्त होते.' त्याच कारणासाठीं प्रस्तुत कालखंडात माणसांचीं मनें आर्थिक जीवनाच्या संकटमय समस्यांवर केंद्रित झालीं होतीं.

माणसांची उपसमार नित्य होत रहाणार असा निष्कर्ष अर्थशास्त्रातील मध्यवर्ती परंपरा आतां काढत नव्हती हें खरें. पण माणसें सुस्थितींत रहातील असाही निष्कर्ष ती काढत नव्हती. आर्थिक ओढघस्त ही अजूनही नित्य गोष्ट होती. आपलें सीमागत उत्पादन वाढवून माणसानां आपली स्थिती सुधारणें शक्य होतें; आणि कार्यक्षमतेत व भांडवलाच्या पुरवठ्यांत वाढ झाल्यामुळें, हें सीमागत उत्पादन व त्याच्या अनुपंगानें मजूरी वाढणें शक्य होतें. पण ह्यामुळें परिस्थितीत विशेष सुधारणा होईल असें कोणी म्हणूं शकत नव्हतें. अशी सुधारणा करण्याचा प्रयत्नच करूं नये. असें अर्थातच कोणीहि म्हणूं शकत नव्हतें. उलट ह्या प्रयत्नांत जराहि शिथलता आणणें म्हणजे समाजाचा फार मोठा घात करण्यासारखें होतें. त्यामुळें आधींच ओढघस्तीची असलेली परिस्थिती अधिकच विकट झाली असती, आणि ती देखील विनाकारण ज्याच्या ठिकाणीं सद्सद्विवेकबुद्धी आणि भूतदया असेल त्यानें कार्यक्षमता वाढविण्यासाठीं पराकाष्ठेचे प्रयत्न करणें आवश्यक होतें. तसे प्रयत्न न करणें हें निष्ठूरपणाचें आणि बेपर्वाईचें ठरलें असतें.

उत्पन्नांतील नित्याच्या विषमतेमुळें ओढघस्तीची परिस्थिती अधिक बिकट होत होती. गरिबांचे संसार रुखुटुकु चालण्याचें एक कारण म्हणजे श्रीमंतांनीं बडेजावीसाठीं केलेला खर्च. आधींच उत्पन्न दोघानां पुरेसें नसतें आणि त्यांत श्रीमंतांनां त्याचा गरजेपेक्षां कितीतरी अधिक वाटा मिळतो. शक्य असेल तर या विषमतेबाबत काहीं तरी करणें अवश्य होतें. कारण या विषमतेमुळें समाजांत ताण व संघर्ष निर्माण होत होते; आणि कावाडकष्ट करणाऱ्या वर्गाला आपल्या विपन्नावस्थेची जाणीव अधिक तीव्रतेनें झाल्यावर त्या संघर्षांत भर पडणार होती. आणि ह्या गोष्टीकडे कोणाहि सहृदय माणसाला दुर्लक्ष करणें अशक्य होतें. पण या प्रश्नावर खरोखरच कांहीं तोडगा होता का ?

अखेर, आणखी एक बेचैन करणारा प्रश्न होता तो म्हणजे असुरक्षिततेचा. कामगारानें प्रसंगोपात बेकार होणें आणि शेतकरी व उद्योगधंद्यांतील माणसें यांचें एखाद्या वेळीं दिवाळें वाजणें या गोष्टी स्पर्धानिष्ठ अर्थव्यवस्थेंत मुळीं अनुस्युतच होत्या. मंदीच्या वाढत्या उग्रतेमुळें ही असुरक्षितता वाढली होती. आणि चालू शतकाच्या तिशींत तर अत्यंत विघातक मंदीचा तडाखा बसला व ती पराकोटीला पोहोंचली. तिशींतली ही मंदी विशेष त्रासदायक ठरली कारण ती आपसुख ओसरेल असा तत्कालीन आर्थिक मीमांसेचा निष्कर्ष होता. पण जर ती स्वयंनिवारक असेल तर अपरिहार्यहि होती; आणि अपरिहार्य असली तर असह्य होती.

एकंदरीत त्या वेळीं परिस्थिती अशी होती कीं तिच्यामुळें उत्पादनक्षमता, विषमता आणि असुरक्षितता या गोष्टींवर माणसांचीं मनें खिळून रहावीं व त्यांबद्दलच्या विचारांत त्यांनीं गुंतून रहावें. अर्थशास्त्राच्या मध्यवर्ती परंपरेची अशी धारणा होती कीं अखेर सारे प्रश्न सुटून समाजाचें भलें होईल. पण त्याचवेळीं अंतःपटातून येणारे काहीं आवाज असें सांगत होते कीं तसें होणार नाहीं. उजव्या बाजूला सामाजिक डार्विनवाद्यांच्या विचारांचा प्रतिध्वनी उमटत होता. तो म्हणत होता कीं झगडा केवळ अपरिहार्य नाहीं तर हितकारकहि आहे. मार्क्सवाद्यांच्या विश्वातून गडगडाट ऐकूं येत होता आणि असा ठांशीव इशारा दिला जात होता कीं विषमता आणि असुरक्षितता वाढत वाढत इतक्या थराला जातील कीं त्यांना वळी पडणारे लोक अर्थव्यवस्थेचा सारा इमलाच कोसळून पाडतील, आणि मग पर्यायानें त्या इमल्यातल्या बहुतेक संपन्न रहिवाशांचा देखील नायनाट होईल.

अशा रितीनें उत्पादनक्षमता, विषमता व असुरक्षितता ह्या अर्थशास्त्रांतल्या पुरातन समस्या होत्या. आणि विसाव्या शतकाच्या तिशींत तर अर्थशास्त्र या सम-

स्यांत पूर्णपणें गुरफटून गेलें होतें. कारण तेव्हां हें शास्त्र एका प्रचंड दरीच्या तळाशीं उभें होतें. त्याच्यापुढें वाढत्या सुवत्तेचा एक मोठा पर्वत होता हें खरें. पण तो पर्वत तेव्हां त्याला दिसत नव्हता. पण आतां आपण त्या सुवत्तेच्या पर्वतावर चढलों आहोंत. पण तरी आपलीं मनें पुष्कळशीं त्या जुन्या समस्यांत गुरफटलेलीं आहेत. खरें म्हणजे याचें आपल्याला आश्चर्य वाटायला नको. कारण ही परिस्थितीच अशा स्वरूपाची आहे कीं ज्या वेळीं सांकेतिक शहणापणाचा वस्तुस्थितीशीं असलेला संबंध तुटावा. आणि या बाबतींत सांकेतिक शहाणपणानें काहीं आपली निराशा केलेली नाहीं. ह्याचा अर्थ असा नव्हें कीं बदललेल्या परिस्थितीचा सांकेतिक दृष्टिकोनांवर काहींच परिणाम झालेला नाहीं. समता व असुरक्षितता यांबाबतच्या दृष्टिकोनांत महत्वाचे बदल झाले आहेत. त्यांच्याकडे आतां आपल्याला वळायचें आहे.

प्रकरण सातवें

विषमता

श्रीमंतानीं कोणत्या ना कोणत्या मार्गानें आपल्या संपत्तीत गरिबानां वांटेकरी करून घ्यावें ह्या प्रमेयावद्दल शतकानुशतकें जितकीं वादंगें माजलीं आहेत तितकीं इतर फारच थोडचा प्रमेयांबद्दल माजलीं असतील. अगदीं थोडे आणि बहुधा तऱ्हेवाईक अपवाद सोडल्यास श्रीमंतानां विरोधच होत आलेला आहे. या विरोधांचीं कारणें अनेक आणि विविधतापूर्ण आहेत. पण हीं कारणें देतानां सर्वांत महत्वाचें जें कारण तें मात्र कटाक्षानें वगळलें जातें. तें कारण असें कीं आपल्या जवळील संपत्तीचा उपभोग घेण्याचा हक्क सोडायला ते तयार नसतात. उलट गरीबानां अधिक समता हवी असते.

विषमतेच्या समस्येला अर्थशास्त्रात व समाजशास्त्रांत किती मूलभूत स्थान आहे तें आपण मागील प्रकरणांत पाहिलेंच आहे. स्पर्धानिष्ठ समाजात म्हणजे रिकार्डोपासून चालत आलेल्या अर्थशास्त्रातील मध्यवर्ती परंपरेनें पुरस्कारिलेल्या समाजात कार्यक्षमतेला अधिक वेतन वा नफा मिळतो असें गृहित धरलेंलें होतें. कार्यक्षम योजक अगर कामगार यानां आपोआप लाभ मिळत असे. आणि जे नालायक अगर आळशी असत त्यानां तितक्याच यांत्रिकपणें नुकसान सोसावें लागत असे कामगार, भांडवल व निसर्गसंपत्ती यांचा उपयोग जर चांगला कार्यक्षमतेने होत असेल तर त्या अर्थव्यवस्थेच्या उत्पादनात अल्पमुदतीत फारशी अगर काहींच भर पडणें शक्य नव्हतें. आणि दीर्घकालीन प्रगतीचा फायदा सामान्य माणसाला मिळत असेच असें नव्हतें. खरें म्हणजे मूळ तत्वानुसार त्या प्रगतीचीं फळें इतरानांच मिळत असत.

त्यामुळें लोक जर दारिद्री असतील, आणि खरोखर ते दारिद्री होतेच, तर उत्पन्नाच्या फेरवाटणीनेंच त्यांचा फायदा होणें शक्य होतें. आणि संचित संपत्तीपासून मिळणाऱ्या उत्पन्नाच्या बाबतींत हें विशेष खरें होतें. रिकार्डोचा आणि त्याच्या अनुयायांचा जरी या गोष्टीला विरोध होता तरी नेहमींच अशीं काहीं माणसें असत —आणि त्यांची संख्या सारखी वाढतच गेली—की ज्यानां संपत्तीची फेरविभागणी करणें शक्य आहे असें वाटे. (रिकार्डो आणि त्याचे मध्यवर्ती परंपरेतले अनुयायी यांच्याबद्दल नेहमींच अशी एक शंका असे कीं काहीं विशिष्ट हितसंबंधांची ते पाठराखणी करीत आहेत.) संपत्तीची फार मोठया प्रमाणावर फेरवाटणी झाली पाहिजे असें सगळेच मार्क्सवादी गृहीत धरत असत. त्यामुळें संबंध एकोणिसाव्या शतकांत

सामाजिक जहालानां उत्पन्नाची व संपत्तीची कोणत्या ना कोणत्या मार्गानें फेरवाटणी झाली पाहिजे असा आग्रह धरण्यावाचून गत्यंतरच नव्हतें. परिस्थितीत बदल घडवून आणण्याचा हा एकच मार्ग त्यानां उपलब्ध होता. हा प्रश्न डावलणें म्हणजे सारेच प्रश्न डावलण्यासारखें होतें.

परंपरानिष्ठानीं विषमतेंचें वेगवेगळ्या प्रकारें समर्थन केलें आहे. उघड चोरीचा मार्ग सोडल्यास अन्य कोणत्याही मार्गानें माणसानें जें काहीं मिळवलें असेल त्यावर त्याचा निसर्गाच्या नियमांनुसार व न्यायानुसार हक्कच असतो ही भावना या समर्थनाच्या मुळाशीं सामान्यपणें असते. जमीनमालक व भांडवलदार याना मिळणारें ऐपआरामी उत्पन्न हा निसर्गक्रमाचा एक अपरिहार्य भाग आहे असें रिकार्डोला व त्याच्या अनुयायानां वाटत असे. ह्या निसर्गक्रमांत खीळ घालणें शक्य होतें. पण तसें केल्यावर सारी अर्थव्यवस्था कोलमडून पडली असती व त्यामुळें प्रत्येकाची (यांत गरीबहि असेच.) स्थिती अधिक वाईट झाली असती.

हें समर्थन मूलतः अकरणात्मक होतें. परंतु कालांतरानें (आणि चळवळींचा परिणाम म्हणून) विषमतेची बाजू मांडतानां तिच्या द्वारें होणाऱ्या आर्थिक कार्यावर भर दिला जाऊं लागला. उत्पन्नाचा निर्वेधपणें उपभोग घेता येणें हें एक आवश्यक आर्थिक आमिष आहे असें मानलें जाऊं लागलें. या आमिषामुळें माणसें काम करतील, नवे नवे प्रयोग करतील आणि त्यामुळें उत्पादन वाढून सगळ्यांच्याच उत्पन्नात भर पडेल. त्याचप्रमाणें भांडवलाच्या संचयासाठींहि विषमता तितकीच आवश्यक आहे असें मानलें जाऊं लागलें. जर उत्पन्नाची विभागणी होऊन ते अनेकांच्या हातीं गेलें तर तें खर्च केलें जाईल. पण जर तें एकवटून त्याचा प्रवाह श्रीमंतांकडे वहात गेला तर त्याच्या काहीं भागाची बचत होऊन त्याचा निवेश केला जाईल.

इतरहि मुद्दे पुढें मांडण्यात आले. अतिरिक्त समतेमुळें सांस्कृतिक जीवनात सारखेपणा व एकसुत्रीपणा येतो. शिक्षण व कला यानां पुरेसें आर्थिक सहाय्य मिळायचें असेल तर त्यासाठीं श्रीमंत वर्गाची आवश्यकता असते. समतेला साम्यवादाचा म्हणजेच निरीश्वरवादाचा दर्प येतो. आणि म्हणून ती आध्यात्मिकदृष्टचा अनिष्ट आहे. विशेष म्हणजे रशियन लोकानीं देखील अव्यवहार्य म्हणून समतेचा नाद सोडला आहे. अखेर असाहि युक्तिवाद केला जातो, कीं प्राप्तिकराच्या सहाय्यानें आम्ही पुष्कळशी किंवा (वक्त्यांच्या कलानुसार) अतिरिक्त समता प्रस्थापित केली आहे. यापुढें खरें म्हणजे वरच्या थरांतील करदात्यानां योग्य सवलती देऊन पुरेशी विषमता आपण निर्माण करायला हवी.

अतिरिक्त समतेमुळें जी सांस्कृतिक हानी होते तिच्याबद्दल फारशी तक्रार करणें

योग्य होणार नाहीं. टॉने यानें या संदर्भात असें म्हटलें आहे कीं 'ज्यानां उत्पन्न व संपत्ती यांच्या सपाट पातळीचें इतकें भय वाटतें त्यानां कायदा सुव्यवस्था आणि जीवित व मालमत्ता यांची सुरक्षितता यावावत जी सर्वांना सारखी वागणूक मिळते तिची मात्र मुळींच भीती वाटत नाहीं. ज्यानां ताकद, साहसीपणा अगर कावेबाजपणा यांचें वरदान निसर्गानें असामान्य प्रमाणात दिलें आहे त्यानां त्या गुणांपासून होणारा लाभ पुरतेपणीं मिळविण्यास बंदी असावी यावद्दल मात्र ह्या अन्य तक्रारी करणाऱ्या लोकानां खंत वाटत नाहीं.'[१] आणि खरें म्हणजे सांकेतिक शहाणपणा जेव्हां विषमतेचें समर्थन करतो तेव्हां दोन गोष्टींवर भर दिला जातो. एक अशी कीं विषमता आर्थिक आमिप या नात्यानें उपयुक्त कार्य करते; व दुसरी अशी कीं तिच्या द्वारें भांडवलाचा संचय होतो.

या संदर्भात असा दावा केला जातो कीं सध्यांच्या करपद्धतींत जो समता निर्माण करण्यावर भर दिला जातो त्यामुळें व्यक्तीची प्रयत्नशीलता पुढाकार घेण्याची तयारी आणि कल्पकता यांच्यावर अनिष्ट परिणाम होतो. निदान तसा परिणाम होईल असा धोका निर्माण झाला आहे. या समतानुकूल करपद्धतीमुळें 'महत्वाकांक्षा नष्ट होते, यशावद्दल दंड सहन करावा लागतो, नवी रोजगारी निर्माण करणाऱ्या भांडवलाच्या निवेशाला लगाम बसतो; आणि (या करपद्धतीमुळें) धोका पत्करायला तयार असलेल्या नियोजकांच्या राष्ट्राचें कर्तृत्वहीन राष्ट्रांत रूपांतर होण्याची शक्यता आहे.'[२] 'तिच्यामुळें (म्हणजे या करपद्धतीमुळें) लोकानां काम करायला प्रोत्साहन मिळेनासे होतें लोकानां बचत करणें अधिकाधिक अवघड किंवा अशक्य होत जातें...नवे उद्योगधंदे उभारण्यांचा हुरूप करपून जातो...आणि ह्या गोष्टींमुळें तर अमेरिकेचा विकास झाला आहे.'[३]

परंतु हें समर्थन बिनतोड नाहीं. प्राप्तीवरील कर हे सध्यांच्या पातळीवर जवळ जवळ वीस वर्षें आहेत. आणि ह्या काळात आर्थिक विकास एकंदरीत झपाट्यानें झाला आहे. आणि जे लोक ह्या करांवद्दल आशंका व्यक्त करतात तेंच ह्या प्रगतीकडे मोठ्या अभिमानानें वोट दाखवितात. आणि अपुऱ्या आर्थिक आमिपांमुळें आपण

---

१ आर्. एच्. टॉने, इक्वॉलिटी (चौथी आवृत्ती, लंडन ॲलन ॲंड अनविन, १९२२) पृ. ८५.

२ 'टॅक्सेस् ॲंड अमेरिकाज् फ्युचर' नॅशनल ॲसोसिएशन ऑफ मॅन्युफेक्चरर्स या संस्थेपुढें फ्रेड मेटॅग सेकंड यानीं केलेलें भाषण, डिसेंबर १, १९५४.

३ 'द रिलेशन ऑफ टॅक्सेस् टु इकॉनॉमिक ग्रोथ' नॅशनल ॲसोसिएशन ऑफ मॅन्युफॅक्चरर्स या संस्थेपुढें अर्नेस्ट एल्. स्विगर्ट यानीं केलेलें भाषण, डिसेंबर ६, १९५६.

अंगचोरपणा करतो असें कबूल करायला उद्योगधंद्यांच्या क्षेत्रातील बहुतेक माणसें तयार होणार नाहींत या क्षेत्रांतला प्रातिनिधिक चालक आपल्या बरोबरीच्या इतरांनां मागें सारून बढती मिळवतो आणि प्रमुखपद गाठतो. जर करांच्या बोजामुळें अगर अन्य काहीं कारणामुळें तो अंगचोरपणा करतो आहे अशी शंका आली तर त्याच्या पुढील बढतीच्या मार्गांत धोका निर्माण होईल. आपल्या कंपनीकरतां त्यानें प्रयत्नांची पराकाष्ठा करावी अशी अपेक्षा असते. आणि बहुधा तो ती पुरी करीत असतो.

बचतीला प्रोत्साहन देण्यासाठीं व्यक्तींनां भलेंमोठें उत्पन्न मिळायळा हवें ही भूमिका देखील अंशतः तर्कदुष्ट आहे. श्रीमंत माणसाला आपल्या साऱ्या गरजा भागवून देखील शिल्लक टाकता येते म्हणून तो बचत करतो. ऐषआरामी रहाणीतून जें काहीं उत्पन्न उरतें त्यातून ही बचत होते. भांडवलाचा संचय करण्याचा हा काहीं उत्कृष्ट मार्ग नव्हे हें उघडच आहे. शिवाय समताप्रस्थापनेचा भांडवलाच्या संचयावर काय परिणाम होतो याबद्दलचा प्रत्यक्ष पुरावा दुहेरी आहे. समतेच्या मार्गें लागून इंग्लंडनें आपलें नुकसान करून घेतलें असें उदाहरण अनेकदां दिलें जातें. परंतु नार्वे हा देश इंग्लंडहून अधिक समताप्रधान आहे. आणि तरी युद्धोत्तर काळात ज्यानीं अत्यंत झपाट्यानें भांडवलाची उभारणी केली अशा बिगरकम्युनिस्ट देशात त्याची गणना होते.[1] तसेंच मध्यपूर्वेतील ज्या देशांत सर्वात अधिक विषमता आहे त्या देशात भांडवलाच। उभारणी अगदीं कूर्मगतीनें चालली आहे. हें सगळें उत्पन्न किंवा त्यांचा बहुतेक भाग चालू गरजांवर खर्च होतो.

विषमतेबद्दलच्या औपचारिक उदारमतवादी भूमिकेत गेल्या अनेक वर्षात फारसा फरक पडलेला नाहीं. श्रीमतानां लुबाडण्याच्या धोरणाचा पुरस्कार करणें हें काहींसें असंस्कृत आहे ही सधन लोकांची भूमिका उदारमतवाद्यांनीं अंशतः मान्य केली आहे. तरी देखील श्रीमंत मनुष्य हा गरिबाचा नैसर्गिक प्रतिस्पर्धी ही वस्तुस्थिती कायम रहाते. आर्थिक कायदे व विशेषतः करविषयक धोरण हें या दोघांच्या स्वार्थाच्या रस्सीखेचींत सापडलेलें असतें. काणत्याहीं धोरणांचा संपत्तीच्या विभागणीवर काय परिणाम होतो ह्या गोष्टी इतकें आर्थिक धोरणाच्या क्षेत्रांत दुसऱ्या कशालाच महत्व नसतें. सच्च्या उदारमतवाद्यांची कसोटी ही कीं श्रीमंतांचा फायदा करून देण्याचा प्रश्न आला कीं तो कधीं बनत नाहीं आणि बघतहि नाहीं. इतर प्रश्न तो विचारांत घेत असतो पण हा प्रश्न नेहमींच त्याच्या डोळ्यापुढें असतो. पाठीमागून त्यांच्या कानांवर मार्क्सवाद्यांचें छद्मी पुटपुटणें नित्य येत असतें त्याला आव्हान देत असतें आणि असें सुचवित असतें कीं त्यानें कितीही केलें तरी तें पुरेसें

१ ॲलिस बुर्नुफ, नॉर्वे : द प्लॅन्ड रिव्हायव्हल (केंब्रिज, मॅसॅच्युसेटस्, हार्वड युनिव्हर्सिटी प्रेस, १९५८).

होणार नाहीं. त्यानें किती प्रयत्न केले तरी भांडवलाचें एकत्रीकरण होत रहाणार व श्रीमंत लोक अधिक धनाढ्य व सामर्थ्यशाली होत जाणार. ते लढाया हरतात पण युद्धें जिंकतात.

[२]

पण आधुनिक सामाजिक इतिहासावरून अन्य कोणत्याहि गोष्टींपेक्षां ही गोष्ट स्पष्ट होते कीं एक आर्थिक प्रश्न या नात्यानें विषमतेवरचें लोकांचें लक्ष उडत चाललें आहे. ही गोष्ट युनायटेड स्टेटस्च्या बाबतींत विशेष खरी आहे. आणि असें दिसतें कीं पश्चिमात्य देशांपैकीं ब्रिटनच्या बाबतींत ही गोष्ट तितकीशी खरी नाहीं. परंपरावादी व उदारमतवादी या दोहोंच्या सांकेतिक शहाणपणात विषमतेला एका महत्वाच्या धर्मकृत्याचें स्थान आहे हें खरें. पण माणसांचीं मनें त्या प्रश्नानें व्यग्र झालेलीं नाहींत. आणि सांकेतिक शहाणपणानें देखील या गोष्टीची अंशतः दखल घेतलेली आहे.

विषमतेचा कमी होत जाणाऱ्या महत्वाचा पुरावा म्हणून इतकेंच सांगायला हवे कीं गेल्या पंधरा वर्षांत उत्पन्नाच्या चालू विभागणीत महत्वाचा बदल करण्याचा प्रयत्न करण्यात आलेला नाहीं. उत्पन्नांची फेरविभागणी करण्याचा प्रमुख राजकीय मार्ग म्हणजे चढता प्राप्तिकर अर्थात् परंपरावाद्यानां राग येता म्हणून अमेरिकन उदारमतवादी यावाबतींत धारणी मौन पाळत असले तरी ही गोष्ट उघड आहे. पण दुसऱ्या महायुद्धानंतर विषमता कमी करण्यासाठीं म्हणून या करात बदल करण्याचा मोठा प्रयत्न असा झालाच नाहीं. फक्त काहीं पळवाटा बंद करण्यात आल्या आहेत आणि काहीं निर्माण करण्यात आल्या आहेत. पण हा कर अधिक चढता करून अधिक समता निर्माण करावी यासाठीं उदारमतवाद्यानीं कोणतीहि नवी व महत्वाची योजना सुचवलेली नाहीं आणि परंपरावाद्यानीं अनेक छोटे विजय मिळवले असले तरी या करांवर एखादा मोठा हल्ला चढवणें त्यानां शक्य झालेलें नाहीं. परिस्थिती खरोखर उलट आहे. सध्यांचे प्राप्ती करावरील जादा आकारणीचें दर स्थूलमानानें युद्धकालात निश्चित करण्यात आले. युद्धामुळें करावया लागणाऱ्या त्यागाचा भार सर्वांवर सारखा पडावा या हेतुनें त्यांची अंमल बजावणी करण्यात आली आणि त्यातून असें सूचित होत होतें कीं ही जादा आकरणी तात्पुरत्या स्वरूपाची आहे. परंतु हा जादा आकार आतां नित्य द्यावा लागणार असें बहुतेक लोक मानतात.

या सध्यांच्या तडजोडीचा एक भाग म्हणून उदारमताचे पुरस्कर्ते सध्यांचे कर अधिक चढते करण्याचा प्रयत्न करीत नाहींत किंवा त्यांच्या आकारणीतले अन्याय व पळवाटा नाहींशा करण्याचाहि निकराचा प्रयत्न करीत नाहींत. पण वर-

च्या थरांतील उत्पन्नांवरील करांच्या दरात एकंदरीनें कपात करण्यास मात्र ते जोरदार विरोध करतील. या करामुळें अतिरिक्त समता निर्माण झाली असें ज्यांचें मत आहे. ते अधिक आरडाओरडा करतात. श्रीमंत लोक जनतेची सहानुभूति व पाठिंबा मिळावा म्हणून नित्य आवाहनें करीत असतात. धैर्य दाखवा, उठावणी करा असा पुकारा करीत असतात. उशीर झाला आहे खरा पण वेळ टळलेली नाहीं. आतां मागेपुढें करीत रहायला आपल्याला कोणतीहि सबब रहिलेली नाहीं. न्याय आणि तर्क यांची सारी शक्तीं आपल्या मागें आहे. आणि आर्थिक प्रगती रोखणारे करांचे साखळदंड तोडणें अत्यावश्यक झालेलें आहे. आपल्या जवळ जर पुरेशी हिंमत असली तर चढाई करण्यास परिस्थिती अनुकूल आहे.[1] पण प्रेसिडेंट आयसेनहॉवर यांच्या अगदीं परंपरावादी सरकारला देखील प्राप्तिकरावरील जादा आकारणीत व्यापक प्रमाणावर कपात करणें इष्ट वाटलें नाहीं.

प्राप्तिकर सोडल्यास विषमता कमी करणारा जवळजवळ कोणताही कायदा अलीकडच्या वर्षांत पसार झालेला नाहीं. फार काय अशा कायद्यावर चर्चा देखील झालेली नाहीं. पण पन्नास वर्षांपूर्वी जेव्हां समाजवाद व भांडवलशाही यांमधील वाद अगदीं निकरावर आला होता त्यावेळीं विषमतेहून वेगळा असा कोणता आर्थिक प्रश्न आहे अशी कल्पना करणें देखील अवघड होतें.

विषमतेवरचें लक्ष उडालें आहे तें समतेचा विजय झाला आहे असें परंपरावाद्यांचें सांकेतिक शहाणपण नित्य सुचवित असतें आणि उद्योगधंद्यातल्या लोकांच्या तक्रारी ऐकल्या तर तें खरेंहि वाटेल. पण खरें म्हणजे अजूनहि खूप विषमता आहे. १९५५ सालीं कमींत कमी उत्पन्न असलेल्या दहा टक्के कुटुंबानां व कुटुंब विहीन व्यक्तीनां एकंदर द्रव्यरूपी उत्पन्नाचा फक्त एक टक्का भाग मिळत होता. सर्वांत अधिक उत्पन्न असलेल्या दहा टक्के कुटुंबानां व व्यक्तींनां एकंदर उत्पन्नाचा २७ टक्के भाग मिळत होता. याचा अर्थ असा कीं किमान उत्पन्न असलेल्या दहा टक्के लोकांच्या उत्पन्नाच्या सत्तावीस पट उत्पन्न या लोकानां मिळत होते. किमान उत्पन्न असलेल्या निम्म्या कुटुंबानां कर वजा जातां एकंदर द्रव्यरूप उत्पन्नाचा फक्त २३ टक्के भाग मिळत होता आणि कमाल उत्पन्न असलेल्या बाकीच्या पन्नास टक्के कुटुंबानां या उत्पन्नाचा ७७ टक्के भाग मिळत होता. १९५४ सालीं फक्त तीन टक्के कुटुंबांचें करआकारणींपूर्वीचें उत्पन्न १५००० डॉलर्सहून अधिक होतें. आणि एकंदर उत्पन्नांचा १५·५ टक्के भाग त्यांच्या वाटणीला येत होता. दुसऱ्या टोकाला जाऊन पाहिलें तर असें दिसतें की १६·७ टक्के कुटुंबांचें करआकारणीपूर्वीचें उत्पन्न दोन हजार डॉलर्सहून कमी होतें आणि एकंदर उत्पन्नाचा फक्त ३·६ टक्के भाग त्यांना

१ मेटॅग, 'टॅक्सेस् अँड अमेरिकाज् फ्युचर'

मिळत होता.[1] निसर्गसंपत्ती आणि तेल यांच्यापासून अजून अफाट संपत्ती कमावली जात आहे. तेलाच्या बाबतींत त्याचा सांठा संपत जात असल्यामुळें २७.५ टक्के उत्पन्नाच्या बाबतींत सूट मिळते. आणि त्यामुळें तेलापासून मिळणाऱ्या उत्पन्नाचा तेवढा भाग आणि कधीं कधीं त्याहूनहि अधिक भाग कर आकारणीतून सुटतो. सध्यांचे कायदे उत्पन्न कमावणाऱ्या माणसापेक्षां ज्याच्या जवळ संपत्तीचा संचय झालेला आहे. अशा माणसाला अधिक अनुकूल आहेत. जो मनुष्य आधींच श्रीमंत आहे त्यानें जर थोडी चतुराई दाखविली तर तो आपलें उत्पन्न भांडवली नफ्याच्या स्वरूपांत मिळवूं शकतो आणि त्यामुळें उत्पन्नाचा फक्त २५ टक्के भाग त्याला कर म्हणून द्यावा लागतो. शिवाय म्हातारपणासाठीं कुटुंबासाठीं किंवा निव्वळ त्यापासून मिळणाऱ्या समाधानासाठीं भांडवलाचा संचय करणें त्याला भाग पडत नाहीं. कारण त्याच्याजवळ भांडवल आधीपासूनच असतें. त्यामुळें त्याला बचत करण्याची गरज भासत नाहीं. ज्याला उत्पन्न मिळविण्यासाठीं प्रयत्न करावा लागतो. त्याची परिस्थिती मात्र अशी सुखदायक नसते. पण असें असूनहि या प्रश्नांकडे लोकांचें लक्ष वेधत नाहीं आणि म्हणून चळवळ अगर प्रत्यक्ष कृति यानां देखील सुरुवात होत नाहीं.

[३]

विषमतेचा प्रश्न मागें पडण्याचें प्रमुख कारण असें कीं विषमता ही अपेक्षानुसार वाढत चाललेली नाहीं आणि त्यामुळें मार्क्सचें जें भाकित चालू शतकाच्या सुरुवातीला प्रत्यक्ष निरीक्षणाच्या कसोटीला उतरल्यासारखे भासत होतें त्याची तितकी जबर भीती आतां कोणाला वाटत नाहीं. या देशांतील दृष्य संपत्तीची मालकी आणि तिच्या उत्पन्नाचा विनियोग करण्याचा अधिकार मूठभर लोकांच्या हातीं जाईल हें आतां शक्य वाटत नाहीं. चढता प्राप्तीकर काढून टाकावा आणि त्यांतील सध्यांच्या पळवाटा अधिक मोठ्या कराव्या असें म्हणणाऱ्या लोकांची मनोवृत्ति या संपत्तीच्या केंद्रिकरणाला अनुकूल असली तरी ती प्रत्यक्षांत येणार नाहीं. दरम्यानच्या काळांत कमाल उत्पन्न मिळविणाऱ्यांच्या हातीं जाणारा उत्पन्नाचा हिस्सा काहींसा कमी झाला आहे. आणि मध्यम व खालच्या थरांतील लोकांच्या हातीं जाणाऱ्या उत्पन्नाचें प्रमाण खूपच वाढलें आहे. वरच्या वर्गाच्या हाती उत्पन्नाचे केंद्रीकरण होण्याच्या

१ यू. एस्. डिपार्टमेंट ऑफ कॉमर्स. स्टॅटिस्टिकल अॅबस्ट्रॅक्ट ऑफ द युनायटेड स्टेटस् १९५७, पृ. ३०९. करवजा उत्पन्नाच्या वांटणीची टक्केवारी 'बोर्ड ऑफ गव्हर्नर्स ऑफ द फेडरल रिझर्व सिस्टिम' या पुस्तकातून घेतलेली आहे; आणि ती ग्राहकांच्या द्रव्याच्या पहाण्यांवर आधारलेली आहे. करपूर्व उत्पन्नाची माहिती डिपार्टमेंट ऑफ कॉमर्सनें संकलित केलेली आहे.

क्रियेला करांमुळें आळा वसला आहे. आणि पुरी रोजगारी व वाढती मजुरी यांमुळें खालच्या वर्गाची स्थिती सुधारली आहे. १९२८ सालीं कमाल उत्पन्न असलेल्या १ टक्का व्यक्तिच्या हातीं करआकारणीनंतर एकंदर उपन्नाचा १९ टक्के भाग जात असे. १९४६ सालीं हें प्रमाण ८ टक्क्यापांसून काहींसें कमीं झालें होतें. १९२८ सालीं कमाल उत्पन्न मिळविणाऱ्या ५ टक्के लोकांना एकंदर उत्पन्नाचा तिसरा हिस्सा मिळत असे. पण १९४६ सालीं हें प्रमाण सुमारें १८ टक्क्यांवर आलें होतें.[1] युद्धाच्या व युद्धानंतरच्या वर्षांत खालच्या लोकांची स्थिती विशेष वेगानें सुधारली. १९४१ व १९५० च्या दरम्यान खालच्या थरांत असलेल्या २० टक्के लोकांचें उत्पन्न ४२ टक्कयांनीं वाढलें. त्यावरच्या थरांत असलेल्या २० टक्के लोकांचें उत्पन्न ३७ टक्कयांनीं वाढलें. या वर्षांविषयीचे तपशीलवार आंकडे खालीं दिले आहेत.

कर आकारणी नंतरचे सरासरी कौटुंबिक उत्पन्न
(१९५० सालचीं क्रयशक्ति असलेल्या डॉलर्समध्यें)[2]

	१९४१ डॉलर	१९५० डॉलर	१९४१–५० टक्क्याचा बदल
सर्व कुटुंबातील अगदीं खालच्या थरांतील २० टक्के	७५०	१०६०	+४२
त्यावरचीं २० टक्के कुटुंबें	१७३०	२३६०	+३७
त्यावरचीं २० टक्के कुटुंबें	२७९०	३४४०	+२४
त्यावरचीं २० टक्के कुटुंबें	४०३०	४६९०	+१६
सर्वांत वरची २० टक्के कुटुंबें	८१९०	८८८०	+ ८
सर्वांत वरची ५ टक्के कुटुंबें	१५०४०	१४७४०	- २

अनुकरण आणि तें जमत नाहीं तेव्हां हेवा यानां मानवी प्रेरणांत महत्वाचें स्थान आहे अशी अर्थशास्त्रज्ञांची भूमिका आहे.[3] जोपर्यंत एका व्यक्तिकडे दुसऱ्या

१ ही माहिती नॅशनल ब्युरो ऑफ इकनॉमिकल रिसर्च ह्या संस्थेकडून मिळालेली आहे. हे आंकडे कुटुंबावद्दलचे नसून व्यक्तीवद्दलचे आहेत हें ध्यानांत घ्यावें.

२ सेल्या गोल्डस्मिथ, जॉर्ज जास्झी, हिमन, हिमन काइटझ आणि मॉरिस लायबेनबर्ग यांच्या 'साइज डिस्ट्रीब्युशन ऑफ इन्कम्स सिन्स द मिड-थर्टीज' या लेखावरून रिव्हयू ऑफ इकनॉमिक्स अँड स्टॅटिस्टिक्स व्हॉल्यूम ३६ (फेब्रुआरी १९५४).

३ प्रकरण ११.

व्यक्तिहून अधिक कांहीतरी असतें तोपर्यंत ती दुसरी व्यक्ति आपल्या परिस्थितीबावत असंतुष्ट असते. आपल्या अधिक नशिबवान समकालिनाची बरोबरी करण्याचा ती प्रयत्न करते, आणि तो प्रयत्न फसला तर अतिशय कष्टी होते. पण माणसाचें हे हीन स्वभाव विशेष वाटतात तितके सर्वगामी नसावेत. हेवा वाटतो तो बहुधा जवळपासच्या शेजाऱ्यांचा. दूर असलेले श्रीमंत त्याच्या टप्प्यांत येत नाहींत. त्यामुळें जेव्हां माणसाचें वस्तुरूप उत्पन्न वाढत असतें तेव्हां आपल्याला अपरिचित असें टेक्सासमधले किंवां न्यूयॉर्क मधले लोक फारच धनाढ्य झाले आहेत या गोष्टीचें त्याला तितकेसें महत्व वाटत नाहीं. त्या ऐवजीं सांकेतिक शहाणपणाची भूमिका मान्य करणें अधिक सोपें, किंवां निदान सोईस्कर वाटतें. ही भूमिका अशी कीं अमेरिकेतले श्रीमंत लोक समाजाला फार उपयुक्त आहेत आणि त्यांचा सध्यां फार छळ चाललेला आहे. शिवाय मागें म्हटल्याप्रमाणें श्रीमंतांच्या संपत्तीवर ताशेरे झाडणें आणि ती कमी करावी असें सुचविणें ही गोष्ट आता हीन अभिरुचीची मानली जाते. ज्या माणसाचें उत्पन्न वाढत असतें तो अशा स्वरूपाची चर्चा करून स्वतःकडे वाईटपणा घ्यायला तयार नसतो. उपटसुंभ वक्ते, विघ्नसंतोषी चळवळ्ये, कम्युनिस्ट आणि इतर समाजकंटक यांच्या पंक्तीला त्यानें काय म्हणून जाऊन वसावें ?

जर श्रीमंतांचीं उत्पन्नें वाढत असतील आणि बाकीच्या लोकांचीं जागच्याजागी असतील अगर घटत असतील तर मात्र गोष्ट वेगळी. ह्याबाबतींत शेतकऱ्यांचें उदाहरण देतां येईल. चालू शतकाच्या पन्नाशीच्या मध्यावर या शेतकऱ्यांचीं उत्पन्नें घटलीं आणि त्याचवेळीं बहुतेक इतर वर्गांचीं उत्पन्नें मात्र वाढत होतीं. आणि जरी या शेतकऱ्यांची स्थिती पूर्वापेक्षां बरी होती तरी त्यानां ही परिस्थिती पसंत पडली नाहीं. आणि ती त्यानीं मान्य करावी असें सुचविणारा सेक्रेटरी ऑफ ॲग्रिकल्चर देखील त्यानां तितकाच नापसंत होता.

[४]

विषमतेच्या प्रश्नावरचें लोकांचें लक्ष उडण्याचें आणखी एक कारण म्हणजे अलीकडच्या काळांत श्रीमंतांच्या राजकीय व सामाजिक दर्जात पडलेला मूलभूत फरक स्थूलमानानें असें म्हणता येईल कीं श्रीमंतीचे तीन मूलभूत फायदे असतात. पहिला असा कीं तिच्यामुळें व्यक्तीच्या हातीं सत्ता येते. दुसरा असा कीं पैशानें ज्या गोष्टी विकत घेता येण्यासारख्या असतात त्या श्रीमंतीमुळें माणसाला मिळूं शकतात. आणि तिसरा असा कीं श्रीमंत माणसाला त्याच्या संपत्तीमुळें मानमान्यता मिळते. संपत्तीपासून मिळणाऱ्या या फायद्यांवर गेल्या पन्नास वर्षांत खूपच निर्बंध पडले आहेत; आणि ते देखील अशा प्रकारें कीं त्यामुळें श्रीमंतांविषयींचा हेवा व राग

खूपच कमी व्हावा, इतकेंच नव्हे तर त्यांच्या अस्तित्वाकडे देखील लक्ष वेधलें जाऊं नये.

अगदीं अलीकडे पावेतों म्हणजे पन्नास वर्षांपूर्वी युनायटेड स्टेटस्‌मध्यें मोठ्या कंपन्यांची सत्ता अगदीं निरंकुश होती. आणि हीच गोष्ट पर्यायानें या कंपन्यांच्या प्रमुखांच्या बाबतींत खरी होती. मॉर्गन, रॉकफेलर कंपनीचे चालक, हिल, हॅरिमन आणि हर्स्ट यांसारख्यांच्या हातीं प्रचंड सत्ता होती. आणि या सत्तेमुळें ते असंख्य व्यक्तींनां आपल्या इच्छेप्रमाणें कामाला लावूं शकत असत आणि त्या व्यक्ती त्यांच्या आज्ञा पाळित असत.

गेल्या अर्धशतकांत युनायटेड स्टेटस्‌च्या सरकारची सत्ता व प्रतिष्ठा यांत वाढ झाली आहे. आणि त्या प्रमाणांत खाजगी संपत्तीच्या मालकांची सत्ता व प्रतिष्ठा कमी झाली आहे. शिवाय त्यांची काहीं सत्ता आतां वॉशिंग्टनच्या म्हणजे सरकारच्या हातीं गेली आहे. दुसऱ्या एका बाजूनें कामगार संघटनांनीं योजकांच्या सत्तेवर आक्रमण केलें आहे. आणि सर्वांत महत्वाची गोष्ट अशी कीं उद्योगधंदे चालविण्याची सत्ता भांडवलदारांच्या हातून पुष्कळश्या प्रमाणांत धंदेवाईक चालकांच्या किंवा अधिकाऱ्यांच्या हातीं गेलीं आहे. पन्नास वर्षांपूर्वी मॉर्गन रॉकफेलर, हिल, हॅरिमन इत्यादि उद्योगपती आपल्या मालकीच्या उद्योगधंद्यांचें निरंकुश सर्वाधिकारी होते. आणि तसें करणें सर्वस्वीं त्यांच्या हातांत होतें. त्यांची संपत्ती अजूनहि त्यांच्या मुलांच्या आणि नातवंडांच्या हातीं आहे. पण काहीं अगदीं थोडे अपवाद सोडल्यास त्यांचे उद्योगधंदे चालविण्याची सत्ता धंदेवाईक चालकांचे हातीं गेली आहे. शिवाय स्वतःच्या मालकीचें उद्योगधंदे स्वतःच चालविणारी योजकांची एक नवी पिढी निर्माण झालेली नाहीं.

ज्या वेळीं धनिक हे नुसते धनिक नव्हते आणि कंपन्यांचे प्रत्यक्ष सूत्रचालन करण्याची सत्ता त्याच्या हातीं होती त्यावेळीं संपत्तीपासून मिळणारे फायदे अधिक होते हें उघडच आहे. आणि त्यामुळेंच श्रीमंतीला अधिक विरोध होत असे. जे. पी. मॉर्गन केवळ आपल्या वैयक्तिक संपत्तीचा मालक नव्हता तर त्यानें निर्माण केलेल्या आणि त्याच्या नियंत्रणाखालीं असलेल्या युनायटेड स्टेटस् स्टील कॉर्पोरेशनच्या धोरणांची जबाबदारी देखील त्याच्यावरच होती. आज देखील अनेकांची श्रीमंती युनायटेड स्टेटस् स्टील कॉर्पोरेशनच्या भागांच्या मालकीवर आधारलेली आहे. पण त्या कॉर्पोरेशनच्या अपकृत्याबद्दल ह्या व्यक्तींना जबाबदार धरलें जात नाहीं कारण त्या व्यक्ति काहीं ती कंपनी चालवत नाहींत. आणि खरें म्हणजे त्या व्यक्ति कोण हेंच जवळ जवळ कोणाला माहित नाहीं. उद्योगधंद्यांच्या प्रत्यक्ष संचालनामुळें जी सत्ता हातीं येत असे ती अशी लुप्त झाल्यावर श्रीमंतांबद्दलचें शत्रुत्वहि नष्ट झालें.

संपत्तीशीं संलग्न असलेली सत्ता कमी होण्यास आणखी एक कारण होतें. ११९४ सालीं नोसाइरि पर्वताच्या एका शिखरावरील अल्काफ या किल्लयावर अॅसॅसिन्स (मारेकरी) या टोळीची प्रमुख छावणी होती. या छावणीला हेन्री ऑफ शांपेन या धर्मरक्षक सरदारानें भेट दिली. अॅसॅसिन्स ही एक कडवी मुसलमान जमात होती हें खरें पण त्यांचे ख्रिश्चन लोकांशीं एकंदरित बरे संबंध होते. भांडण झालें कीं भांडणाऱ्या प्रतिस्पर्ध्यापैकीं एकाला निकालात काढण्याचें आणि अश्या रितीनें भांडण मिटविण्याचें उपयुक्त कार्य ते योग्य मोबदला घेऊन करित असत. या मैत्रीच्या संबंधामुळें हेन्रीचें स्वागत मोठ्या थाटामाटानें झालें. या स्वागताच्या वेळीं जे करमणुकीचे कार्यक्रम झाले त्यांतला एक विशेष छाप पाडणारा होता. या कार्यक्रमांत त्यांच्या शेखनें हुकुम करतांच त्या जमातिच्या निष्ठावंत अनुयायांनीं एकामागून एक असें स्वतःला जाळून घेतलें. या घटनेपूर्वी आणि नंतरहि आपल्या घरांतील निकटवर्ती मंडळीनीं खुषीनें आपल्या आज्ञांचें पालन करावें या गोष्टींपासून सत्ताधाऱ्यानां फार आनंद होत आलेला आहे. आणि हा आज्ञाधारकपणा निर्माण करण्याचें कार्य मुख्यतः संपत्तीनें केलेलें आहे. पण यामुळें आज्ञेचें पालन करणाऱ्या माणसांना आपल्या मालकाबद्दल प्रेम मात्र बहुधा वाटलें नाहीं. अल्काफ येथें देखील असाच प्रकार घडला असावा.

मात्र अशा सेवेची अपेक्षा असेल तर त्यासाठीं आज्ञाधारक व लाचार नोकरांचा तांडा जवळ असावा लागतो. ह्या तांड्याला जर गळती लागली तर श्रीमंतांच्या अरेरावी अधिकारांचा देखील क्षय होतो. संपत्ती हातची जाण्यासारखाच हा प्रकार असतो. खालच्या आर्थिक थरांतील अमेरिकन लोकांचीं उत्पन्नें आतां वाढलीं आहेत व त्याना आर्थिक स्थैर्य प्राप्त झाले आहे. आणि त्यामुळें ह्या लाचार नोकरवर्गाच्या संख्येत घट झाली आहे—नव्हे तो जवळ जवळ नष्टच झाला आहे. ह्याचा एक परिणाम असा झाला आहे कीं लोक आतां श्रीमंतांची सेवा करीत नसल्यामुळें (आणि अशी सेवा त्यानीं पूर्वी केली नसल्यामुळें व पुढें ती करणें भाग पडेल अशी शक्यता नसल्यामुळें) त्यांच्या मनांत या सेवेमुळें निर्माण होणारा रोषही नाहीं.

[५]

आपल्याला वाटेल त्या गोष्टी विकत घेऊन त्यांचा उपभोग घेण्याचीं श्रीमंताची खास शक्ति फारशी कमीं झाली नसेल असें कोणालाहि वाटेल. ज्यांची तेवढी ऐपत आहे तो मनुष्य अजूनहि रेम्ब्रांचीं चित्रें विकत घेऊं शकतो किंवा स्वतःच्या घरीं ऑर्किडचीं फुलें फुलविण्याचा आनंद उपभोगूं शकतो. त्याला तसें करता येऊं नये असें कांहींहि झालेलें नाहीं. पण वस्तूंच्या उपयोगाशीं श्रीमंतीचा आणखी एक विशेष फायदा निगडित झालेला आहे. तो म्हणजे आपण कोणीतरी वेगळे आहोत मोठे आहोत हें लोकानां दाखविण्याचा. ज्यावेळीं सामाजातले बहुसंख्य लोक गरीब

होते तेव्हां श्रीमंतीमुळें खूपच मोठेपणा मिळत असे. संपत्ती दुर्मिळ असल्यामुळें हें असें होणें साहजिक होतें. इंग्लंडमधील ड्यूक लोकांचीं सगळींच कुटुंबें काहीं इतराहून श्रेष्ठ दर्जाचीं नाहींत यांवद्दल पुष्कळसें एकमत आहे. कुशाग्र बुद्धी व मंद बुद्धी, चांगली अभिरुचि व वाईट अभिरुचि, नीति व अनीती, समानलिंगी संबंध व निषिद्ध कुटुंबान्तर्गत लैंगिक संबंध ह्या गोष्टी सर्वसाधारण कुटुंबात जितक्या प्रमाणात असतात तितक्याच प्रमाणात या ड्यूक कुटुंबांतहि असतातच. पण फारच थोड्या लोकानां ड्यूक अगर डचेस् हे किताब असतात. आतां घटस्फोटाचे कायदे शिथिल झाल्यामुळें डचेसची संख्या मात्र काहींशी वाढली आहे. या अल्पसंख्यत्वामुळेंच ड्यूक लोक एरवीं चारचौघांसारखे असले तरी त्यांच्याकडे आदरानें पाहिलें जातें. दीर्घ कालपर्यंत श्रीमंतांच्या बाबतींत अशीच स्थिती होती. ड्यूक लोकांच्या संख्येत वाढ झाली तर त्यांची प्रतिष्ठा कमी होईल. त्याचप्रमाणें श्रीमंतांची संख्या वाढल्यामुळें हीण घातलेल्या नाण्याप्रमाणें त्यांची किंमत कमी झाली आहे.

पुन्हां मानसन्मान मिळवायला केवळ श्रीमंती कधींच पुरी पडत नाहीं. तिची जाहिरात करावी लागते आणि ती करण्याचा घोपट मार्ग म्हणजे लोकांच्या डोळ्यांत भरतील अशा उंची गोष्टी जवळ बाळगणें. गेल्या शतकाच्या उत्तरकालात युनायटेड स्टेट्समध्यें ही जाहिरातबाजी मोठ्या कौशल्यानें केली जात असे. घरें, गाडघाघोडे वायकांचे दागिने आणि वेगवेगळ्या प्रकारचे ऐषआराम या सर्वांचा उपयोग जाहिरातीसाठीं केला जाई. वस्तूंच्या किंमतीपणावर विशेष भर दिला जाई. मिस्टर गौल्ड यांच्या "पांच लाख डॉलर किंमतीच्या विलासनौकेनें" अमक्या बंदरात प्रवेश केला आहे, किंवा आपल्या "एक लाख डॉलरच्या राजेशाही मोटारीतून" मिस्टर मार्गन आतां प्रवासाला निघाले आहेत, किंवा मिस्टर व्हँडरबिल्ट यांच्या "वीस लाख डॉलर किंमतीच्या घराचें" बांधकाम पुरें होत आलें आहे, आणि त्यात "पन्नास हजार डॉलर्सची चित्रें" असून त्याचे "ब्रॉन्झचे दरवाजे वीस हजार डॉलर्सचे" आहेत अशी माहिती सध्यां आपल्याला दिली जाते.[1] उंची घरें, विलासनौका, नृत्यसमारंभ, घोड्याच्या पागा आणि रत्नखचित वक्षःस्थळें या सर्वांचा उपयोग एखादा मनुष्य मानसन्मानास पात्र आहे हें दाखविण्याकरितां केला जात असे.

असें श्रीमंतीचें प्रदर्शन आतां हीन अभिरुचीचें समजलें जातें. या गोष्टीला एक

१ मॅथ्यू जोसेफसन, 'द रॉबर बॅरन्स' (न्यू यॉर्क, हारकोर्ट, ब्रेस अँड कंपनी, १९३४) पृ. ३३०. कोमॉडॉर व्हॅन्डरबिल्ट यांचें चरित्र १८८५ सालीं लिहिणारे डब्ल्यू. ए. फ्रॉफुट यांच्या लेखनाचा जोसेफसन येथें अनुवाद करीत आहेत.

अकस्मिक गोष्टहि अंशत: कारणीभूत झाली. अमेरिकन धनिकानां आपली संपत्ती हिसकून घेतली जाईल कीं काय अशी भीती फार दिवसांपासून वाटते. आणि सुधारणेच्या अगदीं मवाळ योजनेकडे देखील क्रांतीचें पूर्वचिन्ह म्हणून जे ते पहात असत त्याच्या मागें ही भीतीच असावी. यामुळें मंदी व न्यू डील (प्रेसिडेंट रुझवेल्टचें प्रागतिक धोरण) यांची अमेरिकन धनिकांना धडकीच वसली. ह्याचा एक परिणाम असा झाला कीं वैयक्तिक खर्च अगदीं वेतावातानें केला जाऊं लागला. घरें, विलास नौका, आणि स्त्रिया यांच्यावर केवळ दिखाऊ खर्च केला तर जनता चिडून दंगेधोपे करील असा समज धनिकांत पसरला. अधिक तारतम्यानें वागणारे धनिक हा खर्च अयोग्य व मूर्खपणाचा आहे असें म्हणूं लागले. आपण उपयुक्त नागरिक, औद्योगिक मुत्सद्दी किंवा अगदीं चार चौघांतले एक आहोत असा देखावा करणें त्यांच्या दृष्टीनें अधिक शहाणपणाचें होते.[1]

खरें म्हणजे याहून मूलगामी कारणें हा फरक घडवून आणत होती. किंमती वस्तूंचें प्रदर्शन करून आपली श्रीमंती लोकांच्या नजरेस आणणें हें हलकेपणाचें व म्हणून निषिद्ध आहे अशी भूमिका गेल्या पंचवीस वर्षांत दृढमूल झाली आहे. हलकेपणा या शब्दाचा अर्थ अगदीं स्पष्ट आहे. सामान्य लोक अगर सामान्यांचा कळप किंवा जमाव यांच्याशीं ज्याचा संबंध असतो तें हलकेपणाचें असतें (असा अर्थ शब्दकोशात दिलेला आहे.) आणि प्रत्यक्षात काय घडलें तें या अर्थाच्या द्वारेंच स्पष्ट होतें. भरपूर व दिखाऊ स्वरूपाचा खर्च करण्याची ऐपत आतां इतक्या लोकानां प्राप्त झाली कीं तसा खर्च करून आपला उच्च दर्जा लोकांच्या नजरेस आणणें अशक्य होऊं लागलें. आजकाल एखाद्याजवळ रुबाबदार व विशेष शक्तिमान एंजिनांची गाडी असलीं तर त्यामुळें त्याची श्रीमंती काहीं डोळ्यांत भरत नाहीं. कारण अशा हजारों गाड्यांचें आज ठोकवंद उत्पादन होत असतें. पांच वीचवर स्वत:चें घर असणें याची आतां विशेष मातब्बरी राहिलेली नाहीं. कारण मियामी वीचवरच्या हॉटेलांत हजार खोल्या अशा आहेत कीं त्यांचें भाडें अशा घरावर होणाऱ्या दैनिक

१ पहा सी. राइट मिल्स 'द पॉवर एलिट' (न्यू यॉर्क, ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस, १९५६) पृ. ११७. मिस्टर मिल्स असें सुचवितात कीं मंदीच्या वर्षांत तंत्रज्ञ व कंपन्यांचे चालक यांची देखाव्याचीं माणसें म्हणून भरती करण्यांत आली. हेतु हा कीं त्यांच्या आडोशाला राहून श्रीमंतानां आपला बचाव करता यावा व निर्धास्तपणें जगता यावें. मला असें वाटतें कीं मिस्टर मिल्स म्हणतात तितका विचारपूर्वक व कावेबाजपणें हा बदल करण्यात आलेला नाहीं. पण मिस्टर मिल्सनां तसें वाटावें हें त्यांच्या प्रकृतीधर्मास धरून आहे.

खर्चाइतकेंच असतें. एकेकाळीं हिऱ्याचीं उंची भूषणें चढवलीं कीं एखाद्या गलेलठ्ठ व हिडीस माणसाकडे देखील लोकांचें लक्ष वेधत असे. कारण तो अत्यंत उच्च वर्गातला आहे असें तीं भूषणें सांगत असत. पण आतां एखादी टेलिव्हिजन नटी किंवा चलाख बाजारबसवी देखील तसले हिरे वापरूं शकते. आधुनिक ठोकबंद दळणवळणाच्या साधनांमुळें, विशेषतः चित्रपट व दूरचित्र यांच्यामुळें अशी सोय झाली आहे कीं धनिककन्यका जितका उंची नट्टापट्टा करतात तितकाच एखाद्या खाण मजूराच्या किंवा फिरत्या विक्रेत्याच्या मुलीनें केलेला सर्वसामान्य जनतेला पहायला मिळतो. कारण अशा माणसांचें नशीबहि त्यांच्या कर्तृत्वामुळें म्हणा किंवा कर्तृत्वाच्या आभासामुळें म्हणा उघडूं शकतें. दक्षिण अमेरिकेत, मध्यपूर्वेत, व काहीं अंशीं समाजवादी भारतात आणि तसेंच नीस, कॅने व ड्यूव्हिल ह्या आंतरराष्ट्रीय आराम स्थानात श्रीमंतीचें भडक प्रदर्शन अजूनहि केलें जातें. असें व्हावें हें अपेक्षितच आहे. कारण ह्या देशांतले बहुसंख्य लोक एकंदरीत गरीबच आहेत आणि श्रीमंतीची जाहिरात करणाऱ्या गोष्टी घेणें त्यांच्या ऐपती बाहेरचें आहे. ह्यामुळें डामडौलाला अजून तेथें स्थान आहे. तो करण्याची ऐपत अजून फारशा लोकानां नसल्यामुळें तो अजून हलकेपणाचा निदर्शक झालेला नाहीं.

मोठेपणा मिळविण्याच्या बाबतींत अमेरिकेत श्रीमंतीची काहींच मदत होत नाहीं असें मात्र नव्हे. सांस्कृतिक आणि तंत्रविषयक कार्यासाठीं अगर एखाद्या उपयुक्त पौकासाठी संपत्तीचा विनियोग केला तर त्यामुळें अजूनहि समाजाचें लक्ष वेधून घेता येतें. धनिक अमेरिकन माणसानें आपली नखे काळजीपूर्वक कोरून घेतलीं तर त्यामुळें त्याचें कौतुक होणार नाहीं; पण त्यानें शेतीची उत्तम मशागत केली तर मात्र अवश्य होईल. घोड्यांच्या ऐषआरामी पागा कौतुकांचा विषय होणार नाहीं पण गाईंचा सुसज्ज व भव्य गोठा जर त्याच्या मालकीचा असला तर मात्र त्याचा मानसन्मान होईल. सार्वजनिक जीवनांत महत्व मिळविण्यासाठीं जरी श्रीमंतीचा उपयोग होत असला तरी केवळ श्रीमंतीच्या सहाय्यानें जो मोठेपणा मिळवूं पहातो तो नागरिक या नात्यानें कमी प्रतीचा समजला जातो. सार्वजनिक अधिकाराच्या स्थानावर निवडून आलेल्या एखाद्या हॅरिमनला अगर लेहमनला जीं प्रतिष्ठा असते ती एखाद्या अल्ड्रिच अगर व्हिटनेला कधींच लाभत नाहीं. कारण जरीं अल्ड्रिच व व्हिटने यांसारख्या मंडळीची परदेशांत वकील म्हणून नेमणूक व्हावी अशी योग्यता असली तरी निवडणूक खर्चाला त्यानीं भरपूर हातभार लावला नसता तर त्यांची त्या जागीं नेमणूक झाली नसती. सारांश एकेकाळीं जवळ संपत्ती असली व ती डोळ्यांत भरेल असा खर्च केला म्हणजे सामाजिक प्रतिष्ठा मिळत असली तरी आतां तशी परिस्थिती नाहीं. ह्या गोष्टीचा विषमतेविषयींच्या दृष्टिकोनावर काय परिणाम झाला

असेल तें उघड आहे. डामडौलानें खर्च केला कीं गरिबांचें लक्ष श्रीमंतांच्या वैभवाकडे वेधलें जात असे. कारण त्याच हेतूनें तो खर्च केलेला असे. पण हा डामडौल जेव्हां कमी झाला किंवा हलकेपणाचा समजला जाऊं लागला तेव्हां विपमतेचें भडक प्रदर्शन बंद झालें. श्रीमंतीचें प्रदर्शन अशा रितीनें कमी झाल्यावर, ती डोळ्यांत तितकी भरेनाशीं झाली आणि खुपेनाशीहि झाली. विपमता हा वादाचा विपय व्हायला श्रीमंत लोकानीं मदत केली होती. पण आतां तसें करण्याची त्यांची इच्छा नष्ट झाली होती.

अशाच प्रकारचे परिणाम आणखी एका गोष्टीमुळें झाले. ती अशी कीं श्रीमंत माणसानां आतां मानमान्यतेसाठीं स्पर्धा करावी लागत होती. एके काळीं विचारवंत राजकारणी किंवा कोणताहि महत्वाकांक्षी माणूस यानां असें आढळून यायचें कीं जिच्यासाठी आपल्याला धडपड करावी लागते ती मानमान्यता श्रीमंतानां मात्र विनासायास मिळते. ह्यामुळें ही माणसें एकंदर समाजातल्या असंतोपाला तोंड फोडत असत. पण आतां मानमान्यतेसाठीं श्रीमंतानां देखील स्पर्धा करावी लागते असें त्यानां आढळून आलें. ह्या स्पर्धेत यश मिळविण्यास श्रीमंतीमुळें मदत होत असे हें खरें. पण श्रीमंत माणूस नेहमींच वरचढ ठरावा असा प्रकार होत नसे. ह्यामुळें विपमतेवर हल्ला करणें हाच आपला व्यवसाय असें ठरविणाऱ्या माणसांची संख्या एकदम घटली. या बाबतींत दुसरी कोणतीहि गोष्ट इतकी परिणामकारक ठरली नसती. महत्वाकांक्षी माणसाला आतां व्यावसायिक चालकांच्या वर्गात स्थान मिळवणें शक्य झालें. आणि आधुनिक कॉर्पोरेशनमध्यें बढतीच्या पायऱ्या चढत जाऊन अखेर तिच्या संस्थापकाच्या नातवाशीं देखील स्पर्धा करणें—आणि ती देखील जवळ जवळ बरोबरीच्या नात्यानें—या महत्वाकांक्षी माणसाला शक्य असतें.

आपल्या समाजात श्रीमंतीमुळें काहीं खास फायदे मिळतच नाहींत असें म्हणणें चुकीचें ठरेल. अशीं विधानें करणें हा सांकेतिक शहाणपणाच्या क्षणजीवी आतपबाजीचा एक भाग असतो. आणि जे कोणी तीं करतात त्यानां समाजातले द्रष्टे म्हणून फार मोठी पण अल्पकाल टिकणारी मान्यता मिळते. ह्यावरूनच असें सूचित होतें कीं अपराधाची भावना धुवून काढण्याचा हा एक मार्ग आहे. पण एवढें मात्र खरें कीं जे उत्पादनाच्या कार्याचें संचालन करतात त्यानांच हल्लीं मुख्यत्वें करून सत्ता व प्रतिष्ठा यांचा लाभ होतो मग ते व्यक्तिशः श्रीमंत असोत वा नसोत. एखाद्या कॉर्पोरेशनमधला वरिष्ठ अधिकारी नेहमींच मानमान्यतेला पात्र ठरतो. उलट श्रीमंत माणसाला कोणीच विचारीत नाहीं असा प्रकार घडूं शकतो व अनेकदां घडतोहि.

[६]

आपण हें पाहिलेंच आहे कीं रिकार्डोनें कल्पिलेल्या आर्थिक जगात प्रगतीसाठीं नफ्याची आवश्यकता होती, आणि ह्या प्रगतीचीं फळें जमीनमालकांच्या पदरात पडत असत. आर्थिक प्रगतीमुळें म्हणजे वाढत्या उत्पादनामुळें सामान्य माणसाचा बहुधा काहीं फायदा होत नसे. रिकार्डोला व त्याच्या अनुयायानां ज्या विघातक वाटल्या असत्या अशा काहीं सुधारणा करणें किंवा सारी अर्थव्यवस्थाच उलथून पाडणें ह्या मार्गानींच त्याची परिस्थिती सुधारूं शकली असती. आज देखील बहुतेक नव्हे तरी पुष्कळ देशांत आर्थिक प्रगतीच्या द्वारें सामान्य माणसाची परिस्थिती सुधारण्याची शक्यता फार थोडी आहे. अँडिआमधल्या स्पॅनिश मळ्यात, अरवस्थानात, भारतात अगर चीनमध्यें अगदीं परवांपर्यंत अशी परिस्थिती होती कीं शेतांत राबणाऱ्यानां उत्पादन वाढावें अशी फारशी उत्सुकता नसे. कारण उत्पादनातला राबणाऱ्याचा हिस्सा फारच थोडा असे. आणि जेव्हां उत्पादनात होणारी जवळजवळ सगळीच वाढ दुसऱ्याच्या पदरात पडते तेव्हां ती वाढ होणें न होणें सारखेंच असतें. आणि परिस्थिती ह्याहून देखील वाईट असणें शक्य असतें. कारण उत्पादनाच्या विभागणी विषयींच्या नियमात एकदम बदल होऊं शकतात आणि त्यामुळें अगदीं किमान गरजा भागवून शिल्लक राहिलेलें सर्वच्या सर्व उत्पादन जमीनमालक, व्यापारी अगर सावकार यांच्या पदरात पडूं शकतें. रिकार्डोनें कल्पिलेली अर्थरचना अशीच होती. अशा अर्थरचनेत परिस्थिती सुधारण्याचा मार्ग एकच; आणि तो म्हणजे उत्पन्नाच्या विभागणीत बदल करणें. त्याच कारणामुळें जो पर्यंत सामान्य माणसांच्या पदरात उत्पादनाचा अधिक भाग पडत नाहीं तोंपर्यंत उत्पादन वाढविण्यांत—जमीन कसण्याच्या पद्धतीत सुधारणा करणें हा त्याचा एक मार्ग—त्याला जवळ जवळ काहींच रस वाटत नाहीं. तथाकथित मागासलेल्या देशातल्या लोकानां प्रगत देशातले त्याचे पुढारलेले हितकर्ते असा उपदेश करीत असतात कीं उत्पादनाच्या वाढीवरच सध्यां भर द्या आणि समाजात अस्वास्थ्य किंवा क्रांती करणाऱ्या सुधारणा सबुरीनें करा. हा सल्ला अगदींच गैरलागू ठरण्याचा संभव आहे. उत्पादनात वाढ होईपर्यंत समाजसुधारणेला काहीं थोपवून धरता येत नाहीं. प्रगतीच त्यावाचून अडून रहाणें शक्य असतें.

उलट प्रगत देशात उत्पादनात वाढ करणें हा संपत्तीच्या फेरविभागणीचा पर्याय असू शकतो. आणि विषमतेमुळें निर्माण झालेलें ताण सैल करण्याचें फार मोठें कार्य उत्पादनाच्या वाढीनें या देशांत केलेलें आहे. मग विषमता जरी शिल्लक राहिली तरी तिच्यामुळें निर्माण होणारा संघर्ष टळतो. त्यामुळें ज्या बाबतींत श्रीमंतांचें व गरिबांचें एकमत असतें व ज्यापासून दोघांचाही फायदा होतो अशा उत्पाद-

असेल तें उघड आहे. डामडौलानें खर्च केला कीं गरिबांचें लक्ष श्रीमंतांच्या वैभवाकडे वेधलें जात असे. कारण त्याच हेतूनें तो खर्च केलेला असे. पण हा डामडौल जेव्हां कमी झाला किंवा हलकेपणाचा समजला जाऊं लागला तेव्हां विषमतेचें भडक प्रदर्शन बंद झालें. श्रीमंतीचें प्रदर्शन अशा रितीनें कमी झाल्यावर, ती डोळ्यांत तितकी भरेनाशीं झाली आणि खुपेनाशीहि झाली. विषमता हा वादाचा विषय व्हायला श्रीमंत लोकानीं मदत केली होती. पण आतां तसें करण्याची त्यांची इच्छा नष्ट झाली होती.

अशाच प्रकारचे परिणाम आणखी एका गोष्टीमुळें झाले. ती अशी कीं श्रीमंत माणसानां आतां मानमान्यतेसाठीं स्पर्धा करावी लागत होती. एके काळीं विचारवंत राजकारणी किंवा कोणताहि महत्वाकांक्षी माणूस यानां असें आढळून यायचें कीं जिच्यासाठी आपल्याला धडपड करावी लागते ती मानमान्यता श्रीमंतानां मात्र विनासायास मिळते. ह्यामुळें ही माणसें एकंदर समाजातल्या असंतोषाला तोंड फोडत असत. पण आतां मानमान्यतेसाठीं श्रीमंतानां देखील स्पर्धा करावी लागते असें त्यानां आढळून आलें. ह्या स्पर्धेत यश मिळविण्यास श्रीमंतीमुळें मदत होत असे हें खरें. पण श्रीमंत माणूस नेहमींच वरचढ ठरावा असा प्रकार होत नसे. ह्यामुळें विषमतेवर हल्ला करणें हाच आपला व्यवसाय असें ठरविणाऱ्या माणसांची संख्या एकदम घटली. या बाबतींत दुसरी कोणतीहि गोष्ट इतकी परिणामकारक ठरली नसती. महत्वाकांक्षी माणसाला आतां व्यावसायिक चालकांच्या वर्गात स्थान मिळवणें शक्य झालें. आणि आधुनिक कॉर्पोरेशनमध्यें वढतीच्या पायऱ्या चढत जाऊन अखेर तिच्या संस्थापकाच्या नातवाशीं देखील स्पर्धा करणें—आणि ती देखील जवळ जवळ वरोवरीच्या नात्यानें—या महत्वाकांक्षी माणसाला शक्य असतें.

आपल्या समाजात श्रीमंतीमुळें काहीं खास फायदे मिळतच नाहींत असें म्हणणें चुकीचें ठरेल. अशीं विधानें करणें हा सांकेतिक शहाणपणाच्या क्षणजीवी आतषबाजीचा एक भाग असतो. आणि जे कोणी तीं करतात त्यानां समाजातले द्रष्टे म्हणून फार मोठी पण अल्पकाल टिकणारी मान्यता मिळते. ह्यावरूनच असें सूचित होतें कीं अपराधाची भावना धुवून काढण्याचा हा एक मार्ग आहे. पण एवढें मात्र खरें कीं जे उत्पादनाच्या कार्याचें संचालन करतात त्यानांच हल्लीं मुख्यत्वें करून सत्ता व प्रतिष्ठा यांचा लाभ होतो मग ते व्यक्तिशः श्रीमंत असोत वा नसोत. एखाद्या कॉर्पोरेशनमधला वरिष्ठ अधिकारी नेहमींच मानमान्यतेला पात्र ठरतो. उलट श्रीमंत माणसाला कोणीच विचारीत नाहीं असा प्रकार घडूं शकतो व अनेकदां घडतोहि.

[६]

आपण हें पाहिलेंच आहे कीं रिकार्डोनें कल्पिलेल्या आर्थिक जगात प्रगतीसाठीं नफ्याची आवश्यकता होती, आणि ह्या प्रगतीचीं फळें जमीनमालकांच्या पदरात पडत असत. आर्थिक प्रगतीमुळें म्हणजे वाढत्या उत्पादनामुळें सामान्य माणसाचा बहुधा काहीं फायदा होत नसे. रिकार्डोला व त्याच्या अनुयायानां ज्या विघातक वाटल्या असत्या अशा काहीं सुधारणा करणें किंवा सारी अर्थव्यवस्थाच उलथून पाडणें ह्या मार्गानींच त्याची परिस्थिती सुधारूं शकली असती. आज देखील बहुतेक नव्हे तरी पुष्कळ देशांत आर्थिक प्रगतीच्या द्वारें सामान्य माणसाची परिस्थिती सुधारण्याची शक्यता फार थोडी आहे. अँडिआमधल्या स्पॅनिश मळ्यात, अरबस्थानात, भारतात अगर चीनमध्यें अगदीं परवांपर्यंत अशी परिस्थिती होती कीं शेतांत राबणाऱ्यानां उत्पादन वाढावें अशी फारशी उत्सुकता नसे. कारण उत्पादनातला राबणाऱ्याचा हिस्सा फारच थोडा असे. आणि जेव्हां उत्पादनात होणारी जवळजवळ सगळीच वाढ दुसऱ्याच्या पदरात पडते तेव्हां ती वाढ होणें न होणें सारखेंच असतें. आणि परिस्थिती ह्याहून देखील वाईट असणें शक्य असतें. कारण उत्पादनाच्या विभागणी विषयींच्या नियमात एकदम बदल होऊं शकतात आणि त्यामुळें अगदीं किमान गरजा भागवून शिल्लक राहिलेलें सर्वच्या सर्व उत्पादन जमीनमालक, व्यापारी अगर सावकार यांच्या पदरात पडूं शकतें. रिकार्डोनें कल्पिलेली अर्थरचना अशीच होती. अशा अर्थरचनेत परिस्थिती सुधारण्याचा मार्ग एकच; आणि तो म्हणजे उत्पन्नाच्या विभागणीत बदल करणें. त्याच कारणामुळें जो पर्यंत सामान्य माणसांच्या पदरात उत्पादनाचा अधिक भाग पडत नाहीं तोंपर्यंत उत्पादन वाढविण्यांत—जमीन कसण्याच्या पद्धतीत सुधारणा करणें हा त्याचा एक मार्ग—त्याला जवळ जवळ काहींच रस वाटत नाहीं. तथाकथित मागासलेल्या देशातल्या लोकानां प्रगत देशातले त्याचे पुढारलेले हितकर्ते असा उपदेश करीत असतात कीं उत्पादनाच्या वाढीवरच सध्यां भर द्या आणि समाजात अस्वास्थ्य किंवा क्रांती करणाऱ्या सुधारणा सबुरीनें करा. हा सल्ला अगदींच गैरलागू ठरण्याचा संभव आहे. उत्पादनात वाढ होईपर्यंत समाजसुधारणेला काहीं थोपवून धरता येत नाहीं. प्रगतीच त्यावाचून अडून रहाणें शक्य असतें.

उलट प्रगत देशात उत्पादनात वाढ करणें हा संपत्तीच्या फेरविभागणीचा पर्याय असू शकतो. आणि विषमतेमुळें निर्माण झालेलें ताण सैल करण्याचें फार मोठें कार्य उत्पादनाच्या वाढीनें या देशांत केलेलें आहे. मग विषमता जरी शिल्लक राहिली तरी तिच्यामुळें निर्माण होणारा संघर्ष टळतो. त्यामुळें ज्या बाबतींत श्रीमंतांचें व गरिबांचें एकमत असतें व ज्यापासून दोघांचाही फायदा होतो अशा उत्पाद-

नाच्या वाढीवरच भर देणें अधिक बरें वाटतें.

संपत्तीच्या फेरवाटणीमुळें ज्यांचें नुकसान होण्याची शक्यता असते त्यांना हें उत्पादनवाढीचें तत्व दैवी संदेशाप्रमाणें वाटावें यात काहीं नवल नाहीं. युनायटेड स्टेट्समधले अर्थशास्त्रज्ञ व उद्योगपती आज अनेक वर्षें एकमेकानां वोचकारण्यात गुंतलेले आहेत. माफक आयातकर, प्राप्तिकर, मक्तेदारीविरोधी कायदे व कामगार संघटना या गोष्टीना अर्थशास्त्रज्ञ अनुकूल आहेत. ह्यामुळें ते दुसरें काहीं नाहीं तरी निदान गैरसोयीचे स्नेही (कारखानदारांचे) ठरले आहेत. पण अधिक समते ऐवजीं वाढतें उत्पादन चालेल ह्या भूमिकेवर या दोन्हीं वर्गांत आतां समझौता होतो आहे. 'रुपये-आणे-पैच्या हिशोबानें पाहिलें तर असें स्पष्ट दिसतें कीं विषमतेमुळें नाडलेल्यांचा देखील उत्पादनाच्या कोणत्याहि फेरविभागणीमुळें जेवढा फायदा होईल त्याहून अधिक फायदा दीर्घ कालावधींत उत्पादनांतील जलद वाढीमुळें होईल.'[१]

इतर कांहीं जणांची प्रतिक्रिया अधिक संशयपूर्ण आहे. गेलीं अनेक शतकें श्रीमंतानीं आपल्या वैभवाचें समर्थन करण्यासाठीं अनेक अत्यंत चतुर व आकर्षक युक्तिवादांचा अवलंब केलेला आहे. त्यामुळें ह्या युक्तिवादांकडे कांहींसें अविश्वासानें पहायचें अशी उदारमतवादी मंडळींची प्रवृत्ती असते. पण ह्या बाबतींत तरी वस्तुस्थिती अगदी स्पष्ट आहे. अलीकडच्या कांहीं दशकांत सामान्य माणसाला जी अधिकाधिक सुस्थिती प्राप्त झाली आहे ती उत्पादनांतल्या वाढीमुळें, उत्पन्नाच्या फेरवाटणीमुळें नव्हे.[२] आणि अविश्वास दाखवीत, दाखवीत अखेर उदारमतवाद्यांनीं

---

१ 'लर्निंग टु मल्टिप्लाय ॲण्ड डिव्हाइड.' जानेवारीं १५, १९५७ रोजीं युनायटेड स्टेटस् स्टील कॉर्पोरेशनच्या चालक मंडळाचें अध्यक्ष रॉजर-एम्. ब्लाऊ यानीं जे व्याख्यान दिलें त्यांत हेन्री-सी. वॅलिच या येल युनिव्हर्सिटीतल्या प्राध्यापकांच्या लेखनातला हा उतारा त्यानीं उद्धृत केला.

२ १९०० ते १९०९ या दशकांत रोजगारी करणाऱ्या कामगारवर्गाला एकंदर उत्पन्नाचा ५५ टक्के भाग मिळाला. १९३०-३९ या दशकात तो हिस्सा ६७ टक्यांवर गेला आणि तेव्हांपासून स्थूलमानानें तो तेवढाच राहिला आहे. या दोहोंपैकीं पहिल्या दशकांत त्यानां ५५ टक्यांऐवजीं ६७ टक्के हिस्सा मिळाला असता तर त्यांचें उत्पन्न फारसें वाढलें नसतें. उलट आजच्या उत्पन्नाचा जरी त्यानां ५५ टक्के हिस्सा मिळाला तरी त्यांचें उत्पन्न १९००-१९०९ या दशकातील उत्पन्नापेक्षां कितीतरी अधिक भरेल. ही आंकडेवारी रिव्हयू ऑफ इकॉनॉमिक स्टडिज, खंड ३६ (मे १९५४) या नियतकालिकातील 'द फंक्शनल डिस्ट्रिब्युशन ऑफ इन्कम इन द युनायटेड स्टेटस्' या गेल जॉन्सन यांच्या लेखावरून घेतलेली आहे. आंकडेवारी ठोकळ स्वरूपाची आहे.

ही गोष्ट मान्य केली आहे. ह्यामुळें विकास पावणाऱ्या अर्थव्यवस्थेचें उद्दिष्ट आतां अमेरिकेंतील डाव्या गटाच्या सांकेतिक शहाणपणांत देखील दृढमूल झालें आहे. शिवाय अशा विकास पावणाऱ्या अर्थव्यवस्थेपासून सर्वांगीण आर्थिक फायदे होतील असें आतां मानलें जातें. सामान्य माणसाची स्थिती तर या विकासक्षम अर्थव्यवस्थेंत सुधारेलच पण दारिद्र्य व ओढघस्त ह्या गोष्टी सर्वांच्याच जीवनांतून हद्दपार होतील. हा पुढचा निष्कर्ष विवाद्य आहे. एकंदर उत्पादनांत वाढ होत असतांना देखील उत्पन्नाच्या पिरॅमिडच्या बुडाशीं दारिद्र्याचा एक थर कायम रहातो. ह्या थरांकडे कोणाचें फारसें लक्ष जात नाहीं. कारण ह्या थरातली माणसें अल्पसंख्य व मूक असतात. आणि उदारमतवाद्यांची अपेक्षा तर अशी असते कीं गरिबानीं बहुसंख्याकांना साजेशा दणकेबाज आवाजांत बोलावें. ह्या प्रश्नाकडे आपल्याला पुढें पुन्हां एकदा वळावें लागणार आहे.

सध्यां आपण इतकीच नोंद घ्यायला हवी कीं आर्थिक व सामाजिक उद्दिष्ट या नात्यानें विषमतेच्या उच्चाटनाचें महत्व कमी होत चाललें आहे आणि ह्या गोष्टीचा पडसाद सांकेतिक शहाणपणांत उमटला आहे. या घटणानां महत्वांचीं कारणें अनेक आहेत पण एक ना एक प्रकारें त्या सर्वांचा संबंध वाढत्या उत्पादनाशीं आहे. आणि वाढतें उत्पादन हा उत्पादनाचीं फेरवाटणी अगर विषमता कमी करणें या गोष्टीनां असलेला पर्याय आहे हें परंपरानिष्ठ व उदारमतवादी या दोघानांही स्पष्ट झालेलें आहे. अशा रितीनें सर्वांत जुना व खळबळजनक सामाजिक प्रश्न जरी मिटला नसला तरी बहुतांशीं थंडावला आहे आणि त्या प्रश्नावरून भांडणाऱ्या प्रतिस्पर्ध्यांनीं उत्पादनाच्या वाढीवर आपलें लक्ष केंद्रित केलें आहे हा बदल दूरगामी महत्वाचा आहे. आधुनिक कालात उत्पादनाला आपण इतकें महत्व द्यावें ही गोष्ट आपल्या परीनें तर अपुर्वाईचीं आहेच. पण त्या घटनेचा आणखी एक परिणाम असा झाला आहे कीं उत्पन्नाचा कोणाला अधिक आणि कोणाला कमी हिस्सा मिळावा याबाबत झगडा करणाऱ्यानां बाजूला सारून आर्थिक जावनातलें मध्यवर्ती स्थान स्वतःकडे घेतलें आहे.

प्रकरण आठवें

आर्थिक सुरक्षितता

आर्थिक सुरक्षिततेच्या प्रश्नावद्दल जितके गैरसमज झाले तितके आर्थिक जीवनाशीं संलग्न असलेल्या फार थोड्या गोष्टींवद्दल झाले असतील. आणि हे गैरसमज अजूनही पुष्कळसे कायम आहेत.

स्पर्धानिष्ठ समाजात असुरक्षितता अपरिहार्य असे. कोणत्याहि विशिष्ट उत्पादकाची अगर कामगाराची स्थिती तेथें केव्हांहि खालावूं शके. आळशीपणामुळें किंवा नालायकीमुळें त्यांचें गिऱ्हाईक तुटे किंवा नोकरी जाई आणि त्यामुळें कदाचित् असा प्रसंग ओढवे. पण ग्राहकांच्या आवडीनिवडीत एकाएकीं बदल झाल्यामुळें अगर काम देणाऱ्या धन्याच्या नालायकीमुळें एखाद्यावेळीं अत्यंत कार्यक्षम माणसांवर देखील असा प्रसंग ओढवूं शकत असे. आर्थिक स्थितीतले हे अकल्पित बदल जसे अपरिहार्य असत तसेच उपयुक्तहि असत. या बदलांमुळें ती अर्थव्यवस्था बदलत्या परिस्थितीशीं मिळवून घेऊं शकत असे आणि म्हणून ते अपरिहार्य होते. लोकांच्या गरजां व आवडीनिवडी जशा बदलत त्यानुसार माणसें जुन्या ठिकाणीं कामावरून कमी केलीं जात असत व नव्या ठिकाणीं त्यांना काम मिळत असे. नवे उद्योग भांडवलांची मागणी करीत आणि जुनें उद्योग तें नुकसानखातीं घालीत. ही असुरक्षितता उपयुक्त होती, कारण ती चालकवर्ग, कामगार व स्वतंत्रपणें धंदा करणारा वर्ग या सर्वांनांच नेटानें व क्षमतेनें काम करायची प्रेरणा देत असे. कारण जे तसें करीत नसत त्यानां रागलोभाविना कडक शासन भोगावें लागत असे.

मात्र ही असुरक्षितता जरी तत्वतः मोलाची वाटत असली, तरीं तिचें महत्व वाटत असे तें बहुधा दुसऱ्यांच्या पुरतें किंवा केवळ तात्विक पातळीवर. दुसऱ्यांनीं किंवा एकंदर जनतेनें श्रम करावे म्हणून तिची निकडीची गरज भासत असे. आपल्यासाठीं देखील ती आवश्यक आहे असें क्वचितच वाटत असे. स्पर्धा व किंमतींचे चढउतार यांमुळें उद्योगधंद्यांतील अर्थसंस्थांच्या व्यवहारांत अनिश्चितता निर्माण होते. पण ह्या गोष्टींवर निर्बंध घातल्याबद्दल जर मुख्यतः कोणी खेद व्यक्त केला असेल तर कायमच्या नोकऱ्या असलेल्या विश्वविद्यालयातील प्राध्यापकानीं. उपयुक्त विचारमंथन सतत करायचें असेल तर त्यानां अशा कायम नोकऱ्या असणें आवश्यक आहे असें मानलें जातें. जेथें पेन्शनची चांगली व्यवस्था नाहीं अगर नोकरीची

शाश्वती नाहीं अशा कंपन्यांत नोकऱ्या करायला उद्योगधंद्यातला जो चालकवर्ग तयार नसतो त्याच वर्गाला कामगारानीं रोजगारीबाबतच्या विम्यांची अगर वार्धक्यवेतनांची मागणी केली तर तें दुबळेपणाचें व अधोगतीचें लक्षण वाटतें. ज्यांच्या मालाच्या किंमती कित्येक वर्षें स्थिर आहेत असे उद्योगक्षेत्रातले योजक अनिर्बंध किंमतयंत्रणेशीं इमान न राखल्याबद्दल शेतकऱ्यानां नावें ठेवत असतात.

परंपरानिष्ठांचें सांकेतिक शहाणपण नेहमीं अशा जाहिराती फडकावीत असतें कीं सुरक्षिततेचा आधुनिक हव्यास हा आर्थिक प्रगतीच्या मार्गातला सर्वात मोठा अडथळा आहे. आणि जेव्हां सामाजिक सुरक्षिततेच्या योजनांची प्रगती व आर्थिक प्रगती या दोन्हीं गोष्टी मोठ्या प्रमाणावर व बरोबरीनें होत होत्या त्यांच वेळीं ह्या जाहिराती विशेष जोरानें फडकत होत्या. उलट उदारमतवाद्याना असें वाटतें कीं जनतेला जास्तीत जास्त आवडतील अशा सामाजिक सुरक्षिततेच्या योजना आपल्याला आखता आल्या तर त्यामुळें समाजाचीहि फार मोठी प्रगती होईल व आपल्याला हि राजकीय यश मिळेल. युनायटेड स्टेट्समधले उदारमतवादी जेव्हां नव्या कल्पनाच्या दुर्भिक्षाबद्दल खेद व्यक्त करतात तेव्हां तो खेद मुख्यतः नव्या व राजकीय दृष्ट्या आकर्षक अशा सामाजिक सुरक्षिततेच्या योजनांच्या अभावाबद्दल असतो. परंपरानिष्ठ यामुळें फार अस्वस्थ होतात. कारण आर्थिक असुरक्षिततेपासून व्यक्तीचा बचाव करूं पहाणाऱ्या असंख्य योजनांचें पेंव केव्हांहि फुटेल असें त्यानां वाटत असतें. पण खरें म्हणजे गेल्या कित्येक वर्षांत खऱ्या अर्थानें नव्या अशा फारच थोड्या योजना पुढे आलेल्या आहेत.

[२]

ह्या गोंधळातून मार्ग काढायचा तर पहिल्यानें हें मान्य केलें पाहिजे कीं मध्यवर्ती परंपरेनें कल्पिलेल्या अर्थव्यवस्थेचा असुरक्षितता हा जरी आवश्यक भाग असला तरी प्रत्यक्षांत ती सर्वानांच नकोशी वाटते. आणि ज्यानां ज्यानां म्हणून असुरक्षिततेला तोंड द्यावें लागत होतें. त्या सर्वांनीं ती आपल्या पुरती नष्ट करण्याचा प्रयत्न सुरू केला. यासाठीं त्यानीं अगदीं भिन्न भिन्न मार्गाचा अवलंब केला. त्यामुळें आपण योजिलेली उपाययोजना तेवढी आवश्यक आणि इतरानीं योजिलेली तेवढी अन्यायकारक असें प्रत्येकाला वाटत राहिले. आणि प्रत्यक्षात जरी असुरक्षितता नष्ट करण्यांत आली तरी सांकेतिक शहाणपणाच्या तात्विक बैठकीचा मूळाधार म्हणून मात्र तिचें स्थान जवळ जवळ कायम राहिले आणि ती अत्यावश्यक आहे असेंच लोकानां वाटत राहिलें. असें व्हावें याचें आतां तरी कोणाला आश्चर्य वाटूं नये.

आर्थिक असुरक्षितता नष्ट करण्यास प्रारंभ जर कोणी केला असेल तर तो उद्योगधंद्यातील पेढ्यांनीं. स्पर्धा व तिच्यावर आधारलेल्या बाजारांतील किंमतींचे स्वैर व अतर्क्य चढउतार यामुळेंच मुख्यतः असुरक्षितता निर्माण होत होती हें आपण पाहिलेंच आहे. आणि भांडवलशाही अर्थव्यवस्थेच्या प्रारंभकालापासून उद्योगधंद्यांच्या चालकानीं ही असुरक्षितता नष्ट वा कमी करण्याचा प्रयत्न चालवला आहे. मालाच्या पुरवठ्याचें व त्याद्वारें किंमतीचें एका पेढीनें पूर्णपणें नियंत्रण करणें म्हणजेच मक्तेदारी प्रस्थापित करणें हा सुरक्षिततेच्या मार्गावरचा अंतिम टप्पा होता. पण या मार्गाच्या अर्ध्या वाटेवर देखील रहाण्याजोगीं अनेक घरें होतीं. किंमती व उत्पादन या बाबतचे करार किंवा एकमुखी विक्रीसंस्थेची स्थापना, किंमतीचें कायद्याच्या द्वारें नियंत्रण, नव्या पेढ्यांच्या शिरकावावर नियंत्रण, आयतकर किंवा मर्यादित आयात यांच्या द्वारें स्वतःचें संरक्षण आणि असेच इतर मार्ग चोखाळून स्पर्धानिष्ठ अर्थव्यवस्थातील अपरिहार्य असुरक्षितता कमी करण्यात आली. शिवाय एखाद्या धंद्यातल्या पेढ्यांची संख्या जेव्हां थोडी असते तेव्हां आपण एकमेकांवर अवलंबून आहों हें त्या मान्य करतात आणि त्यामुळें सर्वांचीच असुरक्षितता वाढेल असें किंमत विषयक धोरण निर्धारानें टाळतात.

ह्या गोष्टी आज अनेक वर्षें आज अनेकानीं आपल्या निदर्शनास आणलेल्या आहेत. ह्या सर्व उपयांचें लक्ष्य जर काय असेल तर तें म्हणजे किंमतींचें नियंत्रण. कारण अनिश्चिततेचें मूळ पुष्कळसें किंमतींत असतें. पण त्यामुळें अर्थशास्त्रज्ञांचा असा समज झाला कीं किंमतींचें नियमन हीच या संदर्भांत विशेष महत्वाची गोष्ट आहे. आणि त्या ह्या नियमनाचा संबंध नफ्याच्या कमाल वाढीशीं जितका जोडला तितका अनिश्चिततेच्या संकोचाशीं जोडला नाहीं. अर्थशास्त्रज्ञानां जर कोणत्या समंधाची भीती वाटत असेल तर ती समाजाकडून बेसुसार नफा लाटणाऱ्या मक्तेदाराची. स्पर्धानिष्ठ अर्थव्यवस्थेतील धोक्यापासून स्वतःचें संरक्षण करूं पाहणारा उद्योगधंद्यांतला योजक हें पात्र तितकें नाट्यपूर्ण वाटत नाहीं आणि त्यामुळें त्याच्याकडे तितकेसें लक्षहि देण्यात आलें नाहीं. ही गोष्ट खेदजनक आहे. कारण आधुनिक उद्योगधंद्यांचें स्वरूप जर समजूत घ्यायचें असेल तर अनिश्चितता कमी करण्याचा सर्वांगीण प्रयत्न या नात्यानें त्याच्याकडे पहायला हवें. अन्य कोणत्याहि दृष्टिकोनातून त्याचें स्वरूप समजूंच शकणार नाहीं असें म्हटलें तर ती अतिशयोक्ती होणार नाहीं.

प्राचीन कालापासून उद्योगधंद्यांना ज्या ज्या म्हणून महत्वाच्या धोक्यानां (एक अपवाद सोडून) तोंड द्यावें लागलें आहे ते सर्व सौम्य करणें किंवा नष्ट करणें आजच्या मोठ्या कार्पोरेशनला शक्य आहे. ग्राहकांच्या आवडीनिवडी व मागणी यांत

बदल होऊं शकता. त्यापासून आधुनिक मोठी कार्पोरेशन जाहिरातीच्या द्वारें स्वतःचें संरक्षण करते. त्या मार्गानें लोकांच्या आवडीनिवडीचें अंशतः तरी नियंत्रण करता येतें. शिवाय धंदा मोठ्या प्रमाणावर असला कीं विविध प्रकारचें उत्पादन करता येतें. त्यामुळें अधिक संरक्षण मिळते. एखाद्या प्रकारचा माल किंवा एखादी उत्पादन पद्धती तांत्रिक प्रगतीमुळें निरुपयोगी पडण्याची शक्यता असते. पण संशोधन व तांत्रिक साधनसामुग्री यांच्याद्वारें आधुनिक कॉर्पोरेशन बदलत्या जगात आपण मागे पडणार नाहीं अशी खबरदारी घेऊं शकते. त्यामुळें तांत्रिक प्रगती त्या कार्पोरेशनच्या द्वारें तरी होते किंवा त्या प्रगतीचा उपयोग करून घेणें तिच्या आवाक्यात असतें. किंमतींचें काहीं प्रमाणात नियमन करता आलें कीं नफ्याचेंहि करता येतें. यामुळें भांडवलासाठीं भांडवलबाजारांवर तितकेसें अवलंबून रहावें लागत नाहीं. शिवाय धंद्याचा व्याप मोठा असला कीं भांडवल उभें करण्याचे अनेक मार्ग त्या कार्पोरेशनला उपलब्ध होतात. इतकेंच नव्हे तर वरिष्ठ चालकांची निवड करतानां ज्या चुका होण्याचा धोका असतो त्या चुका देखील मोठ्या कार्पोरेशनला अंशतः टाळता येतात. कारण वैयक्तिक नियंत्रणाची जागा संघटना घेते. आणि त्यामुळें कार्पोरेशनचें फारसें नुकसान करण्याइतका अधिकार कोणत्याच व्यक्तीच्या हातीं नसतो. तसें नसतें तर मोठ्या कॉर्पोरेशनांच्या अधिकाऱ्यांची निवृत्ती, मृत्यू अगर नव्या नेमणुका ह्या गोष्टींकडे शेअर बाजारानें बारकाईनें लक्ष दिलें असतें. पण ह्या गोष्टींकडे दुर्लक्ष करून संघटना ही व्यक्तींवर अवलंबून नसते या तत्वाला शेअर बाजार अप्रत्यक्षपणें मान्यता देतो.[1]

आधुनिक कॉर्पोरेशनच्या विकासामुळें धंद्यांतले धोके किती प्रचंड प्रमाणात कमी झाले आहेत ह्याची पुरेशी दखल घेण्यांत आलेली नाहीं. ह्याचें एक कारण असें कीं कामगार, शेतकरी किंवा एखादा नागरिक यानां जी गोष्ट साधलेली नाहीं ती कार्पोरेशनानां साधली आहे. सरकारचें सहाय्य प्रच्छन्नपणें न घेतां त्यानीं आपली असुरक्षितता कमी केली आहे. त्यासाठीं बारकाईनें उभारलेल्या संघटनेची आवश्यकता होती. पण मूळ व्यक्तिनिष्ठ पेढीतून तिचाक्रमानें विकास झाला आहे. उलट असुरक्षितता कमी करण्यासाठीं शेतकरी, कामगार व अन्य नागरिक यानां सरकारचें सहाय्य मागावें लागलें आहे किंवा त्यासाठीं खास संघटना (उदाहरणार्थ कामगार संघटना) निर्माण कराव्या लागल्या आहेत. त्यामुळें अधिक सुरक्षितता मिळविण्यासाठीं ह्या इतरानीं जो प्रयत्न केला तो लोकांच्या डोळ्यांत खुपला क्षाहे. उलट कार्पोरेशनांच्या चालकवर्गानें जरी असुरक्षितेपासून मुक्त होण्याच्या प्रयत्नानां प्रारंभ

[1] कॉर्पोरेशन व तिचें व्यक्तिमत्व या विषयांवर मी एक पुस्तक लिहिण्याचें योजलें आहे. त्यांत या गोष्टीचें अधिक तपशीलवार विवेचन करण्याचा माझा इरादा आहे.

केला असला तरी ते मात्र असा समज करून घेऊं शकतात, कीं सुरक्षिततेसाठीं फक्त कामगार व शेतकरीच धडपडत असतात.

असुरक्षितता शक्य तितकी कमी करण्याच्या आधुनिक कॉर्पोरेशनच्या प्रयत्नांवर पांघरूण घालण्यास साहसी उद्योगपतींविषयींच्या कल्पनारम्य कथांची देखील मदत झाली आहे. अगदीं मोठ्यांत मोठ्या कॉर्पोरेशनांच्या चालकांची देखील अशी ठाम कल्पना असते कीं आपण नेहमीं मोठाले धोके पत्करत असतो. पण हा मजकूर लिहीतानांची परिस्थिती अशी आहे की गेल्या अनेक वर्षांत युनायटेड स्टेटस्मधील कोणत्याहि मोठ्या कॉर्पोरेशननें दिवाळें वाजवलें नाहीं किंवा तिला तशा स्वरूपाच्या गंभीर धोक्यालाहि तोंड द्यावें लागलेलें नाहीं. कॉर्पोरेशनाच्या चालकवर्गाच्या नोकऱ्या अगदीं कायम स्वरूपाच्या असतात. आणि त्यांचें वेतन देखील कमीजास्त होत नाहीं. स्पर्धानिष्ठ अर्थव्यवस्थेच्या कल्पित चित्रांतल्या योजकांची अनिश्चिततापूर्ण स्थिती आणि या चालकवर्गाची स्थिती या दोहोंत काहींच साम्य आढळत नाहीं. कॉर्पोरेशनाच्या चालकांचे विशिष्ट निर्णय चूक ठरण्याची आजहि शक्यता आहे. पण आजच्या मोठ्या, अनेक प्रकारचे व्यवहार करणाऱ्या कॉर्पोरेशनच्या बाबतींत असल्या चुका क्वचित विघातक ठरतात. छोट्या व विशिष्ट प्रकारचेच व्यवहार करणाऱ्या पेढ्यांची स्थिती मात्र अशी नसते.

आधुनिक कॉर्पोरेशन्सच्या व्यवहारांत धोक्याचे मोठाले खांचखळगे असतात असें त्यांचा चालकवर्ग मुठी हापटून जगाला सांगत असतो हें खरें. पण ती केवळ एक निरुपद्रवी आणि पोकळ वढाई असते. आधुनिक कॉर्पोरेशनचा चालक अगदीं काळजीपूर्वक आणि व्यवस्थितपणें आपले व्यवहार करीत असतो आणि म्हणूनच कीं काय आर्थिक वाङ्मयातला साहसी उद्योगपती तो आपणच अशी तो स्वत:ची समजूत करून घेतो. आणि ह्याच कारणामुळें आरामशीर ट्रेलरमधून प्रवास करणारा आणि पेट्रोलच्या पुरवठ्याची तरदूत करण्यांत गुंतलेला आधुनिक चिलखती तुकडीचा सेनानायक देखील आपण जुन्या काळच्या घोडदलाचें नेतृत्व करीत आहोत असा गोड गैरसमज करून घेतो. एकेकाळीं उद्योगपतीला ज्या धोक्यानां तोंड द्यावें लागत असे ते धोके नष्ट करणें हा जनरल मोटर्स किंवा जनरल इलेक्ट्रिक यांसारख्या वड्या कॉर्पोरेशन्सचा मुख्य उद्देश असतो. या कॉर्पोरेशन्सच्या एखाद्या चालकानें जर मालाचा उठाव कितपत होईल याची चांचणी न करतां एखादी नवी वस्तु विक्रीला काढली, तांत्रिक विकासाबाबत जर अज्ञानामुळें त्याची फसगत झाली, कच्च्या मालाच्या पुरवठ्याबाबत जर त्यानें व्यवस्थित बंदोबस्त केला नसला किंवा किमतींच्या बाबतींत जर त्यानें मूर्खपणाची चढाओढ केली, सारांश सर्व प्रकारचें धोके टाळण्याचा जर त्यानें जास्तीत जास्त प्रयत्न केला नाहीं तर त्याच्यावर नालायकीचा मात्र मोठा

अ.क्र. ५५५८९ दि: निरांक्षत
दा. क्र. ४३८७
दि. ३.१९.२ दो: दि: २४/३८७

शिक्का बसेल. पण एकेकाळीं उद्योगपतीला असल्या धोक्यांना नित्य तोंड द्यावे लागत असे.

धोके टाळून सुरक्षिततेच्या तटबंदीच्या आड आश्रय घेण्यात मोठ्या कॉर्पोरेशन्सनी पुढाकार घेतला असला तरी जवळ जवळ इतर सर्वांनींच त्यांचा कित्ता गिरवला. विसाव्या शतकाच्या तिसऱ्या दशकांत सामान्य माणसावर ओढवणाऱ्या आर्थिक अरिष्टांची तीव्रता कमी करण्याचा विशेष व्यापक प्रयत्न करण्यात आला त्यावेळीं प्रथमच मध्यवर्ती सरकारनें आर्थिक अरिष्टापासून व्यक्तीचें संरक्षण करण्यासाठीं आर्थिक सहाय्य देऊं केलें. नंतर बेकारीबाबत विमायोजना, वृद्ध माणसें व निराधार कुटुंबीय यांसाठीं निवृत्ती वेतन इत्यादींच्या द्वारें सामाजिक सुरक्षितता प्रस्थापित केली जाऊं लागली. खुल्या बाजारातील किंमतींच्या अस्थिरतेपासून शेतकऱ्याचें संरक्षण करण्यासाठीं त्यानां सरकार आर्थिक सहाय्य करूं लागलें व किंमतीनां आर्थिक आधार देऊं लागलें. या दशकात कामगार संघटनांची वेगानें प्रगती झाली. त्यानीं कामगारांचें आपल्या मागण्या मान्य करून घेण्याचें सामर्थ्य तर वाढवलेच. शिवाय त्यानीं केवळ लहरीनुसार अगर आकस्मिकरित्या बडतर्फ करणें अगर खालच्या श्रेणींत ढकलणें या गोष्टीना आळा घातला व कामगाराची रोजगारी अधिक सुरक्षित केली. लहान कारखानदाराला देखील रॉबिन्सन-पॅटमन ॲक्ट, फेअर ट्रेड (रास्त पद्धतीनें व्यवहार व्हावे अशी तरतुद करणारे) कायदे, स्वउत्पादनखर्चाहून कमी किंमतीला माल विकण्यास प्रतिबंध करणारे कायदे, व्यावसायिक संघटना इत्यादींच्या द्वारें संरक्षण मिळालें. कारण इतरांप्रमाणेंच त्यालाहि खुल्या बाजारांतील स्पर्धेमुळें निर्माण होणारी अनिश्चितता नकोच होती.

वर निर्देशिलेल्या उपाययोजना विशिष्टस्पर्शी (micro-economic) होत्या. विशिष्ट व्यक्ती, पेढी अगर गट यांचें विशिष्ट आपत्तीपासून संरक्षण करणें हा त्यांचा उद्देश होता परंतु असुरक्षिततेचें परिणामकारकरित्या निराकरण करण्यासाठीं आणखीं व्यापक स्वारूपाची उपाययोजना करणें आवश्यक होतें. अग्रक्रम व्यवस्थित आंखून दिल्यामुळें एखाद्या कामगाराला अन्यायपूर्वक बडतर्फ करण्यात येणार नाहीं हें खरें. परंतु मालाला अपुरी मागणी असल्यामुळें जर त्याला अगदीं न्यायपूर्वक सोडचिठ्ठी देण्यांत आली तर त्याची परिस्थिती समाधानकारक आहे असें मुळींच म्हणता येणार नाहीं. आणि मागणींचा एकंदरीतच तुटवडा असल्यामुळें जर त्याला अन्यत्र रोजगारी मिळणेंहि अशक्य झालें तर त्याची परिस्थिती अधिकच बिकट होईल. अगदींच काहीं न मिळण्यापेक्षां बेकारीचा भत्ता मिळणें बरें असलें तरी रोजगारी चालू असणें त्याहीपेक्षां चांगलें असतें. आपला मोठ्या आकाराचा फायदा घेऊन

एखादा कारखाना माल विकत घेतानां किंमती पाडू शकतो आणि आपला तयार मालहि कमी किंमतीला विकूं शकतो. त्याच्या छोट्या स्पर्धकानां तसें करणें शक्य नसतें आणि त्यामुळें स्पर्धेत त्यांची पिछेहाट होते. आतां दुहेरी किंमतीनां वंदी करणाऱ्या कायद्याची योग्य अंमलबजावणी केली तर या छोट्या स्पर्धकानां संरक्षण मिळेल हें खरें. पण सार्वजनिक मंदी येऊन मागणी घटली तर पुन्हां या छोट्या स्पर्धकानां चढाओढीत तग धरणें कठीण होतें. अशा वेळीं सर्वांच्याच मालाला मागणी चांगली असली तर तें अधिक वरें असतें. मग चढाओढ कोणत्याहि स्वरूपाची असो. शेतमालाच्या किंमतीं अचानक घसरल्या तर त्यावर आधारभूत किंमतींचा तोडगा उपयुक्त असतो. पण मालाला मागणी चांगली असावी व बाजारातल्या किंमती आधारभूत किंमतीहून अधिक असाव्या हेंच कोणाहि सूज्ञ शेतकऱ्याला अधिक इष्ट वाटेल.

विसाव्या शतकाच्या तिशींत सुरक्षितता वाढविण्यासाठीं विशिष्टस्पर्शी आर्थिक उपाययोजना करण्याकडे विशेष लक्ष पुरविलें जात होतें. अशा वेळीं अधिक परिणामकारक अशी सर्वस्पर्शी आर्थिक उपाययोजना देखील त्याच उद्देशानें केली जावी हें साहजिक होतें. ह्या दोन्हीं उपाययोजना परस्परपूरक होत्या. खरें म्हणजे सर्वस्पर्शी आर्थिक उपायांनीं असुरक्षितता कमी करणें या गोष्टीलाच तत्कालीन आर्थिक धोरणात मध्यवर्ती स्थान होतें. अर्थचक्राला पायबंद घालणें आणि साधारणपणें सर्वांनां रोजगारी मिळेल अशा पातळीवर अर्थव्यस्था स्थिर करणें हें तत्कालीन सरकारी धोरणाचें प्रमुख उद्दिष्ट होतें. त्यावेळीं आणि नंतरहि आर्थिक स्थैर्य हें एक स्वयंपूर्ण उद्दिष्ट मानले जात होतें. परंतु जी असुरक्षितता आर्थिक जीवनाचा अंगभूत भाग आहे असें मानलें जात होतें ती दूर करणाऱ्या सर्वांगीण प्रयत्नाचा तें उद्दिष्ट हा एक भाग होता. सर्वांगीण आर्थिक सुरक्षिततेबद्दलच्या भूमिकेत विसाव्या शतकाच्या तिशींत फार मोठें परिवर्तन झालें. त्या दशकाच्या सुरुवातीस असें मानलें जात होतें कीं अर्थचक्रामुळें होणारे चढउतार आणि त्यांतून उद्भवणारी रोजगारी व किंमती यावावतची असुरक्षितता या गोष्टी अपरिहार्य आहेत. त्या गोष्टी विक्राळ स्वरूप धारण करणार नाहींत अशी अनेकानां आशा वाटत होती हें खरें. परंतु सरकारी उपाययोजनेनें मंदीच्या संकटाचें निवारण करतां येईल आणि तसें करण्याच्या प्रयत्नात परिस्थिती अधिकच बिघडणार नाहीं किंवा तिच्यात आपोआप होणारी सुधारणा बंद पडणार नाहीं असा विश्वास मात्र फार करून कोणाला वाटत नव्हता. पण केन्सचे आर्थिक सिद्धान्त आणि न्यू डीलच्या धोरणामुळें निर्माण झालेली उत्साहपूर्ण व प्रयत्नशील मनोवृत्ती यामुळें मंदीचें संकट टाळणें अंशतः तरी शक्य आहे असा विश्वास त्या दशकाच्या अखेरीस अनेकानां

वाटूं लागला. मंदीमुळें सुरू झालेली धसरगुंडी यथाक्रम होऊं द्यावी आणि तिला कोणत्याहि प्रकारें प्रतिवंध करूं नये ही भूमिका त्यानंतर नष्टप्रायच झाली.

[३]

विसाव्या शतकाच्या विशींत सुरक्षितता वाढविण्यासाठीं जे विशिष्टस्पर्शी व सर्वस्पर्शी उपाय योजण्यात आले ते असंख्य होते. त्यांचा परिणाम फार मोठा झाला आणि अगदीं थोड्या कालावधीत त्या सर्वांची अंमलवजावणी करण्यात आली. (हा कालावधी एका दशकांचा होता असें मानणें जरी सोईस्कर असलें तरी आर्थिक सुरक्षिततेसाठीं योजलेले वहुतेक उपाय १८३३ ते १८३८ या पांच वर्षांतच अंमलांत आणले गेले) परंपरावादी आणि उदारमतवादी ह्या दोघांनींहि त्या उपाययोजनेचीं आणि तिच्यावद्दल जनतेनें व्यक्त केलेल्या पसंतीची दखल घेतली आणि असा निष्कर्ष काढला कीं आर्थिक उद्दिष्टांत कोणत्या तरी एका नव्या व वेगळ्या गोष्टीची भर पडली आहे. स्पर्धानिष्ठ अर्थव्यवस्थेंत अंगभूत असलेली व आवश्यक भासणारी असुरक्षितता आणि सुरक्षिततेसाठीं चाललेला हा जोरदार प्रयत्न यांची सांगड घालण्याचा प्रयत्न परंपरानिष्ठ लोक करूं लागले आणि ते एकंदरीत घावरून गेले. इतिहासात प्रथमच या परंपरानिष्ठानां जनतेच्या उसळत्या आकांक्षांच्या ऐवजीं, शांतता व समाधान या गोष्टीविषयीं जनतेला वाढणाऱ्या ओढीची भीती वाटली. सुरक्षिततेची ही ओढ राजकीय दृष्टचा कशी भुरळ घालणारी आहे तें उदारमतवाद्यानीं ओळखलें आणि त्यानीं ही आकांक्षा मान्य करून तिला युक्तिवादाचा आधार दिला. त्यानीं असा निष्कर्ष काढला कीं आधुनिक औद्योगिक जीवन धोक्यानीं भरलेलें आहे आणि ज्या गुंतागुंतीच्या सामाजिक यंत्रणेंत कामगार काम करतो ती त्याच्या चुराडा उडवील अशी सतत शक्यता असते. समाज-व्यवस्थेच्या या चित्राच्या संदर्भात त्यानीं असा युक्तिवाद केला कीं पूर्वीच्या अर्थ-शास्त्रज्ञानीं कल्पिलेल्या साध्या अर्थव्यवस्थेत कामगाराला जेवढ्या संरक्षणाची आवश्यकता होती त्याहून कितीतरी संरक्षणाची गरज त्याला आजच्या अर्थव्यवस्थेत आहे. पूर्वीच्या अर्थशास्त्रज्ञाना प्रगत औद्योगिक भांडवलशाहींतले धोके ज्ञात असणें अशक्य होतें. आणि यापुढे जसजशी प्रगती होईल तसतशी संरक्षणाची गरज वाढतच जाईल.

ह्या प्रश्नाचें स्वरूप आतां आपल्याला अधिक स्पष्टपणें समजूं शकतें. स्पर्धा-निष्ठ अर्थव्यवस्थेतील असुरक्षिततेवद्दल जी प्रतिक्रिया सर्वसाधारणपणें होते तीच त्या वेळीं तिसऱ्या दशकातला सामान्य माणूस व्यक्त करीत होता. आणि ती व्यक्त करतानां तो आधुनिक कॉर्पोरेशन्सनीं आधींच मळलेल्या वाटेनें मार्गक्रमण करीत

होता. असुरक्षितता वरी वाटते ती दुसऱ्यांसाठीं हें तो आपल्या प्रतिक्रियेनें पुन्हां एकदां दाखवून देत होता.

सुरक्षिततेचा शोध शेतकऱ्यानीं व कामगारानीं सर्वांच्या शेवटी करावा हें अपरिहार्य होतें. माणसाजवळ सुरक्षित ठेवण्यासारखें काहीं असल्याशिवाय आर्थिक परिस्थितीतील अनपेक्षित वदलांपासून स्वत:चें संरक्षण करण्याचा प्रयत्न तो कसा करूं शकेल ? अर्थव्यवस्थेत पहिल्यानें कोणाचें हित झालें असेल तर तें उद्योगधंद्याच्या चालकांचें. त्यामुळें आपल्या संपत्तीचें रक्षण करण्याचीं साधनें प्रत्यक्षपणें किंवा अप्रत्यक्षपणें ते पहिल्यानें शोधूं लागले. रिकार्डो व माल्थस यानीं चित्रित केलेल्या निष्ठूर अर्थव्यवस्थेत सामान्य माणसाला आधुनिक स्वरूपाची सामाजिक सुरक्षितता हवीशी वाटणें अशक्यच होतें. जेमतेम चरितार्थ चालेल इतकेंच जेव्हां माणसाचें वेतन असतें तेव्हां वेकारीमुळें अधिक हाल झाले तर काम करायचें याची चिंता तो फारशी करूं शकत नाहीं. कारण रोजगारी असो वा नसो त्याचें जीवन हें अवजड ओझ्यासारखें असतें. जगण्यासाठीं ज्यांना रोज झगडावें लागतें तीं माणसें वार्धक्याची चिंता करीत नाहींत. तितके आपण जगूं अशी त्यांची अपेक्षाच नसते. जेव्हा सर्व-सामान्य आयुर्मानच कमी असतें तेव्हां आजार व मृत्यू हीं नित्याचीं संकटें असतात. ऐशीं वर्षांचा म्हातारा काहीं आयुष्याचा विमा उतरत नाहीं. आपण मरणार ह्या सत्याचा तो जमेल तसा स्वीकार करतो. भारतीय खेडचातला भूमिहीन मजूर हा जगातला एक अत्यंत दुर्दैवी प्राणी आहे. त्याच्या दृष्टीनें वेकारी हें काहीं संकट नसतें. ती त्यांची नित्याची परिस्थिती असते.

आर्थिक स्वास्थ्य अधिकाधिक प्रमाणात लाभू लागलें कीं मग संरक्षण करण्या-सारखें आपल्या जवळ काहीं आहे याची सर्व लोकानां जाणीव होऊं लागते. आपल्या धंद्याच्या सुरुवातीच्या काळात योजक सुरक्षिततेकडे फारसें लक्ष देत नाहीं. कारण सुरक्षित ठेवण्याइतकें फारसें भांडवलच त्याच्याजवळ नसतें. पण नंतर मात्र तो अगर त्याचे वारस भागधारकांवद्दच्या आपल्या जवाबदाऱ्यांचा उल्लेख करूं लागतात. जनतेसाठीं स्वस्तातस्वस्त मोटारगाडी तयार करायची आपल्या कल्पनेची व्यवहार्यता कोणत्याहि प्रकारें न अजमावतां ती प्रत्यक्षात उतरविण्याचें साहस हेन्री फोर्ड करूं शकत होता. तें साहस फार मोठें होतें. आणि त्याच्या सहकाऱ्यानीं त्याला त्यापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न केला. पण त्याच्याजवळ गमावण्यासारखें तसें फारसें नव्हतें पण फोर्ड मोटर कंपनीची सध्यांची मालमत्ता जर फोर्डच्या नातवंडानीं आज तशीच पणाला लावली तर ते मूर्ख ठरतील. आर्थिक धोके शक्य तितके कमी करण्याचा जो प्रयत्न आधुनिक कॉर्पोरेशन्स करीत असतात तो अयोग्य आहे असें मला म्हणायचें नाहीं. जर त्यांनीं तसा प्रयत्न केला नाहीं तर आपल्या जवाबदाऱ्या

त्या नीट पार पाडत नाहींत असें म्हणावें लागेल. जेव्हां खात्रीकरून घेऊन पाऊल टाकणें शक्य आहे तेव्हां जुगार खेळल्यासारखा तो प्रकार होईल.

कामगारांच्या रोजगारीबावत देखील अशाच क्रमानें प्रगती झाली आहे. जसजशी कामगाराची मिळकत वाढत जाते आणि रोजगारीच्या बाबतीत अधिक निश्चिती निर्माण होते त्या प्रमाणात बेकारी व तिच्यामुळें मिळकतीत पडलेला खंड ह्या गोष्टी भीतिदायक वाटूं लागतात. तसेंच मिळकत वाढली कीं म्हातारपणाबद्दल विचार करणें देखील शक्य होतें. आपण म्हातारपण येईपर्यंत तग धरूं अशी अपेक्षा माणूस करूं लागतो आणि म्हातारपणात उत्पन्न नसलें तर हाल होतील अशी पूर्वी मनांत न येणारी चिंता त्याला वाटूं लागते. आजार व शारिरिक इजा यांचा धोका जेव्हां कमी होतो तेव्हां त्या गोष्टी नित्याच्या आहेत ही भावना नष्ट होते. खुल्या बाजारातील अनिश्चितता त्रासदायक वाटते ती सुखवस्तु शेतकऱ्यानां गरीब शेतकऱ्यानां नव्हे. केण्टुकी आणि टेनेसी या डोंगराळ प्रदेशात मंदीचें संकट भयावह वाटत नाहीं. शेतकऱ्यांजवळ विकता येईल असा फारसा माल नसतो आणि त्यांच्या मालमत्तेची किंमतहि अल्प असते. त्यामुळें किंमती घसरल्या म्हणून त्यांचें फारसें नुकसान होत नाहीं. आणि शेतजमिनीच्या किंमती कमी झाल्या तर त्यानां त्याची फारशी पर्वा वाटत नाहीं. पण सुखवस्तु प्रदेशातील परिस्थिती वेगळी असते. एकोणीसशें तीसनंतरच्या मंदीच्या दशकात गहाण टाकलेल्या जमिनींची मालकी मिळविण्यासाठीं धनिकोनीं जेव्हां दावे केले तेव्हां त्यांचा निवाडा करणाऱ्या न्यायाधिशानां जर कोणी धमक्या दिल्या असतील तर त्या आयोवातल्या सधन शेतकऱ्यानीं. शेतकऱ्यानां सहाय्य मिळावें अशी मागणी या शेतकाऱ्यानीं केली. कारण ह्या शेतकऱ्यांजवळ कांहींतरी गमावण्यासारखें होतें. उलट आपालाचियन पठारावरच्या शेतकऱ्यांजवळ तसें काहींच नव्हतें.

ह्यावरून असें दिसून येतें कीं आधुनिक काळात जी सुरक्षिततेसाठीं धडपड चाललेली आहे ती काहीं आधुनिक आर्थिक जीवनात धोक्याचे खांचखळगे विशेष प्रमाणात आहेत म्हणून नव्हे. ह्या भूमिकेवर जरी सांकेतिक शहाणपणानें मान्यतेचा शिक्कामोर्तब केला असला तरी ती चुकीची आहे. लोकांची आर्थिक परिस्थिती सुधारल्यामुळें, ज्याचें संरक्षण करायला हवें असें त्यांच्याजवळ पूर्वीपेक्षां अधिक प्रमाणात असल्यामुळें ही धडपड सुरू झाली आहे. जुन्या जगात दुर्दैव व दुःख या नित्याच्या व अपरिहार्य गोष्टी होत्या. आताच्या जगात त्या प्रासंगिक व परिहार्य झाल्या आहेत. आणि त्यामुळेंच त्या टाळण्यासाठीं उपाय योजणें शक्य व हितकारक आहे असें सूज्ञ माणसानां वाटूं लागलें.

अर्थात् आर्थिक सुस्थिती हेंच काहीं केवळ सुरक्षिततेसाठीं चाललेल्या धडपडीमागचें कारण नव्हतें. निरनिराळ्या राष्ट्रातील लोकांचीं स्वभाव वैशिष्ट्यें व राजकीय विकास यांचा देखील त्या धडपडीशीं संबंध होता. सामाजिक विम्याची सर्वांगीण योजना पहिल्यानें जर्मन साम्राज्यात कां अस्तित्वात आली आणि विगर-कम्युनिस्ट प्रदेशात युनायटेड किंगडम व स्कँन्डिनेव्हिया या देशांत तिचा सर्वांत अधिक विकास कां झाला ह्याचीं कारणें तेथील लोकांच्या स्वभाववैशिष्ट्यांत व राजकीय विकासातच आपल्याला सापडतील. महामंदीचा तडाखा युनायटेड स्टेटस् व कॅनडा या देशानां विशेष प्रमाणात जाणवला आणि त्यामुळें तेथें आर्थिक सुरक्षिततेकडे विशेष लक्ष पुरविलें जाऊं लागलें.

आधुनिक औद्योगिक जीवनात अधिकाधिक असुरक्षितता निर्माण होत आहे याचा पुरावा म्हणून १९२९ सालच्या महामंदीकडे बोट दाखविलें जातें. औद्योगिक क्रांतीपूर्वी इतकें मोठें आर्थिक अरिष्ट ओढवलेलें नव्हतें असें या संदर्भात म्हटलें जातें. पण ही भूमिका उथळपणाची आहे हें आतां कोणालाहि स्पष्ट होण्यासारखें आहे. महामंदीच्या तडाख्यानें नष्ट व्हायला जगात विपुल संपत्ती व उत्पन्न होतें म्हणून तर तिची तीव्रता विशेष जाणवली. आणि जेथें म्हणजे युनायटेड स्टेटस् व कॅनडा या देशांत दरडोई समृद्धी सर्वांत अधिक होती तेथें तिच्यापासून सर्वांत अधिक धोका होता. आणि ज्याप्रमाणें मोठी आग लागली म्हणजे आगीच्या विम्याकडे लोकांचें लक्ष वेधतें व पूर आला म्हणजे पूरनियंत्रक योजनांची त्यानां आवश्यकता वाटते त्याचप्रमाणें महामंदीमुळें आर्थिक सुरक्षिततेकडे लोकांचें लक्ष वेधलें. ज्या प्रमाणात माणसाची मालमत्ता अधिक त्या प्रमाणांत पूर अगर आग यांमुळें त्याचें अधिक नुकसान होतें. मंदीपासून होणाऱ्या नुकसानाच्या बाबतींत देखील हीच गोष्ट खरी आहे.

[४]

गॅल्सवर्दीनें ज्यानां फोरसाइटस् असें नांव दिलें आहे त्या जगातल्या सधन लोकानां पहिल्यांपासून हें पक्के माहीत आहे कीं आपल्या संपत्तीत भर घालण्याइतकेंच तिचें जतन करणें महत्वाचें आहे. पण ह्या दोन्हीं गोष्टी समान किंवा एकच आहेत असें मात्र त्यानीं कधींच मानलें नाहीं. मालमत्तेच्या वाढीला मर्यादा नसते; परंतु तिचें जतन करायचे प्रयत्न जितके अधिक प्रमाणात करावे तितके कमी फलदायी होऊं लागतात. आग, चोरी व वादळें यांच्याबाबत विमा उतरला कीं मालमत्तेला असलेल्या मुख्य धोक्यांचा बंदोबस्त होतो. भूकंप व कोसळणारीं विमानें यांच्यापासूनहि तिचें संरक्षण करणें इष्ट असेल. पण तें तितकेंसें निकडीचें नसतें आणि तसें केल्यामुळें तितक्याच प्रमाणांत अधिक मनःस्वास्थ्य लाभत नाहीं.

आर्थिक सुरक्षिततेच्या बाबतींत अशीच परिस्थिती आहे. ह्या सुरक्षिततेला जे धोके आहेत त्यातले काहीं गंभीर स्वरूपाचे आहेत आणि काहीं तितकेसे गंभीर नाहीत. त्यातल्या गंभीर धोक्यांविरुद्ध उपाययोजना झाली कीं मग इतरांच्या बाबतींत उपाययोजना करण्याची तितकीशी निकड रहाणार नाहीं. खरें म्हणजे मग एकंदर आर्थिक सुरक्षिततेच्या प्रश्नाबाबतच तितकीशी निकड रहाणार नाहीं. पूर्वी कामगाराला सगळ्यात जास्त जर कशाची भीती असेल तर ती आपली नोकरी व उत्पन्न गमावण्याची. त्याच्या खालोखाल वार्धक्य, आजार, अपघात व मृत्यू यांमुळें निर्माण होणाऱ्या अनिश्चिततेचें त्याला भय वाटत असे. ह्या धोक्यांच्या बाबतींत उपायोजना झाल्यावर शिल्लक राहिलेल्या इतर धोक्यानां तितकेसें महत्व नव्हतें. शेतकऱ्याच्या बाबतींत म्हणाल तर त्याच्या पिकांच्या किंमती एकदम खालीं घसरण्याच्या धोक्यापासून संरक्षण मिळणें त्याच्या दृष्टीनें सर्वांत अधिक महत्वाचें होतें. किंमती अशा घसरल्या कीं त्याचें उत्पन्न कमी होतें आणि शिवाय त्याच्या मालमत्तेची किंमतहि कमी होते. त्याच्या खालोखाल अवर्षण व पिकांचा नाश या गोष्टीपासून शेतकऱ्याला भय असतें—निदान काहीं प्रदेशांत. इतर धोके असले तरी ते इतके महत्त्वाचे नसतात. उद्योगधंद्यांच्या चालकांची परिस्थिती अशाच स्वरूपाची असते. मालाच्या किंमती व त्यासाठीं असलेली मागणी यावद्दलची अनिश्चितता त्याच्या दृष्टीनें सर्वांत अधिक धोकादायक असते. ह्यामुळेंच ह्या गोष्टींकडे अर्थशास्त्रज्ञानीं विशेष लक्ष पुरविलें आहे आणि बाजारपेठांबद्दलच्या आर्थिक तत्वचिकित्सेत प्रस्तुत धोका दूर करण्याचे प्रयत्न काहींसे अपूर्व आणि कधीं कधीं अगदीं गर्हणीय मानले गेले आहेत. उत्पादन खर्चातले फेरबदल, कच्च्या मालाच्या पुरवठा, कामगार-मालक संबंध इत्यादि गोष्टींपासून देखील धोके उद्भवतात आणि ते दूर करणें देखील हितावह असतें. पण त्यामुळें तितकें भयंकर नुकसान होत नाहीं. आणि इतर गोष्टींमुळें निर्माण होणारी अनिश्चितता याहूनहि कमी महत्वाची असते.

ह्याचा अर्थ असा कीं आर्थिक जीवनातील असुरक्षितता नष्ट करण्याचें कार्य संपविता येणें शक्य आहे. आर्थिक जीवन हें स्वभावतःच आणि नित्य अनिश्चिततापूर्ण असतें ही सांकेतिक शहाणपणानें पूर्णपणें मान्य केलेली चिरपरिचित भूमिका आहे. पण प्रत्यक्षांत मात्र आर्थिक जीवनातील महत्वाचे धोके आता नष्ट करण्यात आले आहेत. (ह्याला एक महत्वाचा अपवाद आहे.) आणि जे धोके शिल्लक आहेत ते आतां तितकेसे निकडीचे राहिलेले नाहींत.

ह्यातून निष्कर्ष असा निघतो कीं सरकारें व राजकीय पक्ष यानां सुरक्षिततेबद्दलच्या नव्या नव्या गरजा निर्माण करीत रहाणें अशक्य आहे. असें होत राहील ही सांकेतिक शहाणपणाला वाटणारी भीती निराधार आहे. केवळ असुरक्षिततेबद्दल कल्पनाच रचित रहाण्याचा प्रश्न असता किंवा आधुनिक आर्थिक जीवनातल्या धोक्यात

जर वाढ होत असती तर ही भीती साधार ठरली असती. पण ह्या धोक्यांची संख्या मर्यादित आहे; आणि ते वाढत आहेत असें वाटतें याचा अथ इतकाच कीं लोकांजवळ आतां गमावण्या सारखें अधिक आहे. अर्थात् आर्थिक असुरक्षितता संपूर्णपणें नष्ट झाली आहे असे मात्र नव्हे. युनायटेड स्टेटस्मधील सामान्य नागरिकाच्या दृष्टीनें आजारीपण हा एक मोठा धोका आहे. कारण त्यामुळें बराच खर्च करावा लागतो आणि तो देखील उत्पन्न थांबलेलें असताना. लहान प्रमाणावरचे उद्योगधंदे व शेती ह्या व्यवसायांत अजून आर्थिक अनिश्चितता आहे. परंतु एकंदरीत मंदी टाळण्याची आवश्यकता अजून कायम आहे हा अपवाद सोडल्यास आर्थिक सुरक्षिततेचा प्रश्न आतां जुना झाला आहे. ज्या धोक्यांच्या बाबतींत उपाययोजना झालेली आहे. त्याच्या मानानें शिल्लक राहिलेले आर्थिक धोके कमी महत्वाचे आहेत. शिवाय एकदां सुरक्षितता प्राप्त झाली कीं तिचें अस्तित्व गृहीत धरलें जातें. त्याबद्दल चर्चाच नव्हे तर विचारहि कोणी करीनासा होतो. आर्थिक सुरक्षिततेचा मुख्य सांगाडा आतां तयार झालेला आहे. आणि यापुढें अधिक आर्थिक सुरक्षितता मिळविण्यासाठीं आपल्याला या सांगाड्यावरच अधिक बांधकाम व साफसफाई करायची आहे.

परंतु जर आर्थिक सुरक्षिततेचा प्रश्न पूर्णपणें अगर बहुतांशीं सुटला असें आपल्याला मानायचें असेल तर मंदीच्या संकटाचा किंवा तीव्र स्वरूपांच्या बेकारीचा प्रश्न आपण सोडवणें आवश्यक आहे ही गोष्ट इथें मुद्दाम ठांसून सांगायला हवी. उद्योगधंद्यांचे चालक, कामगार, शेतकरी व अन्य नागरिक यानीं स्वतःच्या संरक्षणासाठीं ज्या विशिष्ट उपाययोजना केल्या आहेत त्या सर्व मंदीच्या तडाख्यानें कोसळून पडूं शकतील. मंदी आली कीं स्पर्धेचें नियंत्रण करून मागणीला स्थीरता प्राप्त करून देण्यासाठीं केलेल्या तरतुदींचें रूपांतर प्राणांतिक स्पर्धेत होतें. मग कामगार नोकरी बदलत असतां मधल्या काळांत त्याला मिळणारें संरक्षण असें बेकारी निवारक विमायोजनेचें स्वरूप रहात नाहीं; तर चरितार्थासाठीं त्याला मिळणारें तुटपुंजें उत्पन्न असें स्वरूप त्याला प्राप्त होतें. शेतमालाच्या आधारभूत किंमती या किमान किंमती न रहातां कमाल किंमती होतात. तेव्हां मंदीचा बंदोबस्त करणें हा आर्थिक सुरक्षिततेचा मुळीं गाभाच आहे.

[५]

आर्थिक सुरक्षिततेची ओढ ही उत्पादनाच्या वाढीच्या मार्गातील सर्वात मोठी धोंड आहे असें अनेक दिवस मानलें जात होतें. ह्या भूमिकेच्या मुळाशी असा समज होता कीं स्पर्धानिष्ठ अर्थव्यवस्थेतील अनिश्चितता कार्यक्षमतेसाठीं आवश्यक असते. अधिक उत्पन्नाचें आमिषाचें गाजर जसें माणसाला काम करायला लावण्यासाठीं

आवश्यक असतें तसाच वैयक्तिक आर्थिक नाशाचा बडगा देखील आवश्यक असतो. आर्थिक सुरक्षिततेत वाढ केली तर हा बडगा दूर ठेवल्यासारखें होईल आणि माणसाला काम करायला लावणारी निम्मीं आमिषें नष्ट होतील. ह्या समजाला अजून सांकेतिक शहाणपणात फार महत्वाचें स्थान आहे. अनिश्चितता दूर करण्याचे शेतकऱ्यांचे प्रयत्न कामगार अगर बडचा कॉर्पोरेशन्स यानीं केलेल्या तत्सम प्रयत्नांपेक्षां फारच दुबळे असतात. पण शेतकऱ्यांच्या या प्रयत्नांचीच लोकानीं फार धास्ती घेतली आहे. या संदर्भात एका शेतीच्या अर्थशास्त्राच्या प्रमुख तज्ञानें पुढील मत व्यक्त केलें आहे. 'जेव्हां (शेती करणाऱ्या) लक्षावधी योजकानां नोकरशाहीचें मार्गदर्शन व सर्वांगीण विमा योजना यांचें सामाजिक खोगीर पाठीवरून उतरवून आपले आर्थिक व्यवहार करण्याइतका आत्मविश्वास प्राप्त होईल तेव्हां स्वातंत्र्याधिष्टित व सर्वकष सत्तेला विरोध करणाऱ्या समाजानीं घटनेच्या द्वारें मोठा निर्णायक विजय मिळवला आहे असें म्हणावें लागेल' [१] परंतु आधुनिक मोठ्या कॉर्पोरेशन्सच्या विश्वात देखील संकटांची धास्ती फार उपयुक्त कार्य करते असें सांकेतिक शहाणपण मानतें. 'उद्योगधंद्यांच्या अमेरिकन चालकांशीं तुलना करतां असें दिसतें कीं युरोपातील चालकवर्ग आत्मसंतुष्ट व भित्रा आहे. आजच्या जगात परिस्थितीचे जे जबरदस्त धक्के सहन करावे लागतात त्यांच्यापासून संरक्षण मिळावें म्हणून सरकारच्या तोंडाकडे तरी ते पहातात किंवा एकमेकांची मदत तरी घेण्याचा प्रयत्न करतात. आणि त्याना सर्वांत कशाची धास्ती वाटत असेल तर ती किंमतींच्या बाबतीतल्या चढाओढीची'.[२]

---

१ कार्ल ब्रॅन्ट, 'ॲग्रिकल्चरल प्राइस पॉलिसी डयूरिंग रीआर्मामेन्ट' (लष्करी तयारीच्या काळांतील शेतमालाच्या किंमतीं विषयींचे धोरण) जर्नल ऑफ फार्म इकॉनॉमिक्स. खंड ३४ (मे १९५५) प्रा. ब्रॅन्ट हे अमेरिकन फार्म इकॉनॉमिक असोसिएशनचे भूतपूर्व अध्यक्ष आहेत.

२ रॅंडल, अ क्रीड फॉर फ्री एंटरप्राइज (स्वातंत्र्याधिष्टित उद्योगधंद्यांसाठीं एक क्रीद) मिस्टर रॅंडल हे अनेक वर्षें उद्योगाच्या क्षेत्रातले चालक होते आणि १९४९ नंतर इनलॅंड स्टील कंपनीचे अध्यक्ष होते—वारंवार मतप्रदर्शन करणारे अध्यक्ष. पोलदाच्या धंद्यात किंमतींबाबतची स्पर्धा उघडपणें जवळ जवळ कधींच होत नाहीं. अनिश्चिततेचें हें कारण अनेक वर्षांपूर्वी नष्ट करण्यात आलें आहे. पण सांकेतिक शहाणपणाच्या गीतपाठात मात्र किंमतस्पर्धेचें गुणगान चढचा आवाजात केलें जातें. आणि त्यामुळें ज्यानीं त्या प्रकारची स्पर्धा यशस्वीपणें नष्ट केली आहे ते देखील तिचा जोरदार पुरस्कार करीत असतात.

आर्थिक अनिश्चितता ही कार्यक्षमता व आर्थिक प्रगती यासाठीं आवश्यक असते ही कल्पना म्हणजे एक घोडचूक होती. कदाचित् आर्थिक विचारधारांच्या इतिहासातील ती सर्वांत मोठी चूक असेल. (मार्क्सवादी व परंपरानिष्ठ अशा दोन्ही प्रकारच्या अर्थशास्त्रज्ञानीं ही चुकीची कल्पना उराशीं बाळगली. मार्क्स व त्याचे अनुयायी यांची अशी ठाम समजूत होती कीं भांडवलशाही अर्थव्यवस्थेला जर सुसंस्कृत करण्याचा प्रयत्न केला तर ती पांगळी होईल. उदाहरणार्थ, बेकारीनिवारक विमायोजना अंमलात आणली तर राखीव औद्योगिक फौजेतर्फे कामगारांच्या वेतनाचें नियंत्रण होणार नाहीं. व त्यामुळें भांडवलशाहीचा पायाच उखडला जाईल.) खरें म्हणजे ज्या काळात आर्थिक सुरक्षिततेसाठीं अधिकाधिक प्रयत्न केले जात होते त्याच काळांत उत्पादनात अभूतपूर्व वाढ होत होती. सुरक्षिततेच्या हव्यासामुळें आर्थिक जीवनात पांगळेपणा येईल अशी चिंता ज्या प्रवक्त्यानीं व्यक्त केली त्यानींच उत्पादनात झालेल्या या वाढीचा चकितपणें अनेकदां उल्लेख केला आहे. शेतीच्या क्षेत्रातील 'सर्वांगीण विमायोजनेमुळें' मोठें अरिष्ट ओढवेल असा वर उद्धृत केलेला इशारा ज्या अर्थशास्त्रज्ञानें दिला त्यानेंच त्याच निबंधात पुढील विचार व्यक्त केले आहेतः 'गेल्या कांहीं दशकातली तांत्रिक प्रगती थक्क करणारी आहे आणि त्यामुळें शेतीच्या क्षेत्रात नवी क्षितिजें दिसूं लागलीं आहेत. युनायटेड स्टेट्स् व कॅनडा या देशांतील शेतीची ही प्रगती तर दिपवून सोडणारी आहे. या प्रगतीचा दुसऱ्या महायुद्धात तर खूप उपयोग झालाच, पण तिच्यामुळें युरोप व एशिया खंडांतील लक्षावधी लोकांचें प्राणरक्षण झालें.[1] ही जी तांत्रिक प्रगती झाली तिला किंमती व उत्पन्न यांबाबतची अनिश्चितता कमी करण्यासाठीं किंमतीनां आधार द्यायची तरतूद करणारें कायदे अंशतः तरी कारणीभूत झाले असणें शक्य आहे. या कायद्यांमुळें नव्या तंत्रांचा उपयोग करण्यासाठीं शेतींत अधिक भांडवल निर्धास्तपणें गुंतवणें शेतकऱ्याना शक्य झालें. पण असें घडलें असेल असें मानायला सबळ कारणें असून देखील सांकेतिक शहाणपणाच्या चौकटीत ही भूमिका बसत नाहीं. त्यामुळें या गोष्टीकडे पूर्णपणें डोळेझाक केली जाते.

अलीकडच्या सुरक्षिततेच्या कालखंडात उत्पादन अगदीं ठसठशीतपणें वाढलें आहे. १९३० पूर्वीच्या वीस वर्षांत सुरक्षिततेबद्दलच्या वाढत्या हव्यासाबद्दल परंपरानिष्ठ मंडळींना चिंता वाटूं लागली. ह्या काळात (मूळ पुस्तकात वर्षाच्या गणनेंत चूक आहे. पृ. ८९) म्हणजे १९०० ते १९२९ या कालावधींत कामगारांची उत्पादनक्षमता –दरडोई दरतासागणिक झालेलें उत्पादन– ८९.६ सेंटस्वरून ११३.३ सेंटस्वर गेली. म्हणजे ती एकंदर २३.७ सेंटस्नीं म्हणजे प्रतिवर्षी सरासरी १.२ सेंटस्नीं वाढली.

१ ब्रॅन्ट, 'ॲग्रिकल्चरल प्राइस पॉलिसी डयूरिंग रिआर्मामेन्ट, पृ. १८५-८६

या उलट तिसऱ्या दशकानंतरच्या दहा वर्षांत ती १३१·५ सेंटस्‌वरून १७९·२ सेंटस्‌वर गेली म्हणजे ४७·७ सेंटस्‌नीं वाढली. म्हणजे प्रतिवर्षी ती सरासरीनें ४·८ सेंटस्‌नी वाढली. आधीच्या कालातील प्रतिवार्षिक वाढीच्या मानानें ही वाढ चौपट होती. विसाव्या शतकाच्या पन्नाशींत देखील याच गतीनें वाढ होत राहिली. ह्यावरून असें स्पष्ट होतें कीं अधिक सुरक्षिततेसाठीं चाललेली धडपड आणि वाढती उत्पादनक्षमता ह्यात कोणताहि विरोध नव्हता. उलट ती धडपड चालू असतानां पुष्कळच अधिक वेगानें प्रगती होणें शक्य होतें.[1] युनायटेड स्टेटस् व अन्य पाश्चात्य देश यांच्या इतिहासात उत्पादनक्षमतेची अगदीं असामान्य अशी वाढ जर कधीं झाली असेल तर ती स्पर्धानिष्ठ अर्थव्यवस्थेतील धोके कमी करण्याचा प्रयत्न सुरू झाल्यानंतर झाली.

पण इथें हें पुन्हां एकदां सांगितलें पाहिजे कीं सांकेतिक शहाणपणावर अशा प्रत्यक्ष पुराव्याचा निर्णायक परिणाम होत नाहीं. उलट असा युक्तिवाद केला जातो कीं सुरक्षिततेसाठीं चाललेल्या धडपडीचे जे अनिष्ट परिणाम घडतील असें सांकेतिक शहाणपण सांगतें ते नजरेआड असले तरी दबा धरून वसलेले आहेत. अशा स्थितींत नुसती पुराव्यावर भिस्त ठेवणें अप्रबुद्धपणाचें आहे. पण प्रस्तुत संदर्भात सत्यस्थितीकडे डोळेझाक करणें अंमळ अवघड आहे. कारण आर्थिक सुरक्षितता व आर्थिक उत्पादन ह्या दोन्होंत एकाच वेळीं झालेली वाढ ही आतां घडलेली गोष्ट आहे. सुरक्षितता व प्रगती यामध्यें विरोध आहे आणि या विरोधातून विसाव्या शतकातला सर्वांत मोठा सामाजिक झगडा निर्माण होणार आहे असें जें मानलें जात होतें तें प्रत्यक्ष घटनानीं खोटें ठरविलें आहे.

[६]

असुरक्षिततेविरुद्ध उपाययोजना आणि उत्पादनातील वाढ यात विरोध तर नाहींच. उलट या दोन्हीं गोष्टींचें अविच्छेद्य नातें आहे. आर्थिक सुरक्षितता ही उत्पादनाची कमाल मर्यादा गाठण्यासाठीं आहे. आणि तसेंच उत्पादनाची उच्च पातळी गाठणें आर्थिक सुरक्षिततेसाठीं आवश्यक आहे. आर्थिक सुरक्षिततेसाठीं उत्पादनाची उच्च पातळी गाठणें इतकें आवश्यक आहे कीं त्या पातळीवर रहाण्यासाठीं आजच्या स्थितींत अर्थव्यवस्थेला फारच मोठा प्रयत्न करावा लागतो. आणि तसें करणें त्या अर्थव्यवस्थेला अवघड तर जातेंच पण त्यासाठीं थोडी किंमत द्यावी

१ हे सर्व हिशेब १९५० सालच्या किंमतींच्या संदर्भात केलेले आहेत. अमेरिकाज् नीडस् अँड रिसोर्सेस्, अ न्यू सर्व्हे या जे. फ्रेड्रिक डचूहर्स्ट व सहकारी (न्यूयॉर्क, ट्वेंटिएथ सेंचरी फंड, १९५५) यांच्या पुस्तकातून घेतलेले आहेत. पृ. ४०

लागते व धोकाहि पत्करावा लागतो. पण हा मुद्दा म्हणजे आपल्या विवेचनाचा पुढचा टप्पा झाला. त्याला हात घालण्यापूर्वी आपण आर्थिक सुरक्षितता व उत्पादन यांच्या परस्परसंबंधाचा थोडा अधिक खल करायला हवा.

सांकेतिक शहाणपणाची अशी एक गोड कल्पना आहे की आज उत्पादनाला सर्वांत मोठा धोका असेल तर तो आळशी व कामचुकार कामगार आणि अंगीं धडाडी नसलेले योजक यांच्यापासून. पण ही कल्पना चुकीची आहे. अशा प्रकारचे नालायक कामगार व योजक जरूर अस्तित्वात आहेत. अनैच्छिक बेकारीच्या काळात उपयोगी पडावे म्हणून उपलब्ध असलेलें आर्थिक सहाय्य घेऊन त्याचा उपयोग फ्लॉरिडात अगदीं ऐच्छिक सुट्टी भोगण्यासाठीं केला जातो हें खरें आहे. कामगाराला पराच्या गादीवर बसवणें इतकेंच आपलें कार्य आहे असें मानणाऱ्या मजूरसंघटना, लोभाचा अतिरेक करणारे कामगार आणि आळशी चालक वर्ग आज आपल्याकडे सर्वत्र आढळतात. खरें म्हणजे असेंहि म्हणता येईल कीं कामचुकारपणाच्या प्राचीन कलेनें आज प्रगतीचें, सूक्ष्मतेचें व आकर्षकपणाचें परमोच्च शिखर गाठलें आहे. आणि कोणत्या एका विशिष्ट वर्गानें, धंद्यानें किंवा व्यवसायानेंच हो गोष्ट साध्य केली आहे असें मानण्याचें कारण नाहीं. विश्वविद्यालयांत या कामचुकारपणाला विद्वत्तेच्या आन्हिकाचें स्वरूप प्राप्त झालें आहे. पण त्यांची गोष्ट सोडली तर सुसंस्कृतपणें व फसव्या देखाव्याच्या आड कामचुकारपणा कसा करावा ही कला आधुनिक कॉर्पोरेशन्सच्या उच्च अधिकारी वर्गाने विकासाच्या शिखरावर नेऊन ठेवली आहे.

पण मंदीमुळें जर कामगार अनिच्छेनें घरीं बसले आणि योजकानां पुढें पाऊल टाकणें अशक्य झालें तर जें उत्पादनाचें नुकसान होईल त्यामानानें परंपरागत कामचुकारपणामुळें होणारें नुकसान कमी असतें. आणि त्याच कारणास्तव अनैच्छिक बेकारी नष्ट करून व योजकानां नवीं क्षेत्रें उपलब्ध करून देऊन उत्पादनात जेवढी वाढ होण्याची शक्यता आहे तेवढी वाढ आर्थिक आमिषांत मूलगामी सुधारणा करून व त्या योगें व्यक्तीची काम करण्याची अगर उद्योगधंद्यांचें संचालन करण्याची इच्छा तीव्र करून काहीं होणार नाहीं.

१९५० सालीं डॉलरचें जें मूल्य होतें. त्याच्यानुसार हिशोब केला तर १९२९ ते १९३२ या काळांत राष्ट्रांचें सरसकट उत्पादन १५७८० कोटी डॉलर्सवरून ११३६० कोटी डॉलर्सपर्यंत घसरलें. म्हणजे त्यात ४४०० कोटी डॉलर्सची घट झाली. काम करायला तयार असलेल्या लोकांवर बेकारी लादली गेल्यामुळें उत्पादनात ही जी प्रचंड घट झाली तितकी घट कामगारांच्या व चालकवर्गाच्या शैथिल्यामुळें किंवा धडाडीच्या अभावामुळें खात्रीनें झाली नसती. (१९२९ ते १९३२ च्या दरम्यान् बेकार कामगारांची संख्या साडेदहा लाखांवरून १२१ लाखांवर गेली. शेती वगळून इतर क्षेत्रांतील रोजगारी ३८१ लाखांवरून २८८ लाखांपर्यंत घस-

रली) मंदीमुळें उत्पादनाची किती हानी होते त्याचा हा ऐतिहासिक महत्वाचा दाखला आहे. त्यानंतरच्या काळांतहि त्याहून छोटे पण प्रत्ययकारी दाखले आपल्याला सापडतात. १९५३ च्या उत्तरार्धात व १९५४ सालीं मंदीचा एक माफक तडाखा बसला. व १९५४ सालचें उत्पादन आदल्या वर्षीच्या मानानें काहींसें घटलें. (१९५४ सालीं तें ३६०५० कोटी डॉलर होतें. आदल्या वर्षी तें ३६४५० कोटी डॉलर होतें. किमतींत फरक झाला नाहीं.) १९५३ सालीं १५ लाख माणसें बेकार होतीं. १९५४ सालीं ती संख्या ३२ लाखांवर गेली उत्पादनात अशी घट न होतां पूर्वीच्या काहीं वर्षात झाली तितकी वाढ जर झाली असती—तितकी वाढ होईल इतके कामगार देशात होते—तर २००० कोटी डालर्स किमतीचें अधिक उत्पादन पदरात पडलें असतें. ही रक्कम मध्यवर्ती सरकारच्या एकंदर चालू खर्चाच्या $\frac{3}{5}$ होती आणि राज्य सरकारें व स्थानिक स्वराज्य संस्था यांच्या एकंदर खर्चाइतकी होती. पण उत्पादनातल्या या घटीकडे कोणाचें लक्ष गेलें नाही आणि ती कोणाला जाणवतहि नाहीं. ह्या थंडपणाच्या मागे तशीच सबळ कारणें होतीं—ज्या वस्तूंचें उत्पादन झालें नाहीं त्यांची गरज काहीं तितकीशी निकडीची नव्हती. तें कसें तें आपण पुढें पाहूं. परंतु सौम्यशी मंदीदेखील उत्पादनाची किती हानी करते तें आपल्याला वरील आकड्यांवरून कळतें.

मंदीचें तात्कालिक कारण काहींहि असलें तरी मूलतः ती एकंदर मागणीत घट झाल्यामुळें निर्माण होते. ह्याचा अर्थ असा कीं अर्थव्यवस्थेचें उत्पादन खरेदी करण्यास समाजाची क्रयशक्ति अपुरी पडते. बेकारी निवारक विमा उतरलेला असला कीं माणसाची नोकरी गेली तरी त्याची क्रयशक्ति शाबूत रहाते. ती कमी होते, पण अजिबात नष्ट होत नाहीं. अशा प्रकारें बेकारीमुळें निर्माण झालेली असुरक्षितता कमी करण्यासाठीं केलेली उपाययोजना मंदीमुळें होणारी उत्पादनातील घट थांबविण्यासहि उपयोगी पडते. ही विमायोजना आर्थिक कार्यक्षमतेच्या अभावाचे प्रमुख कारणच अंशतः तरी दूर करते. आणि बेकारी निवारक विमायोजनेमुळें जो काहीं किरकोळ कामचुकारपणा होत असेल त्या पेक्षां त्या योजनेचा हा एकंदर मागणीवरील परिणाम अधिक महत्वाचा असतो. सांकेतिक शहाणपण ही गोष्ट ध्यानांत घेत नाहीं आणि त्यामुळें त्याचा गोंधळ उडतो.

केवळ बेकारी निवारक विम्याचाच मागणीवर असा परिणाम होतो असें नव्हे. शेतमालाच्या आधार किमतींचा देखील असाच परिणाम होतो. कारण जेव्हां शेतमालाच्या किमती, आणि शेतकऱ्यांचें उत्पन्न व क्रयशक्ति यांत घट होत असते तेव्हां या आधार-किमतींमुळें सरकारी खर्चात वाढ होते व ती या घटीची भरपाई करते.

सरकारच्या कल्याणकारी खर्चाचा देखील असाच परिणाम होतो. वार्धक्य व निराधार कुटुंबियांसाठीं ज्या विमायोजना असतात त्यांमुळें देखील जे काम करून पैसे मिळवूं शकत नाहींत अशांच्या हातांत अल्प प्रमाणांत का होईना पण निश्चितपणें पैसा येत रहातो. आर्थिक उत्पादनाला जरी ओहोटी लागली तरी क्रयशक्तीच्या या प्रवाहांत खंड पडत नाहीं आणि या गोष्टीची आर्थिक स्थैर्याला मदत होते. असुरक्षितता कमी करण्यासाठीं हे जे एकंदर उपाय योजलेले आहेत, ते आजच्या अर्थव्यवस्थेचे 'अंगभूत स्थैर्यस्थापक' या नात्यानें फार महत्वाचें कार्य करीत आहेत, अशा प्रकारें सांकेतिक शहाणपणाच्या दृष्टीनें ज्या योजना उत्पादन क्षमतेला विधायक होत्या त्याच ऐन वेळीं उत्पादनाची घसरगुंडी थांवविण्याचें कार्य करतात.

उत्पादनाची देखील आर्थिक सुरक्षिततेला अशीच मदत होते. आणि हें जें दोहोंतलें उलटें नातें आहे त्याच्या मागें अत्यंत प्रभावी अशा आर्थिक शक्ति आहेत. कामगार, शेतकरी व योजकवर्ग यांच्या आर्थिक सुरक्षिततेसाठीं उत्पादन उंच पातळीवर असणें कसें आवश्यक आहे तें आपण पाहिलें आहे. उत्पादन असें भरपूर असलें कीं सर्वांना आवश्यक तितकी सुरक्षितता लाभूं शकते. पण जर उत्पादनाची पातळी घसरली तर निदान सध्यांच्या विशिष्टस्पर्शी सुरक्षिततेच्या योजना तरी अवश्य तें संरक्षण देऊं शकत नाहींत. त्या दुय्यम दर्जाचेंच कार्य करतात. शिवाय वेकारी निवारक विमायोजना, वार्धक्य वेतनें वगैरे सुरक्षिततेच्या विशिष्टस्पर्शी योजना जरी अर्थव्यवस्थेला स्थैर्य प्राप्त करून देत असल्या तरी तो काहीं त्यांचा प्रमुख हेतु नव्हे. ज्याला मदत करायची त्याविशिष्ट व्यक्तीला डोळ्यासमोर ठेवूनच त्यांची एकंदर आखणी केलेली असते.

ह्या उलट अलीकडच्या काळात उत्पादनात वाढ व्हावी म्हणून जे प्रयत्न झाले ते मुख्यतः काहीं अधिक माल हातीं यावा म्हणून झाले नाहींत, तर वाढत्या उत्पादनामुळें जी आर्थिक सुरक्षितता लाभते त्यासाठीं झाले. ज्या मालाचें उत्पादन होतें तो आपल्याला हवा असो वा नसो पण त्याचें जे उत्पादन करतात त्यानां त्यामुळें खात्रीशीर उत्पन्न मिळतें. ह्यामुळें आर्थिक सुरक्षिततेचें उद्दिष्ट साध्य होतें. दुसऱ्या कोणत्याही मार्गानीं तें इतक्या चांगल्या प्रकारें साध्य होत नाहीं. उत्पादन जरी कितीहि मामुली गरजा पुरविणारें असलें तरी त्यात जर खंड पडला तर कोठें तरी कोणातरी व्यक्तीनां नोकऱ्यानां व उत्पन्नाला मुकावें लागतें. असें होऊं देणें आज शक्य नाहीं.

इथें निर्देशिलेली वस्तुस्थिती नित्य दृष्टोत्पत्तीस येणारी आहे. युनायटेड स्टेटस्, युनायटेड किंगडम व ब्रिटिश राष्ट्रकुलांतील प्रौढ देश इत्यादि पाश्चिमात्य देशांच्या राजकीय जीवनात एखाद्या सरकारनें जर अनावश्यक वेकारी टिकूं दिली तर तो

एक अक्षम्य अपराध मानला जातो. आणि या संदर्भात उल्लेख होतो तो उत्पादनातल्या घटीचा नव्हे तर वेकारीचा. आणि ह्यावर उपाय म्हणजे अर्थात अधिक रोजगारी व उत्पादन. अशा प्रकारें आर्थिक सुरक्षितता वाढविण्याचा प्रयत्न हा उत्पादनाच्या वाढीला कारणीभूत होतो.

ह्या प्रबंधातला युक्तिवाद आतां कोणत्या जागीं येऊन ठेपला आहे ह्याचें स्मरण वाचकाला करून देण्याची तशी फारशी आवश्यकता नाहीं. समता, सुरक्षितता व उत्पादनक्षमता ह्या आर्थिक जीवनातल्या प्राचीन उद्दिष्टांचा संकोच होऊन आतां फक्त उत्पादनक्षमता व उत्पादन या गोष्टीवर लक्ष केंद्रित झालेलें आहे. विषमतेमुळें निर्माण होणाऱ्या सामाजिक ताणांवर अधिक उत्पादन हा आतां रामबाण उपाय झाला आहे. आणि ह्यातच आपल्याला एका आधुनिक विरोधाभासाचे उत्तर किंवा निदान त्याची पहिली पायरी सांपडेल. तो विरोधाभास असा : आधुनिक काळात उत्पादन जसजसें वाढत गेलें तसतशी उत्पादनाविषयींची चिंता किंवा आस्था कां वाढत गेली ? आतांपर्यंत उत्पादनाइतकेंच समता व सुरक्षितता यानां महत्व होतें. पण आतां केवळ उत्पादनालाच विशेष महत्व दिलें जातें. या गोष्टीच्यामागें वर दिलेलीं कारणें आहेत. शिवाय इतरहि संकलित व सांगोपांग कारणपरंपरा त्यामागें आहे. आणि त्यामुळेंच रिकार्डोनें चित्रित केलेल्या दरिद्री अर्थव्यवस्थेत उत्पादनाला जितकें महत्व होतें तितकेंच निदान वरपांगी तरी आजहि त्याला आहे. उत्पादनावद्दलच्या आजच्या आस्थेचें स्वरूप व ती आस्था कायम ठेवण्याची साधनें यांचा अभ्यास ही आपल्या विवेचनातील आतां पुढली पायरी.

सरकारच्या कल्याणकारी खर्चाचा देखील असाच परिणाम होतो. वार्धक्य व निराधार कुटुंबियांसाठीं ज्या विमायोजना असतात त्यांमुळें देखील जे काम करून पैसे मिळवूं शकत नाहींत अशांच्या हातांत अल्प प्रमाणांत का होईना पण निश्चितपणें पैसा येत रहातो. आर्थिक उत्पादनाला जरी ओहोटी लागली तरी क्रयशक्तीच्या या प्रवाहांत खंड पडत नाहीं आणि या गोष्टीची आर्थिक स्थैर्याला मदत होते. असुरक्षितता कमी करण्यासाठीं हे जे एकंदर उपाय योजलेले आहेत, ते आजच्या अर्थव्यवस्थेचे 'अंगभूत स्थैर्यस्थापक' या नात्यानें फार महत्वाचें कार्य करीत आहेत, अशा प्रकारें सांकेतिक शहाणपणाच्या दृष्टीनें ज्या योजना उत्पादन क्षमतेला विधायक होत्या त्याच ऐन वेळीं उत्पादनाची घसरगुंडी थांबविण्याचें कार्य करतात.

उत्पादनाची देखील आर्थिक सुरक्षिततेला अशीच मदत होते. आणि हें जें दोहोंतलें उलटें नातें आहे त्याच्या मागें अत्यंत प्रभावी अशा आर्थिक शक्ति आहेत. कामगार, शेतकरी व योजकवर्ग यांच्या आर्थिक सुरक्षिततेसाठीं उत्पादन उंच पातळीवर असणें कसें आवश्यक आहे तें आपण पाहिलें आहे. उत्पादन असें भरपूर असलें कीं सर्वांना आवश्यक तितकी सुरक्षितता लाभूं शकते. पण जर उत्पादनाची पातळी घसरली तर निदान सध्यांच्या विशिष्टस्पर्शी सुरक्षिततेच्या योजना तरी अवश्य तें संरक्षण देऊं शकत नाहींत. त्या दुय्यम दर्जाचेंच कार्य करतात. शिवाय बेकारी निवारक विमायोजना, वार्धक्य वेतनें वगैरे सुरक्षिततेच्या विशिष्टस्पर्शी योजना जरी अर्थव्यवस्थेला स्थैर्य प्राप्त करून देत असल्या तरी तो काहीं त्यांचा प्रमुख हेतु नव्हे. ज्याला मदत करायची त्याविशिष्ट व्यक्तीला डोळ्यासमोर ठेवूनच त्यांची एकंदर आखणी केलेली असते.

ह्या उलट अलीकडच्या काळात उत्पादनात वाढ व्हावी म्हणून जे प्रयत्न झाले ते मुख्यतः काहीं अधिक माल हातीं यावा म्हणून झाले नाहींत, तर वाढत्या उत्पादनामुळें जी आर्थिक सुरक्षितता लाभते त्यासाठीं झाले. ज्या मालाचें उत्पादन होतें तो आपल्याला हवा असो वा नसो पण त्याचें जे उत्पादन करतात त्यानां त्यामुळें खात्रीशीर उत्पन्न मिळतें. ह्यामुळें आर्थिक सुरक्षिततेचें उद्दिष्ट साध्य होतें. दुसऱ्या कोणत्याही मार्गानीं तें इतक्या चांगल्या प्रकारें साध्य होत नाहीं. उत्पादन जरी कितीहि मामुली गरजा पुरविणारें असलें तरी त्यात जर खंड पडला तर कोठें तरी कोणातरी व्यक्तीनां नोकऱ्यानां व उत्पन्नाला मुकावें लागतें. असें होऊं देणें आज शक्य नाहीं.

इथें निर्देशिलेली वस्तुस्थिती नित्य दृष्टोत्पत्तीस येणारी आहे. युनायटेड स्टेटस्, युनायटेड किंगडम व ब्रिटिश राष्ट्रकुलांतील प्रौढ देश इत्यादि पाश्चिमात्य देशांच्या राजकीय जीवनात एखाद्या सरकारनें जर अनावश्यक बेकारी टिकूं दिली तर तो

एक अक्षम्य अपराध मानला जातो. आणि या संदर्भात उल्लेख होतो तो उत्पादनातल्या घटीचा नव्हे तर वेकारीचा. आणि ह्यावर उपाय म्हणजे अर्थात अधिक रोजगारी व उत्पादन. अशा प्रकारें आर्थिक सुरक्षितता वाढविण्याचा प्रयत्न हा उत्पादनाच्या वाढीला कारणीभूत होतो.

ह्या प्रबंधातला युक्तिवाद आतां कोणत्या जागीं येऊन ठेपला आहे ह्याचें स्मरण वाचकाला करून देण्याची तशी फारशी आवश्यकता नाहीं. समता, सुरक्षितता व उत्पादनक्षमता ह्या आर्थिक जीवनातल्या प्राचीन उद्दिष्टांचा संकोच होऊन आतां फक्त उत्पादनक्षमता व उत्पादन या गोष्टीवर लक्ष केंद्रित झालेलें आहे. विषमतेमुळें निर्माण होणाऱ्या सामाजिक ताणांवर अधिक उत्पादन हा आतां रामबाण उपाय झाला आहे. आणि ह्यातच आपल्याला एका आधुनिक विरोधाभासाचे उत्तर किंवा निदान त्याची पहिली पायरी सांपडेल. तो विरोधाभास असा : आधुनिक काळात उत्पादन जसजसें वाढत गेलें तसतशी उत्पादनाविषयींची चिंता किंवा आस्था कां वाढत गेली ? आतांपर्यंत उत्पादनाइतकेंच समता व सुरक्षितता यानां महत्व होतें. पण आतां केवळ उत्पादनालाच विशेष महत्व दिलें जातें. या गोष्टीच्यामागें वर दिलेलीं कारणें आहेत. शिवाय इतरहि संकलित व सांगोपांग कारणपरंपरा त्यामागें आहे. आणि त्यामुळेंच रिकार्डोनें चित्रित केलेल्या दरिद्री अर्थव्यवस्थेत उत्पादनाला जितकें महत्व होतें तितकेंच निदान वरपांगी तरी आजहि त्याला आहे. उत्पादनाबद्दलच्या आजच्या आस्थेचें स्वरूप व ती आस्था कायम ठेवण्याची साधनें यांचा अभ्यास ही आपल्या विवेचनातील आतां पुढली पायरी.

प्रकरण नववें

उत्पादनाचें सर्वोच्च स्थान

१९५४ च्या शरद् ऋतूत अमेरिकन कांग्रेसच्या निवडणुकी झाल्या. तेंव्हां डेमॉक्रॅटिक पक्षानें आपल्या कारभारावर केलेल्या टीकेला उत्तर देतांना रिपब्लिकन पक्षानें असा युक्तिवाद केला कीं चालू वर्षाहून उत्तम असें एकच वर्ष या पूर्वीच्या इतिहासांत होऊन गेलें. हें समर्थन कांहीं सर्वतोपरीनें समाधानकारक नव्हतें. कांहीं लोकांनी तत्काळ असें म्हटलें कीं इतिहासातलें दुसऱ्या नंबरचें उत्तम वर्ष कांहीं पुरेसें चांगलें नाहीं. अमेरिकन लोकांसाठीं तर खात्रीनें नाहीं. पण ह्या वादावादीत एखादें वर्ष चांगलें कीं वाईट हें ठरवायचा निकष कोणता या बाबतींत मात्र दोन्ही पक्षातल्या लोकानीं कोणताच मतभेद व्यक्त केला नाहीं. किंवा एक विशिष्ट निकष कां मान्य करण्यात आला यांचें स्पष्टीकरण करण्याचीहि कोणाला आवश्यकता वाटली नाहीं. दुसऱ्या नंबरचें म्हणजे कला किंवा शास्त्रें यांच्या प्रगतीच्या संदर्भात दुसऱ्या नंबरचें असा अर्थ लावण्याचा विक्षिप्तपणा कोणी करणें शक्य नव्हतें. आरोग्य, शिक्षण किंवा तरुण मुलांच्या गुन्हेगारी विरुद्ध चाललेली लढाई यांच्या संदर्भात त्या वर्षाला दुसरा क्रम देण्यांत आला आहे असेंहि कोणी मानणें शक्य नव्हतें. किरणोत्सर्गी शस्त्रास्त्रांनीं सिद्ध झालेल्या जगात माणसानें जिवंत रहाण्याची शक्यता एखाद्या वर्षांत वाढली आहे कीं कमी झाली आहे यावरून तें वरें कीं वाईट तें ठरवावें असें कोणीहि सुचविलें नाही. त्या वेळीं धर्मकृत्याकडे लोकांचें लक्ष जरा अधिक वळलें होतें आणि या धार्मिकतेचें कांहींसें प्रदर्शनहि केलें जात होतें. पण तरी १९५४ साली किती लोकानां अध्यात्मिक शांतीचा लाभ झाला याचा हिशोब करून त्यावरून तें दुसऱ्या क्रमाचें उत्तम वर्ष आहे असा कांहीं कोणी निष्कर्ष काढला नाहीं.

दुसऱ्या क्रमाचें उत्तम वर्ष याचा अर्थ एकच होता. तो असा कीं त्या वर्षातलें आर्थिक उत्पादन एक वर्ष सोडल्यास इतिहासांतल्या कोणत्याहि इतर वर्षांतल्या उत्पादनापेक्षा अधिक होतें. १९५४ सालापेक्षां देखील अधिक उत्पादन आधींच्या एका वर्षी झालें होतें आणि त्यामुळें त्याचा नंबर वरचा होता. १९५४ सालचें सरसकट राष्ट्रीय उत्पादन ३६०५० कोटी डॉलर होतें. आदल्या वर्षी तें ३६४५० कोटी डॉलर होतें. उत्तमत्व योजण्याची ही फूटपट्टी सर्वानांच मान्य होती. ज्या बद्दल मतभेदच नव्हे तर वादही होत नाहीं असा निष्कर्ष एखाद्या वेळीं आढळला कीं

समाधान वाटतें ! उत्पादनाच्या महत्वाबद्दल रिपब्लिकन्स व डेमॉक्रॅटस् यांत मतभेद नाहीं. नव्हे उजवे व डावे, गोरे व काळे, कॅथॉलिक व प्रोटेस्टंट या कोणांतच त्या बाबतींत मतभेद नाहीं. कम्युनिस्ट पक्षाचे प्रमुख कार्यवाह, अमेरिकन्स फॉर डेमॉक्रॅटिक ॲक्शन या संघटनेचे अध्यक्ष, आणि युनायटेड स्टेटस् चेंबर ऑफ कॉमर्स व नॅशनल असोसिएशन ऑफ मॅन्युफॅक्चरर्स या संस्थांचे प्रमुख या सर्वांचें या बाबतींत एकमत आहे.

उत्पादन म्हणजे कांहीं जीवन सर्वस्व नव्हे असें आपल्याला नित्य सांगितलें जातें. जीवनाला अध्यात्मिक बाजू देखील असते याचें कोणी स्मरण करून दिलें तर आपण त्याला फार महत्व देतो, आणि असे स्मरण जे करून देतात त्यांचे म्हणणें आदरपूर्वक ऐकून घेतो. पण ह्या गोष्टीचें नेहमीं स्मरण करून दिलें जावें ही घटना अर्थपूर्ण आहे. कारण जें नित्य विसरलें जातें त्याचेंच स्मरण करून द्यावें लागतें. आपण एकंदर जीवनक्रमात समंजसपणें व व्यवहारीपणें वागलें पाहिजे याबद्दल कोणालाच शंका वाटत नाहीं. आणि उत्पादनाला महत्व देणें हें समंजसपणाचें व व्यवहारीपणाचें समजलें जातें. यावरूनच आपल्या राष्ट्रीय मनोवृत्तीत उत्पादनाला केवढी प्रतिष्ठा आहे त्याची कल्पना येते. तसेंच एखाद्या योजकाला उत्पादन म्हणजे काय तें समजतें असें म्हणणें ही त्याच्या कुशाग्र बुद्धिमत्तेची सर्वांत मोठी स्तुती आहे असें मानलें जातें. शास्त्रज्ञाना आपल्या काळात प्रतिष्ठा नाहीं असें म्हणता येणार नाहीं, पण त्यांचा जर खराखुरा उपयोग करून घ्यायचा असेल तर एखाद्या उत्पादनाकडे लक्ष पुरविणाऱ्या माणसाच्या हाताखालीं त्यानीं काम केलें पाहिजे असें आपण अजूनहि मानतो. 'अधिक व चांगल्या दर्जाच्या उत्पादनाला जर कोणत्याहि नियंत्रणाचा अगर साधनाचा अडथळा होत असेल तर त्याला भयभीत अंतःकरणानेंच विरोध केला जातो. धार्मिक लोक जसे अश्रद्धपणाला किंवा युद्धोत्सुक लोक जसे शांततावादाला आंधळा विरोध करतात तसाच हा विरोध आंधळा असतो.[1]

उत्पादनाची प्रतिष्ठा साऱ्या सीमारेषा ओलांडते. अमेरिकेतील रहाणीचें मान हें 'साऱ्या जगाला चकित करून सोडतें.' असें आपल्याला नित्य सांगितलें जातें आणि तें पुष्कळसें खरेंहि आहे. आपल्या संस्कृतीचें, फार काय आपल्या खुद्द अस्तित्वाचेंच समर्थन सांस्कृतिक शहाणपणा या गोष्टीच्या आधारें करतें.

[२]

टॉनेनें असें म्हटलें आहे कीं आपण ज्या हवेचा श्वास घेतो तिच्या गुणविशेषांची आपल्याला क्वचितच जाणीव असते. पण लॉस एंजलिसमध्यें ती फार दूषित झालेली

१ जॉफ्रे गोरर, द अमेरिकन्स (लंडन, क्रेसेट प्रेस १९४८) पृ. १२१.

आहे. आणि म्हणून तिच्याकडे आपण गंभीरपणें लक्ष देतो. त्यांचप्रमाणें नव्यानेंच लागवडीखालीं आणलेल्या वाळवंटात जे रहातात त्यानां तेथील कालव्यातल्या पाण्याकडे पाहिलें कीं निसर्गावर आपण कशी मात केली त्याचें स्मरण होतें. सॅरॅसोटाला गेलेल्या शिकागोच्या रहिवाश्यानें आपल्या उन्हानें तांबुस व तजेलेदार झालेल्या पोटाकडे पाहिलें कीं आपण आपलें अंधारलेलें व थंडीनें गोठलेलें निवास-स्थान सोडून बाहेर पडण्यात कशी हुषारी दाखवली याचें त्याला कौतुक वाटतें. पण जेथें सूर्यप्रकाश व पाऊस यांची विपुलता असते तेथें त्यांच्याकडे कोणी लक्ष देत नाहीं. रिकार्डोच्या काळात वस्तूंचा पुरवठा अगदीं अल्प होता. आणि माणसाला जगता येईल व त्याच्या प्राथमिक सुखसोयींची तरतूद होईल इतपत प्रमाणातच त्या उपलब्ध होत्या. त्या वस्तूंमुळें त्याचें पोट भरत असे, तो घराबाहेर पडेल तेव्हां त्याचें अंग झाकलें जात असे व तो घरांत असेल तेव्हां त्याच्या अंगात ऊब रहात असे. अशा स्थितींत या वस्तूंचें उत्पादन कसें होतें यावर माणसांचे विचार केंद्रित व्हावे यात कांहीं आश्चर्य नाहीं.

पण आतां उपयुक्त वस्तूंची रेलचेल झाली आहे. युनायटेड स्टेटस्‌मध्यें उपासमारी-पेक्षां फाजील आहारामुळेंच अधिक माणसें मरण पावतात. जेथें लोकसंख्येच्या मानानें अन्नाचा पुरवठा कमी पडतो असें मानलें जात होतें तेथें आतां अन्नाच्या मानानें लोकसंख्या अपुरी पडते आहे. आपल्या मोटारगाडयांची लांबी आज चार पांच फूट अधिक आहे ती केवळ शोभेसाठीं. यासाठीं जें पोलाद लागतें त्याची आपल्याला निकडीची गरज आहे असें कोणीहि गंभीरपणें म्हणूं शकणार नाहीं. पुष्कळशा स्त्रिया आणि कांहीं पुरुष यांच्या दृष्टीनें कपडा हें आतां शरिराचें संरक्षक आवरण राहिलेलें नाहीं. पक्षाच्या पिसाऱ्या प्रमाणेंच तें केवळ लैंगिक आकर्षणाचें साधन झालें आहे. तरी देखील उत्पादन हें आपल्या विचारांच्या केंद्रस्थानीं आहे. सूर्यप्रकाश किंवा पाणी यासारखीच ती एक नित्याची व दुर्लक्ष करण्यासारखी गोष्ट आहे असें आपण मानत नाहीं; उलट आपल्या संस्कृतीची प्रगती व गुणवत्ता यांची ती फूटपट्टी आहे.

उत्पादनाचें आपल्याला हें जें महत्व वाटतें त्याच्या मुळांशीं प्रभावी अशा ऐतिहासिक व मानसिक प्रवृत्ति आहेत. आणि मोठ्या निर्धारानें इच्छा शक्तीचा उपयोग केला तरच या प्रवृत्तींच्या मिठींतून आपली मुक्तता होऊं शकेल. विषमता व तिच्यावरचे गैरसोयीचे तोडगे यांतून जे सामाजिक ताण पूर्वीपासून निर्माण होत आले आहेत ते आपण उत्पादन क्षमतेमुळेंच टाळूं किंवा सौम्य करूं शकलों आहोंत. त्याचप्रमाणें असुरक्षितता कमी करण्याचे जें आपले प्रयत्न आहेत त्यांच्या केंद्र-स्थानीं ही उत्पादन क्षमताच आहे. शिवाय बुभुक्षितपणांचें सर्वमान्य पण अत्यंत

शंकास्पद मानसशास्त्र, राष्ट्रीय हिताबद्दलची तितकीच सर्वमान्य व तितकीच शंकास्पद मीमांसा आणि प्रभावी असे गुंतलेले हितसंबंध यांचा भक्कम आधार उत्पादनक्षमतेचें हें महत्व कायम ठेवण्यास मदत करीत आहेत. जीवनाचें उद्दिष्ट या नात्यानें उत्पादनाचें आपल्याला इतकें महत्व वाटतें कीं त्याबद्दल कोणी शंका व्यक्त केलीं तर या परतें दुसरें उद्दिष्ट आहे तरी कोठें ? असा प्रश्न त्याला पहिल्या प्रथम विचारला जाईल. आपल्या विचार क्रियेंत उत्पादनानें इतकीं जागा व्यापलेली आहे कीं त्याला दुय्यम स्थान दिलें तर एक मोठी पोकळी निर्माण होईल असें आपल्याला वाटते. पण सुदैवानें आपल्याला डोळ्यासमोर ठेवता येतील अशी इतर उद्दिष्टेंहि आहेत. आणि त्यांबद्दलचा शेवटच्या प्रकरणांत आपण विचार करणार आहोंत. पण त्यांपूर्वी उत्पादनाला आपण जें सध्यां महत्व देतों त्याची चिकित्सा आपण करायला हवी. कारण ज्या ठरीव, आंखींव दृष्टिकोनातून आपण उत्पादनाकडे पहातों आणि विशेष म्हणजे आर्थिक उत्पादन वाढविण्याच्या विशिष्ट पद्धतीनां जे अवास्तव महत्व आपण सांकेतिक व अत्यंत तर्कदुष्ट कारणानीं देतो त्यांचा अभ्यास केला कीं उत्पादनाला दिले जाणारें हें महत्व केवळ परंपरेवर व सामाजिक दंतकथावर आधारलेलें आहे हें उत्तम प्रकारें स्पष्ट होतें.

[३]

तत्वतः पाहिलें तर उत्पादन पांच वेगवेगळ्या मार्गांनीं वाढवता येतें. त्यांची औपचारिकपणें नोंद केली तर तें उपयुक्त ठरेल ते पांच मार्ग असे:

(१) उपलब्ध असलेल्या उत्पादनाच्या साधनांचा, विशेषतः कामगार व भांडवल (यांत उपलब्ध कच्च्या मालाचा समावेश होतो.) यांचा अधिक पूर्णपणें उपयोग करणें म्हणजेच बेकारी किंवा निरुद्योगीपणा नष्ट करणें.

(२) उपलब्ध तांत्रिक ज्ञानाच्या संदर्भांत या उत्पादनांच्या साधनांचा अधिक कार्यक्षमतेनें उपयोग करणें. श्रमशक्ति व भांडवल यांचा जास्तीत जास्त फायदेशीर ठरेल असा संयोग करता येईल आणि ग्राहकांच्या आवडीनिवडी लक्षांत घेऊन त्याची निरनिराळ्या वस्तूंच्या व सोयीच्या उत्पादनासाठीं सर्वात फायदेशीर अशी विभागणी करता येईल.

(३) श्रमशक्तीचा पुरवठा वाढविता येईल.

(४) भांडवलाचा पुरवठा वाढवता येईल. हे भांडवल श्रमशक्तीची जागा देखील भरून काढूं शकतें.

(५) तांत्रिक शोध लावून उत्पादनाच्या तंत्रात सुधारणा करता येईल. त्या योगें श्रमशक्ति व भांडवल यांच्या उपलब्ध पुरवठ्याच्या सहाय्यानें अधिक उत्पादन करता येईल. शिवाय भांडवली वस्तूंच्या गुणवत्तेतहि सुधारणा होईल.

उत्पादन वाढविण्याच्या ह्या वेगवेगळ्या पद्धतींपैकीं अमकी एक पद्धत अधिक परिणामकारक असते असें आपण केवळ अनुमान धक्क्यानें म्हणूं शकणार नाहीं.[1] उत्पादन वाढविण्याचा जर गंभीर प्रयत्न करायचा असेल तर या पांचहि पद्धतींवर भर द्यावा लागेल. परंतु आश्चर्याची गोष्ट अशी कीं उत्पादन वाढविण्याच्या या पांच पद्धतींपैकीं एकीवरच आपण विशेष भर देतो आणि इतर दोन अगर तीन पद्धतींकडे अगदींच तुटपुंजे लक्ष पुरवितों.

अशा रितीनें उपलब्ध साधनांच्या द्वारें उत्पादन (व उत्पादित वस्तूंची संख्या) वाढविण्यात तांत्रिक प्रगति फार मोठे सहाय्य करते ही गोष्ट सांकेतिक शहाणपणाचे पुरस्कर्ते देखील मान्य करतात. ह्या सहाय्याचा नेहमी मोठ्या आणि काहींशा अतिरिक्त अभिमानानें उल्लेख केला जातो. आतां तांत्रिक प्रगति काहीं यदृच्छेनें घडत नाहीं. ही प्रगति ज्याचे स्वरूप अत्यंत संघटित आहे अशा शास्त्रीय व यंत्रविषयक ज्ञानावर आणि कौशल्यावर भांडवली खर्च केल्यामुळें घडून येते. पण तरी ह्या क्षेत्रात भांडवल गुंतवलें जावें या साठीं आपण फारच थोडा प्रयत्न करतो. याला अपवाद एकच आणि तो म्हणजे सैन्याच्या तांतडीच्या तांत्रिक गरजा. एरवीं या क्षेत्रात जी काहीं भांडवलाची गुंतवणूक होत आहे ती ठीक आहे असें आपण मानतो आणि त्या भांडवलापासून जो फायदा होतो त्याचें सहर्ष स्वागत करतो.

खरें म्हणजे या तांत्रिक क्षेत्रांत भांडवलाची गुंतवणूक अधिक मोठ्या प्रमाणावर व अधिक सुबुद्धपणें करणें खात्रीनें शक्य आहे. अगदीं वरवर पाहिले तरी असें आढळून येतें कीं ज्या शास्त्रीय व यांत्रिक साधनांच्या द्वारें आधुनिक तंत्रविद्येचा विकास होतो तीं साधनें निरनिराळ्या उद्योगांत अगदीं विषमपणें विभागलीं गेलीं

---

१ १८६१-७३ व १९४४-५३ या दरम्यानच्या कालखंडात नक्त राष्ट्रीय उत्पादन प्रतिवर्षी सरासरी ३·५ टक्क्यांनीं वाढलें. ह्या पैकीं सुमारें निम्मी (१·७ टक्के) वाढ भांडवल व श्रमशक्ति याच्या वाढीमुळें झाली. बाकीची वाढ भांडवली सामुग्रीतील तांत्रिक सुधारणामुळें व ती यंत्रसामुग्री तयार करणाऱ्या व चालविणाऱ्या कामगारांतील सुधारणेमुळें झाली असा निष्कर्ष काढला तर तो अयोग्य ठरणार नाहीं. अलीकडच्या काळांत उत्पादनात जी वाढ झाली तिला तांत्रिक प्रगति अधिक प्रमाणांत कारणीभूत झाली. भांडवल व श्रमशक्ति यांच्या निव्वळ वाढीला तिचे श्रेय त्या मानानें कमी प्रमाणांत देता येईल. पहा, मोझेस ॲब्रॅमोविच, रिसोर्सेस् ॲंड आउटपुट ट्रेंडस् इन् द युनायडेट स्टेटस् सिन्स १८७०, आणि जॉन् डब्ल्यू. केंड्रिक, प्रोडक्टिव्हिटी ट्रेंडस्: कॅपिटल ॲंड लेबर, ऑकेजनल पेपर्स ५२ आणि ५३, नॅशनल ब्यूरो ऑफ इकॉनॉमिक रिसर्च, न्यू यॉर्क, १९५६.

आहेत. ज्या उद्योगांत अर्थसंस्थांची संख्या थोडी आहे व त्यांचा व्याप मोठा आहे त्या उद्योगांत म्हणजे खनिज तेल, धातुसंस्करण, मोटारी, रसायनें, रबर, मोठी यंत्रसामुग्री इत्यादींचें उत्पादन करणाऱ्या उद्योगांत तांत्रिक प्रगतीसाठीं बऱ्याच भांडवलाचा निवेश केला जातो. तांत्रिक प्रगति ज्या संशोधनात्मक व विकासात्मक कार्यावर अवलंबून असते त्यावर बराच खर्च केला जातो व तें व्यापक प्रमाणावर हातीं घेण्यांत येतें. पण ज्या अनेक उद्योगांतल्या अर्थसंस्था संख्येनें विपुल व आकारानें लहान आहेत अशा उद्योगांत म्हणजे कोळशाचें उत्पादन, घरें बांधणें, कपडे तयार करणे, नैसर्गिक तंतूंचे कपडे करणें, वेगवेगळ्या सोयी करणें इत्यादि कार्य करणाऱ्या उद्योगांत तांत्रिक प्रगतीवर फारच थोडें भांडवल खर्च केलें जातें. हें भांडवल मोठ्या प्रमाणावर गुंतविण्याची ताकद या उद्योगांतील कोणत्याच अर्थसंस्थेंत नसते आणि पुन्हां ह्या अर्थसंस्थांनीं अशा प्रकारें भांडवल गुंतविणें त्यांच्या दृष्टीनें फायद्याचें आहे कीं नाहीं हा प्रश्न शिल्लक रहातोच.[1] शेतीच्या क्षेत्रांत तांत्रिक प्रगतीवर मध्यवर्ती व राज्य सरकारें बराच पैसा खर्च करतात. पण या छोट्या अर्थसंस्थांनीं चालविलेल्या उद्योगांत संशोधन व विकास यांवर सार्वजनिक पैसा खर्च केला जात नाहीं. परंतु इतर उद्योगांत तांत्रिक प्रगतीवर खर्च केल्यामुळें जो लाभ होतो त्याचें आपल्याला विशेष महत्त्व वाटत असलें तरी या उद्योगांत तांत्रिक प्रगतीवर खर्च होत नाहीं इकडे आपण कांहींच लक्ष देत नाहीं. कांहीं उद्योगांची प्रगति होत आहे या गोष्टीचें आपल्याला फार महत्त्व वाटतें. पण इतरांची प्रगति होत नाहीं याची आपल्याला जवळजवळ कांहींच चिंता वाटत नाहीं.

एखाद्या उद्योगांत विशेष प्रगति झाली नाहीं तर तिकडे दुर्लक्ष करणें सोपें असतें. जन्माला न आलेल्या मुलांची उणीव जशी भासत नाहीं तशी न लावलेल्या शोधांचीहि भासत नाहीं. नवीन विकास जेव्हां होत नाहीं तेव्हां आधीं झालेल्या प्रगतीचें बरींच वर्षें कौतुक वाटत रहातें. कम्बाइन या यंत्राचा शोध लागण्यापूर्वीं चाळीस वर्षें शेतीसाठीं यंत्रें तयार करणाऱ्या उद्योगांत सेल्फ-बाइन्डर या यंत्राविषयीं अतोनात कौतुक वाटत होतें. पण उत्पादनाची वाढ व्हावी याविषयीं आपण जर खरोखरच उत्सुक असलों तर या प्रश्नाची आपण खोलवर चिकित्सा करूं आणि एखाद्या उद्योगांत तांत्रिक प्रगतीसाठीं कांहींच खर्च होऊं नये हा प्रकार आपण मुळींच सहन करणार नाहीं. पण प्रत्यक्षांत अनेक उद्योग तांत्रिक प्रगतीवर कांहींच खर्च करीत नाहींत. आणि त्यांच्या वतीनें इतरहि कोणी तसा खर्च करीत नाहीं. कोणीं केलाच तर तो अगदीं अल्प असतो. पण या गोष्टीची आपल्याला कांहींच खंत वाटत नाहीं.

---

१ ह्या मुद्द्याचें कांहींसें तपशीलवार विवेचन मीं माझ्या 'अमेरिकन कॅपिटॅलिझम : द कन्सेप्ट ऑफ काउन्टरव्हेलिंग पॉवर' या पुस्तकांत केलें आहे. पृ. ८४-९४.

[४]

नित्याच्या आर्थिक चर्चेंत भांडवलाचा संचय हेंच बहुधा आर्थिक विकासाचें गमक मानलें जातें. नित्याच्या उपभोगावरच्या खर्चातून बचत केली आणि तिचा निवेश केला कीं हा भांडवलाचा संचय होतो. आणि जी कांहीं तांत्रिक प्रगति होईल तिच्यावर जसे आपण संतुष्ट असतों तोच प्रकार भांडवलाच्या संचयांबावत घडतो. आपण पुरेसें भांडवल उभारीत नाहीं आणि रशियन लोक आपल्या उत्पन्नाचा बराच अधिक भाग भांडवलांत घालतात असें एखादा अभ्यासक निदर्शनास आणतो. बचतीचें गुणगान आपण यांत्रिकपणानें करीत असतों. परंतु त्यानुसार प्रत्यक्षांत कांहीं कृति करणें आवश्यक आहे असें कोणीच मानत नाहीं उलट, अशी एक सर्वसाधारण समजूत आहे कीं, अमेरिकन अर्थव्यवस्थेंत सध्यां जो भांडवलाचा निवेश होत असतो तो अपुरा कधींच नसतो आणि बहुधा स्पृहणीय असतो.

जी गोष्ट भांडवलाची तीच श्रमशक्तीची. एके काळीं जेव्हां आपल्या राज्यांतील संपत्तीचें उत्पादन वाढावें असें राजांना अगर सरदारांना वाटत असे तेव्हां ते कुशल कारागीर परदेशांतून आणवीत असत. आज अमेरिकन अर्थव्यवस्थेच्या विकासाला सर्वांत मोठा अडथळा जर कोणता असेल तर तो कामगारांच्या मर्यादित पुरवठ्याचा आहे. (पुष्कळशा वस्तूंच्या उत्पादनांत सामान्यतः श्रमशक्तीची जागा भांडवल भरून काढूं शकतें. आणि त्याचा उत्पादनखर्चावरहि फारसा परिणाम होत नाहीं. पण हें व्हायला थोडा अवधि लागतो.) आपल्या कामगार दलांत भरती होण्यास योग्य असे असंख्य उमेदवार जगांत आहेत. परंतु उत्पादन वाढविण्याचा हा मार्ग लोकांना अत्यंत संशयास्पद वाटतो. देशांतील जनन-प्रमाण वाढवून त्यायोगें कामगारदलांत वाढ करावी अशी जरी कोणीं सूचना केली तरी ती कांहींशी फसवी आहे असें मानलें जाईल. ह्या विरोधाच्या मुळाशीं असा एक समज आहे कीं, लोकसंख्येंत वाढ झाली तर एकंदर उत्पादन वाढेल पण दरडोई उत्पादन वाढणार नाहीं. हा समज सर्वथैव खरा नाहीं. शिवाय तत्त्वज्ञानांतल्या एका सूक्ष्म प्रश्नाचें उत्तर आपण निर्णायकपणें देऊन टाकलें आहे. तें उत्तर असें : जे जन्मालाच येत नाहींत त्यांना वस्तूंचा उपभोग न घेतां आल्यामुळें त्यांचें कांहींच नुकसान होत नाहीं. एकंदरींत लोकसंख्येंतल्या वाढीचा रहाणीच्या मानावर जरी कांहींहि परिणाम होत असला तरी एक गोष्ट मात्र खरी. ती अशी कीं, उत्पादनाच्या वाढीचें आपल्याला पुरेसें महत्त्व वाटत नाहीं किंवा कामगारांची संख्या वाढवून उत्पादन वाढवावें असें ठरविण्याइतका सुबुद्धपणा आपल्या अंगीं नाहीं.

मंदीमुळें जी उत्पादनाची हानि होते—आणि सौम्यशा मंदीमुळें देखील बरीच हानि होऊं शकते हें आपण गेल्या प्रकरणांत पाहिलेंच आहे–तिच्याबद्दल देखील

अर्थशास्त्रज्ञांनीं जरी थोडाफार विद्वत्तापूर्ण खेद व्यक्त केला तरी एकंदर समाजाला कांहीं तिच्यावद्दल विशेष चिंता वाटत नाहीं. मंदीमुळें उत्पादनाची जी हानि होते ती लोकांना भयकारक वाटत नाहीं. त्यांना भय वाटतें तें बेकारीचें आणि त्यामुळें गमावलेल्या उत्पन्नाचें, थोडक्यांत म्हणजे आर्थिक सुरक्षिततेला जो धोका असतो त्याचें.

उलट भांडवल अगर कामगार यांनीं वृद्धया उत्पादनाच्या कार्यांत भाग घेण्याचें नाकारलें अगर त्यांचा संयोग व उपयोग कार्यक्षमतेनें किंवा धिटाईनें करण्यांत आला आणि त्यामुळें जर उत्पादनाची हानि झाली तर त्याची आपण अत्यंत गंभीरपणें दखल घेतों. कामगारानें कामचुकारपणा करावा यावद्दल आम्ही खेद व्यक्त करतों. कामगारांना पराच्या गादीवर बसविण्याचा प्रयत्न करणाऱ्या कामगारसंघटनेला आपण तीव्रपणें विरोध करतों. मक्तेदारीमुळें एखाद्या उद्योगांत भांडवल व श्रमशक्ति यांचा इष्टतम प्रमाणांत उपयोग केला जात नाहीं आणि त्यामुळें उत्पादित वस्तूंची किंमत वाजवीपेक्षां अधिक ठेवावी लागते. जीं साधनें मक्तेदारीखालील उद्योगांत वापरलीं जात नाहींत तीं वाजवीपेक्षां अधिक प्रमाणांत इतर उद्योगांत वापरलीं जातात. याचा अर्थ असा कीं, त्यांची विभागणी निरनिराळ्या उद्योगांत इष्ट प्रमाणांत होत नाहीं व त्यामुळें त्यांचा उपयोग कमी फलदायी ठरतो. ह्या गोष्टींना कारणीभूत होणारी मक्तेदारी नष्ट करून त्यायोगें उत्पादन वाढविण्याचा जर कोणीं प्रयत्न केला तर त्याला पुष्कळ पाठिंबा मिळतो. या प्रयत्नांत पुढाकार घेण्यांत अर्थशास्त्रज्ञांनीं कधींच खळखळ केलेली नाहीं.[1] इतर कांहीं गोष्टींनाहि लोक असेंच महत्त्व देतात व विरोध करतात. त्या अशा : जकाती व मूलतःच महागच्या असलेल्या उद्योगांत भांडवलाचा अतिरिक्त निवेश यांमुळें होणारा साधनांचा अयोग्य उपयोग, अकार्यक्षम उद्योगांवर किंवा अर्थसंस्थांवर मेहेरनजर करून त्यांना दिलेलें उत्तेजनसहाय्य (Subsidy) आणि खूप जाहिरात, विक्रीखर्च किंवा उधळपट्टीसारखा भासणारा तसाच इतर खर्च यांना कारणीभूत होणारे औद्योगिक संघटनेचे विशिष्ट प्रकार. जो उद्योग वर्षानुवर्षें संशोधन करीत

१ मक्तेदारीमुळें खरोखरच असें नुकसान होतें का यावद्दल साधार शंका घेतली गेली असून देखील (अर्थशास्त्रज्ञ असा पुढाकार घेतात) पहा, अर्नाल्ड सी. हारबर्जर लिखित 'मोनॉपली ॲंड रिसोर्स ॲलोकेशन,' अमेरिकन इकॉनॉमिक रिव्हयू, प्रोसीडिंग्ज्, खंड अंक २ (मे, १९५४) आणि 'द सोशल कॉस्ट ऑफ कॉर्पोरेट मोनॉपली प्रॉफिट्स्,' लेखक-हेन्री. एच्. व्हिलिअर्ड, पोलिटिकल सायन्स क्वॉर्टर्ली, खंड अंक ३ (सप्टेंबर १९५७).

नाहीं व त्यामुळें वेताचीच तांत्रिक प्रगति करतो त्याचा लोकांना विशेष राग येत नाहीं. पण जर एखाद्या अर्थसंस्थेनें एखादा शोध लावला आणि मग तो दडपून ठेवला तर त्याबद्दल मात्र फार संताप व्यक्त केला जातो.

मक्तेदारी, जकाती, उत्तेजनसहाय्य किंवा संघटित व निलाजरा कामचुकारपणा यांना दिलें जाणारें महत्त्व अनुचित आहे असा वरील विवेचनाचा अर्थ नव्हे. शिवाय या गोष्टींच्या संदर्भांत उत्पादनातील कार्यक्षमता हा जरी मध्यवर्ती प्रश्न असला तरी तो कांहीं त्या संदर्भांतला एकमेव प्रश्न नव्हे. आपली उत्पादनाच्या वाढीबाबतची आस्था किती एकांगी आणि खरें म्हणजे विक्षिप्त स्वरूपाची असते तें मला इथें दाखवून द्यायचें आहे. ह्या गोष्टीचीं कारणें शोधायला दूर जायला नको. शंभर वर्षांपूर्वी म्हणजे एकोणिसाव्या शतकाच्या मध्यावर ब्रिटनमधला एखादा अर्थशास्त्रज्ञ आपल्या देशांतील उत्पादन कसें वाढवतां येईल त्याची पहाणी करूं लागला असता तर त्यानें अशी शिफारस केली असती कीं, त्यासाठीं एक महत्त्वाची गोष्ट व दोनतीन इतर गोष्टी करायला हव्या. त्यानें महत्त्वाची सूचना अशी केली असती कीं, मक्तेदाऱ्या नष्ट कराव्या, जकाती कमी कराव्या, स्पर्धेला उत्तेजन द्यावें आणि भांडवल व कामगार यांच्या हालचाली मुक्तपणें होऊं द्याव्या म्हणजे मग कामगार व भांडवल यांचा उत्पादनासाठीं अधिक कार्यक्षमतेनें उपयोग होऊं लागेल. त्यानें अशीहि एक दुय्यम महत्त्वाची सूचना केली असती कीं, लोकांनीं बचत करावी म्हणजे त्यायोगें भांडवलाचा संचय अधिक वेगानें होऊं लागेल. आणि मग अर्थातच त्यानें कामगारांना मन लावून काम करायला सांगितलें असतें आणि ज्या गोष्टी त्यांच्या कामसूपणाच्या आड येत असतील व त्यांचीं आर्थिक प्रोत्साहनें दुबळीं करीत असतील त्यांचा त्यानें धिक्कार केला असता.

आज उत्पादनांत वाढ करण्याचे जे अनेक मार्ग मोकळे आहेत ते तेव्हां उपलब्ध नव्हते. माल्थसच्या छायेंत वावरणाऱ्या त्या जगांत उत्पादनांत वाढ करण्यासाठीं लोकसंख्या वाढवा असें म्हणणें शक्य नव्हतें. अन्नाचा पुरवठा जितक्यांना जिवंत ठेवूं शकेल तितके लोक अस्तित्वांत आहेत असें तेव्हां गृहीत धरलें जात असे. त्या काळांत मोठी औद्योगिक कॉर्पोरेशन ही गोष्ट अस्तित्वांत आलेली नव्हती. त्याच्या आधीं भांडवलाच्या निवेशाविषयींचे निर्णय स्वतंत्रपणें कार्य करणारे असंख्य योजक बाजारांतील परिस्थितीच्या संदर्भांत घेत होते. मोठ्या कॉर्पोरेशन्स अस्तित्वांत आल्या तेव्हांच हे निर्णय सुसूत्रपणें घेतले जाऊं लागले तोंपर्यंत निवेशाचें प्रमाण व त्यामुळें निश्चित होणारी आर्थिक विकासाची गति यांचा समाजहिताच्या दृष्टीनें विचार करणें व निर्णय घेणें अशक्यच होतें.

उद्योगांच्या क्षेत्रांतील संशोधन व विकासात्मक कार्य यांना एकोणिसाव्या

शतकांतल्या अभ्यासकानें महत्त्व देणें अशक्यप्रायच होतें. ही एक आधुनिक व कॉर्पोरेशन्सच्या विकासाशीं निगडित असलेली घटना आहे. एकोणिसाव्या शतकांत शोध लावले जात ते पुष्कळसे यदृच्छेनें. पेटंट ऑफिसच (शोधांवरचा मालकी हक्क मान्य करणारी कचेरी) ते लावण्यास सुसूत्रपणें उत्तेजन देत असे. (त्या ऑफिसलाहि या काळीं फार महत्त्व दिलें जात असे आणि तें योग्यच होतें.) त्या काळांत बेकारी व उत्पादन यांविषयींची चांगली आंकडेवारीच उपलब्ध नसे आणि पुन्हा मंदी ही अपरिहार्य आहे असें मानलें जात असे. त्यामुळे मंदीमुळें होणारी उत्पादनाची हानि ही एक समस्या आहे असें तेव्हां मानलेंच जात नसे.

ह्या विवेचनाचा मथितार्थ उघड आहे. उत्पादनाच्या साधनांचा अधिक कार्यक्षम उपयोग व्हावा, वचत वाढावी व काम अधिक मनःपूर्वक केलें जावें यासाठीं जे उपाय एका शतकापूर्वी सुचविले जात होते त्यांनाच आपण आजहि उत्पादनाच्या वाढीचा विचार करतांना महत्त्व देतों. प्रगति करण्याचे जे नवे मार्ग आतां उपलब्ध झाले आहेत त्यांच्याकडे आपण जवळजवळ लक्षच देत नाहीं. या नव्या परिस्थितीच्या संदर्भांत पाहिलें तर आपल्या उत्पादनव्यवस्थेंत फार मोठे दोष आहेत आणि तींत सुधारणा करण्यासहि खूपच वांव आहे. पण उत्पादनाच्या प्रश्नावाबत सांकेतिक शहाणपणांची जी रूढ व आंखीव भूमिका आहे तिच्या कक्षेंत या गोष्टी येत नाहींत.

ह्या विधानाला पुरावा हवा असेल तर आतांपर्यंत युद्धकाळांत अगर युद्धाची तयारी करीत असतांना आपल्या उत्पादनांत जी नियमितपणें वाढ झाली तिकडे नजर टाकावी. परिस्थितीनें पेचांत टाकलें कीं सांकेतिक शहाणपण गुंडाळून ठेवलें जातें. शक्य त्या सर्व उपायांनीं आपण उत्पादनांत वाढ करायला लागतों. कामगारदलांत वाढ करण्याचा प्रयत्न कसोशीनें केला जातो. आपल्याला न समजणाऱ्या भाषा बोलणारे कृष्णवर्णी कामगार बाहेरून येथें आणण्यास मुभा मिळते. बचत वाढविण्याचे प्रयत्न मनापासून केले जातात. अनैच्छिक बेकारी नष्ट होते. उपलब्ध साधनांच्या द्वारें अधिक उत्पादन व्हावें म्हणून तांत्रिक ज्ञानाचा पद्धतशीरपणें उपयोग केला जातो. संमिश्र पोलाद, कृत्रिम रबर व जहाजें यांच्या उत्पादनासाठीं दुसऱ्या महायुद्धांत अशाच स्वरूपाचे पद्धतशीर प्रयत्न करण्यांत आले. मक्तेदारीविरोधक कायदे साधनांचा अधिक कार्यक्षमतेनें उपयोग करण्यास सहाय्यभूत होतात अशी पारंपारिक कल्पना होती. पण गंमत अशी कीं, दोन्ही महायुद्धांच्या काळांत ते कायदे तात्पुरते रद्द करण्यात आले. (अर्थात् या मुद्दाला विशेष महत्त्व देणें योग्य ठरणार नाहीं.) युद्धकाळांत उत्पादनाच्या प्रश्नांत सुबुद्धपणें लक्ष घातलें गेलें आणि त्यामुळें त्यांत आश्चर्यकारक वाढ झाली, आणि ती देखील अनेक कामगार सैन्यांत दाखल झाले असतांना.

नाहीं व त्यामुळें बेताचीच तांत्रिक प्रगति करतो त्याचा लोकांना विशेष राग येत नाहीं. पण जर एखाद्या अर्थसंस्थेनें एखादा शोध लावला आणि मग तो दडपून ठेवला तर त्याबद्दल मात्र फार संताप व्यक्त केला जातो.

मक्तेदारी, जकाती, उत्तेजनसहाय्य किंवा संघटित व निलाजरा कामचुकारपणा यांना दिलें जाणारें महत्त्व अनुचित आहे असा वरील विवेचनाचा अर्थ नव्हे. शिवाय या गोष्टींच्या संदर्भांत उत्पादनातील कार्यक्षमता हा जरी मध्यवर्ती प्रश्न असला तरी तो कांहीं त्या संदर्भांतला एकमेव प्रश्न नव्हे. आपली उत्पादनाच्या वाढीबाबतची आस्था किती एकांगी आणि खरें म्हणजे विकृत स्वरूपाची असते तें मला इथें दाखवून द्यायचें आहे. ह्या गोष्टीचीं कारणें शोधायला दूर जायला नको. शंभर वर्षांपूर्वी म्हणजे एकोणिसाव्या शतकाच्या मध्यावर ब्रिटनमधला एखादा अर्थशास्त्रज्ञ आपल्या देशांतील उत्पादन कसें वाढवतां येईल त्याची पहाणी करूं लागला असता तर त्यानें अशी शिफारस केली असती कीं, त्यासाठीं एक महत्त्वाची गोष्ट व दोनतीन इतर गोष्टी करायला हव्या. त्यानें महत्त्वाची सूचना अशी केली असती कीं, मक्तेदाऱ्या नष्ट कराव्या, जकाती कमी कराव्या, स्पर्धेला उत्तेजन द्यावें आणि भांडवल व कामगार यांच्या हालचाली मुक्तपणें होऊं द्याव्या म्हणजे मग कामगार व भांडवल यांचा उत्पादनासाठीं अधिक कार्यक्षमतेनें उपयोग होऊं लागेल. त्यानें अशीहि एक दुय्यम महत्त्वाची सूचना केली असती कीं, लोकांनीं बचत करावी म्हणजे त्यायोगें भांडवलाचा संचय अधिक वेगानें होऊं लागेल. आणि मग अर्थातच त्यानें कामगारांना मन लावून काम करायला सांगितलें असतें आणि ज्या गोष्टी त्यांच्या कामसूपणाच्या आड येत असतील व त्यांचीं आर्थिक प्रोत्साहनें दुबळीं करीत असतील त्यांचा त्यानें धिक्कार केला असता.

आज उत्पादनांत वाढ करण्याचे जे अनेक मार्ग मोकळे आहेत ते तेव्हां उपलब्ध नव्हते. माल्थसच्या छायेंत वावरणाऱ्या त्या जगांत उत्पादनांत वाढ करण्यासाठीं लोकसंख्या वाढवा असें म्हणणें शक्य नव्हतें. अन्नाचा पुरवठा जितक्यांना जिवंत ठेवूं शकेल तितके लोक अस्तित्वांत आहेत असें तेव्हां गृहीत धरलें जात असे. त्या काळांत मोठी औद्योगिक कॉर्पोरेशन ही गोष्ट अस्तित्वांत आलेली नव्हती. त्याच्या आधीं भांडवलाच्या निवेशाविषयींचे निर्णय स्वतंत्रपणें कार्य करणारे असंख्य योजक बाजारांतील परिस्थितीच्या संदर्भांत घेत होते. मोठ्या कॉर्पोरेशन्स अस्तित्वांत आल्या तेव्हांच हे निर्णय सुसूत्रपणें घेतले जाऊं लागले तोंपर्यंत निवेशाचें प्रमाण व त्यामुळें निश्चित होणारी आर्थिक विकासाची गति यांचा समाजहिताच्या दृष्टीनें विचार करणें व निर्णय घेणें अशक्यच होतें.

उद्योगांच्या क्षेत्रांतील संशोधन व विकासात्मक कार्य यांना एकोणिसाव्या

शतकांतल्या अभ्यासकानें महत्त्व देणें अशक्यप्रायच होतें. ही एक आधुनिक व कॉर्पोरेशन्सच्या विकासाशीं निगडित असलेली घटना आहे. एकोणिसाव्या शतकांत शोध लावले जात ते पुष्कळसे यदृच्छेनें. पेटंट ऑफिसच (शोधांवरचा मालकी हक्क मान्य करणारी कचेरी) ते लावण्यास सुसूत्रपणें उत्तेजन देत असे. (त्या ऑफिसलात या काळीं फार महत्त्व दिलें जात असे आणि तें योग्यच होतें.) त्या काळांत बेकारी व उत्पादन यांविषयींची चांगली आंकडेवारीच उपलब्ध नसे आणि पुन्हा मंदी ही अपरिहार्य आहे असें मानलें जात असे. त्यामुळे मंदीमुळें होणारी उत्पादनाची हानि ही एक समस्या आहे असें तेव्हां मानलेंच जात नसे.

ह्या विवेचनाचा मथितार्थ उघड आहे. उत्पादनाच्या साधनांचा अधिक कार्यक्षम उपयोग व्हावा, बचत वाढावी व काम अधिक मनःपूर्वक केलें जावें यासाठीं जे उपाय एका शतकापूर्वी सुचविले जात होते त्यांनाच आपण आजहि उत्पादनाच्या वाढीचा विचार करतांना महत्त्व देतों. प्रगति करण्याचे जे नवे मार्ग आतां उपलब्ध झाले आहेत त्यांच्याकडे आपण जवळजवळ लक्षच देत नाहीं. या नव्या परिस्थितीच्या संदर्भांत पाहिलें तर आपल्या उत्पादनव्यवस्थेंत फार मोठे दोष आहेत आणि तींत सुधारणा करण्यासहि खूपच वांव आहे. पण उत्पादनाच्या प्रश्नाबाबत सांकेतिक शहाणपणांची जी रूढ व आंखीव भूमिका आहे तिच्या कक्षेंत या गोष्टी येत नाहींत.

ह्या विधानाला पुरावा हवा असेल तर आतांपर्यंत युद्धकाळांत अगर युद्धाची तयारी करीत असतांना आपल्या उत्पादनांत जी नियमितपणें वाढ झाली तिकडे नजर टाकावी. परिस्थितीनें पेचांत टाकलें कीं सांकेतिक शहाणपण गुंडाळून ठेवलें जातें. शक्य त्या सर्व उपायांनीं आपण उत्पादनांत वाढ करायला लागतों. कामगारदलांत वाढ करण्याचा प्रयत्न कसोशीनें केला जातो. आपल्याला न समजणाऱ्या भाषा बोलणारे कृष्णवर्णी कामगार बाहेरून येथें आणण्यास मुभा मिळते. बचत वाढविण्याचे प्रयत्न मनापासून केले जातात. अनैच्छिक बेकारी नष्ट होते. उपलब्ध साधनांच्या द्वारें अधिक उत्पादन व्हावें म्हणून तांत्रिक ज्ञानाचा पद्धतशीरपणें उपयोग केला जातो. संमिश्र पोलाद, कृत्रिम रबर व जहाजें यांच्या उत्पादनासाठीं दुसऱ्या महायुद्धांत अशाच स्वरूपाचे पद्धतशीर प्रयत्न करण्यांत आले. मक्तेदारीविरोधक कायदे साधनांचा अधिक कार्यक्षमतेनें उपयोग करण्यास सहाय्यभूत होतात अशी पारंपारिक कल्पना होती. पण गंमत अशी कीं, दोन्ही महायुद्धांच्या काळांत ते कायदे तात्पुरते रद्द करण्यात आले. (अर्थात् या मुद्द्याला विशेष महत्त्व देणें योग्य ठरणार नाहीं.) युद्धकाळांत उत्पादनाच्या प्रश्नांत सुबुद्धपणें लक्ष घातलें गेलें आणि त्यामुळें त्यांत आश्चर्यकारक वाढ झाली, आणि ती देखील अनेक कामगार सैन्यांत दाखल झाले असतांना.

ह्या गोष्टीचें आपल्याला आश्चर्य वाटलें असलें तरी तें वाटण्याची खरोखर आवश्यकता नव्हती. शांततेच्या काळांत जरी आपण उत्पादनाला अत्यंत महत्त्व देत असलों तरी त्या वेळीं आपली दृष्टि पारंपरिक व एकांगी असते. आणि ह्यामुळें आपलें एकंदर उत्पादन व त्याच्या वाढीचें प्रमाण जितकें मोठें असणें शक्य असतें तितकें तें प्रत्यक्षांत नसतें. खरें म्हणजे तें शक्यतेच्या मानानें अगदींच कमी असतें. पुन्हा कामगार दलांत व भांडवलाच्या संचयाच्या गतींत वाढ करण्यासाठीं आणि तांत्रिक ज्ञानाचा उपयोग करून मागासलेल्या उद्योगांची प्रगति करण्यासाठीं आपल्या समाजाच्या आर्थिक व राजकीय घटनेंत मोठा क्रांतिकारक बदल करणें आवश्यक आहे अशांतलाहि भाग नाहीं. फरक इतकाच करावा लागेल कीं, साधनांचा उपयोग व संयोग एवढ्याच गोष्टींकडे लक्ष न पुरवितां सरकारी धोरणाच्या सर्व अंगांचा उत्पादनाच्या वाढीसाठीं उपयोग केला पाहिजे.

[५]

उत्पादनाबाबतची आपली भूमिका आणखी एका दृष्टीनें देखील पारंपारिक आणि अप्रबुद्ध आहे. निरनिराळ्या प्रकारच्या वस्तू व सोयी यांत जे आपण भेद करतों ते देखील कांहींसे विचित्र व तर्कदुष्ट असतात. कांहीं अगदीं क्षुल्लक गोष्टींच्या उत्पादनाचा आपल्याला अभिमान वाटतो. आणि कांहीं अत्यंत महत्त्वाच्या व सुसंस्कार करणाऱ्या सोयींचें उत्पादन व्हावें याचा आपल्याला खेद वाटतो.

अर्थव्यवस्थेच्या एकंदर उत्पादनाचा हिशेब करतांना म्हणजे सरसकट राष्ट्रीय उत्पादन किती झालें तें ठरवितांना सर्व वस्तूंच्या व सोयींच्या मूल्यांची बेरीज करतात. मग त्या कोणत्याहि असोत आणि त्यांचें उत्पादन कोणींहि केलेलें असो. सरकारी क्षेत्रांत अमक्या व खाजगी क्षेत्रांत अमक्या सोयींचें उत्पादन झालें असा भेद ते करीत नाहींत. टेलिव्हिजन सेटस्च्या उत्पादनांतील वाढ व शिक्षणाच्या सोयींची वाढ यांची एकाच मापानें मोजदाद होते. पण लोकांच्या दृष्टिकोनाशीं हें अगदीं विसंगत आहे. उत्पादनाची ही मोजदाद कशी होते हें जर लोकांना पूर्णपणें समजलें तर त्यांत सरकारी खर्चाचा समावेश करणें हें समाजविघातक आहे असें कितीतरी लोकांचें मत पडेल. आणि हे लोक अर्थशास्त्रज्ञांना यावद्दल दोष देत नाहींत ही कांहींशी आश्चर्याची गोष्ट आहे.

खाजगी क्षेत्रानें केलेलें उत्पादन महत्त्वाचें असतें आणि अन्य उत्पादन जवळ-जवळ महत्त्वशून्य असतें असा सर्वसाधारण समज आहे. या खाजगी क्षेत्रांतल्या उत्पादनामुळें राष्ट्राच्या सुखसमाधानांत वाढ होते. त्यांत जी वाढ होते ती राष्ट्राच्या संपत्तींतील खरी वाढ. त्याच्याशीं तुलना करतां सरकारनें उपलब्ध केलेल्या

सोयी वांडगुळासारख्या असतात. त्या आवश्यक असतात. कदाचित् त्या फार मोठ्या प्रमाणावर उपलब्ध होणें देखील आवश्यक असेल. पण खाजगी उत्पादनाच्या पाठीवर लादलेलें ओझें, असेंच त्याचें स्वरूप असतें. हें ओझें जर फार जड झालें तर खाजगी उत्पादन त्याखालीं खचेल व कोसळेल.

सरकारनें केलेल्या सोयी जेव्हां अगदीं उपयुक्त असतात तेव्हां देखील 'आवश्यक पण अनिष्ट गोष्ट' असें त्याचें स्वरूप असतें. आणि जेव्हां त्या तशा नसतात तेव्हां त्या शरिरांत वाढणाऱ्या रोगासारख्या असतात. आणि त्यांच्यावर सतत व सक्त नजर ठेवणें हें कोणत्याहि जागरूक समाजाचें कर्तव्य असतें. जेव्हां ह्या सोयी अत्यंत महत्त्वाचीं उद्दिष्टें साध्य करीत असतात तेव्हां देखील त्या वांझोट्या असतात. 'ज्या अर्थानें खाजगी उद्योगधंदे संपत्तीची निर्मिती करतात त्या अर्थानें कशाचीहि निर्मिती करण्यास सरकार असमर्थ असतें.....'[१]

ह्या भूमिकेंतून कांहीं गमतीदार विसंगती निर्माण होतात. ज्या रस्त्यांवरून मोटारी धावतात ते कमी महत्त्वाचे आणि मोटारी अधिक महत्त्वाच्या असें ठरतें. टेलिफोनच्या सोयींत वाढ झाली तर ती समाजहितकारक म्हणून स्वागतार्ह ठरते. पण टपालाच्या सोयींत कपात झाली तर तिच्याकडे आवश्यक काटकसर म्हणून आपण पहातों. खाजगी संपत्तींत वाढ झाली तर त्याचें आपल्याला फार महत्त्व वाटतें. पण तिच्या रक्षणासाठीं पोलिस खात्यावर अधिक खर्च होऊं लागला तर आपल्याला त्याचा खेद वाटतो. घरें स्वच्छ ठेवण्यासाठीं व्हॅक्युम क्लीनर्स आपल्या-जवळ बाळगणें हा आपल्या राहणीचा आवश्यक भाग ठरतो. पण रस्ते स्वच्छ ठेवण्यासाठीं सफाई कामगारांवर अधिक खर्च झाला तर तें आपल्याला रुचत नाहीं. अंशतः तरी ह्यामुळेंच आपलीं घरें सामान्यपणें स्वच्छ असतात आणि रस्ते गलिच्छ असतात. सांकेतिक शहाणपण जेव्हां अधिक संस्कारित स्वरूप धारण करतें तेव्हां सरकारनें केलेल्या सोयी आणि खाजगीरीत्या केलेल्या सोयी यांत इतका तीव्र भेद केला जात नाहीं; आणि मीं वर म्हटल्याप्रमाणें, सरसकट राष्ट्रीय उत्पादनाचा हिशेब करतांना त्यांत या भेदाला स्थान दिलें जात नाहीं. पण हा भेद पूर्णपणें पुसला मात्र कधींच जात नाहीं. सरकारनें पुरविलेल्या सोयी समाजाच्या पाठीवर-च्या ओझ्यासारख्या असतात या कल्पनेपासून अर्थशास्त्रज्ञ व राज्यशास्त्रज्ञ यांनीं देखील आपली पुरती सुटका करून घेतलेली नाहीं. या सोयींचें समर्थन केलें जातें हें खरे. पण त्या मोठ्या प्रमाणावर पुरविल्या जातात व त्यांचा दर्जा चांगला असतो, असें कोणी अभिमानानें म्हणत नाहीं.

---

१ फ्रॅन्सिस एक्स्. सटन, सेमूर इ. हॅरिस, कार्ल केसन आणि जेम्स रॉविन, 'द अमेरि-कन विझिनेस क्रीड' (केंब्रिज मॅस. हार्वर्ड युनिव्हर्सिटी प्रेस) पृ. १९५.

ह्या भूमिकेच्या मुळाशीं अनेक करणें आहेत. पण त्यांतलें सर्वांत महत्त्वाचें कारण कोणतें असेल तर तें म्हणजे परंपरा. ज्या जगांत अर्थशास्त्रानें जन्म घेतला त्यांत अन्न, वस्त्र, निवास व ह्या सर्वांची तरतूद होण्यास आवश्यक अशी सामाजिक सुव्यवस्था या माणसाच्या चार गरजा होत्या. ह्यांपैकीं पहिल्या तीन गोष्टींचें उत्पादन खाजगी रीत्या होऊन त्यांची खरेदीविक्री बाजरांत होऊं शकत होती. आणि सामाजिक सुव्यवस्था असली कीं ह्या गरजा अशा प्रकारें भागविण्याची प्रक्रिया अवश्य त्या कार्यक्षमतेनें होत होती. पण सुव्यवस्था ठेवणें हें जें सरकारचें कार्य तें मात्र पुष्कळसें ढिलाईनें करण्यांत आलें. आणि क्वचित् कांहीं अपवाद सोडल्यास त्यावर बेसुमार खर्च होत असे. शिवाय सुव्यवस्था निर्माण करण्याच्या नांवाखालीं लोकांच्या चरितार्थाच्या साधनांची मरमसाट लूट करण्यांत येत असे.

साहजिकच सरकारविषयींचा तीव्र अविश्वास हें आधुनिक आर्थिक विचारधारांतलें एक सूत्र झालें. सुव्यवस्था निश्चितपणें व अल्प खर्चांत प्रस्थापित करणारी व इतर बाबतींत कमींत कमी ढवळाढवळ करणारी राजसत्ता हा एकोणिसाव्या शतकांतील आर्थिक उदारमतवादाचा आदर्श होता. राजसत्तेचा लोप व्हावा अशी मार्क्सची देखील इच्छा होती. हा दृष्टिकोन सांकेतिक शहाणपणाचा भाग होऊन राहिला आहे. त्याच्यावर बदलत्या वस्तुस्थितीनें एका मागून एक असे निष्ठूर प्रहार केले आहेत. अन्न, वस्त्र व निवारा यांचें उत्पादन, खरेदी व विक्री खाजगी क्षेत्रांत होऊं शकते. पण ह्या गोष्टीची एकदां तरतूद झाली कीं समाजाला अन्य गोष्टींची गरज भासूं लागते. आणि अन्य गोष्टींपैकीं अनेकींचें उत्पादन, खरेदी व विक्री खाजगी क्षेत्रांत करणें अशक्य असतें. त्या एकाला पुरवल्या कीं सर्वांनाच पुरवाव्या लागतात; आणि त्यांची किंमत सर्वांनीं मिळून द्यावी लागते. तसें न केलें तर त्या मिळूंच शकत नाहींत. रस्ते, पोलिस, सफाई व साक्षरता मोठ्या प्रमाणावर साध्य केल्यामुळें सर्वांनाच मिळणारे फायदे, साथींवरची उपाययोजना, सैनिक संरक्षण या सर्व गोष्टी त्या वर्गांत मोडतात. ज्या सोयी एकट्या दुकट्यासाठीं करतां येत नाहींत व सर्व समाजासाठींच कराव्या लागतात त्या प्राथमिक शारीरिक गरजांइतक्या निकडीच्या नसतात. पण अशी मात्र शक्यता आहे कीं, समाजाच्या संपत्तींत ज्या प्रमाणांत वाढ होते त्याहून अधिक प्रमाणांत या गरजा भागविण्याची निकड वाढूं लागते. आणि संपत्तीच्या जोडीला जर लोकसंख्या वाढत असेल तर ही निकड अशा प्रकारें वाढण्याची अधिक शक्यता असते. पण जरी ह्या सोयींची गरज अधिकाधिक तीव्रपणें भासत असली तरी त्याचें नातें बेभरवशाच्या, अकार्यक्षम बेसुमार खर्च करणाऱ्या आणि अरेरावीनें हुकमत चालवणाऱ्या राजसत्तेशीं जोडलेलें असतें. आणि त्यामुळें राजसत्तेवरोवर त्या सोयींबद्दलहि लोकांचीं मनें दूषित होतात. मद्य,

चित्रकथांचीं पुस्तकें आणि गुळण्यांचीं औषधें बाजारांत विकलीं जातात आणि त्यामुळें त्यांना प्रतिष्ठा प्राप्त होते. आणि शाळा, न्यायालयें व नगरपालिकांनीं चालविलेले पोहोण्याचे तलाव यांच्यावर मात्र दुष्ट राजांच्या दुष्कीर्तीची छाया पडते.

शिवाय पूर्वीच्या दरिद्री जगांतले दुष्ट राजे, आपल्या अनिवार लोभाच्या पायीं खाजगी क्षेत्रांत उत्पादन करणारे लोक व त्यांचें भांडवल यांचा नाश करण्यासहि मागेंपुढें पहात नसत आणि त्यामुळें उत्पादनच थांबत असे. पण आतांच्या अर्थव्यवस्था तितक्या कमकुवत राहिलेल्या नाहींत आणि राजसत्ताहि तितक्या तारतम्यशून्य राहिलेल्या नाहींत. आधुनिक काळांत पाश्चिमात्य देशांत कांहीं अपवाद सोडल्यास आर्थिक विकास व सरकारी क्षेत्रातील कार्यांचा विकास यांनीं हातांत हात घालून प्रवास केला आहे. ह्या दोन्ही गोष्टी परस्परपूरक व्हायला हव्या व तशा त्या झालेल्या आहेत. पण ही गोष्ट मान्य करण्यास सांकेतिक शहाणपण मात्र तयार नाहीं. त्या दृष्टीनें सरकारनें पुरविलेल्या सोयींत होणारी वाढ ही एक अनिष्ट प्रवृत्ति आहे. तिच्यामुळें राष्ट्रांतील लोकांचा जोम तरी कमी होतो किंवा त्यांचें स्वातंत्र्य तरी धोक्यांत येतें. आणि स्थानिक शिक्षण मंडळाच्या कार्यानें देखील त्या स्वातंत्र्याला धोका निर्माण होतो. अर्थव्यवस्थेचा डोलारा कोसळण्याची शक्यता निर्माण होते. सांकेतिक शहाणपणाच्या एका शाखेला अशी सारखी धास्ती वाटते कीं, अमेरिकन अर्थव्यवस्था समाजवादाला बळी पडणार. आणि ज्या प्रमाणांत सरकारी खर्च वाढतो त्या प्रमाणांत समाजवादाच्या दिशेनें घसरगुंडी होत आहे असें मानलें जातें. त्यामुळें सरकारनें जरी अगदीं निरुपद्रवी सोयी केल्या तरी त्यामुळें सामाजिक क्रांति होत आहे असें समाजांतल्या कांहीं लोकांना वाटत असतें.

या विवेचनाशीं निकटचा संबंध असलेला आणखी एक मुद्दा इथें विचारांत घ्यायला हवा. तो असा कीं, सरकारनें पुरवलेल्या सोयींवर जो खर्च करावा लागतो त्याचें विषमतेच्या प्रश्नाशीं निकटचें नातें जोडलें गेलें आहे. श्रीमंतांकडून अधिक पैसा वसूल करून ह्या सोयी पुरविण्यांत आल्या आणि त्याचबरोबर विषमता कमी करण्याचें उद्दिष्टहि साध्य करण्यांत आलें. ज्यांना समतेची झळ सहन करावी लागत होती त्यांना या दोन उद्दिष्टांची घातलेली सांगड कधींच पसंत पडली नाहीं. ही नापसंती कांहीं अंशीं सरकारनें पुरविलेल्या सोयींनाहि चिकटावी हें साहजिक होतें. त्यांच्यावर हल्ला चढवला कीं विषमता दूर करणाऱ्या करांनाहि विरोध करतां येत होता. सरकार ज्या सोयी पुरवितें व ज्यांचा आर्थिक भार या लोकांवर पडतो त्यापेक्षां खाजगी क्षेत्रानें उत्पादन केलेल्या वस्तू अधिक चांगल्या या ग्रहाला वरील कारणामुळें बळकटी आली आहे.

सरकारनें पुरविलेल्या सोयींना हा जो विरोध होत आला आहे तशा प्रकारचा विरोध खाजगी क्षेत्रांत निर्माण होणाऱ्या वस्तूंना कधींच सहन करावा लागला नाहीं. उलट आधुनिक जाहिरात तंत्राच्या नौवतींनीं त्यांचें सारखें गुणगान चालविलें आहे. ह्या वस्तू म्हणजे समाजाची खरीखुरी संपत्ति असा ग्रह निर्माण करण्यांत आला आहे. खाजगी व सरकारी क्षेत्रांपासून समाधान किती लाभतें हा प्रश्न जरा बाजूला ठेवला तर या दोन क्षेत्रांतील चढाओढ न्याय्यपणें चाललेली नाहीं हें अगदीं स्पष्ट आहे. खाजगी क्षेत्रांतल्या वस्तूंना सरकारी क्षेत्रांतल्या उत्पादनापेक्षां अधिक महत्त्व देण्याची व अशा प्रकारें त्यांत तरतमभाव करण्याची ही जी प्रवृत्ति आहे तिचे समाजावर व्यापक व गंभीर स्वरूपाचे परिणाम होतात.

[६]

सारांश, उत्पादन हें आपल्या जीवनांतलें जरी प्रमुख उद्दिष्ट झालें असलें तरी आपण त्या उद्दिष्टाचा पाठपुरावा जोमानेंहि करीत नाहीं व विचारपूर्वकहि करीत नाहीं. उत्पादन हें आपण आपल्या कर्तृत्वाचें गमक मानतों. पण तें कर्तृत्व सिद्ध करण्यासाठीं आपण विचारपूर्वक झटत मात्र नाहीं. उत्पादन वाढवण्याचे आपले प्रयत्न ठरीव वळणाचे असतात. आपण आळशीपणा व साधनांची अयोग्य विभागणी या दोषांवर भर देतों. पण हे दोष उत्पादन वाढविण्याच्या संदर्भांत महत्त्वाचे होते तें शंभर वर्षांपूर्वीं. भांडवलाच्या संचयाची गति वाढविण्यासाठीं किंवा मागासलेल्या उद्योगांची तांत्रिक प्रगति अधिक वेगानें व्हावी म्हणून शांततेच्या काळांत आपण जवळजवळ कांहींच करीत नाहीं. आणि ते देखील या मार्गांनीं उत्पादनांत पुष्कळ वाढ करणें शक्य आहे हें स्पष्टपणें दिसत असतांना. मंदीच्या काळांत उत्पादनाची जी हानि होते त्याबद्दल आपल्याला क्वचितच खेद वाटतो. मंदीमुळें आर्थिक सुरक्षिततेला जो धोका निर्माण होतो त्यामुळें ही हानि टाळण्याचा आपण प्रयत्न करतों. आणि अखेर, कांहीं जुनाट व पारंपारिक विचारांमुळें आपण उत्पादनाच्या एका महत्त्वाच्या भागाला दुय्यम महत्त्व देतों.

बहुसंख्य वाचकांना बहुधा असें वाटेल कीं, उत्पादन वाढविण्याच्या ज्या मार्गाकडे आपण दुर्लक्ष करीत आहोंत त्यांकडे आपण अवश्य लक्ष पुरविलें पाहिजे. परंतु या प्रश्नाकडे अधिक चिकित्सकपणें पहाणें आवश्यक आहे. ह्या गोष्टींविषयीं आपण उदासीन कां त्याचीं कारणें समजून घेतलीं पाहिजेत. यापूर्वीं जेव्हां आणीबाणीची परिस्थिति निर्माण झाली होती तेव्हां ज्या योगें उत्पादनांत भरपूर वाढ होऊं शकेल त्या सर्व मार्गांचा आपण अवलंब केला होता. आणि आज आपण तसें

करीत नाहीं ह्याचें कारण कदाचित् असें असेल कीं, असा प्रयत्न समर्थनीय ठरावा इतकी आपल्याला अधिक उत्पादनाची निकड वाटत नसेल. उत्पादनाला जरी आपण महत्त्व देत असलों तरी तो प्रश्न तितकासा निकडीचा नसेल. उत्पादन वाढविण्याच्या सर्वांत कार्यक्षम साधनांचा उपयोग करावा असें वाटण्याइतकी आपल्याला उत्पादनाविषयीं आस्था नसेल. जें मिळतें त्यावर आपण संतुष्ट असतों. याचाच अर्थ असा कीं, ज्या प्रमाणांत उत्पादनाचा प्रश्न आपसुख सुटतो त्या प्रमाणांतच आपल्याला त्याविषयीं आस्था वाटते. जें निसर्गक्रमानें घडतें तें करण्याला आपण फार महत्त्व देतों.

आपण ज्या वस्तूंचें उत्पादन करतों त्या अत्यंत महत्त्वाच्या व निकडीच्या गरजा जर भागवत असत्या तर असें झालें नसतें. तसें असतें तर उत्पादनांत जी स्वाभाविक वाढ होते तिच्यावर आपण संतुष्ट झालों नसतों, तर उत्पादन वाढविण्याच्या मार्गांचा आपण उत्साहानें शोध केला असता. वस्तूंच्या मागणीबाबत जी एक मोठी दंतकथा आपण खरी मानून चालतों तिच्याकडे चिकित्सकपणें पाहिलें कीं ह्या साऱ्या गोष्टी समजूं लागतात—नव्हे त्या अगदीं उघड होतात. ह्या दंतकथेचा परिणाम असा झाला आहे कीं, ज्या गोष्टी आपल्याला मिळतात त्यांचें आपल्याला फार महत्त्व वाटतें आणि ज्या आपल्याला मिळत नाहींत त्यांच्याबद्दल आपल्याला कांहींच पर्वा वाटत नाहीं. कारण ज्या प्रमाणांत मागण्या कृत्रिमपणें निर्माण केल्या जातात त्या प्रमाणांतच त्यांचें अस्तित्व समाधानांच्या सीमेवर आपल्याला जाणवतें. ज्या वस्तूंचें आपण उत्पादन करीत नाहीं त्यांच्यासाठीं आपण कृत्रिमपणें मागण्या निर्माण करीत नाहीं.

प्रकरण दहावें

ग्राहकांच्या मागण्यांची हुकमत

'युनायटेड स्टेटस् ऑफ अमेरिका या देशांत काम न करतां स्वच्छंदांत वेळ घालविणें हें जवळजवळ अनैतिक मानलें जातें. अशा देशांतल्या अर्थव्यवस्थेंत पुरेशा गरजा निर्माण करणें.....उत्पादन साधनांचा पुरा उपयोग करणें ही नजिकच्या भविष्य काळांत एक नित्याची समस्या होऊन वसणें शक्य आहे. अशा परिस्थितींत अर्थशास्त्रज्ञाला चोरटेपणानें दिवस कंठावे लागतात.'

—डब्ल्यू बेकरमन[1]

परंपरेनें चालत आलेली उत्पादनाविषयींची आस्था आणि आधुनिक काळांतला सुरक्षिततेचा सर्वगामामी शोध यांचा परिपाक म्हणजे आजच्या काळांत उत्पादनाला दिलें जाणारें महत्त्व. संपत्तीची फेरवांटणी करण्याच्या प्रयत्नांमुळें जी कटुता निर्माण होते ती आज आपल्याला वाढत्या वस्तुरूप उत्पन्नामुळें फार चांगल्या प्रकारें टाळतां येतें. उत्पादनाची उच्च पातळी ही खऱ्याखुऱ्या आर्थिक सुरक्षिततेची गुरुकिल्ली झाली आहे. पण ह्यामुळें वस्तूंच्या उत्पादनाचा जो प्रवाह वाहूं लागतो त्याचें समर्थन करण्याचें कार्य बाकी रहातें. विषमता दूर करण्याच्या अगर पुरेशी रोजगारी निर्माण करण्याच्या प्रयत्नांचा एक आनुषंगिक परिणाम इतकेंच कांहीं उत्पादनाचें स्थान असूं शकत नाहीं. त्याला स्वतःचें स्वतंत्र समर्थन असणें आवश्यक आहे. ह्या संदर्भांत अर्थशास्त्रज्ञ व अर्थशास्त्रीय मीमांसा यांनीं या प्रश्नाला हात घातला आहे. आणि संरक्षण व राष्ट्रीय सुरक्षितता यांचें तत्त्वज्ञान आपण मांडतों असा दावा करणाऱ्या विचारवंतांनीं देखील याच संदर्भांत चिकित्सा सुरू केली आहे. यांतून उत्पादनाला स्वतंत्र उद्दिष्ट म्हणून महत्त्व कां आहे त्याचा सांगोपांग व चतुर समर्थनाचा डोलारा उभारण्यांत आला आहे. ह्या समर्थनानुसार उत्पादनाची निकड ही उत्पादनाच्या राशीपासून जवळजवळ अलग करण्यांत आली आहे. या मार्गानें अर्थशास्त्रानें एक अवघड गोष्ट साधली आहे. ज्या जगांत अधिक उत्पादनामुळें मुकलेल्यांना अधिक अन्न, कुडकुडणाऱ्यांना अधिक कपडा आणि गृहहीनांना अधिक घरें मिळत होतीं त्या जगांत उत्पादनाला जितकें महत्त्व होतें तितकेंच महत्त्व त्याला अशा एका जगांत मिळवून दिलें आहे कीं, जेथें अधिक उत्पादनामुळें अधिक ऐटबाज मोटारी, नवनवे खाद्य पदार्थ, कामुकांना उत्तेजित करणारीं वस्त्राभरणें, अधिक उत्तेजक करम-

१ 'अर्थशास्त्रज्ञ-एक आधुनिक धर्मप्रचारक', द इकॉनॉमिक जर्नल, मार्च १९५६.

णूक या गोष्टी मिळूं शकतात व अशा प्रकारें आधुनिक काळांतल्या सर्व लोलुप, सुसंस्कारक व घातक इच्छांची पूर्ति होऊं शकते.

जी आर्थिक मीमांसा ह्या इच्छांचें व त्यांचें समाधान करणाऱ्या उत्पादनाचें समर्थन करते तिला जरी सांकेतिक शहाणपणांत अगदीं चपखलपणें (आणि आश्चर्य वाटावें इतक्या विनतक्रारपणें) स्थान मिळालें असलें तरी ती मीमांसा तर्कदुष्ट, दिखाऊ आणि कांहीं अंशीं धोकादायक देखील आहे.

[२]

उत्पादनाची समाजाला नव्हे तर अर्थशास्त्राला जी गरज आहे ती त्याच्या या समर्थनाच्या मुळाशीं आहे. उत्पादनांत गुंतलेले हे जे हितसंबंध आहेत त्यांचा विचार आपल्याला पुढें करायचा आहे. पण त्यांत अर्थशास्त्रज्ञांचे हितसंबंध विशेष प्रकारें गुंतलेले आहेत याची दखल इथें घ्यायला हवी. आर्थिक मापनाची त्याची जी पद्धति आहे ती उत्पादनाच्या गरजेच्या पायावर उभारलेली आहे. अर्थशास्त्राची आजची संपूर्ण शिक्षणपद्धति व जवळजवळ सर्व संशोधन हीं त्याच्यावर आधारलेलीं आहेत. उपलब्ध साधनांपासून मिळणाऱ्या उत्पादनांत वाढ करणारी कोणतीहि कृति चांगली आणि म्हणून महत्त्वाची मानली जाते; आणि जिच्यामुळें उत्पादनावर निर्बंध पडतो अगर तें कमी होतें अशी कोणतीहि गोष्ट अपायकारक मानली जाते. दोन करांत निवड करायचा जेव्हां प्रसंग येतो तेव्हां ज्याचा कार्यक्षमतेवर म्हणजे उपलब्ध भांडवल व श्रमशक्ति यांपासून मिळणाऱ्या उत्पादनावर कमी अनिष्ट परिणाम होतो त्याची निवड होते. जर एखादी कंपनी अधिक फायदा मिळविण्यासाठीं अगर अन्य हेतूनें उत्पादन कमी करत आहे असें आढळलें तर ती समाजद्रोही आहे असा खुशाल निष्कर्ष काढतां येतो. कामगार संघटनांच्या बाबतींत देखील हीच भूमिका घेतली जाते. एखाद्या गोष्टीचें मूल्यमापन करतांना तिचा उत्पादनावर काय परिणाम होतो इकडे जवळजवळ सर्वच लोक लक्ष देतात.

कामगार संघटनेनें केलेला एखादा नियम किंवा दुसरी अशीच एखादी कृति किंवा उपाययोजना यांचा उत्पादनावर काय परिणाम होईल त्याचा आडाखा बांधणें नेहमींच कांहीं सोपें नसतें. कार्यकारणांची गुंतागुंतीची साखळी तो परिणाम घडवून आणीत असणें शक्य असतें व ती कशा प्रकारें कार्य करीत आहे त्याबद्दल मतभेद होणेहि शक्य असतें. शिवाय जेव्हां एखाद्या गोष्टीचा निरनिराळ्या वस्तूंच्यावर, उत्पादनावर अगर अर्थव्यवस्थेच्या एकंदर उत्पादनावर काय परिणाम होतो तें शोधून काढायचें असतें तेव्हां तर अनेक अडचणी उपस्थित होतात. एकंदर उत्पादनांच्या मूल्याचें मापन करावें लागतें आणि त्यांतील विशिष्ट वस्तूंच्या किंमती उत्पन्नाच्या प्रचलित विभागणीवर तरी आधारलेल्या असतात–उदाहरणार्थ, मिकच्या

कातडचाच्या किंमती एका छोटचाशा धनाढच वर्गाच्या मागणीवर आधारलेल्या असतात—किंवा त्या किंमतींचें नियंत्रण करणाऱ्या एखाद्या अर्थसंस्थेच्या तर्कविहीन निर्णयावर तरी आधारलेल्या असतात. त्यामुळें निरनिराळ्या धोरणांचे अर्थव्यवस्थेच्या उत्पादनावर कोणते परिणाम होतात त्यांचा मागोवा घेणें व तुलना करणें हें अत्यंत गुंतागुंतीचें काम असतें. पण ह्यामुळेंच तर अर्थशास्त्रांत पुष्कळसा रस निर्माण होतो आणि त्याच्या क्षेत्रांत पुष्कळांना कामहि मिळतें. आणि 'अधिक उत्पादन' या उद्दिष्टावद्दल व त्यांच्या महत्त्वावद्दल ठाम एकमत हें या सर्व गोष्टींच्या मुळाशीं आहे. उपलब्ध साधनांपासून मिळणाऱ्या उत्पादनांत ज्या कोणत्या गोष्टीमुळें वाढ होते ती हितकारक असते. ती गोष्ट करणें महत्त्वाचें असतें. तो तर अर्थशास्त्राचें जहाज सुरक्षित ठेवणारा नांगर आहे. ह्यामुळें उत्पादनाच्या महत्त्वावद्दल शंका व्यक्त केली तर या साऱ्या डोलाऱ्याचा पायाच ढांसळायला लागतो. तसें केलें तर कोणत्याहि कृतीचें मूल्यमापन करतांना नवीं परिमाणें वापरावीं लागतात आणि हीं परिमाणें अपरिहार्यपणें मनोनिष्ठ (Subjective) व अडचणीचीं असतात. ही गोष्ट अर्थशास्त्रज्ञांना फारच अप्रिय वाटते. जें परिचित, निश्चित व सुरक्षित असतें त्याला सुखासमाधानानें चिकटून रहातां येत असलें तर त्यासाठीं जुनाट व निरुपयोगी विचारांचा पाठपुरावा करायला निदान सामाजिक शास्त्रांचे अभ्यासक तरी तयार असतात. त्या सुखासमाधानासाठीं द्यावी लागणारी ही किंमत त्यांना अल्प वाटतें.

अर्थशास्त्राच्या व्यवसायांत ह्या आत्मसंरक्षणाच्या वृत्तीचा अभाव आहे अशांतला भाग नाहीं. आपल्या पिल्लांना धोका निर्माण झाला कीं अस्वलांच्या मादीला असें वाटतें कीं, आपल्या समग्र वंशाचेंच अस्तित्व धोक्यांत आलें आहे. आणि म्हणून ती जहरी त्वेषानें प्रतिकार करते. उत्पादनाचें महत्त्व व ग्राहकांच्या गरजांची निकड यांचें समर्थन करणाऱ्या बौद्धिक तटबंदीवर जर कोणीं हल्ला केला तर सांकेतिक आर्थिक शहाणपणाचे समर्थक देखील असेच चवताळून उठतील.

मातृत्वाच्या स्वाभाविक प्रेरणेशीं अर्थशास्त्रज्ञांच्या या प्रतिक्रियेशीं जी तुलना केली आहे ती अर्थपूर्ण आहे. कारण सध्यांची किंमतयंत्रणा आणि तिचा उत्पादनाशीं असलेला संबंध यांचें जें समर्थन केलें जातें तें पुष्कळसें प्रेरणाधिष्टित असतें. ज्या प्रकारच्या वस्तूंचें अधिकतम उत्पादन व्हावें असा आग्रह सध्यांची किंमतयंत्रणा धरते त्या कोणत्या तें पाहिल्यावर जो अस्वस्थ झाला नसेल असा अर्थशास्त्रज्ञ आजकाल तरी क्वचितच सांपडेल. लांबलचक आणि वैठ्या बांधणीच्या मोटारींची इतकी निकड काय आहे असा प्रश्न अर्थशास्त्रज्ञांना पडतो आहे. आणि अशा वस्तूंसाठीं कृत्रिमपणें मागणी निर्माण करण्याकरितां जाहिरातबाजी व विक्रीकला यांना ज्या थराला जावें

लागतें त्यावद्दलहि त्यांचीं मनें अस्वस्थ होत आहेत. आणि ही अस्वस्थता त्यांच्या शास्त्रीय मीमांसेच्या या संदर्भातील कमकुवतपणाची निदर्शक आहे.

सामाजिक जीवनांत अर्थशास्त्रज्ञाला मिळणारें स्थान कसें बदलतें आहे इकडेहि यांपैकीं कांहींचें लक्ष गेलें आहे. वीस वर्षांपूर्वी अर्थशास्त्रज्ञाचा मंदी व बेकारी या प्रश्नांशीं संबंध होता. या प्रश्नांवरचे तोडगे त्याला सांपडले आहेत अशी खात्री जरी सर्वांना वाटत नसली तरी त्या वेळीं तो लोकांचें लक्ष वेधून घेत होता आणि वादाचा विषय झाला होता. गेल्या कांहीं वर्षांत मात्र तो बौद्धिक जीवनांत मागें पडल्यासारखा झाला आहे. विकासक्षम अर्थव्यवस्थेचें विवेचन करणाऱ्या अर्थशास्त्रज्ञापेक्षां शहराच्या पाणीपुरवठ्यांत कांहीं रसायनें टाकावीं अशी सूचना करणारा दंतवैद्य हा आज अधिक प्रमाणांत वादाचा विषय होतो. आर्थिक प्रश्नांची निकड व ते सोडविण्याविषयींची नैतिक ओढ यांमुळें एके काळीं विद्यार्थी अर्थशास्त्राकडे आकर्षिले जात असत. पण आतां जे उत्तम विद्यार्थी अर्थशास्त्राकडे वळतात ते चमत्कृतिपूर्ण गणिती कसरत करायची संधि मिळावी म्हणून. याचा अर्थ असा तर नव्हे कीं, समाजाला आर्थिक प्रश्न आतां तितका निकडीचा वाटत नाहीं ? वाढणारें उत्पादन आतां मामुली महत्त्वाच्या गरजा भागविण्यासाठीं वापरलें जात आहे अशी आतां लोकांना मनोमन जाणीव झाली आहे कीं काय ? ज्या आवेशानें व तिरस्कारानें ही शंका उडवून लावली जाईल त्यावरूनच कदाचित् मनांतील आशंका सूचित होईल.

आपल्या पिछावर येऊं पहाणारें संकट उग्र स्वरूप धारण करूं लागलें म्हणजे अस्वलाची मादी जशी अधिक चवताळते तसाच प्रकार अर्थशास्त्राच्या बाबतींत देखील होईल. ठाम आग्रहीपणा हें या प्रतिक्रियेचें एक स्वरूप असेल. 'आर्थिक प्रश्न अजूनहि अस्तित्वांत आहे'; 'अजून दारिद्र्य कांहीं नष्ट झालेलें नाहीं'; 'अधिकाधिक गोष्टी हव्याशा वाटणें हा मनुष्यस्वभाव आहे'; 'उत्पादनांत वाढ होत राहिली नाहीं तर जीवनाची सांठलेल्या पाण्यासारखी अवस्था होईल'; 'आपण वरचढ आहोंत हें रशियन लोकांना दाखवून द्यायला हवें'—अशा प्रकारचीं विधानें या आग्रही पवित्र्यांतून स्फुरतील. पण निर्वाणीचें अस्त्र जर कोणतें म्हणाल तर तें म्हणजे ग्राहकांच्या मागणीचा सिद्धान्त. हा सिद्धान्त एखाद्या जबरदस्त तटबंदीसारखा आहे. उत्पादनाच्या महत्त्वाचें समर्थन करून त्या सिद्धान्तानें आपली उपयुक्तता सिद्ध केली आहे. आजच्या जगांत जरी जुने विचार बाढत्या संपन्नतेमुळें गैरलागू ठरत असले तरी नवे विचार स्वीकारण्याची दुःखद आवश्यकता टाळण्यास या सिद्धान्ताची भक्कम मदत होत राहील.

[३]

आज साधारणतः सर्वमान्य असलेली ग्राहकांच्या मागणीची मीमांसा दोन प्रमेयांवर आधारलेली आहे. तीं दोन्हीं प्रमेयें जरी अगदीं स्पष्टपणें मांडलीं गेलेलीं नसलीं तरी अर्थशास्त्रज्ञांच्या प्रचलित मूल्यमीमांसेच्या संदर्भांत अत्यंत महत्त्वाचीं आहेत. त्यांतलें पहिलें हें कीं, जरी अधिकाधिक गरजांचें समाधान झालें तरी त्यांची तीव्रता फारशी कमी होत नाहीं. अधिक कांटेकोर शब्दांत सांगायचें तर असें म्हणतां येईल कीं, गरजांची ही तीव्रता जर कमी होत असेल तर तें प्रत्ययास येत नाहीं आणि म्हणून ती।गोष्ट अर्थशास्त्रज्ञांच्या अगर आर्थिक धोरणाच्या दृष्टीनें विचारांत घेण्यासारखी नाहीं. माणसाच्या शारीरिक गरजा भागल्या कीं त्यांची जागा त्यांच्या मानसिक गरजा घेतात. त्यांचें कधींच समाधान होऊं शकत नाहीं, किंवा निदान त्या दिशेनें कांहीं प्रगति होत आहे असें सिद्ध करतां येत नाहीं. पूर्ण समाधान या कल्पनेला अर्थशास्त्रांत फारसें स्थान नाहीं. पोटाच्या भुका आणि मनाच्या भुका यांची तुलना करणें शास्त्रसम्मत नाहीं आणि उपयुक्तहि नाहीं.

दुसरें प्रमेय असें कीं, गरजा ह्या ग्राहकाच्या व्यक्तिमत्त्वांतून निर्माण होतात, किंवा निदान, अर्थशास्त्रज्ञाच्या दृष्टीनें त्यांचें अस्तित्व ही उपलब्ध असलेली माहिती असते. त्यांचें समाधान कसें होईल हें पहाणें इतकेंच अर्थशास्त्रज्ञाचें काम असतें. ह्या गरजा कशा निर्माण होतात त्याची तपासणी करण्याची त्याला गरज नाहीं. ज्या वस्तू ह्या गरजा भागवतात त्यांचा पुरवठा शक्य तितका वाढवला कीं त्याचें काम संपतें.

ह्या दोन प्रमेयांची आतां चिकित्सा करायला हवी. ग्राहकाच्या वागणुकीची ही जी कारणमीमांसा आहे तिच्या मुळाशीं एक फार जुना किंवा खरें म्हणजे अर्थशास्त्रांतला सर्वांत जुना प्रश्न आहे. तो म्हणजे किंमती कशा निश्चित होतात हा.[१] किंमती किंवा विनिमयमूल्य कसें निश्चित होतें त्याची उपपत्ति लावतांना एक गोष्ट अत्यंत त्रासदायक ठरायची. ती अशी कीं, कांहीं अत्यंत उपयुक्त गोष्टींचें विनिमय-मूल्य अगदीं कमी असतें आणि कांहीं फारशा उपयोगी नसलेल्या गोष्टींचें विनिमय-मूल्य मात्र फार असतें. ॲडॅम स्मिथनें म्हटल्याप्रमाणें 'पाण्याइतकी उपयुक्त गोष्ट दुसरी कोणतीहि नाहीं; पण त्याच्या बदल्यांत जवळजवळ कांहींच विकत घेतां

१ ग्राहकाच्या वागणुकीच्या मीमांसेचीं पूर्वसूत्रें कोणतीं त्याची चर्चा आय्. डी. एम्. लिटल् यांच्या पुढील वेधक लेखांत केलेली आहे. 'अ रिफॉर्म्युलेशन ऑफ कंझुमर बिहेव्हियर,' ऑक्सफर्ड इकॉनॉमिक पेपर्स, न्यू सीरीज् खंड १ अंक १ (जानेवारी १९४९) पृ. ९९.

येत नाहीं; त्याची अदलाबदल करूं म्हटलें तर काहींच मिळूं शकत नाहीं. उलट हिऱ्यांचा तसा फारसा उपयोग नसतो. परंतु त्याच्या बदल्यांत बहुधा खूप इतर गोष्टी मिळूं शकतात.' [१]

मूल्याची उपपत्ती लावतानां 'विनिमयमूल्य' व 'उपयोगमूल्य' असा भेद करणें स्मिथला इष्ट वाटलें. त्या भेदाच्या द्वारें उपयुक्तता खूप पण विनिमयमूल्य थोडें या विरोधाभासाचें निरसन करण्याचा त्यानें यत्न केला. पण ह्या भेदामुळें प्रश्न सुटण्या ऐवजीं निर्माण झाले आणि नंतरचीं शंभर वर्षें अर्थशास्त्रज्ञ अधिक समाधानकारक उपपत्तीच्या शोधात होते. शेवटीं गेल्याशतकाच्या अखेरीस—त्या पूर्वी देखील या प्रश्नाचें उत्तर शोधून करण्यात आलें होतें हें आतां मान्य झालें आहे—सीमागत समाधानाचा सिद्धान्त तीन अर्थशास्त्रज्ञानीं (कार्ल मेंजर हा ऑस्ट्रियन; विल्यम स्टॅन्ले जेव्हन्स हा इंग्रज आणि जॉन बेटस् क्लार्क हा अमेरिकन) साधारणतः एकाच वेळीं मांडला आणि स्थूलमानानें ही उपपत्ती अजून ग्राह्य मानला जात आहे. एखादी इच्छा पुरविण्यासाठीं लागणारी वस्तू एखाद्या माणसाजवळ किती प्रमाणात आहे. त्यावर त्या इच्छेची तीव्रता अवलंबून असते. त्या वस्तूचा साठा त्या माणसाजवळ जितका अधिक असेल तितकें त्यात भर पडल्यामुळें समाधान कमी असतें. आणि त्यामुळें त्या वस्तूसाठीं जी किंमत द्यायला तो तयार असतो ती देखील कमी असते. बहुतेक लोकांजवळ हिऱ्यांचा काहीं मोठा सांठा नसतो. त्यामुळें आणखी एखादा हिरा मिळाला तर त्यापासून खूप समाधान लाभतें आणि म्हणून त्यासाठीं देऊं केलेली किंमत ही अधिक असते. पाण्याची गोष्ट याच्या अगदीं उलटी आहे. ह्यावरून पुढे असाहि निष्कर्ष निघतो की एखाद्या वस्तूचा पुरवठा जर थोडा उत्पादन खर्च करून सुलभतेनें वाढवता येत असेल तर त्याचें विनिमयमूल्य कमी असतें. कारण ह्या उत्पादनाच्या सुलभतेमुळें त्या वस्तूच्याद्वारें ज्यांचें समाधान होतें त्या सीमागत इच्छांची तीव्रता कमी झालेली असते. एखाद्या वस्तूशिवाय (उदाहरणार्थ, पाणी) व्यवहार चालवणें जरी कितीहि अवघड असलें तर तिच्यावाबतींत देखील असेंच घडतें.

अर्थशास्त्राच्या क्रमिक पुस्तकात जो घटत्या सीमागत समाधानाचा सिद्धान्त असतो त्यावरून असा निश्चित निष्कर्ष निघतो कीं जसजसा माणूस अगर समाज संपन्न होतो तसतसें उत्पादनाचें महत्व कमी होत जातें. दरडोई उत्पन्न जसें वाढत जातें तसतसें अधिकाधिक गरजा भागवणें माणसानां शक्य होतें. या गरजा कमी निकडी-

१ 'वेल्थ ऑफ नेशन्स.' औद्योगिक उत्पादनासाठीं हिरा वापरला जाईल याची स्मिथला कल्पना नव्हती.

च्या असतात. असें जर आहे तर या कमी निकडीच्या गरजा भागविणाऱ्या वस्तूंचें उत्पादन हें देखील कमी (व घटत्या) महत्वाचें असलें पाहिजे. रिकार्डोकालीन इंग्लंडमध्यें बहुसंख्य लोकानां फारच थोडी पावरोटी मिळत असे. त्यामुळें पावरोटीच्या पुरवठ्यात वाढ झाली कीं–तो पुरवठा द्रव्यरूप उत्पन्नात वाढ झाल्यामुळें व पावरोटीची किंमत तितकीच राहिल्यामुळें वाढला असेल किंवा द्रव्यरूप उत्पन्न तितकेंच राहून पावरोटीची किंमत कमी झाल्यामुळें वाढला असेल–खूप समाधान मिळत असे. भूक अंशतः भागत असे; आयुर्मर्यादा देखील कदाचित् वाढत असे. अर्थातच पावरोटीचा पुरवठा वाढविणाऱ्या कोणत्याहि योजनेचा समाजहितदक्ष नागरिक गंभीरपणें व खोलवर विचार करीत असत.

आज युनायटेड स्टेटस्मध्यें पावरोटीचा पुरवठा अगदीं भरपूर आहे आणि धान्याचा पुरवठा तर नको इतका आहे. गव्हाच्या पुरवठ्यात आणखी वाढ झाली तर त्यापासून मिळणारें समाधान अगदीं अल्प असतें. त्या वाढीमुळें शेतीखात्याच्या प्रमुखाचें समाधान तर निःसंशय कमी होतें. त्यामुळें गव्हाच्या पुरवठा वाढविणाऱ्या योजना ह्या काहीं समाजहितदक्ष नागरिकाचें लक्ष विशेष वेधून घेत नाहींत. गव्हाच्या उत्पादनाचें नियंत्रण कसें करायचें त्याच्या योजना आंखण्यातच या नागरिकांचा अधिक वेळ जातो. लोकानीं पावरोटीचें सेवन इतकें वाढवलें आहे कीं त्यापासून मिळणारें सीमागत समाधान अत्यल्प झालें आहे; आणि त्यामुळें लोक आतां आपलें उत्पन्न इतर गोष्टींवर खर्च करतात पावरोटीची गरज भागल्यानंतर ज्या अर्थी लोकानीं या अन्य गोष्टींचें सेवन सुरू केलें त्या अर्थी त्या गोष्टींची गरज तितकीशी तीव्र नसावी असें सहाजिकच सूचित होतें. गव्हाच्या सेवनापासून मिळणारें समाधान जसें अत्यल्प आहे तसेंच या अन्य गोष्टींच्या सेवनापासून मिळणारें समाधानहि अत्यल्प असावें असा निष्कर्ष निघतो. तेव्हां आपण असें गृहित धरलें पाहिजे कीं सर्वच प्रकारच्या उत्पादनापासून मिळणारें समाधान अल्प आहे आणि घटतेंहि आहे. संपन्नता वाढली कीं आर्थिक उद्दिष्टांचें महत्व कमी होतें. उत्पादन व उत्पादनक्षमता यांचें महत्व घटत जातें.

घटणारें सीमागत समाधान ही तर्ककल्पना (Concept) अर्थशास्त्रांत मूलभूत महत्वाची आहे. आणि गरजांची व म्हणून उत्पादनाच्या आवश्यकतेची तीव्रता कमी होत जाते हें या तर्ककल्पनेचें सार असूनहि अर्थशास्त्रज्ञानां उत्पादनाची महती कायम ठेवता यावी हें कौतुकास्पद आहे. हें त्यानीं केलें खरें आणि तें देखील मोठ्या चतुराईनें. गरजांची तीव्रता कमी होते हें त्यानीं मान्यच केलें नाहीं. अंशतः हें अधिक काटेकोर शास्त्रीय अभ्यासपद्धतीच्या नांवाखालीं करण्यात आलें आणि सांकेतिक गहाणपणाला या अभ्यासपद्धतीचा एखाद्या जबरदस्त तटबंदीसारखा उपयोग झाला.

विचार अधिक सूक्ष्म होत जातो तेव्हां असें अनेकदां घडतें. अगदीं उघड व गैरसोयींचा पुरावा बाजूला सारण्यांत आला, कां तर म्हणे तो शास्त्रीय पद्धतीनें पारखून स्वीकारता येत नाहीं. शिवाय ह्याच्याहि पुढें जाऊन काही वेळां गैरसोयीच्या घटनांकडे चक्क डोळेझांक करण्यात आली.

[४]

उत्पादनाचें महत्व कायम रहावें यासाठीं पहिल्या प्रथम अशी भूमिका घेण्यात आली कीं अर्थशास्त्र ज्या वस्तूंचा अभ्यास करतें त्यांच्या वरेवाईटपणाबद्दल किंवा महत्वाबद्दल काहींच सांगूं शकत नाहीं. अमकी वस्तू आवश्यक अगर अनावश्यक, महत्वाची अगर विनमहत्वाची असें म्हणणाऱ्या विधानांची त्या शास्त्रांतून उचलवांगडी करण्यात आली. ह्या व इतर अनेक बाबतींत नियम घालून देण्याचें कार्य आल्फ्रेड मार्शलनें केलें आणि त्या नियंत्रणांचें पालन अर्थशास्त्रज्ञ तेव्हांपासून करीत आले आहेत. त्या मार्शलनें असें म्हटलें आहे कीं 'अर्थशास्त्रज्ञ प्रत्यक्ष मानसिक अवस्थांचा नव्हे तर त्यांच्या बाह्य आविष्कारांचा अभ्यास करतो; आणि जर त्या सारख्याच प्रमाणांत माणसाला कृतिप्रवण करतात असें त्याला आढळून आलें तर आपल्या कामपुरत्या त्या समान महत्वाच्या आहेत असें तो प्रथमदर्शनीं मानतो' [१] ह्या विधानाला त्यानें तावडतोब अशी पुस्ती जोडली कीं अर्थशास्त्रात अत्यंत उपयुक्त ठरलेलें हें सोपें गृहीततत्व ही केवळ 'पहिली पायरी' आहे. पण अर्थशास्त्रज्ञ मात्र तेव्हांपासून या पहिल्या पायरीच्या आधारानेंच आपलें काम करीत आहेत. इतकेंच नव्हे तर ह्या गृहीत तत्वाच्या पलीकडे पाऊल न टाकणें हें अभ्यासकाच्या संयमाचें आणि शास्त्रीय सज्जनतेचें गमक मानलें जातें. हा संयम अत्यंत आवश्यक आहे हें तरुण विद्यार्थ्यांच्या मनावर सारखें ठसवलें जातें. जर एखादा अभ्यासक असें म्हणूं लागला कीं अन्नाची गरज रास्त आहे आणि अधिक भपकेबाज मोटारीची गरज थिल्लरपणाची आहे तर त्याला अभ्यासाची शिस्त नीट लावलेली नाहीं असा निष्कर्ष अर्थशास्त्रज्ञ ताबडतोब काढतात.

या समर्थनाची पुढली पायरी म्हणून अर्थशास्त्रानें एका गोष्टीची नोंद घेतली. ती अशी कीं ग्राहकाला हव्याशा वाटतील अशा असंख्य गोष्टी आहेत. आर्थिक चिकित्सेच्या प्राथमिक (आणि मनाच्या प्रकृतीशीं संबंधित) पातळीवर असें गृहीत धरलें जातें कीं कोणत्याहि विशिष्ट वस्तूपासून मिळणारें सीमागत समाधान जरी त्या निरपवाद नियमानुसार घटत असलें तरी नव्या व वेगळ्या वस्तूंपासून मिळणारें समाधान फारसें कमी होत नाहीं. जोपर्यंत ग्राहक नव्या नव्या वस्तूंचें सेवन करीत

१ प्रिन्सिपल्स ऑफ इकॉनॉमिक्स पृ. १६

असतो—म्हणजे राशीपेक्षां विविधतेच्या शोधात असतो—तोंपर्यंत एखाद्या वस्तू संग्रहालयाप्रमाणें तो आपल्या जवळील वस्तूंची संख्या वाढवूं शकतो आणि ती देखील गरजांची तीव्रता कमी न करतां. आतां एकंदर जितक्या वस्तू घेणें शक्य असतें त्यातल्या फारच थोड्या कोणत्याहि ग्राहकांच्या मालकीच्या असतात. मग तो लॉस एंजिलिसमध्यें रहाणारा (आणि म्हणून चांगलाच सधन) कां असे ना. अशा स्थितींत आपण सेवन करीत असलेल्या वस्तूत वाढ करायला कोणत्याहि ग्राहकाला अमर्याद वांव असतो. जितका त्या वस्तूंचा पुरवठा असतो तितक्या प्रमाणात साधारणतः त्यांच्या मालकानां समाधान मिळतें. आणि ह्या वस्तूंच्या व सोयींच्या उत्पादनापासून मिळणारें समाधान घटत नसल्यामुळें त्या उत्पादनाचें महत्वहि घटत नाहीं.

ह्या भूमिकेत एका गोष्टीकडे दुर्लक्ष केलें जातें. ती अशी कीं काहीं गोष्टी ग्राहक आधीं घेतो व काहीं नंतर घेतो आणि यावरून असें सूचित होतें कीं आधीं घेतल्या जाणाऱ्या वस्तूचें त्याला अधिक महत्व वाटत असतें. ह्याचाच अर्थ असा कीं गरजांची निकड कमी कमी होत जाते. पण अधिक सूक्ष्मदर्शी मीमांसेत हा निष्कर्ष अग्राह्य मानला जातो. त्याचें कारण असें दिलें जातें कीं निरनिराळ्या वेळीं ग्राहकाची मनःस्थिती कशी असते व त्याला समाधान किती मिळतें त्याची तुलना करणें जवळजवळ अशक्य असतें. विशिष्ट वस्तूच्या सेवनामुळें वेगवेगळ्या प्रसंगी किती समाधान मिळतें त्याची तुलना करणें चूक आहे असा इशारा आतां अर्थशास्त्राचा प्राथमिक अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यानांहि दिला जातो. काल थोडें पण वाढतें वस्तुरुप उत्पन्न मिळवणारा मनुष्य चांगलें अन्न व न गळणारें छप्पर याच्यापासून मिळणारें समाधान अनुभवित होता. आज त्याचें उत्पन्न पुष्कळच वाढलें आहे आणि त्यामुळें तो उंची बूट वापरूं लागला आहे. व दर आठवड्याला शर्यती बघायला जाऊ लागला आहे. पण अधिक सकस अन्न व पावसापासून मिळणारा निवारा यामुळें त्याला जितकें अधिक समाधान मिळालें तितकें या नंतरच्या सुखसोयींपासून मिळत नाहीं. असें म्हणणें अगदीं अयोग्य आहे. परिस्थिती बदलली आहे. तो मनुष्यहि आतां बदलला आहे; त्यामुळें त्या दोन परिस्थितींत मिळालेल्या समाधानाची तुलना होऊं शकत नाहीं. एका विशिष्ट वेळीं जर एखाद्या माणसाजवळील वस्तूच्या साठ्यांत थोडी वाढ झाली तर त्याचें समाधान घटत्या प्रमाणात वाढेल व त्यामुळें तो त्या वस्तूसाठीं पूर्वीइतकी किंमत द्यायला तयार होणार नाहीं हें मान्य केलें जातें. पण नंतर कधींतरी त्याला अधिक व विशेषतः वेगळ्या वस्तू मिळाल्या तर त्यांपासून त्याला किती समाधान होईल याबद्दल मात्र वरील उदाहरणाच्या

आधारें काहींच सांगता येत नाहीं. ह्यावरून निष्कर्ष निघतो तो असा : कालांतरानें जर एखाद्या माणसाच्या जवळील वस्तूंच्या साठ्यांत वाढ झाली तर त्या वाढीमुळें त्याच्या समाधानात कमी वाढ होते असें आपण निश्चतपणें म्हणूं शकत नाहीं. त्यामुळें ज्या उत्पादनापासून हें समाधान मिळतें त्याचें महत्व कमी होत चाललें आहे, असेंहि आपण म्हणूं शकत नाहीं.

ह्या युक्तिवादानें काय साधलें आहे त्याच्यावर थोडा विचार केला तर तें उपयुक्त ठरेल. घटत्या समाधानाची तर्ककल्पना अजून शाबूद आहे, आणि गरजेची निकड व त्यानुसार किंमत देण्याची तयारी यांचें पुरवठ्याच्या राशीशीं नातें जोडण्याचें आवश्यक कार्य ती तर्ककल्पना अजूनहि करीत आहे. कोणत्याहि विशिष्ट वेळीं एखाद्या व्यक्तीजवळ वस्तूचा जितका अधिक साठा असेल तितकें त्या साठ्यांत वाढ झाल्यामुळें त्याला कमी समाधान मिळेल; आणि म्हणून वस्तूच्या त्या जादा पुरवठ्यासाठीं तो कमी किंमत देऊं करील आणि अशा सर्व व्यक्तींच्या प्रतिक्रियांची जी गोळाबेरीज ती साऱ्या समाजाची प्रतिक्रिया. म्हणून जसजसा पुरवठा वाढतो तसतशी त्याच्या सीमागत वाढीसाठीं लोक कमी कमी किंमत द्यायला तयार होतात आणि त्यामुळें मागणीच्या आलेखाला विशिष्ट आकार प्राप्त होतो. अर्थशास्त्राशीं ज्यांची अगदीं नांवापुरती ओळख झालेली असते त्यानां देखील मागणीच्या या आलेखाच्या आकाराची महिती असते. पण मागणीच्या घटत्या तीव्रतेचा जरी अशा प्रकारें खुलासा झाला तरी एकंदर वस्तूंच्या सेवनावद्दलची ओढ कमी होते किंवा काय हा प्रश्न मात्र या विश्लेषणात कुशलतेनें टाळला जातो. कारण एखादा माणूस वस्तूंसाठीं किती किंमत द्यायला तयार होईल हा प्रश्न सोडवतानां असें गृहीत धरलें जातें कीं एका विशिष्ट क्षणीं त्याला वस्तूच्या लहान मोठ्या राशी देऊ करण्यात येत आहेत. परंतु वस्तुरूप उत्पन्नांत झालेल्या वाढीमुळें सेवनोपयोगी वस्तूंच्या साठ्यात जी वाढ होते ती एका विशिष्ट क्षणीं होत नाहीं. ती व्हायला वेळ लागतो. आणि म्हणून या वाढीचा ग्राहकांच्या समाधानावर काय परिणाम होतो त्याबद्दल अर्थशास्त्रज्ञ काहींच सांगत नाहीं. शास्त्रीय अभ्यासपद्धतीशीं एकनिष्ठ रहाण्याच्या नांवाखालीं या बाबतींत तो काहीहीं सांगण्याचें नाकारतो.[1] पण ग्राहकाला मिळूं

---

१ ग्राहकांच्या मागणीच्या अधिक तंत्रशुद्ध विश्लेषणात आतां समाधानांची उंची न मोजतां पातळी पाहिली जाते. आणि उत्पादनाच्या घटत्या महत्वाकडे लक्ष जाऊं नये यासाठीं या बदललेल्या मापनपद्धतीचाहि उपयोग केला जातो. या नव्या मापनपद्धतींत एका वस्तूबद्दलची पसंती दुसऱ्या वस्तूच्या राशीच्या रूपानें मोजली जातें. ह्यांचा अर्थ असा नव्हे कीं घटत्या सीमागत समाधानाचें तत्व किंवा वाढत्या उत्पादनाच्या घटत्या महत्वाचें तत्व आतां सोडून देण्यांत आलें आहे. समान-

शकणाऱ्या वस्तूच्या विविधतेंत सतत होत जाणारा वाढ लक्षांत घेतां असें स्थूलपणें मानता येतें कीं मागण्यांची निकड काहीं कमी होत नाहीं निदान अधिक वस्तू अधिक गरजा भागवतील असा निष्कर्ष तरी विनधोकपणें काढता येतो. आणि ह्यात असें एक गर्भित गृहिततत्व असतें कीं वस्तूचें उत्पादन महत्वाचेंच नव्हे तर अत्यावश्यक असतें. त्यालाहि ढळ पोहोंचत नाहीं. आणि मनुष्यप्राण्याची उपासमार थांबविण्याचें महत्वाचें कार्य त्या नेहमींच करीत आलेल्या नाहींत का ? अशा रितीनें अर्थशास्त्रानें घटत्या सीमागत समाधानाच्या सिद्धान्तापासून स्वतःला व आपण गृहित धरलेल्या उद्दिष्टांना जो धोका होता तो मोठ्या चतुराईनें दूर केला आहे.

पसंतीच्या नकाशात किंवा पृष्ठभागात असें दाखविलेलें असतें कीं ग्राहकाजवळचा एखाद्या वस्तूचा सांठा जसजसा वाढतो तसतसा दुसऱ्या एखाद्या वस्तूच्या विशिष्ट राशीकरितां तो या पहिल्या वस्तूच्या अधिकाधिक राशी सोडून द्यायला तयार होतो. आणि हें घटत्या सीमागत समाधानामुळेंच होतें. किमान अन्नाचा साठा जवळ असल्याशिवाय ग्राहक करमणुकीला आपल्या समानपसंतीच्या नकाशात स्थान देत नाहीं. पण करमणुकीला त्यांत मुळींच स्थान नसलें तरी अन्नाला असूं शकतें.

परंतु मागणीच्या या तंत्रशुद्ध विश्लेषणात किंवा त्याच्या प्रतिपादनात वरील गोष्टीमुळें अडचण निर्माण होत नाहीं. त्यांत ज्या गोष्टीवर अधिक भर दिला जातो ती ही कीं अन्न, गॅसोलिन किंवा पिनबॉल या सर्व गोष्टींचा विशिष्ट दरानीं विनिमय होतो आणि अशा प्रकारें त्यानां पसंतीच्या एकाच पातळीवर आणलें जातें: आपल्या उत्पन्नाच्या सहाय्यानें ग्राहक समानपसंतीच्या उंचात उंच आलेखावर गेला कीं त्याला कमाल समाधान लाभतें ह्या गोष्टीला प्रस्तुत प्रतिपादनात महत्व दिलें जातें. उत्पन्न वाढलें किंवा उत्पादन वाढून किंमती घटल्या कीं ग्राहक वरच्या समानपसंतीच्या आलेखावर जातो. तेथें जाणें हें त्याचें उद्दिष्ट असतें हें या मीमांसेत गृहित धरलेलें असतें. अशा प्रकारें जी मीमांसा वस्तूंच्या साठ्यांतील सीमागत वाढीला कमी महत्व असतें असें सुचविते तीच अखेर त्या वाढीचें महत्व प्रस्थापित करते. अधिकाधिक उंचीच्या समानपसंतीच्या आलेखावर जाण्याचें महत्व कमीकमी होत जातें ही गोष्ट प्रस्तुत मीमांसा विचारात घेत नाहीं.

या विषयातला जो तज्ञ नसेल अशा वाचकाला जर या मीमांसेच्या मूळतत्वांशीं परिचय करून घ्यायचा असेल तर त्यानें पॉल ए. सॅम्युएलसन यानीं लिहिलेला सुगम सारांश वाचावा. तो त्यांच्या जॉमेट्रिकल ॲनॅलिसिस ऑफ कंझुमर इक्विलिब्रियम या परिशिष्टात आहे. पहा 'इकॉनॉमिक्स' (तिसरी आवृत्ती न्यू यॉर्क मॅग्रॉहिल १९५५) पृ. ४३२–३८.

अर्थशास्त्रानें घेतलेली ही भूमिका काहींनीं अमान्य केलेली आहे. केन्सनें असें म्हटलें आहे कीं माणसाच्या गरजांचे 'दोन वर्ग पडतात. एका वर्गातल्या गरजा स्वयंसिद्ध असतात. म्हणजे आपल्या स्नेहसंबंधातल्या इतर माणसांची स्थिती कशीहि असली तरी त्या गरजा आपल्याला जाणवतात. दुसऱ्या वर्गातल्या गरजा सापेक्ष असतात. म्हणजे त्यांचें समाधान झाले कीं अन्य संबंधित माणसांपेक्षा आपण श्रेष्ठ आहोंत असें आपल्याला वाटू लागतें.'[1] दुसऱ्या वर्गातल्या गरजांचें समाधान होणें अशक्य आहे हें त्यानें मान्य केलें. पण त्याबरोबर त्यानें असेंहि प्रतिपादन केलें कीं पहिल्या वर्गातल्या गरजांचें समाधान होणें शक्य आहे. आणि पुढें त्यानें असा निष्कर्ष काढला कीं 'जर मोठीं युद्धें झालीं नाहींत अगर लोकसंख्येंत मोठी वाढ झाली नाहीं तर पुढील शंभर वर्षांत आर्थिक प्रश्न सुटेल किंवा निदान तो सुटण्याच्या मार्गाला लागेल.' ह्याचा अर्थ असा कीं भविष्यकालाकडे आपण दृष्टी टाकली तर **आर्थिक प्रश्न हा काहीं मानवजातीचा शाश्वत प्रश्न नव्हे.**[1] परंतु या निष्कर्षाच्या आधारानें केन्स पुढें जाऊं शकला नाहीं कारण सांकेतिक शहाणपणाशीं सामना देतानां त्याला इतराप्रमाणेंच परिस्थितीचें सहाय्य हवें होतें. आणि त्यानें सुचविलेल्या मंदीवरच्या उपायाच्या संदर्भांत जसें त्याला हें सहाय्य मिळालें तसें या बाबतींत मिळालें नाहीं.

---

१ जे. एम. केन्स, एसेज इन परस्वेजन. 'इकॉनॉमिक पॉसिबिलिटीज फॉर अवर ग्रँड चिल्ड्रेन.' पृ. ३६५-६६. मोठा टाइप मुळातच आहे. केन्स हा सांकेतिक नियमानां फारसा जुमानीत नसे. आणि त्यामुळें गरजांचे वर्ग कल्पून त्यांत भेद करण्याचा अक्षम्य अपराध करण्यास तो कचरला नाहीं. वाचकांचें लक्ष या गोष्टीकडे मुद्दाम वेधावेंसें वाटतें.

प्रकरण अकरावें

गरजांचें परावलंबित्व

एखाद्या माणसाला वस्तूंचा जसा अधिकाधिक पुरवठा होतो तसतशी त्याच्या गरजांची तीव्रता कमी होत नाहीं ही कल्पना एकंदरीत समंजसपणाची वाटत नाहीं. ज्यानां ती पटवून घ्यायचीच आहे त्यानांच ती पटेल. परंतु सांकेतिक शहाणपणाशीं त्यांच्याच हद्दींत सामना द्यायला हवा. वेगवेगळ्या वेळीं, व्यक्तीच्या ज्या भिन्न मनःस्थिति असतात त्यांची तुलना होऊं शकत नाहीं हें खरें आहे. उपास पडल्यावर त्याला जाणवणारी गरज आणि शेजाऱ्यानें नवी गाडी घेतल्यामुळें झालेल्या पोटदुखीतून निर्माण झालेली गरज या दोहोंतली कोणती गरज अधिक तीव्र असते तें निश्चितपणें कसें सांगता येईल ? त्याची गरिबी नष्ट झाल्यानंतर जो काळ लोटला त्या काळांत त्याचें हृदय अधिक हळुवार झालें असणें शक्य आहे. आणि गरिबीच्या कालातलें सीमागत समाधान व संपन्नतेच्या काळातलें सीमागत समाधान यांची तुलना जेव्हां समाजाच्या बाबतींत करायचा प्रसंग येतो तेव्हां केवळ एका व्यक्तीच्या वेगवेगळ्या काळातल्या मनःस्थितींची तुलना करण्याचा प्रश्न उद्भवत नाहीं. तर वेगवेगळ्या व्यक्तीच्या वेगवेगळ्या काळातील मनःस्थितींची तुलना करावी लागते. संपन्नता वाढली तरी इच्छाची तीव्रता व त्या पुरविणाऱ्या वस्तूचें महत्व कमी होत नाहीं असें जर एखाद्या अभ्यासकाला प्रतिपादन करायचें असेल तर त्याला मुद्यांची उणीव भासणार नाहीं. त्याच्या भूमिकेचें खंडन कितीहि सयुक्तिक असलें तरी तें निर्णायक असूं शकणार नाहीं. सांकेतिक शहाणपणाचें समर्थन करतानां इतका आधार मिळाला तरी पुरेसा होतो.

परंतु या समर्थनात एक दोष आहे. व्यक्तिच्या गरजा जर तीव्र असतील तर त्या स्वयंभू असायला हव्यात. जर त्या कृत्रिमपणें निर्माण कराव्या लागत असल्या तर त्या निकडीच्या कशा असतील ? आणि विशेष म्हणजे उत्पादनाच्या ज्या प्रक्रियेनें त्यांचें समाधान होतें त्याच प्रक्रियेनें त्या निर्माण केलेल्या असता कामा नयेत. कारण तसें असलें तर गरजांच्या निकडीवर आधारलेलें उत्पादनाचें समर्थन कोसळून पडतें. उत्पादनच गरजा निर्माण करीत असेल तर गरजा भागवतें म्हणून उत्पादन महत्वाचें असा युक्तिवाद करता येणार नाहीं.

माणूस रोज सकाळीं उठला रे उठला कीं जर अनेक समंध त्याला झपाटीत असते आणि त्यामुळें कधीं रेशमी शर्ट, कधीं स्वयंपाक घरांतली भांडीकुंडी, कधीं

'कमोद' तर कधीं नारिंगाचें सरबत आपल्याला हवें अशा इच्छानीं त्याला पछाडलें असतें तर त्या इच्छांची पूर्ती करणाऱ्या वस्तू पैदा करण्याच्या प्रयत्नांचें कौतुक करणें सर्वथैव योग्य ठरलें असतें—त्या वस्तू कितीहि चमत्कारिक असल्या तरी पण आधीं त्या समंधांशीं मुद्दाम दोस्ती केल्यामुळें जर त्याला अशा इच्छानीं पछाडलें आणि त्या इच्छा पुऱ्या करण्यांच्या त्याच्या प्रयत्नामुळें जर ते समंध त्याला अधिकाधिक झपाटूं लागले तर त्या इच्छा पुऱ्या करण्याचा त्या माणसाचा प्रयत्न कितपत सुबुद्धपणाचा आहे असा प्रश्न निर्माण होईल. सांकेतिक दृष्टिकोनामुळें जर तो आंधळा झालेला नसेल तर इच्छा पुऱ्या करण्यासाठीं अधिक उत्पादन करण्यापेक्षां त्या समंधांची संख्या कमी करणें अधिक बरें असें त्याला वाटण्याची शक्यता आहे.

तेव्हां जर उत्पादनाच्या द्वारें भागविल्या जाणाऱ्या गरजा उत्पादनच निर्माण करीत असेल किंवा उत्पादनावरोबरच जर गरजा निर्माण होत असतील तर उत्पादनाचें महत्व गरजांकडे बोट दाखवून सिद्ध करता येणार नाहीं. आपणच निर्माण केलेली पोकळी उत्पादन भरून काढतें इतकेंच काय तें.

[२]

हा मुद्दा इतका मूलगामी आहे कीं त्याचा अधिक पाठपुरावा करायला हवा. ग्राहकांच्या गरजांमागच्या प्रेरणा चमत्कारिक, थिल्लर किंवा अनैतिक असल्या तरी देखील त्यांचें समाधान करूं पहाणाऱ्या समाजाचें समर्थन करता येईल. पण गरजा भागविण्याच्या प्रक्रियेतूनच गरजा निर्माण होत असतील तर हें समर्थन कोसळून पडेल. कारण मग स्वतःच्याच प्रयत्नामुळें फिरणाऱ्या चक्रावरून खालीं पडूं नये म्हणून तितक्याच वेगानें त्यावर उलट दिशेनें धावूं पहाणाऱ्या खारीचें कौतुक करणारा माणूस आणि गरजा भागविण्यासाठीं उत्पादन आवश्यक आहे असें प्रतिपादन करणारा माणूस यांत काहींहीं फरक रहाणार नाहीं.

उत्पादनातून गरजा निर्माण होतात ही गोष्ट आतां फारच थोडे अभ्यासक नाकबूल करतील. पुष्कळशा अर्थशास्त्रज्ञानीं ही गोष्ट आतां मान्य केली आहे. मात्र या कबुलींत अभिप्रेत असलेल्या सर्व गोष्टींची त्याना नेहमींच पूर्ण जाणीव असते असें म्हणता येणार नाहीं. केन्सने असें म्हटलें आहे की 'दुसऱ्या वर्गांतल्या' गरजांचें म्हणजे समाजातल्या इतर माणसांची बरोबरी करण्याच्या अगर त्यांच्याहून वरचढ ठरण्याच्या प्रयत्नांतून निर्माण होणाऱ्या गरजांचें 'समाधान होणें' अशक्य आहे असें म्हणता येईल; कारण एकंदर समाजाची संपन्नता जशी वाढते तशीं या गरजांची वाढत जाते.[१] तसेंच इतर अर्थशास्त्रज्ञानीं देखील गरजांच्या निर्मितीत अनुकरण-

१ आर्थाच्या टीपेनुसार.

प्रियतेला फार मोठें स्थान दिलें आहे. एक मनुष्य ज्या गोष्टीचें सेवन करतो त्याच गोष्टीचें सेवन आपणहि करावें असें त्याच्या शेजाऱ्याला वाटतें. ह्याचाच अर्थ असा होतो कीं ज्या प्रक्रियेनें गरजा भागविल्या जातात तिच्या द्वारेंच त्या निर्माणहि होतात. आणि जितक्या अधिक गरजांचें समाधान होतें तितक्या अधिक नवीन गरजा जन्माला येतात.

खरें म्हणजे ह्या युक्तिवादाचा ह्याहूनहि अधिक विस्तार करण्यात आलेला आहे. ग्राहकांच्या वागणुकीच्या मीमांसकांतले एक आधुनिक अग्रणी प्राध्यापक ड्युसेनवेरि यानीं स्पष्टपणें असें म्हटलें आहे कीं 'उच्चतर जीवनमान हें आपल्या समजाचें एक महत्वाचें उद्दिष्ट आहे.....सेवनाच्या मीमांसेच्या दृष्टीनें (या गोष्टीला) फार मोठें महत्व आहे.....अधिक चांगल्या वस्तू मिळविण्याची इच्छा मग स्वयंप्रेरित होते. त्या इच्छेतून अधिक खर्च करण्याची प्रेरणा निर्माण होते आणि ज्या गरजा या खर्चानें सकृतदर्शनीं भागविल्या जातात त्यांतून स्फुरलेल्या खर्च करण्याच्या इच्छेपेक्षां ही इच्छा अधिक बलवत्तर असू शकते.'[१] या भूमिकेतून ज्या गोष्टी सूचित होतात त्या महत्वाच्या आहेत. स्वयंभूपणें निर्माण झालेली गरज ही गोष्ट आतां मागे पडली आहे. उच्च रहाणीमान प्रस्थापित करणें या गोष्टीला समाज फार महत्व देत असल्यामुळें तो व्यक्तींची किंमत त्याच्या सधनतेवरून करतो. समाजाच्या उत्पादनक्षमतेवर भर देणाऱ्या मूल्यपद्धतीतून सेवनाची प्रेरणा जन्माला येते. उत्पादन जसें वाढतें त्यानुसार इष्ट ती प्रतिष्ठा संभाळण्यासाठीं अधिक वस्तूंवर मालकी असावी लागते हा प्रतिष्ठेचा मुद्दा महत्वाचा आहे. कारण संपन्न समाजात वस्तू म्हणजे केवळ प्रतिष्ठेचीं चिन्हें असतात असें जरी आपण ड्युसेनवेरींप्रमाणें म्हटलें नाहीं तरी त्याच्या युक्तिवादाचा स्पष्ट अर्थ असा होतो कीं ज्या गरजा सकृतदर्शनीं वस्तू भागवतात त्याच वस्तूंच्या उत्पादनातून निर्माण होतात.

[३]

उत्पादन आणि गरजा यांचें नातें आधुनिक जाहिरातकला व विक्रीकला या अधिक सरळपणें जोडतात. या दोन कलांची गरजांच्या स्वयंभूपणाशीं सांगड घालणें अशक्य आहे कारण इच्छा निर्माण करणें, पूर्वी अस्तित्वांत नसलेल्या गरजा निर्माण करणें हें तर या दोन कलांचें मूलभूत कार्य आहे.[२] आणि हें कार्य वस्तूंच्या उत्पादक

१ जेम्स् एस्. ड्युसेनवेरि 'इन्कम, सेव्हिंग्ज अँड द थिअरी ऑफ कंझुमर बिहेव्हियर' (केंब्रिज, मॅस, हार्वर्ड युनिव्हर्सिटी प्रेस. १९४९) पृ. २८.

२ जाहिरात ही काहीं साधी सोपी गोष्ट नाहीं. स्पर्धेच्या संग्रामनीतींत देखील तिला महत्वाचें स्थान असतें. विशिष्ट अर्थसंस्थेचा मागणी आलेख वर सरकविणें

करतो किंवा त्यांच्या प्रेरणेनें अन्य कोणी करतो. उपभोग्य वस्तूंच्या उत्पादनावर किती खर्च होतो आणि त्यांच्यासाठीं कृत्रिमपणें मागणी निर्माण करण्यावर किती होतो याचें प्रत्यक्षात परस्परांशीं काहीं एक प्रमाण असतें. एखादी नवी उपभोग्य वस्तू जेव्हां बाजारांत प्रथम विक्रीला काढली जाते तेव्हां तिच्याकडे लक्ष वेधावें म्हणून एक जाहिरातीची मोहीम करावी लागते. तसेंच वस्तूच्या विक्रीत वाढ करायची असली तर त्यासाठीं जाहिरातीवरील खर्च वाढवून अनुकूल वातावरण निर्माण करावें लागतें. आधुनिक उद्योगात एखाद्या वस्तूच्या उत्पादनावरील खर्चाला जितकें महत्व असतें तितकेंच किंवा त्याहून अधिक महत्व त्या वस्तूसाठीं मागणी निर्माण करण्यावर जो खर्च होतो त्याला असतें. ह्या माहितीत नवीन असें काहींच नाहीं. या देशातल्या अर्थव्यवहार संचालनाच्या अगदीं दुय्यम दर्जाच्या शिक्षणसंस्थेतला अगदीं मठ्ठ विद्यार्थी देखील असें म्हणेल कीं ही माहिती अगदीं प्राथमिक स्वरूपांची आहे. मागणीच्या निर्मितीवर होणारा हा खर्च जबरदस्त असतो. १९५६ सालीं जाहिरातीवर एक हजार कोटीं डॉलर खर्च झाले अर्थात, वर उल्लेखल्याप्रमाणें हा सर्वच खर्च कृत्रिमपणें मागणी निर्माण करण्यासाठीं झाला असें म्हणता येणार नाहीं. जाहिरातीवरचा हा खर्च गेली काहीं वर्षें प्रतिवर्षी शंभर कोटी डॉलर या दरानें वाढत आहे. ह्या खर्चाची ग्राहकांच्या मागणीच्या मीमांसेनें दखल घ्यायला हवी हें उघड आहे. ह्या रकमा इतक्या मोठ्या आहेत कीं त्याकडे दुर्लक्ष करून चालणार नाहीं.

पण अशी दखल घ्यायची म्हणजे मागणी उत्पादनावर अवलंबून असते हें मान्य करायला हवें. उत्पादक हा वस्तू तयार करतो आणि त्यांची गरजहि निर्माण करतो याची नोंद घ्यायला हवी. तसेंच हेंहि मान्य करायला हवें कीं उत्पादन स्वतःची गरज निर्माण करतें तें केवळ माणसाच्या अनुकरणप्रीयतेमुळें नव्हे, त्यासाठीं जाहिरातीचा व तत्संबंधित गोष्टीचा बुद्धिपुरस्सर उपयोगहि केला जातो.

सकृतदर्शनीं जा अगदीं उघड आहे अशा गोष्टीवर मीं इतका भर कां देतो आहे याचें योजकवर्गाला आणि सामान्य वाचकाला देखील आश्चर्य वाटेल. गोष्ट

व त्यासाठीं इतर अर्थसंस्थांचे मागणी आलेख खालीं ओढणें आणि त्याच प्रमाणें वस्तूंच्या भिन्नतेत भर घालून ह्या आलेखाचा आकार बदलणें हें देखील जाहिरातीचें कार्य असतें. अर्थशास्त्रज्ञानीं जाहिरातीचें हें मागणी निर्माण करण्याचें कार्य ध्यानांत घेतलें नाहीं याचें एक कारण असें कीं स्पर्धेचें एक शस्त्र या दृष्टीनें त्यानीं जाहिरातीला अधिक महत्व दिलें. पण या संदर्भांत ही गोष्ट ध्यानांत घ्यायला हवी कीं जेव्हां एखादी गरज तीव्रपणें जाणवणारी नसते तेव्हांच स्पर्धेत यश मिळविण्यासाठीं तिच्यात विशेष बदल घडवून आणता येतो.

अगदीं उघड आहे हें खरें. पण ही गोष्ट मान्य करण्यास मात्र अर्थशास्त्रज्ञानीं फार आढेवेढे घेतले आहेत. कारण उत्पादन व मागणी यांचें हें नातें प्रस्थापित आर्थिक विचारानां किती घोकादायक आहे ही सामान्य माणसाला न जाणवणारी गोष्ट त्यानां जाणवली आहे. आणि आश्चर्य म्हणजे त्यामुळें मागण्याची निर्मित्ती ही जी आधुनिक काळातील अगदीं ढळढळीत आर्थिक घटना तिच्याकडे ते डोळेझांक करीत आहेत (आणि कानावर हातहि ठेवीत आहेत).

गरजा जाहिरातीवर कशा अवलंबून असतात यावद्दलच्या पुराव्याकडे त्यांनीं संपूर्णपणें दुर्लक्ष केलें आहे असा याचा अर्थ नव्हे. जाहिरात या गोष्टीमुळें अर्थशास्त्रज्ञ इतका दीर्घकाळ असे अस्वस्थ कां झाले आहेत याचें एक कारण म्हणजे हा पुरावा. ही गोष्ट अशी आहे कीं सध्याच्या मीमांसेत तिला सहजपणें स्थान देता येत नाहीं. लोकांचें लक्ष वेधण्यासाठीं वेसुमार खर्च करून ज्या गरजा निर्माण होतात हें उघड आहे त्या गरजांच्या तीव्रतेचें विवेचन अनेक पूर्वकालीन अर्थशास्त्रज्ञानीं केलें आहे. एखाद्या न्याहारीच्या खाद्यपदार्थाची अगर कपडे धुवायच्या रासायनिक पावडरीची गरज लोकांना भासावी म्हणून जर इतका खर्च करावा लागत असेल तर ती गरज तीव्र आहे असें कसें म्हणता येईल ? पण ग्राहकांच्या मागणीच्या उपपत्तीच्या दृष्टीनें आणि उत्पादन व उत्पादनक्षमता यांच्या महत्त्वाच्या संदर्भात वरील गोष्ट कोणते प्रश्न उपस्थित करते त्याचा फारसा विचार कोणी केलेला नाहीं. अर्थशास्त्राचें हे घटक अजून तसेच पूज्य व निरपवाद मानले जातात. अर्थशास्त्रज्ञानां वाटणारी अस्वस्थता व्यक्त होते ती बहुधा जाहिरात व जाहिरातव्यवसायातील लोक यांच्याविषयीच्या नापसंतीच्या स्वरूपात. कधीं कधीं तर असें सुचविलें जातें कीं या गोष्टी नष्ट व्हाव्यात. अशा प्रकारच्या सूचनांचें काहीं स्वागत झालेलें नाहीं.

अशा प्रकारें मागण्या स्वयंभू असतात ही कल्पना अजून तग धरून आहे. आधुनिक विक्रीकलेचा प्रभाव इतका जाणवत असतानां देखील क्रमिक पुस्तकांत अजून या कल्पनेचेंच अधिराज्य आहे. आणि गरजा कशा भागवाव्या त्याचे मार्ग शोधणें हें आपलें परमकर्तव्य आहे असें अर्थशास्त्रज्ञ अजूनहि मानतात. या बाबतींत त्यांची तत्वप्रणाली जितकी ठाम भूमिका घेते तितकी इतर फारच थोड्या गोष्टींबावत घेते. असें असल्यामुळें उत्पादनाचें परममहत्त्व अजून अबाधित आहे. जें डोळ्यानां ढळढळीतपणें दिसतें तें अमान्य करण्यात सांकेतिक शहाणपण किती यशस्वी होऊं शकतें त्याचा हा पुरावा आहे. इतक्या आंधळेपणाचें दुसरें उदाहरण द्यायचें झालें तर एका सहृदय समाजसेवकाची गोष्ट सांगायला हवी. गावात शुश्रुषालयांची तीव्र टंचाई आहे असें त्याला फार पूर्वी पटलें आणि त्यामुळें तो अजूनहि जाणाऱ्या येणाऱ्यांकडे त्यासाठीं पैसे मागतो. पण शुश्रुषालय भरलेलें रहावें म्हणून गावांचा

डॉक्टर आपली मोटार सफाईनें पादचाऱ्यांच्या अंगावर घालून त्यानां जखमी करीत आहे इकडे मात्र त्या समाजसेवकाचें लक्ष जात नाहीं.

गुंतागुंतीचे प्रश्न सोडवत असतानां जें उघड आहे तिकडे आपलें दुर्लक्ष होणार नाहीं अशी आपण खबरदारी घेतली पाहिजे. गरजा जहिरातीनें निर्माण करता येतात, विक्रीकलेच्या सहाय्यानें त्यांचें खरेदींत रूपांतर करता येतें आणि कसबी अनुनयानें त्यांचें स्वरूप बदलता येतें. ह्याचाच अर्थ असा कीं त्या फारशा निकडीच्या नसतात. भुकेल्या माणसाला तुला अन्नाची गरज आहे असें पटवावें लागत नाहीं. त्याला भूक लागलेली असेल तर मेसर्स वॅटेन, वार्टन डर्स्टिन आणि ऑसबोर्न यांच्या प्रभावाला तो बळी पडणार नाहीं. आपल्याला काय हवें आहे तें कळूं नये इतक्या प्रमाणात ज्यांच्या शारिरिक गरजांची तृप्ती झाली आहे त्यांच्यावरच वर निर्देशिलेल्या मंडळींचा प्रभाव पडूं शकतो. माणसें अशा मनःस्थितीत असलीं म्हणजे मगच तीं दुसऱ्याचें म्हणणें पटवून घ्यायला तयार असतात.

[४]

या प्रकरणातील विवेचनातून जो एकंदर निष्कर्ष निघतो तो प्रस्तुत पुस्तकाच्या दृष्टीनें इतका महत्वाचा आहे कीं तो काहींसा रेखीवपणें मांडणें इष्ट वाटतें. जसजसा एखादा समाज अधिक संपन्न होत जातो तसतशी गरजांची निर्मिती त्यांचें समाधान करण्याच्या प्रक्रियेच्या द्वारेंच अधिकाधिक प्रमाणात होऊं लागते. कधीं कधीं हें आपसुखच होतें. उत्पादनाच्या वाढीबरोबर सेवनांत देखील वाढ होतें. आणि ह्या वाढीतून माणसांची अनुकरणप्रियता अधिक गरजा निर्माण करते किंवा जाहिरात व विक्रीकला यांच्या द्वारें उत्पादक प्रयत्नपूर्वक गरजा निर्माण करतात. अशा प्रकारें गरजा ह्या उत्पादनांवर अवलंबून राहूं लागतात. उत्पादनाची एकंदर पातळी उंचावली कीं समाजाच्या सुखसमाधानात देखील वाढ होते असें मानणें यामुळें अशक्य होतें. समाजाचें सुखसमाधान जागच्याजागींच रहाण्याची देखील शक्यता असते. उत्पादनात वाढ झाली कीं त्याच्याबरोबर फक्त अधिक प्रमाणात गरजा निर्माण होतात. आणि मग त्यांचें अधिक प्रमाणात समाधान करावें लागतें. ज्या प्रक्रियेनें गरजांचें समाधान होतें. तिच्यावरच गरजा कशा अवलंबून असतात याचा यापुढें वारंवार उल्लेख करावा लागेल. तेव्हां या गोष्टीला यापुढें गरजांचें परावलंबित्व (Dependence Effect) असें म्हणणें सोईस्कर ठरेल.

आतां या चिकित्सेतून जे निष्कर्ष निघाले आहेत त्यांचा थोडक्यात निर्देश करतो : अर्थशास्त्राचीं जीं सध्यांचीं उद्दिष्टें आहेत त्यांचें समर्थन ग्राहक-मागणीच्या

उपपत्तीच्या द्वारें करणें धोक्याचें आहे. प्रथमदर्शनीं असें वाटतें कीं उत्पादनाचें महत्व अबाधित आहे आणि एक उद्दिष्ट म्हणून त्यासाठीं झटणें इष्ट आहे, ह्या भूमिकेला ती उपपत्ती पाठवळ देते. ज्या गरजा भागवायच्या त्या महत्वाच्या व हितकारक आहेत. कीं नाहींत यांवद्दलच्या संशयास्पद नैतिक वादविवादात अर्थशास्त्रज्ञ पडत नाहीं. त्याचप्रमाणें एकाच अगर वेगवेगळ्या व्यक्तींची भिन्न वेळीं कशी मनःस्थिती होती त्याची तुलना करून त्यांपैकीं एका विशिष्ट वेळीं इच्छा अधिक तीव्र होती असा निष्कर्षहि तो काढत नाहीं. गरज अस्तित्वांत असते आणि त्याच्या दृष्टीनें तेवढें पुरेसें असतें. मग तो ती गरज भागविण्याच्या मार्गाला लागतो आणि ती गरज भागविणाऱ्या उत्पादनाला अवश्य तें महत्वहि देतो. एखाद्या स्त्रीच्या घरकामाप्रमाणेंच त्याचें कामहि कधींच संपत नाहीं.

आपल्या कार्याचें समर्थन करणारा हा युक्तिवाद सकृतदर्शनी प्रभावी वाटतो हें खरें. ज्या प्रक्रियेनें गरजांचें समाधान केलें जातें तिच्याच द्वारें त्यांची आपसुख व प्रयत्नपूर्वकहि निर्मिती होते ही गोष्ट एकदां मान्य केली कीं तो युक्तिवाद अंगावर उलटतो. मग उत्पादन कोणत्या गरजा भागवतें तर ज्या उत्पादित वस्तूंच्या सेवनानें निर्माण होतात त्या, किंवा वस्तूंचे उत्पादक ज्या कृत्रिमपणें निर्माण करतात त्या. उत्पादन अधिक गरजा निर्माण करतें आणि त्यांतून अधिक उत्पादन करण्याची आवश्यकता निर्माण होते. आतांपर्यंत एक फार मोठा बौद्धिक वळसा घालून ह्या गोष्टीच्या गर्भितार्थाकडे दुर्लक्ष करण्यात आलें. पण प्रश्न सोडविण्याचा हा मार्ग अत्यंत धोक्याचा आहे. वादविवादांत तो फारशी तग धरूं शकणार नाहीं.

चांगल्या समाजरचनेचे जे अनेक नमुने कल्पिण्यांत आलेले आहेत त्यांत ती खारीला धावायला लावणाऱ्या चाकासारखी असावी असें कोणीहि म्हटलेलें नाहीं. पुन्हां आपण पुढें असें पाहूं कीं हें चाक सुरळितपणें फिरत नाहीं. सांस्कृतिक दृष्ट्या तर तें अनाकर्षक आहेच; शिवाय त्याच्या रचनेंत जे गंभीर स्वरूपाचे दोष आहेत ते पुढे मागे आपल्याला त्रासदायक ठरण्याची शक्यता आहे. पण सध्या आपण किती अवघड मार्गानें वाटचाल करीत आहोत त्याचा विचार केला तरी तें पुरे आहे. आर्थिक सुरक्षिततेसाठीं आपल्याला उत्पादन करणें किती आवश्यक आहे तें आपण आठव्या प्रकरणात पाहिलें. आपल्याला अत्यंत महत्व वाटतें तें उत्पादनामुळें लाभणाऱ्या वस्तूंचें नव्हे तर त्यामुळें मिळणाऱ्या रोजगारीचें. आतां ह्या विवेचनामुळें वस्तूंचें महत्व अधिकच घटलें आहे. ग्राहकांच्या स्वयंभू गरजांमुळें कांहीं उत्पादित वस्तूनां महत्व प्राप्त होत नाहीं. उलट गरजांच्या परांवलबित्वाचा अर्थच असा कीं वस्तूनां महत्व प्राप्त होतें तें त्यांच्यां उत्पादनाच्या प्रक्रियेतूनच. उत्पादन वाढा-

यला हवें असेल तर गरजांची निर्मिती परिणामकारकपणें केली पाहिजे जर त्यांची निर्मिती केली नाहीं तर उत्पादनात वाढ होणार नाहीं. सर्वच वस्तूंच्या बाबतींत हें खरें नाहीं पण पुष्कळशा वस्तूंच्या बाबतींत आहे. आणि तेवढें आपल्याला पुरेसें आहे. कारण ह्या गोष्टीचा अर्थ असा होतो कीं ह्या पुष्कळशा वस्तूंसाठीं कृत्रिमपणें मागणी निर्माण केली नाहीं तर मागणीच शिल्लक रहाणार नाहीं, आणि त्यामुळें या वस्तूंचें महत्व अगर त्यापासून लाभणारें समाधान—त्यातला कृत्रिम भाग सोडून दिल्यास—शून्य आहे. जर हें उत्पादन सीमागत आहे असें आपण मानलें तर आपल्याला असें म्हणावें लागेल कीं सध्यांच्या एकंदर उत्पादनापासून लाभणारें सीमागत समाधान, त्यातला कृत्रिम भाग वगळल्यास, शून्य आहे. उत्पादन हें आपल्या समाजाचें प्रमुख कर्तृत्व असें ज्या दृष्टिकोनांमुळें आणि मूल्यांमुळें वाटतें तीं उरफाटीं किंवा विकृत आहेत हें आता स्पष्ट झालें आहे.

एक गोष्ट अगदीं स्पष्ट आहे, आणि ती ही कीं एकदा रिकॉर्डोच्या आर्थिक विचारांचा मूलाधार आपण सोडून दिला आणि आजच्या जगातल्या संपन्नताधिष्ठित अर्थशास्त्राकडे नजर वळवली कीं अगदीं नवीन व विविध प्रश्न उपस्थित होतात. अर्थशास्त्रात असा बदल करण्यास सांकेतिक शहाणपणानें इतका कडवा विरोध कां करावा तें सहज समजण्यासारखें आहे. विचारांच्या प्रक्षुब्ध सागरात नौका हाकारण्यापेक्षां मूर्खपणाच्या चिखलात नांगर टाकून ठाणबंद रहाणें फारच सोईस्कर असतें.

प्रकरण बारावें.

राष्ट्रीय सुरक्षिततेबद्दलचा भ्रम

१९४३ सालीं जुलैच्या अखेरीस आणि ऑगस्टच्या सुरुवातीस ब्रिटनच्या शाही विमानदलाचीं मोठीं बॉम्बफेकीं विमानें उत्तर समुद्रावरून रोरांवत गेलीं आणि तीन रात्रीं त्यानीं हॅम्बर्ग शहरावर जबरदस्त मारा केला. तीसवर्षांच्या युद्धानंतर जर्मनांवर असें प्राणसंकट कधीहि ओढवले नव्हतें. त्या शहराचा एक-तृतियांश भाग बेचिराख होऊन गेला. किमानपक्षीं ६०,००० माणसें मारली गेलीं. कदाचित् तीं संख्या एक लाख देखाल, म्हणजे हिरोशिमांत मृत्युमुखीं पडलेल्या माणसांच्या संख्येइतकी देखील असेल. त्यांतली बरीचशीं एका रात्रींत ठार झालीं. त्या रात्रीं आगीच्या एका भीषण 'वावटळीत' शहरांचा एक भाग सांपडला आणि त्या आगीनें साऱ्या गोष्टींचा स्वाहाकार केला. डांबरी पदरस्ते देखील त्या आगींत पेटले. ह्या हल्ल्याचें इतिवृत्त जेव्हां ॲडॉल्फ हिटलरनें ऐकलें तेव्हां तो देखील म्हणाला कीं युद्ध थांबवा अशी मागणी कदाचित् करावी लागेल. अशा प्रकारचे उद्‌गार त्यानें साऱ्या युद्धांत एकदाच काढल्याचें आपल्याला माहीत आहे. हर्मान गोअरिंगनें आपल्या लवाजम्यासमवेत नुकसानीची पहाणी करण्यासाठीं त्या शहराला भेट दिली. पण त्याचें तेथें असें काहीं स्वागत झालें कीं त्यानें तेथून काढता पाय घेतला.

मात्र या भीषण घटनेनें युद्धांच्या अर्थशास्त्राबद्दलचें एक सत्य उघडकीला आणलें. त्या सत्याची फार थोड्यानीं दखल घेतली आणि काहींना तर त्याकडे दुर्लक्ष करणेंच सोईचें वाटलें असेल. हॅम्बर्गमधले औद्योगिक कारखाने शहराच्या सीमाभागांत होते आणि पाणबुड्यांचीं घरें बंदरात होतीं. त्याचें या हवाई हल्ल्यांनीं फारसें नुकसान झालें नाहीं. त्या हल्ल्यांनीं उध्वस्त झाला तो शहरांचा मध्यभाग, कामगारांच्या वस्त्या आणि उपनगरें. हवाई हल्ल्यांनंतरचे काहीं दिवस उत्पादनात व्यत्यय आला. पहिल्या कांहीं आठवड्यांत तर तें २० ते २२ टक्यानीं घटलें. पण त्यानंतर तें पूर्ववत् चालू झालें. तेवढ्या अवधीत कामगारांनीं आपल्या उध्वस्त घराचीं पाहणी केली, आपली सारी चीजवस्त आणि क्वचित् कुटुंबेंहि आपण कायमची गमावून बसलों आहोत यांची पुरती खात्री पटवून घेतली मग काहीं कामचलाऊ कपडे आणि रहायला एखादी खोली किंवा तिचा भाग त्यानीं मिळवला आणि पुन्हां ते कामावर रुजू झाले. या तीन रात्रींत त्यांचें रहाणीचें मान

पूर्वीपेक्षां एकदम खालीं घसरलें होतें. रहाण्याची जागा, सामानसुमान, कपडेलत्ते, करमणूक, शाळा आणि सामाजिक व सांस्कृतिक सुखसोयी या सर्वच गोष्टींनां ते वऱ्याचशा प्रमाणात मुकले होते. पण त्यांची कामगार म्हणून जी कार्यक्षमता होती ती मात्र यामुळें कमी झाली नाहीं. नव्या परिस्थितीशीं जुळवून घेण्यात थोडा काळ गेला. पण त्यानंतर ते कामगार पूर्वीइतक्यांच निरलसपणें आणि वाकबगारपणें आपलीं कामें करूं लागले.

या कथेचें आणखी एक प्रकरण आहे. या हल्ल्यापूर्वी हॅम्बर्गमध्यें कामगारांची टंचाई होती. पण जरी बरींच माणसें मरण पावलीं होतीं आणि बरींच आवश्यक दुरुस्तीत गुंतली होतीं तरी देखील नंतरच्या काळात ही टंचाई नष्ट झाली. पूर्वी हजारों लोक विश्रांतिगृहात परिचारक म्हणून, मोटारदुरुस्तीच्या कारखान्यात कामगार म्हणून, बँकांत कारकून म्हणून, दुकानांत विक्रेते म्हणून, दुकानदार म्हणन, तिकीटतपासनीस म्हणून, इमारतींची देखभाल करणारे म्हणून किंवां हस्तोद्योगांतलें कारागीर म्हणून (हें हस्तोद्योगांचे कारखाने छोटे आणि जुने असल्यामुळें शहराच्या मध्यभागी असण्याची शक्यता अधिक होती) काम करीत असत. पण आतां त्यांचीं काम करायची ठिकाणें उध्वस्त झालीं होतीं. पूर्वी हे लोक युद्धोपयोगी उत्पादनाला कोणतीच मदत करीत नसत. पण आतां लोकांचें रहाणीचें मान कायम ठेवण्यासाठीं काम करणें त्यानां शक्य नव्हतें आणि आवश्यकहि नव्हतें. तेव्हां येथें नक्की काम मिळेल या अपेक्षेनें ते युद्धसामुग्रीच्या कारखान्यांकडे वळले.

थर्ड राइशमधलें जीवन व्रतस्थ आणि समर्पित होतें. पुन्हां एका विनाशक युद्धाचें तिसरें वर्ष चालू होतें. पण तरी देखील संचयीमुळें आवश्यक वाटणाऱ्या अनेक सुखसोयी सामान्य नागरिकाला उपलब्ध होत्या[1] आणि त्या आवश्यक वाटत

१ खरें म्हणजे १९४३ सालीं जर्मन लोक आपल्या साऱ्या शक्ती पणांला लावून युद्धसामुग्रीचें उत्पादन करीत नव्हते. या बाबतींत त्यावेळीं ते खात्रीनें ब्रिटिश लोकांच्या मागे होते. कांहीं दिवसांपूर्वीच विजयाचें उन्मादक वातावरण निर्माण झालें होतें आणि त्यामुळें प्रयत्नांत थोडी शिथिलता अपरिहार्यपणें आली होती. पुष्कळसे नाझी पुढारी ऐषआरामी वृत्तीचे होते आणि त्यामुळें ते स्वतः जो निग्रह दाखवीत नव्हते तो इतरांवर लादणें त्यानां अंमळ अवघड जात होतें. ज्या हुकुमशाहीचा स्वतःच्या प्रजेवर पुरता विश्वास नसतो ती त्यांच्यावर हालअपेष्टा लादायला कचरते. शिवाय औद्योगिक शक्ती युद्धकार्यासाठीं कशा संघटित कराव्या त्याचो नीति जर्मनानां नीटशी माहित नव्हती आणि युद्ध अल्पकाल चालेल हें त्यांच्या युद्धनीतीचें गृहिततत्व होतें. हें अज्ञान त्यांच्या अपयशाचें सर्वांत महत्वाचें कारण होतें. त्यापासून धडा घेता येण्यासारखा आहे.

होत्या म्हणूनच आवश्यक होत्या. अशा बाबतींत सरकारानां—मग तीं हुकुमशाही सरकारें का असतना, लोकांच्या ठाम कल्पनांपुढें वाकावें लागतें–त्या कल्पना पसंत नसल्या तरी. जीवरक्षण व कार्यक्षमता यांसाठीं ज्या शारिरिक गरजा भागवाव्या लागतात त्याहून कितीतरी अधिक गरजा भागविण्याइतकें जर्मन रहाणीमान उंच होतें. ब्रिटनच्या शाही विमानदलानें या रूढ कल्पना उध्वस्त केल्या आणि शारिरिक गरजा भागविण्यासाठीं ज्या किमान गोष्टी आवश्यक असतात त्याच फक्त मिळतील इतकें रहाणीचें मान खालीं आणलें. आणि असें जेव्हां झालें तेव्हां जर्मनीत जिचा अत्यंत तुटवडा होतो ती श्रमशक्ती सर्वस्वी युद्धसाहित्याच्या उत्पादनासाठीं उपलब्ध झाली.

हॅम्बर्गवरच्या हल्ल्यांनीं अनावश्यक गोष्टींचें सेवन कमी केलें आणि त्यांचा पुरवठा करण्यात गुंतलेल्या माणसानां मोकळें केलें. जें अन्य कोणत्याहि मार्गांनीं साध्य झालें नसतें तें अशा प्रकारे साधलें. हॅम्बर्गवरच्या हल्ल्यानीं जर्मनांच्या युद्धसाहित्याच्या उत्पादनात वाढ करून त्या देशाचें सैनिकी सामर्थ्य वाढवलें असेल हे अगदीं शक्य आहे. [१]

[२]

लष्करी धोरण व आंतरराष्ट्रीय संबंध यांच्या क्षेत्रांत सांकेतिक शहाणपणाला फारच प्रतिष्ठा असते. ह्या क्षेत्रांतले प्रश्न अवघड असतात आणि त्यांचे अनेक धागेदोरे असतात. अशा परिस्थितीत जुन्या कल्पना आणि जुने आडाखे खंडकांसारखे वाटतात आणि माणसें त्यांच्यावर उभीं रहातात. त्यांच्यावर लोकांची फार निष्ठा असते आणि तितकाच ते नव्या विचारानां विरोध करतात. कारण आधींच जें गुंतागुंतीचें व अनिश्चिततेनें व्यापलेलें असतें त्या जगात हे तसे विचार अधिक गुंतागुंत निर्माण करतात. शिवाय जेव्हां शांतता असते तेव्हां लष्करी धोरणाबद्दलचें सांकेतिक शहाणपण प्रत्यक्ष घटनांच्या निकषावर पारखून घेता येत नाहीं.

---

१ युनायटेड स्टेटस स्ट्रॅटेजिक बॉम्बिंग सर्व्हे या संघटनेनें (हिच्या संचालकांपैकीं मीं एक होतों) १९४५ सालीं केलेल्या अभ्यासांवर ही माहिती आधारलेली आहे. हॅम्बर्गवरच्या हल्ल्यांच्या परिणामांची तपशीलवार तपासणी या संघटनेनें केली. हॅम्बर्गनें औद्योगिक क्षेत्रांत जी पुन्हां आघाडी मारली त्याचा जर्मनानां सहाजिकच अभिमान वाटत होता आणि म्हणून त्याबद्दल त्यानीं तपशीलवार माहिती नोंदून ठेवली होती. तिचा आमच्या तपासणीत पुष्कळच उपयोग झाला.

सामान्यतः प्रत्यक्ष अनुभवच चूक उघडकीस आणतो हें आपण वर पाहिलेंच आहे. पण इथें तोच मिळत नसल्यामुळें सांकेतिक शहाणपणाला चांगलेंच संरक्षण मिळतें. गेल्या शतकांत तरी राष्ट्रें जेव्हांजेव्हां युद्धात उतरलीं तेव्हांतेव्हां बहुधा त्यानां असें आढळून आलें, कीं, आधींच्या शांततेच्या काळात जें लष्करी शहाणपण अत्यंत मोलाचें म्हणून त्यानीं उरापोटाशीं संभाळलें आणि जवळजवळ ईश्वरदत्त आहे असें मानलें तें प्रत्यक्ष परिस्थितीच्या निकपावर मात्र कुचकामाचें व हास्यास्पद ठरलें. चालू शतकाच्या तिशींत पुढील गोष्टी ठामपणें खऱ्या मानल्या गेल्या होत्या. मॅजिनो लाइन ही अभेद्य आहे, फ्रेंच सैन्य कसलेलें आणि कार्यक्षम आहे, अमेरिकन उद्योग चटकन व विनासायास सांघेबदल करून युद्ध साहित्याचें उत्पादन करूं शकेल, ए.ए.एफ्. दिवसा परिणामकारक बॉम्बहल्ले करूं शकेल, नाकेबंदी व आर्थिक युद्ध हीं फार परिणामकारक असतात, रशिया हा देश स्वभावतःच दुबळा आहे. पण यांपैकीं एकहि गोष्ट अनुभवाच्या कसोटीला उतरूं शकली नाहीं, याचें आपल्याला तरी आश्चर्य वाटणार नाहीं. कारण सांकेतिक शहाणपणाचें स्वरूप आपल्याला चांगलें माहीत आहे.

दुसऱ्या जागतिक युद्धाच्या अखेरीस सांकेतिक शहाणपणात एका विधानाला जबरदस्त प्रतिष्ठा होती. तें असें कीं राष्ट्राचें सामर्थ्य व आर्थिक उत्पादन यांचें निकटचें नातें असतें. सरसकट राष्ट्रीय उत्पादनात ज्या प्रमाणात वाढ होते त्या प्रमाणात राष्ट्रीय सामर्थ्य, संरक्षणक्षमता व बाह्य शत्रूंपासूनची सुरक्षितता या गोष्टींतहि वाढ होते ज्या देशांचें उत्पादन अधिक वेगानें वाढतें तो अंतीम विजयाची वाटचाल करीत असतो. 'स्वातंत्र्यप्रेमी राष्ट्रें अखेर तग धरूं शकतील कीं नाहीं तें बहुधा उत्पादन शक्ती वाढविण्याच्या त्यांचा कुवतीवर अवलंबून राहील... सोव्हिएट युनियनचा जो आर्थिक विकास होतो आहे त्यावरच सोव्हिएट राज्यकर्त्यांची पुष्कळशी मदार आहे.'[१] 'ज्या दिवशीं बिगरकम्युनिस्ट राष्ट्रानां सर्वंकष हुकुमशाहीच्या मार्गांचा उपयोग न करतां कम्युनिस्ट राष्ट्रांपेक्षां अधिक वेगानें विकास करण्याचा मार्ग सांपडेल, त्या दिवशीं कम्युनिझमचा पराभव होईल—तो पर्यंत नाहीं.'[२]

असे निष्कर्ष ज्यांनी काढले त्यानां आपल्या सूक्ष्म बुद्धीचा काहींसा संयमित अभिमानहि वाटत असे. अर्थशास्त्र व लष्करी सामर्थ्य यांचें नातें अखेर लोकानां उमजलें

१ असिस्टंट सेक्रेटरी ऑफ स्टेट यानीं नाइन्थ इंटरनॅशनल बँकिंग सेमिनारपुढें केलेलें भाषण, रट्जर्स युनिव्हर्सिटी, जुलै ९, १९५६.

२ स्टेट डिपार्टमेंटचे भूतपूर्व अर्थशास्त्रज्ञ, न्यू रिपब्लिक, एप्रिल २९, १९४७.

होतें. नेपोलियनच्या काळापावेतों आपल्या सैनिकानां अन्न पुरविण्यासाठीं सेनादलें शत्रूच्याच नव्हे तर मित्रांच्याहि प्रदेशात अनिर्बंधपणें लूटमार करीत असत–अर्थव्यवस्था उध्वस्त करीत असत. पहिल्या जागतिक युद्धाच्या वेळीं देखील लष्करी योजना आखतानां आपली अर्थव्यवस्था आवश्यक ती साधनसामुग्री पुरवूं शकेल कीं नाहीं याचा विचार सेनापती करीत नसत. खरें म्हणजे अर्थशास्त्राचें महत्व लोकानां पटलें तें त्या युद्धातील विशिष्ट रणनीतिमुळें इंग्लिश खाडींपासून ते स्वित्झर्लंडपर्यंत खांद्याला खांदा भिडवून सैनिकांची एक अखंड रांग खडी होती आणि त्यानां साधनसामुग्री पुरवावी लागत होती. पोलाद आणि दारूगोळा यांचा जबरदस्त घडाका दिल्याशिवाय ते सैनिक पुढें सरकूं शकणार नाहींत असा त्यावेळचा सर्वश्रेष्ठ लष्करी सिद्धान्त होता. आणि त्यामुळें मग घोडदळाच्या अगदीं तडफदार अधिकाऱ्यांच्या डोक्यांत देखील असा प्रकाश पडला कीं चाल करून जाणाऱ्या सैन्याला मिळणारें तोफखान्याच्या सरबत्तीचें पाठबळ आणि सैन्यामागें उभ्या असलेल्या अर्थव्यवस्थेची उत्पादनक्षमता यांचें काहींतरी नातें आहे. [१]

अनुभवाच्या ह्या पार्श्वभूमीमुळें दुसऱ्या जागतिक युद्धांत जवळजवळ प्रत्येकाला असें पटवून देता आलें कीं सेनादलाचें सामर्थ्य हें त्यानां साधनसामुग्री पुरविणाऱ्या

---

१ उत्पादन किंवा उत्पादनाच्या वाढीची गती ही राष्ट्रीय सामर्थ्य मोजण्याची एकमेव फूटपट्टी आहे असें सांकेतिक शहाणपण मानतें. पण काहीं विशिष्ट अभ्यासकानीं या बाबतींत आणखी पुढें मजल मारली आहे. त्याचें एक वेधक उदाहरण म्हणून मिस्टर पीटर वाइल्स यांच्या एका लेखाकडे बोट दाखवितां येईल. [ग्रोथ व्हर्सेस चॉइस, इकॉनॉमिक जर्नल. खंड LXVI (जून १९५६) पृष्ठ २४४-५५.] उत्पादन गरजांची कधीं बरोबरी करूं शकेल ही कल्पना मिस्टर वाइल्स सुरुवातीलाच उडवून लावतात. "उपभोगाला अधिक वांवच राहिला नाहीं असें कधीं होईल ही शक्यता आपण इथें विचारात घेण्याचें कारण नाहीं.... ग्राहकांच्या सगळ्या गरजा भागविण्याइतकें उत्पादन वाढलें आहे...अशी परिस्थिती जर कधीं निर्माण होणारच असेल तर तसें व्हायला अजून खूप अवधी आहे." पुढें भांडवलाचा अंतर्गत निवेश व निर्यात यासाठीं अधिक साधनसामुग्री कशी आवश्यक आहे व तो उपलब्ध व्हावी म्हणून पाश्चिमात्य राष्ट्रांनीं प्रगतीची गती कशी वाढवली पाहिजे हें ते सांगतात. पण जर आर्थिक विकासच गरजा निर्माण करीत असेल–जर या दोन गोष्टी परस्परावलंबी असतील–तर हें जादा उत्पादन मिस्टर वाइल्सनां अभिप्रेत असलेल्या कार्यासाठीं उपलब्ध होणार नाहीं. जर उत्पादन व विकास यांच्या द्वारेंच ग्राहकाच्या निवडीच्या कक्षा व

अर्थव्यवस्थांच्या सामर्थ्यावर अवलंबून असतें, आणि सरसकट राष्ट्रीय उत्पादन हे त्या आर्थिक सामर्थ्याचें निदर्शक असतें. पुन्हां अखेर ज्यांचें सरसकट राष्ट्रीय उत्पादन अधिक होतें त्याच राष्ट्रानां विजय मिळाला. त्यामुळें या कल्पनेला, लष्करी सामर्थ्याचें एक नवीन परिमाण या नात्यानें सांकेतिक शहाणपणात तावडतोब पक्कें स्थान मिळालें. आणि अजून तें स्थान कायम आहे. आतां नुसते सेनादल मोठें असून चालत नाहीं तर अधिक काहींतरी लागतें हें सूक्ष्म ज्ञान आपल्याला आहे या समाधानात आपण आहोंत. अशा रितीनें दुसऱ्या एका मोठ्या भ्रामक कल्पनेला आपण बळी पडलों आहोंत आणि ती घातक ठरण्याची शक्यता आहे.

[३]

सरसकट उत्पादन नव्हे तर लष्करी दृष्ट्या उपयुक्त असलेलें उत्पादन महत्वाचे असते ही गोष्ट उघड आहे. जर सर्व उत्पादन मुलकीं सेवनावरच खर्च झालें आणि लष्करी उपयोगासाठीं काहींच शिल्लक राहिलें नाहीं तर उत्पादन खूप असूनहि लष्करी सामर्थ्य अत्यल्प असूं शकेल. उपलब्ध आर्थिक साधनांवरोवरच त्यांच्या द्वारें भागवायच्या गरजा देखील आपण विचारात न घेतां उत्पादनावद्दल वोलणें हें एखादें पिंप आधींच भरलेलें आहे कीं नाहीं तें न पहातां त्यात किती पाणी साठवितां येईल त्याचा हिशेव करण्यासारखें आहे.

स्वरूप निश्चित होत असेल तर 'विकास कीं निवड' हा मिस्टर वाइल्सनीं उपस्थित केलेला प्रश्नच विनवुडाचा आहे.

लुडेनडॉर्फ या जर्मन सेनापतीनें असें एक मोठें चमकदार विधान केलें कीं जर्मनीचा पराभव झाला तो अमेरिकन उद्योगपतींच्या 'निर्दय कार्यक्षमतेमुळें.' त्यानां युद्ध म्हणजे काय तें माहीत होतें. सांकेतिक शहाणपणात या शाबासकीला एखाद्या धार्मिक नियमाइतकें महत्व आहे. सैनिकी सामर्थ्यासाठीं आर्थिक उत्पादनक्षमता किती आवश्यक आहे तें सिद्ध करण्यासाठीं या विधानाइतका दुसऱ्या कोणत्याच विधानाचा उपयोग करण्यात आलेला नाहीं. पण खरें म्हणाल तर आपण काय म्हणतोय त्याचा अर्थ लुडेनडॉर्फला माहीत नव्हता. त्याचें आर्थिक ज्ञान अगदींच वेतावें होतें. त्यामुळें आर्थिक सामर्थ्य व लष्करी सामर्थ्य यांचें नातें त्याला समजलें असतें तर तीच आश्चर्याची गोष्ट ठरली असती. प्रत्यक्षांत ब्रिटन व फ्रान्स यांचें औद्योगिक सामर्थ्यच आपल्या सामर्थ्यापेक्षां अधिक परिणामकारक ठरलें. आपण फक्त दीड वर्षच त्या युद्धांत भाग घेतला आणि आपली साधनसामुग्री पुरेशा प्रमाणात पश्चिम आघाडीवर पाठविण्यास तेवढा अवधी पुरेसा नव्हता. खरें म्हणजे आपले सैनिक फ्रेंच व ब्रिटिश शस्त्रास्त्रेंच पुष्कळशा प्रमाणात वापरीत होते. त्या युद्धात ज्यानीं भाग घेतला त्या सैनिकानां हें माहीत आहे.

पण ह्या प्रश्नाला इतर अनेक अंगें आहेत. जर एखादें पिंप सदाच भरलेलें रहावें अशी परिस्थिती असेल तर त्यांत किती पाणी राहूं शकेल हें त्याच्या आकारावरून ठरविण्यात काहींच अर्थ नाहीं. आणि गरजांचें परावलंबित्व लक्षांत घेतां अर्थव्यवस्थेची अवस्था या पिंपासारखीच असते. आपण अर्थव्यवस्थेची उत्पादनक्षमता वाढवतो पण ती वाढविण्यासाठीं या ना त्या मार्गानें उत्पादनाची मागणी पण वाढवतो. आणि उत्पादनावरोवर जर ही मागणी देखील वाढत असेल तर परिणामतः फारसें उत्पादन कधींच शिल्लक रहाणार नाहीं. जर उत्पादन वाढविण्यासाठीं त्याची मागणी वाढवणें अवश्य असेल तर मग दुसरें काय होणार ? आणखीं एक दृष्टांत द्यायचा तर फुग्यात भरलेल्या हवेपेक्षां काहीं फुगा मोठा असूं शकत नाहीं.

सांकेतिक शहाणपण या परस्परावलंबित्वाकडे अंशतः तरी दुर्लक्षच करतें त्याच्या मतें संरक्षणासाठीं किती साधनसामुग्री उपलब्ध आहे तें एकंदर उत्पादनावरून ठरतें. आणि तिथेंच तो प्रश्न सुटतो. जगात निरपवाद अशीं तत्वें आधींच थोडीं आहेत. तेव्हां जीं आहेत त्याबद्दल शंका कशाला उपस्थित करा ?

पण या वाबतींत जेव्हां अधिक सूक्ष्म विचार होतो तेव्हां असें निःशंकपणें गृहीत धरलें जातें कीं आणीबाणीची परिस्थिती जर निर्माण झाली तर नागरिकांच्या गरजा सहज आणि चटकन कमी करतां येतील आणि त्या भागविण्यांत खर्च होणारें उत्पादन सार्वजनिक कार्यासाठीं वापरतां येईल. परंतु खरें म्हणजे संरक्षणासाठीं व शांतता टिकविण्यासाठीं जी साधनसामुग्री लागतें तिची गरज शांततेच्या काळातच अधिक असते. पण त्या काळात आणीबाणीची परिस्थिती पुकारण्यात आलेली नसते व म्हणून नागरिकांच्या गरजा कमी करण्यास सकृतदर्शनीं तरी सवळ कारण नसतें. जो समाज गरजा वाढवून त्यांच्या द्वारें उत्पादनात वाढ करतो, त्याच्याजवळ गरजा भागवण्यावर फारच थोडें उत्पादन शिल्लक राहूं शकतें. शिवाय गरजांचें परावलंबित्व जर ध्यानांत घेतलें तर आणीबाणीच्या परिस्थितींत उत्पादन संरक्षणकार्याकडे चटकन वळवता येईल ही कल्पना टिकाव धरूं शकत नाहीं. परस्परविरोधी प्रमेयांवर ती आधारलेली आहे ही गोष्ट मग स्पष्ट होते. हा वैचारिक गोंधळ विघातकहि ठरला असता. पण संरक्षणाविषयींच्या ज्या कल्पनांशीं तो निगडित होता त्याच आतां जुन्यापुराण्या होऊन मागें पडल्या आहेत. आणि त्यामुळें तो प्रसंग टळला आहे.

वरील भूमिका असें गृहीत धरते कीं शांततेच्या काळांत जो समाज ग्राहकांच्या गरजांच्या समाधानाला सर्वांत अधिक महत्व देतो आणि निव्वळ जगण्यासाठीं व

साध्यासुध्या सुखासाठीं अनेक वस्तूंची आवश्यकता असते असा समज जो समाज लोकांच्या मनात निर्माण करीत असतो तोच समाज राष्ट्रीय आणीबाणीच्या परिस्थितींत हा दृष्टिकोन सहजगत्या सोडून देईल. एखाद्या माणसानें सकाळीं उठल्यावर रात्रींचा पोषाख काढून टाकावा त्याप्रमाणें इतक्या काळजीपूर्वक ज्यांची जोपासना केलेली असते त्या गरजांचा लोकानां अशा प्रकारें सहजगत्या विसर पडेल. त्यामुळें ग्राहकोपयोगी वस्तूंच्या उत्पादनासाठीं वापरली जाणारी उत्पादन-शक्ती समाजाच्या संरक्षणप्रयत्नांसाठीं उपलब्ध होईल. हॅम्बर्गमधल्या लोकांप्रमाणें प्रस्तुत समाजातल्या लोकांचा असा समज झालेला आहे कीं अमुक एक रहाणीचें मान ही माणसाची किमान गरज आहे. जगातल्या अत्यंत वाकबगार प्रचारकांनीं ही गोष्ट त्यांच्या मनावर ठसवलेली आहे. राष्ट्रातल्या अत्यंत कार्यक्षम मानस-शास्त्रज्ञानीं तिला अधिकाधिक पुष्टी दिलेली आहे. आणि तरी असें गृहीत धरलें जातें कीं लोक आपला हा गैरसमज अगदीं सहजगत्या आणि विनानाखुषीनें सोडून देतील आणि आवश्यकतेनुसार आपलें रहाणीचें मान खालीं आणतील.

हा युक्तिवाद अगदीं उघड उघड अर्थशून्य आहे. निदान असें गृहीत धरणें हा एक विलक्षण जुगार आहे. हें असें म्हणण्यासारखें आहे कीं अगदीं विनाश व्हायची पाळी येईपर्यंत मनांतला भ्रम कायम राहील, आणि ती पाळी येऊन ठेपली म्हणजे मात्र माणूस एकदम शहाणा होईल. पण मोटारगाड्या हा आपल्या जीवनपद्धतीचा एक आवश्यक भाग आहे अशी खात्री पटली असतानां आणि त्यांच्यावर आपण अवलंबून आहोत हें नित्याच्या जीवनात दिसत असतानां आपला हा भ्रम नाहींसा होईल हें खरें वाटत नाहीं. त्या ऐवजीं मोटारगाड्यांची आपल्याला आवश्यकता आहे असेंच वाटत रहाण्याची शक्यता अधिक. ह्याच्या अर्थ असा की मोटारगाड्यांनां गती देणारें पेट्रोल, त्यांचीं निगा राखणारीं दुरुस्ती केंद्रें, त्यांच्या दुरुस्तीसाठीं आवश्यक असलेले यांत्रिक व सुटे भाग आणि अपघातामुळें अगर दीर्घ वापरामुळें त्या निकामी झाल्या कीं त्यांची जागा घेणाऱ्या नव्या गाड्या यांचीहि आपल्याला आवश्यकता वाटेल. जी गोष्ट मोटारगाड्यांची तीच गोष्ट स्वयंपाकघरें, कपडे, टेलिव्हिजन, अन्न, भांडीं धुण्याचीं यंत्रें, करमणुकीचीं साधनें इत्यादि बहुतेक इतर वस्तूंची. जर शांततेच्या काळांत आपण तेलावर चालणाऱ्या शेकोट्या व शेगड्या यांच्यावर अवलंबून असलों तर आणीबाणीच्या परिस्थितींत आपलें त्यांच्यावाचून चालू शकेल का ? आपलें असें चालू शकेल असें मानणें व्यवहारीपणाचें होईल का ? शांततेच्या काळांत आरोग्य रक्षणासाठीं गोठवलेला ताजा संत्र्यांचा रस आवश्यक आहे असें आपल्याला वाटत असलें तर युद्धांचा धोका निर्माण झाला म्हणून आपली ही भूमिका चटकन बदलेल का ? लोकशाही-

निष्ठ समाज त्याग करायला तयार नसतो ह्याचें हें उदाहरण नाहीं. तर काहीं गोष्टी आवश्यक आहेत व त्यांच्यावाचून चालणें अशक्य आहे असें मानणाऱ्या लोकांची ही कथा आहे. लोकांच्या मनांत असा भ्रम निर्माण करण्यासाठीं किती अफाट पैसा खर्च झाला तें आपल्याला माहीत आहे. आणि तरी अपेक्षा अशी कीं हा भ्रम मात्र बौधिक निग्रहानें दूर करता येईल.

हा युक्तिवाद मर्यादेबाहेर ताणणें योग्य होणार नाहीं. लोकानां थोडीफार काटकसर करायला लावणें नेहमींच शक्य असतें. काहीं गरजा दडपून टाकता येतात आणि काहींना पायबंद घालतां येतो. इथे तिथे थोडी फार बचत करता येते. आणि इतर गोष्टी समान असल्या तर लहान अर्थव्यवस्थेपेक्षां मोठ्या अर्थव्यवस्थेत अधिक बचत करता येते. पण असें म्हटल्यामुळें माझा मुद्दाच मीं बराचसा सोडून दिला असें कोणी मानूं नये. कारण अशा प्रकारें एकंदर जी बचत होते ती समग्र उत्पादनाइतकी नसते. ज्या अर्थव्यवस्थेंत गरजाचें परावलंबित्व आपलें कार्य करीत असतें तेथें समग्र उत्पादनाचा लहानसाच हिस्सा अशा प्रकारें उपलब्ध होऊं शकतो. या पूर्वी जेव्हां आणीबाणीची परिस्थिती निर्माण झाली होती तेव्हां या मार्गानें फारच थोडें उत्पादन संरक्षणासाठीं उपलब्ध झालें होतें. त्या मानानें उत्पादन वाढवण्यासाठीं जे पद्धतशीर व नेटाचे प्रयत्न करण्यात आले तेच अधिक परिणामकारक ठरले.[१] आपण बचावले गेलों ते आपल्या अर्थव्यवस्थेच्या मोठ्या आकारामुळें नव्हे तर तिचा विकास करण्याच्या आपल्या तोंवर न वापरलेल्या सामर्थ्यामुळें.

[४]

हा युक्तिवाद केवळ पुस्तकी नाहीं. अनुभवाच्या आधारें तो सहज पारखून घेतां-येण्याजोगा आहे. मात्र दुसऱ्या महायुद्धात आपण सुदैवानें विजयी झाल्यामुळें अनुभवाचे हे धडे पुष्कळसे झांकाळून गेले आहेत. १९४१ सालीं जेव्हां युद्धाचा धोका अधिकाधिक स्पष्ट होत होता तेव्हां सेवनांत वेगानें वाढ होत होती. हें वाढतें सेवन आपल्या सैन्यासाठीं लागणारी युद्धसामुग्री आणि ब्रिटन व अन्य मित्र राष्ट्रानां[२] द्यावी लागणारी मदत ह्या सर्वांचा पुरवठा करण्यास अर्थव्यवस्थेची उपलब्ध उत्पादन-शक्ति फार काळ पुरी पडणें शक्य नव्हतें. तिच्यावर हा सगळा भार पडला असता तर युद्धसामुग्रीच्या पुरवठ्यात खूपच खोळंबा झाला असता. मुलकी सेवनाच्या वस्तूंचे उत्पादन कमी करावें अशा योजना १९४१ सालीं पुढें मांडण्यात आल्या. ह्या योजनानां ज्वलंत विरोध करण्यांत आला. आणि तो करण्यांत विशेष पुढाकार

१ पहा. पृष्ठें ९७-१०४

२ १९४० सालीं फ्रान्सचा पाडाव झाल्यावर आपल्या सैन्य उभारणीस खऱ्या अर्थानें प्रारंभ झाला. लीज लेंड बिल १९४१ च्या सुरवातीच्या काळांत संमत करण्यात आलें.

कोणा घेतला असेल तर तो अर्थव्यवस्था युद्धोन्मुख करण्यास वॉशिंग्टनला आलेल्या उद्योगधंद्याच्या चालकानीं. या विरोधामागचे हेतु संमिश्र स्वरूपाचे होते आणि तेव्हांच्या क्षुब्ध मनःस्थितीमुळें आरोप प्रत्यारोप देखील बरेच करण्यात आले. स्पर्धेत यश मिळविण्यासाठीं मोक्याच्या जागा पटकावण्याची इच्छा, शांततेकालात बाजारपेठा गमाविण्यांची धास्ती, दूरवरचा विचार करण्यांविषयीं अविश्वास दाखवायचा आणि प्रश्न आपोआप सुटतील असें समजून चालायचें ही सरकारांत अधिकाराच्या जागांवर असलेल्या उद्योगचालकांची वृत्ती, ह्या सर्व गोष्टी त्या मागें होत्या. पण त्या सर्वांच्या मुळाशीं जी महत्वाची गोष्ट होती ती अशी कीं लोकानां त्या वस्तू हव्या होत्या, महत्वाच्या वाटत होत्या. उत्पादकानां देखील तसेंच वाटत होतें आणि त्या वस्तूंचा पुरवठा करायला ते उत्सुक होते. या दृष्टिकोनानां बौद्धिक पातळीवरून काहीं प्रमाणात विरोध झाला हें खरें. पण तरी १९४१ साल संपेपर्यंत तेच प्रभावी ठरले. सरकार जरी उद्योगधंद्यांच्या चालकानां विशेष अनुकूल नव्हतें तरी हे दृष्टिकोन प्रभावी ठरले. १९४१ सालीं नागरिकांच्या गरजा भागवणाऱ्या वस्तूंच्या उत्पादनात महत्वाच्या अशा कपाती झाल्याच नाहींत. इतकेंच नव्हे तर सेवनात होणारी वाढ थोपविण्याचा देखील प्रयत्न झाला नाहीं. न्यू डील अंमलात आणणारें सरकार जर उद्योगचालकानां अनुकूल असतें तर अर्थात् हा प्रश्नच उपस्थित झाला नसता.

१९४१च्या डिसेंबर मध्यें युद्ध सुरू झाल्यावर ही परिस्थिती जितक्याप्रमाणात पालटली असें सामान्यपणें मानलें जातें तितक्याप्रमाणात ती खरोखर पालटली नाहीं. धातूंपासून बनविलेल्या गोष्टींचें उत्पादन कमी करण्यात आलें किंवा थांबविण्यात आलें. पण तें देखील काहींशा प्रयत्नानेंच. युद्धांत विशेषतः जुन्या वळणाच्या युद्धांत धातूंचा विशेष प्रमाणात उपयोग केला जातो. पण अशा विशिष्ट वस्तूंचें उत्पादन कमी करण्यात आलें असलें तरी वस्तूंचें सेवन एकंदरीनें कमी झालें नाहीं. स्थिर (१९४७ सालच्या) किमतींच्याद्वारें मोजदाद केली तर असें आढळून येतें कीं १९४० ते १९४५ या काळात उपभोग्य वस्तूंचें उत्पादन व विक्री १२·२५ हजार कोटी डॉलरांवरून १४·५२ हजार कोटी डॉलरांवर गेली. म्हणजे त्यात २·३ हजार कोटी डॉलरांचा वाढ झाली. त्यानंतरच्या शांततेकालीन निर्बंध रहीत अशा पांच वर्षांत उपभोग्य वस्तूंच्या उत्पादनात जी वाढ झाली ती याहून फारशी मोठी नव्हती. ती ३·८ हजार कोटी डॉलरांहून जरा कमीच होती. [१] दुसऱ्या जागतिक युद्धात आपण आपली उत्पादन शक्ती युद्धकार्यासाठीं फारशा प्रमाणात वापरली नाहीं. धातूंचें उत्पादन व उपयोग करणाऱ्या उद्योगांच्या क्षेत्रांत आपण युद्धकार्या-

१ डिपार्टमेंट ऑफ कॉमर्स एस्टिमेटस्-स्टॅटिस्टिकल अॅब्स्ट्रॅक्ट १९५६

साठीं थोडया सवलती दिल्या इतकेंच काय तें. कंट्रोल्ड मटीरिअल्स प्लॅन ही युद्धकाळातली उत्पादनावर नियंत्रण घालणारी सर्वांत मोठी आणि व्यापक योजना. पण काहीं मोजक्या धातूंच्या उपयोगावरच तिच्या द्वारें नियंत्रण घालण्यात आलें होतें. उत्पादन वाढविण्याच्या आपल्या सामर्थ्यावरच आपण मुख्यतः विसंवून राहिलों. आणि आधींच्या काळातल्या वेकारीमुळें आपल्या जवळ हें सामर्थ्य वऱ्याच प्रमाणात होते. शिवाय शांततालीन मुलकी निवेश तात्पुरता लांबणीवर टाकून आपण आर्थिक उत्पादनशक्ती उभी केली.

युद्धकाळात मुलकी सेवनात होणारी वाढ थांबविणें अत्यंत अवघड गेलें असतें यांत मुळींच शंका नाहीं. हॅम्बर्गवरील शत्रूच्या हल्ल्याची ज्या प्रकारची मदत झाली तसल्या मदतीच्या अभावीं या सेवनात कपात करणें अत्यंत विकट होतें. स्वदेशाभिमानाच्या अभावामुळें असें झालें असतें असें मला म्हणायचें नाहीं. मागणीच्या परावलंवित्वामुळें काहीं दृष्टिकोन कसें अपरिहार्यपणें निर्माण होतात तें इथें मला दाखवायचें आहे. वस्तू महत्वाच्या आहेत अशी जर लोकांची व त्यांच्या पुढाऱ्यांचीहि खात्री पटली असली—आणि उत्पादन जर ग्राहकांच्या अनुनयावर अवलंबून असेल तर तशी ती पटणें अपरिहार्यच आहे–तर वस्तूनां काहींच महत्व नसतें असें त्यानां चटदिशी पटविणें अशक्य झालें असतें. अमेरिकन जीवन पद्धतीत उच्च रहाणीमानाला जर मध्यवर्ती स्थान नसेल तर त्या जीवन पद्धतीच्या संरक्षणासाठीं चाललेल्या युद्धांत तें जीवनमान कमी करणें हें विरोधाभासात्मक आहे असाहि युक्तिवाद केला जाईल. काल व प्रयत्न यांच्या सहाय्यानें कदाचित् हा विरोधाभास नष्ट करता येईल. पण त्यासाठीं पुढारीवर्गाला इष्ट ती समज असावी लागते. आणि लोकशाहीतले पुढारी तर ज्या समाजाच्या संस्कृतीतून निर्माण होत असतात त्या संस्कृतीचे ते अविभाज्य घटक असतात.

दुसऱ्या जागतिक युद्धाच्या काळात नागरिकांचें नीतिधैर्य कायम ठेवण्यावर फारच व वारंवार भर दिला जात होता. हें नीतिधैर्य फार नाजुक प्रकृतीचें आणि तितकेंच महत्वाचेंहि असतें अशी तत्कालिन सांकेतिक शहाणपणाची भूमिका होती. आणि तें जवळजवळ पूर्णांशानें ग्राहकोपयोगी वस्तूंच्या व सोयींच्या पुरवठ्यावर अवलंबून असतें असें मानलें जात होतें. रहात्या घरांचा दर्जा, पेट्रोलचा पुरवठा, करमणुकीच्या सोयीं आणि नियमितपणें चालू असलेल्या शर्यती यानां हें नीतिधैर्य टिकवून धरण्याच्या दृष्टीनें फार महत्व दिलें जात होतें. मागणीच्या परावलंवित्वामुळें ग्राहकोपयोगी वस्तू व सोयी या अत्यंत महत्वाच्या आहेत असा समज झाला होता. त्यामुळें त्यांची आवश्यकता इतरांबरोबरच समाजाच्या नेत्यानींहि

मान्य केली होती. आणि वाढत्या सेवनामुळें उत्पादन नागरिकांच्या सेवनाव्यतिरिक्त अन्य कार्यासाठीं सहजपणें उपलब्ध होऊं नये अशीहि तरतूद झाली होती.

पण वर म्हटल्याप्रमाणें आपण युद्धांत विजयी झालों. आपलें सुदैव असें कीं ज्या पक्षाजवळ जबरदस्त मनुष्यबळ होतें आणि ज्याची रणांगणावरील व्युहरचना फारच वरचढ होती त्याच्या बाजूनें आपण युद्धात प्रवेश केला. शिवाय उत्पादन वाढवायला आपल्याला वेळहि मिळाला. ज्या दोन मित्रराष्ट्रांचें आपल्याला पाठबळ होतें त्यांची उत्पादनशक्ती जरी आपल्या मानानें बरीच कमी असली तरीं ती युद्ध-कार्यासाठीं राबविण्यांचें कर्तृत्व त्या मित्रराष्ट्रांच्या अंगीं खूपच अधिक प्रमाणात होतें. युद्ध संपल्यापासून सांकेतिक शहाणपणाला कोणत्या गोष्टीचा जर अत्यंत अभिमान वाटत असेल तर ती ही कीं इतिहासातलें सर्वांत मोठें युद्ध एका बाजूने जिंकत असतानांच दुसऱ्या बाजूनें आपण आपलें मुलकी सेवन जवळ जवळ वीस टक्क्यानीं वाढवलें. पण जर का आपण युद्धात हरलों असतों तर मात्र आपण ह्याच गोष्टीकडे वेगळ्या दृष्टीनें पाहिलें असतें. मग आपण ह्या प्रकारामुळें अस्वस्थ झालों. असतों आणि त्याचें खरे स्वरूप आपल्याला अधिक स्पष्टपणें दिसलें असतें. मग आपसांत सावधगिरीनें चर्चा करतानां शत्रुसैन्याची रांगडी वागणूक, शेजारच्या मुलीची बलात्कारावद्दलची शंकास्पद प्रतिक्रिया, ब्रॉंक्समध्यें झालेला ज्यूंचा छळ, शत्रूशीं संगनमत करण्याची वाढती प्रवृत्ती इत्यादि विषय निघाले असते आणि नंतर संभाषणाचा मोर्चा युद्धाच्या संचालनाकडे वळला असता. त्या वेळी आपल्या सेनापतींवर तर आपण ताशेरे झाडले असतेच. पण त्याचवेळीं पुढील गोष्टींचा उल्लेखहि आपण फारशा अभिमानानें केला नसता : अखेरच्या पराभवापूर्वीच्या वर्षांत झालेलें कपड्याचालत्यांचें कमाल उत्पादन, अन्नाचा भरपूर पुरवठा, पेट्रोलचा अगदीं पुरेपूर पुरवठा, मुलकी गरजा भागविणाऱ्या इतर वस्तूंच्या उत्पादनात झालेली विलक्षण वाढ, आगगाडीच्या प्रवासाच्या बाबतींत आपण गाठलेली कमाल मर्यादा, आणि रूळ, इंजिनें, डबे इत्यादींत मोठ्या प्रमाणांवर भांडवल गुंतवून सैनिकी व नागरी वहातुकींतील भरमसाट वाढ पचविणाऱ्या रेल्वे कंपन्या. मग आपल्या आर्थिक उत्पादन शक्तीचा किती मोठा भाग युद्धासाठीं वापरला तें आपल्या ध्यानांत आलें असतें आपल्या नागरी गरजा भागविण्यात गुंतल्यामुळें लक्षावधी माणसें रणांगणावर जाऊं शकलीं नाहींत आणि जे रणांगणावर गेले त्यानां युद्धसामुग्री पुरवूं शकली नाहींत हें पण आपल्याला जाणवलें असतें. सुदैवानें हा धडा आपल्याला असा कटुपणें शिकावा लागला नाहीं. पण दुर्दैवाची गोष्ट अशी कीं सांकेतिक शहाणपणाला जी प्रतिष्ठा असते व मनाचें समाधान करायची जी शक्ती त्याच्या अंगी असते त्यामुळें असे कटु धडे मिळाल्या शिवाय राष्ट्रें काहीहि शिकत नाहींत.

[५]

वरील युक्तिवाद ज्या लष्करी गृहिततत्वांवर आधारलेला आहे ती आतां जुनीं व टाकाऊ झालीं असणें अगदीं शक्य आहे. ज्याला सरसकट राष्ट्रीय उत्पादनाधिष्ठित युद्ध असें म्हणता येईल त्या प्रकारचें युद्ध बहुधा होऊन गेलें आहे. दूरच्या आघाडयांवर मित्रराष्ट्रें शत्रूंशी झुंज देत आहेत आणि इकडे युनायटेड स्टेटस् निर्वेधपणें व पद्धतशीरपणें आपली औद्योगिक साधनसामुग्री एकत्रित करून युद्धासाठीं इष्ट तेथें पाठवीत आहे असा प्रकार तिसऱ्यांचा होऊं शकेल हें अशक्यप्राय वाटतें. पण लष्करी सामर्थ्य व उत्पादन यांचें काय नातें असतें ह्या बद्दलची भूमिका भूतकालीन अनुभवांवर आधारलेली असते. नित्याप्रमाणेंच या बाबतींत देखील सांकेतिक शहाणपणावर त्याच्या हद्दींत शिरूनच हल्ला चढवायला हवा.

काय होऊं शकेल याचा अंदाज घ्यायचा झाला तर असें म्हणता येईल कीं स्थूलमानानें दोन प्रकारचीं युद्धें होणें शक्य आहें. त्यापैकीं एकाचें स्वरूप कोरियातील युद्धासारखें असेल. म्हणजे त्याची व्याप्ति, त्यामागचें हेतु व त्यांत वापरलीं जाणारीं शस्त्रें ह्या सर्वांवरच काहीं मर्यादा असतील. दुसऱ्या प्रकारचें युद्ध म्हणजे अण्वस्त्रांचा भडाका.

मर्यादित युद्धाच्या संदर्भात आपल्या अर्थव्यवस्थेच्या समग्र उत्पादनाला विशेष महत्व नाहीं. कोरियातील युद्धानें काहीं अमेरिकन अर्थव्यवस्थेची परिक्षा घेतली नाहीं. आणि तशीं अनेक युद्धें झालीं असतीं तरी तिच्यावर कसोटीचा प्रसंग आला नसता. सुरुवातीच्या महिन्यांत जे पराभव झाले ते काहीं साधनांच्या तुटवडयामुळें नव्हें, तर शस्त्रास्त्रें शिकवून तयार केलेलें सैनिक आपल्याजवळ नव्हते म्हणून, किंवा होते ते योग्य स्थळीं नव्हते म्हणून प्रश्न होता तो उत्पादनशक्तीचा नव्हे तर प्रत्यक्ष तयारीचा.

आणि आपली तयारी नव्हती याला दोन कारणें होतीं. एक तर अशा युद्धाला तोंड द्यावें लागेल किंवा नाहीं याबद्दलचा आपला अंदाज चुकला. पण त्यावरावर दुसरेंही एक कारण होतें. तें असें कीं जरी १९४५ ते ५० या पांच वर्षांत आपण शांततेकालीन उत्पादनाची कमाल मर्यादा गाठली होती तरी ग्राहकांच्या गरजा त्याचप्रमाणात वाढल्या होत्या. ज्या अर्थव्यवस्थेत या गरजाचें प्रमाण उत्पादनावर अवलंबून असतें तींत असें व्हावें हें स्वाभाविक होतें. परिणामतः सैनिकी खर्च अशा वेतानें केला जात होता कीं त्यामुळें नागरी सेवनात फारशी घट होऊं नये.

कोरियात एकदां युद्ध सुरू झाल्यावर मात्र आपली मुलकी अर्थव्यस्था व रूढ रहाणीमान कायम ठेवण्याचा प्रयत्न यांमुळें युद्धप्रयत्नांत अडथळा निर्माण होऊं

लागला. आतां उपभोग्य वस्तूंचा तुटवडा पडेल अशा अपेक्षेनें ग्राहक आपल्याला तोशीस पडूं नये म्हणून तरतूद करूं लागले. शांततेकाळात त्यांच्या मनावर जे संस्कार करण्यात आले होते त्यामुळें या तुटवडचाचा आपल्याला फार त्रास होईल असें त्यानां सहाजिकच वाटत होतें. ते दुकानांत गेले आणि मोटारगाडचा, रेडिओ, स्वयंपाकघरातील टिकाऊ उपकरणें, कपडे धुण्याची यंत्रें, इस्तऱ्या, बैठकीचें सामान, खाद्यपदार्थांचें हवाबंद डबे व अशाच इतर वस्तूंची त्यानीं प्रचंड प्रमाणात खरेदी सुरू केली. १९५० साळच्या दुसऱ्या तिमाहीपासून—म्हणजे शांततेच्या काळाचे अखेरचे तीन महिने—तों तिसऱ्या तिमाहीपर्यंतच्या—म्हणजे युद्धाचे पहिले तीन महिने—काळांत राष्ट्रीय संरक्षणावरचाखर्च १८० कोटी डॉलर्सनीं वाढला. त्याच काळात उपभोग्य वस्तूंवरचा खर्च १३१० कोटी डॉलर्सनीं वाढला. १९५१ च्या पहिल्या तिमाहीत संरक्षण खर्च शांततकाळातील अखेरच्या तिमाहीच्या मानानें १२९० कोटी डॉलर्सनीं वाढला होता. तर नागरिकांचा खर्च १९०० कोटी डॉलर्सनीं वाढला होता. अशा परिस्थितींत अर्थव्यवस्थेची एकंदर उत्पादनशक्ती किती ह्या गोष्टीला काहींच महत्व नव्हतें. जें रहाणीचें मान अगदीं किमान आहे अशी ग्राहकांची समजूत करून देण्यात आली होती तें कायम ठेवण्याचा प्रयत्न (भविष्य कालीन अनिश्चिततेच्या संदर्भात) ते करीत होते, आणि त्या प्रयत्नांत अर्थव्यवस्थेचें एकंदर उत्पादन खर्ची पडत होतें. परिणामतः हानीकारक अशी भाववाढ झाली. १९५१ च्या सुरुवातीच्या काळात किंमतींवर नियंत्रणें घालावीं लागलीं. दरम्यान् माल मिळविण्यासाठीं नागरिकांची जी स्पर्धा चालली होती त्यामुळें युद्धसामुग्रीचें उत्पादन अगदीं सावकाश व कष्टपूर्वक वाढत होतें. आणि तरी आपल्या लष्करी सामर्थ्याचा आढावा काढतानां सांकेतिक शहाणपण अर्थव्यवस्थेचा आकार व प्रगतीचा वेग यांवर भर देतच होतें.

यानंतर जो पुरावा उपलब्ध झाला आहे त्यामुळें देखील या ठराविक भूमिकेला तडा गेलेला नाहीं. १९५३ ते ५७ या कालात जनरल मोटर्सचें भूतपूर्व प्रेसिडेंट मिस्टर चार्लस इ. विल्सन हे डिपार्टमेंट ऑफ डिफेन्सचे (संरक्षण खात्याचे) प्रमुख होते. एम्. ए. हॅन्ना कंपनीचे भूतपूर्व प्रमुख मिस्टर जॉर्ज एम्. हंफ्रे हे डिपार्टमेंट ऑफ ट्रेझरीचे (वित्तखातें) मुख्य होते. या सर्व कालखंडात हे दोघे उद्योगपती आग्रहपूर्वक असें सांगत होते कीं युनायटेड स्टेटस् संरक्षणावर किती खर्च करूं शकेल याला निश्चित मर्यादा आहेत. आपल्याला झेपणार नाहीं इतका खर्च करणें धोक्याचें आहे असे इशारा ते पुन्हां पुन्हां देत होते. तसें केलें तर आपल्या शत्रूना संतोष वाटेल, आपले लोक कष्टी व उद्विग्न होतील. आणि आपल्या अर्थव्यवस्थेला गंभीर स्वरूपाची इजा—नेमकी कोणती तें मात्र त्यानीं सांगितलें नाहीं—होईल.

ह्या भूमिकेवर अनेकानीं टीका केली. अर्थशास्त्रज्ञ व पत्रकार यानीं एकमुखानें या गृहस्थांची भूमिका कशी चूक आहे तें आग्रहपूर्वक सांगितलें. पण ज्यांच्यावर या

टीकेचा रोख होता त्यांच्यावर तिचा फारसा परिणाम झाला नाहीं. आणि त्यांच्यावर परिणाम व्हावा असें त्या टीकेंतहि विशेष कांहीं नव्हतें. जे टीकाविषय झाले होते त्यानां आपल्या टीकाकारांची भूमिका मान्य होती. फक्त ते ती भूमिका तार्किक परंतु हास्यास्पद पराकोटीला नेत होते इतकेंच. लष्करी सामर्थ्याच्या दृष्टीनें उत्पादन महत्वाचें आहे असें ते टीकाकारच म्हणत होते. पण असें म्हणतानां ते अजाणतां मुलकी वस्तूंच्या उत्पादनाचें महत्व मान्य करीत होते. म्हणजेच त्यासाठीं लागणारी उत्पादनशक्ती लष्करी गरजा भागविण्यासाठीं उपलब्ध होऊं शकणार नाहीं हें देखील ते मान्य करीत होते. विल्सन व हंफ्रे या द्वयीनें ह्या गोष्टीची फोड करून ती स्पष्ट केली होती इतकेंच. मागणीच्या परावलंबित्वामुळें उत्पादनाबरोबरच सेवनांत देखील वाढ झाली आहे ह्याची त्यानीं दखल घेतली होती. आणि म्हणून उत्पादनाचा उपयोग लष्करी कार्यासाठीं केला तर सेवनांत घट होईल असें ते म्हणत होते. ह्या परिस्थितीत अंतर्भूत असलेली तर्क श्रृंखला त्यानीं मान्य केली होती व सेवनाला समाज जें महत्व देतो तें देखील मान्य केलें होतें. आणि असा निष्कर्ष काढला होता कीं सेवनांत घट करणारा हा लष्करी खर्च आपल्याला परवडण्यासारखा नाहीं. मोटारी तयार करण्यात किंवा त्यांसाठीं लागणारा कच्चा माल पुरवण्यात ज्यानीं जन्म घालवला ते मोटारी महत्वाच्या नाहींत असा निष्कर्ष काढूं शकत नाहींत.

उत्पादनाचें जर आपल्याला विशेष कौतुक वाटत असेल तर ज्या वस्तूंचें उत्पादन होतें त्यांचेंहि आपल्याला कौतुक वाटणारच. आणि त्यामुळें लष्करी गरजांसाठीं आपण किती उत्पादन वाजूला काढूं शकूं त्यालाहि पुष्कळशा मर्यादा पडतात. सध्यांची आर्थिक उद्दिष्टें लक्षांत घेतां तें अपरिहार्यच आहे. अर्थव्यवस्थेच्या आकाराला जरी अनेक लोक महत्व देत असले तरी लष्करी कार्यासाठीं काय उपलब्ध आहे हें त्या आकारावरून आपल्याला कळेल हा केवळ भ्रम आहे.

जर युद्धावाचून भांडणें मिटविण्याचा मार्ग मनुष्य प्राण्याला सांपडत नसेल आणि म्हणून लहान तंटचानां तोंड देण्यासाठीं मोठया लष्कराची आवश्यकता असेल तर तें लष्कर आपण उभें करूं शकूं अशा विश्वास उत्पादनक्षमतेच्या जोरावर आपल्याला बाळगता येणार नाहीं. उलट आर्थिक विकासाची प्रक्रिया आज उत्पादनाबरोबरच गरजांतहि वाढ करीत असल्यामुळें ती लष्करी सामर्थ्याच्या दृष्टीनें जितकी उपकारक तितकीच अपायकारकहि ठरण्याची शक्यता आहे.

[६]

जुन्या प्रकारचीं युद्धें लष्करी नियोजकाच्या दृष्टीनें एक प्रकारें समाधानकारक होतीं. आपलें काम करीत असतानां त्याला या गोष्टीची खात्री असे कीं युद्ध सुरू

झालें तर जो मारला जाईल तो दुसरा कोणीतरी असेल. ह्यामुळें आपलें काम अलिप्ततेनें व हौसेनें करण्यास त्याला उत्तेजन मिळत असे. पण अण्वास्त्रांच्या युद्धाच्या योजना आखणें—आणि त्या आंखण्यावाचून गत्यंतर दिसत नाहीं—त्या मानाने निरुत्साहजनक आहे. त्या शस्त्रास्त्रांचें स्वरूपच असें आहे कीं त्यामुळें इतरांबरोबरच त्या नियोजकाचाहि निःपात होईल. आणि तो देखील अशा प्रकारें कीं अखेरच्या क्षणीं उमदेपणा दाखवायला देखील फुरसत मिळणार नाहीं.

हा युक्तिवाद टोकापर्यंत न्यायचा झाला तर एक गोष्ट उघड होते. अशा प्रकारचें युद्ध झालेंच तर उपभोग्य वस्तूंचें उत्पादन करण्याची शक्ती युद्धकार्याकडे लावण्यासाठीं जो वेळ लागतो तो आपल्याला मिळणार नाहीं. त्यामुळें मुलकी उत्पादनाचा व उत्पादनशक्तीचा आतां लष्करी सामर्थ्याशीं कोणताहि संबंध राहिलेला नाहीं.

धाक दाखवून शत्रूला पायबंद घालणें ही आपली सध्यांची नीति आहे. या नीतींत महत्व असतें तें शांततेकालीन सज्जतेला—इशाऱ्यांची यंत्रणा, हल्ला अडविण्याचीं साधनें, प्रतिहल्ल्याची तयारी, संरक्षक स्थानें आणि उच्च दर्जाची शास्त्रीय यंत्रणा इत्यादि गोष्टीनां. पण इथें महत्व आहे तें अर्थव्यवस्थेच्या आकाराला नव्हे तर समाजहितासाठीं किती उत्पादन वापरता येईल या गोष्टीला. (ह्यात शस्त्रास्त्रे व संरक्षण यांवरच्या सरकारी खर्चाचाच नव्हे तर आवश्यक त्या अत्यंत कुशल तंत्रज्ञांच्या शिक्षणावरील खर्चाचाहि समावेश होतो.) ज्या प्रक्रियेनें अर्थव्यवस्थेचा विस्तार होतो तिच्याच द्वारें त्या अर्थव्यवस्थेला भागवाव्या लागणाऱ्या खाजगी मागण्यातहि वाढ होते. आणि त्यामुळें सार्वजनिक गरजा भागविण्यासाठीं कमी उत्पादन शिल्लक रहातें. सांकेतिक शहाणपण उत्पादनाला सर्व दृष्टीनीं महत्व देतें हें खरें. पण चालू गरजा भागविण्यासाठीं साधनें मिळविणें कसें अवघड असतें हें तें शहाणपण देखील कधीं कधीं मान्य करतें.

[७]

आर्थिक उत्पादनावर लष्करी सामर्थ्य अवलंबून असतें ही कल्पना खोटी ठरवणें हें वरील युक्तिवादाचें उद्दिष्ट होतें. जर आपल्याला शांतता हवी असेल व सर्वनाश टाळायचा असेल तर परस्परांच्या अण्वास्त्रांच्या भीतीचा समतोल निर्माण करून भागणार नाहीं. आणखी काहींतरी करायला हवें. तें काय त्याची कल्पना येण्यास प्रस्तुत विश्लेषणाची पुष्कळच मदत होऊं शकेल. या प्रश्नाकडे पुढें आपल्याला वळावें लागणारच आहे. पण त्या बाबतींत चार प्रास्ताविक शब्द इथें सांगणें अप्रस्तुत होणार नाहीं.

गरीब समाजात वावरणें हें श्रीमंत माणसाला नेहमींच अवघड गेलेलें आहे. अनेक तत्वज्ञानीं श्रीमंतीमुळें होणाऱ्या क्लेशांचें विस्तारानें वर्णन केलेलें असलें तरी देखील आपल्या श्रीमंतीचा त्याग करून सुखकारक दारिद्र्यांत रहावें अशी इच्छा फारच थोड्यानां झाली आहे. आपल्या वैभवाचा असंस्कृत देखावा न करणें शहाणपणाचेंच नव्हे तर फॅशनेबल देखील आहे असें अमेरिकेतील श्रीमंतांना आतां वाटतें. सातव्या प्रकरणात आपण ह्या गोष्टीची नोंद घेतली आहे. आपल्या संपत्तीत एक मार्गीपणानें भर घालीत वसण्यात मोठी प्रतिष्ठा आहे असें ह्या श्रीमंतानां आतां वाटत नाहीं. प्रतिष्ठेसाठीं आतां ते समाजसेवा व सत्कार्यें करतात आणि हें कोष्टक चांगलें यशस्वी झालेलें दिसतें. कारण अनेक धनाढ्य अमेरिकनानीं राजकीय क्षेत्रात यश मिळविलें आहे आणि तें देखील जनतेचा विश्वास व स्नेहभाव संपादन करून. श्रीमंतानां देखील अडचणी असल्या तरी त्या अनुल्लंघ्य नसतात.

माणसांचें उदाहरण राष्ट्रानां लागू करणें अत्यंत घोक्याचें असतें हें खरें—पण इथें माणसांच्या व राष्ट्रांच्या परिस्थितींत साम्य तरी नक्की आहे. आज आपण ज्या गोष्टी साधण्यांत गुंतलों आहोत त्यांमुळें राष्ट्र या नात्यानें आपल्याला आपल्या श्रीमंतीचें अनेकदां वेडोलपणानें प्रदर्शन करावें लागतें. आपल्या जवळ विपुल संपत्ती आहे आणि बाकीचें जग बहुतांशानें गरीब आहे. पण तरी आपण एकचित्तानें अधिक धन संपादन करण्यात गुंतलेले आहोंत. तें धन आपल्याला कशाला हवें आहे तर आपल्या सुखवस्तूपणामुळें ज्या गरजा निर्माण झाल्या आहेत किंवा ज्या आपण कृत्रिमपणें निर्माण केल्या आहेत—आणि त्या कृत्रिम आहेत ही गोष्ट काहीं जाहिरातीची कला लपवून ठेवूं शकत नाहीं—त्यांचें समाधान करण्यासाठीं. आणि हें सारें आपण काहींशा पूज्यभावानें करीत असतों.

प्रतिवर्षी आपण इतर राष्ट्रानां थोडें आर्थिक सहाय्य देतों हे खरें. पण त्यापूर्वी एवढा त्याग करणें आपल्याला झेपेल कीं नाहीं याची आपण नित्यनियमानें चर्चा करतों. आणि हा प्रश्न खरोखरीच बिनतोड आहे. कारण उत्पादन आपल्याबरोबर गरजाहि वाढवीत असतें. पण जगातल्या अन्य लोकांच्या डोळ्यांत भरते ती आपली संपन्नता, आपल्या गरजांची निकड नव्हे. एकोणिसांव्या शतकातला भांडवलशहा आपलें आधींच विपुल असलेलें उत्पन्न वाढविण्यासाठीं आपल्या शक्तिसर्वस्वाचा उपयोग करीत असे, भांडवलशाही स्पर्धेतलें आपलें स्थान टिकविण्यासाठीं अवश्य त्या डामडौलानें रहात असे. त्यामुळें आपलें उत्पन्न अपुरें आहे असें त्याला नेहमींच वाटत असे. गरिबानां मदत करायची झाली तर आधीं त्यांची लायकी काय, आपण त्यांच्यासाठीं किती रक्कम बाजूला काढूं शकूं आणि आपण मदत केली नाहीं तर

बंडाळी व अराजक माजण्याची कितपत शक्यता आहे या गोष्टींचा तो काळजीपूर्वक विचार करीत असे. आणि तरी देखील आपलें औद्योगिक साम्राज्य व आपलें औदार्य यांच्या मागें ईश्वरी प्रेरणा आहे अशी त्याची श्रद्धा असे व तसें तो वारंवार बोलूनहि दाखवत असे. सहाजिकच लोकानां तो काहीं आवडत नसे. राष्ट्रांच्या बाबतींत देखील हीच गोष्ट खरी आहे.

या बाबतींत अधिक खोलांत न शिरतां इतकेंच म्हणावेसें वाटतें कीं आपली संपत्ती हें एक मौल्यवान शस्त्र आहे. त्याच्या तोडीचें शस्त्र दुसऱ्या कोणत्याहि देशाजवळ नाहीं. त्या शस्त्राच्या सहाय्यानें आपल्या आर्थिक ओढघस्तीमुळें निर्माण होणारे ताण कमी करता येतील, आंतरराष्ट्रीय सुव्यवस्था निर्माण करता येईल आणि त्यामुळें कदाचित् सर्वनाश टाळता येईल. पण आजच्या परिस्थितींत मात्र आपल्याला त्याचा फारसा उपयोग करता येत नाहीं. आणि जेव्हां करता येतो तेव्हां तें फारसें परिणामकारक ठरत नाहीं.

अलीकडच्या काळांत विचारवंतानां जर कोणता प्रश्न गोंधळात टाकत असेल तर हा कीं या स्वास्थ्यविहीन जगात आपण आपल्या संपन्नतेचा उपयोग चांगल्या प्रकारें कां करूं शकत नाहीं. मुत्सद्देगिरी उणी पडल्यामुळें असें होते असा सामान्य समज आहे. पण याची कारणें अधिक मूलभूत स्वरूपाचीं आहेत हें वरील विवेचनावरून स्पष्ट होतें. आपल्या आर्थिक दृष्टिकोनांतून ही उणीव निर्माण होते. आणि त्यांची जोपर्यंत नीट तपासणी होत नाहीं तों पर्यंत ती उणीव तशीच रहाणार.

प्रकरण तेरावें

उत्पादनांत गुंतलेले हितसंबंध

गुंतलेले हितसंबंध हा शब्द प्रयोग जेव्हां आपण सामाजिक व्यवहारात करतो तेव्हां त्याला एक प्रकारचा आकर्षक लवचिकपणा असतो. नित्याच्या संभाषणात 'एक अल्पसंख्य राजकीय गटाला मिळणारा गैरवाजवी फायदा' असा अर्थ त्या शब्दप्रयोगाला असतो. आणि अशा अर्थानें तो शब्दप्रयोग करणारा मनुष्य त्या अल्पसंख्य गटातला नसतो. पण जेव्हां त्या माणसालाहि तो फायदा मिळत असतो तेव्हां मग तो गुंततलेला हितसंबंध रहात नाहीं. मग तो कष्टाचा मोबदला होतो. जेव्हां तो फायदा अल्पसंख्य गटाऐवजीं बहुसंख्य लोकानां मिळत असतो तेव्हां तो मानवी हक्क होतो. अर्थात हे असे घोटाळे होत असले तरी देखील उत्पादनाविषयींच्या आपल्या सध्यांच्या भूमिकेत कोणाचे हितसंबंध गुंतलेले आहेत त्याचा आपण आतां आढावा घ्यायला हवा. सध्यांच्या या भ्रामक भूमिकेत कोणाचें हित सर्वांत अधिक प्रमाणात गुंतलेलें आहे ? विचारमंथन, परिस्थिती वा काल यांच्या माऱ्यामुळें जेव्हां ही भूमिका बदलेल तेव्हां सर्वांत जास्त नुकसान कोणाचें होईल ? एखादा सेनापती ज्याप्रमाणें प्रतिपक्षाच्या फौजांची पहाणी करतो त्याप्रमाणें आपल्या विरुद्ध मोर्चे बांधून कोण बसलेले आहेत तें लेखकानें देखील पाहिलें पाहिजे. शिवाय ग्राहकांच्या मागणीची प्रस्थापित मीमांसा आणि राष्ट्रीय सुरक्षिततेवद्दलचा सांकेतिक दृष्टिकोन यांच्या जोडीला स्वार्थ देखील सध्यांच्या भूमिकेला भक्कम आधार देतो आहे. आपल्या समाजात हे हितसंबंध देखील काहीं गोष्टी घडवून आणीत असतात ही वस्तुस्थिती आहे.

सध्यांच्या आर्थिक उद्दिष्टांत जर कोणाचें हित सर्वात अधिक गुंतलेलें असेल तर तें उद्योगधंद्यांच्या चालक वर्गाचें—अधिक काटेकोरपणानें बोलायचें तर उच्चपदस्थ चालकाचें. परंपरागत व प्रस्थापित हक्कानुसार उत्पादक या उपाधीवर त्याचाच हक्क आहे. तेव्हां उत्पादनाला जर समाजात प्रथमस्थान असेल तर सामाजिक जीवनांत या चालकाला निर्णायक महत्व प्राप्त होईल. त्याच्या कार्याला अनुरूप अशी प्रतिष्ठा त्याला समाजात मिळेल. आणि त्या प्रतिष्ठेला साजेसें उत्पन्न त्याला विनतक्रार मिळवता येईल. आपल्या आर्थिक दृष्टिकोनांवर जसजसा उत्पादनाचा वाढता पगडा बसत गेला आहे तसतसें उद्योगधंद्यांच्या चालकांचें महत्व वाढत गेलें आहे.

जोपर्यंत विपमता हा एक गंभीर प्रश्न होता तोपर्यंत उद्योगपतींचें स्थान काहींसे डळमळीत होतें. ते एक महत्वाचें कार्य करीत होते हें तर उघडच होतें. पण आपल्या कामाबद्दल ते भरमसाठ मोबदला घेतात असा आरोपहि त्यांच्यावर नित्य होत असे. परंतु विपमतेच्या प्रश्नाचे महत्व जसें कमी होत गेलें तशी ही आरोप करण्याची प्रवृत्ती देखील नष्ट होऊं लागली. आतां उद्योगपतींना गंभीर भय असें कशाचेंच राहिलेलें नाहीं. मोठ्या कॉर्पोरेशनच्या अधिकार श्रेणींत उद्योगपतीला जें स्थान आहे तें अगदीं सुरक्षित आहे. त्याला स्वतःला आणि त्याच्या संस्थांना धोका असा जवळ जवळ काहींच राहिलेला नाहीं. पण तरी देखिल उद्योगपती हा धोके पत्करतो आणि साहसी जीवन जगतो असा समज अंशतः तरी कायम आहे. अमेरिकन समाजांत उद्योगपतीला जें श्रेष्ठ स्थान आहे त्याबद्दल कोणीच शंका घेत नाहीं. परंतु उत्पादनाला आज जें महत्व आहे तें कायम राहिलें तरच हें स्थान टिकेल. यावद्दल कोणीहि शंका वाळगण्याचे कारण नाहीं.

पाणी विपूल असलें म्हणजे त्याच्याकडे कोणत्या दृष्टीनें पाहिलें जातें आणि त्याचा तुटवडा असला म्हणजे कोणत्या दृष्टीनें पाहिलें जातें यावद्दलचा उल्लेख वर आलेलाच आहे. १९५० सालीं न्यूयॉर्क शहरांत पाण्याची टंचाई झाली होती आणि ती त्रासदायक ठरण्याची शक्यता होती. ढगांकडे लोक आशेनें पहात होते आणि त्यांनी वर्षाव करावा म्हणून कृतिम उपाय योजीत होते. पाण्याची वचत करण्याचा एक कार्यक्रम आखण्यांत आला आणि त्याची अंमलबजावणी मोठ्या गाजावाजानें सुरूं झाली. मोटारी आणि रस्ते धुणें, हवा थंड करण्यासाठीं पाण्याचा उपयोग करणें किंवा नळ गळत ठेवणें ह्या सर्व गोष्टींवर बंदी घालण्यांत आली. हें सारें साध्य व्हावें म्हणून जो मोठा प्रचार चालू होता त्याचें सूत्रचालन न्यूयॉर्क शहराच्या पाणीपुरवठ्याचें मुख्याधिकारी मिस्टर स्टीफन जे. कार्ने हे करीत होते. कांहीं काळ ती शहरांतील सर्वांत महत्वाची व्यक्ति झाली होती. त्यांचें नांव प्रत्येकाच्या तोंडात घोळत होतें. मिस्टर कार्ने यांना सार्वजनिक महत्व प्राप्त झालें होतें. नंतर पाऊस आला आणि तलाव पाण्यानें भरले. कार्ने यांना लोक विसरून गेले. एक दिवस त्यांना कामावरून कमी करण्यांत आलें. पण तिकडे कोणाचेहि लक्ष गेलें नाहीं.

उत्पादक या विरूदाला आज आपल्या समाजांत मानाचें स्थान आहे आणि तें नष्ट होण्याची आज तरी कांहीं शक्यता दिसत नाहीं. दारू गाळण्याचा कारखाना, मोटारींत वसून सिनेमा पाहण्याचे प्रेक्षागृह किंवा कुत्र्यांच्या शर्यतीचें मैदान यापैकीं कोणत्याहि गोष्टीचा जर एखादा मनुष्य प्रमुख असला तर तो उत्पादक आहे असें

मानलें जातें. मूलभूत महत्वाच्या वस्तूंच्या उत्पादकाइतकें त्याला महत्व नसतें हें खरें. पण तरी देखील तो एक उत्पादक आहे असें आपण मानतो. समाजाचा तो एक आधारस्तंभ आहे आणि त्याच्या संपत्तीचा एक निर्माता आहे असें समजून त्याला समाजांत एक विशेष स्थान दिलें जातें. एखाद्या शाळेचा मुख्याध्यापक अगर एखादा धर्मगुरू यांना आपण तितकें महत्व देतोंच असें नाहीं. युनायटेड स्टेट स्टील कॉर्पोरेशनचा प्रमुख युनायटेड स्टेटस्च्या प्रेसिडेण्टची भेट घेतो ती उत्पादक या नात्यानें. एखादे सरकारी खातें उत्पादनाचा अनुभव असलेल्या माणसाच्या हातीं द्यावें हें आपल्याला इष्ट वाटतें. एखाद्या माणसाला उत्पादन म्हणजे काय तें माहीत आहे असें म्हणणें ही त्याची सर्वश्रेष्ठ प्रशस्ती मानली जाते. परंतु उत्पादकाची प्रतिष्ठा ही खरें म्हणजे उत्पादनाच्या प्रतिष्ठेतून निर्माण झालेली असते. उत्पादन होतच आहे, त्याला महत्व तें काय द्यायचें असें जर लोक मानायला लागले. तर उत्पादकाची देखील मिस्टर कार्ने यांच्यासारखींच गत होईल.

[२]

माणसांना ज्या गोष्टींचें महत्व वाटतें त्यांच्यासाठीं तीं झगडतात. आणि म्हणून ज्याला स्वहित समजतें असा उद्योगधंद्याचा चालक उत्पादनाला महत्व देणाऱ्या मूल्यपद्धतीसाठीं निकरानें झगडेल. खरें म्हणजे एक प्रकारच्या अंतःप्रेरणेनें तो आतांच तसा झगडत आहे. उद्योगधंद्याच्या चालकांच्या प्रार्थनासूक्तांत आज उत्पादनाचे महत्व पुन्हा पुन्हा कर्णमधूर आणि चढ्या आवाजांत आळविलें जात आहे. 'जे सामर्थ्यवान असतात तेच स्वातंत्र्य उपभोगूं शकतात.' 'अमेरिकेला आज जें स्थान प्राप्त झालें आहे तें उत्पादनामुळें...' 'पुरे झाले भांडणतंटे आपण आतां उत्पादनाच्या कार्याला लागूं या.'

उद्योगधंद्यांच्या चालकांनीं सरकारकडे संशयानेच नव्हे तर शत्रुत्वाच्या भावनेनें पाहायचे ही राजकीय जीवनांतील एक नित्याची घटना आहे. आयसेन हॉवर यांच्या सरकाराप्रमाणें जरी एखादें सरकार उद्योगधंद्याकडे सहानुभूतीनें पाहाणारें असलें तरी त्याकडे देखील याच दृष्टीनें पाहिलें जातें. याचें एक कारण असें कीं, करांचा पुष्कळसा बोजा उद्योगधंद्यांच्या चालकावर पडतो आणि म्हणून सरकारनें पुरविलेल्या सुखसोई आणि आपले आर्थिक हित यांत विरोध आहे असें त्याला वाटतें. परंतु आपल्या सामाजिक विचारांत एक प्रकारच्या यांत्रिक अशा आर्थिक नियतिवादावर आपण फार भर देतो. उद्योगधंद्यांच्या चालकांच्या प्रतिष्ठेला देखील जर कोणाकडून सर्वांत अधिक भय असेल तर तें सरकारकडून. ज्या प्रमाणांत राष्ट्रीय संरक्षण, परराष्ट्रीय धोरण, शेतीची शासन यंत्रणा, सार्वजनिक बांधकामें, शिक्षण

आणि समाज कल्याणाची कार्यें या गोष्टी आपल्या विचारांच्या केंद्रस्थानीं असतील त्या प्रमाणांत सेनापति, परराष्ट्र खात्याचे अधिकारी, शासक वर्ग शिक्षक आणि अन्य सरकारी नोकर यांना आपण महत्व देऊं किंवा आपले नेते मानूं. आधुनिक काळांत ही जी स्पर्धा चालू आहे तिची उद्योगधंद्यांच्या चालकांना खात्रीनें जाणीव झालेली आहे आणि या जाणीवेचा त्यांच्या सरकारविषयक दृष्टिकोनावर परिणाम झालेला आहे हें देखील तितकेंच खरें. यामुळेंच ते अत्यंत आग्रहानें असें प्रतिपादन करतात कीं, सरकार कशाचेंच उत्पादन करीत नाहीं. ते एखाद्या वांझोट्या नायकिणी सारखें असतें. 'उद्योगधंदे जसें संपत्तीचें उत्पादन करतात आणि व्यक्ति ज्या प्रकारें नव्या विचारांची निर्मिती करतात आणि शोध लावतात त्या प्रकारची निर्मिती करण्यास सरकार असमर्थ असतें.' [१] या भूमिकेमागचा युक्तिवाद कांहींसा लंगडा आहे. त्यानुसार शिक्षण म्हणजे उत्पादन नव्हे पण शाळेच्या शौच्यकूपासाठीं बैठका तयार करणें हें मात्र उत्पादन. असें असलें तरी देखील या युक्तिवादाला उद्योगधंधांच्या प्रार्थनासूक्तांत फार महत्व दिलें जातें.

उद्योगधंद्यांचे चालक आणि विचारवंत यांच्यांत नेहमीच एक प्रकारचा विरोध असतो आणि हा विरोध अंतिम दृष्टया कदाचित् अधिक महत्वाचा असूं शकेल. 'आधुनिक भांडवलशाहीच्या युगांत...थिल्लर विचारवंतांचा एक मोठा वर्ग अस्तित्वांत आला आहे आणि ही त्या युगांतली एक खेदकारक घटना आहे. त्यांच्या नाकखुपश्या चळवळींचा समंजस लोकांना तिटकारा वाटतो. ते अनावश्यक खेकटीं मात्र निर्माण करीत असतात.' [२] सरकारला होणाऱ्या विरोधाप्रमाणेंच या विरोधाचें मूळ देखील आर्थिक आहे असें आज अनेक दिवस मानलें जात आहे. 'ज्यांच्या संशोधनामुळें उत्पादनाच्या नव्या पद्धती उपलब्ध झाल्या आहेत ती माणसें उद्योगधंद्यांच्या चालकांचा द्वेष करतात. कारण त्यांच्या संशोधनाची रोकडीच्या हिशेवानें किंमत किती, इकडेच त्या उद्योगधंद्यांच्या चालकांचें लक्ष असतें. अमेरिकेतील पदार्थ विज्ञानाचे अनेक अभ्यासक समाजवाद किंवा साम्यवाद यांच्याकडे सहानुभूतीने पहातात ही गोष्ट फार अर्थपूर्ण आहे....अर्थशास्त्राचे प्राध्यापक देखील नफा पद्धतीकडे तिरस्कारानें पाहातात आणि तिला विरोध करतात...' [३] विचारवंतांच्या जहाल

१ सटन्, द अमेरिकन बिझिनेस क्रीड पृष्ठ १९५.

२ लुडविग व्हॉन मायझेस, द ॲण्टी कॅपिटॅलिस्टिक मेण्टॅलिटी (प्रिन्स्टन, व्हॅन नॉस्ट्रॅंड, १९५६) पृष्ठ १०७.

३ वरील प्रमाणेंच. पृष्ठ २० प्रो. मायझेस् यांची भूमिका आत्यंतिक आहे असें उद्योगधंद्यांच्या बहुसंख्य चालकांना वाटेल हें येथें नमूद करायला हवें, नाहींतर उद्योगपतींवर अन्याय होईल.

मतांमुळें त्यांच्यांत आणि उद्योगधंद्याच्या चालकांत विरोध निर्माण होतो हें कदाचित् खरें असेल परंतु ओहायोचे सिनेटर जॉन डव्ल्यू. ब्रीकर यांनीं आखून दिलेल्या सामाजिक दृष्टिकोनांचा जरी विचारवंतानीं स्वीकार केला तरी त्यामुळें हा विरोध नष्ट होईल अशी खात्री देतां येणार नाहीं. सार्वजनिक मान्यतेसाठीं शास्त्रज्ञ, लेखक प्राध्यापक आणि कलावंत हे उद्योगधंद्यांच्या चालकांशीं जोरदार स्पर्धा करीत असतात.

आर्थिक धोरण, परराष्ट्रीय धोरण, सरकारी धोरणांचे सार्वजनिक नीतिमता व वर्तणूक यांच्यावर होणारे परिणाम इत्यादि सामाजिक प्रश्नावर जें मतप्रदर्शन केले जातें त्यांत ही स्पर्धा विशेष दृष्टोत्पत्तीस येते. सामाजिक प्रश्नाबाबत भाविष्य वर्तविणें ह्या गोष्टीला आपल्या काळांत सर्वांत अधिक प्रतिष्ठा आहे. अज्ञात भविष्यकाळाचा वेध घेणें, पुढें काय होईल तें समाजाला सांगणें आणि विशिष्ट घटना घडावी अगर घडूं नये यासाठीं कोणती उपाय योजना करावी याबाबत सल्ला देणें ही कामें सर्वानुमतें ज्या माणसावर सोपविण्यांत येतात त्याच्या इतकी प्रतिष्ठा दुसऱ्या कोणालाच लाभत नाहीं. ही कार्यें करण्याचा अधिकार आपला आहे असें विचारवंत स्वाभाविकपणे समजतो. विद्वत्ता आणि वक्तृत्व यांची देणगी त्याला जितकी असते तितकी उद्योगधंद्यांच्या चालक वर्गाला नसते. ह्या वरचढपणावर उतारा म्हणून उद्योगधद्यांचा चालक असें ठासून सांगत असतो, कीं, "उत्पादनाचें कार्य मीं करतों. मीं 'तत्वविवेचक' नसून व्यवहारी मनुष्य आहे. कामें कशीं करून घ्यावी हें मला माहीत असतें आणि त्यामुळें मी कोणत्याहि प्रश्नाकडे रोखठोकपणानें पहातो. जीवन म्हणजे काय हें मी माझ्या दुकानांत शिकलों आहें आणि त्यामुळें देशांतील आणि जगांतील परिस्थिति खरोखर कशी आहे हें समजण्यासाठीं लागणारी खास सूक्ष्म दृष्टी मला प्राप्त झालेली आहे." ज्या माणसाला एखादें यंत्र चालवायचा प्रत्यक्ष अनुभव आहे त्याला कोणताहि प्रश्न मग तो कितीहि व्यापक असला तरी उत्तम प्रकारें समजूं शकतो अशी कल्पना आपल्या समाजांत रूढ आहे आणि या कल्पनेवरूनच आपल्या सामाजिक दृष्टीकोनांचें स्वरूप चांगल्या प्रकारें लक्षांत येऊं शकतें. उद्योगधंद्यांच्या चालकाला महत्व असतें तें तो उत्पादनाचा सूत्रधार असतो म्हणून. तेव्हां उत्पादनाची प्रतिष्ठा जर कमी झाली तर समाजांतल्या द्रष्ट्या माणसाच्या भूमिकेसाठीं चालेलेल्या चढाओढींत तो एकदम मागें पडेल आणि विचारवंत वरचढ ठरेल. म्हणून द्रष्टा या नात्यानें आपले समाजांतलें सध्यांचे स्थान त्याला टिकून ठेवायचें असेल तर उत्पादनाचें महत्व कायम रहावें म्हणून त्यानें झटलें पाहिजे. आणि तसा तो झटेल याची शंका बाळगण्याचें कांहींच कारण नाहीं.

सध्यांच्या कालांत सामाजिक मान्यता मिळविण्यासाठीं उद्योगधंद्यांचा चालक आणि विचारवंत यांची ही जी चढाओढ चालली आहे तिच्याबद्दल अधिक विवरण या पुस्तकांत पुढें केलें जाणार आहे. आतां इतकेंच पुरे.

[३]

ज्यांचे कधीं पटणार नाहीं अशांची शय्यासोबत राजकारण घडवून आणते हें पूर्वीपासून लोकांना माहीत आहे. कधीं कधी मात्र असें होतें, कीं, जे एकाच शय्येवर असतात त्यांना आपण असें चमत्कारिकपणें एकत्र आलों आहेत याची कल्पनाच नसते. उत्पादनात ज्यांचे हितसंबंध गुंतलेले आहेत त्यांची परिस्थिति अशा प्रकारची आहे. उत्पादनाच्या श्रेष्ठत्वाचें प्रतिपादन करण्यांत उद्योगचालकांना जर कोणाची मदत मिळत असेल तर ती अमेरिकेंतल्या व्यावसायिक उदारमतवाद्यांची. उद्योग-चालकांना उत्पादनामुळें जी प्रतिष्ठा प्राप्त होते तिच्यांत भर घालण्याचें कार्य अमेरिकेंतील उदार व जहाल तत्वप्रणाली आपल्या साऱ्या वजनानिशीं करीत असतात. या दोघांच्या एकजूटीची जी कारणें आहेत त्यांचे थोडेफार स्पष्टीकरण करणें आवश्यक आहे खरें. पण तीं मूलतः तशीं गुंतागुंतीची नाहींत. प्राणरक्षण तरापयाला जे चिकाटीनें धरून रहातात तें कुठच्यातरी किनाऱ्यावर फेकलें जाण्याची शक्यता असते आणि त्यांना भलतेच सोबती देखील लाभण्याची शक्यता असते. बदलत्या परिस्थितींत एकाच कल्पनेला जे दीर्घकाल चिकटून रहातात त्यांची देखील अशीच स्थिती होते. याबाबतीत ब्रिटन मधील परिस्थिति आणि अमेरिकेंतील परिस्थिति यांत संपूर्ण नसलें तरीं स्थूल साम्य आहे.

पंचवीस वर्षांपूर्वीच्या काळांत अमेरिकेंतील उदारमतवादी अर्थव्यवस्थेच्या एकंदर उत्पादनाचा फारसा विचार करीत नसत, आणि जेव्हा करीत तेव्हा भांडवल, श्रम-शक्ति, कच्चामाल इत्यादि उपलब्ध साधनांचा कार्यक्षमतेनें उपयोग कसा करावा या प्रश्नाकडेच ते मुख्यतः लक्ष देत. मक्तेदारी, आयात निर्यातीवरच्या जकाती, श्रमशक्ति व भांडवल यांच्या प्रवाहीपणांत येणारे अडथळे इत्यादी गोष्टींमुळें हें उद्दीष्ट मागें सारलें जाऊं नये असा ते आग्रह धरीत असत. भांडवलाच्या संचयांत वाढ करणें, कामगारांच्या संख्येत वाढ करणें, किंवा तांत्रिक शोध अधिक प्रमाणांत लावणें या मार्गांनीं उत्पादनांत वाढ करतां येईल ह्याची त्या उदारमतवाद्यांना (किंवा इतरांनाहि) जाणीव नव्हती.[1] विशेष म्हणजे मंदीमुळें उत्पादनाची जी घट होते तिकडे उदारमतवाद्यांचें लक्ष नसे. या प्रश्नाच्या बाबतींत राजकीय क्षेत्रांत कोणीच ठाम आणि आग्रही भूमिका घेतली नव्हती. अर्थचक्राचे चढउतार कमी

१ पृष्ठ १०२ पहा.

व्हावे आणि आर्थिक जीवन सुरळीतपणें चालावे अशी उदारमतवादी आणि परंपरानिष्ठ या दोघांचीहि इच्छा होती. विसाव्या शतकाच्या दुसऱ्या दशकांत अर्थचक्राची तीव्रता कमी करण्यासाठीं कोणते उपाय योजावेत यावद्दल जी चर्चा झाली तिचे राजकीय नेतृत्व हर्बर्ट हूव्हर यांच्याकडे होतें.

अमेरिकेतील उदारमतवाद्यांचा परंपरागत कार्यक्रम विसाव्या शतकाच्या तिसऱ्या दशकापर्यंत पुढील प्रमाणें होता: उपलब्ध उत्पन्नाची समान वाटणी करणें, आर्थिक सुरक्षिततेसाठीं अधिक तरतूद करणें आणि आर्थिक सामार्थ्याच्या अत्यंत विषम अशा विभागणीच्या संदर्भात व्यक्तींच्या आणि संघटनांच्या स्वातंत्र्याचें आणि हक्कांचें संरक्षण करणें. चढता प्राप्तीकर, सरकारतर्फे मिळणाऱ्या सुखसोयींत वाढ करणें, सार्वजनिक साधनसामुग्री खाजगी मालकीची होणार नाहीं अशीं व्यवस्था करणें, सामाजिक सुरक्षिततेच्या योजनांत वाढ करणें, शेतकऱ्यांना आणि इतर दुर्बल आर्थिक गटांना सहाय्य करणें, कामगार संघटना अधिक बलिष्ट करणें आणि कॉरपोरेशन्सचे नियमन करणें, इत्यादी मार्गांनीं वरील उद्दिष्टें साध्य करण्याचा ते उदारमतवादी प्रयत्न करीत. पण यापैकी कोणत्याहि उपायामुळें अर्थव्यवस्थेच्या एकंदर उत्पादनावर फारसा परिणाम होण्याची शक्यता आहे असें तेव्हां मानलें जात नव्हतें.

विसाव्या शतकाच्या तिसऱ्या दशकांत या परिस्थितींत फार मोठा बदल झाला. महामंदीमुळें उत्पादनांत फार मोठी घट झाली. १९२९ ते १९३३ या काळांत अर्थव्यवस्थेच्या खाजगी क्षेत्रांतील उत्पादन ३३ ते ५० टक्क्यांनीं कमी झालें. ही घट इतकी मोठी होती कीं, तिच्यामुळें अर्थव्यवस्थेच्या एकंदर उत्पादनांतील चढउताराकडे लोकांचे लक्ष वेधलें गेलें आणि या चढउतारांचे राजकीय आणि आर्थिक परिस्थितीवर किती दूरगामी परिणाम होतात त्याचाहि विचार होऊं लागला. साहजिकच लोकांना उत्पादनांत वाढ करण्यापेक्षां बेकारी कमी करण्याचें महत्व अधिक वाटत होते. रूझवेल्ट पहिल्याने अध्यक्ष झाले त्यावेळीं आपल्या उद्घाटनाच्या भाषणांत असें म्हणाले कीं, 'लोकांना पुन्हा रोजगारी मिळवून देणें हें आपलें पहिलें आणि सर्वांत महत्वाचे कार्य आहे.' परंतु आर्थिक असुरक्षितता नष्ट करण्याच्या प्रयत्नांचा एक परिणाम म्हणून असो किंवा एक स्वतंत्र उद्दिष्ट म्हणून असो, उत्पादनांत वाढ करणें या गोष्टींला अमेरिकेंतील राजकीय उदारमतवादांत महत्वाचे स्थान प्राप्त झालें.

मग १९३६ सालीं जॉन मेनर्ड केन्स यांनीं जगाच्या आर्थिक रंगभूमीवर प्रवेश केला. अर्थव्यवस्थेतील समग्र मागणीनुसार अर्थव्यवस्थेचें एकंदर उत्पादन निश्चित होतें, ही केन्सच्या उपपत्तींतील मध्यवर्ती कल्पना होती. निरनिराळ्या गोष्टींमुळें उत्पादनाची पातळी निश्चित होते. आणि ती कधीं उंच तर कधीं कमी असूं शकते.

सगळ्या मजूरांना जेयें रोजगारी मिळूं शकेल अशीं पातळी गाठण्याकडे उत्पादनाची अपरिहार्य प्रवृत्ती असते असें मुळींच नाहीं. समग्र मागणीची पातळी कमीजास्त करून सरकार उत्पादनाची पातळी वर अगर खालीं नेऊं शकतें. असें करण्याचे उत्तम मार्ग म्हणजे करांच्या उत्पन्नापेक्षा सरकारी खर्च अधिक करायचा आणि मागणींत भर घालायची किंवा सरकारी खर्चापेक्षां अधिक कर वसूली करून समग्र मागणींत घट करायची.

उत्पादनाच्या पातळीचें नियंत्रण जर यशस्वीरित्या केलें तर त्यापासून फारच मोठे फायदे मिळूं शकतात. कामगारांची बेकारी, शेतीच्या क्षेत्रांतील असुरक्षितता, छोट्या उद्योग चालकांचे धंदे बंद पडण्याची भीति, निवेशकांना सहन करावे लागणारे धोके, राज्यें आणि शहरें यांच्या आर्थिक अडचणी आणि लोकांना भाडें देण्याची ऐपत नसल्याकारणानें निर्माण होणारी वस्तीची दाटीवाटी, हे सर्व प्रश्न, उत्पादनांत वाढ झाली की, सुटण्याच्या मार्गाला लागतात. उत्पादनांत वाढ झाल्यामुळें जो सोपा होत नाहीं असा एकहि सामाजिक प्रश्न नसतो अशी भावना केन्सच्या उपपत्तीमुळें निर्माण झाली. केन्सनें आपले विचार मांडल्यानंतर थोड्यांच वर्षांत युद्ध सुरूं झाले आणि युद्धांसाठीं जी तयारी करायची होती तिच्या संदर्भात उत्पादनाच्या पातळीला फारच महत्व प्राप्त झालें. युद्धसामुग्रीची गरज आपण भागविली ती मुख्यत: उत्पादनांत वाढ करून (पृष्ठ १३३–३५).

यामुळें उदारमतवाद्यांना उत्पादनाचें फारच महत्व वाटूं लागलें. उत्पादन वाढविणें हा त्यांचा राजकीय कार्यक्रम झाला आणि उत्पादनाशिवाय जवळ जवळ दुसऱ्या कशाचाच ते विचार करीनासे झाले. राजकारणाच्या क्षेत्रांत उत्पादन हें एखाद्या रामबाण औषधासारखें झालें. उत्पादन वाढविलें कीं, जवळ जवळ सर्व चालू सामाजिक प्रश्न सुटतात असा आभास निर्माण झाला.

शिवाय कांहीं दिवस तरी अर्थव्यवस्थेचें एकंदर उत्पादन वाढविण्याचा प्रयत्न करणें ही उदारमतवाद्यांची मक्तेदारीच झाली. जे परंपरानिष्ठा होते ते संतुलित अर्थसंकल्पाच्या तत्त्वाला चिकटून राहिले. कारण अनेक वर्षें या तत्त्वाला सांकेतिक शहाणपणांत फार महत्वाचें स्थान होते [1] परंतु हें तत्त्व सोडून देणें आवश्यक होतें. उत्पादनाच्या पातळींत फेरफार करायचे म्हटलें कीं, सरकारचें आर्थिक जीवनांतील कार्य साहाजिकच वाढते. पण ही गोष्ट देखील परंपरानिष्ठाना नापसंत होती. कारण तसें झालें म्हणजे पूर्वी जा प्रतिष्ठा फक्त खाजगी उत्पादनालाच मिळत होती ती सरकारला देखील मिळू लागते.

---

१ अनेक उदारमतवादी–आणि त्यांत रूझवेल्ट यांचा निःसंशय समावेश होतो–हें तत्व सोडायला नाखूष होते आणि त्यांच्यापैकी कांहीं या तत्वासाठीं परंपरानिष्ठात सामील झाले.

उदारमतवाद्यांना उत्पादनाचें इतकें महत्व वाटावें याला आणखी देखील एक कारण होते. तें असें कीं आम्हीं उत्पादनांत वाढ करून बेकारी कमी करूं असें आश्वासन दिलें म्हणजे निवडणूकांत यश मिळत असे विसाव्या शतकाच्या तिसऱ्या दशकाच्या अखेरीपासून तों पांचव्या दशकाच्या सुरवातीपर्यन्त यूनायटेड स्टेटस्-मध्यें उदारमतवाद्यांना जी मतें मिळत ती मुख्यतः उत्पादनाची पातळी उंच ठेवण्याच्या आश्वासनामुळें. मतें मिळविण्याच्या बाबतींत या आश्वासनावर मात करील अशी दुसरी कोणतीहि गोष्ट नव्हती. ब्रिटन मधल्या डाव्या गटांतल्या लोकांची परिस्थिति या उदारमतवाद्यांसारखीच होती.

उदारमतवाद्यांच्या आर्थिक धोरणांत उत्पादनाला अजून देखील अनन्य साधारण महत्व आहे. आतां मंदीच्या काळांतील घटलेल्या उत्पादनाच्या स्मृति कांहीशा पुसट झाल्या आहेत. त्यामुळें आतां उदारमतवाद्यांच्या घोषवाक्यांत पूर्णरोजगारीला कमी महत्व दिलें जातें आणि अर्थव्यवस्थेच्या विकासाला अधिक महत्व दिलें जातें. पक्षांचे कार्यक्रम संमेलनें आणि भाषणें यांच्या द्वारें विकास पावणाऱ्या आणि अधिक उत्पादनक्षम होणाऱ्या अमेरिकेचें स्वप्न निर्माण केलें जातें 'आपली लोकसंख्या वेगानें वाढत असली तरी देखील उत्पादन आणि सेवन यांत चढत्या गतीनें वाढ करण्यासाठीं लागणारी साधनें, यंत्रें, शास्त्रीयज्ञान आणि कसब आपल्या जवळ आहे. परंतु इतिहासाने दिलेल्या त्या महान् संधीचा लाभ आज आपण घीटाइने घेत नाहीं.'[१] अधिक उत्पादन हें अमेरिकन उदारमतवादाचे ब्रीद वाक्य आहे. इथें अभिप्रेत असतें तें एकंदर उत्पादन. या उत्पादनाची विभागणी कशीं करायची हा प्रश्न निश्चितपणें दुय्यम मानला जातो. या प्रश्नाकडे अधिक लक्ष देणें हें कांहींसें जुनाटपणाचे मानलें जातें. खाजगी क्षेत्रांत कोणत्या प्रकारच्या वस्तूंचे आणि सोयींचे उत्पादन होते तिकडे मुळीच लक्ष पुरविलें जात नाहीं. त्या सर्वच गोष्टी महत्वाच्या आहेत असें मानलें जातें आणि लक्ष केंद्रित केले जातें तें उत्पादनाच्या समग्र राशीवर.

[४]

अमेरिकेंतील उदारमतवाद्यांना उत्पादनाचें हें जें महत्व वाटतें तें परिस्थिति बदलली तरी सांकेतिक शहाणपणाचा पगडा कसा कायम रहातो त्याचे वेधक उदाहरण आहे. केन्सचें 'जनरल थिअरी' हें पुस्तक प्रसिद्ध झाल्यापासून जीं वीस पंचवीस वर्षें लोटली आहेत. त्या काळांत परंपरानिष्ठांची केन्सने सुचविलेल्या कार्यक्रमावद्दलची अप्रीति नष्ट झाली आहे आणि तो कार्यक्रम आतां त्यांनीं स्वीकारला आहे. पूर्णरोजगारी आणि आर्थिक विकास या तत्त्वांना डेमॉक्रॅटिक पक्ष किंवा मजूर पक्ष या विरोधी पक्षांचा जेवढा पाठींबा होता तेवढांच युनायटेड स्टेटस्मधील

१ कॉन्फरन्स ऑन इकॉनॉमिक प्रोग्रेस, १९५७, यांनीं प्रसिद्ध केलेल्या 'कन्झम्शन—कीं टु फूल प्रॉस्पेरिटी' या निबंधाच्या प्रस्तावनेवरून. अे. डी. अे. वर्ल्ड, या नियतकालीकाच्या मे, १९५७च्या अंकांत छापल्याप्रमाणें.

आयसेनहॉवर यांच्या सरकारचा आणि ब्रिटनमधील चर्चिल, इडन आणि मॅकमिलन यांच्या हुजूर पक्षीय मंत्रीमंडळाचा देखील होता. त्यांचा तसा पाठींबा नाहीं असें जर लोकांना वाटलें असतें तर त्यांना बहुमत मिळवून अधिकारपदावर येणें अशक्यच झालें असतें.

शिवाय या धोरणाच्या बाबतींत अमेरिकेंतील परंपरानिष्ठांची बाजू उदारमतवाद्यांच्या बाजूपेक्षां कांहीं बाबतींत अधिक बळकट आहे. या पुढें अनेक वर्षें जर पूर्णरोजगारी टिकविता आली तर ह्या धोरणाचा पहिल्याने कोणी पुरस्कार केला तें लोक विसरून जातील. पूर्ण रोजगारीची धोरणें खरी आमची आहेत असा जो उदारमतवाद्यांचा दावा असतो त्याचें लोकांना महत्व वाटेनासे होईल. उत्पादक हेच उत्पादनाचे स्वभावसिद्ध राखणदार आहेत असें लोकांना वाटूं लागेल. मग उदारमतवादी राजकीय पुढाऱ्यापेक्षां उद्योगधंद्यांचे परंपरानिष्ठ चालकच ह्या धोरणावर आपली मालकी सांगून अधिकाराची स्थानें मिळवूं शकतील.

उदारमतवाद्यांची परिस्थिति आणखीहि एक प्रकारें विचित्र झाली आहे. विसाव्या शतकाच्या तिशींत आणि नंतरच्या दशकांत त्यांना जें यश मिळालें तें उत्पादन वाढविण्याच्या व बेकारी नष्ट करण्याच्या आश्वासनांच्या जोरावर. त्याकाळीं त्या गोष्टींना फार मोठें महत्व होतें. पण उत्पादनाचें महत्व एकदां कळल्यावर उदारमतवादी त्यालाच चिकटून राहिले आहेत. ज्या काळांत उत्पादन वाढविल्यामुळें बेकारी नष्ट न होतां ज्यांना रोजगारी आहे त्यांच्याच उत्पादनांत वाढ होते त्या काळांत देखील उदारमतवादी अधिक उत्पादन करा असा आग्रह धरीत आहेत. ज्या काळांत वस्तूंचा पुरवठा आधींच भरपूर आहे आणि उत्पादन वाढविल्यामुळें त्यांत भर मात्र पडते त्या काळांत देखील अधिक उत्पादनाचे धोरण हें राजकीय यश मिळवून देणाऱ्या परिसासारखें आहे असें तो मानतो. सार्वत्रिक बेकारी नष्ट करणारें उत्पादन आणि संपन्नतेंत भर घालणारें उत्पादन या दोहोंत मूलभूत भेद आहे. एके काळीं उदारमतवादी जेव्हां उत्पादनाला महत्व देत होते तेव्हां त्यांच्याजवळ एका ज्वलंत समस्येचें उत्तर होतें. पण आतां जेव्हां ते उत्पादनाला महत्व देतात तेव्हां ती समस्याच मुळीं अस्तित्वांत नसते. पण यांत आश्चर्य वाटण्याजोगें कांहींच नाहीं. कारण उपभोग्य वस्तूंच्या पुरवठ्यांत वाढ करणें अत्यंत महत्वाचें आहें असें ज्या युक्तिवादाच्या साहाय्याने आपण स्वतःला पटवून देतो तोच युक्तिवाद उदारमतवाद्यांना देखील मान्य आहे.

आणि उदारमतवाद्यांची ही भूमिका नजीकच्या भविष्यकाळांत बदलेल अशी फारशी शक्यता नाहीं. कोणत्याहि राजकीय गटानें ज्या तत्त्वप्रणालीच्या सहाय्यानें अधिकारस्थान मिळविलेलें असतें त्या तत्त्वप्रणालीला तो गट अगदीं चिकटून रहातो. तेव्हां आपलें विरोधक आपल्याला अप्रत्यक्षपणें पाठींबा देत

राहातील अशीं खात्री परंपरानिष्ठ पक्षानें बाळगायला हरकत नाहीं. उत्पादनाला जी प्रतिष्ठा आहे तिच्यावरच उद्योगधंद्यांच्या चालकांचे समाजांतील स्थान, प्रतिष्ठा आणि त्यांना मिळणारी राजकीय सत्ता अवलंबून असते. ह्या उत्पादनाचे महात्म्य उदारमतवाद्यांची घोष-पत्रकें देखील वर्णन करीत राहतील आणि अशा प्रकारें उद्योगधंद्यांच्या चालकांना पाठींवा देत राहतील. द नॅशनल ॲसोसिअेशन ऑफ मॅन्यूफॅक्चरर्स या संस्थेने खरोखर अमेरिकन्स् फॉर डेमॉक्रॅटीक ॲक्शन ह्या संघटनेच्या निधीला देणगी द्यायला हवी.

परंतु हें विपर्यांतर झालें. सध्यां आपण एवढीच गोष्ट लक्षांत घ्यायला हवी कीं, केन्सनें उदारमतवाद्यांना उत्पादनाचे महत्व पटवून दिलें आणि त्यांना जें राजकीय यश मिळालें त्यामुळें उत्पादनांत त्यांचे हितसंबंध आतां गुंतून राहिले आहेत. जें नेहमीं घडतें तेंच केन्सच्या भूमीकेच्या बाबतींत देखील घडलें आहे. त्या भूमीकेला नव्या सांकेतिक शहाणपणाचे स्वरूप प्राप्त झालें आहे. सध्यां आपण उत्पादनाला जें महत्व देतो त्याबद्दल कोणी शंका उपस्थित केली तर, मला वाटतें, उत्पादकांइतकेच उदारमतवादी देखील खवळून उठतील.

[५]

ब्राउनिंगने असें म्हटलें आहे कीं, 'टायटन्स जेव्हां डोंगर रचीत असतात त्यावेळीं नव्हे तर जेव्हा त्यांच्या कामाच्या शिखरावर आणखी एक शीला विराजमान व्हायची असते तेव्हां जोव्ह त्यांच्यावर हल्ला करतो.' सध्यांची आपली जी आर्थिक उद्दिष्टें आहेत ती त्या टायटन्सपेक्षां अधिक सुरक्षित आहेत असें म्हणतां येणार नाहीं. प्रश्न असा आहे कीं, या उद्दिष्टांचा दुर्बलतेचा क्षण आज येऊन ठेपला आहे का ?

आज आपण ज्या उत्पादनाला इतकें महत्व देतो त्याचें आपल्या मनांतील स्थान भक्कम आहे यांत शंका नाहीं. एकेकाळीं समानतेला जें महत्व होतें तें आज उत्पादनाला प्राप्त झालें आहे. शिवाय उत्पादनामुळें आर्थिक सुरक्षिततेचा लाभ होतो. त्यामुळें त्याचें महत्व अधिकच वाढलें आहे. ग्राहकांच्या मागणीची परंपरागत आणि तपशीलवार उपपत्ती आज अस्तित्वांत आहे. ती जरी बरीचशी दिखाऊ पण पोकळ असली तरी तिच्या युक्तिवादाचे पाठबळ त्या उत्पादनाला लाभलें आहे. उत्पादनाचीं राष्ट्राच्या संरक्षणास मदत होते या कल्पनेमुळें त्याला एक प्रकारचें पावित्र्य प्राप्त झालें आहे. जरी प्रत्यक्षांत उत्पादनाचे राष्ट्रीय संरक्षणाशीं नातें जोडल्यामुळें आपल्या संकटांत भर पडण्याची शक्यता असली तरी देखील उत्पादनाच्या उद्दिष्टाला हें पावित्र्य प्राप्त झालें आहे. उद्योगधंद्यांच्या चालकांना उत्पादनामुळें प्रतिष्ठा लाभते आणि उदारमतवादी राजकीय पुढाऱ्यांना उत्पादनामुळें आपल्याला राजकीय सत्ता प्राप्त होईल असें वाटतें.

असें असलें तरी हें उत्पादनाचे उद्दिष्ट डळमळीत होणार नाहीं अशांतला भाग नाहीं. त्याच्या तटबंदीत आतांच कांहीं भेगा पडल्या असण्याची शक्यता आहे. त्या किती खोलवर गेलेल्या आहेत तें सांगणें कठीण आहे पण त्यांचें अस्तित्व अवश्य ध्यानांत घ्यायला हवें.

उत्पादनाची प्रतिष्ठा उत्पादित वस्तूंच्या प्रतिष्ठेवर अवलंबून असते. अमेरिकन समाजाच्या उच्चभ्रूश्रेणींत घरगुती वापराच्या यांत्रिक साधनांच्या विषयीं एक प्रकारची अप्रीति निर्माण झाली आहे आणि अशी अप्रीति दाखविणें हें आतां फॅशनेबल देखील झालें आहे. (या साधनांना उद्देशून 'गॅजेट' हा जो शब्द वापरला जातो तोच कांहींशीं हेटाळणी व्यक्त करणारा आहे.) आलीशान मोटारी, टेलिव्हिजनचें मोठाले पडदे, बार्बेक्यूसाठीं बनवलेल्या खास भट्ट्या किंवा मौजमजा करण्यासाठीं बांधलेलीं ऐशआरामी दालनें यांचे आतां या उच्चभ्रू मंडळींना कौतुक वाटत नाहीं. उलट या गोष्टींमुळें समाजात आज कांहींशीं टीकाच होते. आजकाल आपले कपडे कांहींसे अव्यवस्थित असावेत असा प्रयत्नहि विशेषतः पुरूषवर्ग करीत असतो. अधिक वस्तू मिळविण्याच्या वृत्तीविरुद्ध जें बंड होणार आहे त्याची ही नांदी आहे असें म्हणतां येईल. किंवा निदान इतकें तरी म्हणतां येईल, कीं, दुसऱ्यांची बरोबरी करण्याच्या इच्छेंतून आपल्या गरजा निर्माण व्हाव्यात हें आतां लोकांना पसंत नाहीं.

समाजांतील आपलें स्थान आपण गमावित आहोत अशीं जी शंका उद्योगधंद्यांच्या चालकांना येऊं लागली आहे ती तर या संदर्भात विशेष अर्थपूर्ण आहे. या शंकेमुळेंच अशा तक्रारी केल्या जातात की, आज देशाला उद्योगधंद्यांच्या चालकवर्गाच्या समस्यांची मातब्बरी वाटत नाहीं, तो त्यांच्या सल्ला व नेतृत्व अवश्य त्या प्रमाणांत मान्य करीत नाही आणि उद्योगधंदे आपलें महत्व उद्योगधंद्यांच्या चालकांना पटवून देण्यास असमर्थ ठरत आहेत. ही जी शेवटली तक्रार आहे तिचा हितविरोधी आणि अप्रीय वाटणारे कर, नियामक कायदे आणि समाजवादाकडे झुकणारा लोकांचा कल यांच्याबद्दल वाटणाऱ्या भीतीशीं संबंध असण्याची शक्यता आहे. पण यावरून देखील असेंच सूचित होतें कीं, उद्योगधंद्यांच्या चालकांचें नेतृत्व मान्य करण्यास आणि त्यांच्या इशाऱ्यांची दखल घेण्यास आज आपला देश तितकासा तयार नाहीं. कार्नेजी आणि थोरले मॉर्गन यांना अशा तक्रारीं करण्याची कधींच आवश्यकता वाटली नाहीं.

या संदर्भात तितकीच महत्वाची दुसरी एक गोष्ट अशी कीं, आज ज्या उद्योग चालकाला समाजांत मान्यता मिळवायची असते त्याला असें दाखवून द्यायला लागतें कीं, वस्तूंचें उत्पादन करण्याव्यतिरिक्त इतरहि कांहीं आपण करूं शकतो.

जनता संपर्काचा एक नवा व्यवसाय आज अस्तित्वांत आलेला आहे आणि उद्योग चालक हेच मुख्यत: या व्यवसायाची गिऱ्हाइकें आहेत. यावरून असें दिसून येते कीं, केवळ उद्योगधंद्यांच्या क्षेत्रांत कर्तृत्व दाखविलें कीं आज मान्यता मिळत नाहीं. किमानपक्षीं या कर्तृत्वाची जाहीरात तरी करावी लागते. परंतु उद्योगचालक गिऱ्हाइक म्हणून आला कीं, जनता संपर्काचा व्यवसाय करणाऱ्या माणसाला पहिल्या प्रथम त्या चालकाची जी प्रतिमा लोकांच्या डोळ्यापुढें असते तिचें नव्यानें रेखाटन करावें लागतें. आणि वस्तूंच्या उत्पादनाव्यतिरिक्ति तो चालक दुसरेंहि कांहीं करतो असें दाखवावें लागतें. तो चालक मुत्सद्दी आहे, शिक्षणाचा साहाय्यकर्ता आहे आणि सामाजिक कार्यकर्ता आहे असें दाखवावें लागतें. त्याला कलात्मक आणि बौद्धिक गोष्टींची आवड आहे असें दाखविण्याची आवश्यकता देखील अधिकाधिक प्रमाणांत भासूं लागली आहे. जो उद्योगचालक 'बिझिनेस वीक' वाचतो त्याला मान्यता मिळूं शकत नाहीं. पण जो प्रूस्ट वाचतो तो मात्र थोरवीला पात्र ठरतो.

वस्तूंच्याकडे बघण्याचा लोकांचा दृष्टीकोन बदलल्यामुळेच त्यांची मान्यता मिळविण्यासाठीं हे इतर गुणविशेष एखाद्या माणसाला चिकटविणें आवश्यक झालें आहे. मोटारींच्या युगाच्या सुरवातीच्या वर्षात हेन्री फोर्ड किंवा आर. इ. ओल्डस् हे मोटारी तयार करतात इतकें म्हटलें कीं तें पुरेसें होत असे. लोकांनी वाखाणणी करावी यासाठीं आणखी कशाची आवश्यकता नव्हती. परंतु आतां मोटार ही एक नित्याची गोष्ट झाली आहे. आणि उच्चभ्रू लोक तर असें म्हणतात कीं, आकार आणि सजावट या बाबतींत ती फार सदोष आहे ती फार मोठी, आणि अवजड आहे आणि तिचा आकार व सजावट तिच्या कार्याला अनुरूप अनुरूप अशीं नाहीत. फोर्ड किंवा ओल्डस् यांना जी प्रतिष्ठा लाभली ती आजच्या मोटारींच्या कारखानदाराला का लाभत नाहीं हें यावरून सहज लक्षांत येण्याजोगें आहे.

समाजाचा आदर मिळविण्याच्या बाबतींत विचारवंत, सरकारी अधिकारी आणि राजकीय पुढारी हें उद्योगचालकांशीं स्वभावत:च कशी स्पर्धा करीत आहेत तें आपण वर पाहिलेंच आहे[१] (हॉलीवूड, वेसवॉल, टेलिव्हिजन वरचे भाष्यकार किंवा कॅफे सोसायटी यांच्याशीं वरील पैकीं कोणीच स्पर्धा करूं शकत नाहीं. आणि वरील सर्वांचेच असें मत आहे कीं, याची जी वाहवा होते ती थिल्लर स्वरूपाची असते.) खरें पाहिले तर उद्योगचालकाच्या मानानें विचारवंताचें स्थान आज खात्रीनें अधिक बळकट आहे. आपण जनता संपर्काचा व्यवसाय करणाऱ्या एखाद्या

१ अशाच प्रकारचा निष्कर्ष रसेल लाइन्स यांनीं 'अ सरफीट ऑफ हनी' (न्यू यॉर्क, हार्पर, १९५७) या आपल्या पुस्तकांत काढला आहे.

माणसाचें साहाय्य घ्यावें असें एखाद्या यशस्वी कविला किंवा शास्त्रज्ञाला क्वचित्च वाटेल पण एखाद्या यशस्वी कॉर्पोरेशनच्या अध्यक्षाला मात्र जनता संपर्काच्या तंत्राचा उपयोग न करणें मुळीच इष्ट वाटणार नाहीं. आपल्याला वैचारिक अंग देखील आहे असें दाखविण्याची आवश्यकता आज उद्योग चालकाला अधिकाधिक प्रमाणांत वाटत आहे. परंतु आपण चांगले उद्योग चालक आहोत असें दाखविण्याची आवश्यकता मात्र एखाद्या तत्वज्ञाला किंवा कलावंताला वाटत नाहीं. या संदर्भांत जर कोणतीं घटना अत्यंत अर्थपूर्ण असेल तर ती ही कीं, फार पूर्वीपासून अमेरिकेंतील विचारवंतानीं उद्योगचालकांच्या बौद्धिक कर्तृत्वाला वैचारिक जगांत दुय्यम नागरिकत्व दिलें आहे. अमेरिकेंतील विचारवंत या उद्योगचालकांची भाषणें ऐकतात. त्यांच्या पुस्तकांचीं परीक्षणें करतात आणि त्यांच्या विचारांचें देखील आदरपूर्वक स्वागत करतात परंतु उद्योगचालकांच्या या कृती वन्या आहेत कीं वाईट आहेत यावद्दल ते स्वतंत्रपणें मत देत नाहीत. ही एक उद्योग चालकाची कृति आहे आणि त्या दृष्टीनें बरी (किंवा क्वचित् वाईट) आहे असें मत ते प्रदर्शित करतात. आणि सर्वानाच हें माहीत असतें कीं एकंदरीत उद्योगचालकांच्या कृति पुष्कळच खालच्या दर्जाच्या असतात.

गेब्रिअल शेव्हॅलिए यांच्या क्लॉशेमर्ल या पुस्तकांतल्या क्यूर या पात्राला त्याच्या खेड्यांत विशेष प्रतिष्ठा होती अशांतला भाग नाहीं. त्या खेड्याचें कर्तृत्वाचे जे कांहीं निकष होते त्यांच्या संदर्भात तो कमीच पडत होता. चारचौघांसारखींच तो दारूपिऊं शकत असे पण त्या बाबतींतलें त्याचे कर्तृत्व कांही खास चमकदार नव्हते. प्रेम प्रकरणें करणें ही गोष्ट त्या खेड्यांत भूषणास्पद मानली जात असे. पण तो धर्मगुरू असल्यामुळें त्याला तसलें कांहीं करतां येत नसे. पण स्वर्गाच्या किल्या फक्त त्याच्याच हातीं होत्या आणि त्यामुळेंच तो इतरांहून श्रेष्ठ मानला जात असे. यूनायटेड स्टेटस्मध्यें देखील एखाद्या उद्योग चालकाला जर खऱ्या अर्थानें प्रतिष्ठा मिळवायची असेल तर उन्हाळ्यांतल्या एखाद्या प्रसन्न दिवशीं त्याला पदवीधरांच्या मिरवणूकींतून चालत जावें लागते, चेहरा कांहींसा गंभीर आणि कांहींसा खेळकर ठेवावा लागतो आणि एखादी प्रतिष्ठीत अशी सन्मान्य पदवी मिळवावी लागते.

वातावरणांत जे बदल होत आहेत त्याची ही केवळ कांहीं लक्षणें आहेत. खरें म्हणजे आपण अजून उत्पादन आणि उत्पादक यांना एवढी प्रतिष्ठा द्यावी हाच एक चमत्कार आहे. रिकार्डोच्या काळापासून ज्या समजूतींच्या आणि भ्रमांच्या साहाय्यानें ही प्रतिष्ठा कायम राहिली आहे त्या समजूती व भ्रम खरोखर लक्षणीय आहेत. उत्पादन हें सर्वांत अधिक महत्वाचें आहे ही कल्पना समाजांत अत्यंत दृढमूल झालेली आहे. आपण आव्हान देत आहोत तें अशा प्रबल कल्पनेला.

प्रकरण चौदावें

बिल कलेक्टर दार ठोठावतो

परिस्थिति पुढील प्रमाणे आहे. वस्तूंच्या पुरवठ्याच्या दृष्टीनें उत्पादन ही कांहीं आतां फारशी निकडीची गोष्ट राहिलेली नाहीं. वस्तूंच्या पुरवठ्यांत थोडी वाढ झाली काय किंवा घट झाली काय त्याला जवळ जवळ कांहींच महत्व राहिलेलें नाहीं. अर्थशास्त्र ज्यावेळीं जन्माला आलें त्या काळांतल्या भूमिकांना आपण चिकटून राहिल्यामुळेंच आपल्याला उत्पादनाचें अजूनहि महत्व वाटतें. शिवाय आपली ग्राहकांच्या मागणीची उपपत्ती आतां गैरलागू झालेली आहे. उत्पादन आणि लष्करी सामर्थ्य यांचे निकटचें नातें आहे अशी जुनाट, चुकीची आणि घातक समजूत आपण अजून उराशीं बाळगलेली आहे आणि उत्पादन महत्वाचें आहे असें मानण्यांत उदारमतवादी आणि परंपरानिष्ठ या दोघांचेहि हितसंबंध गुंतलेलें आहेत. या सर्व गोष्टींमुळें उत्पादन महत्वाचे आहे या समजुतीला बळकटी आली आहे.

मात्र आर्थिक सुरक्षिततेच्या दृष्टीनें उत्पादनाचें महत्व आणि निकड अजूनहि कायम आहे. कामगार जेव्हां बेकार होतात तेव्हां त्या बेकारीमुळें वस्तूंच्या पुरवठ्यांत जी घट होते ती समाजाला जाणवत नाहीं. ही घट तशी थोडी असते. परंतु बेकारीमुळें ज्यांचें उत्पन्न थांबतें त्यांना मात्र त्या उत्पादनाची गरज अवश्य भासते. बेकारीचा हा परिणाम दुर्लक्ष करण्याजोगा नसतो. कारण त्यामुळें कामगार आपल्या सगळ्याच किंवा निदान बऱ्याचशा उत्पन्नाला पारखे होतात आणि ज्या वस्तू ते पूर्वी विकत घेत असत त्यांना देखील ते पूर्णपणें किंवा बऱ्याचशा प्रमाणांत पारखे होतात. शिवाय शेतकरी, पांढरपेशा वर्ग आणि लहान व मोठे उद्योगचालक या सर्वांचीच आर्थिक सुरक्षितता कायम राहायची असेल तर त्यासाठीं उत्पादनाची पातळी उंच व स्थिर ठेवणें आवश्यक असतें. मंदीपासून आधुनिक मोठ्या कॉर्पोरेशनला देखील मोठा धोका असतो आणि त्यावर कोणताहि तोडगा सांपडलेला नाहीं. आपण पुरेपूर उत्पादन करीत राहिले पाहिजे तें आर्थिक सुरक्षिततेसाठीं.

हे निष्कर्ष तसे सरळ असले तरी सांकेतिक शहाणपणाच्या पसंतीला उतरणार नाहींत. एका बाजूनें असें म्हणायचें कीं, आर्थिक सुरक्षिततेच्या दृष्टीनें उत्पादन महत्वाचें आहे आणि दुसऱ्या बाजूनें असें म्हणायचें कीं, प्रत्यक्ष जें उत्पादन घडतें तें केवळ आनुषंगिक आहे, ही भूमिका संभ्रम निर्माण करणारी आहे. ही भूमिका

घेतली कीं, अनावश्यक काम निर्माण करणें हें अर्थव्यवस्थेचें कार्य ठरतें. या पेचांतून सुटका करून घेण्याचा एक मार्ग म्हणजे सगळ्या गरजा निकडीच्या आहेत असें मानणें. ग्राहकांच्या मागणीबाबत जो भ्रामक युक्तिवाद आपण करतो त्या मागचें एक कारण हें असें आहे. काम करायला तयार असलेल्या सर्व कामगारांना ज्यामुळें उत्पन्न मिळूं शकेल इतकें उत्पादन आपण करणें समाजाच्या सौख्यासाठीं आणि समाधानासाठीं आवश्यक आहे. हें सत्य मनाला तितकेंसे रूचत नाहीं. त्यापेक्षां ज्या वस्तूंचे आपण उत्पादन करतो त्यांची आपल्याला खरोखरच गरज असते असें मानणें अधिक प्रशस्त वाटतें. पण खरोखर कोणती गोष्ट महत्वाची आहे यावद्दल जर कोणाला शंका असेल तर त्यानें एक साधा प्रयोग करून पहावा. त्यानें असें गृहीत धरावें कीं, प्रेसिडेण्टच्या किंवा अन्य महत्वाच्या अधिकारपदासाठीं एक उमेदवार उभा आहे. कामगाराच्या दर तासाच्या उत्पादन क्षमतेंत मोठी वाढ झाली आहे. आणि त्यामुळें एका बाजूला एकंदर उत्पादनांत खूप वाढ झाली आहे आणि दुसऱ्या बाजूला बेकारींत देखील खूप वाढ झाली आहे. प्रस्तुत उमेदवाराला कामगारांच्या उत्पादनक्षमतेंत झालेल्या या वाढीचें समर्थन करायचें आहे. आतां आपण असेंहि समजूंया कीं, या उमेदवाराला दुसरा एक पर्याय उपलब्ध आहे. तो असा कीं, उत्पादनक्षमता पूर्वी इतकींच राहूं द्यायची आणि अशा प्रकारें बेकारी टाळायची. या परिस्थितींत अधिक उत्पादन आणि त्याला जोडून आलेली बेकारी यांच्यापेक्षां पूरीरोजगारी अधिक श्रेयस्कर आहे असेंच कोणताहि राजकीय पुढारी म्हणेल. मग तो अडाणी असो किंवा सुसंस्कृत असो.

वर जें उदाहरण दिलें आहे त्यावरच या पुस्तकांतील पुढचा युक्तिवाद आधारलेला आहे. त्या उदाहरणावरून असें दिसून येतें कीं, वस्तूंच्या पुरवठ्याला पुरवठा या नात्यानें फारसें महत्व देण्याचें कारण नाहीं. या वस्तूंची गरज निकडीची आहे हें सत्य नसून केवळ भ्रम आहे. आणि हा भ्रम एकदां नष्ट केला कीं, कोणत्या गोष्टी करणें शक्य होतें हें पाहणें हा तर आपला अंतिम हेतु आहे. पण या बाबतींत विचार करतांना आपण एका बाबतींत फार जागरूक राहिलें पाहिजे. ती अशीं कीं, व्यक्तींच्या सुरक्षिततेच्या दृष्टीनें उत्पादन महत्वाचें आहे. लोकांचें उत्पन्न मिळविण्याचें साधन म्हणून जें त्याला महत्व आहे तें कमी झालेलें नाहीं. उत्पादनाचें हें जें कार्य आहे तें असेंच चालू राहील अशी आपण खबरदारी घेतलीं पाहिजे.

परंतु माणसाचे भ्रम क्वचित्च कल्याणकारक असतात आणि ज्या भ्रमामुळें उत्पादनाला आपण स्वयंभू महत्व देतो ते मुळांतच हानिकारक किंवा धोकादायक आहेत. ह्या संदर्भात एक धोका निर्माण होतो तो ज्या मार्गानीं आपण गरजा निर्माण

करतो त्यामुळें. उत्पादनामुळें रोजगारी आणि उत्पन्न यांच्या बाबतींत जी सुरक्षितता निर्माण होते तिलाच गरजा निर्माण करण्याच्या ह्या विशिष्ट मार्गामुळें धोका निर्माण होतो. मुद्रास्फितीचा प्रश्न सोडविण्याच्या बाबतींत आपल्याला जें अपयश आलेलें आहे त्याच्या मुळाशीं देखील वस्तूंच्या उत्पादनाबाबतचा आपला सध्यांचा दृष्टीकोन आहे. शिवाय या दृष्टीकोनामुळें सर्वच वस्तूंच्या नव्हे तर कांहीं वस्तूंच्या उत्पादनावर भर दिला जातो आणि त्यामुळें अधिक गंभीर स्वरूपाचे सामाजिक धोके निर्माण होतात. या सर्व धोक्यांचा आतां आपल्याला विचार करायचा आहे. आणि तो करतांना सुरवातीला गरजा निर्माण करण्याच्या सध्यांच्या मार्गामुळें जीं संकटें उपस्थित होतात त्यांबद्दल आपण विवेचन करूं या.

[२]

गरजा निर्माण करण्याच्या पद्धतींतील तात्कालीक धोका असा कीं, गरजा बरोबरच कर्जाची देखील निर्मिती होते. ज्या प्रमाणांत ग्राहक कर्ज काढायला पात्र आणि सिद्ध असतात त्यावर ग्राहकांची मागणी बहुतांशी अवलंबून असते आणि ही कर्ज निर्मिती कांहीं बाबतींत मूलतःच अस्थिरता निर्माण करणारी आहे.

ज्या पद्धतीनें आज गरजा कृत्रिमरित्या निर्माण केल्या जातात ती जवळ जवळ अपरिहार्यपणें ग्राहकांच्या कर्जात वाढ करते. जाहिरात आणि अनुकरण-प्रियता या दोन परस्परावलंबी गोष्टींच्यामुळें गरजा निर्माण होतात. आणि या गोष्टींचा परिणाम सर्व समाजावर होत असतो. ज्यांचीं ऐपत असते त्यांच्यावर आणि ज्यांची नसते त्यांच्यावरहि या गोष्टींचा परिणाम होतो. ज्यांची ऐपत नसते त्यांच्या मनांत जाहीरातीच्या द्वारें गरजा निर्माण केल्या कीं, त्या भागविण्यासाठीं त्यांना कर्ज मिळवून देणें हें ओघानेंच येतें. अनुकरणप्रियता आणि कर्जबाजारीपणा यांचे तर अधिकच निकटचें नातें आहे. प्रत्येक समाजांतल्या निरनिराळ्या व्यक्तींच्या खर्च करण्याच्या ऐपतींत खूप फरक असतो. आणि ज्यांची ऐपत असते त्यांची बरोबरी करण्याचा प्रयत्न ऐपत नसणारे लोक तावडतोब करतात. अशी बरोबरी करायची म्हटली म्हणजे त्यांना अपरिहार्यपणे कर्ज काढावे लागतें. सामान्यपणें असें मानलें जातें कीं, आज लोकांच्या मनोवृत्तींत आणि वर्तनांत कांहींतरी मूलभूत आणि नवीन स्वरूपाचा बदल झाला आहे आणि त्यामुळें ग्राहकांनीं काढलेल्या कर्जांत आज इतकी मोठी वाढ झाली आहे. कर्जाकडे पाहण्याच्या लोकांच्या दृष्टींत फरक पडला आहे. माणसानें आधी बचत करावी आणि नंतर चैन करावी हें जें प्यूरिटन तत्त्वज्ञान होते तें लोकांनीं सोडून दिलें आहे. तें कां तें सांगता येणार नाहीं पण सोडून दिलें आहे हें मात्र निश्चित. खरें म्हणजे आर्थिक जीवनाचें जे वेगवेगळे भाग असतात त्यांचे परस्पराशीं नातें असतें. जो समाज लोकांच्या मनात गरजा

निर्माण करण्यासाठीं कोटयावधि डॉलर्स खर्च करावयाला तयार असतो, त्यानें त्या गरजा भागविण्यासाठीं कर्ज देण्याची व्यवस्था करावी हें स्वाभाविकच आहे. आणि मग गरजा भागविण्यासाठीं कर्ज काढणें हें आवश्यक आणि सोयीस्कर आहे असें लोकांना पटवून देण्याचा त्या समाजानें प्रयत्न करावा हें देखील क्रमप्राप्तच आहे. त्या समाजानें तसें केलें नाहीं तरच नवल. आज प्रत्यक्षांत समाज हीच गोष्ट करीत आहे. वस्तूंचे उत्पादन करणें आणि गरजांची जोपासना करणें हा जसा आधुनिक उत्पादनयंत्रणेचा भाग आहे त्याच प्रमाणें लोकांना कर्जे काढायला उद्युक्त करणें हा देखील तिचा एक भाग आहे. प्यूरिटन तत्वांचा त्याग करण्यांत आलेला नाहीं. आधुनिक व्यापार प्रक्रियेच्या प्रचंड सामर्थ्यांखालीं तीं चिरडलीं गेलीं आहेत इतकेंच.

ह्या सम्रग्र प्रक्रियकडे पाहिलें तर आपण अशी अपेक्षा करायला हरकत नाहीं कीं, जसजशी ग्राहकांच्या सेवनांत वाढ होईल तसतशी त्यांनीं काढलेल्या कर्जांची रक्कम देखील फुगत जाईल. कदाचित् सेवनाच्या मानानें ती अधिक प्रमाणांत फुगेल. आपलें राहणीचें मान जसजसें चढत जाईल तसतसें आपण कर्जांत अधिकाधिक खोल बूडत जाऊं. या बाबतींतला पुरावा आज चांगला भक्कम आहे. विसाव्या शतकाच्या दुसऱ्या दशकांत राहणीच्या मानांत जी वाढ झाली तिच्या बरोबर ग्राहकांच्या कर्जांत पुष्कळच अधिक प्रमाणांत वाढ झाली. तिसऱ्या दशकांत मंदीच्या खडयांतून जेव्हां आपण वर येत होतो तेव्हा देखील अशीच परिस्थिति होती. आणि दुसऱ्या जागतिक युद्धानंतर तर हा प्रकार फारच मोठया प्रमाणावर घडला आहे. १९५२ च्या अखेरीपासून १९५६ च्या अखेरीपर्यंतच्या पांच वर्षांत ग्राहकांचें एकंदर कर्ज २७४० कोटी डॉलर्सवरून ४१७० कोटी डॉलर्सवर गेलें. म्हणजे त्यांत ५३ टक्कयांनीं वाढ झाली. हप्तेबंदीने वस्तू विकून जें कर्ज दिलें जातें त्यांत ६३ टक्क्यांची वाढ झाली आणि मोटारी विकत घेण्यासाठीं दिलेल्या कर्जांत जवळ जवळ १०० टक्क्यांची वाढ झाली. हा काळ जरी अत्यंत भरभराटीचा होता तरी त्यांत व्यक्तींचें खर्च करण्याजोगें उत्पन्न फक्त सुमारे २१ टक्कयांनीं वाढलें.[1] ज्या कुटुंबाचे उत्पन्न ३००० ते ४००० डॉलर्सच्या दरम्यान होते त्यांच्या पैकीं २५ टक्के कुटुंबांनीं १९५५ सालीं प्रत्येकीं एक मोटारीची खरेदी केली आणि या पैकी ६९ टक्के कुटुंबांनीं या मोटारी उधारीवर घेतल्या. ज्या कुटुंबांचें उत्पन्न ४००० आणि ५००० डॉलर्सच्या दरम्यान होते त्यांतील एक तृतीयांशाहून अधिक कुटुंबांनीं प्रत्येकीं एक मोटार त्या वर्षी विकत घेतली आणि यापैकीं ६६ टक्के कुटुंबांनीं

१ इकॉनॉमिक इंडिकेटर्स (वॉशिंटन, यू. एस्. गव्हर्नमेंट प्रिंटिंग ऑफिस, जून १९५७).

मोटारींची खरेदी उधारीवर केली. ज्यांचे उत्पन्न १०,००० डॉलर्सहून अधिक होते अशा कुटुंबांत मात्र उधारीवर खरेदी करणाऱ्यांपेक्षां रोकड किंमत देऊन खरेदी करणाऱ्यांचे प्रमाण अधिक होते. १९५५ सालीं ज्यांनीं उधारीवर मोटारीं विकत घेतल्या त्यांच्यापैकीं ३० टक्के कुटुंबांनीं आपल्या आधीच्या मोटारी तशाच उधारीवर विकत घेतल्या होत्या. आणि ही उधारीची रक्कम त्यावेळीं पूर्णपणें फिटलेली नव्हती.[१]

इतक्या प्रचंड प्रमाणावर कर्जाची निर्मिती झाल्यामुळें सामाजिक जीवनांत किती ताण निर्माण झाले असतील असा विचार साहजिकच मनांत येतो. कृत्रिमरित्या निर्माण केलेल्या गरजांच्या मागोमाग बिलें येतात आणि हप्तेबंदीनें खरेदी करणाऱ्या लोकांच्या डोक्यावर हिवाळ्यातल्या हिमवृष्टीसारखा त्यांचा वर्षाव होतो. देशांतल्या लक्षावधि घरांतील मंडळींना हें माहीत असतें कीं, ही बिलें आलीं कीं, वस्तूंचा पुन्हां कब्जा मागणारा मनुष्य त्यांच्या मागोमाग येण्याची शक्यता असते. बिल कलेक्टर हीच सुखवस्तू समाजांतील सर्वांत महत्वाची व्यक्ति ठरणार कीं काय ?

१९५५ सालीं अमेरिकन कुटुंबाचे कर देण्यापूर्वीचें सरासरी उत्पन्न ३९६० डॉलर्स होते. ३००० ते ४००० डॉलर्सच्या दरम्यान ज्यांचें उत्पन्न होते अशा सर्व कुटुंबांपैकीं ४८ टक्के कुटुंबांना विकत घेतलेल्या वस्तूंच्या किंमतींचे हप्ते भरायचे होते. यापैकीं जवळ जवळ एकतृतीयांश कुटुंबांच्या करभरणीपूर्वीच्या उत्पन्नाचा एक पंचमांशाहून अधिक भाग हे हप्ते भरण्यांत खर्च होत होता. याहून खालच्या थरांतल्या म्हणजे २००० ते ३००० डॉलर्सच्या दरम्यान ज्यांचे उत्पन्न होतें अशा कुटुंबापैकीं ४२ टक्के कुटुंबांना हप्ते भरायचे होते. पुन्हां यांपैकीं ४२ टक्के कुटुंबांच्या उत्पन्नाचा निदान एकपंचमांश भाग ह्या हप्त्यांवर खर्च होत होता आणि दर नऊ कुटुंबांपैकी एक कुटुंब आपल्या उत्पन्नाचा ४० टक्के किंवा अधिक भाग बिलकलेक्टरच्या स्वाधीन करीत होतें.[२] ही परिस्थिति कितपत इष्ट होती तें प्रत्येकानें आपल्या मतानुसार ठरवायचे आहे. पण या परिस्थितींतून कांहीं आर्थिक धोके उद्भवतात ही वस्तुस्थिति आहे.

[३]

ज्या समाजांत उत्पादन करण्याच्या कौशल्यावरोबरच ते लोकांच्या गळ्यांत बांधण्याच्या कौशल्यांतहि वाढ व्हावी लागते त्या समाजाच्या बाबतींत एक शंका

१ ही सर्व माहीती 'कन्झ्युमर इन्स्टॉलमेण्ट क्रेडिट' या पुस्तकाच्या पहिल्या खंडांतील 'ग्रोथ ॲण्ड इम्पोर्ट' या लेखावरून घेतली आहे. (बोर्ड ऑफ गव्हर्नर्स, फेडरल रिझर्व्हसिस्टिम, वॉशिंगटन, डी. सी. १९५७).

२ वरील प्रमाणेंच, पृष्ठ ११०.

उपस्थित होते. ती अशीं कीं, सगळेच्या सगळे उत्पादन लोकांना विकत घ्यायला लावणें किती दिवस जमेल ? कारण उत्पादन हें जरी आत्मनाशक नसलें तरी वस्तूंची विक्री करण्याचा प्रयत्न आत्मनाशक होऊं शकेल. लवकरच असा एक दिवस उगवेल कीं, जेव्हां प्रत्येक विक्रेत्याचा आवाज सर्व विक्रेत्यांच्या कोलाहलांत बुडून जाईल. आधीपासून जें विक्री करायचे प्रयत्न चालू आहेत त्यामुळें माणसांची मनें बधीर होतील आणि मग सद्वर्तनाची प्रशस्ती व समाजवादावद्दलचे इशारे यांच्या प्रमाणेंच जाहीरातींचा देखील त्या बधीर मनांवर कांहींच परिणाम होणार नाहीं. वस्तूंच्या विक्रीसाठीं जो प्रचार होतो त्यापासून मिळणारे फळ क्रमाक्रमाने इतकें घटत जाईल कीं, अखेर या प्रचारावर अधिक खर्च केला तर त्याचा परिणाम शून्य होईल. सगळेच बोलत असल्यामुळें कोणालाच कांहीं ऐकूं येणार नाहीं आणि मग बोलणे हें कोणालाच फायद्याचे वाटणार नाहीं. मग सर्वत्र शांतता पसरेल आणि कदाचित् मधूनच जाहीरातींचा प्रचंड पण अल्पजीवी घोष त्या शांततेचा भंग करील.

अशी निर्वाणीची परिस्थिति जर कधी काळी निर्माण झाली तर तिच्यांतून आर्थिक पुनर्रचनेचे कांहीं वेधक प्रश्न निःसंशय उपस्थित होतील. जाहीरातींचा ज्याच्या मनावर कांहींच परिणाम होऊं शकत नाहीं अशीं माणसें आपलें उत्पन्न बँकेत ठेवतील आणि आपली कर्जे फेडून टाकतील. अशा रितीनें ग्राहकांच्या बचतींत वाढ होईल. ही बचत जितक्या प्रमाणांत वाढेल तितक्या प्रमाणांत इतरत्र जर खर्चांत वाढ झाली नाहीं तर समाजाच्या एकंदर खर्चांत घट होईल. आणि अशी घट झाली कीं, अर्थव्यवस्थेचें एकंदर उत्पादन देखील कमी होईल. समाजाच्या खर्चांत ही जी इतरत्र वाढ व्हायला हवी ती कांहीं उद्योगधंद्याच्या क्षेत्रांत होणार नाहीं. कारण ज्यावेळीं जाहीरात परिणामशून्य ठरेल आणि वस्तूंच्या विक्रीची वाढ खुंटेल, त्यावेळीं उद्योगचालक उत्पादन वाढविण्यासाठीं अधिक भांडवल खात्रीनें गुंतविणार नाहीं. या परिस्थितिचा आणखी एक अनिष्ट परिणाम असा होईल कीं, बेकारी वाढेल आणि लोकांचे उत्पन्न कमी होईल. थोडक्यांत म्हणजे, उत्पादनावर जी आधारलेली असते ती सामाजिक सुरक्षितता पुष्कळशा प्रमाणांत नष्ट होईल.[१]

---

१ जाहीरात आणि विक्रीकला ह्या गरजा निर्माण करण्यांत किती महत्वाचा भाग घेतात या गोष्टींना सांकेतिक शहाणपणानें आवश्यक ते महत्व दिलेलें नाहीं आणि त्याचप्रमाणें या गरजांच्या निर्मितीवर आपण किती अवलंबून असतो त्याचा देखील सखोल विचार केलेला नाहीं. याला पॉल माझर हे अपवाद आहेत आपल्या 'द स्टॅण्डर्टस् वी रेंज' (न्यू यॉर्क, हार्पर, १९५३) या पुस्तकांत त्यांनीं उघड उघड मूर्तीभंजन केलें आहे. त्यामुळें अभ्यासकांनीं त्यांच्या पुस्तकाकडे दुर्लक्ष केलें हें खरें पण जाहीरात आणि तत्संबंधीत इतर गोष्टी यांना आधुनिक जीवनांत कोणतें स्थान आहे तें स्पष्ट करण्यांत त्यांना पुष्कळच यश आलें आहे.

अशा परिस्थितींत ग्राहकांच्या कर्जाच्या बाबतींत जे धोके उपस्थित होतील त्यांचें स्वरूप अधिक सोपें असेल. खरे म्हणजे हे धोके कोणते तें आपल्याला आतांच सांगता येईल. सांकेतिक शहाणपणानें देखील ह्या धोक्यांची अंशतः दखल घेतली आहे. आणि त्यावरोवरच असाहि दिलासा दिला आहे कीं, या बाबतींत काळजी करण्याचें कारण नाहीं.

गरजांच्या निर्मितीवरोवर जसजशी आपण ग्राहकांच्या कर्जांत वाढ करतो तसतसे या कर्जांच्या वाढीवर आपण अवलंबून राहूं लागतो. कर्जाची वाढ जर खुंटली तर त्यामुळें वस्तूंच्या मागणींत घट होते. ह्या कर्जांत वाढ करीत रहाण्याचें कांहीं मार्ग आहेत पण त्यांचा उपयोग सतत करीत रहाणें अशक्य असतें. कर्जाची कालमर्यादा वाढवितां येते. परंतु अखेर अशीं परिस्थिति निर्माण होते कीं, ज्या वस्तूंच्या तारणावर कर्ज दिलेलें असतें त्यांच्या आयुर्मर्यादेपेक्षां कर्जाची कालमर्यादा अधिक होते. तसेंच वस्तू विकत घेतांना तिच्या किंमतीचा जो हिस्सा द्यायचा असतो तो कमी कमी करतां येतो. पण या बाबतीतदेखील अखेर गोष्टी अशा थराला जातात कीं, ग्राहकाचे फारच थोडे पैसे त्या खरेदी केलेल्या वस्तूंत गुंतून पडतात आणि त्यामुळें एवढे मोठे कर्ज फेडत वसण्यापेक्षां त्या वस्तूचाच कब्जा विक्रेत्याला पुन्हां देणें ग्राहकाच्या दृष्टीनें अधिक सोयीस्कर ठरते. कर्ज फेडण्याची ज्यांची कुवत वेताची आहे अशा ग्राहकाना कर्ज देतां येते. पण या बाबतींत देखील अशी एक मर्यादा येते कीं, ज्यापुढें कर्ज फेडण्याची इच्छाच नसलेले लोक शिल्लक रहातात. आणि अशा लोकांना कर्ज देण्यास नकार द्यावा लागतो.

१९५५ सालीं मोटारींच्या विक्रीवावत खूपच चढाओढ झाली. त्या लोकांनीं विकत घ्याव्यात यासाठीं त्यांच्या हप्त्यांची मुदत वाढविण्यांत आली. १९५४ सालीं सरासरीनें पाहतां हे हप्ते २४.५ महिन्यांत पुरे करावे लागत असत. १९५५ सालीं ही कालमर्यादा २८ महिन्यांवर नेण्यांत आली. मोटारींच्या किरकोळ विक्रीच्या किंमतींत जरी वरीच वाढ झाली असली तरी सुरवातीला भरायची रक्कम पूर्वी इतकीच ठेवण्यांत आली. हप्तेबंदीने मोटार घेतली कीं, सरासरीनें १९६० डॉलर्सचे कर्ज १९५४ सालीं ग्राहकाला देण्यांत येत असे. १९५५ सालीं ती रक्कम २२४० डॉलर्स करण्यांत आली.[1] १९५५ सालीं हप्तेबंदीनें विकलेल्या मोटारींवर दिलेल्या कर्जांत ३६० कोटी डॉलर्सची वाढ झाली.

ही वाढ अशीच चालू ठेवणें शक्य नव्हते. पुढील वर्षी कर्जाच्या अटी अधिक सैल करण्यांत आल्या परंतु तरी देखील कर्जाच्या वाढीची गती कमी झाली. त्या-

१ द स्टॅण्डर्डस वी रेझ, पृष्ठ १२८.

मुळें जरी ग्राहकांचे खर्चास उपलब्ध असलेलें उत्पन्न वाढत होतें तरी मोटारींच्या विक्रींत घट झाली. १९५५ सालीं ७९ लक्ष मोटारींची विक्री झाली होती. परंतु १९५६ सालीं ती विक्री ५८ लक्षावर आली. सर्वत्र जरी भरभराट होती तरी मोटारी निर्माण करणाऱ्या प्रदेशांत बरीच बेकारी झाली.

वरील उदाहरणावरून असें दिसून येतें कीं, हाच प्रकार अधिक मोठ्या प्रमाणावर घडूं शकेल आणि त्याचे गंभीर परिणाम होऊं शकतील. हा धोका किती मोठा आहे त्याचा निश्चित अंदाज बांधणें अवघड आहे. परंतु उत्पादक किंवा ग्राहक यांनीं घेतलेल्या कर्जांमुळे आर्थिक जीवनांत बरीच अनिश्चितता निर्माण होते, हा अर्थशास्त्राचा एक विश्वसनीय सिद्धान्त आहे. ज्यावेळीं उत्पन्न आणि रोजगारी यांची पातळी उंच असते आणि एकंदर वातावरण आशादायक असते त्यावेळीं कर्ज देणारे आणि कर्ज घेणारेहि अधिक प्रमाणांत व्यवहार करतात ही गोष्ट पूर्वीपासून सर्वांना माहीत आहे. त्यांच्या या व्यवहारांद्वारे जो पैसा खर्च होतो त्यामुळें एकंदर समाजाच्या क्रयशक्तींत वाढ होते. ज्यावेळी तशी खरोखर आवश्यकता नसते अशा वेळी वाढ होते. जेव्हां परिस्थिति इतकी आशादायक नसते तेंव्हा कर्जें अधिक जपून दिलीं जातात. नवी कर्जें घेऊन पैसा खर्च करण्याऐवजी जुन्या कर्जांची परतफेड करण्यांत येते आणि हें देखील अगदी नको त्यावेळीं घडतें.

पूर्वी कर्जें घेतली जात असत तीं मुख्यतः उद्योगधंद्यांत भांडवल गुंतवण्यासाठीं. त्यामुळें असें मानलें जात असे कीं, समाजांतील तीन प्रकारच्या खर्चापैकीं उद्योगधंद्यावर होणारा खर्च हा अत्यंत अस्थिर असतो. त्यामानानें ग्राहकांचा खर्च आणि सरकारी खर्च अधिक स्थिर स्वरूपाचा असतो. "रोजगारींत जे चढ उतार होतात ते मुख्यतः भांडवलाच्या उभारणीसाठीं कामावर घेतलेल्या मजूरांची मागणी कमीजास्त झाल्यामुळें. ही भांडवलाची उभारणी मुख्यतः बांधकामांच्या स्वरूपांत केली जाते [१]" '...उत्पन्न, उत्पादन आणि रोजगारी यांच्यांत जे चढउतार होतात ते भांडवलाचा निवेश कमी अधिक झाल्यामुळें. त्याचप्रमाणें या निवेशांत होणाऱ्या फेरफारामुळें सेवनांत देखील वाढ किंवा घट होत असते.' [२] ग्राहकांच्या कर्जांत

१ अे. सी. पिगू, 'इन्कम' (लंडन, मॅकमिलन्, १९४६) पृष्ठें ८९–९०.

२ अॅलविन् एच्. हॅन्सेन, 'बिझिनेस सायकलस् अॅण्ड नॅशनल इन्कम' (न्यूयॉर्क, नॉर्टन, १९५१), पृष्ठ १७. प्रो. हॅन्सेन यापुढें असेंहि म्हणतात, कीं, मोटारीं अन्य टिकावूं ग्राहकोपयोगी वस्तू यामुळेंदेखील स्वतंत्रपणें आर्थिक चढउतार निर्माण होऊं शकतात. ह्या ग्राहकोपयोगी वस्तूंमुळेंच मुख्यतः कर्जांची निर्मिती होते.

वाढ झाल्यामुळें ग्राहकांच्या खर्चाविषयी देखील अनिश्चितता निर्माण होते. आणि ह्या अनिश्चिततेची उद्योगधंद्यावर होणाऱ्या खर्चांत जे चढउतार होत असतात त्यांत भर पडते. ग्राहकांच्या खर्चांत होणारें हे चढउतार अधिक तीव्र स्वरूपाचे असण्याची शक्यता असते. कारण वस्तू विकण्याच्या चढाओढीमुळें ग्राहकांच्या कर्जाच्या अटी अधिक सैल केल्या जातात. वस्तूंच्या खरेदीच्यावेळीं किंमतीचा जो पहिला हप्ता भरावा लागतो तो कमी केला जातो आणि कर्जफेडीची कालमर्यादा वाढविली जाते. उद्योगधंद्यासाठीं जें भांडवल कर्जाऊं दिले जाते त्याच्याबाबतींत असें होण्याची शक्यता कमी असते.

ते कांही असले तरी इतके मात्र खरे कीं, ज्यावेळी तशीं गरज नसते त्यावेळीच ग्राहक अधिक कर्जे काढतील आणि त्याच्या द्वारें आपल्या चालूं खर्चांत वाढ करतील. त्यामुळे मुद्रास्फिती अधिकप्रमाणांत होईल. तसेच ज्या कुटुंबाच्या उत्पन्नाचा २० किंवा ४० टक्के भाग हप्ते भरण्यावर खर्च होत असतो त्या कुटुंबातल्या एक किंवा अधिक मिळवत्या माणसांच्या जर नोकऱ्या गेल्या तर त्या कुटुंबाला आपला चालूं खर्च खूपच कमी करावा लागेल. त्यामुळें जर बेकारी वाढलेली असली आणि तिच्यांत वाढ होण्याची जर धास्ती निर्माण झाली असली तर सगळेच ग्राहक नवीं कर्जे घेण्याचें टाळूं लागतील आणि जुनी कर्जे फेडण्याचा प्रयत्न करतील. याचा परिणाम म्हणून ग्राहकांचा खर्च अधिकच कमी होईल. त्यामुळें रोजगारीदेखील कमी होईल. मग ग्राहक कर्जे घेणें कमी करतील आणि कर्जांची परतफेड करण्याचा अधिक जोरदार प्रयत्न करतील. ह्या एकंदर प्रकाराचे आर्थिक परिणाम फार गंभीर व दुःखकारक होतील.

[४]

कांहीं व्यक्तींना आपल्या समाजांत जे विशिष्ट स्थान असते. त्यामुळें त्याना एक विशेष अधिकार प्राप्त होतो. ज्या गोष्टी स्वभावतःच अज्ञेय असतात त्यांवद्दल ते निश्चित विधानें करूं शकतात. एखादा उद्योगपती आणि एखादा कॉलेजचा प्रेसिडेण्ट यांना अशा प्रकारचे खास अधिकार असतात. एखाद्या सार्वजनिक अधिकाराच्या स्थानासाठीं जो मनुष्य उमेदवार म्हणून उभा असतो त्याला देखील असेच अधिकार असतात. एक प्रकारच्या धोरणामुळे खूप भरभराट होईल आणि दुसऱ्या प्रकारच्या धोरणामुळे संपूर्ण नाश होईल असें तो स्पष्टपणानें आणि खात्रीपूर्वक सांगूं शकतो. कांहीं विशिष्ट धोरणांचा अंगिकार केला तर आपले जीवित व स्वातंत्र्य यावत्काल सुरक्षित राहतील, आणि वेगळी धोरणें अंगिकारली तर आपला सर्वनाश होईल असे सरकारी सचिव (सेक्रेटरीज् ऑफ स्टेट) आपल्याला

सांगूं शकतात. ज्यांना आपण द्रष्टे मानतो त्यांना सर्वच बाबतींत एक खास अधिकार असतो. त्यांना त्या विशिष्टवेळी जे धोरण स्विकारणें उपयुक्त वाटतें ते धोरण म्हणजे जणूं मुक्तीचा मार्ग आहे असें ते म्हणूं शकतात. अर्थशास्त्रज्ञाना ह्या इतर व्यक्तींच्या मानानें समाजांत कमी प्रतिष्ठा असते तरी देखील सध्यांच्या जीवनांतील कोणत्या प्रवृत्तीमुळें पुढें संकटें निर्माण होण्याची शक्यता आहे तें सांगण्याचा अधिकार अर्थशास्त्रज्ञांना आहे. तेव्हा ग्राहकांच्या कर्जात बेसुमार वाढ करून ग्राहकांची मागणी स्थिर ठेवण्याचा जो प्रयत्न सध्यां चालूं आहे त्याचे पुढे अत्यंत गंभीर परिणाम होतील असे भाकीत केले तर ते अप्रस्तुत ठरणार नाहीं.

फेडरल रिझर्व्ह सिस्टिमच्या बोर्ड ऑफ गव्हर्नर्सनें १९५६ सालीं ग्राहकांच्या कर्जाबाबत एक अहवाल तयार केला. त्यांत त्यांनीं पुढील प्रमाणे निष्कर्ष काढला आहे : 'जे ग्राहक अल्पमुदतीची आणि मध्यम मुदतीची हप्तेबंद कर्जे घेतात त्यांच्या सांपत्तिक स्थितींत सुरक्षिततेची कक्षा किती मोठी असते त्याबद्दल विशेष माहिती उपलब्ध नाही.....गेल्या दोन दशकांत कर्जाच्या अटी अधिक सैल करण्याकडे प्रवृत्ती आहे. त्यावरून असे अनुमान काढतां येते कीं, या सुरक्षाकक्षा आतां पूर्वीपेक्षां संकुचित झाल्या आहेत.' यापुढे त्या अहवालांत असा इशारा दिला आहे, कीं, 'ह्या कर्जाची एकाएकी आणि मोठ्याप्रमाणावर परतफेड होण्याची अगदींच शक्यता नाहीं असे म्हणतां येणार नाहीं.' असा इशारा दिल्यानंतर मात्र त्याबाबतींत काय उपाययोजना करायला हवी तें अहवालांत सांगितलेले नाहीं.

खरे म्हणजे असा धोका किती प्रमाणांत आहे तें आपल्याला निश्चितपणें माहीत नाही. ह्या ग्राहकांच्या कर्जाची जर परतफेड व्हायला लागली आणि त्यामुळे जर चालूं खर्च कमी झाला तर त्यावर उपाय म्हणून त्वरित आणि मोठ्या प्रमाणावर सरकारी करांचा बोजा कमी करणे आणि सरकारी खर्चांत वाढ करणे शक्य आहे. असे केले म्हणजे इतर खर्चांत वाढ होईल आणि त्यामुळे ग्राहकांच्या खर्चांतील घटीची भरपाई होईल. परंतु ही उपाय योजना करण्यास मानसिक आणि शासकीय कारणांमुळे विलंब होण्याची शक्यता आहे. कांहीं न करतां स्वस्थ राहायचे आणि परिस्थिति आपोआप सुधारते का पाहायचे ही वृत्ती आर्थिक धोरणांच्या बाबतींत आपल्या मनांत खोलवर रूजलेली आहे. आणि या वृत्तीची अर्थशास्त्रज्ञांनीं फारशी दखल घेतलेली नाही. जेव्हा उत्पन्न घटत असते तेव्हा प्राप्तिकरांत देखील आपोआपच घट होते. त्याचप्रमाणे सामाजिक सुरक्षिततेच्या योजनांनुसार होणाऱ्या खर्चांत व शेतकऱ्यांना दिल्या जाणाऱ्या पैशांत देखील आपोआपच वाढ होत असते. परंतु जे कर आणि जे खर्च या स्वयंचलीत स्थैर्यस्थापकांच्या कक्षेबाहेरचे असतात त्यांत

फेरफार करण्यासाठीं सरकार आणि कायदेमंडळ यांना प्रत्यक्ष कृति करावी लागते. आणि शक्यता अशी आहे कीं, जितक्या वेगानें कर्जांची परतफेड होऊन ग्राहकांच्या खर्चांत घट होईल तितक्या वेगानें यावावतींतले सरकारी निर्णय घेतले जाणार नाहींत आणि उपाय योजना केली जाणार नाही.

[५]

आपल्या समाजांत वस्तूंचे उत्पादन आणि विक्री यांना फार महत्व आहे. त्यामुळे ग्राहकोपयोगी वस्तूंची विक्री आणि त्यासाठी दिले जाणारे कर्ज यांच्यावर वंधन घालणारी उपाययोजना आपल्या समाजांत नाखूपीने केली जाईल. ग्राहकांना ज्या अटीवर कर्जे दिली जातात त्या अटी सैल करण्याच्या चढाओढीवर निर्वध घालण्यास फार कडक विरोध होईल. आर्थिक स्थैर्य आणि सुरक्षितता संभाळण्याच्या दृष्टीने अशा प्रतिवंधक उपाय योजनेचे महत्व फार मोठे आहे. या उपाय योजनेमुळे मागणी आणि क्रयशक्ती यांच्या कृत्रिम निर्मितीला इष्ट तो लगाम वसेल आणि उत्पादन व रोजगारी यांच्या स्थैर्याला ढळ पोहोचण्याची शक्यता कमी होईल. ग्राहकांना दिल्या जाणाऱ्या कर्जांच्या अटींवर पूर्वी युद्धकाळांत नियंत्रण घालण्यांत आले होते. परंतु आज तसे नियंत्रण घालण्याचा अधिकार युनायटेड स्टेटस्च्या सरकारला नाही. युनायटेड किंग्डममध्ये मात्र सरकारने असे नियंत्रण करणे ही नित्याची गोष्ट झाली आहे.

या परिस्थितिवर जो विशेष प्रभावी तोडगा आहे तो अधिक मूलगामी स्वरूपाचा आहे. सर्वच वस्तूंची आणि सोयींची विक्री कांहीं हप्तेवंदीनें होत नाहीं आणि त्यामुळे त्या विक्रीशी विलकलेक्टरचा देखील संवंध येत नाही. मोटारी, रेडियो, मोठाले गालीचे यांची विक्री हप्तेवंदीने होते. परंतु शाळा, रुग्णांलयें आणि सार्वजनिक ग्रंथालयें यांच्याद्वारें ज्या सुविधा उपलब्ध होतात त्यांची विक्री अशा प्रकारे होत नाही. ज्याप्रमाणांत एखादी अर्थव्यवस्था पहिल्या प्रकारच्या वस्तूंच्या उत्पादनावर भर देते त्या प्रमाणांत गरजा व कर्जे यांच्या निर्मितीमुळे तिच्यांत अस्थैर्य येतें. परंतु आरोग्य, शिक्षण आणि अशाच इतर सुविधा निर्माण करण्यासाठीं जर त्या अर्थव्यवस्थेनें आपल्या सामर्थ्याचा उपयोग केला तर ही अनिश्चितता कमी होते. कांहीं विशिष्ट प्रकारच्या उत्पादनाचेच आपल्याला महत्व वाटतें हें आपण पाहिलेलेच आहे. त्यांच्या कांहीं गुणविशेषामुळे म्हणा किंवा परंपरेमुळे म्हणा, ज्या वस्तूंचे उत्पादन खाजगी क्षेत्रांत होतें त्या वस्तूंकडेच आज आपण विशेष लक्ष पुरवितो. याचाच अर्थ असा कीं, ज्या वस्तूंमुळें अधिकाअधिक अस्थैर्य निर्माण होतें त्या वस्तूंच्या उत्पादनासाठीच आपण आपल्या शक्ती विशेष करून वापरतो.

हा प्रयत्न इतक्या थराला जातो कीं, गरजांची निर्मिती करण्याचीच प्रक्रिया बंद पडण्याची शक्यता निर्माण होते. अशा परिस्थितींत ज्या गोष्टींचे उत्पादन सार्वजनिक क्षेत्रांत होते त्यांच्यासाठी जर आपल्या साधनाचा आपण अधिक प्रमाणांत उपयोग केला आणि अशा रितीनें आपल्या गरजा जर आपण कांहींशा वेगळ्या प्रकारे भागविल्या तर त्यामुळे आपल्या अर्थव्यवस्थेस पुष्कळच अधिक स्थैर्य येईल. आणि कदाचित् असेंहि होईल कीं, उत्पादनास अधिक स्थैर्य लाभल्यामुळे खाजगी क्षेत्रांतल्या एकंदर उत्पादनांतहि वाढ होईल. हा विरोधाभास वाटतो खरा. पण अर्थशास्त्रांत असे विरोधाभास अनेक आहेत.

परंतु आपण पुन्हां जरा पुढे उडी मारली आहे. ज्या समाजांत वस्तूंच्या उत्पादनाला सर्वांत अधिक महत्व दिलें जातें आणि तें उत्पादन वाढविण्यासाठीं उपाय योजतांना जो समाज तारतम्य ठेवीत नाही (म्हणजे त्यासाठीं जो समाज मोठ्या प्रमाणावर जाहीरातबाजी करून लोकांना मोठ्या प्रमाणावर कर्जबाजारी व्हायला प्रवृत्त करतो.) त्या समाजांत कोणते ताण निर्माण होण्याची आणि त्याच्यावर कोणती संकटें कोसळण्याची शक्यता आहे त्याचाच आपल्याला सध्यां तरी विचार करायचा आहे. अशा समाजांत दुसऱ्या एका प्रकारचा जो ताण निर्माण होतो तिकडे आतां आपण वळूं या.

प्रकरण पंधरावें

मुद्रास्फिती

मानवी इतिहासांत जेव्हां जेव्हां युद्धें, सामाजिक अस्वास्थ दुष्काळ किंवा अशींच अन्य प्रचंड संकटें कोसळतात तेव्हां तेव्हां त्यांच्या जोडीला मुद्रास्फिती (Inflation) देखील होते. अलिकडच्या काळांत मुद्रास्फितीला नवे वळण लागले आहे. शांततेच्या आणि वाढत्या भरभराटीच्या काळांत देखील तिचें अस्तित्व कायम रहाते. ही प्रवृत्ती युनायटेड स्टेट्समध्यें दुसऱ्या जागतिक युद्धानंतरच्या काळांत विशेष प्रमाणांत आढळून येते. ह्या काळांत पोलाद आणि पोलादाच्या वस्तू, यंत्र सामुग्री, यंत्रोत्पादक यंत्रें, शेतीची अवजारें, लोखंडेतर धातू इत्यादी अनेक वस्तूंच्या किंमतींत सतत वाढ झाली. विसाव्या शतकाच्या पन्नाशीच्या मध्यावर पोलादाच्या किंमती इतक्या गतीनें वाढत होत्या कीं, तितक्या गतीने जर त्या वाढत राहिल्या असत्या तर दर दशकांत त्या दुप्पट झाल्या असत्या. १९५५ आणि १९५६ या सारख्या वर्षांत राहणीचा खर्च दर महिन्याला सतत वाढत होता.

या सतत होणाऱ्या मुद्रास्फितीबद्दलची जनतेची प्रतिक्रिया मोठी वेधक आहे. या मुद्रास्फितीबद्दल खेद व्यक्त करण्यांत आला आहे आणि तिचा धिक्कारहि करण्यांत आलेला आहे. दोन्हीं पक्षांतल्या राजकीय कार्यकर्त्यांनीं तिच्या विरूद्ध ठाम भूमिका घेतली आहे. परंपरानिष्ठ लोक पूर्वीपासून स्वत:ला 'सच्च्या डॉलरचे' पुरस्कर्ते समजतात आणि आपल्या भूमीकेतल्या या तत्वावर ते अजूनहि भर देत असतात. उद्योगधंदे, बँका, विमाव्यवसाय आणि अन्य सर्व क्षेत्रांतले चालक मुद्रास्फिती सतत चालूं रहाणे धोक्याचे आहे असा इषारा देत असतात. इकडे उदारमतवादी लोक या बाबतींत परिणामकारक उपाय योजना न झाल्याबद्दल खेद व्यक्त करतात. पण ही उपाययोजना कोणती तें मात्र ते सांगत नाहीत. स्पर्धा कायदेशीर असते हें एक तत्त्व सोडल्यास सांकेतिक शहाणपणाचे जर कोणत्या बाबतींत एक मत असेल तर ती गोष्ट म्हणजे किंमतींच्या स्थैर्याचे महत्व. परंतु या बाबतींत जरी असें ठाम एक मत असलें तरी हा प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न फारच अल्पप्रमाणांत झालेला आहे आणि तो कसा सोडवावा या बाबतींत देखील फार थोड्या सूचना करण्यांत आलेल्या आहेत. जेव्हां मुद्रास्फितीचा प्रश्न उपस्थित होतो तेव्हां त्या बाबतींत कांहीं न करता नुसते बोलणेच बहुतेकांना सोयीस्कर वाटतें. मुद्रास्फितीच्या बाबतींत ज्या उपाययोजना परिणामकारक ठरूं शकतील त्या सर्व अनिष्ट आहेत असें सांकेतिक शहाणपणाच्या सर्व शाखांचें एकमत आहे.

[२]

ह्या वांझोट्या भूमिकेच्या मागें अनेक कारणें आहेत. एक असें कीं, कांहीं लोकांचा मुद्रास्फितीमुळें व्यावहारिक फायदा होतो. ते देखील आपली प्रतिष्ठा सांभाळण्यासाठीं मुद्रास्फितीला विरोध करतात. परंतु हा विरोध तकलादू असतो. आणखी एक कारण असें कीं, निष्क्रीयतेचे किंवा चालढकलीचे धोरण पुष्कळांना मोयीचें वाटतें. याच्या मागें केवळ अकरणात्मक वृत्ती आहे असे जे मानले जाते किंवा आरोप केला जातो तो योग्य नाही. एकोणीसाव्या शतकांत लोकांच्या डोळ्यांसमोर स्पर्धानिष्ठ अर्थव्यवस्थेचा एक नमुना होता आणि अशा अर्थव्यवस्थेंत उत्पादनाचे चढ-उतार सतत होत रहाणार असें तेव्हां गृहीत धरलेलें होतें. भरभराटीच्या काळांत किंमती वाढायच्या आणि उत्पादनाचा संकोच होऊं लागला कीं, त्या खालीं घसरायच्या. किंमतींचे हे हेलकावे विशिष्ट मर्यादेच्या पलीकडे जाणार नाहींत असा त्यावेळीं समज होता. त्यामुळें किंमती वाढूं लागल्या तर स्वस्थ राहण्याकडेच तेव्हां प्रवृत्ती होती. कांही वेळानें उलटा हेलकावा सुरूं होई आणि किंमती पडायला लागत.

कालांतरानें किंमतींतले हेलकावे स्वयंनियंत्रित असतात या कल्पनेवरचा विश्वास पुष्कळसा ढासळला. आर्थिक संकोचाच्या किंवा मंदीच्या परिस्थितिवाबत ही गोष्ट विशेष प्रमाणांत घडली. महामंदीने तर ही कल्पना जमीनदोस्त करून टाकली. विसाव्या शतकाच्या तिशीच्या सुरवातीपर्यंत देखील सांकेतिक शहाणपणाची भूमिका अशी होती कीं, मंदी आली कीं, अर्थव्यवस्थेंत कोणतीहि ढवळाढवळ न करतां स्वस्थ वसणें हेंच योग्य धोरण. परंतु आतां मात्र मंदीच्या काळांत सरकारी हस्तक्षेप अपरिहार्य आहे असें मानलें जातें.

परंतु मुद्रास्फिती आणि वाढत्या किंमती यांना आपोआपच आळा बसतो, या जुन्या कल्पनेवर मात्र तितकाच नाटचपूर्ण हल्ला चढवला गेला नाहीं. मंदी आपोआप नष्ट होते या कल्पनेवर हल्ला चढविण्यांत केन्सनें पुढाकार घेतला. त्यानें असें दाखवून दिलें कीं, ज्या पातळीवर कांहीं प्रमाणांत बेकारी शिल्लक असते अशा पातळीवरच अर्थव्यवस्था स्थिरावण्याची शक्यता अधिक आहे. अनेकांनीं त्यांची बाजू उचलली आणि राजकीय कार्यकर्ते व जनता यांना ती पटविण्याचा प्रयत्न केला. परंतु शांततेच्या काळांत किंमतींची सतत वाढ होत राहण्याची शक्यता आहे या कल्पनेला मात्र केन्ससारखा खंदा पुरस्कर्ता लाभला नाहीं.

त्यामुळे लोकांना असा विश्वास किंवा खरे म्हणजे आशा वाटते कीं, शांतताकालीन मुद्रास्फितीला आपोआपच आळा बसेल. या बाबतींत परंपरानिष्ठांना देखील फारशी खात्री वाटत अशांतला भाग नाहीं. परंतु अलिकडच्या काळांत

अशी एक भावना निर्माण झाली आहे कीं, प्रामाणिक आणि पापभीरू माणसांच्या हातांत जर अर्थव्यवस्थेची सूत्रें दिलीं तर तिचे व्यवहार इष्ट त्या प्रकारें चालतील. यामुळें किंमतीची वाढ आपोआप थांबेल अशा अपेक्षेनें स्वस्थ बसण्याची प्रवृत्ती वळावली आहे. उदारमतवाद्यांच्या बाबतींत अशी अपेक्षा असते कीं, मुद्रास्फितीला आळा घालण्यासाठीं कांहींतरी करायला हवें असा त्यांनीं आग्रह धरावा. मग काय करायला हवें तें त्यांनीं निश्चितपणें सांगितले नाहीं तरी चालते. परंतु त्यांना देखील प्रत्यक्षांत कांहीं न करता स्वस्थ बसण्याचा मोह होतो.

निष्क्रीयतेची ही जी प्रवृत्ती आहे तिला आणखी एका विचाराचें पाठबळ मिळतें. तो असा कीं, अमेरिकन अर्थव्यवस्थेला सर्वांत जास्त धोका जर कशापासून असेल तर तो मंदीपासून. विसाव्या शतकाच्या नंतर ह्या कल्पनेचा लोकांच्या मनावरचा पगडा जरी कमी झालेला असला तरी ती अजून नष्ट झालेली नाहीं. आतां मंदीचें संकट अर्थव्यवस्थेवर कोसळण्याची जरी अल्पशी देखील शक्यता असली तरी ती मुद्रास्फितीचें नियंत्रण करण्यापासून लोकांना परावृत्त करते कारण मुद्रास्फिती थांवविण्याचा प्रयत्न केला तर एखाद्या वेळीं सारी अर्थव्यवस्थाच कोसळून पडण्याची किंवा निदान लाखो मजूर वेकार होण्याची शक्यता असते. वाढत्या किंमतीपेक्षां हें संकट खूपच भयावह असते. आणि म्हणून ज्यामुळें तें कोसळेल असे उपाय योजायला आपण नेहमीच नाखूष असतो. मुद्रास्फितीवरील कांहीं उपाययोजनांमुळें हें संकट कोसळण्याची शक्यता असते. निदान उपाय-योजनांना या बाबतींत दोषी ठरविणें शक्य असतें.

ज्या गोष्टींमुळें मुद्रास्फितीचा प्रश्न विशेष विकट होऊन बसला आहे त्या गोष्टींची पाळेंमुळें खरें म्हणजे आपल्या सामाजिक जीवनांत खोलवर गेलेलीं आहेत. आर्थिक सुरक्षितता निर्माण व्हावी म्हणून आपल्याला अर्थव्यवस्थेंतील उत्पादनाची पातळी उंच ठेवावी लागते. इतकी उंच कीं, ती तेथें स्थिर रहाणें शक्य नसतें आणि उत्पादन त्या पातळीवर असलें कीं, किंमती सारख्या वाढत राहणें ही एक नित्याची गोष्ट होऊन वसते. जे उपाय ही भाववाढ परिणामकारकपणें रोखूं शक-तील त्याच्यामुळें उत्पादनावर अनिष्ट परिणाम होण्याची शक्यता असते. आणि हें उत्पादन तर आर्थिक सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक असतें. कधीं कधीं या उपाय योजना आणि आपले कांहीं आर्थिक दृष्टिकोन याच्यांत विरोध निर्माण होतो. ह्या दृष्टिकोनांनुसार आर्थिक विकासाला आणि खुल्या बाजारपेठांना फार महत्व असतें. या गोष्टींमुळें उत्पादनाच्या साधनांचा अधिक कार्यक्षमतेने उपयोग करतां येतो. या परिस्थितींत आणखी एका कल्पनेमुळें म्हणा, आशेमुळें म्हणा किंवा श्रद्धेमुळें म्हणा भर पडली आहे. ही श्रद्धा अशी कीं, उत्पादन व मुद्रास्फितीवरील उपाययोजना

यांमधील झगडा टाळतां येण्यासारखा आहे. तो टाळण्याचा मार्ग म्हणजे पैशाच्या पुरवठ्याचें नियंत्रण करणें. या नियंत्रणाला अर्थशास्त्रज्ञ द्रव्यविषयक धोरण असें म्हणतात.

आतां आपण मुद्रास्फितीचें स्वरूप आणि परिणाम यांचा विचार करूं आणि या मुद्रास्फितीमुळें जे संघर्ष निर्माण होतात ते द्रव्यविषयक धोरणाच्या द्वारें कसे ना कसे टाळतां येणें शक्य आहे ही जी आशा आज विशेष बलवत्तर झाली आहे तिचा अभ्यास आपण पुढील प्रकरणांत करूं. त्यानंतर आर्थिक सुरक्षितता, आर्थिक विकास आणि खुल्या बाजारपेठा इत्यादि ज्या गोष्टीनां आपण महत्व देतो त्यांच्यांत आणि मुद्रास्फितीवरील इतर उपाययोजनांत जो विरोध आहे त्याचें आपण विवेचन करूं.

[३]

उत्पादनाची पातळी जेव्हां उंच असते त्याच वेळीं मुद्रास्फिती होण्याची आणि किंमती सतत वाढत रहाण्याची शक्यता असते. उपलब्ध यंत्रसामुग्री व श्रमशक्ति[१] याची जी कमाल उत्पादन क्षमता[२] असते तिचा जवळ जवळ पूर्णपणें उपयोग करायला लागावा इतकी जेव्हां अर्थव्यवस्थेंतील मागणी असते तेव्हांच मुद्रास्फिती होऊं

---

१ ज्यावेळी उत्पादनांत आणखी थोडा जरी वाढ केली तरी त्यामुळें अल्पकालीन सीमागत उत्पादन खर्च एकदम वाढतो त्यावेळी यंत्रसामुग्रीचा कमाल उपयोग केला जात आहे असें आपल्याला म्हणतां येतें. यंत्रसामुग्रीमध्यें वाढ केल्यानंतर जो दीर्घकालीन उत्पादन खर्च होत असतो त्यापेक्षां हा उत्पादन खर्च अधिक असतो. ज्यावेळी श्रमशक्ति मिळविण्याकरितां इतका खर्च करावा लागतो कीं, त्यामुळें सीमागत उत्पादन खर्च एकदम खूप वाढतो, त्यावेळीं श्रमशक्तींचा पूर्णपणें उपयोग केला जात आहे किंवा पुरी रोजगारी अस्तित्वांत आहे असें आपल्याला म्हणतां येतें. यंत्रसामुग्री व श्रमशक्ति यांच्या कमाल उत्पादन मर्यादेचा या पुढील प्रकरणांत मीं एकत्रीतपणें उल्लेख करणार आहे. कोणत्याहि विशिष्ट परिस्थितींत या दोहोंपैकीं एक वाढत्या सीमागत उत्पादन खर्चाचे कारण असूं शकेल.

२ मुद्रास्फितीच्या प्रश्नावर मी जितकें लिहीलें आहे तितकें दुसऱ्या कोणत्याच आर्थिक प्रश्नावर लिहिलेलें नाहीं आणि त्यामुळें पुनरूक्ती टाळण्याचा प्रयत्न मला करावासा वाटतो. मोठ्या अर्थसंस्था आणि कामगार संघटना यांच्या संदर्भात मुद्रास्फितीचा विचार मी 'अमेरिकन कॅपिटॅलिझम् : द कन्सेट ऑफ काउन्टर व्हेलिंग पॉवर' या पुस्तकाच्या अखेरच्या प्रकरणांत केला आहे. स्पर्धाधिष्ठित व मक्तेदारी प्रधान बाजारपेठांच्या सहजीवनामुळें आणि मक्तेदारी प्रधान बाजार

शकते. उत्पादनाची कमाल मर्यादा गांठली कीं, वस्तूंच्या उत्पादनांत वाढ करणें अवघड होऊन बसतें. अशा वेळीं जर मागणी अधिक वाढली तर त्यामुळें किंमतींत वाढ होऊं शकते. इथें आपण अर्थव्यवस्थेचे दोन भाग पाडायला हवेत. अर्थव्यवस्थेच्या ज्या भागांत, उदाहरणार्थ शेती, अनेक उत्पादक असतात आणि त्यामुळें शुद्ध स्पर्धेची अवस्था निर्माण झालेली असते त्या भागांत एक विक्रेता किंमतींचे नियंत्रण करूं शकत नाहीं किंवा त्यांच्यावर प्रभाव पाडूं शकत नाहीं. मागणी वाढली कीं, किंमती आपोआप वाढतात. परंतु पोलाद, यंत्रसामुग्री, खनीज तेल, मोटारी, रसायनें, इत्यादी वस्तूंच्या बाजारपेठांत कांहीं थोड्या आणि मोठ्या अर्थसंस्था मालाचा पुरवठा करतात आणि त्यामुळें या ना त्या मार्गाने त्या किंमतींचे नियंत्रण करूं शकतात. या मक्तेदारी प्रधान बाजारपेठांत जेव्हां उत्पादनाची कमाल मर्यादा गांठली जाते तेव्हां किंमती वाढविणें शक्य होतें आणि फायदेशीरहि होतें. सर्वच अर्थसंस्थानीं उत्पादनाची कमाल मर्यादा जवळ जवळ गांठली असल्यामुळें त्यापैकीं कोणतीहि एक अर्थसंस्था किंमती वाढविण्यास नकार देऊन आपल्या मालाच्या विक्रींत वाढ करूं शकत नाहीं. कारण अधिक उत्पादन करून ते बाजारपेठेला पुरवणें तिला शक्य नसते. त्याचप्रमाणें तयार मालाचा सांठा कोणाकडे असेल आणि तो कमी किंमतींत विकायला काढला जाईल अशीहि धास्ती नसते.

पेठांत उत्पादन शक्तीचा पूर्ण उपयोग अल्पकाळांत न केला गेल्यामुळें जे तात्विक प्रश्न उपस्थित होतात त्यांचा विचार 'मार्केट स्ट्रक्चर अॅण्ड स्टॅबिलायझेशन पॉलीसी' लेखांत केला आहे. तो 'रिव्ह्यु ऑफ इकॉनॉमिक्स अॅण्ड स्टॅटिस्टिक्स' (केम्ब्रीज, मॅस., मे १९५७) या नियतकालीकांत प्रसिद्ध झाला आहे. युनायटेड स्टेटसच्या सिनेटच्या (हिअरिंग्ज जुलै ११,१९५७) कमिटी ऑन द ज्यूडिशिअरीच्या सब कमिटी ऑन अॅण्टिट्रस्ट अॅण्ड मोनॉपॉलीसाठीं मी जें निवेदन तयार केलें होतें त्यांत वरील विचार सार रूपानें साध्या भाषेंत मांडलेले आहेत. जशी वर्षें लोटलीं तसतशी मुद्रास्फितीच्या प्रश्नाबाबतची माझी मतें बदलत गेली आहेत. (आणि ती अधिक प्रगल्भ झाली आहेत अशी मला आशा वाटते.) मुद्रास्फितीच्या कारणांचें जें विवेचन मी आतां पुढें करणार आहे तें स्थूल मानाने, 'अमेरिकन कॅपीटॅलिझम' या माझ्या ग्रंथांतील विवेचनासारखेंच असलें तरी अधिक काटेकोरपणानें केलेलें आहे. प्रतिशहाचें सामर्थ्य उभारूं पहाणाऱ्या अर्थव्यवस्थेचा मुद्रास्फिती हा मध्यवर्ती प्रश्न असतो असें म्हणूनच या दोन्ही ठिकाणच्या विवेचनाला सुरवात केलेली आहे. १९५२ सालीं हें पुस्तक प्रसिद्ध झाल्यापासून ज्या घडामोडी झाल्या त्यामुळें या विवेचनाचा खरेपणा सिद्ध झाला आहे.

ठाणा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम ७५५७९वि: ....निर्लंब्ध.
क्रमांक २०११ नं. वि: २०१३/०७

मुद्रास्फितीबद्दल जे प्रचलित समज आहेत त्यांत नेहमी आढळून येणारी एक चूक इथें निदर्शनास आणायला हवी. अर्थात् अर्थशास्त्रज्ञानां ती चूक कोणती तें चांगले माहीत आहे. उत्पादनांत वाढ करणें हा मुद्रास्फितीवरचा उपाय आहे असें मानणे ही ती चूक. ही चूक अगदीं सहज घडणारी आहे आणि या बाबतींत जे विचार सुरवातीला सुचतात ते कसे अगदी साधे आणि रोखठोक असतात. उत्पादनाने कमाल मर्यादा गांठल्यामुळे जर मुद्रास्फिती होत असेल तर त्यावर अगदी साधा उपाय आहे. तो म्हणजे उत्पादनशक्ती वाढवून उत्पादनांत वाढ करणें आणि अशा प्रकारें हा आर्थिक ताण नष्ट करणें. पण थोडा अधिक विचार केला तर असें लक्षांत येईल कीं, एकंदर उत्पादनांत वाढ केली म्हणजे उत्पन्नांतहि तितकीच वाढ होते. मजूरीच्या आणि अन्य उत्पादन खर्चाच्या रूपाने हें उत्पन्न लोकांच्या हातीं जातें. आणि तें उत्पन्न खर्चून तें उत्पादन विकत घेणें शक्य असतें शिवाय आपण असेंहि पाहिलें आहे कीं, उत्पादनांतूनच गरजा निर्माण होतात. ज्या मार्गांनीं उत्पादनांत वाढ होते त्यांच्याच द्वारें गरजांचीहि जोपासना होते. त्यामुळें उपलब्ध यंत्रसामुग्रीच्या सहाय्याने उत्पादनांत जर वाढ केली तर लोकांच्या क्रयशक्तींतहि वाढ होते म्हणजे, त्यांना तें उत्पादन विकत घेणें शक्य होते. आणि त्याचवरोबर त्यांच्या गरजांतहि वाढ होते व ती त्यांना आपली क्रयशक्ति वापरण्यास भाग पाडते.

याशिवाय भाव वाढीला आणखीहि एक गोष्ट कारणीभूत होते. उत्पादनाने जर कमाल मर्यादा गांठलेली असेल तर उत्पादनांत अधिक वाढ करण्यासाठीं उत्पादन शक्तींत वाढ करावी लागते. याचाच अर्थ असा कीं, यंत्र सामुग्रींत अधिक भांडवल गुंतवावे लागते. तें भाडवल मजूरी, कच्च्या मालाची किंमत, भांडवलावरील व्याज आणि नफा यांच्या द्वारें लोकांच्या हातीं जाते व त्यांच्या क्रयशक्तींत वाढ होते. म्हणजेच वस्तूंच्या चालू मागणींत देखील वाढ होते. भांडवल गुंतवल्यामुळें अधिक यंत्रसामुग्रीची उभारणी होऊन तिच्या द्वारें उत्पादन सुरूं होण्यापूर्वीच मागणींतहि वाढ होते. अशा रितीने उत्पादन वाढविण्याच्या प्रयत्नांमुळेंच उपलब्ध उत्पादनशक्तीवर अधिक ताण पडूं लागतो आणि त्यामुळें अधिक भाववाढ होण्याची शक्यता निर्माण होते.

स्वतःची शेपटी पकडायला धावणारे मांजर एखाद्या वेळीं अनपेक्षित चतुराईनें ती पकडूं शकते. उत्पादन वाढवून मुद्रास्फितीचे परिणाम टाळण्याचा प्रयत्न वर वर पाहिले तर त्याच स्वरूपाचा असतो परंतु मांजराला आपली शेपटी पकडण्यांत जितपत यश लाभते तितपत हा प्रयत्न यशस्वी होत नाहीं.

[४]

जेव्हां अर्थव्यवस्थेंतल्या जवळ जवळ सर्व उत्पादनशक्तीचा उपयोग केला जात असतो तेव्हां जर मागणींत वाढ झाली तर तिचा सर्व उद्योगांवर सारखा परिणाम होत नाहीं. स्पर्धाधिष्ठित उद्योगांच्या उत्पादनाच्या किमती बाजारांत आपोआप निश्चित होतात. ह्या उद्योगांच्या क्षेत्रात जेव्हां वस्तूंच्या पुरवठ्यांत चटकन वाढ करणें शक्य नसतें त्यावेळीं जर मागणी वाढली तर किमतींत आपोआप वाढ होईल. तसेंच जर मागणी घटली तर किमती खालीं उतरतील. परंतु औद्योगिक क्षेत्र हे साधारणपणें मक्तेदारीप्रधान असतें आणि त्या क्षेत्रांतील किमती उत्पादक ठरवीत असतात. या क्षेत्रांत जर मागणी वाढली तर अर्थ संस्थांना किमती वाढवण्याचा निर्णय घ्यावा लागतो. त्या आपोआप वाढत नाहींत. हा निर्णय घेण्याच्या बाबतींत पुढील कारणांमुळें चालढकल होण्याची शक्यता असते : निष्क्रीयता; किंमती किती प्रमाणांत वाढवाव्या या बाबतींत सर्वांचे मत अजमावण्याची आवश्यकता—काहीं वेळां मक्तेदारी विरोधी कायद्यानुसार उद्योग संस्थांना एकमेकींशीं औपचारिक विचारविनमय करण्यास बंदी असते आणि त्यामुळें सर्वांचे मत अजमावण्यास बराच वेळ लागतो. किंमती वाढविल्या तर लोकमत प्रतिकूल होईल ही भीति; किंमती वाढविल्या तर त्या विशिष्ट अर्थसंस्थेचे किंवा उद्योगाचें स्पर्धेला तोंड देण्याचें सामर्थ्य भावीकाळांत कमी पडेल ही भीति; भाववाढीमुळें मजूरसंघटना जागृत होतील आणि वेतनवाढीची मागणी करायला लागतील ही शक्यता. (इथें पुन्हां ह्या गोष्टीचा निर्देश करायला हवा कीं, अर्थव्यवस्थेच्या ज्या क्षेत्रांत उत्पादकांची संख्या अल्प असते किंवा इतर कांहीं कारणांमुळें आपल्या मालाच्या किंमती निश्चित करणें त्यांना शक्य असते, अशाच क्षेत्रांत किंमतींच्या बाबतींत वरील प्रकार घडूं शकतो. स्पर्धाधिष्ठित क्षेत्रांत वावरणाऱ्या शेतकऱ्याच्या किंवा उद्योग चालकाच्या बाबतींत असा प्रकार घडणें शक्य नसते.) वरील कारणांमुळेंच आणखी एक गोष्ट घडून येईल ती अशी कीं, किंमतींत वाढ झाली तरी त्यामुळें अर्थसंस्थाच्या चालू किंवा अल्पकालीन नफ्याने कमाल मर्यादा गांठावी इतक्या प्रमाणांत ती होणार नाहीं. मोठ्या कॉर्पोरेशन्स् दीर्घकालीन फायद्याच्याच दृष्टीने आपली धोरणें आखतात. त्यांचे चालक हिशोब करतात तो विस्तृत कालखंडांत आपल्याला किती नफा मिळेल याचा. जर ताबडतोब जास्तींतजास्त नफा मिळेल अशा प्रकारें ठरविलेल्या किंमतीमुळें वेतन वाढीच्या मागण्या निर्माण होण्याची शक्यता असेल आणि त्यामुळें कॉर्पोरेशनच्या दीर्घकालीन उत्पादन खर्चांत वाढ होणार असेल, किंवा तिची स्पर्धा करण्याची ताकद जर कमी होणार असेल किंवा कॉर्पोरेशनच्या सार्वजनिक प्रतिष्ठेला जर धक्का पोहोचणार असेल तर

जास्तींतजास्त अल्पकालीन नफा मिळवणें कॉर्पोरेशनच्या हिताचे नसतें—नफा या शब्दाची व्याख्या कितीहि संकुचित केली तरी देखील ही गोष्ट कॉर्पोरेशनच्या हिताची नसते [१] जो पर्यंत आपल्या दीर्घकालीन हिताला धक्का लागणार नाही अशीं कॉर्पोरेशन्सना खात्री वाटत नाही तोपर्यंत त्या आपला चालूं नफा कमाल मर्यादेपर्यंत वाढविण्याचा प्रयत्न करणार नाहीत.

या विवेचनांतून दोन निष्कर्ष निघतात. ज्यावेळीं मालाला भरपूर आणि वाढती मागणी असते त्यावेळीं किमती वाढवून अधिक फायदा मिळविण्याची अल्पकालीन शक्यता अधिक असते. दूरवरचा विचार करून किमतींची पातळी किती असावी ते ठरवायचें झालें तर मात्र त्यांच्यात इतकी वाढ करणें इष्ट नसतें. यामुळें औद्योगिक बाजारपेठांत माल विकणाऱ्या उद्योग संस्थांजवळ एक प्रकारचा (सुप्त प्राप्य पण न मिळविलेला) नफा असतो. किमतींत वाढ न केल्यामुळें हा नफा प्रत्यक्षांत मिळालेला नसतो पण तो मिळविण्याची शक्यता असते. स्पर्धाधिष्ठित बाजारपेठांत माल विकणाऱ्या शेतकऱ्याला किंवा उत्पादकाला जी संधी नसते ती या उद्योग-संस्थांना असते. प्रत्यक्षांत मिळतात त्याहून अधिक किमतीना माल विकणें त्यांना शक्य असते. जर परिस्थितींत बदल झाला व अल्पकालीन नफा आणि दीर्घकालीन हित यांच्यांतला विरोध नष्ट झाला तर या उद्योगसंस्था आपल्या किमती खात्रीने वाढवतील.

यामुळें वरील उद्योगांच्या क्षेत्रांतील किमतींची वाढ आणि कमाल उत्पादन किंवा वाढती मागणी ह्यांचे तितकेसें घट्ट नातें नसतें. उदाहरणार्थ, पोलादाच्या उद्योगाने उत्पादन केलेल्या मालाची मागणी जरी घटली आणि त्यामुळें जरी उत्पादन शक्तीच्या मानाने प्रत्यक्ष उत्पादन घटलें तरी त्या मालाच्या किमतींत वाढ होणें शक्य असते. मात्र यासाठीं दोन गोष्टींची आवश्यकता असते. एक म्हणजे सुप्त नफा अस्तित्वांत असायला हवा आणि दुसरी अशी कीं, कोणत्या तरी कारणामुळें अल्पकालीन व दीर्घकालीन हितांतील विरोध नष्ट होऊन अल्पकालीन नफ्यांत वाढ करणें इष्ट ठरायला हवें. ज्यावेळीं मागणी घटत असते त्यावेळीं देखील असें घडणें शक्य असते. स्पर्धाधिष्ठित उद्योगांच्या क्षेत्रांत मात्र उत्पादन जेव्हां स्थिर असतें तेव्हां मागणींत वाढ झाल्याशिवाय किमतींत वाढ होणें अशक्य

---

१ किमती निश्चित करण्याच्या बाबतींत कॉर्पोरेशन्स असा संयम दाखवित असतील हे मान्य करण्यास अनेक अर्थशास्त्रज्ञ कांहींसे नाखूष असतात. कारण हा संयम आणि कॉर्पोरेशन्सचे हित यांत विरोध असतो अशी त्यांची कल्पना असते. परंतु खरोखर अशी समजुत करून घेण्याची आवश्यकता नाही.

असतें. त्याचप्रमाणें जेव्हां मागणी घटते तेव्हां किंमती देखील निश्चितपणें खालीं घसरतात.[१]

ज्यावेळीं उत्पादन शक्तीचा पूर्ण उपयोग होत नसतो आणि मागणी घटत असते त्यावेळीं देखील मक्तेदारीप्रधान क्षेत्रांतील उद्योगांच्या किमतींत वाढ होऊं शकते. हें जरी खरें असलें तरी ही वाढ मोठ्या प्रमाणांत होऊं शकेल असें मानणें योग्य होणार नाही. जर वरीचशी यंत्रसामुग्री उपयोगांत आणली जात नसेल तर एखादी अर्थसंस्था किमतींत वाढ करण्यास नकार देण्याची शक्यता असते. किंवा ती अर्थसंस्था चोरून कमी किमतीला माल विकेल अशीहि शक्यता असते. ह्या धोक्यामुळें अल्पकालीन नफ्यांत वाढ करण्यासाठीं किमती वाढविणें कितपत शहाणपणाचे आहे यावद्दल शंका वाटूं लागेल आणि किमती वाढविण्याबाबतचा निरूत्साह अधिकच वाढेल. शिवाय मागणी घटत असतांना किमतींत जर अशीं वाढ केली तर तिचे दीर्घकालीन परिणाम काय होतील यावद्दलहि अर्थ संस्थांना अधिकच भीति वाटूं लागेल. कारण कदाचित् या वाढविलेल्या किमती पुन्हां कमी कराव्या लागतील आणि दरम्यानच्या काळांत किमती वाढविल्यामुळें मजूरांच्या वेतनांत मात्र वाढ झालेली असेल. इथें लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट एवढीच कीं, मक्तेदारीप्रधान उद्योगाच्या क्षेत्रांत मागणी व उत्पादनशक्ति यांचे परस्पर संबंध कांहींसे अनिश्चित स्वरूपाचे असतात. मागणी घटली आणि यंत्रसामुग्री कांहीं प्रमाणांत बंद ठेवावी लागली कीं, किमती तावडतोब घटल्या असा प्रकार होत नाही.

[५]

मुद्रास्फितीच्या या नाटकांत आतां हॅम्लेटचे पात्र आणून सोडायचें एवढेंच काय तें बाकी राहिलें आहे. इथें हॅम्लेटची भूमिका कामगार संघटना करतात असें

१ निरनिराळ्या वस्तूंच्या मागणींत जर निरनिराळ्या प्रमाणांत फरक झाले आणि मागणीनुसार उत्पादनशक्तींत फेरफार करण्याची निरनिराळ्या उद्योगांची गति जर भिन्न असली तर या गोष्टींचा किमतींच्या हालचालीवर परिणाम होईल. सुप्त नफ्यावर भर दिला म्हणून या नित्य घडणाऱ्या अन्य गोष्टींकडे मी दुर्लक्ष करतो अशांतला भाग नाही. परंतु या सुप्त नफ्याकडे आपण दुर्लक्ष केले तर वेतनवाढीच्या मागण्यावावत उद्योगसंस्थाची जी प्रतिक्रिया असते तिचा समाधानकारक खुलासा करणें अशक्य होईल. पहा : रॉबर्ट सॉलोमन यांचा 'गालब्रेथ ऑन मार्केट स्ट्रक्चर ॲण्ड इकॉनॉमिक स्टॅबिलायझेशन पॉलीसी' हा लेख आणि त्यावरील माझी टिप्पणें. हे लिखाण १९५८च्या रिव्ह्यू ऑफ इकॉनॉमिक्स् ॲण्ड स्टॅटिस्टिक्स या नियतकालीकांत प्रसिद्ध झालेलें आहे.

सर्वांचेच मत आहे. कामगारांचे वेतन आणि किंमती यांनीं एकमेकांचा पाठलाग करीत वर धांवणें ही जी सर्वांना परिचित असलेली आर्थिक जीवनांतील घटना आहे तिला या कामगार संघटना कारणीभूत होतात असें मानलें जातें. निदान या घटनेचे तात्कालीक निमित्त तरी या संघटना असतात.

मुद्रास्फिती आणि मजूरांचे वेतन यांचे परस्पर संबंध काय हा प्रश्न अर्थशास्त्रज्ञांना नेहमीच बिकट वाटत आलेला आहे. किंमतींतील वाढीशीं मजूरांच्या वेतनाचा कांहींतरी संबंध आहे हें तर उघडच आहे पण त्या बरोबर हेहि खरें कीं, जी अर्थसंस्था मजूरींत वाढ झाल्यानंतर किंमतींत वाढ करते तिला तीच गोष्ट मजूरींत वाढ होण्यापूर्वी करणें देखील शक्य असते. पूर्वी उत्पादन खर्च कमी असतांना जर तिनें किंमती वाढविल्या असत्या तर तिला अधिक नफा मिळाला असता. मजूरांच्या वेतनांत वाढ झाल्यामुळें तिला मालाची किंमत वाढविणें शक्य झालें असें मुळीच नसते. जर पोलाद उद्योगांत काम करणाऱ्या मजूरांचे वेतन वाढलें तर त्यामुळें त्या उद्योगाच्या मालाच्या मागणींत अत्यल्प वाढ होते आणि ती देखील कालान्तराने. शिवाय मजूरींत वाढ झाली कीं, पोलादाचे कारखानदार आपल्या किंमतींत जी तावडतोब वाढ करतात ती करतांना ते ही मागणींतील अत्यल्प वाढ लक्षांत घेतात अशांतला मुळीच भाग नाहीं.[1]

ही जी किंमतींत वाढ करतां येते तिचे एक कारण म्हणजे सुप्त नफ्याचें अस्तित्व. दुसरें असें कीं, मजूरींत वाढ झाली कीं, अर्थसंस्थांचें अल्पकालीन हित आणि दीर्घकालीन हित यांतला विरोध कमी होतो. किंमती वाढविल्या तर कामगार संघटना अधिक वेतनाची मागणी करतील या भीतिने जेव्हां किंमतींत वाढ करणें टाळलेलें असतें तेव्हां वरील प्रमाणें गोष्टी घडून येतात हें उघडच आहे. एकदां कामगार संघटनांनी अधिक वेतनाची मागणी केली कीं, त्या अशी मागणी करतील या भीतिला कांहीं अर्थ राहात नाहीं आणि मग अशी भीति न बाळगतां मोकळेपणानें किंमतींत वाढ करतां येते. शिवाय अशा वेळीं लोकमत प्रतिकूल होण्याची शक्यता देखील फारच थोडी असते कारण कामगार संघटनांनीं जास्त मजूरी मागितली म्हणून किंमती वाढल्या असें मानण्याकडे लोकांचा सामान्यपणें कल असतो. पोलाद आणि इतर उद्योगांत आतां हें एक नित्याचें धोरणच होऊन बसलें आहे. मजूरींत जेव्हां वाढ होते तेव्हां किंमती आणि कंपन्याचा नफा यांत वाढ करण्याची संधी साधण्यांत येते.

---

१ मुद्रास्फिती सतत चालू रहाण्यास समाजाच्या उत्पन्नातील जी वाढ कारणीभूत होते तिचाच मजूरींतील ही वाढ हा एक भाग असतो. पण तरीदेखील ही गोष्ट खरी कीं, किंमतींत वाढ होते ती उत्पन्नांत वाढ व्हायच्या आधीं, नंतर नव्हे.

किंमती आणि मजूरांचे वेतन यांचे जे परस्पर संबंध आहेत त्यांचा हा गाभा आहे. हा जो एकंदर सर्व प्रकार घडतो तो घडवून आणण्यांत कामगार संघटना, त्यांच्या मजूरी बाबतच्या मागण्यांच्या द्वारें पुढाकार घेतात असें मानणें चुकीचे आहे. कारण राहणीच्या खर्चांत वाढ होते त्यामुळें त्यापूर्वी जी मजूरीची वाढ झालेली असते तिच्यापासून झालेला फायदा घुवून निघतो. आणि मग तो गमावलेला फायदा पुन्हां मिळवावा असा प्रयत्न सुरू होतो. आतां ज्यावेळीं उत्पादनाने आणि मागणीनें कमाल मर्यादा गांठलेली असते त्यावेळीं नफ्याचे प्रमाण सामान्यपणे चांगलें असते. या नफ्यावर दृष्टी ठेवून कामगार अधिक वेतनाची मागणी करतात. आणि त्यांनी अशी मागणी केली कीं, तिचा फायदा घेऊन जी किंमतींची वाढ करणें शक्य असते पण केलेली नसते ती केली जाते. हें चक्र असें फिरत रहातें. त्या चक्राचा एखादा आरा इतराहून वेगळा काढून त्याला काळा (किंवा लाल) रंग द्यायचा आणि मग तो आरा इतर सर्वांना ढकलतो असें म्हणायचे हें योग्य नाहीं. परंतु हा वादविवाद जरी निष्फळ असला तरी भाववाढीला कामगार अधिक जबाबदार कीं, मालकवर्ग अधिक जबाबदार ही चर्चा सारखी जोरांत चालूं असते.

[६]

मजूरी, किंमती आणि नफा यांचा जो हा पाठलाग चाललेला असतो त्याची सुरवात अर्थव्यवस्थेच्या एका विशिष्ट क्षेत्रांत होते. त्या क्षेत्रांत मोठ्या आणि थोड्याशाच अर्थसंस्था असतात आणि प्रबळ कामगार संघटना असतात किंमतींत ही जी वाढ होत असते तिचे अर्थव्यवस्थेंतील वेगवेगळ्या गटांवर अगदीं भिन्न स्वरूपाचे परिणाम होतात. ज्यावेळीं अर्थसंस्था प्रबळ असतात आणि आपल्या बाजारपेठांचें नियंत्रण करूं शकतात व कामगार संघटना मजूरींत वाढ करून घेण्यास समर्थ असतात त्यावेळीं मुद्रास्फितीमुळें कोणाचेच फारसे नुकसान होत नाहीं. अशा परिस्थितींत दुसऱ्यांच्या दुखाःकडे माणसें किती शातपणें पाहूं शकतात त्यानुसार त्यांना या प्रश्नाचे महत्व वाटेल. परंतु अर्थव्यवस्थेच्या अन्य क्षेत्रांत मात्र मुद्रास्फितीचे अत्यंत संमिश्र स्वरूपाचे परिणाम होतात. कांहीं व्यक्तींचे आणि गटांचे आपल्या किंमतीवर व मजूरीवर जवळ जवळ कांहींच नियंत्रण नसतें आणि त्यामुळें आपले उत्पन्न वाढवून स्वतःचे संरक्षण करण्याचे सामर्थ्य त्यांच्या अंगीं जवळ जवळ मुळींच नसते. ह्या व्यक्तींचे आणि गटांचें मुद्रास्फितीमुळें सर्वांत अधिक नुकसान होतें. शेतकऱ्याची देखील किंमतीचे नियंत्रण करण्याची ताकद फार मर्यादित असते. त्याच्या बाबतींत मुद्रास्फितीचा परिणाम किती होतो तें त्याच्या मालाच्या मागणीच्या उत्पन्नावलंबी लवचिकपणावर अवलंबून असतें, म्हणजेच वाढत्या उत्पन्नांचा

त्या मालाच्या मागणीवर किती परिणाम होतो त्यावर अवलंबून असतें, मुद्रास्फितीचा परिणाम आणखीहि एका गोष्टीवर अवलंबून असतो. किंमती वाढल्यावर कोणत्याहि विशिष्ट उत्पादकाचा उत्पादन खर्च तावडतोब वाढतो कीं, कांहीं काळानें वाढतो यावर तो परिणाम अवलंबून असतो.

उदाहरणार्थ, शेतकऱ्यांचें उत्पादन किती किंमतीला विकलें जाते यावर त्यांचें जवळ जवळ कांहींच नियंत्रण नसतें. बाजारांत आपोआप घडणाऱ्या हालचालींच्या द्वारें मुद्रास्फितीचे परिणाम त्यांच्या पर्यंत येऊन पोहोंचतात. गहुं किंवा बाटाटे यांच्या मागणीवर उत्पन्नांतील चढउतारांचे जवळ जवळ कांहींच परिणाम होत नाहीत. मजूरांच्या वेतनांत वाढ झाली तरी त्यामुळें माणसें पाव अगर बटाटे यांच्यावर कांहीं अधिक खर्च करीत नाहींत. खरें म्हणजे उत्पन्न वाढलें कीं, बटाट्यावरचा खर्च कमी होतो असें मानायला जागा आहे. अशा रितीने मुद्रास्फितीमुळें गहुं व बटाटे यांची लागवड करणाऱ्या शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढत नाहीं परंतु त्याचा उत्पादन खर्च मात्र वाढतो. कारण मक्तेदारी प्रधान क्षेत्रांतून तो जळण, खतें इत्यादि ज्या वस्तू विकत घेतो त्यांच्या किंमतींत वाढ होते. जे शतकरी मांसासाठीं गुरांची निपज करतात त्यांच्या मालाची मागणी लोकांच्या उत्पन्नावरोबर वाढते. पगारांत वाढ झाली कीं, ताज्या मांसावर अधिक खर्च करण्याकडे लोकांची जी प्रवृत्ति असते तिच्यापासून या शेतकऱ्याचा फायदा होतो. एकंदरींत परिस्थितींत जर अन्य कांहीं फरक झाला नाहीं तर मुद्रास्फितीमुळें गुराची जोपासना करणाऱ्या शेतकऱ्याची परिस्थिती सुधारते. पाव, अन्नधान्यें किंवा बटाटे यांच्या उत्पादकांपेक्षां त्याची स्थिति बरी असते.

मुद्रास्फितीच्या परिणामांतला हा भेदभाव आपल्याला सर्वत्र आढळून येतो. एखाद्या व्यक्तीनें अगर अर्थसंस्थेनें आपल्या नित्याच्या व्यवहाराचा एक भाग म्हणून किंवा वाढत्या किंमतींचा फायदा घेण्याच्या इच्छेने जर मालाचा सांठा करून ठेवलेला असला तर मागणींत व किंमतींत वाढ झाल्यामुळें तिचा फायदा होतो.

दुसऱ्या टोकाला माणसांचा असा एक वर्ग असतो कीं, ज्यांचा राहणीचा खर्च मुद्रास्फितीमुळें वाढतो. पण त्यांच्या उत्पन्नांत मात्र जवळ जवळ कांहींच वाढ होत नाहीं. कारण त्यांचे उत्पन्न कायद्यानें, किंवा सामाजिक रीतिरीवाजानीं किंवा अन्य कोणीतरी निश्चित केलेलें असतें. शिक्षक, धर्मगुरू, सरकारी नोकर मध्यम वर्गीय नोकरी पेशांतली माणसें, निवृत्तिवेतन किंवा तत्सम दुसरें उत्पन्न यांवर जगणारी माणसें यांची मुद्रास्फितीच्या काळांत वरील प्रमाणें परिस्थिती होते. स्थिर उत्पन्न आणि वाढता राहणीचा खर्च यांचा या सामाजिक गटावर काय परिणाम होतो तें सर्वांच्या चांगलेंच परिचयाचें असल्यामुळें विस्तारानें सांगण्याची गरज नाहीं. जे

निवृत्तिवेतनावर अवलंबून असतात त्यांचे फारच हाल होतात. तसेंच मुद्रास्फितीच्या काळांत सरकारी नोकरांची परिस्थिति देखील कठीण होते. वाढत्या किंमतींचे परिणाम इतरांप्रमाणेंच त्यांनाहि सहन करावे लागतात. पण वेगवेगळ्या कारणांमुळें त्यांच्या उत्पन्नांत मात्र त्वरित वाढ होत नाहीं. तें मागेंच रेंगाळत रहातें. या रेंगाळण्याचे फार महत्वाचे परिणाम होतात. त्या परिणामाची दखल या पुस्तकांत पुढें आपल्याला घ्यायची आहे.

मुद्रास्फितीमुळें सगळ्यांच व्यावसायिक क्षेत्रांतील व्यक्तींना त्रास होतो अशांतला भाग नाहीं. त्याच्यापैकीं कांहीं गटांना आपल्या कामाचे मोल ठरविण्याचें स्वातंत्र्य असते आणि त्यामुळें मागणी आणि मजुरी यांत सार्वत्रिक वाढ झाली कीं, ते आपल्या कामाचे मोल देखील वाढवून घेतात. सामान्यपणें वकील आणि डॉक्टर या वर्गांत मोडतात. असे इतरहि कांहीं गट असतात. १९४२ सालीं अमेरिकन नागरिकांनीं कृतज्ञता बुद्धिनें सर्व सैनिकांचे पगार वाढविले, वेतनांत जेव्हां ही वाढ झाली तेव्हा होनोलुलू या गजबजलेल्या शहरांतील नायकिणींनीं आपल्या कामाच्या किंमतींत तावडतोब वाढ केली. खरें म्हणजे त्या दिवसांत त्यांच्या धंद्यांत खूप वाढ झाली होती आणि त्यामुळें त्यांचा दर गिऱ्हाईकामागें होणारा सरासरी खर्च कमी झाला होता. सैन्यांतल्या उच्च अधिकाऱ्यांना या गोष्टीचा अत्यंत संताप आला आणि जुन्या दरानेच या नायकिणीनीं आपल्या गिऱ्हाईकांची सेवा करावी असा त्यांनीं हुकुम काढला. त्यांच्या दृष्टीनें या नायकिणी अयोग्य, अनैतिक आणि अश्लाघ्य अशी नफेबाजी करीत होत्या.

ज्या काळांत मुद्रास्फिती सतत चालूं असते त्या काळांत शिक्षक, धर्मगुरू किंवा पोलीस अधिकारी होण्यापेक्षां सट्टेबाज किंवा गणिका होणें आर्थिक दृष्टचा अधिक फायद्याचें असते. खुल्या अर्थव्यवस्थेंतील आर्थिक प्रोत्साहनांचें स्वरूप हे असे असते आणि तरी सांकेतिक शहाणपणाला या प्रोत्साहनांच्या व्यवस्थेचे कौतुक वाटते.

[७]

मुद्रास्फितीचें नियंत्रण करण्यासाठीं स्थूल मानाने काय केलें पाहिजे याची कल्पना वरील विवेचनावरून करतां येण्यासारखी आहे. जेव्हां अर्थव्यवस्थेंत उत्पादनशक्तीचा जवळ जवळ पूर्ण उपयोग होत असतो त्यावेळीं मक्तेदारी प्रधान क्षेत्रांतील अर्थसंस्थांना आपल्या किंमतींत वाढ करणें शक्य असतें. शिवाय मजूरींत वाढ होत असल्यामुळें आपल्या मालाच्या किंमती वाढविण्यासाठीं त्यांना निमित्तहि मिळतें. अर्थव्यवस्थेंतील उत्पादनाची पातळी खालीं घसरली तरच किंमतींतील ही वाढ व तिचे परिणाम थोपविणें शक्य असतें. एकदा मंदी आली कीं, किंमतींतील वाढ,

मजूरींतील वाढ किंवा ती व्हावी अशा मागण्या या गोष्टींना पायबंद बसतो. परंतु अर्थसंस्था जेव्हा कमाल उत्पादन करीत असतात तेव्हा त्यांच्यापाशीं सुप्त नफा असतो आणि त्यामुळें किंमतींतील वाढ टाळायची असेल तर उत्पादनांत पुष्कळच घट करावी लागते. दुसऱ्या महायुद्धानंतर १९४९ सालीं आणि १९५४ सालीं आर्थिक मंदी आली होती. परंतु या दोन्हीं प्रसंगीं मक्तेदारी प्रधान क्षेत्रांतल्या किंमती वाढतच राहिल्या. या मक्तेदारी प्रधान क्षेत्रांत मोठाल्या अर्थसंस्था आणि मोठाल्या कामगार संघटना यांच्यामध्यें मजूरीबद्दल जी रस्सीखेच चाललेली असते ती या काळांतहि चाललेली होती. मात्र स्पर्धाप्रधान क्षेत्रांतील किंमती घटत असल्यामुळें किंमतींची एकंदर पातळी मात्र स्थिर राहिली. जेव्हा मागणीचा जोर असतो आणि तिच्यांत वाढ होत असते आणि जेव्हा बेकारी साधारणपणें ३० किंवा ४० लाखाहून कमी असते तेव्हा मुद्रास्फिती होईल अशीं अपेक्षा करणें योग्य ठरेल. अर्थात् कांहीं अपवादात्मक परिस्थिती निर्माण झाली तर गोष्ट वेगळी. किंमती आणि मजूरी यांचे परस्परावर जे परिणाम होतात ते जर टाळतां आले तर उत्पादनाने आणि रोजगारीने कमाल मर्यादा गांठलेली असतांना देखील किंमती स्थिर ठेवणें शक्य होईल. अशा परिस्थितींत जरी मजूरींत वाढ झाली तरी त्यामुळें किंमतींत वाढ होणार नाहीं आणि नफ्यांत वाढ करण्यास निमित्त मिळणार नाहीं. वाढत्या मजूरीचे अन्य आर्थिक क्षेत्रावर जे पर्यायीं परिणाम होतात ते टाळतां येतील. मुद्रास्फितीचा धोका निर्माण न होता उत्पादन आणि रोजगारी उंच पातळीवर ठेवणें शक्य होईल. मुद्रास्फितीच्या नियंत्रणासाठीं योजना आंखतांना मागणीकडे अधिक लक्ष पुरवावें कीं, किंमती आणि मजूरी यांच्या परस्पर पाठलागाकडे अधिक लक्ष पुरवावे या बाबतींत मागें बराच वादविवाद झालेला आहे. सर्व सामान्यपणें अर्थशास्त्रज्ञांची भूमिका अशी कीं, किंमतींच्या पातळीचे नियंत्रण करायला हवें. उलट सामान्य माणसाला असें वाटतें कीं, किंमती व मजूरी यांचा जो परस्पर पाठलाग चाललेला असतो तो थांबवायला हवा. खरी गोष्ट अशी कीं, या दोन्ही गोष्टी महत्वाच्या आहेत. मागणीची पातळी जर पुरेशा प्रमाणांत खालीं आणली तर मुद्रास्फितीला पायबंद घालतां येईल. तसेंच मजूरी आणि किंमती किंवा, अधिक काटेकोरपणें बोलायचें झालें तर, मजूरी नफा आणि किंमती यांचे परस्परांवर जे परिणाम होत असतात ते थांबवतां आले तर मागणींत कमी प्रमाणांत घट करून देखील मुद्रास्फितीला पायबंद घालतां येईल.

या संदर्भांत कोणते संघर्ष उद्भवणें शक्य आहे तें सहज ध्यानांत येण्याजोगें आहे. मागणींत जर बऱ्याच प्रमाणांत घट केली तर आर्थिक सुरक्षिततेला धोका

निर्माण होईल. आणि नियंत्रणांचा उपयोग केला तर त्यामुळें कांहीं दृढमूल झालेल्या आर्थिक कल्पनांना धोका पोहोचेल. निरनिराळ्या आर्थिक कार्यासाठीं साधनांची योग्य प्रकारें विभागणी केली पाहिजे आणि ती विभागणी करण्याचें सर्वांत उत्तम किंवा एकमेव साधन म्हणजे खुली अर्थव्यवस्था असा जो आर्थिक समज आहे त्यालाच या नियंत्रणामुळें धक्का बसेल. वस्तूंच्या उत्पादनाला आपण जें महत्व देतो तें लक्षांत घेतलें तर वरील आर्थिक समजुतीच्या संदर्भांत नियंत्रणांचे समर्थन करणें अशक्य होईल.

प्रस्थापित आर्थिक समजूतींत आणि नियंत्रणें यांत हा जो विरोध आहे त्याचा विचार आपल्याला पुढील एका प्रकरणांत करायचा आहे. परंतु त्यापूर्वी द्रव्य विषयक धोरणाच्या सहाय्यानें हा संघर्ष टाळण्याचा जो प्रयत्न केला जातो त्याचा आपण विचार करायला हवा.

प्रकरण सोळावें

द्रव्याविषयीचे भ्रम

सबंध एकोणीसाव्या शतकांत बँक ऑफ इंग्लंड ही ब्रिटनची मध्यवर्ती बँक बँकांचे व्यवहार आणि आर्थिक जीवन यांचे नियंत्रण बँकदरांतील चढउतारांच्या द्वारें करूं शकत असे. कर्जे देणें हाच ज्यांचा धंदा त्यांना ज्या दरानें बँक ऑफ इंग्लंड कर्जे देत असे त्याला बँकदर हें नांव होतें. हे बँकदराचें शस्त्र परिणामकारक ठरण्यास तत्कालीन परिस्थिती निःसंशय अनुकूल होती. जगाच्या बहुतेक भागांत शांतता नांदत होती. भांडवलाच्या आंतरराष्ट्रीय हालचालींवर कोणतेहि निर्बंध नव्हते. अधिक नफा मिळविण्यासाठीं ते कुठेहि जाऊं शकत असे. बँकदरांत वाढ केली कीं, अधिक मिळकतीच्या अपेक्षेने भांडवल परदेशांतून ब्रिटनमध्यें येत असे. बँकदरांत घट झाली कीं, ते बाहेर जात असे. त्यामुळें बँकांच्या रोकड निधींचे नेमकेपणाने नियंत्रण करणें शक्य होत असे. एकोणीसाव्या शतकाच्या उतरार्धांत ब्रिटनने खुल्या व्यापाराचें धोरण स्वीकारलेलें होतें. त्यामुळें ब्रिटनच्या अर्थव्यवस्थेशीं जगांतले अन्य देश मोकळेपणाने स्पर्धा करूं शकत असत, व म्हणून व्याजाच्या दरांत फरक झाला कीं, त्याचा ब्रिटीश अर्थव्यवस्थेवर चटकन परिणाम होत असे. व्याजाचा दर वाढला कीं, उत्पादन खर्चांत वाढ होई आणि त्यामुळें नव्या भांडवलाच्या निवेशापासून मिळणारा नफा कमी होई. उलट व्याजाचा दर कमी झाला कीं, भांडवलाच्या निवेशापासून मिळणाऱ्या नफ्यांत वाढ होई आणि तो निवेश करण्यास उत्तेजन मिळे. बँकदराचा ब्रिटीश अर्थव्यवस्थेंतील भांडवलाच्या निवेशावर आणि वस्तूंच्या किंमतीवर खरोखर किती परिणाम होत असे या बाबतींत मतभेदाला वरीच जागा आहे. कदाचित् एरवी देखील जें घडून आलें असतें तें बँकदरानें घडवून आणलें असा उगीचच समज झाला असेल. व्हिक्टोरिअन काळांत संभाषणाचा विषय म्हणून जें त्याला स्थान होतें त्यामुळें देखील त्याला प्रतिष्ठा प्राप्त झाली असेल. किंवा बँकदर हें खरोखरच आर्थिक नियंत्रणाचें एक परिणामकारक साधन असेलहि.

ह्या बाबतींत जरी कांहीहि परिस्थिती असली तरी एका गोष्टीबद्दल शंका घेण्यास मात्र मुळींच जागा नाहीं. बँकदराच्या सहाय्यानें अर्थव्यवस्थेचें अशा प्रकारें नियंत्रण करणें ही गोष्ट सर्वांनाच फार आकर्षक वाटूं लागली. सर्वांना म्हणजे बँकदराशीं ज्यांचा संबंध येत होता त्या सर्वांना. बँकींगच्या व्यवसायांतील

मंडळींना तर बँकदराची विशेषच भुरळ पडली. कारण त्यांना असें वाटूं लागलें कीं, आपण मध्यवर्ती बँकेच्या द्वारा सगळ्या आर्थिक जीवनाचे नियंत्रण करूं शकतो. पुन्हां त्यांच्या हातीं ही जी सत्ता होती ती कांहीं मतांची भीक मागून मिळवलेली नव्हती. निवडणूका हा सत्ता मिळवण्याचा एक असंस्कृत आणि बिनभरवशाचा मार्ग आहे. त्या बँकर्सना जी सत्ता मिळालेली होती ती त्यांच्या संपत्तीच्या आणि आर्थिक कर्तृत्वाच्या द्वारें मिळालेली होती. द्रव्यविषयक धोरणावर बँकींगच्या क्षेत्रांतील व्यक्तींचे नियंत्रण होते हें तर खरेंच. परंतु शिवाय त्यांच्या या अधिकारावर राजकीय क्षेत्रांतील व्यक्तींनीं अतिक्रमण करूं नये याचीहि तरतूद करण्यांत आलेली होती. मध्यवर्ती बँक ही स्वतंत्र ठेवण्यांत आलेली होती ती सरकारच्या अधिकारांच्या कक्षेबाहेर होती आणि ती सरकारपेक्षां देखील कांहींशी श्रेष्ठ आहे असें मानलें जात होतें. ब्रिटनच्या आर्थिक जीवनांत बँक ऑफ इंग्लंडला अनेक शतकें अशा प्रकारचें स्थान होतें. फेडरल सिस्टिम ही यूनायटेड स्टेटची मध्यवर्ती बँक आहे आणि तिला देखील आर्थिक जीवनांत तत्वतः तरी तेंच स्थान आहे. फेडरल रिझर्व्ह सिस्टिमचे हे जे स्वातंत्र्य आहे त्याला सांकेतिक शहाणपण फार महत्व देतें. परंतु काँग्रेस आणि सरकार यांनीं जर निकरानें विरोध केला तर हें स्वातंत्र्य फारसें टिकून रहाणार नाहीं. या तथाकथित स्वातंत्र्याच्या मूळाशीं एक समज आहे. तो असा कीं, द्रव्यविषयक धोरण ही एक अत्यंत तांत्रिक गोष्ट आहे आणि तें ठरविण्याचा अधिकार फक्त बँकींगच्या क्षेत्रांतील मंडळींनाच आहे. त्यामुळें या अधिकारावर लोकनियुक्त सरकारनें घसमुसळेपणानें अतिक्रमण करूं नये अशी खबदारी घ्यायला हवी.

द्रव्यविषयक धोरणाच्या सहाय्याने जेव्हां अर्थव्यवस्थेचे नियंत्रण केलें जात असे तेव्हा तें करण्यासाठीं अधिकाराचा उघडानागडा उपयोग करावा लागत नसे. तो अधिकार अप्रत्यक्षरित्या कळेल न कळेल अशा बेताने वापरला जात असे. तूं अमकी एक गोष्ट कर असें कोणत्याहि उद्योगचालकाला किंवा नागरिकाला सांगितलें जात नसे. उलट ज्यांचे स्वरूप त्यांना पूर्णपणें समजलेले नव्हते अशा शक्तीं त्यांना कांहीं गोष्टी करायला लावीत असत. अर्थव्यवस्थेचे नियंत्रण करणें जर आवश्यकच असेल तर ते असें आडवळणाने आणि सत्तेचें प्रदर्शन न करतां करावे हें कोणालाहि इष्ट वाटेल.

शिवाय द्रव्य आणि पतचलन ह्या गोष्टींबद्दल बहुसंख्य लोकांना फार गूढ वाटते. ह्या गोष्टी निर्माण कशा होतात आणि नष्ट कशा होतात, कागदाच्या कपटचांना एकदम इतकें मूल्य कसें प्राप्त होतें हें त्यांना कळत नाही. शिवाय द्रव्यविषक धोरणाबद्दलचे निर्णय नेहमी गुप्तपणे घेतले जातात आणि तें अप्रत्यक्षपणे म्हणजे कांही

कृतींच्या द्वारेंच लोकांच्या निदर्शनास येतात. व्याजाच्या दरांत चढउतार होतात किंवा मध्यवर्ती बँकेच्या ऐवजांत फेरफार होतात. या विषयावर बरेच विद्वतापूर्ण साहित्य निर्माण झाले आणि मध्यवर्ती बँकेच्या निरनिराळ्या हालचाली मागील हेतूंचे विवेचन त्या साहित्यांत करण्यांत आले. ह्या साहित्याचे जे लेखक होते त्यांचे हित-संबंध अशा रितीने मध्यवर्ती बँकेच्या ज्या धोरणाचा ते अर्थ लावीत होते त्या धोरणाशी जोडले गेले. कारण ते धोरण समजूं शकणारी जी निवडक माणसें होतीं त्यांत त्यांचा समावेश होत होता. जे लोक तें धोरण प्रत्यक्ष ठरवित होते त्यांनाच काय तें या लेखकांहून अधिक महत्त्व होतें. मध्यवर्ती बँकेच्या धोरणाविषयीं लोकांना हें जें आकर्षण वाटत होतें त्यांतून ते धोरण खरोखरच परिणामकारक असते असा ग्रह निर्माण झाला. त्या धोरणांत कांहीं अतिमानुषशक्ति आहे असें सूचित होऊं लागले. द्रव्यविषयक धोरण पूज्य ठरलें आणि त्याचे परिणाम गूढच नव्हे तर अति-मानुष आहेत असा समज प्रसृत झाला.

अर्थात हा समज कांहीं कायम टिकून राहिला नाही. विसाव्या शतकाच्या तीशींत द्रव्यविषयक धोरणाची प्रतिष्ठा कांहींकाळ तरी फारच कमी झाली. त्या शतकाच्या वीशीच्या उरार्धांत सट्टेबाजीमुळें जी किंमतींत वाढ होत होती ती थांबविण्यास व्याजाच्या दरांतील वाढ असमर्थ ठरली होती. आणि जेव्हां महामंदी आली तेव्हां व्याजाचे दर कमी करून ती दूर करणें अशक्य झालें. या काळांत बँकांच्या चालकांनीं कांही चूका केल्या आणि त्यांच्यावर कांहीं आकस्मिक संकटेंहि कोसळली. शिवाय डाव्या गटाच्या टीकाकारांनीं त्यांचे आवेशानें वाभाडें काढलें. यामुळें समाजांतील त्यांची प्रतिष्ठा पुष्कळच कमी झाली. त्यावरोबरच द्रव्यविषयक धोरणावरचा लोकांचा विश्वासहि उडाला. केन्सने असें प्रतिपादन केलें कीं, व्याजाचा दर आर्थिक व्यवहारांचे नियंत्रण करतो तो आडवळणांनी आणि तें नियंत्रण फारसे परिणामकारक नसते.

द्रव्यविषयक धोरणाची प्रतिष्ठा त्या काळांत कशी अगदी रसातळाला पोहोचली होती. परंतु दुसऱ्या जागतिक युद्धानंतरच्या काळांत त्याला पुन्हां पुष्कळच प्रतिष्ठा प्राप्त झाली. बँका आणि त्यांचे चालक ह्यांना त्यावेळी पुन्हां महत्व प्राप्त झालें होतें आणि त्यावरोबरच त्यांच्या हातीं असलेल्या ह्या साधनाचे महत्त्व देखील वाढले. द्रव्यविषयक धोरणावर विश्वास व्यक्त करणें हा केन्सच्या पाखंडी विचारानां विरोध करण्याचा एक मार्ग झाला. जीं माणसें पैशाच्या ठेवी स्वीकारण्याचे आणि कर्जे देण्याचे व्यवहार करीत होती ती चांगली आणि प्रतिष्ठीत आहेत असे हे केन्सचे विरोधक पुन्हां मानं लागले. आणि त्यांना उगीचच वाईट

ठरवणारा जहाल मतवाद आपल्याला पसंत नाही असें दाखविण्याकरीतां ते द्रव्यविषयक धोरणाच्या उपयुक्ततेचा पुरस्कार करूं लागले.

शिवाय मुद्रास्फितीवर कांहींतरी तोडगा काढणे आवश्यक होते. आणि ह्या-साठी जी इतर धोरणे सुचविली जात होती ती या मंडळींच्या दृष्टीने अव्यवहार्य आणि अमेरिकन परंपरेला विरोधी होती. या मंडळीच्या समोर जी अन्य आर्थिक उद्दिष्टें होती त्यांच्याशी ह्या धोरणांचा मेळ बसत नव्हता आणि म्हणून तीं या मंडळीना अप्रिय होती. परंतु तीं धोरणें जरी टाकावू ठरविली तरी कांहींतरी उपाय योजणें आवश्यक होते आणि या संदर्भात द्रव्यविषयक धोरण हा एकच पर्याय शिल्लक होता. या धोरणाविषयीं या मंडळींच्या मनांत प्रेम होते आणि त्यावर त्यांचा विश्वासहि होता. ह्या गोष्टींत आतां इष्ट ते अपेक्षिण्याच्या वृत्तीची भर पडली. दुसरा कोणता मार्गच नव्हता तेव्हां ह्या साधनाचा उपयोग करणे आणि ते परिणामकारक ठरेल अशी स्वत:ची समजूत करून घेणे आवश्यक होते. द्रव्यविषयक धोरणावर श्रद्धा ठेवणे ह्याला एक प्रकारच्या आर्थिक पलायनवादाचे स्वरूप आलें. ह्या धोरणाचा आधार नसतां तर प्रत्यक्ष परिस्थिती अधिकच विकट वाटली असती.

दुर्दैवाची गोष्ट अशी कीं, एखाद्या गोष्टीवर आपली श्रद्धा असली किंवा तिची आपल्याला अत्यंत गरज असली तरी तेवढ्यामुळे कांही ती गोष्ट आपल्याला इष्ट वाटणारे परिणाम घडवून आणूं शकत नाही. लोकांच्या मनांत बँकांच्या चाल-कांविषयी शंका होती आणि त्यामुळेच द्रव्यविषयक धोरणावरचा त्यांचा विश्वास उडाला अशीं बँकचालकांची पहिल्यापासून समजूत होती. ही समजूत कदाचित् खरीहि असूं शकेल. पण तेवढ्यावरून द्रव्यविषयक धोरणाची उपयुक्तता प्रस्था-पित होत नाहीं. परिस्थिती हीच सांकेतिक शहाणपणाची अंतिम शत्रू असते हें आपण दुसऱ्या प्रकरणांत पाहिलेले आहे. सांकेतिक शहाणपणाचे असले उत्साही पुरस्कर्ते जेव्हां त्याचा असा व्यवहारांत उपयोग करूं पाहातात तेव्हांच त्याला सर्वांत अधिक धोका असतो. सांकेतिक शहाणपण द्रव्यविषयक धोरणाला फार महत्त्व देते हे खरे. परंतु प्रत्यक्षांत हे धोरण मुद्रास्फितीला आड वळणानेच मर्यादित प्रमाणांतच पायबंद घालूं शकते. आणि या धोरणाचे दुर्दैव असे की, ही गोष्ट पुन्हां पुन्हां व्यवहारांत सिद्ध झालेली आहे.

[२]

द्रव्यविषयक धोरणाचा जादूच्या कांडीसारखा परिणाम होत नाहीं ही त्याच्या दृष्टीने दुर्दैवाची गोष्ट आहे. सरकारला जर चेटूक करण्याची शक्ति प्राप्त झाली तर आर्थिक जीवनाचे नियमन करणे पुष्कळच सोपे होईल, असें निदान युनायटेड

स्टेस्टस्‌मध्ये तरी आढळून आले आहे. ज्या द्रव्यविषयक धोरणावर कांही लोकांची विशेष मदार असते त्याच्या द्वारे असे कोणतेच चेटूक करतां येत नाही. प्रत्येक जबाबदार नागरिकाला ह्या गोष्टीचा खरे म्हणजे खेद वाटायला हवा.

मजूरी आणि किंमती यांचा जो परस्पर पाठलाग चाललेला असतो त्याच्यावर द्रव्यविषयक धोरण प्रत्यक्षपणे कोणतांच परिणाम करूं शकत नाही हें एक दुःखद सत्य आहे. द्रव्यविषयक धोरण असे कांही करूं शकेल असे त्याचे पुरस्कर्ते देखील म्हणत नाहीत. तेव्हां वस्तूंची समग्र मागणी कमी करूनं हें धोरण आर्थिक जीवनावर परिणाम करूं शकते. समग्र मागणींत घट करण्यासाठी हे धोरण व्याजाच्या दरांत वाढ करते आणि कर्ज देण्यासाठीं उपलब्ध असलेल्या द्रव्यांत घट करते. अशा रीतीने हें धोरण बँकांना कर्जे देण्यापासून आणि ग्राहकांना व उत्पादकांना ती घेण्यापासून परावृत्त करतें. ह्या मार्गाने ग्राहक व उत्पादक यांचा खर्च कमी होतो व त्यामुळें समग्र मागणी देखील कमी होते असें मानलें जातें. ह्या दोन गटांच्या खर्चांत घट झाली कीं, तिचा पर्यायाने अन्य लोकांच्या खर्चावर देखील परिणाम होतो. यामुळें वस्तूंची एकंदर मागणीच मुळी कमी होते किंवा त्या मागणींत होणाऱ्या वाढीची गति तरी कमी होते.[1] अशा रितीने मागणीचा उत्पादन शक्तीवर किंवा उपलब्ध श्रमशक्तीवर जो ताण पडतो तो कमी होतो. किंमती स्थिर रहातात. निदान असें कांही तरी होईल अशी कांही लोकांची अपेक्षा असते.

द्रव्यविषयक धोरण अर्थव्यवस्थेवर फक्त याच मार्गाने परिणाम करूं शकतें.[2]

---

१ समग्र मागणींत घट केल्यामुळें जो परिणाम होतो तोच मागणीच्या वाढीची गति कमी केल्यामुळें होईल. मात्र त्यावेळीं यंत्रसामुग्री आणि कामगारांचा पुरवठा यात वाढ होत असली पाहिजे. कोणतीहि चर्चा करतांना निश्चित राशींचा उल्लेख करणें सोईस्कर असते. म्हणून या संदर्भांत व्याजाचा दर वाढवल्यामुळें समाजाचा एकंदर खर्च कमी होतो कीं, नाही ते इथे सांगितले आहे. असे केल्यामुळें चर्चेला सोईस्कर सोपेपणा येतो. आणि शिवाय असे करण्यांत फारशी चूकहि नाहीं हें खरें. परंतु प्रत्यक्षांत विकास पावणाऱ्या अर्थव्यवस्थेच्या बाबतींत प्रश्न असतो तो असा कीं, उत्पादन शक्तींत ज्या गतिने वाढ होत आहे तिच्याशीं तुलना करतां मागणीच्या वाढीची गति कमी झालेली आहे कीं नाही. या दोन गतींत फरक असला तर उत्पादनशक्तीवरचा ताण कमी होतो आणि त्यामुळें किंमतींना स्थैर्य येते.

२ तत्त्वतः पाहिलें तर व्याजाच्या दरांत वाढ झाली कीं, त्यामुळें ग्राहकांना चालूं उत्पन्नांतून बचत करण्यास प्रोत्साहन मिळेल. आणि तसें झालें कीं, चालूं उत्पन्नांतून होणारा खर्च कमी होईल. व्याजातील दराच्या फरकाचा असा परिणाम

ठरवणारा जहाल मतवाद आपल्याला पसंत नाही असें दाखविण्याकरीतां ते द्रव्यविषयक धोरणाच्या उपयुक्ततेचा पुरस्कार करूं लागले.

शिवाय मुद्रास्फितीवर कांहींतरी तोडगा काढणे आवश्यक होते. आणि ह्या-साठी जी इतर धोरणे सुचविली जात होती ती या मंडळींच्या दृष्टीने अव्यवहार्य आणि अमेरिकन परंपरेला विरोधी होती. या मंडळीच्या समोर जी अन्य आर्थिक उद्दिष्टें होती त्यांच्याशी ह्या धोरणांचा मेळ बसत नव्हता आणि म्हणून तीं या मंडळीना अप्रिय होती. परंतु तीं धोरणें जरी टाकावू ठरविली तरी कांहींतरी उपाय योजणें आवश्यक होते आणि या संदर्भात द्रव्यविषयक धोरण हा एकच पर्याय शिल्लक होता. या धोरणाविषयीं या मंडळींच्या मनांत प्रेम होते आणि त्यावर त्यांचा विश्वासहि होता. ह्या गोष्टींत आतां इष्ट ते अपेक्षिण्याच्या वृत्तीची भर पडली. दुसरा कोणता मार्गच नव्हता तेव्हां ह्या साधनाचा उपयोग करणे आणि ते परिणामकारक ठरेल अशी स्वतःची समजूत करून घेणे आवश्यक होते. द्रव्यविषयक धोरणावर श्रद्धा ठेवणे ह्याला एक प्रकारच्या आर्थिक पलायनवादाचे स्वरूप आलें. ह्या धोरणाचा आधार नसतां तर प्रत्यक्ष परिस्थिती अधिकच विकट वाटली असती.

दुर्दैवाची गोष्ट अशी कीं, एखाद्या गोष्टीवर आपली श्रद्धा असली किंवा तिची आपल्याला अत्यंत गरज असली तरी तेवढ्यामुळे कांही ती गोष्ट आपल्याला इष्ट वाटणारे परिणाम घडवून आणूं शकत नाही. लोकांच्या मनांत बँकांच्या चाल-कांविषयी शंका होती आणि त्यामुळेच द्रव्यविषयक धोरणावरचा त्यांचा विश्वास उडाला अशीं बँकचालकांची पहिल्यापासून समजूत होती. ही समजूत कदाचित् खरीहि असूं शकेल. पण तेवढ्यावरून द्रव्यविषयक धोरणाची उपयुक्तता प्रस्था-पित होत नाहीं. परिस्थिती हीच सांकेतिक शहाणपणाची अंतिम शत्रू असते हें आपण दुसऱ्या प्रकरणांत पाहिलेले आहे. सांकेतिक शहाणपणाचे असले उत्साही पुरस्कर्ते जेव्हां त्याचा असा व्यवहारांत उपयोग करूं पाहातात तेव्हांच त्याला सर्वांत अधिक धोका असतो. सांकेतिक शहाणपण द्रव्यविषयक धोरणाला फार महत्त्व देते हे खरे. परंतु प्रत्यक्षांत हे धोरण मुद्रास्फितीला आड वळणानेच मर्यादित प्रमाणांतच पायबंद घालूं शकते. आणि या धोरणाचे दुर्दैव असे की, ही गोष्ट पुन्हां पुन्हां व्यवहारांत सिद्ध झालेली आहे.

[२]

द्रव्यविषयक धोरणाचा जादूच्या कांडीसारखा परिणाम होत नाहीं ही त्याच्या दृष्टीने दुर्दैवाची गोष्ट आहे. सरकारला जर चेटूक करण्याची शक्ति प्राप्त झाली तर आर्थिक जीवनाचे नियमन करणे पुष्कळच सोपे होईल, असें निदान युनायटेड

स्टेस्टस्‌मध्ये तरी आढळून आले आहे. ज्या द्रव्यविषयक धोरणावर कांही लोकांची विशेष मदार असते त्याच्या द्वारे असे कोणतेच चेटूक करतां येत नाही. प्रत्येक जबाबदार नागरिकाला ह्या गोष्टीचा खरे म्हणजे खेद वाटायला हवा.

मजूरी आणि किंमती यांचा जो परस्पर पाठलाग चाललेला असतो त्याच्यावर द्रव्यविषयक धोरण प्रत्यक्षपणे कोणतांच परिणाम करूं शकत नाही हें एक दुःखद सत्य आहे. द्रव्यविषयक धोरण असे कांही करूं शकेल असे त्याचे पुरस्कर्ते देखील म्हणत नाहीत. तेव्हां वस्तूंची समग्र मागणी कमी करूनं हें धोरण आर्थिक जीवनावर परिणाम करूं शकते. समग्र मागणींत घट करण्यासाठी हे धोरण व्याजाच्या दरांत वाढ करते आणि कर्ज देण्यासाठीं उपलब्ध असलेल्या द्रव्यांत घट करते. अशा रीतीने हें धोरण बँकांना कर्जे देण्यापासून आणि ग्राहकांना व उत्पादकांना ती घेण्यापासून परावृत्त करतें. ह्या मार्गाने ग्राहक व उत्पादक यांचा खर्च कमी होतो व त्यामुळें समग्र मागणी देखील कमी होते असें मानलें जातें. ह्या दोन गटांच्या खर्चांत घट झाली कीं, तिचा पर्यायाने अन्य लोकांच्या खर्चावर देखील परिणाम होतो. यामुळें वस्तूंची एकंदर मागणीच मुळी कमी होते किंवा त्या मागणींत होणाऱ्या वाढीची गति तरी कमी होते.[1] अशा रितीने मागणीचा उत्पादन शक्तीवर किंवा उपलब्ध श्रमशक्तीवर जो ताण पडतो तो कमी होतो. किंमती स्थिर रहातात. निदान असें कांही तरी होईल अशी कांही लोकांची अपेक्षा असते.

द्रव्यविषयक धोरण अर्थव्यवस्थेवर फक्त याच मार्गाने परिणाम करूं शकतें.[2]

---

१ समग्र मागणींत घट केल्यामुळें जो परिणाम होतो तोच मागणीच्या वाढीची गति कमी केल्यामुळें होईल. मात्र त्यावेळीं यंत्रसामुग्री आणि कामगारांचा पुरवठा यात वाढ होत असली पाहिजे. कोणतीहि चर्चा करतांना निश्चित राशींचा उल्लेख करणें सोईस्कर असते. म्हणून या संदर्भांत व्याजाचा दर वाढवल्यामुळें समाजाचा एकंदर खर्च कमी होतो कीं, नाही ते इथे सांगितले आहे. असे केल्यामुळें चर्चेला सोईस्कर सोपेपणा येतो. आणि शिवाय असे करण्यांत फारशी चूकहि नाहीं हें खरें. परंतु प्रत्यक्षांत विकास पावणाऱ्या अर्थव्यवस्थेच्या बाबतींत प्रश्न असतो तो असा कीं, उत्पादन शक्तींत ज्या गतिने वाढ होत आहे तिच्याशीं तुलना करतां मागणीच्या वाढीची गति कमी झालेली आहे कीं नाही. या दोन गतींत फरक असला तर उत्पादनशक्तीवरचा ताण कमी होतो आणि त्यामुळें किंमतींना स्थैर्य येते.

२ तत्त्वतः पाहिलें तर व्याजाच्या दरांत वाढ झाली कीं, त्यामुळें ग्राहकांना चालूं उत्पन्नांतून बचत करण्यास प्रोत्साहन मिळेल. आणि तसें झालें कीं, चालूं उत्पन्नांतून होणारा खर्च कमी होईल. व्याजातील दराच्या फरकाचा असा परिणाम

हे धोरण कोणत्या प्रकारे परिणाम करते त्याचे निवेदन कधी वेगळ्या पद्धतीने केले जाते. त्यावेळी या धोरणाचा द्रव्याच्या पुरवठ्यावर जो परिणाम होतो त्यावर भर दिला जातो. परंतु अशा स्वरूपाच्या विवेचनांतून देखील तोच निष्कर्ष निघतो. अर्थात या विवेचनाला जेव्हां गूढगुंजनाचे स्वरूप प्राप्त होत नाहीं, तेव्हां व्यापारी बँकांनी दिलेल्या कर्जात ज्या प्रमाणात वाढ अगर घट होते त्याच प्रमाणात द्रव्याचा पुरवठा देखील कमी जास्त होतो. द्रव्याच्या पुरवठ्यांत वाढ झाली कीं, बँकांचे कर्जदार कर्ज घेतलेल्या रकमा खर्च करून समाजाच्या एकंदर खर्चांत वाढ करतात. ज्यांच्याकडून हे कर्जदार माल विकत घेतात त्यांचा खर्चहि मग अधिक प्रमाणांत वाढतो. समाजाच्या एकंदर खर्चांत अशी वाढ झाली कीं, त्यामुळे किंमती देखील वाढतात. द्रव्याच्या पुरवठ्यांत जेव्हां घट केली जाते तेव्हां कर्जे काढण्याच्या आणि देण्याच्या व्यवहारावर बंधन पडतें आणि ह्या व्यवहारामुळें होणारा खर्चहि कमी होतो. असे करण्याचे मार्गहि तेच असतात. कर्जे देण्यासाठीं उपलब्ध असलेल्या रकमांत कपात करण्यांत येते आणि लोकांना कर्जे घेण्यापासून परावृत करण्यासाठी व्याजाचा दर वाढविण्यांत येतो. कोणत्याहि मार्गाचा अवलंब केला तरी द्रव्यविषयक धोरण जर यशस्वी व्हायचे असेल तर लोकांनीं घेतलेल्या कर्जात घट व्हायला हवी. तसे झाले कीं, समाजाचा एकंदर खर्च कमी होतो. इथपर्यन्त अर्थशास्त्रज्ञांत फारसे दुमत नाही.

कर्जे म्हणून घेतलेल्या रकमांतून जो खर्च होतो त्याचे दोन भाग पडतात हे आपण वर पाहिले आहेच त्यातला एक ग्राहक उपभोग्य वस्तूंवर खर्च करतात आणि दूसरा भाग उद्योगचालक भांडवलाच्या निवेशासाठीं वापरतात. आर्थिक दृष्टीकोन आणि वर्तणूक यांचा संपूर्ण विचार करून त्याच्या संदर्भात आर्थिक धोरणांचा अभ्यास करणे कसे फायदेशीर आहे तें आतां स्पष्ट होईल. हप्तेवंदीच्या किंवा अन्य स्वरूपाच्या कर्जावरील व्याजांत वाढ करून जर ग्रहकांनीं घेतलेल्या कर्जात घट केली तर ग्राहकांची मागणी निर्माण करण्याची प्रक्रिया एकदम थांबेल. जर ग्राहकांची मागणी स्वतंत्रपणें अस्तित्वांत येत असली तर व्याजाच्या दरांतील वाढीचा ग्राहकांच्या मागणी पत्रकावर आधी परिणाम होईल आणि मग त्यांनी घेतलेली कर्जे आणि त्यांचा खर्च यांत घट होईल. व्याजाच्या दराचा ग्राहकांच्या मागणीवर अशा प्रकारे फारसा परिणाम होईल हे शक्य वाटत नाही, पण तसे

होऊं शकेल असें एकेकाळीं प्रतिपादन केलें जात असे, परंतु आतां मात्र द्रव्यविषयक धोरणाचे अगदीं निष्ठावंत पुरस्कर्ते देखील अशा तशा प्रकारचा युक्तिवाद करीत नाहीत.

होण्याचा संभव मात्र असतो. परंतु आतां मात्र अशीं परिस्थिती आहे कीं, ग्राहकांची कर्जें व त्यातून त्यानीं केलेली खरेदी यांत कपात करण्याचा कोणताहि प्रयत्न केला कीं, मागणी निर्माण करणारी यंत्रणा त्याला विरोध करेल. ग्राहक जर कमी प्रमाणांत कर्जें काढूं लागले तर ग्राहकांची मागणी निर्माण करण्यांत गूंतलेले लोक ती मागणी वाढविण्यासाठीं अधिक प्रयत्न करूं लागतील किंवा व्याजाच्या दरांतील वाढीमुळें जो परिणाम होईल तो पुसून टाकण्यासाठीं ते कांहींतरी उपाययोजना करतील.

अशी उपाययोजना करणें अगदींच सोपें आहे. ग्राहकांनीं घेतलेली कर्जें हप्तेबंदीनें फेडलीं जातात आणि या हप्तेबंदीचें गणित असें असतें कीं, व्याजाच्या दरांत जरी खूप वाढ झाली तरी त्यामुळें परतफेडीच्या मासिक हप्त्यांत फारच थोडी वाढ होते. एक उदाहरण घेऊन हें स्पष्ट करतां येईल. समजा एखाद्या माणसाने नवी मोटार विकत घेण्यासाठीं १८०० डॉलर्सच्या कर्जचिठ्ठीवर सही केली आहे आणि ही रक्कम चौवीस महीन्यांत फेडायची आहे. शिवाय असेहि समजा कीं, ह्या कर्जावर ६ टक्के व्याज देण्याचे त्या माणसाने कबूल केले आहे. आतां या माणसाला व्याज म्हणून एकंदर २७६ डॉलर्स द्यावे लागतील आणि दर महीन्याला कर्जफेडीचा हप्ता म्हणून त्याला ८४ डॉलर्स भरावे लागतील. समजा व्याजाचा दर एक तृतियांशाने वाढवून जर आठ टक्के करण्यांत आला तर एकंदर व्याजाची रक्कम २८८ डॉलर्स होईल. परंतु त्याच्या मासिक हप्त्यांत मात्र फक्त तीन डॉलर्सची वाढ होईल. अशा प्रकारें व्याजाचा दर एक तृतियांशाने वाढवला तर कर्जफेडीचा हप्ता फक्त एक तिसांशाने वाढतो[1] परतफेडीच्या हप्त्यांत ही जी वाढ होते ती देखील परतफेडीच्या मुदतींत वाढ करून टाळतां येते. प्रत्यक्षांत ग्राहकाला विम्याचे, तपासणीचे आणि अशाच अन्य गोष्टींचे पैसे द्यावे लागतात आणि हा जो जादा आकार असतो त्यांत व्याजांतली ही वाढ लपून जाते. ग्राहक जेव्हां एखादी खरेदी करण्याचे ठरवीत असतो तेव्हां तो व्याजाचा दर हिशेवांत घेत नाहीं तर मासिक हप्ता विचारांत घेतो. ही गोष्ट एकदां लक्षांत घेतली कीं, मग व्याजाच्या दरांत जरी बरीच मोठी वाढ झाली तरी तिचे परिणाम टाळणें किती सोपें आहे तें चटकन् ध्यानांत येईल. विसाव्या शतकाच्या पन्नाशीच्या प्रथमार्धांत द्रव्यविषयक धोरणावर विशेष भर होता. ह्या काळांत जेव्हां जेव्हां व्याजाच्या दरांत वाढ होई तेव्हां तेव्हां ग्राहकांनीं घेतलेल्या कर्जांत देखील बरीच वाढ होई. मागणीची निर्मिती करण्याची व त्यासाठीं कर्जे

१ कन्झुमर इन्स्टॉलमेन्ट क्रेडिट, खंड१, पृष्ठ ६०-६१.

देण्याची जी प्रक्रिया असते ती ग्राहकांच्या खर्चांत वाढच करीत होती. त्या खर्चावर ती निर्बंध घालीत नव्हती.

जो पर्यंत द्रव्यविषयक धोरण आणि ग्राहकांच्या गरजा निर्माण करणारी यंत्रणा यांच्यांतला विरोध आपण नष्ट केलेला नाहीं आणि पूर्णपणें लक्षांतहि घेतलेला नाहीं आणि जोपर्यन्त ही गरजा निर्माण करणारी यंत्रणा अत्यंत महत्त्वाची आहे असें आपण मानतो, तो पर्यन्त द्रव्यविषयक धोरणाचा ग्राहकांच्या खर्चावर जवळ जवळ कोणतांच परिणाम होणार नाही. द्रव्यविषयक धोरण ग्राहकांच्या कर्जावर आणि खर्चांवर फारसा परिणाम करूं शकत नाही यावाबतींत आतां पुष्कळसे एकमत झालेले आहे. परंतु या गोष्टीची कारणें मात्र अर्थशास्त्रज्ञांच्या ध्यानांत पूर्णपणें आलेलीं नाहीत.

[३]

द्रव्यविषयक धोरणांच्या साहाय्यानें उद्योगधंद्यांतील भांडवलाच्या निवेशावर नियंत्रण घालण्याचा प्रयत्न केला तर त्यामुळे देखील एका अन्य आर्थिक उद्दिष्टाला याच स्वरूपाचा धोका पोहोंचतो ही गोष्ट आतां स्पष्ट होईल. उत्पादनाला आपण सर्वांत अधिक महत्व देतो. द्रव्यविषयक धोरण भांडवलाचा निवेश कमी करून त्याच्या द्वारे किंमतीतील वाढ टाळण्याचा प्रयत्न करतें. परंतु उत्पादनांतील वाढ भांडवलाच्या निवेशावर अवलंबून असते. याचाच अर्थ असा कीं, द्रव्यविषयक धोरणाचें उद्दिष्ट आणि उत्पादनाला आपण दिलेलें प्राधान्य यांत तीव्र विरोध आहे. पण असे असले तरी बँकांचे आणि उद्योगधंद्यांचे जे चालक द्रव्यविषयक धोरणाला फार महत्त्व देतात तेच उत्पादन फार महत्त्वाचें आहे असें आग्रहाने सांगत असतात. उत्पादनांत वाढ होणें ही त्यांना फार समाधानाची गोष्ट वाटते.

प्रत्यक्षांत द्रव्यविषयक धोरण आणि उत्पादन यांच्यांतला विरोध तितकासा तीव्र नाहीं. याला कारण म्हणजे एक आर्थिक समज असा कीं, द्रव्यविषयक धोरण भांडवलाच्या निवेशावर परिणाम न करतां, किंमतीच्या पातळीवर परिणाम घडवून आणतें. १९५३ ते १९५७ या काळांत मिस्टर जॉर्ज हम्फ्रे हे सेक्रेटरी ऑफ द ट्रेझरी (वित्तखात्याचे प्रमुख) होते. ते नेहमी असे मत व्यक्त करीत असत कीं, भांडवलाच्या निवेशांत सारखी वाढ होत रहाणें अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने आवश्यक आहे आणि त्यासाठीं करांत कपात करणे वगैरे मार्गांनी उद्योगचालकांना प्रोत्साहन देणे इष्ट आहे. परंतु असें म्हणत असतांनाच द्रव्याच्या पुरवठ्यावर निर्बंध घालण्याच्या धोरणाचा ते जोरदार पुरस्कार करीत होते. या परस्पर विरोधी भूमिकांचा जर मेळ घालायचा असेल तर त्यासाठी आपल्याला असे गृहीत धरायला हवे कीं, कोणत्या तरी अद्‌भूत किमयेने द्रव्यविषयक धोरण किंमती स्थिर ठेवूं शकेल आणि ते देखील उत्पादकांची कर्जें, भांडवलाचा निवेश आणि खर्च यांत कपात न करतां.

ज्या गतिने कोणत्याहि वेळीं आर्थिक विकास होत असेल ती योग्य व स्पृहणीय आहे असें मानण्याची आपली प्रवृत्ती असते हें आपण नवव्या प्रकरणांत पहिलेलें आहे. उत्पादन आणि भांडवलाचा निवेश कमी करणारे द्रव्यविषयक धोरण यांत जो विरोध आहे त्याची तीव्रता वरील प्रवृत्तीमुळें कमी होते. खरे म्हणजे आर्थिक विकासाच्या गतिवद्दल आपल्याला फारशी काळजी वाटत नाहीं. त्यामुळें ज्या धोरणामुळे भांडवलाचा निवेश कमी होऊन आर्थिक विकासाची गति मंदावते त्या धोरणाला आपला फारसा विरोध नसतो.. फक्त त्या धोरणामुळे मोठ्या प्रमाणावर वेकारी निर्माण झाली तर मात्र ती आपल्याला नको असते.

परंतु जो भांडवलाचा निवेश करणे अर्थसंस्थांना इष्ट आणि फायदेशीर वाटते तो करण्यास जर या धोरणामुळें पायवंद वसला तर त्या अर्थसंस्था या धोरणाला विरोध करणारच. परंतु प्रत्यक्षांत मात्र द्रव्यविषयक धोरण आणि उत्पादन यांतला विरोध तीव्र स्वरूप धारण करीत नाही आणि त्याचे आणखी एक महत्त्वाचे कारण वरील मुद्द्याचा विचार करतांना आपल्याला सांपडूं शकेल.

[४]

ज्यावेळीं सर्व उत्पादनशक्तीचा उपयोग केला जात असतो त्यावेळीं मुद्रास्फितीचे संकट उपस्थित होतें आणि तिचें नियंत्रण करण्याची आवश्यकता भासते. या परिस्थितींत भरपूर नफा मिळत असतो आणि पुढेंहि तो मिळण्याचा शक्यता असते. त्यामुळें भांडवलाच्या निवेशांत वाढ करणें हें समाजाच्या दृष्टीने फायदेशीर आणि क्रमप्राप्त आहे असेच कोणत्याहि अर्थसंस्थेला वाटणें स्वाभाविक आहे. (वस्तूंच्या उत्पादनांत वाढ करून समाजाची जी आपण सोय करतो तिचे या अर्थसंस्थेला फार महत्त्व वाटेल आणि आपल्या भांडवलाच्या निवेशामुळें एकंदर खर्चांत वाढ होऊन भाववाढीला जे प्रोत्साहन मिळेल तिकडे मात्र या अर्थसंस्थेचें लक्ष जाणार नाहीं.)

ह्या परिस्थितींत व्याजाच्या दरांत जरी थोडी फार वाढ झाली तरी तिचा वरील कारणांमुळें भांडवलाच्या निवेशावर फारसा परिणाम होणार नाहीं. परंतु कोणत्याहि अर्थसंस्थेच्या व्यवहारावर द्रव्यविषयक धोरण परिणाम करूं पाहते तेव्हा तें व्याजाच्या दरांतील चढउतारांचाच उपयोग करीत असते.

द्रव्यविषयक धोरण जर कडकपणें अमलांत आणलें तर व्याजाच्या दराच्या वाढीमुळें कांही अर्थसंस्थाच्या व्यवहारांना लगाम घातला जाईल प्रत्यक्ष व्यवहारांत व्याजाचे दर फारसे वरखालीं सरकूं शकत नाहीत त्यामुळें कर्जे देण्यासाठीं उपलब्ध असलेल्या रकमांचे वाटप करावे लागेल. याचाच अर्थ असा कीं, कांहीं अर्थसंस्थाना हवे तितकें कर्ज मिळणार नाहीं. जर द्रव्यविषयक धोरणाची कडकपणें अमलबजा-

वर्णीं केली तर भांडवली खर्च खात्रीने कमी होईल. अखेरीस उत्पादनशक्तीवर पडणारा ताण कमी होईल आणि त्यामुळें किंमती स्थिर होतील. पण यामुळें उत्पादनाचे आपल्याला जें महत्त्व वाटतें त्याला ढळ पोहोंचेल. त्याचप्रमाणे आर्थिक सुरक्षितता आणि हे द्रव्यविषयक धोरण यामधला संघर्ष देखील तीव्र स्वरूप धारण करील. परंतु इतकी परिस्थिती येण्यापूर्वीच दुसरा एक फारच महत्त्वाचा प्रश्न उपस्थित होईल. तो प्रश्न म्हणजे द्रव्यविषयक धोरणाचे निरनिराळ्या प्रकारच्या आणि आकारांच्या अर्थसंस्थांवर होणारे भिन्न परिणाम.

आपण असे पाहिलेच आहे की, ज्यावेळीं मागणींत वाढ होत असते व सर्व उत्पादनशक्ती उपयोगांत आणली जात असते त्यावेळीं मक्तेदारीप्रधान क्षेत्रांतील अर्थसंस्थाजवळ एक प्रकारचा सुप्त नफा असतो. ह्या परिस्थितीमुळें जर व्याजाच्या दरांत वाढ झाली तर तिचा बोजा ग्राहकांवर टाकणें या अर्थसंस्थाना शक्य असते. (मजूरींतील वाढीचा बोजा त्या ग्राहकांवर टाकूं शकतात, तेव्हां वाढलेल्या व्याजाचा बोजा देखील त्या ग्राहकावर टाकूं शकतील हें उघडच आहे.) आपल्या किंमतींत आणि उत्पन्नांत वाढ करून त्या तो सुप्त नफा प्रत्यक्षांत मिळवूं शकतात आणि त्याचा उपयोग भांडवलाच्या निवेशासाठीं करूं शकतात. भांडवलाच्या निवेशासाठीं लागणाऱ्या रकमेचा बराचसा भाग चालूं उत्पन्नांतून मिळेल इतकी किंमतींची पातळी उंच ठेवली पाहिजे असा युक्तिवाद या अर्थसंस्था गेली अनेक वर्षे करीत आल्या आहेत. आणि त्याच्या आधाराने त्यांनी किंमतीत बरीच वाढ केली आहे. याचा अर्थ असा कीं, ज्या उद्योगांजवळ सुप्त नफा असतो त्यांना द्रव्यविषयक धोरणाचे परिणाम टाळतां येतात. पुन्हां थोड्या अर्थसंस्था आपली गिऱ्हाइके असाव्यात असें बँकाना वाटत असतें. आणि या अर्थसंस्था सरळ बाजारांत जाऊन अधिक भांडवल उभारूं शकतात. त्यामुळें द्रव्यविषयक धोरणाच्या साह्यानें त्यांना मिळणारा भांडवलाचा पुरवठा कमी करतां येत नाहीं.

स्पर्धाप्रधान क्षेत्रांतल्या अर्थसंस्थांच्या मालाच्या किंमती आणि त्यांचे उत्पादन खर्च बाजारांतील परिस्थितीनुसार निश्चित होत असतात. म्हणजेच त्या अर्थसंस्थांचे या गोष्टीवर नियंत्रण नसतें आणि त्यामुळे वाढलेल्या व्याजाचा बोजा गिऱ्हाइकावर टाकणें त्यांना शक्य नसते. तसेंच बँकाकडून मिळणाऱ्या कर्जांत कपात झाली कीं, बाजारांत आपले रोखे विकून भांडवलाची तूट भरून काढणे त्यांना शक्य नसते. याचा अर्थ असा कीं, शेतकरी, छोटे व्यापारी, सुविधा पुरविणारे उद्योग आणि छोटी बांधकामें करणारे उद्योग हे सर्व स्पर्धाप्रधान क्षेत्रांत असल्यामुळें द्रव्यविषयक धोरण त्यांच्या व्यवहारावर परिणाम करूं शकते. जे उद्योग स्वतःच्या किंमतीचे नियंत्रण अधिक प्रमाणावर करूं शकतात त्यांच्यावर द्रव्यविषयक धोरणाचा

ज्यावेळीं परिणाम होतो त्याच्या पुष्कळच आधीं त्या धोरणाचा परिणाम ह्या स्पर्धाप्रधान क्षेत्रांतील अर्थसंस्थावर होतो.

विसाव्या शतकाच्या पन्नाशींच्या काळांतील परिस्थितीकडे आपण पुन्हां एकदां वळूंया. त्या काळांत आणि विशेषतः १९५५ आणि १९५६ ह्या वर्षांत शेती, राहती घरें बांधणाऱ्या अर्थसंस्था आणि इतर छोटे उद्योग यांतील भांडवलाचा निवेश निश्चितपणें कमी झाला. परंतु त्याचवेळीं मोठ्या अर्थसंस्था आणि यंत्र सामुग्रीचे उत्पादन करणाऱ्या अर्थसंस्था यांतील भांडवलाचा निवेश कमाल मर्यादा गांठीत होता. अर्थशास्त्रांत कोणतीहि गोष्ट सिद्ध करणें अवघड असते. परंतु तात्त्विक दृष्ट्या जें संभाव्य वाटतें त्याला जर अनुभवांचा दुजोरा मिळाला तर तिकडे लक्ष देणें इष्ट असते.

मोठ्या आणि बलिष्ठ अर्थसंस्था द्रव्यविषयक धोरणाचा पुरस्कार कां करतात तें समजणे आतां सुलभ होईल. त्या धोरणाची अमलबजावणी दीर्घकाल पर्यन्त आणि कडकपणें जर केली नाही तर त्याचा ह्या अर्थसंस्थांवर फारसा परिणाम होत नाहीं. पण हें जर खरें असेल तर तें धोरण कितपत व्यवहार्य आहे या बद्दल गंभीर शंका उपस्थित होतात. ह्या धोरणाचा मोठ्या आणि बलिष्ठ अर्थसंस्थाच्या भांडवलाच्या निवेशावर परिणाम होण्यापूर्वीच छोट्या अर्थ-संस्थाना मिळणाऱ्या भांडवलाचा पुरवठा पुष्कळच कमी होईल. उत्पादनांतील वाढ आणि द्रव्यविषयक धोरण यांतला विरोध ह्या छोट्या अर्थसंस्थाना अत्यंत स्पष्टपणें आणि दुःखदपणें जाणवेल. ह्यामुळें त्या धोरणाची कडकपणें अमल-बजावणी करणें अवघड होईल. जें धोरण अनेक छोट्या अर्थसंस्थाची मुस्कटदाबी करतें आणि मोठ्या व बलिष्ठ अर्थसंस्थाना सैल सोडतें तें सामाजिक दृष्ट्या कितपत इष्ट आहे असा प्रश्न साहाजिकच उपस्थित होईल. पण हा प्रश्न जरी आपण बाजूला ठेवला तरी शेतकरी आणि छोटे उद्योग चालक यांचे राजकीय सामर्थ्य कांहीं थोडे नसते हें आपण ध्यानांत घ्यायला हवें; हे सामर्थ्य द्रव्यविषयक धोरणाच्या मार्गांत खात्रीने अडथळे निर्माण करील.

[५]

उद्योगधंद्यांतील भांडवलाच्या निवेशावर जो खर्च होतो तो अत्यंत अस्थिर स्वरूपाचा असतो ही गोष्ट आज अनेक वर्षें सर्वांनाच माहित आहे. (इथें ग्राहकांनी घेतलेलीं कर्जे विचारांत घ्यायची नाहीत) आणि सरकारें जो खर्च करतात तो पुष्कळच स्थिर स्वरुपाचा असतो. ग्राहकांचा खर्च त्यांच्या उत्पन्नावर अवलंबून असतो. तो संवयीवर आधारलेला असतो. सरकारला मिळणारें उत्पन्न जरी अस्थिर

असले तरी त्याच्या मानाने सरकारी खर्च अधिक स्थिर असतो. उलट भांडवली खर्च भावी नफ्याच्या अंदाजावर अवलंबून असतो. भविष्यकाळाचा एक विशेष असा कीं, तो अज्ञात असतो त्यामुळें त्याच्याबद्दलचे अंदाज बदलत असतात व त्यानुसार भांडवली खर्चात देखील चढउतार होत असतात. भांडवली खर्चांतले हे चढउतार भावी नफा कमी अधिक करतात आणि अशा रीतीने भविष्यकालीन परिस्थितीच बदलून टाकतात.

द्रव्यविषयक निर्बंध जर दीर्घकाल चालूं ठेवण्यांत आले तर त्यांचा कालांतराने मोठ्या अर्थसंस्थाच्या भांडवलाच्या निवेशावर परिणाम होईल. छोट्या अर्थसंस्था आणि उद्योग यांच्या कर्जांत आणि भांडवली खर्चांत आधी कपात होईल आणि त्याचा परिणाम अर्थव्यवस्थेंतील मक्तेदारी प्रधान क्षेत्रातील मागणी व अपेक्षित नफा यांच्यावर होईल. असे झाले कीं त्या क्षेत्रातील भांडवलाच्या निवेशाच्या योजनांत फेरबदल होतील हे फेरबदल मोठ्या प्रमाणावर होण्याची शक्यता असते.

अशा रीतीने द्रव्यविषयक धोरण आर्थिक व्यवहाराच्या अत्यंत अस्थिर घटकावर परिणाम करतें. या कारणानेच त्या धोरणामुळे फार मोठे संकट ओढवण्याची शक्यता निर्माण होते. ते धोरण आणि उत्पादन यामधल्या विरोधाकडे दुर्लक्ष करून जर त्या धोरणाची कडकपणें आणि सातत्याने अंमलबजावणी केली तर तें अर्थव्यवस्थेंतील मागणी कमी करूं शकेल, पण ही मागणींतील घट फार मोठ्या प्रमाणावर होण्याचा धोका असतो. किंवा अधिक काटेकोरपणें बोलायचें तर असें म्हणता येईल कीं, ह्या धोरणाचा काय परिणाम होईल त्याबद्दल अपरिहार्य अनिश्चितता असते. समग्र मागणीचा जो सर्वांत चंचल व अनिश्चित घटक त्यावर निर्बंध घालण्याचा हें धोरण प्रयत्न करते. सहाजिकच त्या धोरणाचा किंमती स्थिर राखण्यासाठीं जर उपयोग केला तर त्यामुळें भांडवलाचा निवेश कमी होऊन मोठी मंदी येईल असा धोका नेहमीच असतो. ह्या मंदीवर उपाय नाहीं अशांतला भाग नाहीं; पण ती येणें इष्ट नव्हे हे देखील तितकेंच खरें. शिवाय दुर्दैवाची गोष्ट अशी कीं, या गोष्टींचा केवळ तात्विक पातळीवर विचार करून भागत नाहीं. हें पुस्तक अशावेळीं छपाईला जात आहे कीं, ज्यावेळीं द्रव्यविषयक धोरणामुळें किंमती स्थिर झालेल्या नाहींत, परंतु त्यामुळें भांडवलाच्या निवेशांत मात्र फार मोठ्या प्रमाणांत घट होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. असें झालें तर त्याचे परिणाम दीर्घकाल टिकून राहतील अशांतला भाग नाहीं; परंतु तरी देखील ते त्रासदायक ठरण्याची शक्यता आहे.

सांकेतिक शहाणपणाचा द्रव्यविषयक धोरणावर अजून दृढ विश्वास टिकून राहातो; इतकेच नव्हे तर तें यशस्वी झालेलें आहे असें मानलें जातें. दुसऱ्या कोणत्याच आर्थिक धोरणाच्या बाबतींत हा प्रकार इतक्या प्रमाणांत घडत नाहीं. मुद्रास्फिती हा संपन्नसमाजांच्या जीवनांतला नित्याचा प्रश्न आहे. आणि या प्रश्नाच्या बाबतींत द्रव्यविषयक धोरण जितक्या प्रमाणांत यशस्वी ठरतें तितक्या प्रमाणांत तें धोकादायक असतें. द्रव्यविषयक धोरणाविषयीं ज्यांना फार प्रेम वाटतें त्यांनीं अधून मधून स्वतःला एक प्रश्न विचारायला हवा. तो असा कीं, आपल्या अर्थव्यवस्थेच्या प्रतिष्ठेबद्दल आपल्याला अधिक प्रेम वाटायला नको कां ?

प्रकरण सतरावें

उत्पादन आणि किंमतींचें स्थैर्य यांतील विरोध

आधुनिक आर्थिक धोरणांच्या राजकीय अंगाचा जर आपण विचार केला तर आपल्याला असें आढळून येतें कीं, द्रव्यविषयक धोरण हें परंपरानिष्ठांचें आवडतें आर्थिक शस्त्र आहे. वित्तविषयक धोरण हें उदारमतवाद्यांचे आवडतें शस्त्र आहे. सामान्यपणें अर्थशास्त्रज्ञ असें मानतात कीं, वित्तविषयक धोरण हें अंतिम आर्थिक शस्त्र आहे. द्रव्यविषयक धोरणाचें पुरस्कर्ते तें धोरण परिणामकारक असतें असें आग्रहाने सांगत असतात. याचें एक कारण असें असावें कीं, या धोरणाच्या परिणामकारकतेविषयीं त्यांच्याच मनांत सुप्त शंका असाव्यात. वित्तविषयक धोरण परिणामकारक असतें कीं नाहीं यावद्दल त्या मानानें क्वचितच वाद होतो. शिवाय या धोरणाला केन्सने आशिर्वाद देऊन ठेवला आहे. सरकारी खर्चांत वाढ करणें हा केन्सने सुचविलेला बेकारीवरचा उपाय. वित्तविषयक धोरण हें त्या उपायाशीं निगडीत आहे. त्यामुळें त्याला अजूनहि बौद्धिक जहालपणाचा कांहींसा वास येतो.

द्रव्यविषयक धोरणाच्या मानानें वित्तविषयक धोरण हें साधें असतें आणि तें इष्ट ते परिणाम सरळपणें घडवून आणतें. या धोरणाच्या भोंवती गूढशक्तीचे वलय नाही. पुन्हां कोणतीहि कृति आणि तिचा अंतिम परिणाम यांना जोडणारी जी तार्किक सांखळी असते तिच्यावर अर्थशास्त्रांत नेहमीच बारकाईनें लक्ष ठेवावें लागतें. वित्तविषयक धोरणाच्या बाबतीत ही सांखळी पुष्कळच तोकडी आहे आणि काय व्हायला हवें त्याबाबतची विधानें या सांखळींत फार थोडीं आहेत. सरकार खर्च करतें त्यापेक्षां अधिक कर बसवितें. करांचें उत्पन्न आणि खर्च यामध्ये जो फरक असतो तेवढीं रक्कम खर्च न होता शिल्लत रहाते. त्यामुळें एकंदर देशाचा खर्च कमी होतो. करांपासून होणारें उत्पन्न आणि सरकारी खर्च यांत जो फरक असतो (अमेरिकन सरकारच्या एकत्रित अंदाजपत्रकांत हा फरक शिलकी उत्पन्न म्हणून नोंदलेला असतो. [1]) तो जर पुरेशा प्रमाणांत वाढविला तर अर्थव्यवस्थेंतील

१ अंदाजपत्रकांतील तक्त्यांत एका बाजूला सर्व मिळकत दाखविलेली असते आणि दूसऱ्या बाजूला सर्व खर्च दाखविलेला असतो. अंदाजपत्रकांत नेहमी ज्या रकमा दाखविलेल्या असतात आणि ज्या रकमांचा उल्लेख दर वर्षीच्या सरकारी खर्चावरील चर्चेंत केला जातो त्याहून वरील रकमा भिन्न असतात. रूढ अंदाजपत्रकांत ज्या रकमा दाखवलेल्या असतात त्यांतून कांहीं मिळकत आणि कांहीं खर्च वगळलेले असतात. उदाहरणार्थ, सामाजिक सुरक्षिततेच्या संदर्भात होणारी मिळकत व खर्च. याला कारण इतकेंच कीं, तसें करण्याची पहिल्यापासून पद्धत आहे.

एकंदर खर्चाचा उत्पादनशक्तीवर पडणारा ताण नष्ट होईल आणि आर्थिक व्यवहारांत शिथिलता जर वऱ्यांच प्रमाणांत आली तर अर्थसंस्था किंमती वाढवणार नाहीत आणि मजूरांच्या जादा वेतनाच्या मागण्या मान्य करणार नाहीत. कारण आपण वर पाहिल्याप्रमाणें अल्पकालीन कमाल नफा आणि दीर्घकालीन कमाल नफा यांत विरोध आहे असें त्यांना आढळून येईल. स्पर्धानिष्ठ क्षेत्रांत देखील मागणी किंमतींना वर ओढणार नाही. याचा परिणाम असा होईल कीं, किंमती स्थिर रहातील. मात्र हें धोरण फार ताणण्यांत आलें तर त्या खाली येतील.

अर्थसंस्थांना द्रव्यविषयक धोरणाचा परिणाम जाणवतो तो उत्पादन साधनांच्या वाढलेल्या किंमतीच्या स्वरूपांत. किंवा ही साधनें दुर्मिळ होतात. भांडवलासाठीं लागणाऱ्या कर्जांच्या बाबतींत हा प्रकार विशेषत: घडतो. मोठ्या अर्थसंस्था आपल्या मालाला मिळणाऱ्या किंमतीचे नियंत्रण करूं शकतात आणि त्यामुळें उत्पादन खर्चातील वाढीचा बोजा त्या ग्राहकांवर टाकूं शकतात. तसेच जर कर्जे मिळणें अवघड झालें तर त्या अन्य मार्गांनीं भांडवल उभारूं शकतात. स्पर्धाधिष्ठित क्षेत्रांतील छोट्या अर्थसंस्थांना ही पळवाट उपलब्ध नसते. वित्तविषयक धोरण मुख्यत: मागणी कमी करून इष्ट तो परिणाम घडवून आणतें. अर्थसंस्था लहान असोत किंवा मोठ्या असोत, बलिष्ठ असोत किंवा दुर्बल असोत त्या सर्वांच्याच मालाची मागणी वित्तविषयक धोरणामुळें कमी होते. मागणीच्या आलेखावरील या परिणामांतून कोणत्याच अर्थसंस्थेला आपली सुटका करून घेता येत नाहीं. याचा अर्थ असा नव्हें कीं, मक्तेदारीप्रधान व स्पर्धाधिष्ठित क्षेत्रावर आणि लहान किंवा मोठ्या अर्थसंस्थावर वित्तविषयक धोरणाचा एकच परिणाम होतो. परंतु हा परिणाम अधिक सारखा असतो एवढें मात्र खरें.[1]

असें असलें तरी दुसऱ्या जागतिक युद्धानंतर युनायटेड स्टेस्टस् मध्यें असें आढळून आले आहे कीं, मुद्रास्फितीपासुन संरक्षण करण्याचा दृष्टीने वित्तविषयक धोरण हें एक दुबळें साधन आहे. ते परिणामकारक ठरलें नाहीं असा याचा अर्थ नव्हे. तें दुबळें ठरलें याचे कारण असें कीं, त्याच्या प्रमुख पुरस्कर्त्यांनी देखील त्याचा तडफदारपणें उपयोग करावा असा आग्रह धरला नाहीं. तत्त्वत: त्याला लोकांचा पाठिंबा होता पण व्यवहारांत मात्र नव्हता. याचें कारण शोधायला फार दूर जायला

---

१ जेव्हां राखीव नफा अस्तित्वांत असतो त्यावेळीं मक्तेदारीप्रधान क्षेत्रांतील उद्योगांच्या किंमतीं अधिक सावकाश खालीं येतात आणि त्यांचे उत्पन्नहि अधिक सावकाश कमी होतें. स्पर्धाधिष्ठित क्षेत्रांतील उद्योगांच्या बाबतीत ह्या गोष्टी अधिक त्वरेने घडतात. कारण त्या उद्योगांजवळ राखीव नफा नसतो.

नको. आर्थिक उद्दिष्टांतील अनिर्णित संघर्षामुळें हा प्रकार घडला. कोणत्याहि गोष्टींचा विचार करतांना तिचा संबंध सामाजिक संदर्भ लक्षांत घेणें कसें इष्ट असते त्याचा इथें आपल्याला प्रत्यय येतो.

[२]

जितका किमान खर्च केल्याशिवाय समाजाचे चालण्यासारखें नसते तितकी साधारणत: सरकारी खर्चाची पातळी असते. याची कारणें कोणतीं त्याचा तपशीलवार विचार आपल्याला पुढील प्रकरणांत करावयाचा आहे. इथें वरील प्रवृतीचीं नोंद करूनच आपण पुढें जाऊं. सरकार जीं कामें करतें त्यांत ढिलाई व उघळपट्टी फार होते अशी टीका आपल्या राजकीय जीवनांत नेहमीच होत असते. ती गैरलागूं असते अशांतलाहि भाग नाही. परंतु ह्या टीकेमुळें आपण मूळ मुद्याच्या बाबतींत घोटाळ्यांत पडता कामा नये. अत्यंत महत्वाची कार्यें करतांना देखील उघळपट्टी होऊं शकते आणि पुष्कळदां ती तशी होते देखील. खर्च कमी करून उघळपट्टी क्वचितच टाळतां येते. उघळपट्टी थांबविण्यापेक्षां तें कार्यच थांबविणें अधिक सोपें असतें आणि पुष्कळदां तसेंच करण्यांत येते. सध्यां आपण मुद्रास्फितीच्या संदर्भांत विचार करीत आहोत. ह्या मुद्रास्फितीच्या काळांत सरकारतर्फे केल्या जाणाऱ्या कार्याची बाजू नेहमीपेक्षां अधिक डळमळीत होते. कारण त्यावेळीं किंमतींच्या एकंदर पातळींत वाढ होत असते परंतु सरकारी अर्थसंकल्पांत आणि पगारांच्या श्रेणींत तितक्या प्रमाणांत वाढ होत नाहीं.

याचा अर्थ असा होतो कीं, मुद्रास्फितीला आळा घालण्यासाठीं वित्तविषयक धोरणाचा उपयोग करायचा झाला तर करांत वाढ करणें बहुधा आवश्यक असतें. सांकेतिक शहाणपणाच्या विशेष अर्थशून्य कल्पनांनुसार सरकारी खर्च कमी करावा किंवा पुढें ढकलावा अशी सूचना आग्रहपूर्वक केली जाते आणि त्यामुळें आशेला थोडी जागा निर्माण होते. परंतु प्रत्यक्षांत असें कांहीं करणें मात्र पूर्णपणें अशक्य ठरतें. या बाबतींत अनुभवाने अगदीं पक्का धडा देऊन ठेवलेला आहे. जेव्हां जेव्हां मुद्रास्फितीचा धोका निर्माण होतो (आणि कधीं कधीं तो निर्माण झालेला नसतांना देखील.) तेव्हां तेव्हां आर्थिक क्षेत्रांतील प्रवक्ते सरकारला आणि काँग्रेसला असें आग्रहपूर्वक सांगत असतात कीं, खर्च कमी करायला हवा. सरकार आणि काँग्रेस देखील स्वत:ला हीच गोष्ट पटवून देत असतात. परंतु अर्थव्यवस्थेंतील एकंदर खर्च पुष्कळशा प्रमाणांत कमी होईल असें सरकारतर्फे विशेष कांहींच केलें जात नाहीं. पुष्कळदां तर ह्या बाबतींत कांहींच कपात होणार नाहीं याबद्दल लोकांची पुरती खात्री पटली आहे. त्यामुळें दर हिवाळ्यांत जेव्हा काँग्रेस अर्थसंकल्पांत कपात

करण्यावावत चर्चा करते तेव्हा तिला एखाद्या निरुपद्रवी सामाजिक संकेताचें स्वरूप येतें. अर्थसंकल्प सादर केल्यानंतर कांहीं दिवसांनीं ती चर्चा ऐन भरांत येते. मग सरकारी उघळेपणाची तीव्र शब्दांत हजेरी घेतली जाते आणि खर्चांत फार मोठ्या प्रमाणावर कपात करण्याची आश्वासने दिलीं जातात. अशा रीतीने संतप्त दैवतांना शांत केलें जातें. ह्या समारंभाचें वर्णन मोठ्या गंभीरपणें वृत्तपत्रें आणि रेडियो यांच्या द्वारें केलें जातें. त्यानंतर जो सरकारी खर्च अगदीं आवश्यक भासतो तो मंजूर केला जातो. आणि याचा परिणाम असा होतो कीं, अर्थसंकल्पांत कपात होण्याऐवजीं वाढ मात्र होते.

मागणी कमी करण्यासाठीं जेव्हां करांत वाढ करायची असते तेव्हा पहिल्या प्रथम ही गोष्ट लोकांना नीटपणें समाजावून सांगण्याचा प्रश्न उपस्थित होतो. जेव्हा मंदी आलेली असते आणि मागणी अपुरी असते तेव्हा समग्र मागणी आणि रोजगारी यांत वाढ करण्यासाठीं कर कमी करायला हवेत आणि सरकारी खर्च वाढवायला हवा, ही गोष्ट आतां जवळ जवळ सर्वमान्य झालेली आहे. असें करणें तर्काला धरून आहे असें उघड उघड दिसतें. मुद्रास्फितीवर इलाज म्हणून सरकारी खर्चांत कपात करायला हवी, हें देखील तर्काला धरून आहे असें वाटतें. तसें करणें प्रत्यक्षांत अशक्य असतें ही गोष्ट अर्थांत वेगळी, परंतु मुद्रास्फितीला आळा घालण्यासाठीं करांत वाढ करायला हवी हें वर वर पाहतां. तरी तर्कशुद्ध वाटत नाहीं. करांत वाढ केली कीं, पहिल्यानें ग्राहकाचें उत्पन्न कमी होतें आणि रहाणीचा खर्च वाढतो. आणि हें अशा वेळीं घडतें, कीं जेव्हा मुद्रास्फितीमुळें पुष्कळशा लोकांना आपले नित्याचे राहणीचे मान टिकवून धरणें अवघड झालेलें असते: इतर करांमुळें उत्पादन खर्चांत वाढ होते. यामुळें करांत वाढ करून मुद्रास्फितीला आळा घालूं पाहणें हा उलटाच प्रकार आहे असें वाटूं लागते. अनेकांना असें वाटत असतें कीं, आर्थिक संबंध व व्यवहार जेव्हा फार गुंतागुंतीचें होतात तेव्हां त्यांत कांहींतरी चूक असते. त्यानां असेंहि वाटतें कीं सत्याचा प्रत्यय सरळ साध्या मनालाच येऊं शकतो. आणि हें मत मोठ्या आग्रहाने आणि अभिमानाने पुढें मांडलें जाते. ह्या मताचे पुरस्कर्ते करांत वाढ करण्यास विरोध करतात.

[३]

वित्तविषयक धोरणाच्या वावतींत अत्यंत गंभीर समस्या ही कीं, हें धोरण आणि अन्य आर्थिक उद्दिष्टें यांत विरोध असतो.

उत्पन्नांच्या विषमतेच्या वावतींत जो अलिखित तहनामा झालेला आहे त्याचा उल्लेख सातव्या प्रकरणांत आलेलाच आहे. तो तहनामा आणि वित्तविषयक धोरण यांत विरोध आहे. उत्पन्नांच्या वाटणींत फरक करण्याचे साधन म्हणून सरकारनें

करांचा प्रछन्नपणें उपयोग केलेला आहे. त्यामुळें उत्पन्नाच्या विभागणाच्या संदर्भात करांना विशेष व्यवहारिक महत्त्व प्राप्त झालें आहे; आणि एक निशाण म्हणून तर त्यांना अधिकच महत्व प्राप्त झालें आहे. त्यामुळें वित्तविषयक धोरणाच्या अंमलबजावणीसाठीं करांत वाढ करावी असें जेव्हा सुचविलें जाते तेंव्हा आपोआपच विषमतेच्या प्रश्नावरील वादाला पुन्हां एकदां सुरवात होते. मग तहनाम्याच्या अटी इतके दिवस विनक्कार पाळणारे उदारमतवादी आपले मौन सोडतात आणि विषमता कमी करणाऱ्या करांना पाठींबा देऊं लागतात. त्यांचे तत्वज्ञानच यांना तसें करायला भाग पाडतें. उलट परंपरानिष्ठ लोक त्यांना एकजूटीने विरोध करायला उभे रहातात. युद्धकाळांत हा वादविवाद कांहीं प्रमाणांत टाळतां येतो. कारण त्यावेळीं सर्वांनीं सारखा त्याग केला पाहिजे. हें तत्त्व पुढें माडतां येतें. श्रीमंत माणसाला असें सांगतां येतें कीं, तिकडे सैनीक गोळीबाराला तोंड देत आहेत तेव्हा तूं देखील करांचा बोजा सहन केला पाहिजे. ह्या युक्तिवादाला समपर्क उत्तर शोधण्याचा बराच प्रयत्न श्रीमंत लोकांनीं केलेला आहे. परंतु त्यांना अजून पूर्णपणें समर्पक असें उत्तर सापडलेलें नाहीं. यामुळें जादा क्रयशक्ति शोपून घेण्यासाठीं युद्धकाळांत प्राप्तीकराचा उपयोग करणें शक्य झालें आहे, परंतु शांततेच्या काळांत जर करांचा असा उपयोग करायचें ठरवलें तर आर्थिक समता ह्या मूलतः असंबद्ध असलेल्या विषयावर भला मोठा वादविवाद सुरूं होईल.

अखेरीस वित्तविषयक धोरण आणि उत्पादन यांतहि विरोध असतो. वित्तविषयक धोरण जर यशस्वी व्हायचें असेल तर त्याच्या द्वारें मागणीं कमीं करावी लागते आणि मग उपलब्ध यंत्रसामुग्रीच्या आणि श्रमशक्तीच्या अवाक्यापेक्षां प्रत्यक्ष उत्पादन कमी होतें. एका बाजूने उत्पादन हें सर्वांत अधिक महत्वाचें असतें असें आपण स्वतःला पटवून दिलें आहे आणि आतां दुसऱ्या बाजूनें आपण स्वतःला असें पटवायला हवें कीं, किंमतींच्या स्थैर्यासाठीं आपण उत्पादनाला कांहीं प्रमाणांत तरी तिलांजली द्यायला हवी. पुन्हां ही तिलांजली फार मोठ्या प्रमाणावर द्यावी लागेल अशीहि शक्यता असते. ज्या अर्थव्यवस्थेंतल्या अर्थसंस्था मोठ्या असतात व त्यांना बलिष्ठ कामगार संघटनांना तोंड द्यायचें असतें म्हणजेच ज्या अर्थव्यवस्थेंत सुप्त प्राप्य पण प्रत्यक्षांत न कमावलेला नफा मोठ्या प्रमाणांत अस्तित्वांत असतो त्या अर्थव्यवस्थेंत जर किंमती उतरवायच्या असतील तर मागणींत व उत्पादनांत कपात करावी लागते. हें उत्पादन कमी झाल्यामुळें जे कामगार बेकार होतात त्यांचे कमावलेलें उत्पन्न मात्र महत्वाचे असतें.

द्रव्यविषयक धोरण भांडवली खर्च कमी करते. उलट वित्तविषयक धोरण (मुख्यतः) ग्राहकांचा खर्च कमी करून अर्थव्यवस्थेवर आवश्यक तो परिणाम

घडवून आणतें. तें भांडवलाच्या निवेशांत कपात करीत नसल्यामुळें आर्थिक विकास व प्रगती यांची कमी हानी करणारे आहे असें प्रथमदर्शनीं वाटतें, परंतु ह्या दोन धोरणांच्या परिणामांतला हा जो भेद आहे त्याला फारसें महत्व देण्यांत अर्थ नाहीं. जेव्हा उत्पादनशक्ति उत्पादनाला अपुरी पडत असते तेव्हा अर्थसंस्था भांडवलाचा निवेश करायला उद्युक्त होतात. पण जेव्हा उत्पादनाचा उपलब्ध यंत्रसामुग्रीवर ताण पडेनासा होतो, म्हणजेच जेव्हा आर्थिक व्यवहारांत शिथिलतां येते, तेव्हां अर्थसंस्थानीं भांडवलाच्या निवेशांत कपात करावी हें स्वाभाविक आहे. ज्यावेळीं उत्पादनासाठीं साऱ्या उत्पादनशक्तीचा उपयोग करावा लागतो आणि म्हणून त्या उत्पादनशक्तींतच वाढ करावी लागते त्यावेळीं वाढती मागणी भांडवलाच्या निवेशांत चढत्या प्रमाणांत वाढ घडवून आणते. हें जर खरें असेल तर उत्पादनशक्तीच्या मानाने उत्पादन घटल्यावर त्याचा भांडवलाच्या निवेशावर उलटा परिणाम व्हावा हें स्वाभाविक आहे. अशा रीतीने मागणींत फरक झाला कीं, त्याहून फार मोठ्या प्रमाणांत भांडवलाच्या निवेशांत फरक होतात. असें व्हावें हें वित्तविषयक धोरणाच्या परिणामकारकतेचें द्योतक आहे असें वर वर पाहतां कोणालाहि वाटेल. सरकारी धोरणामुळें समाजाच्या खर्चांत अशा प्रकारें मोठ्या प्रमाणावर फरक घडवून आणता येतील. पण यामुळें एक धोकाहि निर्माण होतो. तो असा कीं उत्पादनशक्तीच्या मानाने उत्पादनांत घट झाली कीं, भांडवलाचा निवेश व त्यामुळें होणारा आर्थिक विकास यांना खूपच मोठा धक्का पोहोचतो. निराळ्या शब्दांत सांगायचे तर असें म्हणतां येईल कीं, ज्यावेळीं उत्पादनाचा उत्पादनशक्तीवर ताण पडत असतो व त्यामुळें मुद्रास्फिती होत असते त्यावेळींच आर्थिक विकास जास्तीत जास्त प्रमाणांत होत असतो.

अतिरिक्त प्रमाणांत भांडवलाचा निवेश आणि वाढत्या किंमती ह्या गोष्टी अर्थव्यवस्थेंत जर अधून मधूनच घडत असल्या, म्हणजेच त्या अर्थव्यवस्थेंत जर अर्थचक्राचे चढ-उतार होत असले तर मागणीला आळा घालणें व अर्थचक्राचे चढ-उतार थांववणें हें फारसें अवघड होणार नाहीं. प्रत्यक्ष परिस्थिती अशीच असते असें कांहीं लोकांना वाटतें. आणि त्यामुळें वित्तविषयक धोरण आणि आर्थिक विकास यांत विरोध नाहीं असा त्यांचा ग्रह होतो. परंतु आधुनिक काळांत असें मानलें जातें कीं उत्पादनशक्तीचा व श्रमशक्तीचा पूर्ण उपयोग करणें हें आर्थिक धोरणाचे नित्याचें उद्दिष्ट आहे. यामुळ उत्पादनशक्तीचा पूर्ण उपयोग होत असतांना ज्या प्रमाणांत भांडवलाचा निवेश होतो त्या प्रमाणांत तो नित्य होत रहाणें ही आवश्यक गोष्ट होते. परंतु किंमती स्थिर ठेवण्यासाठीं आर्थिक व्यवहारांत शिथिलता आणायची व उत्पादनशक्तीच्या मानाने उत्पादन कमी ठेवायचे असें धोरण जर अंमलांत आणलें तर समाजाला इष्ट वाटणाऱ्या आर्थिक विकासाला अपरिहार्यपणें पायबंद बसतो.

वित्तविषयक धोरणाचा दुसऱ्या एका गोष्टीशीं अधिक गंभीर स्वरूपाचा विरोध आहे. ती गोष्ट म्हणजे आधुनिक बाजारपेठांत किंमती स्थिर ठेवण्यासाठीं आवश्यक असलेली बेकारी. अपुरे उत्पादन आणि मंद आर्थिक विकास ह्या गोष्टी एखाद्या वेळीं खपून जातील, परंतु बेकारी मात्र खपणार नाहीं आणि ती मुद्दाम निर्माण करण्याचें धोरण कोणत्याच राजकीय पक्षाला मान्य होण्यासारखें नाहीं. पुन्हां किंमतींच्या स्थैर्यासाठीं जी बेकारी आवश्यक असते ती राष्ट्रांतील एकंदर रोजगारीच्या मानाने कांहीं फार मोठी नसते हें खरें, परंतु ती सर्व आर्थिक क्षेत्रांत सारख्या प्रमाणांत विभागली जात नाहीं. देशाच्या ज्या भागांची किंवा उद्योगांची आर्थिक कुचंबणा होत असते किंवा ज्या क्षेत्रांत मागणी अधिक मंद गतीने वाढत असते तेथें ही बेकारी विशेष प्रमाणांत निर्माण होते. मग ह्या क्षेत्रांत बेकारीची आणि विपन्नावस्थेची डबकी निर्माण होतात. अशारितीने मागणी कमीं करण्याचें वित्तविषयक धोरण समाजांतल्या कांहीं गटांना फारच त्रासदायक ठरतें आणि म्हणून कांहीं राजकीय पुढाऱ्यांना देखील त्यापासून विशेष ताप होतो.

राजकारणांतील परंपरानिष्ठ मंडळीना मुद्रास्फितीवरील उपाय योजनांपेक्षा मुद्रास्फितीच कमीं त्रासदायक वाटते. आणि बेकारी हवी कीं, भाववाढ हवी असा प्रश्न जर राजकारणांतील उदारमतवाद्यांपुढें उपस्थित झाला तर ह्या दोन्हीं गोष्टी नकोत असें ते निःशंकपणें सांगतात.

मुद्रास्फिती विरोधी असें जें वित्तविषयक धोरण असते त्याचें राजकारण हें असें निराशाजनक आहे.

[४]

एक द्रव्यविषयक धोरण सोडलें तर वित्तविषयक धोरण हाच सांकेतिक शहाणपणाला सध्या मान्य असलेला मुद्रास्फितीवरील उपाय आहे. परंतु जोपर्यन्त त्या उपायाचा वापर आणि अन्य आर्थिक उद्दिष्टें यांत विरोध आहे तोपर्यन्त निदान शांततेच्या काळांत तरी त्या उपायाचा परिणामकारकपणें उपयोग केला जाणार नाहीं.

वित्तविषयक धोरण आणि अन्य उद्दिष्टें यांत हा जो विरोध आहे आणि त्यामुळें वैत्तिक उपाय फसण्याची जी शक्यता असते ती तर्कशास्त्रज्ञांनीं व्यापकप्रमाणांत मान्य केलेली नाही. वित्तविषयक धोरण हें किंमती स्थिर ठेवण्याचे एक साधन आहे असें अर्थशास्त्राच्या क्रमिक पुस्तकांत अजूनहि लिहिलें जातें. ह्या धोरणामुळें कांहीं अडचणी निर्माण होतील हें ते मान्य करतात परंतु ते असें गृहीत धरतात कीं मुद्रास्फितीच्या काळांत करांत वाढ करणें

शक्य असते. या धोरणाच्या बाबतींत नेहमींच एक मोठी अडचण असते. कोणत्याहि एका विशिष्ट वेळीं तें व्यवहार्य आहे असें वाटत नाहीं. दुर्दैवाची गोष्ट अशी कीं जोपर्यन्त हें धोरण व अन्य आर्थिक उद्दिष्टें यांत विरोध आहे तोपर्यन्त तें कधींच व्यवहार्य वाटणार नाहीं.

अखेर एक शक्यता शिल्लक रहाते ती म्हणजे वित्तविषयक धोरण आणि किंमती व मजूरी यांचे नियंत्रण यांचा एकत्रितपणें उपयोग करण्याची. असें केले म्हणजे उत्पादनशक्तीचा जरी पूर्ण उपयोग होत असला व त्यामुळें किंमतीं वाढण्याकडे कल झाला असला तरी प्रत्यक्षांत किंमती व मजूरीं वाढूं शकत नाहीत. उत्पादनशक्तीचा जेव्हा पूर्णपणें उपयोग होत असतो त्यावेळीं किंमतींना रोखण्याचें कार्य मागणींतील कपातीच्या द्वारें न होता नियंत्रणांच्या द्वारें होतें. अशा रीतीने उत्पादनशक्तीचा पूर्ण उपयोग (आणि त्यामुळें होणारा आर्थिक विकास) व किंमतींचे स्थैर्य यांची सांगड नियंत्रणें घालतात. उत्पादनशक्ति कांहीं प्रमाणांत उपयोगांत न आणणें व बेकारी निर्माण करणें यांची आवश्यकता उरत नाहीं.

पुष्कळांचें असें मत आहे कीं, किंमती व मजूरी यावरील नियंत्रणें स्वतः होऊन कांहींच घडवून आणित नाहीत. तीं रोगाच्या बाह्य चिन्हांवर परिणाम करतात पण त्याची कारणें दूर करीत नाहीत. त्यांचा उपयोग करणें म्हणजे उष्णतामापकांतला पारा वर चढवणाऱ्या भट्टीकडें लक्ष न देतां त्या उष्णतामापनातच सुधारणा करण्याची खटपट करण्यासारखें आहे. जर अर्थव्यवस्थेच्या उत्पादन सामर्थ्यांच्या मानाने चालूं मागणी बरीच अधिक असेल तर वरील युक्तिवादांत बरेंच तथ्य आहे असें म्हणावें लागेल. अशा परिस्थितींत एकच उपाय असतो. तो म्हणजे मागणी व पुरवठा यांत समतोल निर्माण करणें. दुसरें कांहींही केलें तर हा प्रश्न खऱ्या अर्थाने सुटणार नाहीं. परंतु वैत्तिक आणि अन्य उपायांनीं समग्र मागणी अर्थव्यवस्थेच्या उपलब्ध उत्पादनशक्तीपेक्षां अधिक असूं नये अशी व्यवस्था केली तर मात्र मजूरी व किंमती यावरील नियंत्रणें खऱ्या अर्थाने परिणामकारक नसतात असें म्हणतां येणार नाहीं. तसें म्हणणें हें प्रश्न फारच सोपा करण्यासारखें आहे. जेव्हां उत्पादनशक्तीचा जवळ जवळ पूर्णपणें उपयोग होत असतो तेव्हा मजूरीचा किंमतींवर परिणाम होत असतो व किंमतींचा मजूरीवर होत असतो. ह्या परस्पर परिणामांना नियंत्रणें पायबंद घालतात आणि त्यामुळें किंमतींत होणारी वाढ टाळून उत्पादनशक्तीचा जवळ जवळ पूर्ण उपयोग करणें शक्य होतें.

नियंत्रण अशा प्रकारचें कार्य करूं शकतात हें कांहीं अर्थशास्त्रज्ञांनीं उघडपणें

मान्य केले आहे.[१] इतर अर्थशास्त्रज्ञांनीं या गोष्टीला अप्रत्यक्षपणें मान्यता दिली आहे. ज्यावेळीं युद्धकालीन आणिबाणीची परिस्थिती निर्माण झालेली असते आणि उत्पादनशक्तीचा पूर्ण उपयोग आणि किंमतीचे अधिकाधिक स्थैर्य यांची सांगड घालणें अत्यंत आवश्यक झालेलें असतें त्यावेळीं अशा नियंत्रणांची आवश्यकता असते हें या अर्थशास्त्रज्ञांनीं मान्य केलें आहे. परंतु शांततेच्या काळांत मात्र प्रत्यक्ष नियंत्रणें घालणें अत्यंत चुकीचे असतें असें सांकेतिक शहाणपणाचे ठाम मत आहे. एखाद्या अर्थशास्त्रज्ञाने अशा नियंत्रणांनां विरोध केला कीं, तो समंजस आणि खरा ज्ञानी आहे असें लोकांना वाटूं लागतें. परंतु नियंत्रणांना तो कांहींसा अनुकूल आहे असा संशय जर लोकांना आला तर त्याचे ज्ञान व त्याचे हेतु यांबद्दल तावडतोब शंका उपस्थित केल्या जाऊं लागतात.

नियंत्रणावरचे आक्षेप अनेकविध व व्यापक स्वरूपाचे आहेत. नियंत्रणें जर परिणामकारक ठरायची असतील तर तीं सर्व किंमतींना आणि सर्व मजूरांच्या वेतनांना लागूं करणें आवश्यक असते असें मानलें जाते. याचा अर्थ असा कीं, नियंत्रणामुळें निर्माण होणारे कारभारविषयक प्रश्न अत्यंत गंभीर स्वरूपाचे असतात आणि जसा काळ लोटतो तसे ते अधिकाधिक गंभीर होत जातात. ह्या नियंत्रणांचा प्रश्न उपस्थित केला कीं, सरकार आपल्या जीवनांत ढवळाढवळ करूं पहात आहे ही जुनी शंका लोकांच्या मनांत उद्भवते आणि ते नियंत्रणांना विरोध करूं लागतात. नियंत्रणें आलीं कीं, सरकारी हस्तक्षेप खूपच प्रमाणांत होतो हें खरें आहे. कारण आर्थिक निर्णयांच्या संदर्भांत किंमती ठरविण्याचा अधिकार हा फार महत्त्वाचा असतो. सामाजिक डार्विनवादी आणि उपयुक्ततावादी तत्वज्ञान यांनीं खुल्या बाजारपेठा आणि स्वातंत्र्य व जीवनोत्साह यांचे निकटचें नाते आहे असा ग्रह निर्माण केला आहे. ज्याप्रमाणांत हा ग्रह निर्माण करण्यात ते यशस्वी झाले आहेत त्या प्रमाणांत नियंत्रणें हें एक व्यापक स्वरूपाचे संकट आहे असेच मानलें जाईल.

अखेरीस एक अत्यंत महत्वाची गोष्ट लक्षांत घ्यायला हवी. ती अशीं कीं, उत्पादनविषयींचा सांकेतिक दृष्टिकोन आणि अशा प्रकारची नियंत्रणें यांत तीव्र स्वरूपाचा विरोध आहे. उत्पादनांच्या साधनांची कार्यक्षमतेने विभागणी करणें

---

१ उदाहरणादाखल पहा पॉल ए. सॅम्युएलसन यांचे 'इकॉनॉमिक्स्' (पहिली आवृत्ति, न्युयॉर्क, मॅग्रॉ हिल, १९४८) पृष्ठ ४३५. सध्यांच्या सामाजिक परिस्थितींत नियंत्रणांना हें कार्य करणें कितपत शक्य आहे यावाबतींत इथें ज्या शंका व्यक्त केलेल्या आहेत तशाच शंका सॅम्युएलसन यांनीहि व्यक्त केल्या आहेत.

हा उत्पादनाची कमाल मर्यादा गांठण्याचा फार महत्त्वाचा मार्ग आहे असें आपण मानतो. नवव्या प्रकरणांत हे सांगितलेलें आहे. गेल्या शतकांत ह्या मार्गावरच भर दिला जात असे. आणि जुन्या आठवणींमुळें अजूनहि आपण त्याविभागणीला मध्यवर्ती स्थान देतो. उत्पादनांच्या साधनांची ही विभागणी भांडवलशाही अर्थव्यवस्थेंत बाजारयंत्रणेच्या द्वारें केली जाते. बाजारांत ठरणाऱ्या किंमती व मजूरीचे दर यांच्या द्वारें श्रमशक्ति, भांडवल आणि अन्य साधनें सर्वांत अधिक कार्यक्षम असलेल्या अर्थसंस्थांच्या व उद्योगांच्या हातीं जातात. हें कार्य करणारा खुला बाजार आणि नियंत्रणें ही एकंदर नांदूं शकणार नाहीत हें उघड आहे.

प्रत्यक्षांत मात्र परिस्थिती अशी आहे असें निश्चयपूर्वक म्हणतां येणार नाहीं. युद्धकाळांत नियंत्रणें होती आणि तरी उत्पादनांत फार मोठी वाढ झाली. त्याचें कारण असें की उत्पादन वाढविण्यासाठीं नव्या मार्गांचा उपयोग करण्यांत आला आणि साधनांच्या अधिक चांगल्या विभागणीमुळें उत्पादनांत जितकी वाढ होते त्याहून कितीतरी अधिक वाढ ह्या नव्या मार्गांनीं झाली. शिवाय नियंत्रणांच्या द्वारें मजूरी व किंमतीं यांचा परस्पर पाठलाग थांबवायचा असेल तर ती सर्व समावेशक असावी लागतात असेंहि खात्रीपूर्वक म्हणता येणार नाहीं. कमाल उत्पादन आणि किंमतींचें स्थैर्य यांचीं सांगड घालण्याचे कार्य कांहीं मर्यादित स्वरूपाची नियंत्रणें देखील करूं शकतील असें मानायला जागा आहे. हा मुद्दा महत्वाचा आहे आणि त्याचा ह्या पुस्तकांत पुढें आपल्याला विचार करायचा आहे. इथें आपण इतकेच लक्षांत घ्यायचे आहे कीं किंमतीचे स्थैर्य कमाल उत्पादन आणि किमान बेकारी यांची सांगड घालण्यासाठीं किंमती व मजूरी यांवरील नियंत्रणांचा उपयोग करणें सध्यांच्या परिस्थितींत शक्य नाहीं. कारण नियंत्रणें आणि उत्पादनाविषयींची परंपरागत भूमिका यांत विरोध आहे आणि तो विरोध जरी काल्पनिक असला तरी त्याला फार महत्व आहे.[1]

---

१ या विचारांची लोकांच्या मनावर फार घट्ट पकड आहे. बेकार साधनांचा उपयोग केला आणि उत्पादनशक्तीच्या मानाने मागणींत वाढ करून उत्पादन वाढविण्यास प्रोत्साहन दिलें तर त्यामुळें उत्पादनांत खूप वाढ होते. उलट किंमती स्थिर ठेवून आणि थोडी फार बेकारी अस्तित्वांत ठेवून जर बाजारयंत्रणेच्या द्वारें उत्पादनांच्या साधनांची कार्यक्षमतेने विभागणी केली तर त्यामुळें उत्पादनांत कमी वाढ होते. परंतु तरी देखील अनेकांना उत्पादनांत पहिल्या मार्गाने वाढ करण्यापेक्षा दुसऱ्या मार्गाने वाढ करणे अधिक पसंत पडते.

[५]

वरील विवेचनाचा आतां सारांश काढला तर ते उपयुक्त ठरेल. आपलीं सध्यांची उद्दिष्टें व दृष्टीकोन असे आहेत की, त्यामुळें उत्पादनशक्तीचा जास्तीत जास्त उपयोग करण्याचा आपण प्रयत्न करतो. त्यामुळें मुद्रास्फिती ही प्रासंगिक गोष्ट राहिलेली नसून नित्याची गोष्ट झाली आहे. जे आर्थिक दृष्टिकोन यंत्र-सामुग्री व श्रमशक्ति यांचा अधिकाधिक उपयोग करण्यास आपल्याला उद्युक्त करतात, तेंच मुद्रास्फितीवरील उपाययोजनेला प्रतिबंध करतात. द्रव्यविषयक धोरणाचा ग्राहकांच्या मागणीच्या निर्मितीशीं विरोध आहे. शिवाय तें धोरण उद्योगधंद्यातील भांडवलाचा निवेश कमी करतें आणि त्यामुळें ते धोरण व आपल्याला हवा असलेला आर्थिक विकास यांत विरोध निर्माण होतो. शिवाय तें धोरण विशेषसे परिणामकारक नसते. त्यामुळें कांहीं लोकांचा फायदा होतो तर कांहींचे नुकसान होतें. शिवाय त्या धोरणापासून कांहीं धोके देखील निर्माण होतात. आपल्याला उत्पादन अशा एका पातळीवर ठेवायचे असतें कीं जेथें सर्वांना रोजगारी मिळते आणि आर्थिक सुरक्षितता प्रस्थापित होते उत्पादनाचीं आपल्याला इष्ट वाटणारी हीं पातळी आणि वित्तविषयक धोरण यांत विरोध आहे. पूर्ण रोज-गारी व किंमतींचे स्थैर्य यांची सांगड प्रत्यक्ष नियंत्रणें घालूं शकतात हें जरीं तत्त्वतः खरें असलें तरी नियंत्रणें समाजाला नकोशी वाटतात. तीं व्यापक व अव्यवहार्य स्वरूपांत तरी वसवायला हवीत किंवा ती मुळींच वसवतां कामा नये असे आपण मानतो. उत्पादन कार्यक्षमतेने केले पाहिजे हें जें आपले उदिष्ट आहे त्याच्याशी या नियंत्रणांचा सकृतदर्शनी तरी विरोध असतो. कारण उत्पादन कार्यक्षमतेने व्हायचे असेल तर बाजारयंत्रणेच्या द्वारें साधनांची विभागणी व्हायला हवी असें आपण मानतो.

हे संघर्ष अंशतः तरी अन्य आवरणाखालीं दडलेले असतात. द्रव्यविषयक धोरण व उत्पादन यांत जो विरोध आहे तो परंपरानिष्ठ मंडळी दडवून ठेवण्याचा प्रयत्न करतात. त्यांचा असा विश्वास असतो कीं, द्रव्यविषयक धोरणाचे सहज दृष्टीपथांत न येणारे परंतु अद्‌भूत असे काहीं परिणाम होत असतात आणि या विश्वासाच्या आधारे ते वरील विरोध दृष्टीआड करण्याचा प्रयत्न करतात. वित्तविषयक धोरण व कमाल उत्पादन यांत जो विरोध आहे तो छपवून ठेवण्याचा प्रयत्न उदारमतवादी मंडळी करीत असतात. यांत केन्सचे अनुयायित्व करणाऱ्या अर्थशास्त्रज्ञांचा देखील समावेश होतो. हा विरोध छपवण्यासाठीं हे लोक गूढगुंजनाचा उपयोग करीत नाहीत. ते मुळी या प्रश्नाकडे पद्धतीशीरपणें पाठच फिरवतात.

हें साधण्यासाठीं उदारमतवादी मंडळी वैत्तिक उपायांचा पुरस्कार करतांना सामान्य स्वरूपाची विधाने करतात. आणि त्याचवेळीं बेकारी आणि यंत्रसामुग्रीचा अपुरा उपयाग यांवर तीव्र टीका करतात. पुन्हां ते प्रत्यक्ष नियंत्रणें अनिष्ट असतात असें प्रतिपादन करतात आणि त्यामुळें वरील विरोध नष्ट करण्याची संधी गमावतात.

अशा रितीने नित्य ओढवणाऱ्या मुद्रास्फितीचा मार्ग निष्कंटक होतो. ह्या मुद्रास्फितीचा समाजांतील वेगवेगळ्या गटांवर भिन्न परिणाम होतो आणि त्यामुळें कांही गटांचे फार मोठे नुकसान होते हें आतां आपण पंधराव्या प्रकरणांत पाहिलेलेंच आहे. ह्या मुद्रास्फितीचे अधिक सखोल असे सामाजिक परिणाम होतात हें आतां आपण पुढील प्रकरणांत पाहाणार आहोत. मुद्रास्फिती अर्थव्यवस्थेच्या अशा एका भागावर प्रहार करते कीं तेथें प्रहार झाल्यामुळें फार मोठें नुकसान होते. संपन्न समाजाचा हा न सुटलेला दुसरा प्रश्न आहे असें आपल्याला म्हणतां येईल. ग्राहकांच्या मागणीची निर्मिती व त्यासाठीं दिलेलीं कर्जे यांतून या समाजाच्या पहिला न सुटलेला प्रश्न निर्माण होतो हें आपण वर पाहिलेलेंच आहे.

प्रकरण अठरावें.

सामाजिक समतोलाची उपपत्ति

'व्यक्तिगत उत्पन्नांत कितीहि वाढ झाली तरी त्यामुळें कॉलरा, टायफस् आणि अज्ञान यापासून मनुष्य जातीची मुक्ती होऊं शकत नाहीं आणि शिक्षणाची संधी व आर्थिक सुरक्षितता यापासून मिळणारे फायदे तर मनुष्य जातीच्या मुळीच पदरांत पडत नाहीत. हें सत्य जेव्हां समाजाला समजते तेव्हांच तो कांहीं गरजा भागविण्यासाठीं सामाजिक उपाय योजना करूं लागतो. ह्या गरजा अशा असतात कीं, कोणत्याहि सर्वसामान्य व्यक्तीने जरी जन्मभर पराकाष्ठेचे प्रयत्न केले तरी त्याला त्या आपल्यापुरत्या भागविणें शक्य नसते. ह्या गरजा भागवण्यास समाज अगदीं सावकाश आणि नाखूषीने तयार होतो आणि समाजाच्या मनाची अशी तयारी होत असतांना नैतिक अधःपात घडत आहे आणि आर्थिक अरिष्ट कोसळणार आहे अशीं भाकितें केलीं जात असतात.'

— आर्. एच्. टॉनी [१]

आपण कशाचे उत्पादन करतो हा उत्पादक समाजाचा अंतिम प्रश्न असतो. त्या समाजांत कांहीं गोष्टींचे फारच थोडे उत्पादन केलें जातें आणि दुसऱ्या गोष्टींचे भरपूर उत्पादन केलें जातें आणि या संदर्भांत वरील प्रश्न उपस्थित होतो. वस्तूंच्या उत्पादनांतील ही विषमता इतक्या थराला जाते कीं, त्यामुळें सामाजिक स्वास्थ विघडतें आणि समाजाला त्रास सहन करावा लागतो. आपल्या समाजांत ज्यांचा पुरवठा भरपूर आहे आणि ज्यांचा पुरवठा अपुरा आहे अशा वस्तूंना विभागणारी एक रेषा आहे. खाजगी क्षेत्रांत ज्यांचे उत्पादन व विक्री होते त्या वस्तू व सुविधा आणि सरकारने पुरविलेल्या सुविधा यांना विभागणारी रेषा आणि वरील रेषा या स्थूलमानाने एकच आहेत. खाजगी क्षेत्राने उत्पादन केलेल्या वस्तूंच्या बाबतींत आपण फार संपन्न आहोत. त्यामानाने सरकारने उत्पादन केलेल्या वस्तूंच्या बाबतींत आपण दरिद्री आहोत. ही संपन्नता आणि हें दारिद्र्य यांतला विरोध तर डोळ्यांत भरण्यासारखा आहेच. शिवाय खाजगी क्षेत्राने पुरविलेल्या वस्तूंची आपल्या जवळ जी विपुलता आहे तिच्यामुळेच सार्वजनिक सुविधांच्या पुरवठ्याच्या बाबतींत गंभीर अडचण निर्माण झाली आहे. ह्या दोन प्रकारच्या

---

१ इक्वॉलिटी (चौथी सुधारलेली आवृत्ति), पृष्ठें १३४-३५.

वस्तूंच्या पुरवठ्यामध्यें एक प्रकारचा समतोल ठेवणें किती अवश्य आहे हें आपल्या ध्यानांत आलेलें नाहीं.

खाजगी उत्पादन आणि सार्वजनिक उत्पादन यांत विषमता आहे असें जें मी म्हटलें तें कांहीं केवळ एक वैयक्तिक मत नव्हे. ह्या परिस्थितीबद्दल खूपच लिहिलें गेलें आहे; परंतु येथें जो दोन प्रकारच्या उत्पादनांतला विरोध मी दाखविला आहे त्याचा उल्लेख मात्र त्या लेखनांत केलेला नाहीं. दुसऱ्या जागतिक युद्धानंतरच्या काळांत प्रसिद्ध झालेल्या आपल्या कोणत्याहि प्रमुख शहरांतल्या—न्यूयॉर्क शहर हें या बाबतींतलें उत्तम उदाहरण आहे—वृत्तपत्राकडे आपण पाहिलें तर आपल्याला असें आढळून येते कीं, अगदीं प्राथमिक स्वरूपाच्या नागरी सुविधांच्या तुटवड्याबद्दल किंवा त्यांतील दोषांबद्दल तीं रोज तक्रारीं करीत असतात. त्या शहरांतल्या शाळा फार जुन्या असतात आणि त्यांत फार मुलें कोंबलेलीं असतात. पोलीसांची संख्या अपुरी असते आणि त्यांचें वेतनहि पुरेसें नसतें. उद्यानें आणि क्रीडांगणें यांचा तेथें तुटवडा असतो. रस्ते आणि रिकाम्या जागा कचऱ्यांमुळें गलिच्छ झालेल्या असतात. शहरस्वच्छतेसाठीं पुरेशीं माणसें नेमलेली नसतात आणि त्यांच्या जवळ अवश्य ती साधनें नसतात. त्या शहरांत कामासाठीं येणाऱ्या लोकांच्या वाहतुकीची व्यवस्था असमाधानकारक आणि बेभरवशाची असते. शहरांतील अंतर्गत वाहतुकीची साधने देखील अपुरी व अस्वच्छ असतात आणि त्यांच्यामुळें प्रकृतिला अपाय होत असतो. शहरांतील हवा देखील तशीच असते. रस्त्यावर मोटारी उभ्या करण्यास बंदी करणें आवश्यक असतें आणि त्या उभ्या करायला दुसरीकडे कुठें जागा नसते. नव्या सुविधांच्या बाबतींतच हा तुटवडा जाणवतो असें नव्हे तर जुन्या व अनेक वर्षें उपलब्ध असलेल्या सुविधांच्या बाबतींत देखील तो जाणवतो. रस्ते झाडणें, लोकांच्या वाहतुकीची व्यवस्था ठेवणें, त्यांना शिक्षण देणें, सुव्यवस्था ठेवणें, गाडीघोड्यांना थांबण्यासाठीं जागेची व्यवस्था करणें ह्या गोष्टीं नगरपालिका पूर्वीपासून करीत आल्या आहेत. नगरांतल्या लोकांना विषारी वायूचे श्वसन करायला लागूं नये ही मागणी क्रान्तीकारक आणि समाजवादी आहे असें कांहीं आपल्याला म्हणतां येणार नाहीं.

सार्वजनिक क्षेत्रांतल्या दारिद्र्याची ही चर्चा ज्यावेळीं केली जात होती त्यांच वेळीं खाजगी क्षेत्रांतल्या उत्पादनाबाबतच्या आपल्या बाढत्या संपन्नतेच्या गोष्टी देखील प्रसिद्ध होत होत्या. सरसकट राष्ट्रीय उत्पादन बाढत होते आणि व्यक्तिगत उत्पन्न व मालाची किरकोळ विक्री यांतहि बाढ हात होती. कामगारांची उत्पादनक्षमता बाढत होती. ज्या मोटारी उभ्या करायला जागा नव्हती त्यांचे उत्पादन अधिक मोठ्या प्रमाणावर होत होतें. मुलांना शाळा नव्हत्या आणि क्रिडांगणावर

मोठ्या माणसांच्या विकृत प्रेमाला ती वळी पडत होती. त्यांच्या गुन्हेगारीला अधिक कल्पकतापूर्ण स्वरूपें प्राप्त होत होतीं. परंतु हें सर्व जरी खरें असलें तरी त्यांच्या जवळ टेलिविजनचे सेट भरपूर प्रमाणांत होते. राष्ट्रांतील माणसांची शरीरे सुटत चालली होती आणि तरी अन्नाचें जादा उत्पादन सांठवून कुठें ठेवायचें हा आपल्या पुढें प्रश्न पडला होता अन्नाचें उत्पादन आणि संस्करण खाजगी क्षेत्रांत केलें जात होतें. अशा रीतीने पोटाची काळजी खाजगीं क्षेत्र घेत होते परंतु मनाची जोपासना करण्याचे कार्य मात्र मुख्यतः सार्वजनिक क्षेत्रांकडे होते. आपल्या महाविद्यालयांत आणि विश्वविद्यालयांत विद्यार्थ्यांना दाटीवाटीने बसून शिकावें लागत होतें आणि या शिक्षण संस्थांजवळ अवश्य ती साधनसामुग्री पुरेशा प्रमाणांत नव्हती. मानसिक रोगांच्या रूग्णालयांबाबत देखील हीच परिस्थिती होती.

ही जी विषमता होती आणि आहे ती केवळ पुस्तकें वाचणाऱ्यांच्याच निदर्शनास येईल अशांतला भाग नाहीं. आपल्या उंची आणि सुसज्ज मोटारींतून प्रवासाला निघणाऱ्या एखाद्या कुटुंबाच्या देखील ही परिस्थिती निदर्शनास येते. प्रवासांत त्यांना जीं शहरें लागतात त्यांच्या पायरस्त्यावर नीटपणें फरशी बसविलेली नसते. केरकचऱ्यामुळें ती गलिच्छ दिसतात. त्यांच्या इमारतींवर एक प्रकारची अवकळा आलेली असते. जाहिरातींच्या मोठाल्या फलकांनीं तीं विद्रूप झालेली असतात. ज्या तारा जमीनीखालून नेण्याची पूर्वीच व्यवस्था करायला हवी होती त्यांचे खांब या कुटुंबाला वाटेंत जागोजागीं दिसतात. शहरांतून बाहेर पडून जेव्हा हें कुटुंब मोकळ्या प्रदेशांतून प्रवास करूं लागते तेव्हा त्यांना भोवती जाहिरातींचे जंगल दिसते. आणि या जंगलामुळें त्यांना निसर्गसौंदर्य दिसणें अशक्य होते. (ज्या वस्तूंची जाहिरात तेथें केलेली असते त्यांना आपल्या मूल्य पद्धतीनुसार फार महत्व आहे. त्यांच्या मानाने निसर्गसौंदर्याचा क्रम खालीं लागतो आणि म्हणून ह्या जाहिरातींमुळें निसर्गसौंदर्याच्या दर्शनांत जर अडथळा आला तर आपण त्याची पर्वा करीत नाही. ह्या बाबतींतहि आपण फार सुसंगतपणें वागतो.) हे कुटुंब छोटया वर्फपेटींतून आणलेले आणि डब्यांत उत्तम प्रकारें बंद केलेलें अन्न सहलीच्या ठिकाणी खातें. परंतु ज्या ओढ्याजवळ बसून हें अन्न खाल्लें जातें त्या ओढ्यांतलें पाणी मात्र दूषित झालेलें असतें. नंतर ज्या सार्वजनिक उद्यानांत हें कुटुंब रात्रीं मुकाम करतें ते उद्यान म्हणजें सार्वजनिक आरोग्य व नीतिमत्ता यांना एक मोठा धोका असतो. नायलॉनच्या तंबूंत हवा भरून फुगवलेल्या गादीवर झोंपतांना त्यांच्या भोंवतीं कुजणाऱ्या कचऱ्याची दुर्गंधी दरवळत असते. अशावेळीं आपल्याला उपलब्ध असलेल्या सुखसोयींतील या विषमतेबद्दलचे विचार त्यांच्या मनांत येणें साहजिक आहे. ही विषमता निर्माण करणें हा अमेरिकन लोकांच्या बुद्धीवैभवाचाच एक भाग आहे असे आपण मानायचे का ?

[२]

खाजगीं क्षेत्रांत ज्या वेगवेगळ्या वस्तूंचें उत्पादन होतें त्यांत कांहीं एक समतोल राखणें आवश्यक असते हें मान्य केलें जातें. पोलाद, खनिज तेल आणि यंत्रोत्पादक यंत्रें यांचे उत्पादन आणि मोटारींचे उत्पादन ह्यांचा परस्परांशीं संबंध आहे. ज्या वस्तूंची वाहतूक करायची त्यांचे उत्पादन जितक्या प्रमाणांत वाढतें तितक्या प्रमाणांत वाहतूकीच्या साधनांतहि अधिक प्रमाणांत भांडवल गुंतवावें लागतें. विद्युत-शक्तीचा वापर करणाऱ्या उद्योगांची जितकी वाढ होते तितक्या प्रमाणांत विद्युत-शक्तीच्या पुरवठ्यांत देखील वाढ करावी लागते. निरनिराळ्या वस्तूंच्या उत्पादनांत हें जें नाते असते त्याच्या आधारें साधन-उत्पादन तक्ता तयार करतां येतो. एका उद्योगाच्या उत्पादनांत जर बदल झाला तर त्याचे इतर उद्योगांच्या उत्पादनाच्या मागणीवर काय परिणाम होतात हें या तक्त्याच्या आधारें समजू शकतें. ह्या तक्त्यानें आर्थिक क्षेत्रांतील परस्पर संबंधावर महत्वाचा प्रकाश टाकला आहे. प्रो. वॅसिलि लिअँन्टिएफ् यांनीं हा तक्ता तयार केला आणि त्याबद्दल जग त्यांचे ऋणि आहे. अर्थव्यवस्थेतील एका क्षेत्राच्या विकासाच्या जोडीला जर अवश्य त्या प्रमाणांत इतर क्षेत्रांचा विकास झाला नाहीं तर कांहीं वस्तूंचा तुटवडा जाणवूं लागतो. मग ज्या वस्तूंचा पुरवठा अपुरा असतो त्यांची सांठेबाजी होऊं लागते. आणि उत्पादन खर्चात एकदम मोठी वाढ होते: निरनिराळ्या वस्तूंच्या पुरवठ्यांत हा समतोल राखण्याचे कार्य शांततेच्या काळांत बाजारयंत्रणा परिणामकारकपणें आणि सहजपणें करूं शकते. शिवाय अर्थव्यवस्थेंत निरनिराळ्या वस्तूंचें सांठे केलेले असतात आणि एका वस्तूंचा तुटवडा पडला तर तिच्या ऐवजी दुसऱ्या वस्तूंचा वापर करणें कांहीं प्रमाणांत तरी शक्य असते. यामुळें विशेष अडचणी निर्माण होत नाहीत. परंतु पोलंड किंवा हिंदुस्थान ह्या देशांत साधनांचा पुरवठा मर्यादित आहे आणि नियोजनाच्या द्वारें निरनिराळ्या वस्तूंच्या उत्पादनांत हा समतोल राखण्याचा प्रयत्न ते देश करीत आहेत. हा समतोल राखणें त्या देशांत किती कठीण जात आहे हें पाहिलें कीं, ह्या प्रश्नाचे गांभीर्य आपल्या लक्षांत येतें.

निरनिराळ्या वस्तूंच्या उत्पादनांत जसा हा समतोल ठेवावा लागतो तसाच त्यांच्या सेवनांत देखील ठेवावा लागतो. एका वस्तूचा उपयोग अधिक प्रमाणांत केला जाऊं लागला कीं, दुसऱ्या वस्तूंच्या जादा पुरवठ्याची आवश्यकता देखील अपरिहार्यपणें निर्माण होते. आपण जर अधिक मोटारी वापरूं लागलों तर आपल्याला अधिक पेट्रोलची गरज भासते. त्या चालवायला अधिक व मोठे रस्ते लागतात; आणि त्यांचा विमा उतरवायची अधिक प्रमाणांत सोय करावी लागते.

अधिक आणि सकस अन्नाचा उपयोग एका विशिष्ट मर्यादेपलिकडे जर आपण करूं लागलो तर औषधपाण्याची देखील अधिक प्रमाणांत व्यवस्था करावी लागते. तंबाखू आणि मद्य ह्यांच्या सेवनात जर वाढ झाली तर औषधोपचारांचीं अशी सोय करणे अधिकच आवश्यक ठरते. लोकांना अधिक सुट्ट्या मिळूं लागल्या कीं अधिक हॉटेलें बांधावी लागतात आणि मासे पकडायच्या गळांचे उत्पादन देखील वाढवायला लागते. इतर अनेक बाबतींत देखील असाच प्रकार घडतो खाजगी क्षेत्रांत ज्या वस्तूंची विक्री आणि सेवन होते त्यांच्या बाबतींत हा समतोल विनासायास राखला जातो. हा समतोल राखण्याचे कार्य बाजारयंत्रणा करीत असते आणि आपल्या समाजाच्या संपन्नतेची तिला मदत होते. ह्या गोष्टीला कांहीं अपवाद नाहींत असें नाहीं. उदाहरणार्थ, डॉक्टरांचा तुटवडा आपणाला जाणवतो. पण हे अपवाद थोडे असतात.

निरनिराळ्या वस्तूंच्या उत्पादनांत हें जें नातें असतें तें खाजगी क्षेत्रापुरतेंच मर्यादित नसते. सार्वजनिक आणि खाजगीरित्या ज्यांचा पुरवठा केला जातो त्या सर्व वस्तूंच्या व सुविधांच्या बाबतीत तें नातें अस्तित्वांत असते. मोटारीचे उत्पादन वाढलें की पोलादाची मागणी जशी वाढते तशीच सार्वजनिक सुविधांची देखील वाढ होते. त्याच प्रमाणें खाजगी क्षेत्रांतील वस्तूच्या सेवनांत जेव्हा जेव्हा वाढ होते तेव्हा तेव्हा साधारणपणें सरकारला कांहीं नवीन सोयी उपलब्ध करून द्याव्या लागतात जर सरकारतर्फे ह्या सुविधांचा पुरवठा होऊ शकला नाही तर त्याचे परिणाम अनिष्ट होतात. खाजगी क्षेत्रांत जे वस्तूंचें व सुविधांचे उत्पादन होतें त्यांत समाधानकारक नातें ठेवणें ह्या गोष्टीला एखादे सुटसुटीत नांव देणें सोइचें पडेल त्या गोष्टीला आपण सामाजिक समतोल असें म्हणूं या.

सामाजिक समतोलाचा हा प्रश्न सर्वव्यापी आहे आणि पुष्कळदा तो त्रासदायक ठरतो. आपण असें पाहिलेच आहे की गाड्यांचा वापर वाढला कीं, रस्ते आणि हमरस्ते, वाहतुकीचे नियंत्रण, मोटारी उभ्या करण्यासाठीं जागा इत्यादी गोष्टींची गरज निर्माण होते. साधे आणि गस्त घालणारे पोलीस यांची आणि त्याचप्रमाणें रूग्णालयांची देखील अवश्यकता भासू लागते. या बाबतीत समतोल राखणें किती आवश्यक आहे तें अगदीं सुस्पष्ट आहे. परंतु तरी देखील जितक्या प्रमाणांत खाजगी क्षेत्राने उत्पादन केलेल्या मोटारींच्या संख्येत वाढ झाली आहे तितक्या प्रमाणांत संबंधींत सार्वजनिक सुविधाच्या पुरवठ्यांत झालेली नाहीं. त्यामुळें रस्त्यावर रहदारीची फार दाटी होते. अपघातांत मोठ्या प्रमाणावर माणसें मरतात आणि शहरांतल्या अनेक लोकांना पोटाचे रोग होतात, जमीनीवर जशी परिस्थिती आहे

तशी आकाशांत देखील आहे. खाजगी क्षेत्राच्या हातांत असलेल्या विमानवाहतूकींत जितक्या प्रमाणांत वाढ झाली आहे तितक्या प्रमाणांत हवाई वाहतूकीचे नियंत्रण करण्याची सोय झालेली नाहीं. त्यामुळें विमानांच्या अनेकदां टकरा होतात आणि अनेक प्रवासी मरतात.

मोटारी आणि विमानें यांची संख्या आणि त्यांच्यासाठीं लागणाऱ्या सार्वजनिक सुविधा यांच्यात हा जो समतोलाचा अभाव आहे तो नजरेंत विशेष भरतो हे खरें. परंतु हा समतोलाचा प्रश्न सर्वच क्षेत्रांत उद्‌भवत असतो. लोक जितक्या अधिक वस्तू विकत घेतात तितक्या अधिक पिशव्या आणि डबे टाकून देतात आणि मग तितक्याच प्रमाणांत कचरा हलविण्याची व्यवस्था करावी लागते. शहर सफाईच्या व्यवस्थेंत जर वाढ केली नाहीं तर संपन्नतेवरोवरच गलीच्छपणाहि वाढत जाईल. आपल्या जीवनांत ही प्रवृति सर्वत्र आढळून येते. वस्तूंचें उत्पादन आणि मालकी यांत जितकी वाढ होते तितक्याच प्रमाणांत त्या मालमत्तेचें संरक्षण करण्याची देखील आवश्यकता निर्माण होते. फसवाफसवीचें प्रकार करायला अधिक संधी मिळते आणि तें थांववण्याची व्यवस्था करावी लागते. संपन्नतेंत जितकी वाढ होते तितकीच सरकारी कायद्यांची अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणेंत देखील वाढ करावी लागते. तसें केलें नाहीं तर गुन्हेगारी अधिक प्रमाणांत वोकाळते.

आधुनिक काळांत सामाजिक समतोलाचा हा जो प्रश्न निर्माण झालेला आहे त्याचे उत्तम उदाहरण आपल्याला लॉस-अॅन्जलिस ह्या शहरांत आढळतें. या शहरांत अत्यंत कार्यक्षम कारखाने आणि तेलशुद्धीची केंद्रें आहेत. इथें भरपूर मोटारी आहेत आणि उत्तम प्रकारें डब्यांत वंद केलेल्या वस्तूंचे इथें मोठ्या प्रमाणांत सेवन केलें जातें. पण त्याचवरोवर येथील नगरपालिकेने कचरा हलविण्याची योग्य ती व्यवस्था केलेली नाही. त्यामुळें कचरा जाळण्याची यंत्रें घरोघरी वापरावी लागतात. तिथली हवा वर्षभर अत्यंत दूषित असते. हवेतले हे दोष जर काढून टाकायचे असतील तर त्यासाठीं अत्यंत विकासित आणि गुंतागुंतीच्या सार्वजनिक सुविधांची आवश्यकता आहे. त्यासाठीं अधिक संशोधन करून अधिक ज्ञान मिळवायला हवें. पोलीस दलांत सुधारणा करायला हवी. नगरपालिकेने कचरा हलविण्याची व्यवस्था करायला हवी आणि वस्तूंचे उत्पादन करण्यापेक्षां हवा स्वच्छ ठेवणें अधिक महत्त्वाचे आहे हें तत्त्व व्यवहारांत लागू करायला हवें. परंतु ह्या सुविधा पुरविण्यांत फार दिरंगाई झाली आहे आणि त्यामुळें शहरांतली हवा अत्यंत दूषित होऊन जीवन असह्य झालें आहे.

सध्यांच्या अनेक समस्यांच्या मूळाशीं हा सामाजिक समतोलाचा प्रश्न आहे असें दाखवून देतां येईल. खाजगी क्षेत्रांतील उत्पादन वाढल्यामुळें अशा अनेक गोष्टी

अस्तित्वांत आल्या आहेत कीं, ज्या तरूण मुलांचे लक्ष वेधून घेतात. चित्रपट, टेलिव्हिजन, मोटारी आणि प्रवास सुलभ झाल्यामुळें निर्माण झालेल्या नव्या संधी इत्यादींचा या गोष्टींत समावेश होतो. अंमलीपदार्थ, चित्रमय गोष्टींचीं पुस्तकें, आणि अश्लील वाङमय या अनिष्ट गोष्टी देखील आज तरुण मुलांना उपलब्ध झाल्या आहेत. आपल्या वाढत्या राष्ट्रीय उत्पादनांत या सर्व गोष्टींचा समावेश होतो. ज्या काळांत इतकी तांत्रिक प्रगति झाली नव्हती व इतक्या प्रमाणांत संपन्नताहि निर्माण झाली नव्हती त्या काळांत लहान मुलांना फार थोडी करमणूकीची साधने उपलब्ध असत. त्या काळांत शाळेच्या लाल इमारतीला विद्यार्थ्यांच्या जीवनांत अत्यंत महत्त्वाचे स्थान होते. आधुनिक शाळेला तसें स्थान नाहीं आणि म्हणूनच शाळेच्या त्या लाल इमारतीची सर्वांना इतकी आठवण येते.

ज्या समजांत शिक्षणाची चांगली व्यवस्था असते, करमणुकीच्या चांगल्या सोई असतात आणि चांगलें पोलीस दल असतें, म्हणजेच जो समाज सुव्यवस्थित आणि सुनियंत्रित जीवन जगत असतो, त्या समाजांत मुलांचे लक्ष वेधून घेणाऱ्या विविध करमणुकींच्या साधनांचा अनिष्ट परिणाम होत नाहीं. त्या समाजांत खाजगी क्षेत्रांतील उत्पादन आणि सार्वजनिक क्षेत्रांतील सुविधा यांत समतोल राखलेला असतो. तेथें टेलिव्हिजन, हॉलीवूडचे चित्रपट आणि न्युयॉर्कला प्रसिद्ध होणारीं चित्ररूप गोष्टींची मासिकें जरी मुलांना दंगेखोरी करण्यास प्रवृत्त करीत असलीं तरी दुसऱ्या बाजूला शाळा त्या मुलांना बौद्धिक शिस्त लावीत असते. खेळ, नाटकें, सामाजिक समारंभ इत्यादी गोष्टींत मुलांचे मन रमविण्याचा प्रयत्न शाळांत केला जातो. शिवाय समाजांत करमणुकींचीं अन्य साधनेहि उपलब्ध असतात त्यामुळे गुन्हेगारीची प्रवृत्ति कमी होते. कायद्याची व्यवस्थित अंमलबजावणी होत असल्यामुळें दंगल करण्याच्या किंवा अनैतिक गोष्टी करण्याच्या प्रवृत्तिला मुळांतच आळा बसतो आणि मग या गोष्टींची साथ पसरत नाहीं.

परंतु ज्या समाजामध्यें खाजगी सेवनाच्या बरोबरीने सार्वजनिक सुविधांत वाढ झालेली नसते त्या सामाजांतली परिस्थिती वेगळी असते. तेथें खाजगीं क्षेत्रांत वैपुल्य असतें आणि सार्वजनिक क्षेत्रांत दारिद्र्य असतें. त्यामुळें खाजगी क्षेत्रांतील वस्तूच मनाचा तावा घेतात. टेलिव्हिजन आणि चित्रपट यांच्याशीं तेथें शाळा स्पर्धा करीत नाहीत. मग चित्रपटांचे नायकच मुलांचे आदर्श पुरुष होतात. आपल्या शिक्षिकेला आदर्शवत मानण्याची प्रवृत्ती त्यांच्या मनांत निर्माण होत नाहीं. वेगवान मोटारी वेफामपणें चालवणें हाच मुलांचा मुख्य खेळ होतो. दुसरे अधिक संयमित खेळ त्यांचे लक्ष वेधून घेत नाहींत कारण ते खेळण्यासाठीं पुरेशा सोईच उपलब्ध नसतात. चित्ररूप गोष्टींची पुस्तकें, दारू, अमली पदार्थ, कळीचे चाकू इत्यादींचे

उत्पादन इतर वस्तूंच्या बरोबरच वाढलेलें असतें. त्या मुलांना उपलब्ध असतात आणि त्यांची जागा घेईल असें दुसरें कांहींच नसते. जी चोरतां येईल अशीं खाजगी मालमत्ता भरपूर प्रमाणांत अस्तित्वांत असते. त्यामानाने पोलीसांची भीति वाटादी इतकें पोलीस दल मोठें नसते. ज्या समाजाचें उत्पन्न थोडे असतें त्या समाजांत मुलांना बिघडवणाऱ्या गोष्टी देखील थोड्या असतात. अशा समाजांत सार्वजनिक सुविधा कमी असल्या तरी चालतात. समृद्ध समाजांत मात्र तसें चालत नाहीं.

शिवाय ज्या समाजात उत्पादनाला फार महत्त्व असते आणि जेथें खाजगी गरजा कृत्रिमपणे निर्माण करणारी अत्यंत कार्यक्षम यंत्रणा असते. तेथें प्रत्येक कुटुंबांतल्या जास्तीत जास्त माणसांनीं काम करून पैसा मिळवावा अशी प्रवृत्ती असते. सामाजिक वर्तणूकीची सर्व अंगे अशीं परस्पर सुसंगत असतात. आई आणि वडिल ही दोघेहि जर खाजगी क्षेत्रांतील उत्पादनांत गुंतलेली असली तर सार्वजनिक क्षेत्रावरील जबाबदारी वाढते. दिवसांतला बराच वेळ मुलाचा सांभाळ करणें ही समाजाची जबाबदारी होते. आणि ही जबाबदारी पार पाडण्यासाठीं अवश्य त्या प्रमाणांत सार्वजनिक सुविधांची जर वाढ झाली नाही तर सामाजिक अस्वास्थ्यांत भर पडते.

सामाजिक समतोलाचा हा जो प्रश्न आहे तो राहात्या घरांच्या बाबतींत देखील कांहींशा गुंतागुंतीच्या स्वरूपांत निर्माण होतो. मध्यम किंवा कनिष्ट वर्गांतील अमेरिकन लोकांना रहायला उत्तम घरें आहेत असें आपल्याला म्हणतां येणार नाहीं. पुष्कळशा कुटुंबांना मोठी जागा हवी असते किंवा अधिक चांगल्या ठिकाणीं रहाण्याची इच्छा असते. आणि ही इच्छा त्यांच्या मनांत निर्माण करण्यासाठीं जाहीरातीचा उपयोग करण्याची आवश्यकता नसते. आतां घरें बांधणें हें खाजगी क्षेत्राचे कार्य आहे. त्यामुळें खाजगी व सार्वजनिक क्षेत्र यांत जो भेद आहे त्यामुळें घरांचा पुरवठा पुरेशा प्रमाणांत होत नाहीं असें प्रथमदर्शनी तरी आपल्याला म्हणतां येणार नाही.

अधिक बारकाईने पाहिलें तर हा प्रश्न शिक्षणाच्या प्रश्नापेक्षां फारसा वेगळा नाहीं असें आढळून येतें. युनायटेड स्टेस्ट्समधील घर बांधणीचा धंदा, स्कँण्डिनेव्हिया, हॉलंड किंवा इंग्लंड येथील घर बांधीच्या धंद्यापेक्षां कमी कार्यक्षम आहे असें म्हणतां येणार नाहीं. तरी देखील या इतर देशांतील गलिच्छ वस्त्या बऱ्याचशा प्रमाणांत नष्ट करण्यांत आल्या आहेत. आणि स्वच्छता व सुखसोयी याबाबतीतील तेथील किमान पातळी आपल्यापेक्षां बरीच उंच आहे. ह्या देशांच्या अनुभवावरून असें दिसून येतें कीं, घरबांधणीचा धंदा नीटपणे चालायचा असेल तर त्यासाठीं विविध प्रकारच्या सार्वजनिक सुविधांवर मोठ्या प्रमाणांत खर्च करावा लागतो.

अस्तित्वांत आल्या आहेत कीं, ज्या तरूण मुलांचे लक्ष वेधून घेतात. चित्रपट, टेलिव्हिजन, मोटारी आणि प्रवास सुलभ झाल्यामुळें निर्माण झालेल्या नव्या संधी इत्यादींचा या गोष्टींत समावेश होतो. अंमलीपदार्थ, चित्रमय गोष्टींचीं पुस्तकें, आणि अश्लील वाङमय या अनिष्ट गोष्टी देखील आज तरुण मुलांना उपलब्ध झाल्या आहेत. आपल्या वाढत्या राष्ट्रीय उत्पादनांत या सर्व गोष्टींचा समावेश होतो. ज्या काळांत इतकी तांत्रिक प्रगति झाली नव्हती व इतक्या प्रमाणांत संपन्नताहि निर्माण झाली नव्हती त्या काळांत लहान मुलांना फार थोडी करमणूकीची साधने उपलब्ध असत. त्या काळांत शाळेच्या लाल इमारतीला विद्यार्थ्यांच्या जीवनांत अत्यंत महत्त्वाचे स्थान होते. आधुनिक शाळेला तसें स्थान नाहीं आणि म्हणूनच शाळेच्या त्या लाल इमारतीची सर्वांना इतकी आठवण येते.

ज्या समजांत शिक्षणाची चांगली व्यवस्था असते, करमणुकीच्या चांगल्या सोई असतात आणि चांगलें पोलीस दल असतें, म्हणजेच जो समाज सुव्यवस्थित आणि सुनियंत्रित जीवन जगत असतो, त्या समाजांत मुलांचे लक्ष वेधून घेणाऱ्या विविध करमणुकींच्या साधनांचा अनिष्ट परिणाम होत नाहीं. त्या समाजांत खाजगी क्षेत्रांतील उत्पादन आणि सार्वजनिक क्षेत्रांतील सुविधा यांत समतोल राखलेला असतो. तेथें टेलिव्हिजन, हॉलीवूडचे चित्रपट आणि न्युयॉर्कला प्रसिद्ध होणारीं चित्ररूप गोष्टींची मासिकें जरी मुलांना दंगेखोरी करण्यास प्रवृत्त करीत असलीं तरी दुसऱ्या बाजूला शाळा त्या मुलांना बौद्धिक शिस्त लावीत असते. खेळ, नाटकें, सामाजिक समारंभ इत्यादी गोष्टींत मुलांचे मन रमविण्याचा प्रयत्न शाळांत केला जातो. शिवाय समाजांत करमणुकींचीं अन्य साधनेहि उपलब्ध असतात त्यामुळे गुन्हेगारीची प्रवृत्ति कमी होते. कायद्याची व्यवस्थित अंमलबजावणी होत असल्यामुळें दंगल करण्याच्या किंवा अनैतिक गोष्टी करण्याच्या प्रवृत्तिला मुळांतच आळा बसतो आणि मग या गोष्टींची साथ पसरत नाहीं.

परंतु ज्या समाजामध्यें खाजगी सेवनाच्या बरोबरीने सार्वजनिक सुविधांत वाढ झालेली नसते त्या सामाजांतली परिस्थिती वेगळी असते. तेथें खाजगीं क्षेत्रांत वैपुल्य असतें आणि सार्वजनिक क्षेत्रांत दारिद्र्य असतें. त्यामुळें खाजगी क्षेत्रांतील वस्तूच मनाचा तावा घेतात. टेलिव्हिजन आणि चित्रपट यांच्याशीं तेथें शाळा स्पर्धा करीत नाहीत. मग चित्रपटांचे नायकच मुलांचे आदर्श पुरुष होतात. आपल्या शिक्षिकेला आदर्शवत मानण्याची प्रवृत्ती त्यांच्या मनांत निर्माण होत नाहीं. वेगवान मोटारी वेफामपणें चालवणें हाच मुलांचा मुख्य खेळ होतो. दुसरे अधिक संयमित खेळ त्यांचे लक्ष वेधून घेत नाहींत कारण ते खेळण्यासाठीं पुरेशा सोईच उपलब्ध नसतात. चित्ररूप गोष्टींची पुस्तकें, दारू, अमली पदार्थ, कळीचे चाकू इत्यादींचे

उत्पादन इतर वस्तूंच्या बरोबरच वाढलेलें असतें. त्या मुलांना उपलब्ध असतात आणि त्यांची जागा घेईल असें दुसरें कांहींच नसते. जी चोरतां येईल अशीं खाजगी मालमत्ता भरपूर प्रमाणांत अस्तित्वांत असते. त्यामानाने पोलीसांची भीति वाटावी इतकें पोलीस दल मोठें नसते. ज्या समाजाचें उत्पन्न थोडे असतें त्या समाजांत मुलांना विघडवणाऱ्या गोष्टी देखील थोड्या असतात. अशा समाजांत सार्वजनिक सुविधा कमी असल्या तरी चालतात. समृद्ध समाजांत मात्र तसें चालत नाहीं.

शिवाय ज्या समाजात उत्पादनाला फार महत्त्व असते आणि जेथें खाजगी गरजा कृत्रिमपणे निर्माण करणारी अत्यंत कार्यक्षम यंत्रणा असते. तेथें प्रत्येक कुटुंबांतल्या जास्तीत जास्त माणसांनीं काम करून पैसा मिळवावा अशी प्रवृत्ती असते. सामाजिक वर्तणूकीची सर्व अंगे अशीं परस्पर सुसंगत असतात. आई आणि वडिल ही दोघेहि जर खाजगी क्षेत्रांतील उत्पादनांत गुंतलेली असली तर सार्वजनिक क्षेत्रावरील जबाबदारी वाढते. दिवसांतला बराच वेळ मुलाचा सांभाळ करणें ही समाजाची जबाबदारी होते. आणि ही जबाबदारी पार पाडण्यासाठीं अवश्य त्या प्रमाणांत सार्वजनिक सुविधांची जर वाढ झाली नाही तर सामाजिक अस्वास्थ्यांत भर पडते.

सामाजिक समतोलाचा हा जो प्रश्न आहे तो राहात्या घरांच्या बाबतींत देखील कांहींशा गुंतागुंतीच्या स्वरूपांत निर्माण होतो. मध्यम किंवा कनिष्ट वर्गांतील अमेरिकन लोकांना रहायला उत्तम घरें आहेत असें आपल्याला म्हणतां येणार नाहीं. पुष्कळशा कुटुंबांना मोठी जागा हवी असते किंवा अधिक चांगल्या ठिकाणीं रहाण्याची इच्छा असते. आणि ही इच्छा त्यांच्या मनांत निर्माण करण्यासाठीं जाहीरातीचा उपयोग करण्याची आवश्यकता नसते. आतां घरें बांधणें हें खाजगी क्षेत्राचे कार्य आहे. त्यामुळें खाजगी व सार्वजनिक क्षेत्र यांत जो भेद आहे त्यामुळें घरांचा पुरवठा पुरेशा प्रमाणांत होत नाहीं असें प्रथमदर्शनी तरी आपल्याला म्हणतां येणार नाही.

अधिक बारकाईने पाहिलें तर हा प्रश्न शिक्षणाच्या प्रश्नापेक्षां फारसा वेगळा नाहीं असें आढळून येतें. युनायटेड स्टेस्ट्समधील घर बांधणीचा धंदा, स्कॅण्डिनेव्हिया, हॉलंड किंवा इंग्लंड येथील घर बांधीच्या धंद्यापेक्षां कमी कार्यक्षम आहे असें म्हणतां येणार नाहीं. तरी देखील या इतर देशांतील गलिच्छ वस्त्या बऱ्याचशा प्रमाणांत नष्ट करण्यांत आल्या आहेत. आणि स्वच्छता व सुखसोयी याबाबतीतील तेथील किमान पातळी आपल्यापेक्षां बरीच उंच आहे. ह्या देशांच्या अनुभवावरून असें दिसून येतें कीं, घरबांधणीचा धंदा नीटपणे चालायचा असेल तर त्यासाठीं विविध प्रकारच्या सार्वजनिक सुविधांवर मोठ्या प्रमाणांत खर्च करावा लागतो.

आपल्याला देखील हाच अनुभव येत आहे. तो धंदा यशस्वी होण्यासाठीं जमीनीची खरेदी करून पुनर्विकासासाठीं तिची सफाई करावी लागते. सबंध शहर आणि त्यांतील वस्त्या यांची चांगल्या प्रकारें रचना व्हावी म्हणून योजना आखाव्या लागतात. निरनिराळ्या कार्यासाठीं शहराचे विभाग पाडावे लागतात आणि या विभाग-योजनेची परिणामकारकपणें अंमलबजावणी करावी लागते. घरें बांधणारे आणि घरांचे मालक यांना कर्जाच्या आणि इतर अनेक गोष्टींच्या रूपाने मदत करावी लागते. घर-बांधणीच्या तंत्राच्या क्षेत्रात संशोधन करावें लागते आणि इतर तांत्रिक स्वरूपाची मदत करावी लागते. कारण ह्या धंद्याला स्वत:साठीं या गोष्टींची तरतूद करणें शक्य नसते. शिवाय गरीब कुटुंबांसाठीं मोठ्या प्रमाणावर सरकारी खर्चाने घरें बांधण्यास मदत करावी लागते. घरांचा दर्जा घर बांधणीच्या धंद्यावर केवळ अवलंबून नसतो तर या आनुषंगिक गोष्टीवर किती खर्च केला जातो किंवा घर बांधणीस किती प्रमाणांत साहाय्य केलें जातें यावर तो अवलंबून असतो.

[३]

सामाजिक समतोलाची आवश्यकता आतां पर्यन्त अकरणात्मक स्वरूपांत मांडण्यांत आली आहे. सार्वजनिक सुविधा आणि खाजगी क्षेत्रांतील उत्पादन व सेवन यांचे परस्परांशीं कांही एक किमान प्रमाण ठेवलें नाहीं तर त्यामुळें सामाजिक अस्वास्थ निर्माण होते किंवा आर्थिक व्यवहारांत अडथळे निर्माण होतात. हाच मुद्दा करणात्मक स्वरूपांत देखील मांडतां येईल. सरकारीं क्षेत्रांतील उत्पादनांत आपण वाढ न केल्याने एरवी ज्या सुखसोयी आपल्याला मिळाल्या असत्या त्या मिळवण्याची संधी आपण दवडतो. मोठ्या मोटारी खरेदी केल्यामुळें समाजाला जितकें सुख लागते तितकेंच चांगल्या शाळा किंवा चांगलीं सार्वजनिक उद्यानें यांच्या द्वारें देखील मिळूं शकतें. समाजानें खाजगी क्षेत्रांतील उत्पादनावरच जर भर दिला व ह्या अन्य गोष्टींकडे जर दुर्लक्ष केलें तर त्याला अधिकांतअधिक समाधान मिळूं शकत नाहीं. शाळांच्या बाबतींत जें खरें आहे तेंच देशांतील सर्व सार्वजनिक सुविधांच्या बाबतींत देखील खरें आहे. खाजगीं क्षेत्रांतील वस्तूंच्या गरजा आपण भरपूर प्रमाणांत भागवाव्या आणि सार्वजनिक क्षेत्रांतील वस्तूंच्या बाबतींत मात्र अतिरिक्त काटकसर करावी हें इष्ट नाहीं. परंतु सार्वजनिक सुविधांमुळें आपल्याला जी सुखें मिळूं शकतात ती मिळविण्याचा पद्धतशीर प्रयत्न आपण करीत नाहीं. इतकेंच नव्हे तर सामाजिक स्वास्थ बिघडूं नये यासाठीं त्या सुविधांची जितक्या प्रमाणांत आवश्यकता असते तितक्या प्रमाणांत देखील आपण त्यांचें उत्पादन करीत नाहीं.

सांकेतिक शहाणपणाची भूमिका अशी कीं, सार्वजनिक सुविधांवर किती खर्च करायचा त्या बाबतचा निर्णय समाज घेत असतो. हा निर्णय लोकशाही पद्धतीने घेतला जातो. लोकशाहींत जें कांहीं दोष असतात व अनिश्चितता असते तिचा या निर्णयावर परिणाम होतो हें खरें. परंतु ज्या सार्वजनिक सुविधांची लोकांना विशेष गरज असते त्या भागवण्यासाठीं आपल्या खाजगी उत्पन्नाचा केवढा भाग सरकारच्या स्वाधीन करायचा ते लोक ठरवीत असतात. यामुळें खाजगी उत्पादनापासून मिळणारें समाधान आणि सरकारनें पूरवलेल्या वस्तू व सुविधा यापासून मिळणारें समाधान यांत एक प्रकारचा समतोल राखला जातो.

ग्राहकांच्या गरजा स्वयंभूपणे निर्माण होतात हीं कल्पना वरील भूमिकेच्या मुळांशीं आहे हे उघड आहे. ही कल्पना जर खरी असेल तर खाजगीं क्षेत्रांतील व सरकारीं क्षेत्रांतील वस्तू किती प्रमाणांत आपल्याला हव्यात याचा निर्णय ग्राहक मतदार या नात्यानें घेतात असें म्हणणें संयुक्तिक ठरेल. परंतु मागण्या परावलंबी असतात. ज्या प्रक्रियेनें ग्राहकांच्या गरजांचे समाधान केलें जातें तिच्याच द्वारें त्यांची निर्मितीहि केली जाते. ही गोष्ट ध्यानांत घेतली कीं, वरील निर्णय ग्राहक घेतो असें म्हणता येणार नाहीं. जाहिरात आणि अनुकरणप्रियता यांच्या द्वारें उत्पादन स्वत:साठीं मागणी निर्माण करीत असते. आणि या गोष्टींचे दडपण ग्राहकांवर पडत असतें. जाहिरातींमुळें फक्त खाजगी क्षेत्रांतील वस्तू आणि सुविधा यांसाठी मागणी निर्माण होते. आणि अनुकरण-प्रियता देखील मुख्यत: याच गोष्टीसाठीं मागणी निर्माण करते,[1] जाहिरात आणि अनुकरणप्रियता यांची खाजगी उत्पादनाला अशा प्रकारें मदत होत असल्यामुळें सार्वजनिक सुविधा नेहमींच मागें रहातात. मोटारीसाठी मागणी निर्माण करण्यावर फार मोठा खर्च केला जातो. उत्पन्नाचा बराच हिस्सा ही गरज भागवण्यांत खर्च होतो. परंतु रस्ते, उद्याने व क्रिडांगणें किंवा सार्वजनिक आरोग्यासाठीं अवश्य असलेल्या सुविधा यांसाठीं कृत्रिमपणें मागणी निर्माण केली जात नाहीं. त्यामुळें या गोष्टीवर उत्पन्नाचा कमी भाग खर्च

---

१ निरनिराळें समाज देखील एकमेकांचे अनुकरण करीत असतात एका गावांत जर नवी शाळा झाली किंवा नवा हमरस्ता बांधला गेला तर इतर गांवांना देखील या बाबतींत आपण मागे पडूं नये असें वाटते. परंतु खाजगी क्षेत्रांत उत्पादन केलेल्या ग्राहकोपयोगी वस्तूंसाठी मागणी निर्माण करण्याचें कार्य अनुकरणप्रियता ज्या प्रमणांत करते त्यामानाने अनुकरणप्रियतेचा निरनिराळ्या गांवावर होणारा परिणाम मर्यादीत असतो. मला वाटतें कीं, या बाबतींत सर्वांचे एकमत व्हायला हरकत नाहीं.

होतो. सार्वजनिक प्रसाराची अत्यंत विकसित साधने समाजाने अधिक विअर प्यावी ह्यासांठी माणसांच्या कानांवर आणि डोक्यावर सारखे जाहिरातीचे आघात करीत असतात. परंतु अधिक शाळा बांधल्या जाव्या यासाठीं मात्र असलें काहींच केले जात नाहीं. अशा परिस्थितींत या दोन गोष्टीवरील खर्चाची विभागणी समतोलपणें केली जाते असा आग्रह सांकेतिक शहाणपणाचे पुरस्करते देखील धरणार नाहीत.

नव्या वस्तू आणि सुविधा याच्या बाबतींत तर हा समतोलपणाचा अभाव विशेष तीव्रतेने जाणवतो. एखाद्या नव्या वस्तूसाठीं मागणी निर्माण व्हावी म्हणून देशांतील अत्यंत हुषार माणसें समाजाच्या मनावर परिणाम करण्याचा सारखा प्रयत्न करीत असतात. परंतु ज्या सुविधा बाजारांत विकता येत नाहींत आणि ज्या सरकार निर्माण करीत असते त्यांसाठीं मागणी निर्माण व्हावी म्हणून अशा प्रकारचा कोणताच प्रयत्न केला जात नाहीं. खरे म्हणजें खाजगी क्षेत्रातील वस्तूंसाठीं मागणी निर्माण करण्याचा प्रयत्न केला जावा हे आपण गृहीत धरून चालतो. परंतु सार्वजनिक सुविधांच्या बाबतींत असा प्रयत्न व्हावा हें मात्र आपल्याला मुळींच पटत नाहीं. एखादा नवा कार्ब्यूरेटर किंवा अशाच अन्य वस्तू तयार करण्यासाठीं जे शास्त्रज्ञ, तंत्रज्ञ किंवा जाहिराततज्ञ काम करीत असतात ते समाजाचे महत्त्वाचे घटक आहेत असें मानलें जातें. खरें म्हणजें जो पर्यन्त जाहिरातींच्या द्वारें या वस्तूंसाठीं गरज निर्माण केली जात नाहीं तो पर्यन्त समाजाला त्यांची आवश्यकता भासत नसते. आणि तरी त्या वस्तू निर्माण करणारी ही माणसें महत्त्वाची आहेत असें मानलें जाते. परंतु एखादी नवी सार्वजनिक सुविधा लोकांना उपलब्ध करून द्यावी अशी कल्पना जर एखाद्या राजकीय कार्यकर्त्याला किंवा सरकारी नोकराला सुचली तर तो उघळ्या आहे असा शिक्का त्याच्यावर बसतो. सार्वजनिक जीवनांत तें एक फार मोठें दूषण ठरते.

खाजगी क्षेत्रांत किती उत्पादन करावें आणि सार्वजनिक क्षेत्रांत किती करावें या बावतचा निर्णय कोणत्या गोष्टींवर अवलंबून असतो ते आपण आतां पर्यन्त पाहिलें. खाजगी क्षेत्रांतील आणि सार्वजनिक क्षेत्रांतील सेवनाबावत शांतपणें निर्णय घेतला जातो असें जें चित्र सांकेतिक शहाणपणानें रेखाटलें आहे तें अगदीं चुकीचे आहे कारण तें रेखाटतांना सामाजिक वर्तणुकीमागचें सर्व धागेंदोरे लक्षांत घेतलेले नाहींत, सार्वजनिक सुविधा या खाजगी उत्पादनाच्या नेहमींच मागें पडाव्यात अशी एक अपरिहार्य प्रवृत्ती असते. सामाजिक समतोलाच्या अभावाचे हें पहिलें कारण आहे.

[४]

आपल्या समाजांत विषमतेवाबत तात्पुरती शस्त्रसंधी झाली आहे आणि मुद्रास्फिती ही एक नित्याची प्रवृत्ति झाली आहे. या दोन गोष्टींमुळें देखील सामाजिक समतोल विघडतो. या गोष्टी आपण विचारांत घेतलेल्या आहेत. त्यामुळें त्यांचा परिणाम आपल्याला चटकन् समजू शकेल.

टपालाच्या सोयीसारखे कांही थोडे अपवाद सोडल्यास सार्वजनिक सुविधांचा उपयोग करणाऱ्या माणसास त्यासाठीं तिथल्या तिथें पैसें मोजावे लागत नाहीत. त्यांचे स्वरूपच असें असतें कीं, सामान्यतः त्या सर्वांनाच उपलब्ध असाव्या लागतात. त्यामुळें त्या सुविधांत जर सुधारणा केली किंवा नव्या सुविधा उपलब्ध करून देण्यांत आल्या तर त्यासाठीं होणारा खर्च कोणी सोसावा हा जुना व त्रासदायक प्रश्न उपस्थित होतो. तो उपस्थित झाला कीं, त्याच्याशीं निगडीत असलेल्या परंतु या संदर्भात अप्रस्तुत असलेल्या विषमतेच्या प्रश्नावरील चर्चा सुरू होते. वित्तविषयक धोरणाचे साधन म्हणून करांचा उपयोग करण्याचा प्रसंग आला कीं, ज्याप्रमाणें विषमतेबाबतच्या शस्त्रसंधीचा भंग होतो तसेंच या बाबतींत देखील होतें. मग उदारमतवादी असें प्रतिपादन करूं लागतात कीं, या सुविधांचा खर्च भागविण्यासाठीं चढत्या दराचे कर बसवा. हे दर विषमता कमी करतील. वस्तूंच्या उत्पादनाचे महत्त्व त्यांना मान्य असते. (शिवाय उत्पादनाची पातळी स्थिर कशी ठेवावी याबाबत देखील त्यांचा कांहींसा यांत्रिक दृष्टिकोन असतो असतो. या दृष्टीकोनाचा विचार आपल्याला पुढील एका प्रकरणांत करायचा आहे.) त्यामुळें विक्रीकर किंवा एक्साइज कर यांना ते विरोध करतात. उलट जे परंपरानिष्ठ असतात ते विषमतेचे समर्थन करायला उभे असतात आणि प्राप्तिकराला विरोध करतात. (अर्थात् विषमता आपल्याला हवी आहे असें उघडपणें ते कधींच म्हणत नाहींत.) सार्वजनिक सुविधांवरील खर्चाला ते जो विरोध करतात तो या सुविधांच्या वरेवाईटपणावर अवलंबून नसतो. करपद्धतींत त्यांना जे दोष दिसतात त्यांतून हा विरोध निर्माण होतो. विषमतेबाबतच्या वादविवादाचा निर्णय लागणें अशक्य असतें. त्यामुळें या सार्वजनिक सुविधांसाठीं पुष्कळदां पैशांची व्यवस्था केली जात नाहीं. आणि मग या सुविधा देखील उपलब्ध केल्या जात नाहीत. परंपरानिष्ठ आणि उदारमतवादी या दोघांच्याहि दृष्टीनें उत्पादन व विषमता यांच्या मानाने सामाजिक समतोलाचे महत्त्व कमी आहे. आणि या त्यांच्या भूमिकेमुळें सार्वजनिक सुविधांत वाढ होण्यास सारखा अडथळा येतो.

या प्रश्नाबाबत ज्या शक्ति रस्सीखेंच करीत असतात त्यांचे स्वरूप हें असें

असतें. पण त्यावरून जो निष्कर्ष निघतो त्यामानाने प्रत्यक्षांतील परिस्थिती कांहीं अंशी अधिक चांगली आणि कांहीं अंशी अधिक वाईट असते. करांचे दर स्थिर आहेत असे मानलें तर ज्या प्रमाणांत अर्थव्यवस्थेचा विकास होतो त्याप्रमाणांत सरकारची आवकहि वाढत असते. उत्पन्नांत ही जी आपोआप वाढ होते त्यामुळें उपलब्ध सुविधा कायम ठेवणें किंवा कधीं कधीं त्यांत सुधारणा करणें देखील शक्य होतें.

परंतु हा परिणाम अत्यंत विषम प्रकारें होत असतो. मध्यवर्ती सरकारचे उत्पन्न पुष्कळसे प्राप्तीकरांतून मिळत असतें. त्यामुळें खाजगी क्षेत्राचा आर्थिक विकास झाला कीं, या सरकारचे उत्पन्न त्याहून अधिक प्रमाणांत वाढतें. शिवाय मध्यवर्ती सरकारतर्फे जो खर्च होतो तो करांपासून मिळणाऱ्या उत्पन्नावर फारसा अवलंबून नसतो. सांकेतिक शहाणपणाला हें पसंत नसलें तरी असे असतें खरे. सार्वजनिक सुविधांची आवश्यकता किती तीव्र आहे त्याच्या आधारेच त्यांच्यावर चर्चा व मतदान होतें. एखादीं सार्वजनिक सुविधा उपलब्ध करणें किंवा तिच्यांत सुधारणा करणें या बाबतचा निर्णय घेतांना त्या सुविधेचा खर्च भागविण्यासाठीं जे कर बसवावे लागतील त्यांचे परिणाम विचारांत घेतले जात नाहीत. अर्थात् चर्चेत मात्र त्या परिणामांचा उल्लेख होतो. करविषयींचे धोरण ठरवतांना आर्थिक उत्पादनाची पातळी, तिच्यापासून मिळणारे करांचे उत्पन्न, व्यवहार्यता आणि इतर बाबी विचारांत घेतल्या जातात. स्वतंत्रपणें विचार करून ज्या वेगवेगळ्या गोष्टींवर खर्च करायचें सरकारने ठरवलेलें असतें त्या गोष्टींना व त्या खर्चाला करावावतचे धोरण ठरवतांना प्राधान्य दिलें जात नाहीं. या परिस्थितींत एखाद्या विशिष्ट गोष्टीवरील खर्चामुळें करांवर निश्चित असा परिणाम होत नाहीं. आणि त्यामुळें या परिणामाकडे दुर्लक्ष केलें जातें. परिस्थितीचे गणितच मुळीं तसें करायला लावतें. यामुळें विषमतेचा प्रश्न उपस्थित न करतां काँग्रेसला सामाजिक समतोलांत फेरबदल करणारे निर्णय घेतां येतात.

परंतु या संदर्भात एक गोष्ट प्रतिकूल असते. मध्यवर्ती सरकारच्या उत्पन्नाचा बराच मोठा भाग राष्ट्रीय संरक्षणासाठीं नियुक्त केलेला असतो. संरक्षणाचा खर्च वाढतो आहे आणि त्यामुळें करांच्या उत्पन्नांत जी आपोआप वाढ होत असते तिचा पुष्कळसा भाग संरक्षणासाठीं खर्च होतो. दुसऱ्या महायुद्धानंतर सामाजिक समतोलांत सुधारणा करण्याचे मध्यवर्ती सरकारचे सामर्थ्य आणखी एका गोष्टीमुळें कमी झालें आहे. दुसऱ्या महायुद्धापासून असा एक समज प्रचलित आहे कीं, युद्धकालीन परिस्थितीमुळें करांत फार वाढ झाली आहे. आणि हे कर शक्यतो लवकर कमी करण्यास सरकार बांधलेलें आहे. हा समज आतां मागे पडत चालला

आहे हें खरें. परंतु तरी देखील त्यामुळें सामाजिक समतोलांत सुधारणा करण्याचें मध्यवर्ती सरकारचे सामर्थ्य कमी झालें आहे.

घटक राज्यें आणि स्थानिक स्वराज्यसंस्था यांच्या बाबतींत सामाजिक समतोलाचा हा प्रश्न विशेष बिकट आहे. खाजगी उत्पादनांत जितकी वाढ होते त्याहून कमी प्रमाणांत या संस्थाच्या करापासून मिळणाऱ्या उत्पन्नांत वाढ होते. मालमत्तेवरील सामान्य कराच्या बाबतींत ही गोष्ट विशेषच खरी आहे. त्याचप्रमाणें आपलें अंदाजपत्रक तयार करतांना मध्यवर्ती सरकारला जितकें स्वतंत्र्य असते तितकें या स्थानिक सरकारांना नसतें. स्वत: काढलेल्या कर्जांची हमी स्वत:च देण्याचा सोयीस्कर अधिकार फक्त मध्यवर्ती सरकारलाच असतो. यामुळें घटक राज्यें आणि स्थानिक संस्था यांना जेव्हा अधिक सुविधा उपलब्ध करून द्याव्याशा वाटतात तेव्हा अधिक उत्पन्न कसें मिळवावे आणि त्यासाठीं नवे कर कोणते लादावे या प्रश्नांना त्यांना तोंड द्यावें लागतें. या संदर्भात सामाजिक समतेचा आणि न्यायाचा प्रश्न उपस्थित होतो. आणि त्याची चर्चा करतांना सामाजिक समतोलाचा प्रश्न मागें पडतो.

त्यामुळें आपल्याला असें आढळून येते कीं, स्थानिक सरकारें ज्या सुविधा पुरवतात त्यांच्या संदर्भात सामाजिक समतोलाचा प्रश्न तीव्रपणें उपस्थित होतो. एफ्. बी. आय्. या मध्यवर्ती सरकारच्या गुप्त-पोलीस दलाला पैसे सुलभपणें मिळतात. परंतु शहरांतील पोलीस दलाला पैसे मिळणें मात्र अवघड जातें. शेतकीचे उत्पादन जसें वाढतें तसा पिकांच्या रोगांच्या बंदोबस्तासाठीं होणारा खर्च वाढवणें मध्यवर्ती सरकारच्या शेती खात्याला सहजपणें शक्य होतें. परंतु शहरांतील कामगारांची संख्या जशी वाढते त्याप्रमाणांत आरोग्य खात्यावरील खर्चांत वाढ करणें सर्वसामान्य नगरपालिकांना अवघड जातें. याचा एक परिणाम असा होतो कीं, घटकराज्यांच्या सरकारांना व स्थानिक सरकारांना मध्यवर्ती सरकारने मदत करावी असें त्याच्यावर सारखें दडपण आणलें जाते. मध्यवर्ती सरकारचे उत्पन्न अधिक असल्यामुळें त्याने असें करावें अशी अपेक्षा निर्माण होते.

[५]

अखेर नित्य होत रहाणारी मुद्रास्फिती देखील सामाजिक समतोलांत बिघाड निर्माण करीत असते. निरनिराळ्या व्यक्ति आणि गट यांच्यावर मुद्रास्फिती अगदीं भिन्न स्वरूपाचे परिणाम करीत असते. निवृत्ती-वेतनावर किंवा अशाच स्वरूपाच्या अन्य बांधलेल्या उत्पन्नावर अवलंबून राहिलेल्या व्यक्ति सोडल्या तर मुद्रास्फितीचा

सर्वांत अनिष्ट परिणाम सरकारी नोकरांवर होतो. खाजगी क्षेत्रांत वस्तूंची विक्री करणाऱ्या ज्या अर्थसंस्था असतात त्यांच्या उत्पन्नांत मुद्रास्फितीबरोबरच वाढ होत असते. त्यांच्या किंमतींत झालेली वाढ म्हणजेच मुळी मुद्रास्फिती. त्यामुळें जशा किंमती वाढत जातात तसतसें या अर्थसंस्थांच्या मालकांचें उत्पन्नहि वाढत जाते. तसेच मजुरींत वाढ होणें हा मुद्रास्फितीचाच एक भाग आहे. त्यामुळें जितक्या प्रमाणांत मजुरींत वाढ होते तितक्या प्रमाणांत औद्योगिक कामगारांचा देखील मुद्रास्फितीपासून बचाव होतो. असंघटित पांढरपेशा वर्ग देखील वाढत्या किंमती आणि उत्पन्ने यांच्या चक्रावर बसलेला असतो. औद्योगिक कामगरांच्या मानानें त्यांच्या उत्पन्नांत जरा सावकाशीने वाढ होते हें खरें. परंतु तरी देखील ही वाढ पुष्कळच वेगाने घडून येते.

सरकारी नोकरांची परिस्थिति अगदीं उलटी असते. त्यांच्या पगाराच्या श्रेणी अगदीं पक्केपणानें ठरवलेल्या असतात. आणि त्यांचा फेर विचार दीर्घकालानंतरच करायचा अशी पद्धत पडून गेली आहे. मुद्रास्फिती झाली कीं, घटक राज्यांची आणि स्थानिक सरकारांची आवक आपोआप वाढत नाहीं आणि अधिक पगार देण्यासाठीं लागणारा जादा पैसा त्यांच्या हाती येत नाहीं. भाववाढ थांबेल अशा अपेक्षेने सरकारी नोकरांच्या पगाराचा फेरविचार लांबणीवर टाकण्याचा साधारणपणें मोह होतो. शिवाय सरकारी नोकरांच्या पगारांत वाढ केली तर खाजगी क्षेत्रांतील चालकवर्ग व मजूरसंघटना यांना वाईट उदाहरण घालून दिल्यासारखें होईल अशी भीति कांहीं प्रमाणांत सरकारला वाटते. यूनायटेड स्टेस्टस्‌पेक्षां इंग्लंडमध्यें ह्या भीतिचा प्रभाव अधिक जाणवतो.

मुद्रास्फितीचा अर्थ असा कीं, श्रमशक्तीच्या पुरवठ्याच्या मानाने तिला असलेली मागणी अधिक असते आणि त्यामुळें खाजगीं क्षेत्रांतील मजूरी व पगार ह्यांत वाढ होत असते. या परिस्थितींत सरकारी नोकरी सोडून खाजगी नोकरी घरणें फायद्याचें असते. पूर्वी सरकारी नोकरींत अधिक प्रमाणांत सुरक्षितता असे आणि यामुळें लोकांना तिचे आकर्षण वाटे. मंदी आली कीं, औद्योगिक कामगारांत बेकारी निर्माण होण्याची फार मोठी वास्ती असे. उलट सरकारी नोकरींत त्या मानाने अधिक स्थैर्य असे. आणि त्यामुळें पगार थोडा कमी मिळाला तरी ते खपून जात असे. परंतु आतां सर्वच आर्थिक क्षेत्रांत अधिक सुरक्षितता निर्माण झाली आहे. आणि म्हणून सरकारी नोकरीचे हें आकर्षण कमी झाले आहे. आतां खाजगी नोकरींत मुद्रास्फितीपासून अधिक संरक्षण मिळतें. आणि इतर बाबतींत कांहींसे कमी संरक्षण मिळतें. सार्वजनिक कार्याला ज्यांनीं स्वतःला वाहून घेतलेलें असते ती

माणसें सरकारी नोकऱ्यांना चिकटून रहातात. परंतु चलाख माणसें मात्र अन्यत्र निघून जातात.

मुद्रास्फितीच्या काळांत सरकारी नोकरांची स्थिती खालावते ही गोष्ट लोकांच्या ध्यानांत आलेली आहे. परंतु तें एक तात्कालिक संकट आहे असें मानण्याकडेच पुष्कळशीं प्रवृत्ती आहे. बाहेर सहलीला जाऊन मजा करीत असतां पावसांची सर यावी तसेंच हें कांहींसे हे संकट असतें असें मानलें जाते. त्यामुळें सरकारी नोकरांच्या पगारांत इतर पगारांनुसार वाढ केली जात नाहीं. आणि असें होणें ही एक दुःखद घटना आहे इतक्यावरच तो प्रश्न सोडून दिला जातो. ही भूमिका अत्यंत सदोष आहे. सरकारी नोकरांवर अन्याय होणें हा मुद्रास्फितीचा एक अंगभूत भाग आहे. सतत मुद्रास्फिती होत राहिली तर त्यामुळें सरकार अत्यंत दुर्बल होतें. फ्रान्स, इटली आणि युरोप व साऊथ अमेरिका या खंडातील अनेक देश या प्रदेशांतील सरकारी यंत्रणा दीर्घकाल चाललेल्या मुद्रास्फितीमुळें अगदीं डबघाईला आली आहे. सामाजिक समतोलाच्या अभावामुळें कायद्यांची नीटपणे अंमलबजावणी होत नाही. सामाजिक न्याय प्रस्थापित करणाऱ्या कायद्यांच्या बाबतींत हा प्रकार विशेष प्रमाणांत घडतो. तसेच समाजाला आवश्यक असणाऱ्या सुविधांचा देखील योग्य प्रकारें पुरवठा होत नाहीं आणि त्यांत सुधारणा देखील होऊं शकत नाही. यामुळें विफलता निर्माण होते आणि असंतोष व्यापक प्रमाणावर फैलावतो जगांतल्या. बहुतेक भागांत आपल्याला असें आढळून येतें कीं, जितक्या प्रमाणांत तेथें मुद्रास्फिती सतत होत असते तितक्या प्रमाणांत तेथील कम्युनिस्ट पक्ष अधिक प्रबल असतात आणि तेथें वारंवार क्रांत्या देखील होत असतात.

[६]

दुसऱ्या जागतिक युद्धानंतरच्या काळाचे एक वैशिष्ट्य असें कीं, सार्वजनिक सुविधांत सुधारणा व वाढ व्हावी या कल्पनेवर त्या काळांत जोराचा हल्ला झाला. मंदीच्या काळांत या सुविधांत सुधारणा व वाढ करण्यांत आली होती. खाजगी उत्पादन घटल्यामुळें जी पोकळी निर्माण झाली होती ती अंशतः तरी भरून काढावी हा त्या सुविधांमागचा एक हेतु होता. युद्धाच्या काळांत सरकारच्या कार्यक्षेत्राचा प्रचंड प्रमाणांत विस्तार झाला. नंतर साहाजिकच लंबक उलटच्या दिशेने जाऊं लागला. खाजगी उत्पादन व उत्पादक यांना पुन्हां पहिली प्रतिष्ठा प्राप्त करून देणें हा ह्या प्रतिक्रियेमागचा प्रधान हेतु होता. सरकारी क्षेत्रावर हल्ला करण्यांत जे सामील झाले त्या पैकीं कांहींची तरी अशी अपेक्षा होती कीं, ह्या हल्लचामुळें सर्वच कर कमी करतां येतील. आणि समता व ती निर्माण करणारे यांच्या बाब-

तींत जी शस्त्रसंधी झालेली आहे तिला अशा प्रकारें डावलतां येईल. आपल्या सार्वजनिक सुविधांत वेसुमार वाढ झालेली आहे ही कल्पना कांहींकाळ तरी सर्वमान्य झाली होती. राजकीय क्षेत्रांतलें उदारमतवादी देखील या कल्पनेला फारसा विरोध करीत नव्हते. सरकारी खर्चांत काटकसर करण्यास आपणहि अनुकूल आहोत असें म्हणणें त्यांना त्यावेळीं सोयीस्कर वाटले.

या चर्चेंत खाजगी क्षेत्रातर्फे भागवल्या जाणाऱ्या गरजांभोंवतीं एक प्रकारचे गूढवलय निर्माण करण्यांत आलें होते. एखाद्या गांवाने नवी शाळा बांधायची असें ठरवलें कीं, त्यासाठीं होणारा खर्च प्रत्येक व्यक्ति कराच्या रूपाने देणार हें पर्यायाने येतेच. पण जर ते उत्पन्न त्या व्यक्तीच्याच हातीं राहिलें तर त्या व्यक्तीला एक प्रकारचें स्वातंत्र्य असतें. मग अधिक चांगली मोटार घ्यावी कीं, टेलीव्हिजनचा सेट घ्यावा हें त्या व्यक्तीला ठरवितां येतें. हा युक्तीवाद टेलीव्हिजन सेटवरील खर्चाचे समर्थन करण्यासाठीं कांहींशा गंभीरपणें पुढें मांडण्यांत आला होता. या युक्तिवादांतला दोष असा कीं, तो मान्य केला कीं, आपल्याला शाळा हवी असें ठरविण्याचा मार्गच समाजास उघडा रहात नाहीं. कारण या युक्तिवादाचा अर्थ असा होतो कीं, सर्व खाजगी गरजा ह्या सर्व सार्वजनिक गरजांपेक्षां श्रेष्ठ असतात. खाजगी गरजांच्या बाबतींत व्यक्तीला निवड करण्याचे स्वातंत्र्य असतें. उलट सार्वजनिक गरजा भागविण्यासाठीं कर भरावे लागतात आणि कर म्हटलें म्हणजे कांहीं प्रमाणांत जबरदस्ती ही आलीच.

त्यावेळीं खाजगी उत्पादनांत जोराने वाढ होत होती. परंतु तरी देखील असा युक्तिवाद करण्यांत आला की, सार्वजनिक सुविधांवर जो खर्च करावा लागतो त्याचा बोजा खाजगी उत्पादनावर पडतो व त्यामुळें त्या उत्पादनावर अनिष्ट परिणाम होतो. करांचे भांडवलाच्या निवेशावर जे अनिष्ट परिणाम होतात त्याबद्दल तेव्हा निर्वाणीचे इषारे देण्यांत आले. 'लोकांना जे फार अवजड वाटतात असे कर बसवणें हें भांडवलाचा निवेश करण्यापासून त्यांना परावृत करण्याचे सर्वांत उत्तम साधन आहे.[१]' ज्यावेळीं भांडवलाचा फार मोठ्या प्रमाणांत निवेश होत होता व त्यामुळें मुद्रास्फिती होत होती त्यावेळीं वरील विधान करण्यांत आलेले होते. करांच्या अनिष्ट परिणामाबद्दल ज्या व्यक्ति इषारे देत होत्या त्याच व्यक्ति असा जोरदारपणें पुरस्कार करीत होत्या कीं, द्रव्यविषयक धोरणाचा उपयोग भांडवलाच्या निवेशांत घट करण्यासाठीं करण्यांत यावा. परंतु आपल्या देशांतील आर्थिक चर्चेचे जर आकलन व्हायचें असेल तर त्या चर्चेमागचा एक मुलभूत नियम आपण समजून घ्यायला हवा. तो असा कीं, आपल्याला जो निष्कर्ष काढायचा असेल

---

१ आर्थर. एफ. बर्नस्, प्रेसिडेण्टस् काउन्सिल ऑफ इकॉनॉमिक अॅडव्हायझर या संघटनेचे चेअरमन, यू. एस्. न्यूज अॅण्ड वर्ल्ड रिपोर्ट, मे ६, १९५५.

त्यानुसार आपला युक्तिवाद फिरवण्याची खास परवानगी उच्च पदस्थ मंडळींना असते. तर्काला धरून बोलावें लागतें तें फक्त कमी दर्जाच्या मंडळींना.

अखेर असाहि युक्तिवाद मोठ्या आवेशाने करण्यांत आला कीं, सरकारचे कार्यक्षेत्र वाढलें कीं, त्यामुळें व्यक्तीचे स्वातंत्र्य धोक्यांत येते. 'ज्या समाजांत सरकारी नोकर होऊनच दर्जा व प्रतिष्ठा ही प्राप्त होतात, त्या समाजांत सुरक्षिततेपेक्षां स्वातंत्र्य अधिक महत्वाचे आहे असें बहुसंख्य लोकांना दीर्घकाल वाटेल अशी अपेक्षा आपल्याला करतां येणार नाहीं.'[1]

कालान्तराने सार्वजनिक सुविधांवरील ह्या हल्ल्याचा जोर कांहींसा कमी झाला. सामाजिक समतोलाच्या अभावामुळें जी अव्यवस्था माजते तिचें लोकांना दर्शन घडलें परंतु खाजगी आणि सार्वजनिक क्षेत्रांतील उत्पादनांत समतोल ठेवण्याची आवश्यकता लोकांना अजूनहि नीटशी समजलेली नाहीं.

सार्वजनिक क्षेत्राच्या विकासामुळें स्वातंत्र्य धोक्यांत आलेलें नाहीं असेंहि आढळून आले. संघटित जीवन जगायचे म्हटलें कीं व्यक्तीला समाजासाठीं कांहीं झीज सोसावी लागते हें बहुधा लोकांच्या ध्यानांत आलें असावें. पोलीस दलांत दाखल होणारा पोलीस असो, शाळेंत नोकरी करणारा शिक्षक असो किंवा डच्यू पॉण्ट या अर्थसंस्थेच्या कारभार यंत्रणेंत वरचे स्थान मिळवणारा चालक असो, या सर्वांच्याच बाबतींत वरील गोष्ट खरी आहे. सार्वजनिक आणि खाजगी संघटनायांत जर भेद असलाच तर तो तरतम भावाचा असतो, मुलभूत स्वरुपाचा नसतो. हें ज्यावेळीं लिहिलें जात आहे त्यावेळीं लंबक खरें म्हणजे उलटच्या दिशेला जाऊ लागला आहे. मोठ्या कॉर्पोरेशनस् जी शिस्त बसवतात आणि आपल्या कार्यासाठीं जो 'संघटित मनुष्य' निर्माण करतात त्यामुळेंच आपल्या स्वातंत्र्याला धोका निर्माण झाला आहे. ह्या संकटांतून देखील आपण बचावणार आहोत.

परंतु युद्धोत्तर कालांत सार्वजनिक सुविधांवर जो हल्ला चढविण्यांत आला त्याचा परिणाम पुसला गेलेला नाहीं. तो दीर्घकाल टिकून रहाणार आहे. अधिक आणि चांगल्या सुविधांमुळें आपल्या सुखांत कितपत भर पडेल ते आम्हाला पाहायचें आहे, आणि म्हणून सार्वजनिक सुविधांचा आम्ही पुरस्कार करतो असें जर कोणी म्हटलें तर तें जहालपणाचें मानलें जातें. अव्यवस्था निर्माण होऊं नये यासाठीं ज्या सार्वजनिक सुविधा आवश्यक असतात त्यांचे देखील समर्थन करावे लागतें. उलट जी गरज अस्तित्वांतच नाहीं ती भागवण्यासाठीं जो मनुष्य एखादी वस्तू निर्माण करतो आणि मग ती गरज व ती वस्तू यांच्या उत्पादनाचे कार्य यशस्वीरीत्या चालूं ठेवतो तो मनुष्य मोठा कर्तृत्ववान् आणि श्रेष्ठ असें मानलें जातें.

---

१ एफ. ए. हायेक, द रोड टू सर्फडम् (लंडन, जॉर्ज रूटलिट ॲण्ड सन्स, १९४४) पृष्ठ ९८.

प्रकरण एकोणिसावें

भांडवलाच्या निवेशांतील समतोल

ज्या वस्तूंचे आणि सुविधांचे आपण सेवन करतो त्यांच्याशीं सामाजिक समतोलाचा संबंध असतो. त्याच्याशींच निगडित असलेला दुसरा एक प्रश्न आहे, तो म्हणजे निवेशासाठीं उपलब्ध असलेल्या साधनसामुग्रीचा उपयोग आपण कसा करतो हा. ज्या सामाजिक शक्तींमुळें आपल्या समाजांत खाजगी वस्तूंचे वैपुल्य आणि सार्वजनिक सुविधांचे दारिद्र्य निर्माण झालें आहे त्या शक्तींमुळेंच उपलब्ध भांडवलाची वस्तूरूप भांडवल आणि व्यक्तिनिविष्ट भांडवल ह्यांत विषम विभागणी होते. ह्या विषम विभागणीचे दूरगामी परिणाम होतात. एक परिणाम असा कीं, खाजगी वस्तूंच्या उत्पादनांतच अडथळे निर्माण होतात. ह्या परिणामाचा मागोवा घेत जर आपण गेलो तर एकंदर परिस्थितीवर अत्यंत भेदक प्रकाश पडेल. परंतु वर निर्देशिलेल्या विषम विभागणीचा हा एकमेव किंवा सर्वांत महत्वाचा परिणाम असतो असें मात्र नाहीं.

आर्थिक विकासासाठीं म्हणजेच आर्थिक उत्पादनांत वाढ होण्यासाठीं देशांतील यंत्र सामुग्रींत वाढ व्हावी लागते किंवा तिच्या गुणवत्तेंत सुधारणा व्हावी लागते. खरें म्हणजे ह्या दोन्हीं गोष्टी व्हाव्या लागतात ह्याबाबतींत एकमत आहे. यंत्र-सामुग्रींत जी वाढ होते तिला भांडवलाची निर्मिती असें म्हणतात. तिच्या गुणवत्तेंत जी सुधारणा होते तिला तांत्रिक प्रगति म्हणतात.

आर्थिक विकासाच्या प्रथमावस्थेंत जें घडलें त्यांतूनच आपले सध्यांचे बरेचसे आर्थिक दृष्टीकोन निर्माण झालेले आहेत. त्यावेळीं अधिक बचत करणें आणि वस्तुरूप भांडवलांत वाढ करणें हा आर्थिक विकास साधण्याचा साधा मार्ग होता, व तेवढें केलें म्हणजे भागत देखील होते. योजकबुद्धीची देखील त्या काळांत आवश्यकता होती. परंतु पाश्चात्य देशांत ती बहुधा पुरेशा प्रमाणांत उपलब्ध होती. योजकाचे काम करण्यासाठीं थोडचा फार शिक्षणाची आवश्यकता असे; परंतु फॉमॉडॉर व्हॅण्डरबिल्ट, हेन्री फोर्ड इत्यादी थोर योजकांच्या उदाहरणावरून असें दिसून येतें कीं, हें शिक्षण परिस्थितीच्या द्वारें मिळूं शकत असे, आणि पुष्कळदां तसें मिळतहि असे. कामगारवर्ग साक्षर व सुशिक्षित असणें इष्ट होतें पण आवश्यक नव्हतें. यूनायटेड स्टेस्टस् मधील कांहीं अत्यंत मोठचा कारखान्यांत पूर्वी जी माणसें काम करीत असत त्यापैकीं बहुतेकांना इंग्रजी देखील बोलतां येत नसे. आणखी

एक अत्यंत महत्वाची गोष्ट अशी कीं, आर्थिक विकासाच्या प्रथमावस्थांत सुशिक्षित कामगार वर्गाचा पुरवठा आणि त्यांच्या शिक्षणाचे स्वरूप यांचा तांत्रिक प्रगतिशीं निकटचा आणि निश्चित संबंध नसे. तेव्हा जे शोध लागत ते दीर्घकालीन शिक्षण व प्रयत्न यामुळें लागत नसत तर बहुधा एखादी चमकदार कल्पना सुचल्यामुळें लागत असत. जॉन के याने लावलेला उडत्या धोटचाचा शोध, जेम्स हारग्रिव्हज् याचा स्पिनिंग जेनीचा शोध, रिचर्ड आर्कराइटचा (निदान असें मानलें जाते) स्पिनिंग फ्रेमचा शाध आणि जेम्स वॅटचा वाफेच्या एंजिनाचा शोध यांमुळें इंग्लंड-मध्यें औद्योगिक क्रांति होऊं शकली. औद्योगिक उत्पादनासाठीं जे भांडवल वापरलें जात होतें त्याच्या उत्पादन क्षमतेंत या शोधांमुळें प्रचंड प्रमाणांत वाढ झाली परंतु शिक्षणामुळें आणि पूर्व तयारीमुळें शोध लावतां आला असें आपल्याला फक्त वॅटच्या बाबतींतच म्हणतां येईल. के आणि हारग्रिव्हज हे साधे विणकर होते. फक्त त्यांच्या मनाचा यांत्रिक गोष्टीकडे कल होता इतकेच. आर्कराइट हा एका न्हाव्याकडे आणि केसांचे टोप बनवणाऱ्याकडे उमेदवार मुलगा म्हणून काम करीत असे. तो जेमतेम साक्षर होता.

परंतु आतां प्रचंड आणि गुंतागुंतीची यंत्रसामुग्री अस्तित्वांत आली आहे. शिवाय शास्त्रीय ज्ञानाचा पसारा देखील बराच वाढला आहे. आणि ते ज्ञान अत्यंत सूक्ष्म स्वरूपाचे झालें आहे. शिवाय ह्या ज्ञानाचा औद्योगिक क्षेत्रांत कसा उपयोग करायचा त्याचेहि पुष्कळसे अनुभवजन्य ज्ञान आज आपल्या जवळ आहे. यामुळे वरील परिस्थिती पूर्णपणे बदलून गेली आहे. आजच्या आर्थिक व्यवहारासाठीं केवळ योजकांचीच (आणि हिशेबनीस व कारकून यांचाहि उल्लेख करायला हवा.) गरज आपल्याला भासत नाहीं तर त्यासाठीं सुशिक्षित आणि तज्ञ अशा इतर बऱ्याच लोकांची देखील आवश्यकता असते. यावरून हें उघड होते, कीं वस्तुरूप भांडवलांत निवेश करणें जितकें महत्वाचे तितकेच माणसांत निवेश करणें देखील महत्वाचें असतें. आजच्या गुंतागुंतीच्या जीवनांत या दोन्हीं गोष्टी परस्परावलंबी असतात.

ह्याहून महत्वाची गोष्ट अशी कीं, भांडवलाच्या गुणवत्तेतील सुधारणा म्हणजेच तांत्रिक प्रगति ही शिक्षण आणि शास्त्रीय कार्य करण्याची संधी ह्यांवर जो भांडवली खर्च होतो त्यावरच जवळ जवळ पूर्णपणें अवलंबून असते. सांकेतिक शहाणपणाच्या एका शाखेची अजून अशी एक गोड कल्पना आहे की, चमकदार माणसानी आपल्या मर्मग्राही कल्पकतेच्या साहायाने एकाकीपणाने लावलेलें शोध हेच मुख्यतः तांत्रिक प्रगति घडवून आणतात. आणि हे शोध कुठेंहि आणि कोणीहि लावण्याची शक्यता असते.[1] बेन्जामिन फ्रॅन्क्लिन हा अमेरिकन संशोधक बुद्धीचा

१ उदाहरणार्थ जी. वॉरन्ट नटर् यांचा पुढील लेख पहा 'मोनॉपली बिझनेस ॲण्ड प्रोग्रेस' जर्नल ऑफ पोलिट्रिकल इकॉनॉमि, डिसेंबर १९५६.

पवित्र आणि आद्य नमूना आहे. आणि त्याच्या स्थानाला ढळ पोहोचेल असें कांहींहि केलें तर तें चालत नाहीं. परंतु गद्य सत्य असें आहे कीं, शोध लावणें हा आतां एक अत्यंत संघटित उद्योग झाला आहे. या कार्यासाठीं वापरली जाणारी सामुग्री व तिची गुणवता यांच्यावर त्याचे यश पुष्कळसे अवलंबून असते. या कार्यासाठीं वापरली जाणारी सामुग्री व तिची गुणवत्ता यांच्यावर त्यांचे यश पुष्कळसे अवलंबून असते. या कार्यासाठीं वापरली जाणारी सामुग्री म्हणजे स्त्रिया आणि पुरुष. त्यांना शिक्षण, अनुभव आणि संशोधनाची संधी देण्यासाठी किती भांडवल खर्ची घातलें जाते त्यावर त्यांची संख्या व गुणवत्ता अवलंबून असते. तांत्रिक प्रगति घडवून आणतात ती ही माणसे. ही माणसे नसली आणि वस्तुरूप भांडवलांत वाढ केली तर आर्थिक प्रगति होणार नाहीं असें नाहीं. परंतु तांत्रिक ज्ञानांत वाढ न झाल्यामुळें ही प्रगति उत्पादनांत तितकीशी वाढ करणार नाहीं.

[२]

इथें आपण या प्रश्नाच्या गाभ्यालाच हात घालतो. वस्तूरूप भांडवलाच्या निवेशाची वेगवेगळ्या उद्योगांत विभागणी करण्याचें कार्य भांडवलबाजार करीत असतो. तेल-उद्योगांतील (सीमागत) नफा जर कापडउद्योगांतील नफ्यापेक्षां अधिक असेल तर भांडवलाचा प्रवाह तेल उद्योगाकडे जातो. भांडवलबाजाराच्या द्वारें भांडवलाची ही जी विभागणी होते ती पुष्कळशा कार्यक्षमतेने केली जाते, असें सकृतदर्शनीं तरी वाटते. भांडवलाच्या 'अनिर्बंध प्रवाहांत' व्यत्यय आणणें हा एक गुन्हा आहे असें अर्थशास्त्राने पूर्वीपासून मान्य केलेलें आहे.

वस्तुरूप भांडवलाची मागणी करणाऱ्या उद्योगांत भांडवलाची विभागणी अशा प्रकारें व्यवस्थितपणें होते हे खरें. परंतु वस्तुरूप भांडवल आणि व्यक्तिनिविष्ट भांडवल ह्यांच्या गरजा भागवण्याचा जेव्हा प्रश्न येतो तेव्हा ते कार्य भांडवलबाजार व्यवस्थितपणें आणि कार्यक्षमतेनें करीत नाहीं. व्यक्तींत भांडवल गुंतवण्याचे कार्य जवळ जवळ पूर्णपणें सार्वजनिक क्षेत्र करीत असते. आणि जवळ जवळ हें सर्व कार्य बाजारयंत्रणेच्या कक्षेच्या बाहेर केलें जातें. प्राथमिक व माध्यमिक शाळा आणि महाविद्यालये व विश्वविद्यालये यांच्या द्वारें व्यक्तींत मोठ्या प्रमाणावर भांडवल गुंतवण्याचे कार्य सरकार करीत असतें. खाजगी महाविद्यालयें आणि विश्वविद्यालयें यांच्याशीं सरकारचा प्रत्यक्षपणें संबंध नसतो. परंतु येथें देखील जे भांडवल गुतवलें जाते ते उत्पादनापासून किती नफा मिळेल ह्या हिशोबानें गुंतवलें जात नाहीं. तेलशुद्धीच्या कारखान्यापासून जर कापडगिरण्यापासून मिळतो त्याहून अधिक नफा मिळत असला तर भांडवलाचा प्रवाह तेलशुद्धीच्या कार-

खान्याकडे अधिक प्रमाणांत वाहातो हें खरें. परंतु तेलशुद्धीच्या कारखान्यांची योजना आखणारे तंत्रज्ञ हे त्याहूनहि अधिक महत्वाचे असणें शक्य असते. त्यांच्यात भांडवल गुंतवले तर अधिक नफा मिळवण्याची शक्यता असते आणि तेलशुद्धीच्या प्रक्रियेंत जी महत्वाची सुधारणा करतो त्या शास्त्रज्ञांत जर भांडवल गुंतवले तर त्यापासून सर्वात अधिक नफा मिळण्याची शक्यता असते. ही शक्यता केवळ काल्पनिक नाहीं तर संभाव्य आहे. परंतु जरी शास्त्रीय आणि तांत्रिक शिक्षणांत गुंतवलेल्या भांडवलापासून पुष्कळ नफा मिळत असला तरी त्यामुळें भांडवलाचा प्रवाह यंत्रसामुग्रीच्या निर्मितीकडून शिक्षणाकडे वळत नाहीं. तेलशुद्धीच्या कारखान्यांच्या उभारणेत जें भांडवल गुंतवलें जाते तें शास्त्रज्ञांच्या शिक्षणांत गुंतविलें जाण्याची शक्यता नसते. निवेशासाठीं उपलब्ध असलेल्या भांडवलाची विभागणी करणाऱ्या प्रक्रियेची पुष्कळ स्तुति केली जाते. परंतु वरील अत्यंत महत्वाच्या बाबतींत ती प्रक्रिया योग्य प्रकारें कार्य करीत नाहीं. आणि आवश्यक त्या दिशेने भांडवल वाहाण्याच्या मार्गात ती भला मोठा अडथळा निर्माण करते. ह्या प्रकाराची विशेषशी चर्चा झालेली नसावी हें स्वाभाविकच आहे. आयात निर्यातीवरील कर किंवा मक्तेदारी हे जसे भांडवलाच्या हालचालींतील अडथळे म्हणून सर्वमान्य झालेले आहेत तसे ह्या अडथळ्याच्या बाबतींत झालेलें नाहीं. त्यामुळें गेल्या शतकांत ह्या अडथळचाला अर्थशास्त्रांत स्थान मिळाले नाहीं आणि आजोबांचे वाक्य प्रमाण मानण्याची प्रवृती अर्थशास्त्रांत दृढमूल झालेली असल्यामुळें आजहि ह्या अडथळ्याचा खऱ्या गांभीर्याने विचार केला जात नाहीं.

हा अडथळा अत्यंत महत्वाचा आहे यांत कोणताहि संशय नाहीं. व्यक्तींत भांडवल गुंतवण्याचे कार्य सरकारी क्षेत्राच्या कक्षेंत येते. शास्त्रीय आणि तांत्रिक ज्ञानाची प्रगति झाल्यामुळें अशा प्रकारें भांडवल गुंतवणें हें अधिकाधिक आवश्यक झालें आहे. आणि वस्तु आणि व्यक्ति यांतील निवेशासाठीं भांडवलाची विभागणी आपोआप करणारी यंत्रणा आज अस्तित्वांत नाहीं. परंतु एवढ्यावरच हा प्रकार थांबत नाहीं. सरकारी क्षेत्रांत आणि म्हणूनच त्याच्या कोणत्याहि भागांत भांडवलाचा निवेश करण्याच्या बाबतींत भेदभाव केला जातो हें आपण आधींच्या प्रकरणांत पाहिलेंच आहे. तेलशुद्धीच्या कारखान्यांतील भांडवलाचा निवेश हा सर्वतोपरीने चांगला असतो. त्यामुळें आपल्या संपत्तिच्या संचयांत वाढ होते. तेथें भांडवलाचा निवेश करणें हे एक निरपवाद कर्तृत्व आहे. परंतु जे शास्त्रज्ञ आणि तंत्रज्ञ तो तेलशुद्धीचा कारखाना चालवतात, त्याच्या आर्थिक कार्यक्षमतेंत वाढ करतात आणि अखेर त्याच्या जागीं अधिक चांगल्या उत्पादनसाधनांची योजना करतात त्यांना शिक्षण देणें ही गोष्ट मात्र निरपवादपणें चांगली आहे असें मानलें

पवित्र आणि आद्य नमूना आहे. आणि त्याच्या स्थानाला ढळ पोहोचेल असें कांहींहि केलें तर तें चालत नाहीं. परंतु गद्य सत्य असें आहे कीं, शोध लावणें हा आतां एक अत्यंत संघटित उद्योग झाला आहे. या कार्यासाठीं वापरली जाणारी सामुग्री व तिची गुणवता यांच्यावर त्याचे यश पुष्कळसे अवलंबून असते. या कार्यासाठीं वापरली जाणारी सामुग्री व तिची गुणवत्ता यांच्यावर त्यांचे यश पुष्कळसे अवलंबून असते. या कार्यासाठी वापरली जाणारी सामुग्री म्हणजे स्त्रिया आणि पुरुष. त्यांना शिक्षण, अनुभव आणि संशोधनाची संधी देण्यासाठी किती भांडवल खर्ची घातलें जाते त्यावर त्यांची संख्या व गुणवत्ता अवलंबून असते. तांत्रिक प्रगति घडवून आणतात ती ही माणसे. ही माणसे नसली आणि वस्तुरूप भांडवलांत वाढ केली तर आर्थिक प्रगति होणार नाहीं असें नाहीं. परंतु तांत्रिक ज्ञानांत वाढ न झाल्यामुळें ही प्रगति उत्पादनांत तितकीशी वाढ करणार नाहीं.

[२]

इथें आपण या प्रश्नाच्या गाभ्यालाच हात घालतो. वस्तूरूप भांडवलाच्या निवेशाची वेगवेगळ्या उद्योगांत विभागणी करण्याचें कार्य भांडवलबाजार करीत असतो. तेल-उद्योगांतील (सीमागत) नफा जर कापडउद्योगांतील नफ्यापेक्षां अधिक असेल तर भांडवलाचा प्रवाह तेल उद्योगाकडे जातो. भांडवलबाजाराच्या द्वारें भांडवलाची ही जी विभागणी होते ती पुष्कळशा कार्यक्षमतेने केली जाते, असें सकृतदर्शनीं तरी वाटते. भांडवलाच्या 'अनिर्बंध प्रवाहांत' व्यत्यय आणणें हा एक गुन्हा आहे असें अर्थशास्त्राने पूर्वीपासून मान्य केलेलें आहे.

वस्तुरूप भांडवलाची मागणी करणाऱ्या उद्योगांत भांडवलाची विभागणी अशा प्रकारें व्यवस्थितपणें होते हे खरें. परंतु वस्तुरूप भांडवल आणि व्यक्तिनिविष्ट भांडवल ह्यांच्या गरजा भागवण्याचा जेव्हा प्रश्न येतो तेव्हा ते कार्य भांडवलबाजार व्यवस्थितपणें आणि कार्यक्षमतेनें करीत नाहीं. व्यक्तींत भांडवल गुंतवण्याचे कार्य जवळ जवळ पूर्णपणें सार्वजनिक क्षेत्र करीत असते. आणि जवळ जवळ हें सर्व कार्य बाजारयंत्रणेच्या कक्षेच्या बाहेर केलें जातें. प्राथमिक व माध्यमिक शाळा आणि महाविद्यालये व विश्वविद्यालये यांच्या द्वारें व्यक्तींत मोठ्या प्रमाणावर भांडवल गुंतवण्याचे कार्य सरकार करीत असतें. खाजगी महाविद्यालयें आणि विश्वविद्यालयें यांच्याशीं सरकारचा प्रत्यक्षपणें संबंध नसतो. परंतु येथें देखील जे भांडवल गुतवलें जाते ते उत्पादनापासून किती नफा मिळेल ह्या हिशोबानें गुंतवलें जात नाहीं. तेलशुद्धीच्या कारखान्यापासून जर कापडगिरण्यापासून मिळतो त्याहून अधिक नफा मिळत असला तर भांडवलाचा प्रवाह तेलशुद्धीच्या कार-

खान्याकडे अधिक प्रमाणांत वाहातो हें खरें. परंतु तेलशुद्धीच्या कारखान्यांची योजना आखणारे तंत्रज्ञ हे त्याहूनहि अधिक महत्वाचे असणें शक्य असते. त्यांच्यात भांडवल गुंतवले तर अधिक नफा मिळवण्याची शक्यता असते आणि तेलशुद्धीच्या प्रक्रियेंत जी महत्वाची सुधारणा करतो त्या शास्त्रज्ञांत जर भांडवल गुंतवले तर त्यापासून सर्वात अधिक नफा मिळण्याची शक्यता असते. ही शक्यता केवळ काल्पनिक नाहीं तर संभाव्य आहे. परंतु जरी शास्त्रीय आणि तांत्रिक शिक्षणांत गुंतवलेल्या भांडवलापासून पुष्कळ नफा मिळत असला तरी त्यामुळें भांडवलाचा प्रवाह यंत्रसामुग्रीच्या निर्मितीकडून शिक्षणाकडे वळत नाहीं. तेलशुद्धीच्या कारखान्यांच्या उभारणेत जें भांडवल गुंतवलें जाते तें शास्त्रज्ञांच्या शिक्षणांत गुंतविलें जाण्याची शक्यता नसते. निवेशासाठीं उपलब्ध असलेल्या भांडवलाची विभागणी करणाऱ्या प्रक्रियेची पुष्कळ स्तुति केली जाते. परंतु वरील अत्यंत महत्वाच्या बाबतींत ती प्रक्रिया योग्य प्रकारें कार्य करीत नाहीं. आणि आवश्यक त्या दिशेने भांडवल वाहाण्याच्या मार्गात ती भला मोठा अडथळा निर्माण करते. ह्या प्रकाराची विशेषशी चर्चा झालेली नसावी हें स्वाभाविकच आहे. आयात निर्यातीवरील कर किंवा मक्तेदारी हे जसे भांडवलाच्या हालचालींतील अडथळे म्हणून सर्वमान्य झालेले आहेत तसे ह्या अडथळ्याच्या बाबतींत झालेलें नाहीं. त्यामुळें गेल्या शतकांत ह्या अडथळ्याला अर्थशास्त्रांत स्थान मिळाले नाहीं आणि आजोबांचे वाक्य प्रमाण मानण्याची प्रवृती अर्थशास्त्रांत दृढमूल झालेली असल्यामुळें आजहि ह्या अडथळ्याचा खऱ्या गांभीर्याने विचार केला जात नाहीं.

हा अडथळा अत्यंत महत्वाचा आहे यांत कोणताहि संशय नाहीं. व्यक्तींत भांडवल गुंतवण्याचे कार्य सरकारी क्षेत्राच्या कक्षेंत येते. शास्त्रीय आणि तांत्रिक ज्ञानाची प्रगति झाल्यामुळें अशा प्रकारें भांडवल गुंतवणें हें अधिकाधिक आवश्यक झालें आहे. आणि वस्तु आणि व्यक्ति यांतील निवेशासाठीं भांडवलाची विभागणी आपोआप करणारी यंत्रणा आज अस्तित्वांत नाहीं. परंतु एवढ्यावरच हा प्रकार थांबत नाहीं. सरकारी क्षेत्रांत आणि म्हणूनच त्याच्या कोणत्याहि भागांत भांडवलाचा निवेश करण्याच्या बाबतींत भेदभाव केला जातो हें आपण आधींच्या प्रकरणांत पाहिलेंच आहे. तेलशुद्धीच्या कारखान्यांतील भांडवलाचा निवेश हा सर्वतोपरीने चांगला असतो. त्यामुळें आपल्या संपत्तिच्या संचयांत वाढ होते. तेथें भांडवलाचा निवेश करणें हे एक निरपवाद कर्तृत्व आहे. परंतु जे शास्त्रज्ञ आणि तंत्रज्ञ तो तेलशुद्धीचा कारखाना चालवतात, त्याच्या आर्थिक कार्यक्षमतेंत वाढ करतात आणि अखेर त्याच्या जागीं अधिक चांगल्या उत्पादनसाधनांची योजना करतात त्यांना शिक्षण देणें ही गोष्ट मात्र निरपवादपणें चांगली आहे असें मानलें

जात नाहीं. त्यांच्या शिक्षणांत भांडवल गुंतवलें जावें हें इष्ट आहे असें मानलें जात नाहीं. उलट ही भांडवलाची गुंतवणूक हें एक ओझें आहे असें बहुसंख्य लोक मानतात. या क्षेत्रांत भांडवलाचा निवेश जितका कमी होईल तितके त्या क्षेत्रांतलें कार्य चांगलें चाललें आहे असें मानण्याकडे अनेकांचा कल असतो. इतरांना असें वाटतें कीं, समतेच्या प्राचीन प्रश्नावरील वादविवाद जोपर्यन्त संपला नाहीं तोपर्यन्त भांडवलाचा हा निवेश पुढें ढकलावा. ह्या स्वरूपाच्या भांडवली निवेशासाठीं केलेली तरतूद इतकी अल्प असते कीं, ह्याकार्यासाठीं लागणारी वरीचशी रक्कम याचना करून उभी करावी लागते. शिक्षणावरील खर्चाला भांडवलाचा निवेश असें नांवहि दिलें जात नाहीं. कारण ते नांव मिळावें इतकी त्या खर्चाची प्रतिष्ठा आहे असें लोकांना वाटत नाहीं. शंभर वर्षांपूर्वी शिक्षणावरील खर्च आणि उत्पादन यांचें निकटचें नातें नव्हतें. त्यावेळीं ज्या भांडवलांच्या संचयामुळें नंतर उत्पादनात वाढ होत असे, त्यालाच फक्त निवेश असें नांव लोक देत असत. आणि तें त्या परिस्थितींत योग्यच होते. त्यावेळीं शिक्षणाचा सेवनासाठीं केलेल्या खर्चांत समावेश होत असे. शब्दाच्या वापरावावत तेंव्हा जो प्रघात पडला त्यांत आजतागाईत सुधारणा करण्यांत आलेली नाहीं. [१]

आपल्या देशांतील विद्यार्थ्यांची त्यांनीं गणितांत मिळवलेल्या मार्कांच्या आधारें जर लहानपणीच निवड करतां आली आणि त्यांतले जे हुषार असतील त्यांना 'जन्मभर ते तुमचीच नोकरी करतील' या बोलीने एखाद्या कॉर्पोरेशनच्या हवाली करण्याची जर कादेशीर व्यवस्था केली तर माणसांच्या विकासावर अवश्य त्या प्रमाणांत भांडवली खर्च होऊं लागेल. वस्तुरूप भांडवलावर जसा खर्च होतो तसाच मग व्यक्तिनिविष्ट भांडवलावर होऊं लागेल. आपल्या शास्त्रज्ञांच्या आणि तंत्रज्ञांच्या सांठ्यांत भांडवल गुंतवणे आवश्यक आहे हें अर्थसंस्थांच्या ध्यानांत येईल. बेसबॉलचे प्रमुख क्लब ज्याप्रमाणें आपल्या शिकावू खेळाडूंत भांडवल गुंतवतात तसेच अर्थसंस्थाहि करूं लागतील. ह्या बाबतीत आदर्श योजना आखायची म्हटली तर ज्या अर्थसंस्थांजवळ शास्त्रज्ञ व तंत्रज्ञ यांचा जादा सांठा असेल त्यांना तो विकण्याची परवानगी द्यावी लागेल. ज्यांची निवड चुकीने करण्यांत

१ हा मजकूर लिहून झाल्यानंतर रशियांतील शास्त्रिय प्रगतिचा प्रभाव आपल्याला जाणवला आणि त्यामुळें शास्त्रीय शिक्षणासाठीं भांडवलाचा निवेश करण्याच्या बाबतींत आपण कसे मागें पडलों आहोत त्याची बरीच चर्चा झाली. परंतु ही एक तात्कालिक चूक आहे असें मानलें जात आहे. उत्पादन साधनांची विभागणी करणाऱ्या आपल्या यंत्रणेंतला हा एक मूलभूत दोष आहे याची आपल्याला जाणीव झालेली नाहीं.

आली त्यांना शिक्षण देण्याच्या अयशस्वी प्रयत्नांत जो पैसा वाया जाईल तो वुडीत खर्च म्हणून मांडायची व्यवस्था करावी लागेल; किंवा त्या चुकीने निवडलेल्या विद्यार्थ्यांना विक्रेत्याचे काम देऊन तो खर्च अंशत: भरून काढतां येईल. ह्या योजनेमुळें त्या निवडलेल्या व्यक्तींना आपले स्वातंत्र्य गमवावें लागेल हें खरें. परंतु त्याचबरोबर माणसांत भांडवलाचा जो निवेश होतो त्यांत वेगाने वाढ होईल.

परंतु जो पर्यन्त व्यक्तीस्वातंत्र्य कायम आहे तो पर्यन्त शिक्षणांत भांडवलाचा निवेश करण्याचे कार्य मुख्यत: सरकारलाच करावे लागेल. कोणत्याहि व्यक्तीला स्वत:च्या शिक्षणासाठीं भांडवलाची तरतूद करणें फारसे शक्य होणार नाहीं. कारण शिक्षण घेतांना व्यक्तीची पैसे कमविण्याची शक्ति विकास पावलेली नसते. त्या व्यक्तीच्या मातापितरांना हा खर्च करणें कितपत शक्य होईल व पसंत पडेल हें यदृच्छेच्या आधीन असते. ती व्यक्ति ज्याच्याकडे पुढें नोकरी करणार आहे तो उद्योगचालक तिच्या शिक्षणावर खर्च करील अशी अपेक्षा करणें अयोग्य आहे. कारण त्या उद्योगचालकाच्या खर्चानें शिकणारा तो मनुष्य कदाचित् त्याच्या स्पर्धकाच्या कारखान्यांत किंवा एखाद्या वेगळ्याच उद्योगांत नोकरीला लागेल अशी शक्यता असते. ज्यांचे शिक्षण जवळ जवळ पूर्ण झालेलें आहे अशासाठीं तो उद्योगचालक अभ्यासवृत्या देण्याची शक्यता आहे. कारण त्यामुळें ते हुषार विद्यार्थी आपल्या कारखान्यांत किंवा क्षेत्रांत येतील अशी त्याला आशा असते. परंतु माणसांत जें भांडवल गुंतवलें जातें त्यांत ह्या अभ्यासवृत्यामुळें फारसा फरक पडत नाहीं. शिकार आटोपल्यावर मेलेल्या जनावराचें कातडें काढण्याला जितकें महत्व आहे तितकेंच ह्या अभ्यासवृत्यांना आहे. ह्या अभ्यासवृत्यांमुळें केवळ एक गोष्ट दिसून येते. ती अशीं कीं, शिकून तयार झालेल्या तंत्रज्ञांचे उद्योग चालकांना बरेंच महत्व वाटते.

[३]

वेगळ्या शब्दांत सांगायचे म्हणजे व्यक्तींचा विकास ही उत्पादनाला साहाय्यभूत होणारी बहिर्गत गोष्ट आहे, तिचा फायदा सर्व अर्थसंस्थाना मिळतो. कुठल्याहि एका विशिष्ट अर्थसंस्थेशी ती निगडीत असू शकत नाही. आणि त्यामुळें कोणतीहि अर्थसंस्था किंमत मोजून ती विकत घेऊं शकत नाहीं.

माणसांच्या विकासाबद्दल जें खरें आहे तेंच त्या विकासाच्या एका महत्वाच्या फळाबद्दल देखील खरें आहे. तें फळ म्हणजें शास्त्रीय-संशोधन. वस्तूंच्या पुरवठ्यांत वाढ करणें हे ज्या समाजाचे उद्दिष्ट असतें त्या समाजाला अशी जाणीव असते कीं

नवीन शोध लागल्यामुळें वस्तूंच्या पुरवठ्यांत व संख्येंत वाढ होईल आणि त्यांच्या स्वरूपांत बदल होईल. त्यामुळें तो समाज असें गृहीत धरतो कीं, संशोधनास उत्तेजन देणें हे कार्य बाजारयंत्रणा करील.

पुष्कळशा प्रमाणांत बाजारयंत्रणा तें कार्य करते देखील. जर उद्योगांचा आकार पुरेसा मोठा असेल आणि इतर परिस्थिती अनुकुल असेल[1] तर ग्राहकोपयोगी वस्तूचा शोध लावणें, त्यांत सुधारणा करणें व त्यांचे स्वरूप बदलणें आणि त्यांच्या उत्पादनाच्या प्रक्रियेंत सुधारणा करणे ही कार्यें आपली अर्थव्यवस्था उत्तमप्रकारें करते. तसेंच परिस्थिती अनुकुल असेल तर ह्या ग्राहकोपयोगी वस्तूंचे सेवन ज्यांच्या वर अवलंबून असते त्या भांडवली उद्योगांत देखील तशाच प्रकारची सुधारणा केली जाईल. जो पर्यन्त अशा प्रकारें निर्माण केलेल्या वस्तूची मागणी कोणत्या मार्गानें निर्माण केली जात आहे व कायम ठेवली जात आहे याचा आपण विचार करीत नाहीं तोपर्यन्त या कतृत्वाचे आपल्याला कौतुक वाटेल. परतु वरील गोष्टींचा जर आपण विचार करू लागलो तर आपल्याला असें आढळून येईल कीं, वस्तूंतील ज्या सुधारणांची जहिरात करणें शक्य असते अशाच सुधारणा करण्यासाठीं संशोधनाचा बहुशः उपयोग केला जातो. 'विक्रीकरणारी आकर्षणें' व 'जाहिरात करण्यासारखी वैशिष्टयें' निर्माण करणे किंवा 'योजनाबद्ध टाकाऊपणा' अधिक वेगाने निर्माण करणे ह्यासाठींच संशोधनाचा उपयोग केला जातो. यावरून असें सूचित होते कीं ज्या गोष्टी फारशा महत्वाच्या नाहीत अशा गोष्टीसाठींच संशोधनावर डोळ्यांत भरेल इतका खर्च होतो परंतु त्याची विभागणी मात्र तितकीशीं इष्ट स्वरूपाची नसते. असें असलें तरी ग्राहकोपयोगी वस्तूंत फरक व सुधारणा करण्याकडे अमेरिकन अर्थव्यवस्थेंत लक्ष पुरवलें जात नाहीं असें कोणीच म्हणणार नाहीत.

परंतु या प्रोत्साहनामुळें एकंदर जे शास्त्रीय संशोधनात्मक कार्य चाललेलें असतें त्यापैकीं फार थोड्या कार्याला उत्तेजन मिळतें. इतकेंच नव्हें तर अशा प्रकारच्या ज्या कार्याचा वस्तूंच्या उत्पादनासाठीं उपयोग होण्याची शक्यता असते त्यांतल्या-देखील फार थोड्या कार्याला या प्रोत्साहनाची मदत होते. अशा रीतीने अत्यंत उपयुक्त असें पुष्कळसें संशोधनाचें कार्य विक्रीयोग्य वस्तूंच्या उत्पादनास साहाय्य-कारक नसतें आणि म्हणून त्याच्याकडे दुर्लक्ष होतें. ज्याला मुलभूत संशोधन असें म्हणतात त्याच्या बाबतींत असें घडतें हें उघडच आहे. परंतु पुष्कळशा आनुषंगिक व उपयुक्त संशोधनाच्या बाबतींत देखील असेच घडते. आजची जी विमान वाहतूक आहे तिचा अवतार लष्करी विमानापासून झाला. ह्या वाहतुकीसाठीं जें संशोधन

१ पहा, अमेरिकन कॅपिटॅलिझम, पृष्ठें ८४-९४ (दुसरी आवृति).

करण्यांत आलें तें या वाहतुकीचा धंदा स्वतःच्या जोरावर मुळीच करूं शकला नसता. अणुशक्तीचे जे बिनलष्करी उपयोग केले जातात त्यांच्या बाबतींत देखील हीच गोष्ट खरी आहे. अशी आणखी कितीतरी उदाहरणें देता येतील.

लष्करी सामर्थ्यांत वाढ करण्यासाठीं संशोधनावर मोठ्या प्रमाणावर खर्च केला जातो आणि त्यामुळें संशोधनावरील खर्चाच्या अपुरेपणाचा हा प्रश्न आपल्याला तितक्या तीव्रतेने जाणवत नाहीं. त्यामानाने व्यक्तींच्या विकासावर होणाऱ्या खर्चाचा अपुरेपणा आपल्याला अधिक तीव्रतेने जाणवतो. शास्त्रीय संशोधन देखील सार्वजनिक क्षेत्राच्या द्वारें होण्याची आवश्यकता आहे आणि तें तसें होत नाहीं हें खरें. परंतु लष्करी हेतूंमुळें जें संशोधन होते त्यामुळें ही उणीव भरून निघते. ज्या परिस्थितीमुळें संशोधनासाठीं हा पैसा खर्च होतो व त्या संशोधनांतून जी शस्त्रें निर्माण होतात, ती माणसाच्या दृष्टीने फारशीं सुखकारक आहेत, असें म्हणतां येणार नाहीं. परंतु लष्करी गरजेमुळें शास्त्रीय क्षेत्रांत अत्यंत महत्वाचे असें पुष्कळच संशोधन व विकास झाला आहे ही वस्तुस्थिती आहे. अगदीं उत्तम प्रकारचा नवा साबण तयार करण्यासाठीं जें संशोधन केलें जातें त्याच्याहून कितीतरी अधिक महत्त्वाचे संशोधन स्वनातीत विमानांच्या निर्मितीसाठीं करण्यांत आलें आहे. उद्योगांच्या दृष्टीनें देखील तें अधिक महत्त्वाचें ठरण्याची शक्यता आहे. ते कांहींहि असलें तरी एक गोष्ट मात्र निश्चित आहे. लष्करी हेतूने आणि सरकारी खर्चाने जर संशोधन केलें गेलें नसतें तर गेल्या कांहीं दशकांतील अमेरिकन उद्योगांची तांत्रिक प्रगति पुष्कळच मंद गतीने झाली असती.

[४]

सांकेतिक शहाणपणाशीं वादविवाद करतांना शक्यतों त्याच्याच युक्तिवादाचा अवलंब करणें इष्ट असते हें आपण वर पाहिलेंच आहे. सांकेतिक शहाणपण असें आग्रहपूर्वक सांगत असतें कीं, वस्तूंच्या उत्पादनांत वाढ करणें हें अत्यंत महत्वाचे आहे. म्हणून सध्यां भांडवलाच्या निवेशाची विभागणी होते ती उत्पादनाच्या दृष्टीनें देखील अयोग्य स्वरूपाची आहे असें जर दाखवून दिलें तर तें लोकांना चटकन् पटेल. उत्पादनाच्या दृष्टीने पाहिलें तर संशोधनावर पुरेसा खर्च होतो तो केवळ लष्करी परिस्थितीमुळें. ही परिस्थिती बदलली तर आपल्या अर्थव्यवस्थेंत संशोधनावर पुरेसा खर्च होणार नाही. आणि व्यक्तींवर जो भांडवली खर्च होतो तो तर आज अगदींच अपुरा आहे. परंतु वस्तूंच्या उत्पादनांत वाढ करण्यासाठींच शिक्षणावर खर्च करणें आवश्यक आहे असें म्हणणें रानटीपणाचे आहे. त्या खर्चाचे समर्थन स्वतंत्रपणे आणि अधिक उच्च पातळीवरून करतां येते. एखाद्या घोड्याला जर

तवेला असला, खायला पुरेसे ओटस् असले, त्याच्या मनोविनोदनाची जर व्यवस्था केलेली असली आणि तवेल्यांतील दुसऱ्या कोणत्याहि घोड्याइतकेंच जर त्याचें कौतुक होत असलें तर तो घोडा खूप असतो. परंतु माणसें आणि घोडें यांत फरक आहे. माणसाला हीं सर्व शारिरीक व मानसिक सुखें हवी असतात, परंतु ज्ञान मिळवावे, परिस्थिती समजून घ्यावी आणि तर्काचा उपयोग करावा अशी देखील त्याला इच्छा असते आणि ही इच्छा कांहीं आध्यात्मिक स्वरूपाची नसते. ज्या गोष्टींमुळें माणूस हा त्याने पाळलेल्या जनावरापेक्षां वेगळा ठरतो त्या गोष्टींसाठीं भांडवली खर्च करणें इष्ट आहे हें कांहीं विस्ताराने पटवून द्यायला नको. निदान मला तशी आशा वाटते परंतु आज जो माणसावर भांडवली खर्च होतो तो वस्तूंचे उत्पादन वाढवण्याच्या दृष्टीने देखील अपुरा असतो. मग माणसाला आत्मिक समाधान व कृतकृत्यतेचा आनंद मिळवून देण्याच्या दृष्टीने हा भांडवली खर्च किती अपुरा असेल याची कल्पनाच केलेली बरी.

[५]

अखेर एक कांहींशा तात्विक प्रश्नाचा विचार करायला हवा. सेवनाच्या बाबतींतील सामाजिक समतोलाचा प्रश्न आणि वस्तूरूप व व्यक्तिनिविष्ट भांडवलाच्या निर्मितींत समतोल ठेवण्याचा प्रश्न ह्या दोन प्रश्नांतून हा प्रश्न उद्भवतो.

सोळाव्या प्रकरणांत असा युक्तिवाद करण्यांत आला आहे कीं, ज्या प्रक्रियेने आज गरजा कृत्रिमपणें केल्या जातात तिच्यामुळें आर्थिक अस्थैर्य निर्माण होण्याची शक्यता आहे. ग्राहकांना कर्जे देऊन मागणी निर्माण करण्याची प्रक्रिया मूलतःच स्थैर्यविहीन आहे. आणि उत्पादन, रोजगारी व सामाजिक सुरक्षितता ह्या गोष्टी या प्रक्रियेवर अवलंबून असतात. एखाद्या दिवशीं ही प्रक्रिया बंद पडेल आणि मग कृत्रिमपणें मागणी निर्माण करणें आणि अनुकरण प्रियतेचा उपयोग करून लोकांना वस्तू विकत घ्यायला भाग पाडणें ह्या गोष्टी अशक्य होतील. मग सेवनांत घट होईल, बेकारी वाढेल आणि परिस्थितीशीं जुळवून घेण्याचा एक अवघड प्रश्न निर्माण होईल.

जर माणूस विविध गोष्टींचे सेवन करीत असला म्हणजेच माणसाच्या सर्व प्रकारच्या गरजा भागवण्यासाठीं उत्पादनशक्तीचा समान उपयोग होत असला तर ही संकटें टाळतां येतील. मग तीं लहान असोत किंवा मोठी असोत सार्वजनिक गरजा कांहीं कृत्रिमपणें निर्माण केल्या जात नाहींत, त्यामुळें कृत्रिमपणें गरजा निर्माण करण्याची यंत्रणा जरी निकामी झाली तरी त्या गोष्टीचा सार्वजनिक गरजांवर कांहींच परिणाम होणार नाहीं. शिवाय सार्वजनिक सुविधा कांहीं हसेवंदीने विकल्या जात नाहीत. त्यामुळें जरी कांहीं कारणांमुळें लोक वस्तूंच्या खरेदीसाठीं कर्जे

काढण्यास असमर्थ किंवा प्रतिकूल झाले तरी त्यामुळें या सुविधाच्या पुरवठ्यांत घट होणार नाहीं. तेव्हा सामाजिक समतोल जितक्या अधिक प्रमाणांत राखला जाईल तितक्या प्रमाणांत खाजगी मागणीच्या हेलकाव्यामुळें अर्थव्यवस्थेला पोहोंचणारा धोका कमी होईल.

हा युक्तिवाद आणखी पुढें नेण्याचा मोह होतो. साध्या मनांचें नियमन करणें सर्वांत सोपें असते असें मानायला हरकत नाहीं. सामाजिक समतोल अधिक प्रमाणांत निर्माण झाला कीं, लोक अधिक सुशिक्षित होतील. आणि त्यामुळें जाहिरातीच्या आणि अनुकरण प्रियतेच्या साहाय्याने गरजा निर्माण करण्याच्या प्रक्रियेचा त्यांच्या मनावर कमी परिणाम होईल. सत्कृतदर्शनी असें वाटेल कीं, असें झालें तर त्याचा मागणीवर प्रतिकूल परिणाम होईल परंतु त्यावरोवर हें देखील खरें कीं, शिक्षणामुळें माणसांच्या गरजांच्या कक्षा विस्तार पावतात. सेवनयोग्य अशा साध्या वस्तू किंवा साध्या प्रकारची करमणूक यासाठीं ग्राहकांच्या मनावर संस्कार करण्याची आवश्यकता नसते. आणि जाहिरात व अनुकरणप्रियता यांच्या साहाय्याने अशा गोष्टींची गरज निर्माण करणे सुलभ असते. घरें, मोटारीं, मद्य, अन्न आणि लैंगिक सुख ह्यांचे साधे प्रकार व तसेच चित्रपट ह्यांपासून आनंद मिळविण्यासाठीं ग्राहकाचे मन सुसंस्कृत करण्याची आवश्यकता नसते. या गोष्टींसाठीं सामुदायिक आकर्षण निर्माण करणे सहज शक्य असते. आणि त्यामुळें आधुनिक काळांत जी गरजांची निर्मिती केली जाते ती करतांना ह्या गोष्टींवर भर दिला जातो. उलट संगीत, चित्रकला, साहित्यशास्त्र आणि कांहीं अंशीं प्रवास यांच्या वद्दलची आवड कृत्रिमपणें निर्माण करणें अवघड असतें आणि ती निर्माण करण्याकरतां आधीं पुष्कळसे शिक्षण द्यावें लागते. अशा रीतीनें शिक्षणाचा प्रसार केला आणि सामाजिक समतोल निर्माण केला कीं, माणसांच्या गरजांत अधिक विविधता येते, आणि ज्या कृत्रिमपणें निर्माण कराव्या लागतात अशा गरजांवर समाजाला कमी प्रमाणांत अवलंबून रहावें लागते. निदान असें होण्याची शक्यता असते एवढें तरी गृहित धरायला हरकत नाहीं. कारण आपल्या विचारांची दिशा ठरवणाऱ्या शक्तींनीं आपल्यावर इतके दृढ संस्कार केलेले आहेत कीं, ते विचार या नव्या कल्पनाशक्तीला आवाहन करणाऱ्या गोष्टींकडे वळणे अवघड आहे.

प्रकरण विसावे

संक्रमण

एका दृष्टीने पाहिलें तर या पुस्तकाच्या द्वारें जे मुख्य कार्य करायचे होते ते आतां झाले आहे. ज्या एका भ्रामक कल्पनेचा पगडा आपल्या मनावर बसलेला आहे तिचाच या पुस्तकांत विचार करायचा होता. ती भ्रामक कल्पना अशीं कीं, उत्पादन हा अत्यंत महत्त्वाचा आणि अवघड प्रश्न आहे. आणि म्हणून त्याला आपल्या जीवनांत मध्यवर्ती स्थान आहे. ही भ्रामक कल्पना कोणत्या कारणांमुळें निर्माण झाली तें आतां आपण पाहिलें आहे. आणि ह्या भ्रामक कल्पनेमुळें कोणते परिणाम होतात ते देखील आपण पहिलें आहे. तिच्यामुळें सामाजिक समतोलांत विघाड होतो, पुन्हां पुन्हां मुद्रास्फिती होते आणि ग्राहकांची मागणी निर्माण करण्याच्या अविश्वसनीय व धोकादायक प्रक्रियेवर आपल्याला अवलंबून रहावें लागतें. शरीराला बंधनांतून मुक्त करण्याइतकेच मनाला स्वतंत्र करण्याचे कार्य देखील मोलाचे आहे. गुलामाला स्वातंत्र्य दिलें आणि त्या स्वातंत्र्याचे मोल त्याला पटवून दिले कीं, मग त्या स्वातंत्र्याचा उपभोग घ्यायला तो सामान्यतः मुखत्यार असतो. आणि त्या गुलामानें पुढें काय करावे याची यादी त्याच्या हातांत दिली नाहीं म्हणून त्याच्या विमोचकाला कोणी दोष देत नाहीं.

एकदां जुनी उद्दिष्टें त्याज्य ठरलीं कीं, नवी उद्दिष्टें ठरविण्याच्या प्रश्नाकडे वळणे हें तात्त्विकदृष्ट्या क्रमप्राप्तच नव्हे तर अपरिहार्य असते. निसर्गाप्रमाणेच सामाजिक तत्त्वज्ञानाला देखील पोकळीचें वावडें असतें. आपण जी धडपड करतो तिच्या मागें कांहींतरी उद्दिष्ट असणें माणसाच्या दृष्टीनें आवश्यक असतें. हें उद्दिष्ट अर्थशून्य असले तरी चालते. त्या अर्थशून्यतेंत जडजंबालाची भर पडली तर ते अधिकच चांगलें असते. अखेरचे उद्दिष्टच हास्यास्पद आहे कीं काय, याचा विचार न करतां त्या उद्दिष्टाकडे नेणारी एकेक पायरी किती अर्थपूर्ण आहे त्याचा खल माणसें मोठ्या प्रयत्नपूर्वक करूं शकतात. परंतु उद्दिष्टावद्दल त्यांनीं शंका उपस्थित केली तर तें मात्र चालत नाहीं. कारण तशी शंका एकदा उपस्थित झाली कीं, अधिक चांगल्या उद्दिष्टाचा शोध करावा लागतो. त्यामुळेच अशा प्रकारच्या पुस्तकाला जें महत्व असतें तें ज्या गोष्टींचा तें नाश करतें त्यामुळें. तें काय निर्माण करतें त्यामुळें नव्हे- अर्थात खरें म्हणजे भ्रामक कल्पनांचा नाश अखेर परिस्थिती करते. एखादें पुस्तक त्या नाशाचे स्वरूप फक्त समजावून देऊं शकते.

सांकेतिक शहाणपणाला हा विनाश मुळीच पसंत नसतो. त्याचा भर विधायक टीकेवर असतो. आणि जी भूमिका केवळ विनाशक किंवा अकरणात्मक आहे असें त्याला वाटतें त्या भूमिकेबद्दल तें तिरस्कार व्यक्त करते. असें करण्यामागें आत्मसंरक्षणाची प्रेरणा असते.[१] सांकेतिक अगर सर्वमान्य विचारावर हल्ला करणें ही एक कमी दर्जाची आणि बेजबाबदारपणाची गोष्ट आहे असें मानलें जाते. आणि अशा हल्यांचा गंभीरपणें विचारच केला जात नाहीं. त्याचबरोबर असें सुचविलें जातें, कीं 'विधायकपर्याय' सुचवा. या पर्यायांपासून फारसा धोका नसतो. सांकेतिक शहाणपणाला धोका असतो तो परिस्थितीच्या संदर्भांत तें अप्रस्तुत ठरेल या गोष्टीचा. त्याला कोणी पर्याय सुचवला तर त्यापासून त्याला धोका नसतो. वैमार रिपब्लिकच्या काळांत जर्मनींतल्या सरकारांना स्थैर्य नव्हतें. त्यामानाने युद्धोत्तर काळांतील पश्चिम जर्मनीचे सरकार पुष्कळच स्थिर आहे. याचें मुख्य कारण असे कीं, पश्चिम जर्मनीच्या घटनेंत तथाकथित 'विधायक नकाराला' स्थान देण्यांत आलें आहे. घटनेंतल्या या तरतूदीचा परिणाम असा होतो कीं, विधान सभेला जेव्हां जुन्या प्रधान मंडळाला पदच्युत करायचे असते तेव्हां तसें करण्यापूर्वी नवें प्रधान मंडळ कोणते असावें याचा निर्णय घ्यावा लागतो. अशा प्रकारच्या पर्यायी मंत्रीमंडळाबद्दलचा निर्णय आगाऊ घेणें अवघड किंवा अशक्य असते. त्यामुळें आहे तीच परिस्थिती कायम ठेवण्यापलीकडे दुसरें काहीं करण्याची विधान सभेला संधीच मिळालेली नाहीं. ह्या गोष्टीमुळें जर्मन सरकारला जशी वळकटी आली तशीच वळकटी विधायक टीका अधिक श्रेष्ठ आहे असें म्हटल्यामुळें सांकेतिक शहाणपणाला येते.

असें असलें तरी सांकेतिक शहाणपणावर हल्ला करतांना त्याच्याच युक्तिवादाचा अवलंब करणें नेहमी प्रमाणें इथेंहि इष्ट आहे. उत्पादनाला आज जे महत्व प्राप्त

---

१ ज्यांना सार्वजनिक प्रतिष्ठा प्राप्त झाली आहे त्यांना जो स्थानभ्रष्ट करूं पाहातो त्याच्यावर सांकेतिक शहाणपण जोरदार हल्ला चढवितें. त्या हल्यामागें देखील आत्मसंरक्षणाची हीच प्रेरणा असते. जो मनुष्य मानसिक कारणांनीं किंवा व्यापारी हेतूने किंवा अशाच अन्य हेतूने माणसांच्या कर्तृत्वाचे मूल्यमापन करतांना कल्पितापासून सत्य वेगळें करायला पाहातो तो मोठा धोकादायक आहे असें सांकेतिक शहाणपणाच्या पुरस्कर्त्याला वाटते. हा जो मूर्तिभंजक असतो तो सत्याशीं कितीहि एकनिष्ठ असला तरी त्याला वाङ्मयीन क्षेत्रांतील वेवारशीं प्राण्यासारखें अलिकडे वागवलें जाते. त्यामुळें ह्या मूर्तिभंजकापासून निर्माण होणारा धोका पुष्कळच कमी झाला आहे.

झाले आहे ते नष्ट कसें करायचें; किंवा अधिक वस्तूंसाठीं अधिक गरजा निर्माण करायच्या आणि मग त्याहून अधिक वस्तूंसाठीं त्याहून अधिक गरजा निर्माण करायच्या ही न संपणारी शर्यत थांववायची कशी; किंवा ही शर्यत बंद केली तर आपल्या जीवनांत जी प्रचंड पोकळी निर्माण होईल ती भरून कशी काढायची; किंवा वस्तूंचा पुरवठा हें सुखांचे गमक नाहीं असें ठरवलें तर दुसऱ्या कोणत्या गोष्टीला सुखाचे गमक मानायचे इत्यादि प्रश्न जर सांकेतिक शहाणपणाने निर्माण केले तर त्यांना आपण उत्तरें द्यायला हवीत. सांकेतिक शहाणपणाच्या संरक्षणासाठीं अगदीं कडेकोट तयारी केलेली असते. तेव्हा त्याच्यापुढें कोणत्याहि बाबतींत आपण माघार घेऊन चालत नाहीं. उत्पादनाला आपल्या जीवनांत जे अत्यंत महत्त्वाचें स्थान आहे त्याची जागा दुसऱ्या कोणत्या गोष्टीने घ्यायची तें आपण सांगायला हवें.

[२]

जे जग कांहींसे वेडसर असते त्या जगांत अत्यंत सुबुद्धपणें वागणारा मनुष्य आणि ठार वेडा मनुष्य हे दोघेहि सारखेच तऱ्हेवाईक ठरतात. आपले जग दारिद्र्याने गांजलेलें आहे आणि या जगांत उत्पादनाला सर्वांत अधिक महत्त्व आहे ही कल्पना जुनी आहे. त्या कल्पनेंतून स्फुरलेली वर्तणूक देखील तितकीच जुनी आहे. उत्पादन आतां तितकेसें महत्वाचें राहिलेलें नाहीं, तें चालू रहाण्यावावत् आपण फारशी काळजी करायला नको आणि त्याला जर सर्वांत अधिक धोका कशापासून असेल तर तो त्याच्याकडे पहाण्याच्या चुकीच्या दृष्टिकोनापासून, या गोष्टीची आपल्याला जाणीव करून घ्यायची आहे. आणि असें करायचे म्हटलें कीं, आपल्या जुन्या दृष्टीकोनांची पार मोडतोड करावी लागेल. आर्थिक क्षेत्रांतील जी वर्तणूक पूर्वी रास्त मानली जात होती ती मग रास्त ठरणार नाहीं. व्यक्ति, संघटना आणि मुख्यतः सरकार यांची पूर्वी जी उद्दिष्टें होती ती आतां देखील कायम राहतील असा भरवसा मग देतां यायचा नाहीं. उत्पादन ही आतां अत्यंत निकडीची गोष्ट राहिलेली नाहीं हें ज्यांना पटेल त्यांच्या पैकीं अनेकांना देखील या नव्या कल्पनेनुसार आपली वर्तणूक व धोरण यांत फरक करणें कांहीसे अवघड जाईल. त्यांची वर्तणुक आणि त्यांची धोरणें ह्यांची स्थिती मग कांहीशी सुकाणू नसलेल्या नावेसारखीं होईल. त्यामुळें धोके निर्माण होतील. आणि सांकेतिक शहाणपण या गोष्टीचा पुरेपूर फायदा घेईल हें कांहीं सांगायला नको.

नेहमीच हें असे चालत आलेलें आहे. मंदीच्या काळांत अनेकांना हें पटत होतें कीं, मागणीचा तुटवडा हेंच तेव्हांच्या अडचणीचे तात्कालीक व स्पष्ट कारण होते. खाजगी अर्थव्यवस्थेंत ज्यावेळीं समतोल निर्माण होईल तेव्हां पूर्णरोजगारी असावी

इतकी मागणी कदाचित् असणार नाहीं. उलट ती मागणी इतकी कमी असेल. कीं, त्यामुळें लक्षावधि लोक बेकार रहातील, हा युक्तीवाद लोकांना पटत होता. परंतु तरी देखील खाजगी मागणीतला हा तुटवडा भरून काढण्यासाठीं सरकारने कर्जे काढून खर्च करावा ही गोष्ट मान्य करणें लोकांना अवघड जात होते. असें करणें अत्यंत बेजबाबदारपणाचे आहे असें लोकांना वाटत होते. अर्थव्यवस्थेच्या प्रकृतिचे केन्सने केलेलें निदान त्यांना मान्य होते. पण केन्सने सुचवलेली उपाययोजना मात्र त्यांना मान्य नव्हती.

तसेच विसाव्या शतकाच्या तिशींत शेतमालाच्या जादा उत्पन्नाचे सांठे वाढत होते. आणि त्यावरून असें दिसून येत होते कीं, उत्पादनाच्या प्रश्नाची निकड आतां कमी झाली आहे. हे साठे महामंदीमुळें निर्माण झाले असे म्हणणे कांहीकाळ शक्य होतें आणि तें कांहीसे संयुक्तिक देखील होते. परंतु विसाव्या शतकाच्या चाळीशींत पूर्ण रोजगारी चालूं रहावी इतकी मागणी अर्थव्यवस्थेंत होती. आणि तेव्हा असें स्पष्टपणें आढळून आलें कीं, शेतीची वाढती उत्पादनक्षमता ग्राहकांच्या गरजांच्या पुढें धांवत आहे. ही उत्पादनक्षमता इतकी होती कीं, तिला लगाम घालणें शेतकऱ्यांच्या ताकदीपलीकडचें होते. परिस्थितीचें हें निदान या ना त्या स्वरूपांत अनेकांनीं मान्य केलें. या समस्येवर दोन सोपे तोडगे होते. एक म्हणजे उत्पादनावर नियंत्रण घालायचे किंवा ज्या लोकांना अन्नाची गरज होती त्यांना तें जादा उत्पादन देऊन टाकायचें. परंतु असें करणें ही कांहींतरी भयानक गोष्ट आहे असें लोकांना वाटत होते आणि वाटत राहिलें. न्यू डीलच्या पहिल्या वर्षांत छोट्या डुक्करांची कत्तल करण्यांत आली. उत्पादनावर नियंत्रण घालण्याची ती एक असंस्कृत पद्धत होती. असें जेव्हा करण्यांत आले तेव्हां लोकांना एक सौम्यसा राजकीय धक्काच बसला. आणि त्या नंतर देखील उत्पादन नियंत्रित करावे असें जेव्हां राजकीय पुढारी सांगत तेव्हां ते पुष्कळशी जर तरची भाषा वापरीत आणि या गोष्टीचा आपल्याला फार खेद होत आहे असें पुन्हां पुन्हां दर्शवीत. सांकेतिक शहाणपणाचा रोप टाळण्यासाठीं आणि प्रस्थापित दैवतांना संतुष्ट करण्यासाठीं ते असें करीत. शक्यतो ते उनोक्तीचा उपयोग करीत. त्याचें उदाहारण हें लिहिलें जात असतांनाच घडत आहे. जमिनीची मशागत थांबवली आहे असें म्हणण्याऐवजी ती जमिन भूमिबँकेंत ठेवली जात आहे असें म्हटलें जात आहे. उत्पादनाचे नियंत्रण करणें हा उघड आणि अपरिहार्य असा तोडगा असून देखील राजकीय पुढाऱ्यांना त्याचा असा आवडळणाने पुरस्कार करावा लागत आहे.

त्याचप्रमाणें अन्न दुसऱ्यांना देऊन टाकणें हा दुसरा उपाय जेव्हा सुचविण्यांत आला तेव्हा त्याचा जोरदारपणें निषेध करण्यांत आला. हॉटेण्टॉट्सना दूध द्यावे

अशी इच्छा व्यक्त करणें म्हणजे अधिक वेजबाबदारपणाची परिसीमा आहे असें कांहींकाळ मानलें जात होते. पण अखेर परिस्थितीने विजय मिळवला. मोठ्या प्रमाणावर जगभर अन्नाच्या देणग्या द्यायच्या हें धोरण पक्केपणे स्वीकारण्यांत आलें. आणि ही गोष्ट मिस्टर एझ्रा टॅफ्ट बेन्सन ह्या अगदीं परंपरानिष्ठ अशा सेक्रेटरी ऑफ ॲग्रिकल्चरच्या नेतृत्वाखालीं करण्यांत आली. हॉटेण्टॉटस्ना अजून मलईविरहीत दूधाची भुकटी जर अजून देण्यांत आली नसेल तर त्याचे कारण इतकेंच कीं, त्यांनीं त्या भुकटीची अजून पुरेशा जोरदारपणें मागणी केलेली नाहीं. पण अजून देखील या देणग्या आडवळणानें द्याव्या लागतात. ज्या देशांना हा शेतीचा माल देण्यांत आला त्यांनीं तो स्वतःचें चलन देऊन 'विकत' घेतला. याचा अर्थ असा कीं, जें चलन त्यांना फुकट उभें करतां येत होते ते त्यांनीं या मालाच्या बदल्यांत दिलें आणि हें चलन आपण फारशा प्रमाणांत वापरणार नाहीं असें यूनायटेड स्टेटस्नें कबूल केलें. जर या जगांतल्या लोकांना स्वतःच्या टाकसाळींत तयार केलेल्या पैशाने वस्तूंची खरेदी करून आपल्या गरजा मागवतां आल्या असत्या आणि त्यांना त्या वस्तू विकणाऱ्या संपन्न विक्रेत्यांनीं जर तो पैसा विनतक्रार स्वीकारला असता तर मग कोणीच दरिद्री राहिलें नसतें.

बदललेली परिस्थिती आणि त्यामुळें बदललेली धोरणें यांचा जर आपण उघडपणे स्वीकार केला तर आयुष्य अधिक सोपें होईल. आणि आपले व्यवहार अधिक सोप्या भाषेंत करतां येतील. परंतु त्यामुळें आपल्या राजकीय जीवनाला सध्यां जो एक आकर्षक रंग आहे—अगदीं खास पौर्वात्य रंग आहे—तो नष्ट होईल आणि सध्यांच्या प्रश्नांच्या हातांत जुनी निशाणें द्यायची जी आपली पद्धत आहे ती देखील नष्ट होईल. उत्पादनाचे महत्व कमी झालें असेल. पण तें तसें झालेलें नाहीं असा देखावा आपण नेहमीच करीत रहाणार.

[३]

उत्पादनाला उत्तेजन मिळतें कीं नाहीं या निकापाच्या आधारें जे प्रश्न सोडवायचे असें आपले एकमत आहे त्या प्रश्नांची संख्या फार मोठी आहे. एखाद्या गोष्टीमुळें जर उत्पादनांत वाढ होत असेल तर ती इष्ट आहे असें मानलें जातें. तसें नसेल तर ती निरूपयोगी ठरते. ती उत्पादनाला अपायकारक असेल तर ती वाईट ठरते. एखाद्या करामुळें आर्थिक प्रोत्साहनांना आणि म्हणून उत्पादनाला जर अपाय होत असेल तर तो कर वाईट आहे असा निष्कर्ष निघतो. आणि एखाद्या कराचा तसा परिणाम जरी प्रत्यक्षांत होत नसला तरी तसा आरोप करणें फायद्याचे असते. आयात निर्यातीवरील कर हा आपला वादविवादाचा अत्यंत जुना विषय आहे. आयाती-

वरील करांचे विरोधक नेहमीच असें म्हणतात कीं, त्यामुळें ज्या उद्योगांची वाढ होते ते कार्यक्षम नसतात. त्या उद्योगांत गुंतलेली साधनें जर अन्यत्र वापरलीं तर ती उत्पादन अधिक कार्यक्षमतेने करतील. कार्यक्षमता ही निर्णायक गोष्ट आहे याबद्दल त्यांना कधींच शंका वाटत नाहीं. जे विरोधक असतात ते खुला व्यापार कार्यक्षमतेला उपकारक असतो ही गोष्ट अमान्य करतात. परंतु संदर्भात कार्यक्षमता हाच निकष आहे यावावतींत दोन्हीं पक्षांचे एकमत असतें.

त्याचप्रमाणें मोठ्या कॉर्पोरेशन्सच्या बावतींत जो वादविवाद चालला आहे त्यांत देखील कार्यक्षमतेवरच भर देण्यांत येतो. मोठ्या कॉर्पोरेशनचे समर्थक असें म्हणतात कीं, उत्पादक या नात्याने ती अधिक कार्यक्षम असते. तिचे विरोधक अशी शंका व्यक्त करतात कीं, कार्यक्षमतेंत घट व्हावी इतक्या प्रमाणांत तिचा आकार वाढला तर नाही ना ? कॉर्पोरेशनला राजकीय आणि सांस्कृतिक दृष्टचा देखील फार मोठे महत्व आहे. परंतु परवां परवां पर्यन्त तिच्या अस्तित्वाच्या या अंगाकडे जवळ जवळ दुर्लक्ष केलें जात होतें. कॉर्पोरेशनच्या बावतीत जी गोष्ट खरी आहे तीच कामगार संघटनेच्या बावतींत खरी आहे. तिच्या सदस्यांच्या उत्पादन क्षमतेवर तिच्या अस्तित्वाचा काय परिणाम होतो याच्या संदर्भातच तिचे समर्थन केलें जातें किंवा निषेध केला जातो. कामगार संघटनेमुळें काम अधिक सुसह्य झालें आहे. तिच्या सदस्यांना अधिक प्रतिष्ठेने जगणें शक्य झालें आहे. आणि अग्रक्रमाबावतच्या नियमामुळें वाढत्या वयाबरोबर अधिक वेतन व अधिकार तिच्या सदस्यांना मिळूं लागले आहेत. परंतु या गोष्टी निर्णायक मानल्या जात नाहीत. या गोष्टींचा उत्पादनक्षमतेवर काय परिणाम होतो ते निर्णायक मानलें जातें.

जर एखाद्या प्रदेशाला उतरती कळा लागली असेल म्हणजेच जर वीज पुरवठा, वाहतुक, कच्च्या मालाचा पुरवठा, ग्राहकांची आवडनिवड किंवा करविषयक कायदे यांच्या बावतींत इतर प्रदेशांतील किंवा देशांतील परिस्थिती अधिक अनुकुल असेल तर तो उतरतीकळा लागलेला प्रदेश सोडून देण्यास लोकांना उत्तेजन द्यायला हवें. लोकानी असे प्रदेशान्तर करणें कार्यक्षमतेच्या दृष्टीने इष्ट असते. कुटुंब, मित्रमंडळी, धर्मगुरू आणि विशिष्ट दीर्घपरिचित प्रदेश यांच्या विषयींच्या प्रेमामुळें किंवा निव्वळ बदल नकोसा असल्यामुळें लोकांना स्थलान्तर करणें फार त्रासदायक वाटेल हें खरें. पण असें करणें कार्यक्षमतेच्या दृष्टीने उपयुक्त असते. अगदीं अलिकडच्या काळापर्यन्त बरीचशीं औद्योगिक व व्यावसायिक रोगराई दूर करणें इतके खर्चाचे होतें कीं, तो खर्च परवडण्यासारखा नव्हता. त्यामुळें ती रोगराई तशीच चालूं रहात असे. परंतु ती रोगराई नष्ट करणें फार खर्चाचे आणि म्हणून

अशक्य आहे हा युक्तिवाद सांकेतिक शहाणपण आतां मान्य करीत नाहीं. मात्र तरी देखील तें असें म्हणते कीं, कोळशाच्या खाणींतील मजूरांनीं गेल्या कित्येक वर्षांत ज्या सवलती मिळविल्या आहेत त्यामुळें कोळशाच्या खाणींचा उद्योग मागें पडण्यास मदत झाली आहे. उत्पादनाचे महत्व मान्य केले तर ही गोष्ट अत्यंत खेदकारक आहे असेंच म्हणावे लागते.

परंतु ज्या गोष्टीचे उत्पादन केले जाते त्यांना जर फारसें महत्त्व नसेल तर त्या निर्माण करण्याची प्रक्रिया कितपत कार्यक्षम आहे हा गौण मुद्दा होतो. मग या बाबतींत नवे आणि अधिक अवघड निकष लावावे लागतील. नव्हे, आतांच हें निकष आडवळणानें लावले जात असतील व त्यांना फार महत्त्व प्राप्त झाले असेल अशी देखील शक्यता आहे. त्यांना मिळणारे हें महत्त्व आतां डोळ्यांत भरूं लागलें आहे.

त्याचप्रमाणें चढत्या प्राप्तीकराबद्दल जो वादविवाद चालतो त्यांत या कराचा कार्यक्षमतेवर काय परिणाम होतो याला आतांपर्यंत फार महत्त्व दिलें गेलें आहे. कार्यक्षमतेंत वाढ करण्यासाठीं आवश्यक असलेल्या प्रोत्साहनांवर या कराचा प्रतिकूल परिणाम होतो अशी भूमिका कांहीं मंडळींनीं घेतली आहे. उलट तसें होत नाहीं असा युक्तिवाद इतरांनीं केला आहे. परंतु कार्यक्षमता ही जर निर्णायक गोष्ट नसेल तर हा वादविवाद इतर मुद्यांवर करायला हवा. कराचा भार कोणावर किती प्रमाणांत पडावा ह्या साध्या आणि अडाणी प्रश्नाला मग त्या वादविवादांत स्थान द्यावें लागेल. आणि खरें म्हणजें कार्यक्षमतेबद्दल आज जे अनेक लोक बोलतात त्यांच्या मनांत देखील हाच प्रश्न असतो.

तसेच कार्यक्षमता हा जर आतां प्रधान निकष नसेल तर आयातनिर्यातीवरील करांबाबतचे धोरण ठरवतांना देखील अन्य गोष्टी विचारांत घ्याव्या लागतील. व्यापक राष्ट्रीय धोरणाचे एक साधन म्हणून व्यापाराचा उपयोग करणें कितपत इष्ट आहे किंवा अडचणींत सांपडलेल्या उद्योगांचे किंवा प्रदेशांचे प्रश्न सोडवतांना सहानुभूति कितपत दाखवावी या गोष्टींना मग ते धोरण ठरवितांना महत्त्व द्यावे लागेल. खरें म्हणजे प्रत्यक्षांत व्यापारविषयक धोरण ठरवतांना अंतरराष्ट्रीय हित-संबंध विचारांत घेतले जातात आणि स्थानिक दानधर्म देखील केला जातो. या इतर अधिक महत्त्वाच्या गोष्टींनी कार्यक्षमतेच्या निकषांना आजच अंशतः पदच्युत केलें आहे.

जर आधुनिक कॉर्पोरेशनला वस्तूंच्या उत्पादनाबरोबरच त्यांची गरजहि निर्माण करणें आवश्यक ठरत असेल तर मग वस्तूंचे उत्पादन किती कार्यक्षमतेने

होते ही गोष्ट निर्णायक ठरूं शकत नाहीं. माणसाच्या सुखांत उत्पादनाच्या कार्यक्षमतेमुळें जितकी भर पडते तितकीच गरजा निर्माण करण्याच्या प्रक्रियेंतल्या कार्यक्षमतेच्या अभावामुळें देखील पडते असा युक्तिवाद करतां येईल. अशा परिस्थितींत आधुनिक कॉर्पोरेशनचे तिची सेवा करणाऱ्या लोकांशीं कोणत्या प्रकारचे संबंध असतात, त्यांना आपल्या व्यक्तीमत्त्वाचा पूर्ण विकास करता येतो का आणि प्रतिष्ठेने जगतां येते का या गोष्टींना महत्त्व प्राप्त होईल. निदान कार्यक्षमतेला जितके असतें तितके तरी महत्त्व या गोष्टींना प्राप्त होईल. या गोष्टींसाठीं उत्पादनखर्चांत वाढ करणें देखील इष्ट ठरेल. माणूस ज्या परिस्थितींत काम करतो ती सुसह्य असावी यासाठीं कामगार संघटना जो प्रयत्न करीत आल्या आहेत तो कांहीं चुकीचा नाहीं. ज्या वस्तूंना विशेषसे महत्त्व नाहीं त्यांचे उत्पादन करण्यासाठीं माणसाने स्वतःचे हाल कशाला करून घ्यावे ?

मागें पडूं लागलेल्या गांवाबद्दलचा दृष्टीकोन देखील मग आपल्याला बदलावा लागेल. लॉरेन्स आणि लॉवेल् या गांवांतील माणसांचे सुख व समाधान आणि या प्राचीन गांवांतच राहण्याची त्यांची इच्छा या गोष्टींना मग महत्त्व द्यावें लागेल. आणि ती माणसें उत्पादनाचें कार्य किती कार्यक्षमतेने करतात याच्या बरोबरीनेच-वरील गोष्टींचाहि विचार करावा लागेल. जो समाज सुबुद्ध अणि सहृदय असेल तो अशा गावांतील माणसांची गाढ निराशा करणें टाळील. वस्तूंचे महत्त्व जर कमी झाले असेल तर त्यांचे उत्पादन कमाल कार्यक्षमतेने व्हावे म्हणून माणसांनीं आपली घरेंदारें सोडावीत असा कठोर फतवा आपल्याला कसा काढतां येईल ?

कोळशाची जागा घेऊं शकतील अशा अनेक गोष्टी आहेत. त्याचा जो सध्या उपयोग केला जातो त्याचे सीमागत महत्त्व फार थोडें आहे. कोळशाच्या उत्पादनातील कार्यक्षमतेची किंमत देऊन ज्या कामगारांनीं आपले जीवन अधिक सुखदायक करून घेतले त्यांनी चूक केली असें म्हणणें अवघड आहे. खनिज तेल, जलशक्ति आणि अणुशक्ति ह्या ज्या कोळशाऐवजी वापरता येण्याजोग्या गोष्टी आहेत त्या अधिक स्वच्छ असतात आणि त्यांच्या सान्निध्यांत काम करणें अधिक सुखदायक असते.

जे धोरण 'जास्तीतजास्त लोकाना जास्तीतजास्त सुख देते' ते धोरण चांगले असा निकष बेन्थॅमने घालून दिला होता. आणि जें अधिक उत्पादनक्षम तें अधिक सुखकारक असें समीकरण गृहीत धरण्यांत आले होते. अजून देखील सार्वजनिक धोरणाचा औपचारिक निकष हाच असतो. मात्र आधुनिक काळांत हा निकष फारसा काटेकोरपणें लावण्यांत आलेला नाहीं. वस्तूंचे महत्त्व कमी होत आहे या

अशक्य आहे हा युक्तिवाद सांकेतिक शहाणपण आतां मान्य करीत नाहीं. मात्र तरी देखील तें असें म्हणते कीं, कोळशाच्या खाणींतील मजूरांनीं गेल्या कित्येक वर्षांत ज्या सवलती मिळविल्या आहेत त्यामुळें कोळशाच्या खाणींचा उद्योग मागें पडण्यास मदत झाली आहे. उत्पादनाचे महत्व मान्य केले तर ही गोष्ट अत्यंत खेदकारक आहे असेंच म्हणावे लागते.

परंतु ज्या गोष्टीचे उत्पादन केले जाते त्यांना जर फारसें महत्त्व नसेल तर त्या निर्माण करण्याची प्रक्रिया कितपत कार्यक्षम आहे हा गौण मुद्दा होतो. मग या बाबतींत नवे आणि अधिक अवघड निकष लावावे लागतील. नव्हे, आतांच हें निकष आडवळणानें लावले जात असतील व त्यांना फार महत्त्व प्राप्त झाले असेल अशी देखील शक्यता आहे. त्यांना मिळणारे हें महत्त्व आतां डोळ्यांत भरूं लागलें आहे.

त्याचप्रमाणें चढत्या प्राप्तीकराबद्दल जो वादविवाद चालतो त्यांत या कराचा कार्यक्षमतेवर काय परिणाम होतो याला आतांपर्यंत फार महत्त्व दिलें गेलें आहे. कार्यक्षमतेंत वाढ करण्यासाठीं आवश्यक असलेल्या प्रोत्साहनांवर या कराचा प्रतिकूल परिणाम होतो अशी भूमिका कांहीं मंडळींनीं घेतली आहे. उलट तसें होत नाहीं असा युक्तिवाद इतरांनीं केला आहे. परंतु कार्यक्षमता ही जर निर्णायक गोष्ट नसेल तर हा वादविवाद इतर मुद्यांवर करायला हवा. कराचा भार कोणावर किती प्रमाणांत पडावा ह्या साध्या आणि अडाणी प्रश्नाला मग त्या वादविवादांत स्थान द्यावें लागेल. आणि खरें म्हणजें कार्यक्षमतेबद्दल आज जे अनेक लोक बोलतात त्यांच्या मनांत देखील हाच प्रश्न असतो.

तसेच कार्यक्षमता हा जर आतां प्रधान निकष नसेल तर आयातनिर्यातीवरील करांबाबतचे धोरण ठरवतांना देखील अन्य गोष्टी विचारांत घ्याव्या लागतील. व्यापक राष्ट्रीय धोरणाचे एक साधन म्हणून व्यापाराचा उपयोग करणें कितपत इष्ट आहे किंवा अडचणींत सांपडलेल्या उद्योगांचे किंवा प्रदेशांचे प्रश्न सोडवतांना सहानुभूति कितपत दाखवावी या गोष्टींना मग ते धोरण ठरवितांना महत्त्व द्यावे लागेल. खरें म्हणजे प्रत्यक्षांत व्यापारविषयक धोरण ठरवतांना अंतरराष्ट्रीय हित-संबंध विचारांत घेतले जातात आणि स्थानिक दानधर्म देखील केला जातो. या इतर अधिक महत्त्वाच्या गोष्टींनी कार्यक्षमतेच्या निकषांना आजच अंशतः पदच्युत केलें आहे.

जर आधुनिक कॉर्पोरेशनला वस्तूंच्या उत्पादनाबरोबरच त्यांची गरजहि निर्माण करणें आवश्यक ठरत असेल तर मग वस्तूंचे उत्पादन किती कार्यक्षमतेने

होते ही गोष्ट निर्णायक ठरूं शकत नाहीं. माणसाच्या सुखांत उत्पादनाच्या कार्यक्षमतेमुळें जितकी भर पडते तितकीच गरजा निर्माण करण्याच्या प्रक्रियेंतल्या कार्यक्षमतेच्या अभावामुळें देखील पडते असा युक्तिवाद करतां येईल. अशा परिस्थितींत आधुनिक कॉर्पोरेशनचे तिची सेवा करणाऱ्या लोकांशीं कोणत्या प्रकारचे संबंध असतात, त्यांना आपल्या व्यक्तीमत्त्वाचा पूर्ण विकास करता येतो का आणि प्रतिष्ठेने जगतां येते का या गोष्टींना महत्त्व प्राप्त होईल. निदान कार्यक्षमतेला जितके असतें तितके तरी महत्त्व या गोष्टींना प्राप्त होईल. या गोष्टींसाठीं उत्पादनखर्चांत वाढ करणें देखील इष्ट ठरेल. माणूस ज्या परिस्थितींत काम करतो ती सुसह्य असावी यासाठीं कामगार संघटना जो प्रयत्न करीत आल्या आहेत तो कांहीं चुकीचा नाहीं. ज्या वस्तूंना विशेषसे महत्त्व नाहीं त्यांचे उत्पादन करण्यासाठीं माणसाने स्वतःचे हाल कशाला करून घ्यावे ?

मागें पडूं लागलेल्या गांवाबद्दलचा दृष्टीकोन देखील मग आपल्याला बदलावा लागेल. लॉरेन्स आणि लॉवेल् या गांवांतील माणसांचे सुख व समाधान आणि या प्राचीन गांवांतच राहण्याची त्यांची इच्छा या गोष्टींना मग महत्त्व द्यावें लागेल. आणि ती माणसें उत्पादनाचें कार्य किती कार्यक्षमतेने करतात याच्या बरोबरीनेच-वरील गोष्टींचाहि विचार करावा लागेल. जो समाज सुबुद्ध अणि सहृदय असेल तो अशा गावांतील माणसांची गाढ निराशा करणें टाळील. वस्तूंचे महत्त्व जर कमी झाले असेल तर त्यांचे उत्पादन कमाल कार्यक्षमतेने व्हावे म्हणून माणसांनीं आपली घरेंदारें सोडावीत असा कठोर फतवा आपल्याला कसा काढतां येईल ?

कोळशाची जागा घेऊं शकतील अशा अनेक गोष्टी आहेत. त्याचा जो सध्या उपयोग केला जातो त्याचे सीमागत महत्त्व फार थोडें आहे. कोळशाच्या उत्पादनातील कार्यक्षमतेची किंमत देऊन ज्या कामगारांनीं आपले जीवन अधिक सुखदायक करून घेतले त्यांनी चूक केली असें म्हणणें अवघड आहे. खनिज तेल, जलशक्ति आणि अणुशक्ति ह्या ज्या कोळशाऐवजी वापरता येण्याजोग्या गोष्टी आहेत त्या अधिक स्वच्छ असतात आणि त्यांच्या सान्निध्यांत काम करणें अधिक सुखदायक असते.

जे धोरण 'जास्तीतजास्त लोकाना जास्तीतजास्त सुख देते' ते धोरण चांगले असा निकष बेन्थॅमने घालून दिला होता. आणि जें अधिक उत्पादनक्षम तें अधिक सुखकारक असें समीकरण गृहीत धरण्यांत आले होते. अजून देखील सार्वजनिक धोरणाचा औपचारिक निकष हाच असतो. मात्र आधुनिक काळांत हा निकष फारसा काटेकोरपणें लावण्यांत आलेला नाहीं. वस्तूंचे महत्त्व कमी होत आहे या

गोष्टीची दखल आपण घेतलेली नसली तरी त्या गोष्टीची आपल्याला जाणीव झालेली आहे. तरी देखील या निकषाला आपण अजून चिकटून आहोत. माणुसकी, वैयक्तिक सुख व स्वास्थ आणि सामाजिक ताण कमी करणें ह्या इतर निकषांना आतां महत्त्व प्राप्त झालें आहे. परंतु हें नवे निकष लावण्या ऐवजी तो जुना निकष लावणेंच आपल्याला अधिक सोपें वाटते.

[४]

हा प्रश्न केवळ आर्थिक धोरणाबाबतच्या निर्णयांचा नाहीं. इतरहि अनेक गोष्टींचा विचार या संदर्भात आपल्याला करायला हवा. एक विशिष्ट नैतिक भूमिका समर्थनीय आहे कीं नाहीं हा प्रश्न देखील येथें उपस्थित होतो. जिला आपण प्यूरिटन परंपरा असें म्हणतो तिचें मूळ आर्थिक परिस्थितींत होते. जंगल हटवून जो देश निर्माण केला जात होता त्या देशांत प्रत्येकाने मेहनत करणें आणि काटकसरीने रहाणें आवश्यक होते. कारण या गोष्टीमुळें वस्तूंच्या पुरवठ्यांत वाढ होत होती आणि जीवन धारणेसाठीं ती आवश्यक होती. शिवाय अर्थशास्त्राची मध्यवर्ती परंपरा म्हणजे कांहीं केवळ आर्थिक वर्तणूकीची चिकित्सा नव्हती आणि अर्थव्यवस्थेसाठीं तयार केलेली नियमावली देखील नव्हती. त्या अर्थशास्त्रीय परंपरेंत नीतिमत्तेचे कांहीं नियम देखील अनुस्युत होते. कोणत्याहि माणसाच्या चरितार्थाची व्यवस्था करायला जग बांधलेलें नव्हतें. त्याने काम केलें तरच त्याला खायला मिळूं शकत होते. म्हणून स्वतःसाठीं आणि इतरांसाठीं देखील काम करणें ही त्याची जबाबदारी होती. जिला आपण व्हिक्टोरियन नीतिमत्ता म्हणतो परंतु जिला आर्थिक नीतिमत्ता असें देखील नांव देतां आलें असते त्या नीतिमत्तेला काम न करणें ही गोष्ट पूर्णपणे नामंजूर होती. आळसांत रहाणें शक्य असलें तरी माणसाने काम करावे, अशी त्या नीतिमत्तेची अपेक्षा होतीं. 'जरी तुम्ही सधन असलांत तरी आळसांत जीवन कंठणें हे तुम्हांला स्वतःला तर अपायकारक असतेंच पण तसें करणें ही समाजाची एक प्रकारची फसवणूक देखील असते.'[१]

परंतु जर वस्तूंच्या उत्पादनाचें महत्वच कमी झालें असलें तर हा फसवणूकीचा प्रश्न उद्भवत नाहीं. जो गहूं आपल्याला विकत घ्यावा लागूं नये अशी सरकारची तीव्र इच्छा असते त्या गव्हाचे उत्पादन करण्यासाठीं जर नॉर्थ डॅकोटांतल्या एखाद्या

१ हें वाक्य विल्यम ए. अल्कॉट यांचे आहे. (हे गेल्या शतकांत न्यू इंग्लंडमध्यें शिक्षक होते आणि नीतिवेत्ते देखील होते.) त्यांचे हें वाक्य आर्यविन जी. वायली यांनीं 'द सेल्फमेड मॅन इन अमेरिका' या आपल्या पुस्तकांत उद्धृत केलें आहे. (न्यू ब्रन्सविक, रटजर्स युनिव्हर्सिटी प्रेस, १९५४) पृष्ठ ४१.

शेतकऱ्याने कसून मेहनत केली नाहीं तर त्याबद्दल त्याला दोष कसा देतां येईल ? आधुनिक मोटारींच्या आकाराला जो उगीचच फुगवटा आणलेला असतो त्यावर रंगीत अेनॅमलचे पूट चढविणाऱ्या कामगाराने मनःपूर्वक काम करावे हे आपल्या दृष्टीने खरोखरीच अत्यंत आवश्यक आहे का ? आळशी मनुष्य हा स्वतःचा शत्रु असतो ही गोष्ट आजहि खरी असेल. परंतु त्याने काम केले नाहीं म्हणून समाजाचे नुकसान होते असें म्हणणे अवघड आहे. मात्र समाजाचे असें नुकसान होते त्या कल्पनेनेच आपण आळशीपणा निशिद्ध मानतो.

जो मनुष्य उत्पादन करीत नाहीं तो समाजाची हानि करीत असतो ही जी आपली कल्पना आहे तिच्यामुळे आपण पुष्कळदां सोयीस्कर बेपर्वाईने वागतो, आणि कधीं कधीं तर निष्ठूरपणे देखील वागतो. आपल्या शेजाऱ्यावर प्रेम करणे ही चांगली गोष्ट आहे असें निरनिराळे धार्मिक पंथ आज अनेक वर्षें सांगत आलेले आहेत. परंतु या गोष्टीची मूलभूत आर्थिक आवश्यकतांशीं सांगड घातली पाहिजे अशीच भूमिका ह्या धर्मपंथाच्या व्यवहारी अनुयायांनी घेतलेली आहे व्यवहारांत निष्ठूरपणे वागणे समाजाच्या दृष्टीने हितकारक होते. पुष्कळ लोकांना काम करणे हें कष्टदायक वाटते पण त्यांना साहानुभूती दाखवली तर उत्पादनाची हानि होईल. नोकरीसाठी देशांतराला जाणे अत्यंत दुःखकारक असते. परंतु भलत्या ठिकाणी उत्पादन केल्यामुळे कार्यक्षमतेची जी हानी होते ती अधिक अपायकारक असते. ज्या शेतकऱ्यांचे दिवाळे वाजते त्यांना सहानुभूती दाखवणें इष्ट नसतें. कारण अशी दिवाळी वाजल्यामुळे शेतीच्या उत्पादनाची कार्यक्षमता वाढते. सामाजिक जीवनांत एक धर्मगुरूचा धर्मच निर्माण झाला आहे आणि त्याला आपण फार दिवस मान देत आलो आहोत. हे धार्मिकनीति, सहृदयता, दयाबुद्धी इत्यादी गोष्टींना निष्ठुरपणे दूर सारतात आणि असें दाखवून देतात कीं, समाजाच्या व्यापक हितासाठीं या गोष्टींचा त्याग करणे इष्ट असते. हें व्यापक हित म्हणजे अधिक कार्यक्षमतेने केलेले उत्पादन असेच समीकरण नेहमी मांडलें जात असे. परंतु ज्या गोष्टींची गरज अजून लोकांना जाणवलेली नाहीं त्या गोष्टींचे अधिक कार्यक्षमतेने उत्पादन व्हावे म्हणून ह्या अन्य मूल्यांना वाजूला सारायचे असेल तर तसें करणे कितपत इष्ट आहे असा प्रश्न सहाजिकच उद्भवतो. आणि ज्या गरजांची लोकांना जाणीव देखील नाही त्या निर्माण करण्यांचे कार्य अधिक कार्यक्षमतेने व्हावे यासाठीं जर इतर मूल्यांवर तिलांजली द्यायची असेल तर ते तात्त्विकदृष्टचां अधिकच शंकास्पद होईल.

वस्तूंचा तुटवडा असतो ही गोष्ट अमान्य केली आणि त्यांचा पुरवठा विपुल

आहे ही गोष्ट मान्य केली कीं, त्यामुळें प्रस्थापित कल्पनांना केवढा धक्का बसतो हें आतां वाचकांच्या ध्यानांत येईल. आणि अगदी कठोरहृदयी वाचकाला देखील प्रस्थापित कल्पनांच्या दुःखद परिस्थितीविषयीं सहानुभूती वाटू लागेल. सध्याच्या भ्रामिक कल्पना तशाच कायम रहाव्या यासाठीं सांकेतिक शहाणपण इतके अपरंपार प्रयत्न का करते ते आतां वाचकांच्या ध्यानांत येईल. या भ्रामक कल्पना नष्ट करण्यांत आपण विश्वासघात करीत आहोत असे या परिस्थितींत वाटूं लागते.

परंतु उत्पादनांतील कार्यक्षमता आणि कामाचे सातत्य या गोष्टींचा आपल्या मनावरचा पगडा आपण काढून टाकला कीं, अनेक नवे मार्ग आपल्याला दिसूं लागतात. मात्र या मार्गानी पुढे जाण्यापूर्वी आपण दरिद्री जग आणि संपन्न जग ह्यांना जोडणारा आणखी एक पूल बांधायला हवा. कारण ज्या जगांत वस्तूंचा तुटवडा होता त्या जगांत वस्तूंची जी आवश्यकता वाटत होती तिच्यांत काम करण्याच्या आवश्यकतेमुळें भर पडत होती. जो मनुष्य काम करीत नसे त्याला कांहींच उत्पन्न मिळत नसे. अर्थात जे थोडे लोक श्रीमंत होते त्यांची गोष्ट वेगळी. आज देखील जो मनुष्य काम करीत नाहीं तो आपले सगळें उत्पन्न गमावून बसतो. ही गोष्ट उत्पादनाला पोषक असते. परंतू ज्या गोष्टींचे उत्पादन केले जाते त्या तितक्याशा महत्वाच्या नसतात. लोकांना रोजगारी देणे मात्र आवश्यक असते आणि त्यामुळें आपल्यापुढे दोन पर्याय उभे रहातात. मुद्रास्फितीचा ताण अर्थव्यवस्थेला सतत सहन करायला लावणे हा एक पर्याय आणि कांहीं लोकांना बेकार ठेवणे व त्यांचे उत्पन्न कमी करणे हा दुसरा पर्याय. हें दोन्ही पर्याय कांही आकर्षक नसतात आणि या पर्यायापैकीं एकाची निवड करण्याचा जो प्रश्न आहे तो जोपर्यंत आपण सोडवत नाही तोपर्यंत संपन्नतेची फळें आपल्याला भोगतां येणार नाहीत.

प्रकरण एकविसावें

उत्पादन आणि सुरक्षितता यांची फारकत

आपण असें पाहिलें आहे कीं, ज्या गोष्टींचे उत्पादन करण्यासाठीं आपण आपल्या उत्पादक शक्ति वापरतो त्या वस्तूंची कांही आपल्याला तीव्र गरज नसते. या गोष्टींसाठीं मागणी निर्माण व्हावी म्हणून बराच खर्च करावा लागतो आणि तसा खर्च केला नाहीं तर ती मागणी निर्माण न होण्याची शक्यता असते. असे असले तरी उत्पन्न मिळवण्याचे साधन या दृष्टीने उत्पादनाचे महत्व जवळ जवळ कायम आहे. ज्यांचे फारसें महत्व नाहीं अशा गोष्टींचे उत्पादन करून माणसें जें उत्पन्न मिळवतात ते मात्र अत्यंत महत्वाचे असते. वस्तूंची सीमागत उपयुक्तता समाजाच्या दृष्टीने फार अल्प आहे असें उत्पादन दर्शवितें. परंतु कोणत्याहि माणसाच्या दृष्टीने चरितार्थासाठीं लागणाऱ्या उत्पन्नाची एकंदर उपयुक्तता फार मोठी आहे असे उत्पन्न दर्शविते यामुळे वस्तूंपेक्षा उत्पन्न आणि रोजगारी ह्यांना आपल्या आर्थिक जीवनांत अधिक मूलभूत महत्व प्राप्त झाले आहे. ही गोष्ट नाकबूल करण्याचा प्रयत्न सांकेतिक शहाणपण करीत असते. परंतु तरी ती गोष्ट खरी आहे. आज मंदीमुळें उत्पादन किती कमी होईल याचा आपण विचार करीत नाहीं, तर बेकारी किती वाढेल याचा विचार करतो. तसेंच उत्पादन अधिक असले म्हणजे आर्थिक सुस्थिती आहे असें आपण मानत नाहीं, तर पूर्ण रोजगारी ही आर्थिक सुस्थितीचें गमक आहे असें आपण मानतो, यावरूनच वरील गोष्ट सत्य आहे हें सिद्ध होते.

त्याचप्रमाणें ज्यांना ज्यांना काम हवें असेल त्यांना त्यांना रोजगारी द्यायला हवी या गोष्टीचे आपल्याला अधिकाधिक महत्व वाटूं लागले आहे. संपन्नतेचा हा स्वाभाविक परिणाम आहे. ज्यावेळी नोकरीवर असलेल्या कामगाराला भरपूर उत्पन्न मिळते त्यावेळी कांही थोड्या कामगारांना रोजगारी नसावी व मुळीच उत्पन्न मिळूं नये या गोष्टीचे समर्थन करणें कांही सोपें नसतें. अशा परिस्थितींत भेदभाव फारच अन्यायकारक वाटतो. जसजशी आपली संपन्नता वाढत आहे तसतशी प्रत्येकाला रोजगारी मिळवून देण्याची जबाबदारी आपण अधिकाधिक प्रमाणांत मान्य करीत आहोत. प्रत्येक कारखाना चौवीस तास व आठवड्यांतील सातहि दिवस सारखा चालूं ठेवायला हवा. त्यामुळे त्याची मोडतोड होण्याची शक्यता असली तरी तो चालू ठेवायला हवा. तो कारखाना ज्या वस्तूंचे उत्पादन

करतो त्यांना फार मागणी असते अशांतला भाग नाही. उलट त्या विकण्यासाठी खूपच चतुराई लढवावी लागते. परंतु तरी देखील तो कारखाना सारखा चालू ठेवावा लागतो. कारण तसें केले नाहीं तर कांहीं माणसांचा चरितार्थ थांबेल. हे संकट जर टाळता येत नसेल तर तो कारखाना चालू ठेवायलाच हवा परंतु मग अपरिहार्यपणे असा प्रश्न उपस्थित होतो कीं, ह्या असहाय्य परिस्थितींतून समाजाची सुटका करणे शक्य नाहीं का ?

प्रत्यक्ष व्यवहारांत अशा प्रकारच्या कारखान्याची केवळ मोडतोड[1] होण्याचाच धोका नसतो तर त्या बरोबरच मुद्रास्फितीचा देखील धोका असतो. रोजगारी आणि उत्पन्न यांची पातळी उंच राखण्यासाठीं यंत्रसामुग्री व श्रमशक्ति यांचा कमाल उपयोग करण्याची जो पर्यन्त आपल्याला आवश्यकता भासते तो पर्यन्त भाववाढीच्या धोक्याला आपल्याला सतत तोंड द्यावें लागेल. सतत मुद्रास्फिती होत रहाण्याची संभाव्यता कांहीं सुखदायक नाहीं. शिवाय मुद्रास्फिती जर दीर्घकाल होत राहिली तर त्यामुळें सामाजिक समतोल ढळतो. यावर उपाय असा कीं, उत्पन्न मिळवण्याचें साधन म्हणून उत्पादनाऐवजी दुसरी कोणती तरी गोष्ट उपलब्ध झाली पाहिजे. उत्पादन आणि उत्पन्न यांचे जे परस्परावलंबित्व आहे तें नष्ट करण्याचा हा एकमेव मार्ग आहे. ह्या मार्गाचा अवलंब केला कीं, उत्पादनाच्या प्रश्नाचा आपल्याला अधिक सुबुद्धपणें आणि घायकुतीला न येता विचार करतां येईल आणि समाजांतील विशिष्ट व्यक्तींवर अन्याय होण्याचे टळेल.

[२]

उत्पादन आणि उत्पन्नाचे स्थैर्य यांचे परस्परावलंबित्व नष्ट करण्याचा एक मार्ग सध्या उपलब्ध आहे. तो म्हणजे बेकारी-भत्ता देण्याची योजना. या योजनेमुळें उत्पादन केले नाहीं तरी उत्पन्न मिळते. परन्तु ह्या योजनेच्या द्वारे वरील कार्य साधायचे असेल तर तिला नवे आणि अगदी वेगळें स्वरूप देणें आवश्यक आहे. यापूर्वी बेकारीभत्त्याने दोन महत्वाची कार्यें साधलेली आहेत. एका वस्तूची मागणी कमी झाली व दुसरीची वाढली म्हणजे किंवा अशाच अन्य कांहीं कारणांमुळें कामगाराला एक नोकरी सोडून दुसरी धरावी लागते. ही नोकरी बदलतांना त्याला ज्या अडचणींना तोंड द्यावे लागते त्या अंशतः निवारण्याचे कार्य या भत्त्यानें केलें आहे. तसेच समग्र मागणीच्या पातळींत अल्पकालीन फेरफार होत असतात व त्यामुळें कांहीं कामगार बेकार होतात. ह्या कांहीं काळ बेकार होणाऱ्या कामगारांचे संरक्षण देखील या भत्त्याने केलें आहे. परंतु सतत जर बेकारी चालूं राहिली तर तिच्यापासून कामगारांचे संरक्षण करण्याचें कार्य मात्र या बेकारीभत्त्याने केले नाहीं.

---

१ पहा पृष्ठ १५८

कारण हा भत्ता कांहीं काळच मिळत असे. त्यामुळें तो अल्पकालीन अडचणी दूर करीत असे. परंतु मजुरीपासून मिळणाऱ्या उत्पन्नाची जागा तो भरून काढूं शकत नसे. १९५६ सालीं निरनिराळ्या घटक राज्यांत दर आठवड्याला १८ ते ३६ डॉलर्स इतक्या प्रमाणांत हा भत्ता दिला जात होता. त्याच वर्षांत कारखान्यांत दर आठवड्याला मिळणारी सरासरी मजूरी जवळ जवळ ८० डॉलर्स होती.

हा भत्ता इतका तुटपुंजा असण्याचे एक कारण म्हणजे उत्पादनाविषयीचा आपला दृष्टीकोन. उत्पादनाला जर प्रधान महत्त्व असेल तर उत्पन्न मिळवण्याचें तें एकमेव साधन असले पाहिजे. लोकांना काम करायला आणि उत्पादनांत भर घालायला भाग पाडलें पाहिजे आणि त्यांनी तसे केले नाहीं तर त्यांच्या डोक्यावर उपासमारीची टांगती तलवार ठेवली पाहिजे. कामगार काम न करता बेकारी भत्ता घेतील आणि समाजासाठीं कांहींच करणार नाहीत अशीं भीति आपल्याला सतत वाटत आलेली आहे. आणि सामाजिक सुरक्षिततेसाठीं कायदे करण्याबद्दल जेव्हा आपण चर्चा करतो तेव्हा ही भीति सतत आपल्या मनांत असते. त्यामुळे जेमतेम उदरनिर्वाह व्हावा परंतु सुखाने जगतां येऊं नये इतक्या प्रमाणांत आपल्या समाजांत बेकारीभत्ता दिला जातो. आधुनिक भांडवलशाही अर्थरचनेंत कामगाराला अल्पकालीन बेकारीपासून फारसें भय नसतें. कारण तिच्यापासून त्याचें संरक्षण व्हावे अशी तरतूद करण्यांत आली आहे. परंतु मंदी आली व मागणीची पातळी सतत कमी राहिली कीं, त्यामुळें जी बेकारी निर्माण होते तिच्यापासून कामगाराला अधिक भय असतें. अशा प्रकारची बेकारी विसाव्या शतकाच्या तिशींत अनेकांना सहन करावी लागली. पण या बेकारीपासून कामगाराला संरक्षण मिळावे अशी फारशी तरतूद करण्यांत आलेली नाहीं. अशा दीर्घकालीन बेकारीपासून समाधानकारकपणे संरक्षण करणारी विमा योजना जर अंमलांत आणली तर कामगारांत ऐतखाऊपणा फैलावण्याचा धोका निर्माण होतो. त्यामुळें आळशी कामगाराला असें दाखवून देतां आले पाहिजे कीं, कांहीं काळानंतर हा बेकारीभत्ता बंद होईल आणि मग त्याला नोकरी शोधावी लागेल. शिवाय ही बेकारीनिवारक विमायोजना जर समाधानकारक व्हायची असेल तर त्या योजनेनुसार देण्यांत येणाऱ्या भत्त्यांत वाढ करावी लागेल.

जर बेकारीभत्ता वाढवून आठवड्याच्या मजुरी इतका करण्यांत आला तर उगीचच घरी बसून भत्ता खाण्याची प्रवृत्ति वाढेल. ऐतखाऊपणा हा जीवन जगण्याचा एक मार्ग होईल. जोपर्यंत उत्पादनाला प्रधान महत्व होतें तो पर्यन्त उगीचच घरी बसण्याच्या प्रवृत्तींत वाढ होण्यास समाजानें विरोध करणें अपरिहार्य

करतो त्यांना फार मागणी असते अशांतला भाग नाही. उलट त्या विकण्यासाठी खूपच चतुराई लढवावी लागते. परंतु तरी देखील तो कारखाना सारखा चालू ठेवावा लागतो. कारण तसें केले नाहीं तर कांहीं माणसांचा चरितार्थ थांवेल. हे संकट जर टाळता येत नसेल तर तो कारखाना चालू ठेवायलाच हवा परंतु मग अपरिहार्यपणे असा प्रश्न उपस्थित होतो कीं, ह्या असहाय्य परिस्थितींतून समाजाची सुटका करणे शक्य नाहीं का ?

प्रत्यक्ष व्यवहारांत अशा प्रकारच्या कारखान्याची केवळ मोडतोड[1] होण्याचाच धोका नसतो तर त्या वरोवरच मुद्रास्फितीचा देखील धोका असतो. रोजगारी आणि उत्पन्न यांची पातळी उंच राखण्यासाठीं यंत्रसामुग्री व श्रमशक्ति यांचा कमाल उपयोग करण्याची जो पर्यन्त आपल्याला आवश्यकता भासते तो पर्यन्त भाववाढीच्या धोक्याला आपल्याला सतत तोंड द्यावें लागेल. सतत मुद्रास्फिती होत रहाण्याची संभाव्यता कांहीं सुखदायक नाहीं. शिवाय मुद्रास्फिती जर दीर्घकाल होत राहिली तर त्यामुळें सामाजिक समतोल ढळतो. यावर उपाय असा कीं, उत्पन्न मिळवण्याचें साधन म्हणून उत्पादनाऐवजी दुसरी कोणती तरी गोष्ट उपलब्ध झाली पाहिजे. उत्पादन आणि उत्पन्न यांचे जे परस्परावलंवित्व आहे तें नष्ट करण्याचा हा एकमेव मार्ग आहे. ह्या मार्गाचा अवलंव केला कीं, उत्पादनाच्या प्रश्नाचा आपल्याला अधिक सुवुद्धपणें आणि घायकुतीला न येता विचार करतां येईल आणि समाजांतील विशिष्ट व्यक्तींवर अन्याय होण्याचे टळेल.

[२]

उत्पादन आणि उत्पन्नाचे स्थैर्य यांचे परस्परावलंवित्व नष्ट करण्याचा एक मार्ग सध्या उपलब्ध आहे. तो म्हणजे वेकारी-भत्ता देण्याची योजना. या योजनेमुळें उत्पादन केले नाहीं तरी उत्पन्न मिळते. परन्तु ह्या योजनेच्या द्वारे वरील कार्य साधायचे असेल तर तिला नवे आणि अगदी वेगळें स्वरूप देणें आवश्यक आहे. यापूर्वी वेकारीभत्त्याने दोन महत्वाची कार्यें साधलेली आहेत. एका वस्तूची मागणी कमी झाली व दुसरीची वाढली म्हणजे किंवा अशाच अन्य कांहीं कारणांमुळें कामगाराला एक नोकरी सोडून दुसरी धरावी लागते. ही नोकरी वदलतांना त्याला ज्या अडचणींना तोंड द्यावे लागते त्या अंशतः निवारण्याचे कार्य या भत्त्यानें केलें आहे. तसेच समग्र मागणीच्या पातळींत अल्पकालीन फेरफार होत असतात व त्यामुळें कांहीं कामगार बेकार होतात. ह्या कांहीं काळ वेकार होणाऱ्या कामगारांचे संरक्षण देखील या भत्त्याने केलें आहे. परंतु सतत जर बेकारी चालूं राहिली तर तिच्यापासून कामगारांचे संरक्षण करण्याचें कार्य मात्र या बेकारीभत्त्याने केले नाहीं.

---

१ पहा पृष्ठ १५८

कारण हा भत्ता कांहीं काळच मिळत असे. त्यामुळें तो अल्पकालीन अडचणी दूर करीत असे. परंतु मजुरीपासून मिळणाऱ्या उत्पन्नाची जागा तो भरून काढूं शकत नसे. १९५६ सालीं निरनिराळ्या घटक राज्यांत दर आठवड्याला १८ ते ३६ डॉलर्स इतक्या प्रमाणांत हा भत्ता दिला जात होता. त्याच वर्षांत कारखान्यांत दर आठवड्याला मिळणारी सरासरी मजूरी जवळ जवळ ८० डॉलर्स होती.

हा भत्ता इतका तुटपुंजा असण्याचे एक कारण म्हणजे उत्पादनाविषयीचा आपला दृष्टीकोन. उत्पादनाला जर प्रधान महत्त्व असेल तर उत्पन्न मिळवण्याचें तें एकमेव साधन असले पाहिजे. लोकांना काम करायला आणि उत्पादनांत भर घालायला भाग पाडलें पाहिजे आणि त्यांनी तसे केले नाहीं तर त्यांच्या डोक्यावर उपासमारीची टांगती तलवार ठेवली पाहिजे. कामगार काम न करता बेकारी भत्ता घेतील आणि समाजासाठीं कांहींच करणार नाहीत अशीं भीति आपल्याला सतत वाटत आलेली आहे. आणि सामाजिक सुरक्षिततेसाठीं कायदे करण्याबद्दल जेव्हा आपण चर्चा करतो तेव्हा ही भीति सतत आपल्या मनांत असते. त्यामुळे जेमतेम उदरनिर्वाह व्हावा परंतु सुखाने जगतां येऊं नये इतक्या प्रमाणांत आपल्या समाजांत बेकारीभत्ता दिला जातो. आधुनिक भांडवलशाही अर्थरचनेंत कामगाराला अल्पकालीन बेकारीपासून फारसें भय नसतें. कारण तिच्यापासून त्याचें संरक्षण व्हावे अशी तरतूद करण्यांत आली आहे. परंतु मंदी आली व मागणीची पातळी सतत कमी राहिली कीं, त्यामुळें जी बेकारी निर्माण होते तिच्यापासून कामगाराला अधिक भय असतें. अशा प्रकारची बेकारी विसाव्या शतकाच्या तिशींत अनेकांना सहन करावी लागली. पण या बेकारीपासून कामगाराला संरक्षण मिळावे अशी फारशी तरतूद करण्यांत आलेली नाहीं. अशा दीर्घकालीन बेकारीपासून समाधानकारकपणे संरक्षण करणारी विमा योजना जर अंमलांत आणली तर कामगारांत ऐतखाऊपणा फैलावण्याचा धोका निर्माण होतो. त्यामुळें आळशी कामगाराला असें दाखवून देतां आले पाहिजे कीं, कांहीं काळानंतर हा बेकारीभत्ता बंद होईल आणि मग त्याला नोकरी शोधावी लागेल. शिवाय ही बेकारीनिवारक विमायोजना जर समाधानकारक व्हायची असेल तर त्या योजनेनुसार देण्यांत येणाऱ्या भत्त्यांत वाढ करावी लागेल.

जर बेकारीभत्ता वाढवून आठवड्याच्या मजुरी इतका करण्यांत आला तर उगीचच घरी बसून भत्ता खाण्याची प्रवृत्ति वाढेल. ऐतखाऊपणा हा जीवन जगण्याचा एक मार्ग होईल. जोपर्यंत उत्पादनाला प्रधान महत्व होतें तो पर्यन्त उगीचच घरी बसण्याच्या प्रवृत्तींत वाढ होण्यास समाजानें विरोध करणें अपरिहार्य

होते. मात्र सांकेतिक शहाणपणाच्या उत्पादनाबद्दलच्या दृष्टीकोनांत एक तार्कीक विसंगती होती. मंदीच्या काळांत बेकारी व्हावी आणि उत्पादन घटावे हे त्याच्या दृष्टीनें फारसे अनिष्ट नव्हते. ते कांहीही असले तरी आता कांहीं उत्पादन तितकेंसे महत्त्वाचे राहिलेले नाहीं. अशा परिस्थितींत जर लोक काम न करतां घरी राहिले तर त्या गोष्टीला आपण पूर्वी इतका तीव्र विरोध करण्याचें कारण नाहीं. शिवाय बेकारीभत्ता जरी वाढवून मजुरी इतकाच करण्यांत आला तरी त्यामुळें ऐतखाऊपणांत फार वाढ होईल असें आपल्याला खात्रीपूर्वक म्हणतां येणार नाहीं. यावद्दल व्यक्त केली जाणारी भीति अतिरिक्त स्वरूपाची असते. विसाव्या शतकाच्या तिशींत अनेकांची अशी समजूत होती कीं, मजुरीपेक्षां जरी बेकारीभत्ता बराच कमी असला तरी त्याचा फायदा घेऊन अनेक लोक उगीचच घरी बसतील. प्रत्यक्षांतला अनुभव मात्र असा आहे कीं, बेकारी भत्ता घेऊन उगीचच घरी बसणाऱ्या लोकांचे प्रमाण फारच अल्प असतें. कामगार काय किंवा त्यांच्याकडे संशयाने पाहणारी मंडळी काय, या दोघांनाहि ऐतखाऊपणाचा अत्यंत तिटकारा वाटतो. आळशीपणा, 'ही समाजाची एक प्रकारची फसवणूकच आहे' असें केवळ सधन वर्गालाच वाटत नाहीं. बेकारी ही लांछनास्पद आहे असें सर्वच लोकांना वाटते व दीर्घकाल वाटत रहाणार आहे. पूर्ण रोजगारी चालूं ठेवण्याची आपल्याला सध्यां जी जबाबदारी वाटते तिच्यापासून मुक्त होण्याच्या मार्गात वरील भूमिकेमुळें एक अडचण निर्माण होते.

बेकारी हे जर व्यक्तिवर ओढवणारे महान् संकट असेल तर मग सर्व कामगारांना काम मिळेल इतक्या प्रमाणांत आपण उत्पादन केलेच पाहिजे. त्यासाठीं आपल्याला अनावश्यक गोष्टींसाठी कृत्रिमपणे मागणी निर्माण करीत रहावें लागेल. शिवाय पूर्णरोजगारी असली कीं, अर्थव्यवस्थेंत जे अस्थैर्य निर्माण होते त्यामुळे सारखी मुद्रास्फिती होत राहिल. या दोन्हीं गोष्टींमुळे जे ताण निर्माण होतात त्यांना आपल्याला सतत तोंड द्यावें लागेल. अनेकांना असें वाटेल कीं, या अडचणींतून पूर्णपणे किंवा अंशतः मुक्त होण्यासाठीं देखील आळसाला उत्तेजन देणे आणि कामाला प्रोत्साहन देणारी आमिषे दुबळी करणे इष्ट होणार नाहीं. परिस्थिती आणि तर्क या दोन्हीं गोष्टीं आपल्याला अनुकूल असल्या तरी ह्या मर्यादेपलिकडे मूर्तिभंजन करणे आपल्याला शक्य होणार नाहीं.

परतु प्रोत्साहनांवर फारसा अनिष्ट परिणाम होणार नाही अशी तरतूद करणे शक्य आहे. बेकारीनिवारक विमायोजना अशा प्रकारें आंखतां येईल कीं, तिच्यामुळें मुद्रास्फिती टाळतां येईल आणि त्याचवेळीं मंदीचे निवारण करणाऱ्या अन्य वैत्तिक धोरणांना पाठबळ मिळेल. हें पाठबळ अत्यंत महत्वाचे आहे. कारण मंदी हा अजूनहि आर्थिक सुरक्षिततेला असलेला एक मोठा धोका आहे.

[३]

बेकारीभत्ता जर जवळ जवळ मजुरी इतकाच असेल तर त्यामुळें मजूरींत वाढ होण्याची प्रवृति निर्माण होईल. अर्थव्यवस्थेंत ज्यावेळीं जवळ जवळ पूर्ण रोजगारी असेल त्यावेळीं ही प्रवृत्ति प्रत्ययाला येईल. काम न करणे हें जर आर्थिक दृष्टचा काम करण्याइतकेच फायदेशीर झाले तर विशिष्ट कामगार व त्याच प्रमाणे कामगार संघटना यांची अधिक मजूरी सांगण्याची ताकद वाढेल. आणि काम न करतां सुखांत घरी बसणाऱ्या कांहीं कामगारांना काम करण्यास प्रवृत करण्यासाठीं जर अधिक मजूरी द्यावी लागली तर त्यामुळें मजूरींत वाढ होण्याचीं प्रवृत्ति बळावेल. जेव्हा जवळ जवळ पूर्ण रोजगारी असते व सर्व यंत्रसामुग्री वापरली जात असते तेव्हा मजूरींत वाढ होते व त्यामुळें किंमतींत वाढ होते. किंमतींत वाढ झाली कीं, पुन्हां मजूरींत वाढ होते. असा प्रकार चालतो हें आपण वर पाहिलेंच आहे. जवळ जवळ मजूरी इतकाच बेकारीभत्ता द्यायला जर सुरवात केली तर हचा भाववाढीच्या प्रवृत्तीला अधिकच जोर चढेल. अशा प्रकारच्या भत्यामुळें बेकारी सुसहच होईल हे खरें परंतु त्याच बरोबर पूर्ण रोजगारीच्या अवस्थेंतले मुद्रास्फितीचे संकट अधिकच तीव्र होईल.

परंतु जेव्हा पूर्ण रोजगारी असेल तेव्हा महागाई भत्त्याची पातळी इतकी उंच ठेवण्याची कांहींच आवश्यकता नाहीं. त्यावेळीं मजूरीच्या मानाने जर बेकारी-भत्ता कमी असला तर त्यामुळें कामगारांना फारसा त्रास होणार नाहीं. आज या बेकारीभत्त्याचा उपयोग दीर्घकालीन बेकारीपासून स्वतःचे संरक्षण करण्यासाठीं कामगार करीतच नाहीत. कारण त्या भत्त्याच्या द्वारें तसें संरक्षण मिळूंच शकत नाहीं. एखादीं व्यक्ति नोकरी बदलीत असतांना तिला साहाय्य करणे हें या भत्याचे परंपरागत कार्य आहे हें आपण पाहिलेच आहे. ज्यावेळीं रोजगारीची पातळी उंच असते आणि नोकऱ्या मिळणे सोपें असते त्यावेळीं नोकरी भत्त्यावर अवलंबून रहाण्याऐवजी तावडतोब दुसरी नोकरी मिळवणे शक्य असतें. बेकारीभत्ता आणि मजूरीची पातळी यांत दुसऱ्या जागतिक युद्धानंतरच्या काळांत जी मोठी तफावत पडली तिचे एक कारण असें की, त्याकाळांत जवळ जवळ सतत पूर्ण रोजगारीची परिस्थिती होती. त्यामुळें बहुसंख्य कामगारांच्या दृष्टीने बेकारीभत्त्याची पातळी ही कांहीं महत्वाची गोष्ट नव्हती आणि सहाजिकच त्या गोष्टीला विशेषसे राजकीय महत्त्व देखील नव्हते.

जेव्हा कांहीं प्रमाणांत सार्वत्रिक बेकारी असते म्हणजेच जेव्हा अर्थव्यवस्थेंत कामगारांच्या श्रमशक्तीचा पूर्णपणे उपयोग केला जात नसतो तेव्हा परिस्थिती

अगदी विरुद्ध स्वरूपाची असते. तेव्हा उपलब्ध नोकऱ्या थोडक्या असतात आणि एक काम सोडून दुसरे धरण्यांत अधिक वेळ जातो. नोकरी मिळवून बेकारींतून मुक्त होता येईल अशी तेव्हा खात्री नसते. दुसरी नोकरी मिळवणे हें त्यावेळीं व्यक्तीच्या स्वतःच्या प्रयत्नावर अवलंबून नसते. जोपर्यन्त समग्र मागणी अपुरी असते तोपर्यन्त असे प्रयत्न निष्फळ ठरतात. मनुष्य बेकार किती काळ रहातो ते समग्र मागणीवर अवलंबून असते. असे असल्यामुळें जरी बेकारीभत्ता बराच असला तरी तो कामगाराला पुन्हा काम मिळण्याच्या मार्गात अडथळा निर्माण करीत नाहीं. शिवाय कामगारांच्या श्रमशक्तीचा अर्थव्यवस्थेच्या उत्पादनशक्तीचा पूर्णपणे उपयोग केला जात नसल्यामुळे बेकारीभत्ता जरी जास्ती असला तरी त्यामुळे भाववाढीची प्रवृत्ति वळावत नाहीं. तो भत्ता अधिक असल्यामुळे उत्पन्न व ग्राहकांचीं मागणी यांत वाढ होते. हे आपोआप घडत असते. माणसाला मजूरी मिळायची थांबली कीं, त्याला तितकाच बेकारीभत्ता मिळूं लागतो. यामुळे मुद्रास्फितीला प्रतिबंध करणे व एकंदर अर्थव्यवस्थेंत अधिक सुरक्षितता निर्माण करणे हे कार्य बेकारीभत्ता अत्यंत परिणामकारकपणे करतो. कोणत्याहि वैत्तिक धोरणाच्या द्वारे — उदाहरणार्थ, सार्वजनिक उद्योगावर खर्च करणे — हे कार्य तितक्या परिणामकारकपणे होऊं शकत नाहीं.

यावरून असा स्पष्ट निष्कर्ष निघतो कीं, बेकारी वाढली कीं, बेकारीभत्त्यांत वाढ करावी व पूर्ण रोजगारीची अवस्था निर्माण होऊं लागली कीं, तो भत्ता कमी करावा. अशा प्रकारच्या व्यवस्थेला एक नांव देणे सोयीस्कर पडेल म्हणून त्याला आपण 'अर्थचक्रानुसार बदलणारा भत्ता'[1] असें नांव देऊं या. किंवा अ. व. भत्ता असें सुटसुटीत नांव आपल्याला त्याला देतां येईल. अशा प्रकारची व्यवस्था करणे अवघड नाहीं. आणि सध्यांच्या स्थिर व्यवस्थेपेक्षां ही नवी व्यवस्था अधिक चांगली ठरेल. खरें म्हणजे इतका चांगला परिणाम घडवून आणणारी दुसरी कोणतीहि आर्थिक सुधारणा सुचविणे कठीण आहे. ह्या नव्या व्यवस्थेमुळें उत्पादन व आर्थिक सुरक्षितता यांचे परस्परावलंबित्व नष्ट होईल. (ही गोष्ट किती महत्त्वाची आहे त्याचे विवरण मी पुढें करणार आहे.) त्याचप्रमाणें या व्यवस्थेमुळें कामगारावर ओढवणारें मंदीच्या काळांतील बेकारीचे संकटहि पुष्कळशा प्रमाणांत नष्ट होईल. या व्यवस्थेमुळे मागणीला स्थैर्य येईल आणि मंदीचा धोका पुष्कळसा कमी होईल.

---

१ इथे मी जो अर्थचक्राचा उल्लेख केला आहे तो करतांना माझ्या डोळ्यापुढे तालबद्ध आर्थिक चढउतार नाहीत. मागणी व रोजगारी यांच्या पातळीत होणारे सर्व प्रकारचे फेरबदल येथे अभिप्रेत आहेत.

शिवाय जेव्हा पूर्ण रोजगारी असेल तेव्हा या व्यवस्थेमुळे मुद्रास्फितीत भर पडणार नाही व कामगार नव्या नोकऱ्या शोधण्यापासून परावृत्तहि होणार नाहीं. जर बेकारीभत्त्याचे दर अधिक असल्यामुळे ऐतखाऊपणा निर्माण होत असेल तर या व्यवस्थेमुळे तसे होण्याचे टळेल. जेव्हा नोकऱ्या भरपूर प्रमाणात उपलब्ध असतील तेव्हा भत्ता कमी होईल आणि म्हणून उगीचच घरी बसण्यास उत्तेजन मिळणार नाही. जेव्हा नोकऱ्या मिळतच नसतात तेव्हा आपखुषीने बेकार राहिलेले कामगार व नाखुषीने बेकार राहिलेले कामगार यांत भेद करण्यात कांही अर्थ नसतो. कारण दोन्ही प्रकारच्या कामगारांना काम मिळणे शक्य नसते.

[४]

सध्यांची बेकारीभत्त्याची जी व्यवस्था आहे तिचा कारभार घटक राज्यें स्वतंत्रपणे पाहातात. शिवाय विमा, राखीव निधी आणि कामगाराची लायकी या गोष्टींवर ती व्यवस्था आधारलेली आहे. त्यामुळें तिच्यांत लवचिकपणाचा पूर्णपणे अभाव आहे. बेकारीभत्त्याचे दर व कालमर्यादा या गोष्टींत सावकाश बदल होतात. आणि ते करण्यासाठीं घटक राज्यांतील विधान सभांना कायदे करावे लागतात. अ. व. भत्त्याची व्यवस्था घटकराज्यांच्या कृतीने अंमलांत येणें जवळ जवळ अशक्य आहे.

सुदैवाने तसें करणे आवश्यक नाहीं आणि इष्टहि नाहीं. घटकराज्यें जिचा कारभार पहातात व जिचे स्वरूप प्रत्येक राज्यांत कांहीसे वेगळें आहे अशी ही सध्यांची व्यवस्था तशीच चालूं रहाणे इष्ट आहे. तिच्या द्वारें कामगारांना एक किमान बेकारीभत्ता मिळत राहिल.[1] अ. व. भत्त्याची व्यवस्था पूर्णपणे मध्यवर्ती सरकारने अंमलांत आणावी. आर्थिक उत्पादनाशीं ज्याचा संबंध असतो तें आर्थिक धोरण आंखणे ही मध्यवर्ती सरकारची जबाबदारी आहे असें आतां सर्व लोक मानतात. या बाबतींत जाब विचारला जातो तो मध्यवर्ती सरकारला. तेव्हा उत्पादनांत होणाऱ्या फेरफारांशीं निगडीत असलेली बेकारी हा देखील मध्यवर्ती सरकारच्या कक्षेतला प्रश्न आहे. ह्या बेकारीचा धोका कितपत आहे त्याचा अंदाज बांधून त्यानुसार कायमची आर्थिक तरतूद करून ठेवणे शक्य नाहीं. तेव्हा या बेकारीचे निवारण करण्यासाठीं जो काहीं खर्च करावा लागेल तो चालू अर्थ संकल्पाच्या द्वारे केला जावा. पूर्ण रोजगारी असतांना देखील जितकी बेकारी अपरिहार्यपणे असते त्यापेक्षा जर कोणत्याहि विशिष्ट काळांत अधिक बेकारी असेल तर मध्यवर्ती सरकारतर्फे जादा बेकारीभत्ता देण्यास सुरवात केली जावी. बेकार कामगाराला चालू दराने

१ परंतु मध्यवर्ती सरकारने अधिक समाधानकारक कसोटया घालून देणे आवश्यक ठरेल. एरवी देखील ती गोष्ट आवश्यक आहे.

मिळणारा बेकारीभत्ता आणि तो कामगार पूर्वी कामावर असतांना त्याला मिळणारी मजूरी यांत जो फरक असेल त्याचा एक विशिष्ट हिस्सा मध्यवर्ती सरकारने त्या कामगाराला जादा बेकारीभत्ता म्हणून द्यावा. उदाहरणार्थ, आपण असे समजू या कीं, पूर्ण रोजगारीच्या काळांत वीस लाख कामगार बेकार असतात. त्यांतल्या कांहींची बेकारी हंगामी असते. कांही नोकऱ्या बदलत असल्यामुळें बेकार असतात आणि इतर कांहींची बेकारी अल्पकालीन असते. जेव्हा अशा प्रकारे किमान बेकारी असेल तेव्हा प्रत्येक कामगाराला त्याच्या पूर्वीची मजूरी व चालू बेकारीभत्ता यामध्ये जो फरक असेल त्याचा निम्मा भाग अ. व. भत्ता म्हणून देण्यांत यावा. जेव्हा बेकारी तीस लाख असेल. तेव्हा अ. व. भत्ता या फरकाच्या दोन तृतीयांशाइतका असावा आणि जेव्हा बेकारी चाळीस लाख किंवा अधिक असेल तेव्हा हा अ. व. भत्ता त्या फरकाच्या चार पंचमाशाइतका असावा. अशा परिस्थितीत एखाद्या कामगाराची १९५२ सालातली सरासरी मजूरी जर ८० डॉलर्स असेल आणि जर तो दर आठवड्यास चालू बेकारीभत्ता म्हणून ३६ डॉलर्स मिळवण्यास पात्र असेल तर अ. व. भत्ता धरून त्याला दर आठवड्याला ७१·२० डॉलर्सचे उत्पन्न मिळेल. या उत्पन्नापैकी ३५·२० डॉलर्स त्याला अ. व. भत्त्याच्या रूपाने मिळतील. (त्याचे पूर्वीचे उत्पन्न व हे उत्पन्न यांत थोडासा फरक राहिल. परंतु जो काम करतो त्याला घरी वसणाऱ्या माणसापेक्षा अधिक उत्पन्न मिळावे हे जे प्युरिटन तत्व आहे त्याला मान देण्यासाठी आपण मजूरी व बेकारीभत्ता यात इतका फरक ठेवायला हवा.) शिवाय काम करून मिळणारी मजूरी व अ. व. भत्त्याच्या व्यवस्थेनुसार मिळणारे उत्पन्न यांत जरी फार थोडा फरक असला—आणि इतका थोडा फरक असणे हेच त्या व्यवस्थेचे महत्वाचे वैशिष्ट्य आहे—तरी त्यामुळें काम करून मजूरी मिळवण्याचा आकर्षकपणा नष्ट करणे योग्य होणार नाहीं. लोकांना घरी बसण्यापेक्षा काम करणे अधिक पसंत पडते हे खरे. परंतु या नैसर्गिक प्रवृत्तीला बळकटी आणण्यासाठी असे एक आर्थिक प्रोत्साहन निर्माण करायला हवे कीं, ज्यामुळे नोकरी मिळण्यासारखी असली तर कोणताहि माणूस ती उत्सुकतेने स्वीकारील.

एखाद्या माणसाला किती आठवडे बेकारीभत्ता मिळायचा त्याच्यावर सध्या मर्यादा घालण्यांत आलेली आहे. या मर्यादेच्या मागे असा समज आहे कीं, माणसाने प्रयत्न केला तर कांही काळानंतर तरी त्याला नोकरी मिळू शकते. पूर्ण रोजगारीच्या काळांत मजूरांच्या मागणींत होणाऱ्या फेरफारामुळे जी अल्पकालीन बेकारी निर्माण होते तिच्या बाबतींत ही गोष्ट खरी आहे. परंतु उत्पादनाच्या पातळींत कांही वेळा फरक होतात आणि ती पातळी स्वतःच्या प्रयत्नाने पुन्हा वर नेणे कोणत्याहि विशिष्ट कामगाराला शक्य नसते. उत्पादनाच्या पातळींत असे फेरफार

झाल्यामुळे जी बेकारी निर्माण होते तिच्या बाबतींत वरील गोष्ट खरी नसते. त्यामुळे अशी बेकारी जितके दिवस टिकेल तितके दिवस कामगाराला बेकारीभत्ता देण्यांत यावा. याचाच अर्थ असा कीं, जितके दिवस विशिष्ट मर्यादेहून अधिक बेकारी असेल तितके दिवस कामगाराला नित्याचा बेकारी-भत्ता व अ. ब. भत्ता हे दोन्हीं देण्यांत यावे. हे भत्ते अधिककाळ दिल्यामुळें जो जादा खर्च होईल तो मध्यवर्ती सरकाराने सोसावा हे क्रमप्राप्तच आहे.

जेव्हा अर्थव्यवस्थेंतील समग्र मागणींत घट होते व त्यामुळे सर्व कामगारांना काम मिळणे अशक्य होते तेव्हां जी बेकारी निर्माण होते ती सर्व देशांत समप्रमाणात विभागली जात नाहीं. ती कशी विभागली जाते तें कोणत्या भागांत कोण ते उद्योग आहेत त्यावर अवलंबून असतें. कांहीं प्रदेशात ही बेकारी अधिक असते आणि कांही प्रदेशांत ती अगदी अल्प असते. ज्या शहरांतले पन्नास टक्के कामगार बेकार आहेत अशा शहरांत रहाणाऱ्या कामगाराला जर असें सांगितले कीं, एकंदर देशांतील सरासरी बेकारी त्या मानाने कमी आहे तर तें ऐकून त्या कामगाराला विशेषसे समाधान वाटणार नाहीं. अशा परिस्थितींत प्रादेशिक परिस्थितीनुसार अ. ब. भत्यांत फरक करावा कीं काय असा प्रश्न उपस्थित होतो. शिवाय जरी एकंदर देशांतील बेकारी ठराविक मर्यादेपेक्षां कमी असली तरी देखील एखाद्या विशिष्ट प्रदेशांत जर फार बेकारी असेल तर त्या प्रदेशांत अ. ब. भत्ता देणे इष्ट होणार नाहीं का ? त्याच प्रमाणें एकंदर देशांत किमान मर्यादेहून अधिक बेकारी असतांना जर एखाद्या प्रदेशांत अल्पबेकारी असली तर त्या प्रदेशापुरता अ. ब. भत्ता बंद करणे देखील इष्ट होणार नाहीं का ? या बाबतींत जो निर्णय घ्यायचा तो साधक-बाधक विचार करूनच घेणे इष्ट ठरेल. असें केलें तर ज्या प्रदेशांत अधिक बेकारी असेल तेथे अ. ब. भत्ता अधिक उपयुक्त कार्य करील. त्यामुळें त्या प्रदेशांतील कामगार जेथे बेकारी कमी आहे अशा प्रदेशांत नोकऱ्या मिळवण्यासाठीं विशेष धडपड करणार नाहीत. परंतु यांत धोका असा आहे कीं, नोकरीच्या निमित्ताने जे लोकसंख्येचें आंतरप्रदेशीय गमनागमन होत असतें त्याला आळा बसेल. परंतु दरिद्री समाजांत जरी असें गमनागमन होणे आवश्यक असलें तरी संपन्न समाजांत तशी आवश्यकता नसते हें आपण पाहिलें आहेच. तेव्हा प्रादेशिक परिस्थितीनुसार अ. ब. भत्त्याच्या व्यवस्थेंत आवश्यक ते फेरफार व्हावे हें क्रमप्राप्त वाटते.

येथें एक आक्षेप उपस्थित होण्याची शक्यता आहे. तो असा कीं, अधिक बेकारी असतांना ज्या दराने बेकारीभत्ता द्यायचा असे ठरेल त्या दरानें तो एकदां दिला जाऊं लागला कीं, मग बेकारी कमी झाल्यावर देखील तो कमी करणे अशक्य होईल. तो कमी होऊं नये म्हणून कामगार संघटना व मतदार दडपण आण-

तील. असें होणे अर्थातच शक्य आहे. लोकशाहीनिष्ठ समाजांत समाजाला हितकारक अशी कोणतीहि योजना जरी सुचवली तरी तिला विपर्यस्त स्वरूप देणे कोणत्याहि अल्पसंख्य गटाला शक्य असते आणि कधीं कधीं बहुसंख्य गट देखील तसे करूं शकतो. सुसंस्कृत सरकारें ज्या अनेक सुविधा पुरवितात त्यांतली टपालाची व्यवस्था ही एक जुनी सुविधा आहे. आणि तरी नागरिकांचा असा प्रयत्न चालत असतो कीं, टपाल नेण्यासाठीं जितका खर्च होतो त्यापेक्षां अगदीं कमी पैशांत टपाल खात्याने आपल्या पत्रांची ने आण करावी. परंतु आपल्याला वाटते तितकीं कांही लोकांची समजशक्ति कमी नसते. आणि अ. व. भत्त्याची व्यवस्था ज्या तत्त्वांवर आधारलेली आहे तीं लोकांच्या समजशक्तीच्या आवाक्यापलिकडची नाहींत. बेकारी कमी असते त्यावेळी बेकारीभत्ता कमी ठेवल्यामुळेच त्यांत बेकारी वाढली म्हणजे वाढ करतां येते. ज्यावेळी बेकारी अधिक असते तेव्हा बेकारीभत्ता जास्त असला तरी तो लोकांना नोकऱ्या मिळवण्यापासून परावृत्त करीत नाहीं. तसेच तो भत्ता असा कमी जास्त होणारा असला म्हणजे उद्योग चालकांना कामगारांना आकर्षित करण्यासाठीं अधिक मजूरी देऊं करावी लागत नाहीं. अशा रितीने मजूरींत वाढ होण्याचे टळते. या गोष्टी समजायला कांही फारशा कठीण नाहीत. आणि तसें ज्यांना वाटते त्या लोकांच्या कामगार-पुढारी व कामगार यांच्या बुद्धिमत्तेबद्दलच्या व जबाबदारीच्या जाणिवेबद्दलच्या कल्पना चूकीच्या आहेत असें म्हणावे लागेल.

[५]

आजची परिस्थिती अशी आहे की, अमेरिकेंतील अर्थव्यवस्था एका विशिष्ट पातळीवरच कार्य करूं शकते. ती पातळी म्हणजे पूर्ण रोजगारीची पातळी. ह्या पातळीवर जेव्हा अर्थव्यवस्था कार्य करीत असते तेव्हा तींत पुष्कळच ताण निर्माण होतात हें आपण पाहिलेंच आहे. त्या परिस्थितींत ग्राहकांच्या गरजा कृत्रिमपणे निर्माण करण्याचे कार्य अगदीं बेफाम वेगाने चालूं ठेवणे आवश्यक असते. पूर्ण रोजगारी असली कीं, अर्थव्यवस्था अस्थिर असते ही गोष्ट अगदी उघड आहे. त्यावेळी किंमती सारख्या वर जात असतात. परंतु पूर्ण रोजगारीच्या पातळीपेक्षां जर उत्पादन बरेचसें कमी असले तर त्यामुळे जीं माणसे बेकार होतात त्यांच्या उत्पन्नांत जबरदस्त घट होते. असें होणे हे एक गंभीर स्वरूपाचे आर्थिक अपयश आहे असें मानले जाते आणि तें खरेच आहे.

अ. व. भत्त्याची व्यवस्था अंमलांत आणली कीं, अर्थव्यवस्थेचे कार्य एकाच पातळीवर चालण्याची आवश्यकता नसते. विशिष्ट मर्यादेंत ती पातळी वरखाली सरकूं शकते. अ. व. भत्त्याच्या व्यवस्थेमुळे अशी परिस्थिती निर्माण होते कीं, पूर्ण

रोजगारीच्या पातळीपेक्षा जरी मागणी खाली घसरली तरी त्यामुळे कोणत्याहि एका विशिष्ट गटांचे फार मोठें नुकसान होत नाहीं. तसें नुकसान होणे उघड उघड अन्यायकारक आहे. आणि त्यामुळे बेकारी निर्माण करील असे धोरण आज आपल्याला स्वीकारता येत नाहीं, परंतु अ. व. भत्त्याची व्यवस्था अंमलांत आणली कीं, तसें धोरण स्वीकारणें शक्य होतें. वेगळ्या शब्दांत सांगायचे तर असें म्हणता येईल कीं, एका विशिष्ट कक्षेंत अर्थव्यवस्थेचे उत्पादन कमी अधिक करता येईल, अशी व्यवस्था करण्याचा आपला प्रयत्न आहे. उत्पादनाची पातळी नियंत्रित करण्याची जी साधने आज उपलब्ध आहेत ती दोषपूर्ण आहेत. आणि म्हणूनच अशा प्रकारची व्यवस्था करणे आवश्यक आहे. आज अर्थव्यवस्थेंत पूर्ण रोजगारी ठेवणे व त्याचवेळी मुद्रास्फिती टाळणे हें एखाद्या शास्त्रवैद्याला पावडऱ्याच्या साहाय्याने मेंदूवर शस्त्रक्रिया करायला सांगण्यासारखें आहे. शिवाय सौम्य बेकारीचे परिवर्तन तीव्र बेकारींत होऊं नये यासाठी देखील अ. व. भत्त्याची व्यवस्था उपयुक्त आहे. ज्यावेळी बेकारी वाढत असते त्यावेळी या व्यवस्थेमुळे क्रयशक्ति आणि मागणी यांत वाढ होते. आणि जेव्हा बेकारी घटत असते तेव्हा या व्यवस्थेमुळे काम करायला तयार असणाऱ्या कामगारांच्या संख्येत वाढ होते.

कांही लोकांना असें वाटेल कीं, या व्यवस्थेमुळे बेकारीला आर्थिक जीवनांत कायमचे स्थान मिळेल आणि म्हणून या योजनेला ते विरोध करतील. परंतु या या संबंधी त्यांनी कांही गोष्टी विचारांत घ्यायला हव्यात. या व्यवस्थेनुसार फारच थोडी बेकारी असलेली चालेल. १९५६ सालीं एकंदर मुलकी कामगारांची संख्या ६७५ लाख होती. आर्थिक धोरणाची व्यवस्थित अमलबजावणी करतां यावी यासाठीं सुमारे ४० लाख कामगारांना अधून मधून बेकार ठेवण्याची आपली तयारी असली पाहिजे. हे कामगार ज्या वस्तूंचे उत्पादन करतात त्यांची फार निकडीची गरज आहे असें आपल्याला आतां म्हणता येणार नाहीं. मात्र घरीं बसणे ही गोष्ट लांछनास्पद आहे अशी आज कल्पना असल्यामुळे जे लोक प्रत्यक्षांत बेकार होतील त्यांची परिस्थिती मात्र फार गंभीर होईल.

परंतु आर्थिक जीवनांतला नित्याचा अनुभव असा आहे कीं, सगळेच आपल्या मनासारखे होईल अशी अपेक्षा करणे चुकीचें असतें. शक्य तितके आपल्या मनासारखेच करून घेण्यांतच समाधान मानणे इष्ट असते. अ. व. भत्त्यामुळे सध्यांच्या परिस्थितींत पुष्कळच सुधारणा होईल. तसेंच उत्पादनांतील या फेरफारांमुळे जे लोक बेकार होतील त्यांना या भत्त्यामुळे नुकसान भरपाई मिळेल. उलट आज अशी परिस्थिती आहे कीं, बेकारी निर्माण व्हायची ती होतेच परंतु या बेकारीमुळे कामगार आपले उत्पन्न गमावतात. त्यांना पुरेशी नुकसान भरपाई मिळत नाहीं.

शिवाय या व्यवस्थेमुळे अर्थव्यवस्थेंत आपोआप स्थैर्य आणणारी एक नवी शक्ति निर्माण होते. आणि त्यामुळे स्थैर्यासाठीं आवश्यक असलेल्या बेकारीचे गंभीर स्वरूपाच्या बेकारींत रूपांतर व्हायचें टळते. या संदर्भात थोडे अधिक विवेचन करणे आवश्यक आहे.

समग्र मागणीत घट होऊन मंदी निर्माण झाली तर तिच्यावर इलाज म्हणून सध्या आपण सरकारी खर्चात वाढ करतो आणि करांत सूट देतो. ह्या उपायांचा अवलंब केल्यामुळे इतर सामाजिक उद्दिष्टांना धोका पोहोचत नाही. त्यामुळे संपन्न समाजामध्ये मंदीवर इलाज करणे अवघड नाही. उलट मुद्रास्फितीवर इलाज करणे मात्र जवळ जवळ अशक्य आहे. मंदीवर इलाज करणे अवघड नसले तरी आर्थिक सुरक्षिततेला तो एक गंभीर स्वरूपाचा धोका आहे. एक शक्यता अशी असते की, खाजगी खर्चात फार वेगाने घट होईल आणि ती घट भरून काढण्याचे कार्य वैत्तिक धोरणे त्यामानाने मंद गतीने करतील. अशा परिस्थितीत मुद्राक्षय थांबवणाऱ्या योजनांचा इष्ट तो परिणाम होण्यास वेळ लागतो आणि दरम्यानच्या काळांत बेकारी फैलावते. वैत्तिक उपायांचा अवलंब करण्याची म्हणजे खर्चात वाढ व करांत घट करण्याची वेळ आली आहे की नाही, यावद्दल मंदीच्या काळांत अपरिहार्यपणे चर्चा होते. शिवाय नेहमीच अशी आशा वाटत असते की, कांही न करतां स्वस्थ बसले तर आर्थिक परिस्थिति सुधारेल. यामुळे वैत्तिक उपाययोजना करण्यास विलंब लागतो व बेकारी फैलावते. शिवाय ग्राहकांची मागणी निर्माण करण्याची व त्यासाठी त्यांना कर्जे देण्याची जी आधुनिक प्रक्रिया आहे त्यामुळे मंदीचा धोका वाढतो हे आपण पाहिलेच आहे.

अ.व. भत्त्याची व्यवस्था हा कांही अन्य वैत्तिक उपायांचा पर्याय नव्हे. परंतु या व्यवस्थेमुळे मजुरीपासून मिळणाऱ्या उत्पन्नात अधिक स्थैर्य येते. हें उत्पन्न म्हणजे एकंदर उत्पन्नाचा बराच मोठा हिस्सा असतो. शिवाय ग्राहकांना दिलेल्या कर्जावर आपली व्यवस्था विशेष प्रमाणावर अवलंबून असल्यामुळे या उत्पन्नाला विशेष धोका निर्माण होतो. जेव्हा मुद्राक्षय होतो तेव्हा लोक आपल्या कर्जाचे हप्ते भरण्यासाठी धडपडतात. त्यामुळे त्यांचा चालू खर्च खूपच कमी होतो आणि तो कमी झाला की, बेकारी वाढून कामगारांचे उत्पन्न घटते. शिवाय आपली वैत्तिक धोरणे अंमलात येण्यास सध्या बराच विलंब लागतो. हा विलंबाचा धोका अ. व. भत्त्याच्या व्यवस्थेमुळे टळतो.

सध्या अधिकात अधिक उत्पादन करणे आपल्याला भाग पडते. यामुळे जे ताण निर्माण होतात ते ज्यामुळे टळतील अशी योजना आपल्याला आज हवी आहे. शिवाय गंभीर स्वरूपाची बेकारी ज्यामुळे टाळता येईल अशा उपाययोजनेची देखील

आपल्याला गरज आहे. रोजगारी कमी झाली आणि बेकारीने गंभीर स्वरूप धारण केले म्हणजे आपण बेकारीभत्त्यांत जर वाढ केली तर वरील सर्व गोष्टी साधता येतील. माणसे नोकऱ्या बदलत असल्यामुळे निर्माण होणारी बेकारी किंवा किंमतींच्या स्थैर्यासाठी आवश्यक असणारी बेकारी ही मामुली स्वरूपाची असते. बेकारीने अधिक गंभीर स्वरूप धारण केले की, आर्थिक सुरक्षिततेला धोका पोहोचतो आणि हा धोका टाळण्यास अ. ब. भत्त्याच्या व्यवस्थेची मदत होईल.

वेगळ्या शब्दांत सांगायचे तर या व्यवस्थेमुळे कामगारावर पडणारा ताण कमी होईल. कांही प्रमाणात बेकारी असणे ही एक नित्याची गोष्ट असे मानले जावे, हा या योजनेचा एक गर्भित अर्थ आहे.

चार दिवसांचाच आठवडा असावा का, म्हणजेच मजूरांनी आठवड्यातून चारच दिवस काम करावे का या प्रश्नावरील चर्चेला अलिकडे सुरवात झाली आहे. असे करणे शक्य आहे हा विचार औपचारिकपणे १९५६ साली मिस्टर रिचर्ड एम्. निक्सन यांनी मानला. त्यावेळी व्हाइस प्रेसिडेण्टच्या पदासाठी रिपब्लिकन पक्षाचे उमेदवार म्हणून ते उभे होते. वरील प्रश्नावर जेव्हा चर्चा होते तेव्हा असे गृहीत धरले जाते की, आठवड्यातील दोन अगर तीन दिवसात जे उत्पादन करणे शक्य असते त्याची कांहीं आपल्याला निकडीची गरज नसते. आठवड्यातून तीन दिवस विश्रांती मिळाली तर त्यामुळे जे प्रश्न निर्माण होतील ते आयुष्यांत मधून मधून अधिक दीर्घकाल विश्रांती मिळाल्यामुळे निर्माण होणाऱ्या प्रश्नापेक्षा कमी गंभीर असतील असे मानण्याचे कारण नाही. या संदर्भात हे ध्यानात ठेवायला हवे की, दीर्घकालीन विश्रांती मिळत असताना उत्पन्न मिळतच राहिल.

[६]

मुद्रास्फिती हा सामाजिक समतोलाचा कडवा शत्रु आहे. त्यामुळे हा समतोल निर्माण करणे हे ज्या समाजाचे प्रधान उद्दिष्ट आहे त्या समाजात मुद्रास्फिती होऊन चालणार नाही. परंतु किंमती स्थिर ठेवायच्या म्हणजे बेकारी निर्माण होते. ही बेकारी सुसह्य करण्याचे कार्य अ. ब. भत्ता करूं शकेल. ही बेकारी कांहीशी सुसह्य झाली तरी ती कमी करण्याचे उद्दिष्ट आपण डोळ्यासमोर ठेवले पाहिजे असे अनेकांना वाटत राहिल आणि ते इष्टच आहे. शिवाय तसे केल्यामुळे आर्थिक विकासाची गति वाढण्याचा देखील संभव आहे.

जर अधिकात अधिक रोजगारी निर्माण करायची असेल व त्याचवेळी जर मुद्रास्फिती टाळायची असेल तर ते करण्याचा एकच मार्ग आहे; तो म्हणजे अधिक आर्थिक नियंत्रणें बसवणे. जेव्हा पूर्ण रोजगारी असते तेव्हा मजूरी आणि किंमती

शिवाय या व्यवस्थेमुळे अर्थव्यवस्थेंत आपोआप स्थैर्य आणणारी एक नवी शक्ति निर्माण होते. आणि त्यामुळे स्थैर्यासाठीं आवश्यक असलेल्या बेकारीचे गंभीर स्वरूपाच्या बेकारींत रूपांतर व्हायचें टळते. या संदर्भात थोडे अधिक विवेचन करणे आवश्यक आहे.

समग्र मागणीत घट होऊन मंदी निर्माण झाली तर तिच्यावर इलाज म्हणून सध्या आपण सरकारी खर्चात वाढ करतो आणि करांत सूट देतो. ह्या उपायांचा अवलंब केल्यामुळे इतर सामाजिक उद्दिष्टांना धोका पोहोचत नाही. त्यामुळे संपन्न समाजामध्ये मंदीवर इलाज करणे अवघड नाही. उलट मुद्रास्फितीवर इलाज करणे मात्र जवळ जवळ अशक्य आहे. मंदीवर इलाज करणे अवघड नसले तरी आर्थिक सुरक्षिततेला तो एक गंभीर स्वरूपाचा धोका आहे. एक शक्यता अशी असते की, खाजगी खर्चात फार वेगाने घट होईल आणि ती घट भरून काढण्याचे कार्य वैत्तिक धोरणे त्यामानाने मंद गतीने करतील. अशा परिस्थितीत मुद्राक्षय थांववणाऱ्या योजनांचा इष्ट तो परिणाम होण्यास वेळ लागतो आणि दरम्यानच्या काळांत बेकारी फैलावते. वैत्तिक उपायांचा अवलंब करण्याची म्हणजे खर्चात वाढ व करांत घट करण्याची वेळ आली आहे की नाही, यावद्दल मंदीच्या काळांत अपरिहार्यपणे चर्चा होते. शिवाय नेहमीच अशी आशा वाटत असते की, कांही न करतां स्वस्थ बसले तर आर्थिक परिस्थिति सुधारेल. यामुळे वैत्तिक उपाययोजना करण्यास विलंब लागतो व बेकारी फैलावते. शिवाय ग्राहकांची मागणी निर्माण करण्याची व त्यासाठी त्यांना कर्जे देण्याची जी आधुनिक प्रक्रिया आहे त्यामुळे मंदीचा धोका वाढतो हे आपण पाहिलेच आहे.

अ.व. भत्त्याची व्यवस्था हा कांही अन्य वैत्तिक उपायांचा पर्याय नव्हे. परंतु या व्यवस्थेमुळे मजुरीपासून मिळणाऱ्या उत्पन्नात अधिक स्थैर्य येते. हें उत्पन्न म्हणजे एकंदर उत्पन्नाचा बराच मोठा हिस्सा असतो. शिवाय ग्राहकांना दिलेल्या कर्जावर आपली व्यवस्था विशेष प्रमाणावर अवलंबून असल्यामुळे या उत्पन्नाला विशेष धोका निर्माण होतो. जेव्हा मुद्राक्षय होतो तेव्हा लोक आपल्या कर्जाचे हप्ते भरण्यासाठी धडपडतात. त्यामुळे त्यांचा चालू खर्च खूपच कमी होतो आणि तो कमी झाला की, बेकारी वाढून कामगारांचे उत्पन्न घटते. शिवाय आपली वैत्तिक धोरणे अंमलात येण्यास सध्या बराच विलंब लागतो. हा विलंबाचा धोका अ. ब. भत्त्याच्या व्यवस्थेमुळे टळतो.

सध्या अधिकात अधिक उत्पादन करणे आपल्याला भाग पडते. यामुळे जे ताण निर्माण होतात ते ज्यामुळे टळतील अशी योजना आपल्याला आज हवी आहे. शिवाय गंभीर स्वरूपाची बेकारी ज्यामुळे टाळता येईल अशा उपाययोजनेची देखील

आपल्याला गरज आहे. रोजगारी कमी झाली आणि बेकारीने गंभीर स्वरूप धारण केले म्हणजे आपण बेकारीभत्त्यांत जर वाढ केली तर वरील सर्व गोष्टी साधता येतील. माणसे नोकऱ्या बदलत असल्यामुळे निर्माण होणारी बेकारी किंवा किमतींच्या स्थैर्यासाठी आवश्यक असणारी बेकारी ही मामुली स्वरूपाची असते. बेकारीने अधिक गंभीर स्वरूप धारण केले की, आर्थिक सुरक्षिततेला धोका पोहोचतो आणि हा धोका टाळण्यास अ. व. भत्त्याच्या व्यवस्थेची मदत होईल.

वेगळ्या शब्दांत सांगायचे तर या व्यवस्थेमुळे कामगारावर पडणारा ताण कमी होईल. कांही प्रमाणात बेकारी असणे ही एक नित्याची गोष्ट असे मानले जावे, हा या योजनेचा एक गर्भित अर्थ आहे.

चार दिवसांचाच आठवडा असावा का, म्हणजेच मजूरांनी आठवड्यातून चारच दिवस काम करावे का या प्रश्नावरील चर्चेला अलिकडे सुरवात झाली आहे. असे करणे शक्य आहे हा विचार औपचारिकपणे १९५६ साली मिस्टर रिचर्ड एम्. निक्सन यांनी मानला. त्यावेळी व्हाइस प्रेसिडेण्टच्या पदासाठी रिपब्लिकन पक्षाचे उमेदवार म्हणून ते उभे होते. वरील प्रश्नावर जेव्हा चर्चा होते तेव्हा असे गृहीत धरले जाते की, आठवड्यातील दोन अगर तीन दिवसात जे उत्पादन करणे शक्य असते त्याची कांहीं आपल्याला निकडीची गरज नसते. आठवड्यातून तीन दिवस विश्रांती मिळाली तर त्यामुळे जे प्रश्न निर्माण होतील ते आयुष्यांत मधून मधून अधिक दीर्घकाल विश्रांती मिळाल्यामुळे निर्माण होणाऱ्या प्रश्नापेक्षा कमी गंभीर असतील असे मानण्याचे कारण नाही. या संदर्भात हे ध्यानात ठेवायला हवे की, दीर्घकालीन विश्रांती मिळत असताना उत्पन्न मिळतच राहिल.

[६]

मुद्रास्फिती हा सामाजिक समतोलाचा कडवा शत्रु आहे. त्यामुळे हा समतोल निर्माण करणे हे ज्या समाजाचे प्रधान उद्दिष्ट आहे त्या समाजात मुद्रास्फिती होऊन चालणार नाही. परंतु किंमती स्थिर ठेवायच्या म्हणजे बेकारी निर्माण होते. ही बेकारी सुसह्य करण्याचे कार्य अ. व. भत्ता करूं शकेल. ही बेकारी कांहीशी सुसह्य झाली तरी ती कमी करण्याचे उद्दिष्ट आपण डोळ्यासमोर ठेवले पाहिजे असे अनेकांना वाटत राहिल आणि ते इष्टच आहे. शिवाय तसे केल्यामुळे आर्थिक विकासाची गति वाढण्याचा देखील संभव आहे.

जर अधिकात अधिक रोजगारी निर्माण करायची असेल व त्याचवेळी जर मुद्रास्फिती टाळायची असेल तर ते करण्याचा एकच मार्ग आहे; तो म्हणजे अधिक आर्थिक नियंत्रणें बसवणे. जेव्हा पूर्ण रोजगारी असते तेव्हा मजूरी आणि किंमती

यांत इच्छेनुसार मोठ्या प्रमाणात फेरवदल करणे कामगारांना व उद्योगचालकांना शक्य असते. यावर उपाय एकच तो म्हणजे हे फेरवदल करण्यावर सरकारी निर्बंध घालणे.

अशी व्यवस्था करणे फारसे कठीण नाही. सांकेतिक शहाणपणाची कल्पना अशी आहे की, नियंत्रण करायचे म्हटले की, सर्व किंमतींचे व सर्व प्रकारच्या मजूरीचे नियंत्रण करायला हवे. नित्याच्या परिस्थितींत असें सर्वंगामी नियंत्रण करणे शक्य नसते असा निष्कर्ष मग काढला जातो आणि तो चुकीचा असतो असे म्हणता येणार नाही. परंतु अधिक मर्यादीत स्वरूपाच्या नियंत्रणाच्या द्वारे किमती व मजूरी यांचा परस्पर पाठलाग थांववणे शक्य असते आणि त्यामुळे किमती स्थिर ठेवून देखील पूर्ण रोजगारी निर्माण करणे शक्य होते. नियंत्रणे सर्व उद्योगांना लागूं करण्याची आवश्यकता असते. ज्या उद्योगांत कामगार संघटना नसतात व चालक वर्गाला स्वतः होऊन किमतींत फेरफार करणे शक्य नसते त्या उद्योगांचे नियंत्रण करण्याची आवश्यकता नसते. इतर कांही उद्योग असे असतात कीं, जे अर्थव्यवस्थेंत कोणतीहि प्रवृत्ती निर्माण करूं शकत नाहीत. ते परावलंबी व म्हणून दुय्यम महत्त्वाचे असतात. कांही उद्योग असे असतात कीं, त्यांच्या किमती आणि मजूरी परस्परावर परिणाम करून किमतींत सतत वाढ करतात, असे पूर्वानुभवावरून आढळून आलेले असते. अशा उद्योगांत जेव्हा मजूरींत वाढ केल्यामुळे किमती वर जाण्याची शक्यता असते, तेव्हा ती वाढ करण्यास सार्वजनिक न्यायालयाची संमती घेणे आवश्यक असावे असा निर्बंध घालता येईल. सार्वजनिक न्यायालयाऐवजी चालक, कामगार व जनता यांच्या प्रतिनिधींनीं ते कार्य केले तरी चालेल. जेव्हा वाढलेली मजूरी वाढलेल्या किमतींच्या द्वारे जनता देत असते; तेव्हा ती देण्याचा निर्णय घेण्यांत जनतेने भाग घ्यावा यांत अनुचित असे कांहीच नाही. ज्या पगार-वाढीमुळे किमतीवर परिणाम होणार नसेल त्या पगार वाढीसाठीं अशी संमती घ्यावी लागणार नाही. अशा प्रकारें किमतींत वाढ न करतां जी पगारवाढ करणे शक्य असते त्या पगारवाढीचे निमित्त पुढें करून नंतर किमतींत वाढ करता येणार नाही. निदान ती संयुक्तिक आहे, असे दाखवल्याखेरीज तरी ती करतां येणार नाही. ही किंवा अशाच प्रकारची अन्य व्यवस्था विकेंद्रित व अनौपचारिक स्वरूपांत करणे सहज शक्य आहे.

सांकेतिक शहाणपणाची एक शाखा असे मानते कीं, बेकारी, मुद्रास्फिती आणि नियंत्रणे या सर्व गोष्टी टाळणे शक्य आहे. फक्त अधिरेपणा केला नाही; श्रद्धा कायम ठेवली आणि प्रार्थना करीत राहिले म्हणजे इष्ट ते सगळे घडून येईल. ही भूमिका पुढे मांडणाऱ्यांना असे वाटते कीं, परस्पर-विसंगत गोष्टी एकत्र नांदवणे

अशक्य आहे असे जे लोक सांगत असतात, त्यांच्यामुळे साऱ्या अडचणी निर्माण होतात. सौम्य भाषेंत सांगायचे तर हे लोक कटकटी निर्माण करतात, आणि कडक भाषेंत सांगायचे तर ते समाजाचे अस्तित्व धोक्यांत आणत असतात. सध्यांचे आर्थिक दृष्टिकोन लक्षांत घेतले तर विसंगत गोष्टींमध्ये समाधानकारक संगति निर्माण करण्याचे कार्य मर्यादीत स्वरूपाची नियंत्रणे करूं शकतील. परंतु दुसरीहि एक गोष्ट करण्याची शक्यता आहे. ती म्हणजे रोजगारी व वैयक्तिक आर्थिक सुरक्षितता यांचे जे उत्पादनाशी नाते आहे ते तोडून टाकणे. किंवा या दोन उपायांचा संमिश्रपणे उपयोग करतां येईल. श्रीमंत व्यक्ति प्रमाणेच श्रीमंतदेशाला देखील निवड करण्याची संधी असते. परंतु निवडच टाळायची असे मात्र त्याला करतां येत नाही.

इथे जे उपाय सुचविण्यांत आले आहेत ते ज्यांना त्याज्य वाटत असतील त्यांनीं क्षणभर थांबून आपण निवड करण्याची जबाबदारी टाळण्याचा प्रयत्न करीत आहोत कीं, काय त्याचा एकदां विचार करावा.

प्रकरण बाविसावें

समतोलाची स्थापना

दरवर्षी वस्तू व सुविधा यांचा जो मोठा प्रवाह आपल्या संपत्तीतून निर्माण होतो त्या प्रवाहात समतोल कसा ठेवायचा त्याचा मार्ग आता आपल्याला शोधून काढायचा आहे. विशेषतः सार्वजनिक सुविधांचे आपल्याकडे दारिद्र्य आहे. व खाजगी वस्तूंचे वैपुल्य आहे. हें वैपुल्य आणि हें दारिद्र्य यातील विरोध नष्ट करण्यासाठीं सार्वजनिक सुविधात कशी वाढ करतां येईल इकडे आपल्याला विशेष लक्ष द्यायचे आहे. सध्या जो समतोलाचा अभाव आहे त्यामुळे पुष्कळसे सामाजिक अस्वास्थ निर्माण झालेले आहे. हे अस्वास्थ कमी व शक्य तर नष्ट करण्यासाठीं सार्वजनिक सुविधांत वाढ करणे आवश्यक आहे. शिवाय अशी वाढ करणे हे खाजगी उत्पादनाचा दीर्घकालीन विकास साधण्यासाठीं देखील आवश्यक आहे. आपल्या देशातील दारिद्र्य इतक्या प्रमाणात नष्ट झाले आहे की, येथें गरजा कृत्रिमपणे निर्माण कराव्या लागतात व ज्या गरजा अस्तित्वात आहेत त्यांची जोपासना करावी लागते. अशा परिस्थितीत वर निर्देशिलेला समतोल निर्माण करायला हवा हे अगदीं थोडेसे व्यवहारज्ञान अंगी असणाऱ्या माणसाला देखील पटेल. आज नव्या मोटारीसाठीं मागणी निर्माण करण्यासाठीं आपल्याला त्याच्या स्वरूपांत दरवर्षी मोठाले व अनावश्यक फरक करावे लागतात. आणि हे फरक महत्त्वाचे आहेत हे ग्राहकाना पटवण्यासाठीं आपल्याला त्याच्या मनावर जोरदार दडपण आणावे लागते. ही प्रक्रिया मंदावली किंवा बंद पडली तर तिचे परिणाम त्रासदायक ठरतील. एकीकडे अशी परिस्थिती असताना दुसरीकडे आपल्याला शाळा, रुग्णालयें, गलिच्छ वस्त्यांचें उच्चाटन, शहराचा पुनर्विकास, नगर सफाईच्या सुविधा, उद्यानें, क्रिडांगणे, पोलीस दलें आणि अशाच इतर शेकडों गोष्टींची आवश्यकता आहे. पुन्हां ह्या गोष्टींची आवश्यकता कोणालाहि पटवून देण्याची गरज नाहीं. त्या उपलब्ध नसण्याचे कारण एकच आहे. तें असें कीं, त्यांचा पुरवठा करण्यासाठीं लागणारा पैसा आपल्या जवळ नाहीं असें सर्व प्रकारचे व दर्जाचे सरकारी अधिकारी दररोज आपल्याला मोठ्या कुशलतेने पटवून देत असतात. यामुळे अशी परिस्थिती निर्माण झाली आहे कीं, खाजगी वस्तूंच्या क्षेत्रात उत्पादन व रोजगारी यात वाढ होत आहे आणि ती करण्यासाठीं आपल्याला लोकाच्या मनावर अधिकाधिक दडपण आणावे लागत आहे. परंतु

सार्वजनिक सुविधांत वाढ करण्याच्या संधीचा आपण जवळ जवळ काहींच उपयोग करीत नाहीं. माणसाच्या किमान महत्त्वाच्या गरजा भागवण्याच्या कार्यात आज आपली अर्थव्यवस्था गुंतलेली आहे. जर सर्व प्रकारच्या गरजा भागविण्याचे कार्य ती करील तर तिला पुष्कळच अधिक स्थैर्य प्राप्त होईल.

[२]

शाळा, रस्ते व अन्य सुविधा निर्माण करण्यासाठीं जर आपण अधिक खर्च करायचे ठरवले व त्यास तो भागवण्यासाठीं जर अधिक कर बसवले तर त्यामुळे हा प्रश्न सुटणार नाहीं. अशा प्रकारचे निर्णय रोज घेतले जात असतात. आणि समतोलाच्या अभावाची खरी कारणे ते दूर करीत नाहीत. ही कारणे अधिक मूलभूत स्वरूपाची आहेत. खाजगी व सार्वजनिक वस्तूंत जो सर्वांत महत्वाचा फरक आहे तो तांत्रिक स्वरूपाचा आहे. खाजगी वस्तू विशिष्ट व्यक्तींना विकणे शक्य असते. सार्वजनिक वस्तू तशा विकतां येत नाहीत. आपण वर पाहिलेच आहे [१] कीं, आर्थिक विकास होत गेला तसतसे ज्या वस्तू किंमत घेऊन विकणे शक्य होते त्यांचे उत्पादन खाजगी उत्पादकांच्या हातीं गेले. ज्या वस्तू अशा प्रकारे विकणे शक्य नव्हते त्या पुरवण्याचे कार्य सरकारच्या हाती गेले. मात्र अशा प्रकारच्या वस्तूंची गरज कमी तीव्र होती अशातला भाग नाहीं. रोटी आणि पोलाद याचे उत्पादन खाजगी क्षेत्राच्या हाती गेले. कारण विशिष्ट व्यक्ती या वस्तूंचे उत्पादन करून त्या अन्य व्यक्तींना विकू शकत होत्या. पोलीस दल, सफाईची व्यवस्था आणि गटाराची व्यवस्था या गोष्टी सरकारच्या हाती गेल्या कारण सामान्यतः त्यांची विक्री करणे शक्य नव्हते. त्याचप्रमाणे शिक्षण हे सार्वत्रिक व सक्तीचे करण्याचा निर्णय जेव्हा घेतला गेला तेव्हा ती विक्री करतां येईल अशी गोष्ट राहिली नाहीं. राष्ट्रें जेव्हा अस्तित्वांत आली तेव्हा राष्ट्रीय संरक्षण या गोष्टीची खरेदी विक्री करणे अशक्य झाले. सार्वजनिक क्षेत्र व खाजगी क्षेत्र यानां विभागणारी जी रेषा कोणत्याहि वेळी अस्तित्वांत असते तिच्या मागे अनेक गोष्टी असतात. परंपरा, तात्त्विक भूमिका, सामाजिक निकड इत्यादी अनेक गोष्टी ही रेषा निश्चित करण्याचे कार्य करीत असतात. परंतु विशिष्ट कार्यें सरकारच्या हातीं जाण्याचे सर्वात महत्वाचे कारण तांत्रिक स्वरूपाचे असते. तांत्रिकदृष्ट्या ती सरकारच्या हाती देण्यावाचून दुसरा मार्गच नसतो.

ज्या वस्तू व सुविधा किंमत घेऊन विकणे शक्य असते त्याना अर्थव्यवस्थेत मोक्याचे स्थान मिळते. त्यांची जी किंमत येते ती खर्च करून श्रमशक्ति, भांडवल

१ पृष्ठें १०४–१०७

आणि कच्चा माल या गोष्टी उत्पादनासाठीं मिळवणे शक्य होतें. उत्पादनाच्या प्रक्रियेचा तो अविभाज्य भाग असतो. समाजाने जर हस्तक्षेप केला नाहीं तर उत्पादनाची सर्वच साधनें खाजगी क्षेत्राच्या हाती जातील. तसे होऊं नये म्हणून जर काहीं इलाज केले तरच सार्वजनिक क्षेत्राला साधने मिळू शकतील. अँग्लो-सॅक्सन राष्ट्राचा घटनात्मक इतिहास पाहिला तर असे आढळून येते कीं, उत्पादनाची साधने खाजगी क्षेत्राच्या हातून सार्वजनिक क्षेत्राच्या हाती जाण्यासाठीं विधान-सभेची अनुमती लागत असे आणि राजाकडून सत्ता हिसकावून घेण्याकरता पार्लमेंटने म्हणजेच विधान सभेने या गोष्टीचा शस्त्रासारखा उपयोग केला. राजाला अखंडपणे मिळणारे उत्पन्न नव्हते किंवा निदान तसे फारसे उत्पन्न त्याला मिळत नसे. त्यामुळें सार्वजनिक कार्यांसाठीं कर बसवावे लागत व त्या प्रत्येकास पार्लमेटची अनुमती मिळवावी लागे. हळूहळू असा प्रघात पडला कीं, लोकांची गाऱ्हाणी दूर केल्याखेरीज राजाला कर बसवून पैसे उभारण्यास परवानगी द्यायची नाहीं. पैशाच्या थैलीवर असलेल्या या पार्लमेंटच्या सत्तेचा जनतेच्या स्वातंत्र्याचे रक्षण करण्यासाठीं अशा रीतीने उपयोग केला गेला. शिवाय या प्रथेपासून इतरहि अनेक फायदे झाले. जे समाज दरिद्री होते आणि ज्यातील कारभाराची व्यवस्था दोषपूर्ण होती त्या समाजात खाजगी वस्तूंचे उत्पादन जगण्यासाठीं आवश्यक होते आणि सुखासाठीं देखील आवश्यक होते. अन्न, वस्त्र आणि निवारा या गोष्टींची खाजगी रित्या खरेदी व विक्री करणे तांत्रिकदृष्ट्या शक्य असते. आणि कायदा व सुव्यवस्था यांचा जर अपवाद सोडला तर सार्वजनिक क्षेत्राच्या द्वारें ज्या सुविधा उपलब्ध होतात त्यांच्या पेक्षा या वस्तूंची गरज अधिक निकडीची असे. यामुळें या प्राथमिक शारीरिक गरजा भागवण्याऐवजी उघळ्या राजसत्तेच्या द्वारे भागविल्या जाणाऱ्या गरजासाठीं उत्पादनसाधनाचा उपयोग करायचा झाला तर तसे करणे आवश्यक आहे, असे आधी सिद्ध करावे लागत असे.

आतां सरकारला पुष्कळसे उत्पन्न नित्य मिळत असतें. विधानसभा आणि शासन यामध्ये सत्तेची योग्य प्रकारें विभागणी करण्याचे साधन या दृष्टीने थैलीवरील नियंत्रण हें अजूनहि महत्वाचें आहे. परंतु शासन व विधानसभा यांचे नातें आतां अधिकाधिक गुंतागुंतीचें झालें आहे. त्यामुळे सत्तेची योग्य प्रकारें विभागणी करण्यासाठीं अन्य साधने देखील उपलब्ध झाली आहेत. इंग्लंडमध्यें जेंव्हा स्टुअर्ट राजांची कारकीद होती तेंव्हा करांना अनुमती देण्याची सत्ता हें पार्लमेंटच्या अधिकारांचे मूळ होते. परंतु आतां खर्चाला अनुमती देण्याची सत्ता हे विधान सभेच्या अधिकाराचे मूळ झाले आहे. तरी देखील पुष्कळ बाबतींत परिस्थिती पहिल्या सारखीच आहे. पूर्वी भूक आणि थंडी या गोष्टीमुळे खाजगी वस्तूसाठीं विक्रीची

मागणी निर्माण होत असे. आणि आतां देखील त्या वस्तूसाठीं तितकीच निकडीची मागणी निर्माण व्हावी म्हणून आपण जाहिराती सारख्या कृत्रिम साधनांचा उपयोग करीत असतो. तसेंच सरकारचे उत्पन्न आजहि पुष्कळशा प्रमाणांत स्थिर आहे. समाजाचे एकंदर उत्पन्न वाढत असते पण तरी देखील करांपासून मिळणारे उत्पन्न पुष्कळसें स्थिर रहाते. त्यामुळे लोकसंख्येंत वाढ झाल्याकारणानें जर जुन्या सार्वजनिक सुविधांचा अधिक प्रमाणांत पुरवठा करण्याची आवश्यकता निर्माण झाली, किंवा नव्या सार्वजनिक गरजा निर्माण झाल्या तर त्यासाठीं जो खर्च करावा लागतो तो करण्यास पार्लमेंटची अनुमती मिळवावी लागते. पहिल्यानें एखाद्या सार्वजनिक सुविधेची गरज आहे असें सिद्ध करावें लागते आणि हें काम खर्चासाठीं जे पैशाची मागणी करतात त्यांना करावे लागतें. शाळा, रस्ते पोलीस दलें, सार्वजनिक घरबांधणी इत्यादी गोष्टींसाठीं किती प्रमाणांत पैसा खर्च करावा एवढाच निर्णय घेऊन सरकारचे चालत नाहीं. कारण असा निर्णय घेतला कीं, तो अंमलांत आणण्यासाठीं लागणारा पैसा आपोआप उभा होत नाहीं. सरकारच्या हातीं पैसा आपोआप जावा हें आपल्याला घोक्याचे वाटते. तसें झालें तर उधळपट्टी होईल अशी आपली भावना असते.

परंतु खाजगी व्यक्तीचे उत्पन्न वाढलें, म्हणजे मात्र तिच्या हाती आपोआप गरजा भागवण्याची अधिक साधने येतात. आपल्या वाढलेल्या उत्पन्नांतून जेव्हा एखादी व्यक्ति नवी मोटार विकत घेते तेव्हा त्या मोटारीची खरोखरच आवश्यकता आहे असे तिला सिद्ध करावें लागत नाहीं. मोटारीची खरोखर गरज आहे असें सिद्ध केल्याखेरीज जर मोटारीची खरेदी करण्यास बंदी केली तर मोटारींची खरेदी खूपच घटेल मोटारीची गरज आहे असें जरी सिद्ध करावें लागत नसले तरी शाळांची गरज आहे असे मात्र सिद्ध करावे लागते.

[३]

यावर एक उपाय आहे. तो असा कीं, जिच्या द्वारें वाढत्या उत्पन्नाचा विशिष्ट हिस्सा आपोआप सरकाच्या हातीं जाईल अशी करव्यवस्था निर्माण करणे. हे जे अधिक उत्पन्न हातीं येईल त्याची गरजांच्या निकडीनुसार विभागणी करणे हें सरकारचे कार्य राहिल. म्हणजेच खाजगी व्यक्ति व सरकार ही दोघेंही एकाच पातळीवर येतील. मग मोटारी व टेलिव्हिजन सेटस् यांची जशी परिस्थिती आहे तशीच शाळा व रस्ते यांची होईल. शाळा व रस्ते यांची गरज आहे असे दरवेळीं सिद्ध करीत रहावे लागणार नाहीं.

मध्यवर्ती सरकारची जी आवक आहे तिचा उपयोग जर सामाजिक समतोल निर्माण करण्यासाठीं झाला तर तें व्यावहारिकदृष्ट्या सोयीचे पडेल. मध्यवर्ती

सरकारच्या महसूलाचा जवळ जवळ चार पंचमांश भाग व्यक्ति व कॉर्पोरेशनस् यांवरील प्राप्तीकराच्या द्वारें उपलब्ध होतो. खाजगी उत्पन्न वाढले कीं, ह्या करापासून मिळणारे उत्पन्न त्याहून कांहींसे अधिक प्रमाणांत वाढते. याला कांहीं अपवाद नाहीत असें नाही. पण ते महत्वाचे नाहीत. दुर्दैवाची गोष्ट अशी कीं, प्राप्तीकरापासून हें जें उत्पन्न मिळतें त्याचा बराचसा भाग आज राष्ट्रीय संरक्षण व शस्त्रास्त्रांच्या क्षेत्रांतील चढाओढ यांच्यावर खर्च होतो. विसाव्या शतकाच्या पन्नाशीच्या मध्यकालांत मध्यवर्ती सरकारच्या खर्चापैकीं अर्धा भाग राष्ट्रीय संरक्षणावर खर्च होत होता. तसेंच राज्य सरकारें व स्थानिक सरकारें यांच्या एकंदर खर्चापेक्षा संरक्षणावरील खर्च अधिक होता. भविष्यकाळांत या रकमेचा बराचसा भाग जर सरकारच्या मुलकी क्षेत्रांतील कार्यासाठीं उपलब्ध झाला तर सामाजिक समतोल त्वरित प्रस्थापित करतां येईल. सध्यां हा समतोल राखण्याचे कार्य प्राप्तीकर चांगल्या प्रकारें करूं शकतील आणि तसे करतांना समतेच्या प्रश्नाबाबत सध्या जी तडजोड झालेली आहे तिला ते औपचारिक स्वरूपांत तरी धक्का लागू देणार नाहीत. इथे 'औपचारिक' हा शब्द अधोरेखीत करायला हवा. कारण सांकेतिक शहाणपणाच्या एका प्रभावी आणि बोलक्या शाखेचे मत असे आहे कीं, संरक्षणासाठीं जादा कर वसवलेले चालतात. परंतु मुलकी कार्यासाठीं जर ते बसवले तर तें अनैतिक असते. तो एक लुबाडणुकीचा प्रकार असतो.

कदाचित पुढें अशी परिस्थिती निर्माण होईल कीं, त्यावेळीं मध्यवर्ती सरकारचा महसूल व त्यांत होणारी नित्य वार्षिक वाढ यांचा उपयोग संरक्षणासाठीं केला जाणार नाहीं. या बाबतींत सांकेतिक भूमिका कांहींशीं वेगळी आहे. ती भूमिका अशी कीं, माणसाच्या परिस्थितींत इतर सर्व बाबतींत सुधारणा होणे शक्य आहे परंतु युद्ध झाल्याशिवाय शास्त्रास्त्रांच्या क्षेत्रातील चढाओढ थांबणे अशक्य आहे. या संदर्भात थंड व निष्ठूर वस्तुनिष्ठा असे सांगते कीं, आशेला कांही जागा नाहीं. प्रत्यक्षात मात्र परिस्थिती इतकी निराशाजनक नसण्याची शक्यता आहे.

परंतु दरम्यानच्या काळात सामाजिक समतोलाच्या प्रश्नाला आपण तोंड द्यायला हवे. हे कार्य जर मध्यवर्ती सरकारने करायचे असेल तर त्यासाठीं वैयक्तीक आणि कॉर्पोरेशनस्वरील प्राप्तीकरावर त्याला अवलंबून रहावे लागेल. इतरहि असे कांही कर आहेत कीं, जे या बाबतींत उपयोगी ठरूं शकतील. परंतु त्यांच्यावर अन्य घटक सरकाराचा अधिक हक्क आहे. नेहमीप्रमाणेच जे पर्याय उपलब्ध आहेत त्यातच या प्रश्नाचे उत्तर दडलेले आहे. जादा लष्करी खर्चामुळे इतर प्रकारच्या सरकारी खर्चात घट करावी लागते कीं काय हा प्रश्न येथे प्रस्तुत नाहीं. संरक्षणावर खर्च होणार हे आपण गृहीत धरले पाहिजे. आणि मग असा विचार केला पाहिजे

कीं, ज्यामुळे सामाजिक समतोल अधिक प्रमाणात निर्माण होतो अशा सार्वजनिक सुविधांची आपल्याला आवश्यकता आहे कीं, आधीच भरपूर प्रमाणांत उपलब्ध असलेल्या खाजगीवस्तूंच्या पुरवठ्यांत वाढ करण्याची आवश्यकता आहे? या प्रश्नाची अशा प्रकारें मांडणी केली कीं, मग आपल्याला एकच निष्कर्ष काढता येतो.[१]

परंतु सामाजिक समतोल प्रस्थापित करण्यासाठीं सार्वजनिक सुविधांत वाढ करणे आवश्यक आहे असें जरी मान्य केले तरी यासाठीं लागणारा पैसा कोठून आणायचा हा प्रश्न शिल्लक रहातोच. हा पैसा उभा करण्यासाठीं प्राप्तीकराचा उपयोग करणे आवश्यक ठरते. त्यामुळें समतेबद्दलचा वादविवाद पुन्हा सुरू होण्याची आणि त्या वादविवादांत सामाजिक समतोलाचा प्रश्न विसरला जाण्याची पुष्कळशी शक्यता आहे. या प्रश्नावरील शस्त्रसंधीचा मग भंग होईल आणि उदारमतवादी व परंपरानिष्ठ हे लढाईच्या मैदानांत उतरतील. मग सार्वजनिक सुविधांच्या बाबतीतलें आपलें दारिद्र्य दूर करण्याची आवश्यकता आहे व त्याचप्रमाणें लोकांचे दारिद्र्य दूर करण्यासाठीं सरकारी खर्चांत वाढ करण्याची देखील आवश्यकता आहे, या गोष्टीचा त्यांना विसर पडेल. शाळा, रूग्णालयें, उत्पादनात वाढ करणारें शास्त्रीय संशोधन इत्यादी गोष्टींचा विचार मग पुढें ढकलला जाईल. आणि श्रीमंतांजवळ फारच संपत्ती आहे, कीं काय या प्राचीन व कधींच सुटूं न शकणाऱ्या प्रश्नावरील वादविवाद चालूं राहिल.

यांतून एकच मार्ग आहे. तो म्हणजे सामाजिक समतोलाचा प्रश्न आर्थिक समतेच्या प्रश्नापासून वेगळा करणे. उदारमतवादीच ही गोष्ट करूं शकतील हें अधिक शक्य दिसतें. सामाजिक समतोलाचा प्रश्न समतेच्या प्रश्नापेक्षां पुष्कळच अधिक महत्वाचा आहे. विषमतेच्या प्रश्नाबाबत आज एक अलिखित तहनामा अस्तित्वांत आहे हीच गोष्ट असे सिद्ध करते कीं, तो प्रश्न सामाजिकदृष्ट्या तितकासा निकडीचा नाहीं. ज्यांचे उत्पन्न सर्वांत अधिक आहे त्यांच्यावरील प्राप्तीकर

१ या विवेचनात असे गृहीत धरलेले आहे कीं, रोजगारीची पातळी समाधानकारक आहे. मागणी जर अपुरी असेल तर तींत वाढ करण्यासाठीं कर कमी करता येतील आणि खर्चात वाढ करता येईल. ज्यावेळी सामाजिक समतोलाचा अभाव विशेष तीव्रतेने जाणवत असेल त्यावेळी जर मागणी अपुरी असली तर त्यावर उपाय म्हणून आवश्यक असलेल्या सार्वजनिक सुविधांवर अधिक खर्च करणे योग्य ठरेल. करात कपात केली तर त्यामुळे लोकांच्या खर्चात व मागणीत वाढ होईल हे खरें. परंतु तो खर्च तितक्याशा आवश्यक नसलेल्या खाजगी वस्तूवर केला जाईल.

कमी करावा असे जेव्हा परंपरानिष्ठ मंडळी पूर्वी सुचवत असत तेव्हा उदारमतवादी राजकीय कार्यकर्ते अशी उलट सूचना करीत कीं, सर्वांत ज्यांचे उत्पन्न कमी आहे त्यांनाच प्राप्तीकरांत सूट द्यावी. शिवाय उदारमतवादी राजकीय कार्यकर्त्यांनीं असा देखील आग्रह त्यावेळीं धरला कीं, करांत जितकी वाढ करणे आवश्यक असेल तिचा अधिक हिस्सा जास्त उत्पन्न मिळवणाऱ्या व्यक्तींकडून वसूल केला जावा. याचा परिणाम असा झाला कीं, कर कमी करण्याच्या बाबतींत उदारमतवादी व परंपरानिष्ठ यांची युति झाली. आणि कर कमी केल्यामुळें सामाजिक समतोलावर जे अनेक परिणाम होतात त्याची दोघांनीहि पर्वा केली नाही. त्याचप्रमाणें करांचा उपयोग अधिक समता निर्माण करण्याचें साधन म्हणून करण्यांत यावा असा आग्रह उदारमतवाद्यांनीं धरल्यामुळें करांत वाढ करणेच अशक्य किंवा निदान अवघड झाले आहे. दरम्यानच्या काळांत परिस्थिती बदलली आहे. ज्यांच्या विषयीं त्यांना सहानुभूती वाटते ते लोक आतां करांच्या ओझ्याखालीं दडपलेल्या बंगाली प्रजेसारखे किंवा पहिल्या साम्राज्यांतील प्रजेसारखे गरीब राहिलेले नाहींत. ऐतिहासिक दृष्टीने पाहिलें तर ते आतां सुखवस्तु नागरिक झालेले आहेत. शिवाय शिक्षण, आरोग्य घरबांधणी आणि अशाच अन्य सुविधांत सुधारणा केली व अशा प्रकारें सामाजिक समतोल अधिक प्रमाणांत निर्माण केला तर या लोकांचा पहिल्याने फायदा होईल. तसेंच माणसांत जर अधिक भांडवल गुंतवले तर त्यामुळें दीर्घकालीन फायदा देखील त्यांचाच होईल.

ज्या करकपातीमुळें सामाजिक समतोलांत बिघाड होतो. तिला सुबुद्ध उदारमतवाद्याने या पुढें विरोध केला पाहिजे. सकृतदर्शनी ती गरीबांचा फायदा करून देणारी असली तरी तिला विरोध केला पाहिजे. आणि करांतील ज्या वाढीमुळें संपत्तीच्या विभागणींत फरक पडत नाही तिचा त्याने त्याच कारणासाठीं स्वीकार केला पाहिजे. अधिक समता निर्माण करण्याची त्याची जी जुनी प्रतिज्ञा आहे ती पुरी करण्याचा दुसरा एक चांगला मार्ग आहे. तो म्हणजे सध्यांच्या करव्यवस्थेत ज्या पळवाटा आहेत त्या बंद करण्यासाठीं स्वतंत्रपणें प्रयत्न करणें. भांडवली नफ्यावर सध्यां कमी कर बसवण्यांत येतो. तसेच खाणींच्या व विशेषतः तेलाच्या खाणींच्या उद्योगांना घसाऱ्याची सूट अधिक प्रमाणांत देण्यांत येते. करव्यवस्थेतल्या या पळवाटा आहेत आणि परंपरागत उदारमतवादी भूमिकेला या पळवाटा मुळीच मान्य नाहीत. कारण या पळवाटा म्हणजे सरकारने विषमतेला दिलेली अधिकृत मान्यता आहे. समतेसाठीं ज्याला युद्ध करायचे आहे त्याला या क्षेत्रांत पुष्कळच काम करतां येण्यासारखें आहे.

[४]

अठराव्या प्रकरणांत आपण असें सुचविलें आहे कीं, मध्यवर्ती सरकारला सामाजिक समतोल निर्माण करण्यासाठीं पुष्कळच करतां येण्याजोगें आहे. असें असलें तरी राज्यसरकारें व स्थानिक सरकारें ज्या सुविधांचा पुरवठा करतात त्यांच्या संदर्भात सामाजिक समतोलाचा अभाव विशेष तीव्रतेने जाणवतो. या गोष्टीवर कोणता उपाय योजायला हवा हें अगदीं स्पष्ट आहे. तो उपाय म्हणजे विक्रीकराचा अधिक मोठ्या प्रमाणावर उपयोग करणें. हा उपाय पारंपरिक उदारमतवादी भूमिकेशी जुळणारा नाहीं हें खरें. परंतु तरी देखील तो आपण योजायला हवा.

जोपर्यन्त सामाजिक समतोल पुरेशा प्रमाणांत प्रस्थापित झालेला नाहीं तोपर्यन्त अधिक कर बसविण्यास आपण पाठिंबा दिला पाहिजे. हे कर सर्वग्राहकोपयोगी वस्तूंवर व सुविधांवर बसवायला हवे. संपन्न समाजांत आवश्यक वस्तू व चैनीच्या वस्तू यांत भेद करणे उपयुक्त नाहीं. अन्न आणि वस्त्र यांच्या शिवाय आजहि माणसाचे चालू शकत नाहीं हें खरें. परंतु पुष्कळदां याच गोष्टींवर वारे माप खर्च केला जातो.

विक्रीकराचा सामाजिक समतोलाशी सरळ सरळ संबंध आहे. आपल्या समाजांत खाजगी क्षेत्राने उत्पादन केलेल्या वस्तूंचे वैपुल्य आहे आणि सार्वजनिक सुविधांचा तुटवडा आहे, यावर साधा उपाय असा कीं, खाजगी वस्तूंवर कर बसवायचे आणि त्यांचा उपयोग सार्वजनिक सुविधांचा पुरवठा करण्यासाठीं करायचा खाजगी वस्तू अधिक महाग करायच्या व तसें करून सार्वजनिक वस्तूंचे वैपुल्य निर्माण करायचे. शाळांवर अधिक खर्च करतां यावा म्हणून चित्रपट, टेलिविजन सेटस् आणि सिगरेटी महाग करण्यांत आल्या आहेत. त्याप्रमाणें शहरें अधिक स्वच्छ रहावीत म्हणून आपण साबण, कपडे धुवायच्या पावडरी आणि व्हॅक्यूम क्लीनर्स यांना अधिक किंमत देतो. शहरें स्वच्छ असली कीं या वस्तू वापरण्याची आवश्यकता कमी होते. मोटारी चालविण्यासाठीं रस्ते व हमरस्ते हवेत म्हणून मोटारी व पेट्रोल याना आपण अधिक किंमत देतो. अन्न हे विपूल आणि स्वस्त असल्यामुळे आपण त्यावर कर बसवतो व त्या पैशाचा उपयोग औषधोपचाराची अधिक चांगली व्यवस्था निर्माण करण्यासाठीं व आरोग्यांत सुधारणा करण्यासाठीं करतो. अशा प्रकारचा उपाय योजण्यांत आणखी एक फायदा आहे. घटक राज्ये आणि शहरें देखील विक्रीकराचा उपयोग परिणामकारकपणे करूं शकतात. आणि ही सरकारें ज्या सुविधा पुरवितात त्यांच्या संदर्भातच सामाजिक समतोलाचा अभाव विशेष तीव्रतेने जाणवतो. उत्पादनात जशी वाढ होते तसे विक्रीकरापासून मिळणारे उत्पन्न देखील वाढते. खाजगी वस्तूंसाठीं जस-

जशी अधिकाधिक मागणी निर्माण केली जाते तसतशी महसूलात देखील वाढ होते व त्याचा उपयोग सार्वजनिक सुविधांसाठीं करता येतो. विक्रीकराला मुख्य पर्याय म्हणजे मालमत्तेवरी सार्वत्रिक कर. परंतु या करापासून मिळणारें उत्पन्न स्थिर असते. शिवाय सार्वजनिक सुविधांत वाढ करायची असेल तर या कराचे दर देखील वाढवावे लागतात. उत्पादन व उत्पन्न यांत वाढ होत असली व त्यामुळे जरी अधिक सुविधांची गरज निर्माण झाली असली तरी देखिल या कराचे दर वाढवावे लागतात. त्यामुळें अधिक सुविधांची व म्हणून या करात वाढ करण्याची गरज आहे असे संबंधित सरकारला सिद्ध करावें लागते. आणि तसे करणे अवघड असते. एकंदरीत हा कर सामाजिक समतोल निर्माण करण्याच्या दृष्टीने फारसा उपयुक्त नाहीं.

चालू शतकात घटक राज्यें व शहरे विक्रीकराचा अधिकाधिक प्रमाणात उपयोग करीत आहेत. सामान्यतः उदारमतवाद्यानी या गोष्टीला विरोध केला आहे. किमान पक्षी या गोष्टीकडे त्यानी अत्यंत साशंकपणे पाहिले आहे. यामुळे उदारमतवादाचा पुरस्कर्ता हा सामाजिक समतोलाचा विरोधक ठरला आहे. या विरोधामागील कारणांचा जर अभ्यास केला तर असे आढळून येते कीं, बदलत्या परिस्थितींत लोकानी आपले विचार बदलले नाहीत तर ज्या गोष्टी त्या लोकाना हव्या असतात त्याच गोष्टींचे ते विरोधक होतात. सर्व बाजूंनी विचार केला तर असे आढळून येते कीं, शाळा, समाजजीवन, शहरातील वाहतुकीची व्यवस्था आणि फार काय आर्थिक स्थैय देखील या गोष्टींत सुधारणा करण्यास त्याने म्हणजे उदारमतवाद्याने विरोधच केला आहे.

गरीब देश व संपन्न देश यावर होणारा विक्रीकराचा परिणाम पुष्कळच भिन्न स्वरूपाचा असतो. आणि हा फरक केवळ अंशात्मक नसतो तर गुणात्मक असतो. फ्रान्समधील क्रांतीपूर्वक राजवटीत मिठावर जो कर होता तो अत्यंत जुलमी होता असे सर्वत्र मानले जाते. भारतांत आज देखील हा कर जुलमी मानला जातो. युनायटेड स्टेस्टस्मध्ये मिठावर कर बसवला व त्यामुळे मिठाची किंमत जरी दुप्पट किंवा तिप्पट झाली तरी त्यामुळे कोणालाच जाणवण्यासारखा त्रास होणार नाहीं. क्रांतीपूर्व फ्रान्समध्ये मिठाची जितकी आवश्यकता होती तितकी आज आपल्या देशात नाहीं अशातला भाग नाहीं. परंतु त्या काळी मीठ खरेदी करणे ही एक मोठी खर्चाची बाब होती. आणि आज तो एक क्षुल्लक खर्च झाला आहे. पूर्वी मिठाची किंमत वाढली कीं, इतर खर्चासाठीं थोडा पैसा शिल्लक रहात असे आणि तें तीव्रपणे जाणवत असे. आतां मिठाची किंमत वाढली तर तिचा जाणवण्या जोगता कोणताच परिणाम होत नाहीं.

जी गोष्ट मिठाची तीच गोष्ट इतर वस्तूंची. एखादें कुटुंब जर केवळ रोटी व कपडे विकत घेऊं शकत असेल तर त्या दोन वस्तूंवर कर बसवल्यामुळे मुलाना पुरेसे अन्न व वस्त्र मिळणार नाहीं. परंतु जे कुटुंब अनेक गोष्टी विकत घेऊं शकते त्या कुटुंबाला करामुळे जर आवश्यक वस्तूंवर अधिक खर्च करावा लागला तर त्याची भरपाई करण्यासाठीं अनावश्यक वस्तूंची खरेदी थोड्या प्रमाणात कमी केली जाते. पेट्रोल, शर्यती, उत्तम अन्न किंवा विकत घेतलेल्या वस्तूंसाठी भरायचे हप्ते यावरील खर्च कमी केला जातो.

अशा रीतीने विक्रीकरांतील दोषाचे स्वरूप संपन्नतेमुळे बदलले जाते. कोणी असे म्हणेल कीं, अजूनहि कांही लोक अत्यंत गरीब आहेत आणि अशा व्यक्तींच्या तुटपुंज्या सेवनावर विक्रीकराचा फारच मोठा बोजा पडतो. प्राप्तीकराच्या बाबतीत तसे होत नाहीं. परंतु प्राप्तीकर जर बसवता येत नसेल किंवा त्याचा जर अन्य गोष्टीसाठीं उपयोग केला जात असेल तर एकच पर्याय शिल्लक रहातो. तो म्हणजे सामाजिक समतोलाला तिलांजली देणे. गरीब समाज गरीब लोकांची परिस्थिती लक्षांत घेऊन आपली धोरणे आंखतो. परंतु संपन्न समाजाने असा विचार करायला हवा कीं, गरीबीच नष्ट करता येणार नाहीं का ? दारिद्र्य जर नष्ट करायचे असेल तर त्यासाठीं पहिल्याने सामाजिक समतोल अधिक प्रमाणात निर्माण करणे आवश्यक आहे, हे आपण पुढील प्रकरणात पहाणार आहोत. आज ज्या करांपासून गरीबांचे रक्षण करण्यासाठीं आधुनिक उदारमतवादी पुढे सरसावतो त्याच करामुळे पुढील पिढीत दारिद्र्य नष्ट होईल. कारण त्या कराचा उपयोग गरीबांच्या मुलांवर अधिक भांडवली खर्च करण्यासाठीं केला जाईल.

[५]

विक्रीकराचा अधिक प्रमाणात उपयोग करण्यावर आणखी एक आक्षेप आहे, तो असा कीं, व्यक्तीवरील आणि कॉर्पोरेशनस्वरील प्राप्तीकरामुळे आर्थिक स्थैर्यास जशी बळकटी येते तशी विक्रीकरामुळे येत नाहीं. हे प्राप्तीकर आर्थिक स्थैर्यास दोन प्रकारें उपकारक ठरतात. ते श्रीमंताना आणि कॉर्पोरेशन्सना द्यावे लागत असल्यामुळे ज्या उत्पन्नाची बचत केली जाण्याची शक्यता असते त्याच्यावर त्याचा बोजा अधिक प्रमाणात पडतो. उलट ग्राहकोपयोगी वस्तूंवर जे उत्पन्न खर्च केले जाणार असेल, त्यावर त्याचा बोजा तितकासा पडत नाहीं. उत्पन्न आणि खर्च यांत तफावत होण्यास जर कोणती गोष्ट विशेष प्रमाणात कारणीभूत होत असेल तर ती म्हणजे बचत व भांडवलाचा निवेश यांतील नाते. जे उत्पन्न खर्च होण्याची तितकीशी खात्री नसते ते उत्पन्न प्राप्तीकर शोषून घेतो व ते खर्च केले जाईल

अशी व्यवस्था करतो. शिवाय अर्थव्यवस्थेंत आपोआप स्थैर्य निर्माण करण्याचे कार्य देखील प्रासीकर व विशेषत: व्यक्तीवरील प्रासीकर करीत असतो. व्यक्तीवरील प्रासीकर चढत्या दराने वसूल केला जातो त्यामुळें व्यक्तीच्या उत्पन्नात घट झाली कीं, या कराचा बोजा देखील आपोआप कमी होतो. त्यामुळे अर्थव्यवस्थेचे नियमन करण्याचे प्रमुख साधन म्हणून त्याच्याकडे बघितले जाते आणि तसे करणे सयुक्तिकच आहे.

परंतु प्रस्तुत पुस्तकातील युक्तीवादाचा एक महत्त्वाचा भाग असा आहे कीं, उत्पादनात वाढ करणे व ते स्थिर ठेवणे या गोष्टी इतकीच अन्य उद्दिष्टें देखील महत्त्वाची आहेत. सामाजिक समतोल निर्माण करणें हें यापैकी एक उद्दिष्ट आणि ते साध्य करण्यास विक्रीकराची मदत होते. शिवाय गेल्या प्रकरणात ज्या उपाययोजनाचा आपण विचार केला त्याचे प्रमुख उद्दिष्ट असे होते कीं, व्यक्तीच्या आर्थिक सुरक्षिततेला बाधा न आणता आपण आपल्या कमाल उत्पादन करीत रहाण्याच्या जबाबदारीतून मुक्त होणे.

परंतु सामाजिक समतोलामुळे देखील उत्पादनाच्या स्थैर्याला एका वेगळ्या प्रकारे मदत होते. खूप खर्च करून ज्या कृत्रिमपणे निर्माण केल्या जातात अशा खाजगी गरजा कांहीशा अस्थिर स्वरूपाच्या असतात. उलट अर्थव्यवस्थेचे सार्वजनिक क्षेत्र ज्या गरजा भागवते त्या अधिक स्थिर स्वरूपाच्या असतात. या दुसऱ्या प्रकारच्या गरजा भागवण्यावर जर भर दिला तर त्यामुळे आर्थिक स्थैर्य निर्माण होईल व अर्थव्यवस्थेचा सुरळीतपणे विकास होईल हे आपण मागेच पाहिले आहे. मग माणसाच्या सर्व गरजावर उत्पादन आधारले जाईल, केवळ कांही गरजावर नव्हे. त्यामुळे उत्पादनाला अधिक स्थैर्य येईल.

अखेर, सामाजिक समतोल अधिक चागल्या प्रकारें निर्माण झाला कीं, वस्तूरूप भांडवलात जितका निवेश होतो तितकाच निवेश मनुष्यरूपी उत्पादन साधनात देखील केला जाईल. असे करण्यावर तांत्रिक प्रगति अवलंबून असते हे आपण पाहिलेच आहे. त्यामुळे माणसांवर केलेला भांडवलाचा निवेश ही आर्थिक विकासाला सर्वांत उपकारक अशी गोष्ट आहे. आर्थिक धोरणात अशा प्रकारचे अनेक विरोधाभास असतात.

विक्रीकराचा पुष्कळच अधिक प्रमाणात उपयोग करावा, असे येथे सुचविलेले आहे. परंतु त्याचा अर्थ असा नव्हे कीं, प्रासीकराची जागा विक्रीकराने घ्यावी. असे व्हावे हे परंपरानिष्ठाचे एक सुखस्वप्न आहे. इथल्या युक्तिवादाचा हेतू इतकाच आहे कीं, प्रासीकर व समानता याचे जे नाते आहे त्यामुळे निर्माण झालेली कोंडी फोडणे आणि उत्पादनसाधनाचा ओघ अधिक प्रमाणात सार्वजनिक क्षेत्राकडे वळवणे. परंपरानिष्ठ काय किंवा उदारमतवादी काय, या दोघांच्याहि सांकेतिक शहाणपणाशी हा हेतू सुसंगत नाहीं.

ग्रंथालय एवं संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
क्रमांक ७५५७९ दि: .....निवंद्रा
२०१९ ने. दि: 29/3/19

हा युक्तीवाद स्वीकारण्याच्या बाबतीत अधिक खळखळ जर कोणी करतील तर ते उदारमतवादीच. समता निर्माण करणे हे त्यांचे पूर्वीपासूनचे उद्दिष्ट आहे. शिवाय केन्सची उपपत्ती ही उदारमतवाद्यांच्या सांकेतिक शहाणपणाच्या केंद्रस्थानीं आहे. या उपपत्तीत प्राप्तीकराला जोरदार पाठिंबा देण्यात आला आहे. केन्सच्या उपपत्तीत अभिप्रेत होती ती उत्पादनातील वाढ झाली आहे. आणि त्यामुळे आपण अशा एका अवस्थेला येऊन पोहोंचलो आहोत कीं, उत्पादनाच्या पातळीपेक्षा त्या उत्पादनाचे घटक कोणते या गोष्टीला आज महत्त्व प्राप्त झाले आहे. असे होईल याची केन्सला कल्पना नव्हती. आज जर तो जिवन्त असता तर उत्पादन-वाढ हे एकमेव उद्दिष्ट आहे असे मानून धोरणे आखण्याच्या आपल्या अनुयायांच्या प्रवृत्तीमुळे तो चिन्ताग्रस्त झाला असता. कधी एक गोष्ट महत्त्वाची असते तर कधी दुसरी हे त्याला समजूं शकत होते. परंतु आज मात्र त्याचे अनुयायी किंवा त्यांतले कांही, समग्रमागणी आणि उत्पादन याच्यावर भर देणाऱ्या त्याच्या उपपत्तीला चिकटून राहिले आहेत. आणि केन्सला स्वतःलाच जे विचार कदाचित् पटले असते त्यापासून त्याच्या उपपत्तीचे संरक्षण करण्याचा प्रयत्न हे त्याचे अनुयायी करीत आहेत. ज्याच्या विचाराचा सांकेतिक शहाणपणात समावेश केला जातो, त्याच्या नशीबात असेच लिहिलेले असते.

[६]

मागणी पुरेशी असली कीं, तिच्यानुसार वस्तूंचे उत्पादन होणार याची आधुनिक अर्थव्यवस्थेत खात्री असते. एक काळ असा होता कीं, अर्थव्यवस्था ही वस्तूंचे अगदीच अपुरे उत्पादन करते असे माणसाना वाटत असे. या गोष्टीचा उल्लेख मागिल प्रकरणात आलेलाच आहे. आणि उत्पादनाचा प्रश्न सुटल्यानंतर देखील लोक अर्थव्यवस्थेविषयीच्या त्याच जुन्या कल्पनेला कसे चिकटून राहिले आहेत ते देखील आपण पाहिले आहे. अजूनहि कांही लोक असा युक्तिवाद करतील कीं, उत्पादनसाधनाचा ओघ सार्वजनिक क्षेत्राकडे अधिक प्रमाणात वळला तर त्यामुळे खाजगी उत्पादनाला धोका निर्माण होईल ही भूमिका पूर्णपणे निराधार आहे. आणि आपण असे पाहिले आहे कीं, खरा धोका अगदी वेगळ्या स्वरूपाचा आहे. खाजगी वस्तूंवर अधिक भर देण्यासाठीं ज्या साधनाचा आपण उपयोग करतो त्यामुळे मागणीच्या स्थैर्याला धोका निर्माण झाला आहे आणि सामाजिक समतोलाच्या अभावामुळे दीर्घकालीन आर्थिक विकासाच्या मार्गात अडचणी निर्माण होतात. असे असले तरी वरील भीति लोक व्यक्त करीत रहाणारच.

उत्पादन साधनांचा प्रवाह सार्वजनिक क्षेत्राकडे वळवण्याचे साधन या नात्याने विक्रीकरांत आणखी एक गुण आहे. अगदीं पक्क्या परंपरा निष्ठांनीं या करांचा पुरस्कार गेलीं अनेक वर्षे केलेला आहे. ह्या कराचे गुणगान करणारी भाषणे नॅशनल

ॲसोशिएशन ऑफ मॅन्युफॅक्चरर्स या सारख्या प्रतिष्ठीत संस्थेपुढें अनेकदां करण्यांत आली आहेत व ती ऐकून टाळ्यांचा गजर करण्यांत आला आहे. या करामुळे प्रोत्साहने कमकुवत होत नाहीत किंवा उत्पादनावर अनिष्ट परिणाम होत नाहीं, हें स्पष्ट करण्यांत आलें आहे. इतर करांना पर्याय या नात्याने विक्रीकराचे हें गुणगान करण्यांत आले आहे हें खरें. परंतु उत्पादक म्हणून ज्यांना प्रतिष्ठा आहे त्यांनी हें गुणगान केलें आहे. राजकीय दृष्टचां ही गोष्ट महत्त्वाची आहे.

अखेर आणखी एका गोष्टीचा निर्देश करायला हवा खाजगी व सार्वजनिक गरजा भागविण्याच्या बाबतींत समतोल निर्माण झाला आहे कीं नाहीं हे ठरवण्याची कसोटी कोणती, असा प्रश्न उपस्थित करण्यांत येईल. त्याला उत्तर असें कीं, अशी कोणतीहि कसोटी लावतां येणार नाहीं. कारण तशी कसोटी मुळी अस्तित्वांतच नाहीं. सार्वजनिक गरजा भागवण्यासाठीं वापरल्या जाणाऱ्या साधनांत वाढ केल्यामुळे समाजाला मिळणारें सीमागत समाधान आणि खाजगी क्षेत्रांतील साधनांत वाढ केल्यामुळे मिळणारे सीमागत समाधान हीं सारखीं असली कीं, समतोल निर्माण झाला असें मानावें, असा या बाबतींला पारंपारीक दृष्टीकोन आहे. परंतु या समाधानांची तुलना करणे शक्य नसते. त्याचे एक कारण असे कीं, समाधाने कांहीं अंशी वेगवेगळचा व्यक्तींना मिळत असतात. दुसरें असे कीं, कृत्रिमपणे निर्माण केलेल्या गरजा व स्वाभाविक गरजा ह्यांच्या समाधानांची तुलना करणे शक्य नसतें. आणि या संदर्भात तर तशी तुलना करावी लागते.

परंतु हा समतोल अगदीं काटेकोरपणें प्रस्थापित करणें हे फारसे महत्त्वाचे नसते. संपन्न समाजांत या बाबतींत चुक झाली तरी ते खपून जाऊ शकते. सध्यां समतोलाचा अभाव आहे हें स्पष्ट आहे. तसेच सार्वजनिक वस्तूंपेक्षां खाजगी वस्तूंस अधिक महत्त्व प्राप्त होण्यास कोणत्या शक्तीं व कल्पना कारणीभूत झाल्या आहेत तें देखील स्पष्ट आहे. यांमुळे परिस्थितींत सुधारणा करण्यासाठी आपण काय करायला हवें त्याबाबतींतहि दुमत होण्याचे कारण नाहीं. शिवाय खाजगी वस्तूंना अधिक महत्व प्राप्त करून देणाऱ्या शक्ती किती प्रभावी आहेत हें लक्षांत घेतले कीं, समतोल प्रस्थापित करण्यासाठी आपल्याला बराच पल्ला गांठावा लागणार आहे ही गोष्ट स्पष्ट होते. तो पल्ला आपण गांठला म्हणजे मग एका बाजूला खाजगी सेवनाचे वैपुल्य व दुसऱ्या बाजूला शाळांचे दारिद्र्य, शहरांतील दाटीवाटी व कुरूपपणा, वाहतुकीच्या व्यवस्थेतील दोष व समाजांतील अस्वास्थ असें दृश्य आपल्या देशांत दिसणार नाहीं. परंतु समतोल केव्हा निर्माण होतो याची काटेकोरपणे व्याख्या करणे अवश्य आहे. एखाद्या विशाल विचाराची व्याख्या करता आली नाहीं की तो विचारच चुकीचा आहे असें मानणाऱ्या लोकांनाच या गोष्टीपासून समाधान होते.

प्रकरण तेविसावें

दारिद्र्याचें समाजजीवनांतील नवें स्थान

चालूं शतकाच्या सुरवातीला आलफ्रेड् मार्शलने असें विधान केले होते कीं, दारिद्र्याच्या कारणांचा अभ्यास हा बहुसंख्य माणसांच्या विपन्नावस्थेच्या कारणांचा अभ्यास आहे. हें विधान त्याने समकालीन इंग्लंड व जगाचे अन्य भाग ह्यांच्या संदर्भात केले होते. त्याने तेव्हा असे म्हटलें कीं, शहरांतील व ग्रामीण भागांतील असंख्य लोकांना पुरेसे अन्न, वस्त्र व निवारा मिळत नाहीं. त्यांना 'आवाक्याबाहेर काम करावें लागते आणि पुरेसे शिक्षण मिळत नाहीं. ती माणसें दमली भागलेली व चिंतेने ग्रासलेली असतात. त्यांना फुरसत व निवांतपणा कधींच मिळत नाहीं.' अर्थशास्त्राच्या अभ्यासाचे 'प्रमुख व सर्वोच्च आकर्षण', हें कीं, त्याच्यायोगें या माणसांचे दारिद्र्य दूर करण्याची आपल्याला संधी मिळते.

वरील स्वरूपाचे विधान कोणीहि समकालीन अर्थशास्त्रज्ञ आज युनायटेड स्टेट्स्च्या बाबतींत करणार नाहीं. अजूनहि थोडे दारिद्र्य अस्तित्वांत आहे या गोष्टीचा प्रासंगिक उल्लेख सांकेतिक आर्थिक विवेचनांत केला जाईल. 'आपल्या देशांत अजूनहि पुष्कळ गरीब लोक आहेत हे आपण विसरता कामा नये,' अशा प्रकारची विधाने केली कीं, सांकेतिक आर्थिक उद्दिष्टें आणि विशेषतः आर्थिक कार्यक्षमतेचें उद्दिष्ट अजूनहि महत्वाचे आहे–याबद्दल मनांत शंका रहात नाहीं. कांहीं लोकांच्या गरजा कृत्रिमपणे निर्माण कराव्या लागतात हें खरें. परंतु इतरांच्या अनेक स्वाभाविक गरजा अजूनहि भागवल्या जात नाहीत. म्हणून या लोकांना अधिकांत अधिक वस्तूं कमीतकमी खर्चात पुरवण्याची आवश्यकता आहे इकडे आपल्याला दुर्लक्ष करतां येणार नाहीं. जे साधन आहेत त्यांच्या दृष्टीने विक्रीकर कदाचित् इष्ट असेल. परंतु अजूनहि गरीबांवर त्याचा बराच बोजा पडतो. अशा रीतीने सांकेतिक शहाणपणाचा आधार म्हणून दारिद्र्याला आर्थिक विवेचनांत अजूनहि स्थान आहे. परंतु ज्या जगांत, औद्योगिक क्षेत्रात आठवड्याला ८० डॉलर्स मजूरी मिळते व सर्वसाधारण कुटुंबाला दर वर्षी ३९६० डॉलर्स उत्पन्न म्हणून मिळतात त्या जगांत बहुसंख्यलोक दारिद्र्याने ग्रासलेले आहेत असे म्हणतां येणार नाहीं. या जगाबद्दल बोलतांना दारिद्र्याचा उल्लेख करणे हा पश्चात बुद्धीचा एक प्रकार आहे.

पन्नास वर्षांपूर्वी निदान अकुशल कामगारांना तरी मार्शलने म्हटल्या प्रमाणें दारिद्र्यांत रहावें लागत असे. परंतु उत्पादनांत जेंव्हा वाढ झाली तेव्हा हें दारिद्र्य पुष्कळसे नष्ट झाले. ह्या उत्पादनाची विभागणी विषम होती हे खरें. तरी देखील त्याचा पुष्कळसा भाग श्रमिकांच्या हाती गेला. त्यामुळे दारिद्र्य हा बहुसंख्य लोकांचा

१ प्रिन्सिपल्स ऑफ इकोनॉमिक्स् (आठवी आवृत्ति) पृष्ठें २–४.

प्रश्न न रहाता, अल्पसंख्य लोकांचा प्रश्न झाला आहे. ती आतां सामान्य स्थिती राहिलेली नाहीं तर विशिष्ट गटांची समस्या झाली आहे. यामुळेंच दारिद्र्याच्या प्रश्नाला एक वैशिष्ट्यपूर्ण व आधुनिक स्वरूप प्राप्त झाले आहे.

[२]

कारण दारिद्र्य अजूनहि अस्तित्वांत आहे. या दारिद्र्याची निश्चित व्याख्या करता येणार नाहीं. आणि तशी आवश्यकता देखील नाहीं. उगीचच बौद्धीक अडथळे निर्माण करण्यांत ज्यांना आनंद वाटतो त्यांनाच अशा व्याख्येची आवश्यकता वाटेल. कांहीं अंशी दारिद्र्य ही शरीराला जाणवणारी गोष्ट आहे. जे दरिद्री असतात त्यांना पुरेसे अन्न आणि वस्त्र मिळत नाहीं. ते घाणेरड्या घरांत दाटीवाटीने व थंडीने काकडत रहातात. त्यामुळें त्यांचें आयुष्य दुःखपूर्ण असतें आणि तें अल्पहि असतें. परंतु रहाणीमानाच्या बाबतींत सर्वच कांहीं सापेक्ष असतें असें म्हणण्याचा मोह टाळणे जसे आवश्यक आहे त्याचप्रमाणें त्या बाबतींत कांहीं ठाम कसोट्या लावणे देखील चुकीचे आहे. लोकांचे उत्पन्न जरी उदरनिर्वाहाला पुरेसे असले तरी एकंदर समाजाच्या उत्पन्नाहून जर ते पुष्कळच कमी असले तर ते लोक दारिद्र्याने ग्रासलेले आहेत असे आपण मानले पाहिजे. चांगले जीवन जगण्यासाठीं ज्या किमान गोष्टींची आवश्यकता आहे असे समाज मानत असतो त्या गोष्टी या लोकांना मिळूं शकत नाहीत. त्यामुळें हे लोक संभावित जीवन जगत नाहीत असा समाज शेरा मारतो आणि तो शेरा चुकविणें त्यांना शक्य नसतें. ज्या पातळीवर माणसाने जगले पाहिजे अशी समाजाची अपेक्षा असते त्या पातळीवर ही माणसें जगूं शकत नाहींत. आणि त्यामुळें तीं हीन दर्जाचीं ठरतात. विसाव्या शतकाच्या पन्नाशीच्या मध्यकालांत युनायटेड स्टेस्टस् मधील दर तेरा कुटुंबांतील एका कुटुंबाचें एकंदर वार्षिक उत्पन्न १००० डॉलर्स पेक्षां कमी होतें. शिवाय अशा अनेक व्यक्ती होत्या कीं, ज्यांची कुटुंबे नव्हती आणि ज्यांचे उत्पन्न देखील असेच अल्प होते. कांहीं अंशी कौटुंबिक जीवन ही देखील एक चैन आहे. ज्याला पुरेसे उत्पन्न मिळते त्यालाच ती भोगता येते. या अत्यंत दरिद्री लोकांच्या संख्येत घट होत होती पण ती फारशा वेगाने होत नव्हती. [१]

---

१ स्टॅटिस्टिकल अॅब्स्ट्रॅक्ट, १९५७, पृष्ठ ३१२. १९५५ सालीं ७·७ टक्के कुटुंबांचे उत्पन्न १००० डॉलर्सहून कमी होते. हा आंकडा १९५४ सालीं ८·८ होता, १९५३ सालीं ८·६ होता आणि १९५२ सालीं ८·५ होता. १९५० सालीं हा आंकडा ११·५ होता. त्यामानाने पुढील वर्षांत गरीब कुटुंबांच्या टक्केवारींत घट झाली. परंतु १९५० सालीं किंमती देखील पुष्कळच कमी होत्या.

कमी उत्पन्न मिळवणाऱ्या या माणसांपैकीं बरीचशीं माणसें शेतीवर अवलंबून असतात. १९५४ सालीं एकंदर शेतकऱ्यांच्या कुटुंबांपैकीं २७·४ टक्के कुटुंबांचे रोकड उत्पन्न १००० डॉलर्सहून कमी होते. शहरांत इतकें कमी उत्पन्न असलेली कुटुंबे ४·९ टक्के होती. या ग्रामीण कुटुंबांना राहायला जागा होती आणि खायला शेतावर पिकलेले अन्न होते. हें देखील त्यांचे उत्पन्नच होते पण त्याचा समावेश रोकड उत्पन्नांत होत नसल्यामुळें ते प्रत्यक्षांतल्यापेक्षां अधिक गरीब होते असा भास होतो. पण त्या बरोबर हें देखील खरें कीं हे ग्रामीण लोक रंगरंगोटी न केलेल्या खोपटांत रहातात. त्यांची जनावरे कामाच्या दृष्टीने तितकीशी उपयोगी नसतात आणि त्यांची छोटी आवारे नापीक असतात. या गोष्टींपासून त्यांना जे उत्पन्न मिळते ते इतके अल्प असते कीं, ते हिशोबांत न घेतल्यामुळें फारसे बिघडत नाहीं. उलट ते हिशोबांत घेण्याचा प्रयत्न केला तर त्यामुळें त्यांचे उत्पन्न उगीच फुगण्याची शक्यता आहे.

शेतीच्या क्षेत्रांतले हें जें दारिद्र्य आहे ते कांहीं विशिष्ट प्रदेशांत विशेष प्रमाणांत जाणवते. अपॅलाचिअन पठार आणि त्यांतल्या दऱ्या, पिएडमॉण्डचा प्रदेश आणि दक्षिणेतील समुद्रकांठचा सपाट प्रदेश, अपॅलाचिअन पर्वत आणि मिसिसिपी नदी यांच्या मधला छोटया टेकडयांनीं भरलेला प्रदेश, मोठया सरोवरां भोवताल-च्या राज्यांतील घुपला गेलेला प्रदेश, ओझार्कचे पठार, इत्यादि प्रदेशांत आपल्याला अशी परिस्थिती आढळून येते. १९५० सालीं या प्रदेशांतील १०,००० कुटुंबांची सरसकट आवक १२०० डॉलर्सपेक्षां कमी होती आणि त्यांपैकीं अंदाजे २·५ लक्ष कुटुंबांची आवक २५० डॉलर्सपेक्षां कमी होती. १९४९ सालीं अपॅलाचिअन पठारा-च्या दक्षिण भागांत पूर्णपणे शेतीवर अवलंबून असलेल्या सर्व शेतकऱ्यांचे सरासरी नक्त उत्पन्न ५०० डॉलर्सपेक्षां कमी होतें. दक्षिण पिएडमॉण्टमध्यें हें सरासरी उत्पन्न थोडेसेंच जास्ती होतें. १९५० सालीं मुख्यतः वर निर्देशिलेल्या प्रदेशांतील १५ लक्ष शेतकरी कुटुंबांचे नक्त रोकड उत्पन्न १००० डॉलर्सहून कमी होतें.[1] आधुनिक जगांत शहरांतील गलिच्छ वस्त्यांत जितके दारिद्र्य आहे त्याहून अधिक दारिद्र्य ग्रामीण भागांतील गलिच्छ वस्त्यांतून आहे.

---

१ डेव्हलपमेंट ऑफ ॲग्रिकल्चर्स ह्यमन रिसोर्सेस, अ रिपोर्ट ऑन प्राबलेमस् ऑफ लो इनकम् फारमर्स (युनायटेड स्टेस्टस् डिपार्टमेंट ऑफ ॲग्रीकल्चर, १९५५) सरसकट आवक दाखवणारे जे आंकडे आहेत ते देतांना ६५ वर्षांहून अधिक वय असलेले शेतकरी वगळण्यांत आले आहेत.

[३]

आधुनिक काळांतल्या दारिद्र्याचे आपल्याला दोन वर्ग पाडता येतील. एका वर्गात विशिष्ट व्यक्तीचे त्यांच्या दोषामुळें निर्माण झालेले दारिद्र्य आपल्याला घालता येईल. अशा प्रकारचे दारिद्र्य प्रत्येक समाजांत असतें, मग तो ग्रामीण असो किंवा शहरांत रहाणारा असो, तो समाज कितीहि समृद्ध असला तरी अशा प्रकारचें दारिद्र्य अस्तित्वांत असते. याचें उदाहरण म्हणून एका विशिष्ट प्रकारच्या शेतकरी कुटुंबाचा आपल्याला उल्लेख करता येईल. ह्या कुटुंबाच्या घराचे आवार फालतु वस्तूंनीं भरलेलें असते त्यांची मुले घाणेरडी असतात आणि ती घाणींत खेळत असतात. अशा प्रकारचे दारिद्र्य आपल्याला रेल्वे लाइनी लगतच्या अवकळा आलेल्या खोपटांत आढळते किंवा एखाद्या गल्लींतल्या घराच्या तळघरांत आढळते.

अशा प्रकारचें दारिद्र्य सामान्यत: त्या दरिद्री व्यक्तीच्या काहीं स्वभावदोषांतून निर्माण झालेलें असतें. इतर सर्व लोकांनीं परिस्थितीवर मात केलेली असते. त्यामुळें परिस्थिती अवघड नाहीं हें सिद्ध झालेलें असतें. परंतु त्या विशिष्ट व्यक्तींत अगर कुटुंबांत कांहींतरी दोष असतो. मानसिक दौर्बल्य, वाईट शरीरप्रकृति, आधुनिक आर्थिक जीवनाची शिस्त पाळण्याची असमर्थता, पोरावाळांचे लेंढार, अतिरिक्त मद्यपान इत्यादि कारणांमुळें किंवा यापैकीं अनेक कारणांच्या समुच्चयामुळें त्या व्यक्तीला अगर कुटुंबाला सामाजिक सुस्थितींत सहभागी होता येत नाहीं. दुसऱ्या प्रकारचें जें दारिद्र्य असते तें एकाद्या लहानशा प्रदेशांत सर्वत्र आढळून येते. दारिद्र्याचें एक वेटच तयार झालेलें असतें. या वेटांतला जवळ जवळ प्रत्येक मनुष्य दरिद्री असतो. हे दारिद्र्य वैयक्तिक दोषांमुळें निर्माण झालेले असते असे आपल्याला म्हणता येणार नाहीं. कांहीं विशिष्ट व्यक्तीत स्वभावदोष आहेत असें आपल्याला म्हणता येईल. परंतु एखादा सबंध समाजच स्वाभावदोषांनीं ग्रस्त झालेला आहे असे म्हणणे योग्य होणार नाहीं. कांहीं विशिष्ट कारणांमुळें त्या वेटावरील सर्व लोक परिस्थितीवर मात करण्यास असमर्थ ठरलेले असतात.

प्रादेशिक दारिद्र्याची तपशीलवार चिकित्सा करण्याचे हे स्थळ नव्हे. या दारिद्र्याची कारणे गुंतागुंतीची असतात, ती वाटतात तितकी साधी नसतात आणि पुष्कळदा त्या कारणाची जी आपण चिकित्सा करतो ती चुकीची असते. जमिन नापीक आहे किंवा साधनसामुग्रीचा अभाव आहे म्हणून ते दारिद्र्य निर्माण झाले असे सामान्यत: मानले जाते. परंतु खरोखर तसे नसते. कॉनेक्टिकटची जमिन खडकाळ आहे आणि तेथे साधनसंपत्तीचा अभाव आहे. उलट वेस्ट व्हर्जिनियामध्ये साधनसंपत्तीचे वैपुल्य आहे. परंतु कॉनेक्टिकट हा प्रदेश सधन आहे आणि वेस्ट व्हर्जिनिया दरिद्री आहे.

आपण जेथे जन्मलो तेथेच आयुष्य कंठण्याची जर पुष्कळ लोकाची इच्छा असली तर त्यामुळे कांही अंशी प्रादेशिक दारिद्र्य निर्माण होते. या इच्छेमुळे इतरत्र जाऊन ती माणसे दारिद्र्यातून आपली सुटका करून घेऊं शकत नाहींत. आणि जो पर्यन्त ती जन्मस्थळाला चिकटून रहातात तो पर्यन्त ती विशिष्ट प्रकारें शेती करीत रहातात किंवा अनुत्पादक खाणीत अगर उद्योगात काम करीत रहातात. [१] तो समाज दरिद्री असल्यामुळे तेथे शिक्षणाची चांगली व्यवस्था नसते. आरोग्यविषयक सुविधा अपुऱ्या असतात. त्यामुळे परिस्थितीवर मात करण्याची कुवत पुढील पिढ्यात निर्माण होऊं शकत नाहीं. तसेच अधिक सधन असलेल्या अन्य प्रदेशात देखील त्या पिढ्या जाऊ शकत नाहींत. शिवाय जन्मस्थळाला चिकटून रहाण्याची प्रवृत्ति दरिद्री लोकात अधिक प्रमाणात असते असे म्हणायला हरकत नाहीं.

कांहीवेळा परिस्थिती अशी असते कीं, दारिद्र्यातून सुटका करून घेणे अशक्य असते. विशेषतः शहरातील गलिच्छ वस्त्यांतील माणसे वांशिक कारणामुळे किंवा दारिद्र्यामुळे तेथून बाहेर पडूं शकत नाहीत. आणि तेथे तर परिस्थिती सुधारण्याची फारशी संधीच नसते. शिवाय त्या वस्त्यांतील शाळा चांगल्या नसतात. सामाजिक जीवन अनिष्ट प्रवृत्तीनीं भरलेले असते आणि जीवनाची पूर्वतयारी तेथे चांगल्या प्रकारें होऊं शकत नाहीं. त्यामुळे परिस्थितीत सुधारणा होणे अशक्य होते.

एक गोष्ट मात्र निश्चित आहे. ती अशी कीं, उत्पन्नात सार्वत्रिक वाढ करून आणि त्याची चांगल्या प्रकारें विभागणी करून आधुनिक काळातील दारिद्र्याचा

---

१ उदाहरणार्थ ॲपलाचिअन पठारावर जी वस्ती झाली ती दऱ्यांच्या आसपास झाली. तेथील शेते लहान लहान व म्हणून स्वयंपूर्ण शेतीस योग्य होती. बदलत्या परिस्थितीमुळे अशा प्रकारची शेती आता टाकावू ठरली आहे. दुसरे प्रदेश तीच पिकें अधिक चांगल्या प्रकारें काढतात. एकेकाळी जे राहणीचे मान ठीक वाटत होते ते आता बदलत्या परिस्थितीमुळे अगदींच हीन दर्जाचे ठरत आहे. परिस्थितींत बदल करण्यासाठीं शेतीच्या व्यवस्थेत फार मोठा फरक करणे आवश्यक आहे. शेतांचा आकार मोठा करायला हवा आहे व खूप भांडवल वापरणारे उद्योग जंगलातील मालाचे संस्करण करण्यासाठीं स्थापन करणे आवश्यक आहे. परंतु हे करण्याइतके शिक्षण व पैसा त्या लोकांजवळ नाहीं. मात्र जन्मस्थळाला चिकटून रहाण्याच्या प्रवृत्तीमुळे ते लोक त्याच प्रदेशात रहात आहेत.

प्रश्न सोडवता येणे शक्य नाहीं. यामुळे विशिष्ट व्यक्तीचे दारिद्र्य दूर होऊं शकत नाहीं. कारण त्याना आपल्या स्वभाव दोषामुळे रोजगारी करून समाजाच्या वाढत्या संपन्नतेत सहभागी होता येत नाहीं. तसेच उत्पन्नातील सार्वत्रिक वाढीमुळे प्रादेशिक दारिद्र्य देखील नष्ट होत नाहीं. कारण त्या विशिष्ट प्रदेशातील लोकांच्या ज्या विशिष्ट अडचणी असतात, त्या उत्पन्नातील सार्वत्रिक वाढीमुळे दूर होत नाहीत. याचा अर्थ असा नव्हे कीं, उत्पादनातील या वाढीचा कांहीच परिणाम होत नाहीं. औद्योगिक प्रगति झाली कीं, इतरत्र चांगल्या नोकऱ्या मिळण्याची शक्यता वाढते. त्यामुळे जन्मस्थळाला चिकटून रहाण्याचीं प्रवृत्ति कमी होते. उद्योगाचा प्रसार झाल्यामुळे असा प्रकार अधिकच प्रमाणात होतो. टेनिसी-व्हॅली प्रदेशाच्या कांहीं भागात जेव्हा कारखाने उभारण्यात आले तेव्हा त्या भागातले दारिद्र्य वेगाने नष्ट होऊं लागले. परंतु इतके मात्र खरें कीं, जे लोक स्वभावातील अगर परिस्थितीतील दोषामुळे आर्थिक विकासाच्या फायद्यांत सहभागी होऊं शकत नाहीत किंवा ज्यांच्या पर्यन्त आर्थिक विकास पोहोचतच नाही त्या लोकाच्या परिस्थितीत आर्थिक विकासामुळे कांहीच सुधारणा होऊं शकत नाहीं.

[४]

ह्या परिस्थितीमुळे दारिद्र्याच्या अर्थशास्त्रात मूलभूत बदल घडून आला आहे. त्याचे स्वरूप अजून लोकांच्या नीटसे ध्यानात आलेले नाहीं. दारिद्र्य हा आता बहुसंख्य लोकाचा प्रश्न राहिलेला नसून तो अल्पसंख्या लोकाचा प्रश्न झाला आहे. त्यामुळे राजकारणी लोकांच्या दृष्टीने त्याला आता महत्त्व राहिलेले नाहीं. पूर्वी अशी परिस्थिती होती कीं, राजकारणात दरिद्री लोकांची कड घेतली कीं, श्रीमंत लोकाचा रोष सहन करावा लागत असे. परंतु त्याच बरोबर प्रचंड बहुसंख्येचा पाठिंबा सुद्धा मिळत असे. उलट आता जेव्हा एखादा राजकारणी मनुष्य गरीबाची कड घेतो तेव्हा तो एका अल्पसंख्य आणि मोठ्याने तक्रार न करणाऱ्या गटाच्या वतीने बोलत असतो. त्यामुळें आधुनिक उदारमतवादी राजकीय कार्यकर्ता गरीबाची कड घेत नाहीं तर आधुनिक कामगार संघटनाच्या सदस्याची बाजू तो मांडत असतो. त्याची संख्या मोठी असते आणि आर्थिक परिस्थिती देखील पुष्कळच चांगली असते. ॲम्ब्रोस बिअर्स या लेखकाने आपल्या डेव्हिल्स् डिक्शनरीत असे म्हटलें आहे कीं, दारिद्र्य ही 'सुधारणेच्या घुशीचे दांत घासण्यासाठीं बनवलेली कानस आहे.' परंतु आतां तशी परिस्थिती राहिलेली नाहीं. आता सुधारणा ही त्या मानाने सुखवस्तु असलेल्या लोकासाठीं असते. ह्या लोकांचे

पूर्वीचे उत्पन्न लक्षात घेतले किंवा सध्यांच्या अगदी दरिद्री माणसाचे उत्पन्न लक्षात घेतले तर, या मानाने हे लोक सुखवस्तु असतात असेच म्हटले पाहिजे.

दरिद्री माणसाकडे जे दुर्लक्ष केले जाते त्याचे आणखी एक कारण आहे. ते असे कीं, उत्पादनात वाढ झाली म्हणजे दारिद्र्य नष्ट होईल असे गृहीत धरले जाते. सर्वसामान्य श्रमिक वर्गाचे दारिद्र्य उत्पादनातील वाढीमुळे नष्ट झाले आहे. तेव्हा आता जे दारिद्र्य शिल्लक राहिले आहे ते देखील तसेच नष्ट होईल. आपण आताच असे पाहिले आहे कीं, प्रत्यक्षात तसे होणार नाहीं. निदान हा उपाय खात्रीलायक नाहीं आणि तो लागू पडण्यास बराच वेळ लागेल. परंतु आधुनिक राजकारणाच्या गणितामुळे जसे गरीबाकडे दुर्लक्ष केले जातें त्याचप्रमाणे वाढत्या उत्पादनामुळे त्याचा प्रश्न सुटेल ह्या कल्पनेने त्याच्याकडे तसे दुर्लक्ष करणे अधिक सोपेंहि होते.

हीच गोष्ट वेगळ्या प्रकारें मांडायची तर असे म्हणता येईल कीं, जो पर्यन्त थोडेच लोक सधन होते व बहुतेकांची उपासमार होत होती तों पर्यन्त विषमतेचा प्रश्न जिव्हाळ्याचा होता. परंतु जेव्हा कांहीं लोक सधन असले तरीहि बहुसंख्य लोक सुखवस्तु झाले तेव्हा विषमता हा ज्वलंत प्रश्न राहिला नाहीं. परंतु दुर्दैवाची गोष्ट अशी कीं, विषमतेच्या प्रश्नाचे महत्व जरी कमी झाले तरी त्यामुळें पाटी स्वच्छ झाली नाहीं. एक प्रश्न बाकी राहिला आणि कांहीं बाबतींत तो अधिकच विकट आहे.

[५]

जो समाज सुबुद्ध व सहृदय आहे तो सर्व लोकांना सुखाचें व संभावित जीवन जगण्यासाठीं अवश्य असलेले किमान उत्पन्न देई. काम न करता जर थोडेंसें उत्पन्न मिळालें तर त्यामुळें माणसाच्या मनोवृत्तीवर जो अनिष्ट परिणाम होतो त्याचे आतां पर्यन्त फार भडक चित्र रंगवण्यांत आले आहे. तसेच उपासमार व आर्थिक ओढाताण यामुळें माणसाच्या मनोवृत्तींत जो कणखरपणा येतो त्याचे सांकेतिक चित्र देखील तितकेच भडक आहे. प्रत्येक कुटुंबाला जर कांहीं एक किमान उत्पन्न देण्याची समाजानें जबाबदारी घेतली तर त्यामुळें आईबापांच्या कमनशीबाची झळ त्यांच्या मुलांना लागणार नाहीं. मग तें कमनशीब त्या आईबापांनीं स्वतःवर ओढवून घेतलेले असो किंवा परिस्थितीनें त्यांच्यावर लादलेले असो. प्रत्येक कुटुंबाला कांहीं एक किमान उत्पन्न मिळालें तर जुन्या दारिद्र्यांतून नवें दारिद्र्य निर्माण व्हायचें थांबेल. ह्या गोष्टीला जो विरोध होईल तो बहुतांशीं जुनाट व टाकावूं कल्पनांवर आधारलेला असेल. जेव्हा बहुसंख्य लोक दरिद्री होते तेव्हा प्रत्येक कुटुंबासाठीं किमान उत्पन्नाची सोय करणे समाजाला परवडण्यासारखें नव्हतें. आपण मागें

पाहिल्या प्रमाणें जो मनुष्य काम करणार नाहीं त्याला खायला मिळणार नाहीं. या नियमाची अंमल बजावणी दरिद्री समाजाला करावी लागत असे. ज्यांना काम करणे शक्य नसे किंवा ज्यांची कार्यक्षमता चार चौघांहून कमी असे त्यांना हा नियम लागूं करणें निर्दयीपणाचे होतें. परंतु त्या समाजांत तें अपरिहार्य होतें असें कदाचित् म्हणता येईल. मात्र इतक्या निर्दयपणे वागण्यास संपन्न समाजाजवळ कोणतीच सबब नाहीं. ज्यांची नड असेल त्यांना मदत करणें या समाजाला शक्य असतें. त्या समाजानें सहानुभूतिपूर्वक वर्तन करावें असे त्यांच्यावर कोणतेच बंधन नाहीं. परंतु आपल्या निष्ठूरपणाचे त्याला उच्च तात्विक पातळीवरून समर्थन करता येणार नाहीं.

परंतु दारिद्र्यावर अशी सरळ व सावी उपाययोजना केली जाईल अशी आशा करायला फारशी जागा नाहीं. जी माणसें मद्याच्या आहारीं गेलेली असतात किंवा मानसिक दौर्बल्याने निकामी झालेली असतात त्यांना मदत करायची म्हटली तरी त्या बाबतीत अडचणी निर्माण होतात. उत्पन्न मिळवण्याप्रमाणेच ते खर्च करण्यास देखील कांही एक किमान चारित्र्याची व बुद्धिमत्तेची आवश्यकता असते. दारिद्र्य जर नष्ट किंवा कमी करायचे असेल तर त्यासाठी अप्रत्यक्षपणे परंतु तितक्याच परिणामकारकपणे कार्य करणारे उपाय योजणे अधिक चांगले. ते यशस्वी होण्याची शक्यता अधिक आहे.

दारिद्र्याचा नाश करण्यासाठी आपण पहिल्याने अशी व्यवस्था केली पाहिजे कीं, दारिद्र्यातून आणखी दारिद्र्य निर्माण होणार नाहीं. हे साधण्यासाठीं आपण अशी सोय केली पाहिजे कीं, इतर मुलावर जितका केला जातो तितकाच भांडवली खर्च गरीब कुटुंबातील मुलांवर देखील केला जाईल. गरीब कुटुंबातील मुलांसाठीं पहिल्या दर्जाच्या शाळा उघडायला हव्यात आणि शाळेत नियमितपणे जाण्याचे बंधन त्यांच्यावर घालायला पाहिजे. त्या मुलांना घरीं जर चांगले खायला प्यायला मिळत नसेलतर तर शाळेत त्याना सकस अन्न द्यायला हवे. समाजाने आरोग्य विषयक सुविधा निर्माण करायला हव्यात. आणि या मुलांचे शारीरिक आरोग्य चांगले राहावे म्हणून त्यांच्यावर देखरेख करायला हवीं. ती मुले उच्च शिक्षण घेण्यास पात्र असली तर ते त्याना द्यायला हवे. मग ते घेण्याची त्याची ऐपत असो वा नसो. त्याचप्रमाणे शहरांत कायदा व सुव्यवस्था याची अमलबजावणी चांगल्या प्रकारें करायला हवी व करमणुकीची साधने पुरेशा प्रमाणात उपलब्ध करून द्यायला हवीत. असे केले तर समाजातील दरिद्री वर्गाची मुले चांगल्या प्रकारें वाढतील आणि इतर मुलांच्या मानाने ती फारशी मागें पडणार नाहीत. प्रादेशिक दारिद्र्य जर दूर करायचे असेल तर त्या प्रदेशातील

समाज ज्या सुविधा उपलब्ध करून देतो त्यात बाहेरून भर घालायला हवी. दारिद्र्य नष्ट करण्यासाठी ज्या सुविधांची आवश्यकता असते त्या सुविधांचेच दारिद्र्य दरिद्री समाजात असते. आणि त्यामुळे दारिद्र्य तसेच कायम रहाते. दारिद्र्य जर नष्ट करायचे असेल तर दरिद्री प्रदेशातील मुलांत आपण विशेष प्रमाणात भांडवल गुंतवायला हवे. तेथील कुटुंबें आपल्या मुलांवर फारच अपुरा भांडवलीखर्च करूं शकतात. ही उणीव भरून काढण्यासाठीं तेथे उत्तम शाळा सुरूं करायला हव्यात आणि आरोग्य विषयक सुविधाची, चांगल्या आहाराची व करमणुकीच्या साधनांची व्यवस्था करायला हवी.

व्यक्तींच्या शिक्षणावर आणि संवंधित गोष्टीवर भांडवली खर्च केला कीं, त्यामुळे त्या व्यक्तीना आपल्या सभोवतालच्या परिस्थितीशी यशस्वीपणे मुकावला करता येईल. किंवा त्याना अन्यत्र राहून इतरांच्या बरोबरीने जीवन जगतां येते. घराला चिकटून रहाण्याच्या प्रवृत्तीमुळे पुष्कळशी माणसे मागासलेल्या विभागात रहातात. आणि त्याची जीवने निष्फळ ठरतात. घराला चिकटून रहाण्याच्या या प्रवृत्तीवर शिक्षण हा एक चांगला उपाय आहे. परंतु प्रादेशिक दारिद्र्य जर नष्ट करायचे असेल तर त्या प्रदेशांतील ज्या विशिष्ट परिस्थितीमुळे ते निर्माण होते तिच्यावरहि आपण हल्ला चढवायला हवा. गलिच्छ वस्त्यांच्या बाबतींत असे करणे किती आवश्यक आहे ते स्पष्टच आहे. गलिच्छ वस्त्याचे उच्चाटन केले आणि तेथे गरीब व माध्यमवर्गीय लोकांसाठीं घरे बांधली कीं, तेथें रहाणाऱ्या लोकाच्या जीवनांतील अनेक अडचणी नष्ट होतात व त्याना अनेक संधी उपलब्ध होतात. ग्रामिण भागातील गलिच्छ वस्त्याच्या बाबतींत देखील असेच करणे शक्य आहे. तेथे शेतांच्या आकारांत व लागवडीच्या पद्धतींत अवश्य ते बदल करायला हवेत व त्यायोगे राहणीचे मान सुधारण्यास अनुकुल अशी परिस्थिती निर्माण करायला हवी. तसेच जमीन आणि भांडवल यांचे नव्या प्रकारें संघटन करायला हवे. असे केले म्हणजे तेथील लोकांच्या अडचणी दूर होतील. यासाठीं बराच पैसा व वेळ खर्च करावा लागेल. हे अशक्य आहे अशांतला भाग नाहीं. प्रश्न आहे तो हे करण्याच्या इच्छेचा. [1]

---

१ ग्रामीण गलिच्छ वस्त्या व त्यांची पुनर्घटना याचा प्रश्न अशा स्वरूपाचा आहे कीं, त्याबाबतींत एक तर थोडे लिहून थांबायला हवे किंवा खूपच लिहायला हवे. यापैकीं पहिल्या मार्गाचा अवलंब मी येथे केला आहे. या प्रश्नांचा मी माझ्या पुढें निर्देशिलेल्या व्याख्यानात अधिक विस्ताराने विचार केला आहे: इन्-इक्वॉलिटी इन ॲग्रिकल्चर–प्रॉबलेम ॲण्ड प्रोग्राम,' जे. जे. मॉरिसन मेमोरिअल लेक्चर, ओण्टॅरिओ ॲग्रिकल्चरल कॉलेज,ग्यूएल्फ कॅनडा १९५६.

त्याच प्रमाणे त्या प्रदेशातील चालूं पिढीचे दारिद्र्य नष्ट करणे देखील अगदीच अशक्य नाहीं. ज्या स्वभाववैशिष्ट्यामुळें ती माणसे आधुनिक औद्योगिक समाजाच्या चौकटींत बसूं शकत नाहींत ती स्वभाववैशिष्ट्यें बदलण्यासाठीं पुष्कळशा गोष्टी करणे शक्य आहे. शैक्षणिक उणीवा दूर करता येतात, मानसिक दोषांवर इलाज करता येतात व शारीरिक दोष देखील दूर करता येतात. काय करता येणे शक्य आहे या विषयींच्या अज्ञानामुळे परिस्थितींत सुधारणा होत नाहीं असे आपल्याला म्हणता येणार नाहीं. आपण लोकांत पुरेसे भांडवल गुंतवत नसल्यामुळेच हे दारिद्र्य टिकून राहिले आहे.

६

वरील विवेचनावरून असे आढळून येईल कीं, सामाजिक समतोल प्रस्थापित करण्यासाठीं ज्या गोष्टी करण्याची आवश्यकता आहे त्याच गोष्टी दारिद्र्य नष्ट करण्यासाठीं देखील करायला हव्यात. (व्यक्तीगत दारिद्र्य हे पुष्कळशा प्रमाणात सामाजिक समतोलच्या अभावामुळेच निर्माण होते.) उत्पादन आणि वस्तुरूप भांडवलाचा संचय यांतच आपले लक्ष गुंतले आहे. आणि त्यामुळे आपण आपल्या साधनसामुग्रीचा उपयोग कशा प्रकारे करीत आहोत ह्या अधिक निकडीच्या प्रश्नाचा आपण विचार करीत नाहीं. त्याचप्रमाणे माणसात भांडवल गुंतवण्याची गरज व संधि अधिक आहे हे देखील आपण विचारांत घेत नाहीं.

हा एक विरोधाभास आहे. यदृच्छेमुळे, दोषामुळे किंवा दुर्दैवामुळे जी माणसे आपल्या अर्थव्यवस्थेच्या चौकटींत बसू शकत नाहीत त्यांचा प्रश्न सोडवण्याचा साधा मार्ग म्हणजे त्याच्या मुलांना उत्पादक नागरिक बनवणे. यांचा अर्थ असा कीं, त्यांचा प्रश्न सोडवल्यावर ते वस्तूंच्या एकंदर उत्पादनात भर घालतील. यावरून आपल्याला पुन्हा असे आढळून येते कीं, उत्पादन वाढवण्यासाठीं माणसात भांडवल न गुंतवता वस्तूत भांडवल गुंतवण्याची जी सध्यांची प्रवृत्ती आहे ती खुद्द उत्पादनालाच अपकारक आहे. सुशिक्षित कामगारांचा पुरवठा होण्यासाठीं भांडवल गुंतवण्याची आवश्यकता आहे याचे जे वर विवेचन केलेले आहे, [1] त्याच्याशी या मुद्द्याचे कसे साधर्म्य आहे ते वाचकांच्या सहज लक्षांत येईल.

परंतु वस्तूंच्या उत्पादनात वाढ करणे ही गोष्ट महत्त्वाची नाहीं. विशेष बौद्धिक त्रास घेण्यास नाखूष असलेल्या वाचकाच्या ध्यानातहि एव्हाना असे आले असेल कीं, उत्पादनातील वाढ हा या पुस्तकाचा विषय नव्हे. दारिद्र्य नष्ट करण्यासाठीं केलेल्या उपाय योजनेचा आनुषंगिक परिणाम म्हणून उत्पादनात वाढ

१ प्रकरण १९ वें.

होते इतकेच इथें म्हणायचें आहे. उत्पादनात वाढ करण्याचा प्रश्न सहजपणें सोडविता येण्याजोगा आहे. त्यावर इतक्या विस्ताराने लिहिण्याची आवश्यकता नाहीं. मुख्य मुद्दा वेगळाच आहे. माणसाला अवोगातीला नेणारे भीषण व अपरिहार्य दारिद्र्य ही भारतांतील एक नित्याची गोष्ट आहे. तेथील वहुसंख्य लोक अशा दारिद्र्यांत खितपत पडलेले आहेत. परंतु युनायटेड स्टेस्टस् मध्यें अजूनहि दारिद्र्य शिल्लक रहावे ही गोष्ट मात्र अपूर्वाइची आहे. त्याच्याकडे आपण दुर्लक्ष करतो याचे कारण इतकेच कीं, जें आपल्याला वघायचे नाहीं तिकडे डोळे झांक करण्याचे कसव आपल्याजवळ आहे. सर्वकाळातील सर्व समाजांजवळ हे कसव असतें. हें कसव अंगीं असल्यामुळें पूर्वीच्या काळीं अमीर उमरावांना मिष्टान्न खातांना आपल्या दारावाहेर उभ्या असलेल्या भिकाऱ्यांकडे दुर्लक्ष करता येत असे. आणि तेंच कसव अंगीं असल्यामुळें आपण देखील दक्षिण शिकागोतून किंवा दक्षिणेंतील राज्यातून निःशंकपणें प्रवास करूं शकतो. परंतु आपण ही जी डोळेझांक करतो तिची कारणें देतां आली तरी तिचे समर्थन करणें शक्य नाहीं. पिट्ने असे उदगार काडले होते कीं, 'दारिद्र्य हे लांच्छनास्पद नाहीं, परंतु ते अत्यंत त्रासदायक असते.' परंतु आजच्या युनायटेड स्टेस्टस्मधील दारिद्र्य त्रासदायक नाहीं, तें लांच्छनास्पद आहे.

त्याच प्रमाणे त्या प्रदेशातील चालू पिढीचे दारिद्र्य नष्ट करणे देखील अगदीच अशक्य नाहीं. ज्या स्वभाववैशिष्ट्यामुळें ती माणसे आधुनिक औद्योगिक समाजाच्या चौकटींत वसूं शकत नाहींत ती स्वभाववैशिष्ट्यें बदलण्यासाठीं पुष्कळशा गोष्टी करणे शक्य आहे. शैक्षणिक उणीवा दूर करता येतात, मानसिक दोषांवर इलाज करता येतात व शारीरिक दोष देखील दूर करता येतात. काय करता येणे शक्य आहे या विषयींच्या अज्ञानामुळे परिस्थितींत सुधारणा होत नाहीं असे आपल्याला म्हणता येणार नाहीं. आपण लोकांत पुरेसे भांडवल गुंतवत नसल्यामुळेच हे दारिद्र्य टिकून राहिले आहे.

६

वरील विवेचनावरून असे आढळून येईल कीं, सामाजिक समतोल प्रस्थापित करण्यासाठीं ज्या गोष्टी करण्याची आवश्यकता आहे त्याच गोष्टी दारिद्र्य नष्ट करण्यासाठीं देखील करायला हव्यात. (व्यक्तीगत दारिद्र्य हे पुष्कळशा प्रमाणात सामाजिक समतोलच्या अभावामुळेच निर्माण होते.) उत्पादन आणि वस्तुरूप भांडवलाचा संचय यांतच आपले लक्ष गुंतले आहे. आणि त्यामुळे आपण आपल्या साधनसामुग्रीचा उपयोग कशा प्रकारे करीत आहोत ह्या अधिक निकडीच्या प्रश्नाचा आपण विचार करीत नाहीं. त्याचप्रमाणे माणसात भांडवल गुंतवण्याची गरज व संधि अधिक आहे हे देखील आपण विचारांत घेत नाहीं.

हा एक विरोधाभास आहे. यदृच्छेमुळे, दोषामुळे किंवा दुर्दैवामुळे जी माणसे आपल्या अर्थव्यवस्थेच्या चौकटींत वसू शकत नाहीत त्यांचा प्रश्न सोडवण्याचा साधा मार्ग म्हणजे त्याच्या मुलांना उत्पादक नागरिक बनवणे. यांचा अर्थ असा कीं, त्यांचा प्रश्न सोडवल्यावर ते वस्तूंच्या एकंदर उत्पादनात भर घालतील. यावरून आपल्याला पुन्हा असे आढळून येते कीं, उत्पादन वाढवण्यासाठीं माणसात भांडवल न गुंतवता वस्तूत भांडवल गुंतवण्याची जी सध्यांची प्रवृत्ती आहे ती खुद्द उत्पादनालाच अपकारक आहे. सुशिक्षित कामगारांचा पुरवठा होण्यासाठीं भांडवल गुंतवण्याची आवश्यकता आहे याचे जे वर विवेचन केलेले आहे,[1] त्याच्याशी या मुद्द्याचे कसे साधर्म्य आहे ते वाचकांच्या सहज लक्षांत येईल.

परंतु वस्तूंच्या उत्पादनात वाढ करणे ही गोष्ट महत्त्वाची नाहीं. विशेष बौद्धिक त्रास घेण्यास नाखूष असलेल्या वाचकाच्या ध्यानातहि एव्हाना असे आले असेल कीं, उत्पादनातील वाढ हा या पुस्तकाचा विषय नव्हे. दारिद्र्य नष्ट करण्यासाठीं केलेल्या उपाय योजनेचा आनुषंगिक परिणाम म्हणून उत्पादनात वाढ

१ प्रकरण १९ वें.

होते इतकेच इथें म्हणायचें आहे. उत्पादनात वाढ करण्याचा प्रश्न सहजपणें सोडविता येण्याजोगा आहे. त्यावर इतक्या विस्ताराने लिहिण्याची आवश्यकता नाहीं. मुख्य मुद्दा वेगळाच आहे. माणसाला अवोगातीला नेणारे भीषण व अपरिहार्य दारिद्र्य ही भारतांतील एक नित्याची गोष्ट आहे. तेथील वहुसंख्य लोक अशा दारिद्र्यांत खितपत पडलेले आहेत. परंतु युनायटेड स्टेस्टस् मध्यें अजूनहि दारिद्र्य शिल्लक रहावे ही गोष्ट मात्र अपूर्वाइची आहे. त्याच्याकडे आपण दुर्लक्ष करतो याचे कारण इतकेच कीं, जें आपल्याला वघायचे नाहीं तिकडे डोळे झांक करण्याचे कसब आपल्याजवळ आहे. सर्वकाळातील सर्व समाजांजवळ हे कसब असतें. हें कसब अंगीं असल्यामुळें पूर्वीच्या काळीं अमीर उमरावांना मिष्टान्न खातांना आपल्या दारावाहेर उभ्या असलेल्या भिकाऱ्यांकडे दुर्लक्ष करता येत असे. आणि तेंच कसब अंगीं असल्यामुळें आपण देखील दक्षिण शिकागोतून किंवा दक्षिणेंतील राज्यातून निःशंकपणें प्रवास करूं शकतो. परंतु आपण ही जी डोळेझांक करतो तिची कारणें देतां आली तरी तिचे समर्थन करणें शक्य नाहीं. पिट्ने असे उदगार काडले होते कीं, 'दारिद्र्य हे लांच्छनास्पद नाहीं, परंतु ते अत्यंत त्रासदायक असते.' परंतु आजच्या युनायटेड स्टेस्टस्मधील दारिद्र्य त्रासदायक नाहीं, तें लांच्छनास्पद आहे.

प्रकरण चौविसावें

काम, फुरसत आणि नवा सामाजिक वर्ग

ज्या समाजांत संपत्तीचे वाढते वैपुल्य आहे त्या समाजांत श्रमांच्या संदर्भात तीन प्रवृत्ती कार्य करीत असतात. वस्तूंच्या उत्पादनाचे महत्त्व जसजसे कमी होते आणि व्यक्तींची उत्पन्नाची गरज जसजशी कमी होते तसतशा त्या व्यक्ती दर दिवशीं किंवा दर आठवड्यांत कमी काम करूं लागतील; किंवा त्या कमी तत्परतेने काम करूं लागतील. आणखी एक शक्यता अशी कीं, नित्य काम करणाऱ्या व्यक्तींच्या संख्येंत घट होईल.

गेल्या शतकांत दर आठवड्यांतील कामाच्या तासांत मोठीच कपात झाली आहे. अठराशें पन्नास सालीं दर आठवड्यांत जवळ जवळ सत्तर तास काम करावें लागत असे. म्हणजे दर दिवशीं दहा तास या हिशोवाने आठवड्यांतले सातहि दिवस काम करावें लागत असे; किंवा साधारणपणे सकाळचे सहा वाजल्यापासून संध्याकाळचे सहा वाजेपर्यंत काम केलें तर आठवड्यांतले सहा दिवस काम करावे लागत असे. आज शंभर वर्षानंतर दर आठवड्यांत सरासरीने चाळीस तास काम करावे लागते. म्हणजे आठ तासांचा दिवस या हिशोवाने आठवड्यांतले पांच दिवस काम करावे लागतें.[1]

कामाच्या तासांत ही जी घट झाली आहे ती असें दर्शविते कीं, वस्तूंची सीमागत गरज आतां कमी झाली आहे, हें समाजाने अप्रत्यक्षपणे पण निश्चितपणे मान्य केलें आहे. या परिस्थितीचा दुसरा अर्थ लावणे शक्यच नाहीं. परंतु उत्पादन या गोष्टीची आपल्या मनावर इतकी पकड आहे कीं, अशा प्रकारचा खुलासा क्वचितच केला जातो. माणसाला शिळोप्याचा वेळ मिळणे किती महत्त्वाचे व उपयुक्त आहे त्याचा पुन्हां पुन्हां निर्देश केला जात नाहीं. कामाचे तास जसजसे कमी होत गेले आहेत तसतशी दरताशीं उत्पादनांत वाढ झाली आहे, या गोष्टीचा

---

१ जे. फ्रड्रिक डयूहर्स्ट आणि सहकारी, अमेरिकाज् नीड्स ॲण्ड रिसोर्सेस, अ न्यू सर्व्हे, पृष्ठ १०५३. शेतांवर काम करणारे कामगार व अन्य कामगार यांच्या कामाच्या तासांची सरासरी काढून वरील आंकडे तयार करण्यांत आले आहेत. १९५० सालीं शेती सोडून अन्य उद्योगांत दर आठवड्याला सरासरीने ३८.८ तास काम करावे लागत असे.

उल्लेख करून असें म्हटलें जातें कीं, थोड्या वेळांत अधिक उत्पादन होत असल्यामुळे कामाचे तास कमी करणे आपल्याला शक्य झालें आहे. परंतु अधिक तास काम केलें तर याहूनहि अधिक उत्पादन होईल या गोष्टीचा मात्र उल्लेख केला जात नाहीं. किंवा कधीं कधीं असा युक्तिवाद केला जातो कीं, कामगाराची उत्पादनक्षमता जसजशी वाढते तसतशी उपलब्ध कामें सर्व कामगारांत वाटून घायची व्यवस्था करायला हवी. ह्यावरूनहि असे सूचित होतें कीं, उत्पादनाचे सीमागत महत्त्व अगदींच अल्प आहे. परंतु या गोष्टीचा देखील उल्लेख केला जात नाहीं.

उत्पादनाची सीमागत गरज जसजशी कमी होते तसतसें आठवड्यांतील कामाचे तास कमी व्हावेत हे देखील स्वाभाविक आहे. काम करणे हे अन्य कांही करण्यापेक्षां अधिक सुखकारक असते असे सर्वसामान्य माणसाला पटवण्यासाठीं मानवी इतिहासांत सतत प्रयत्न करण्यांत आलेले आहेत. शिक्षण, तत्त्वनिष्ठा इत्यादि अनेक गोष्टींचा यासाठीं उपयोग करण्यांत आलेला आहे. परंतु माणसाला कांही ती गोष्ट पटलेली नाहीं. अधिक सुबत्ता झाली तर तिचा उपभोग माणसाने अंशतः वस्तूंच्या रूपाने घ्यावा व अंशतः अधिक फुरसतीच्या रूपाने घ्यावा ही गोष्ट अगदीं तर्कसंगत आहे. शिवाय अवश्य वाटल्यास जादा काम करण्याची देखील सोय असते. त्यामुळे कामगाराला आपल्या गरजा व आवडी निवडी यांच्या अनुसार कामाचे तास व उत्पन्न कमी अधिक करता येते. या पद्धतीमुळे दर आठवड्याला तितकीच मजूरी मिळायची हा असंस्कृत साचेबंदपणा नष्ट होतो आणि सर्व कुटुंबांच्या आवडी-निवडी व गरजा सारख्याच असतात या गृहीततत्त्वाचा त्याग केला जातो. स्वतःचे उत्पन्न कांही प्रमाणांत कमी अधिक करण्याची संधी माणसाला दिल्यामुळे त्याच्या स्वातंत्र्यांत जितकी भर पडते तितकी इतर फार थोड्या गोष्टींमुळे पडते.

दुर्दैवाची गोष्ट अशी कीं, सुबत्ता वाढली म्हणजे कामाचे तास कमी करणे इष्ट असते एवढीच गोष्ट सांकेतिक शहाणपणाने मान्य केली आहे. ह्याचे एक कारण असे कीं, वस्तूंचे महत्त्व कमी होत आहे या गोष्टीची दखल घेण्यांत आलेली नाहीं. माणसाला अधिक फुरसत मिळणे हे महत्त्वाचे आहे हे आपण मान्य केले आहे परन्तु उत्पादनक्षमतेविषयींच्या रूढ कल्पनांना ज्यामुळे धक्का बसेल असे दुसरे कांही करण्यास आपण तयार नाहीं. जर एखादा समाज अधिक सुखी होण्याचा सुबुद्धपणे प्रयत्न करीत असेल तर या अन्य पर्यायांची देखील दखल घ्यायला हवी.

[२]

यापैकीं एक पर्याय म्हणजे काम अधिक सुलभ व सुखकारक करणे.

गेल्या शतकांतील किंवा पंचवीस वर्षांपूर्वीच्या कारखान्याहून आजचा कारखाना खूपच वेगळा असतो. सरकारने घालून दिलेले नियम आणि कारखान्यांची तपासणी, स्थापत्यशास्त्राची व तांत्रिकज्ञानाची प्रगति, मेहनतीचे व साचेबंद काम यंत्राकडून करून घेण्यांत असलेला फायदा, कामगार मिळवण्यासाठीं स्पर्धा करण्याची आवश्यकता आणि कामाचे तास व मजूरी यांप्रमाणेच कारखान्यांतील परिस्थिती सुधारण्याचा कामगार संघटनांचा प्रयत्न, इत्यादि अनेक गोष्टींमुळे ही सुधारणा झाली आहे.

परंतु काम अधिक सुखकारक करण्याच्या प्रयत्नामुळे उत्पादनक्षमतेंत वाढ झाली तर त्या प्रयत्नांना कोणाची हरकत नसते. एरवी मात्र तसे प्रयत्न करणे इष्ट आहे हें मुद्दाम पटवून द्यावें लागते. ज्यामुळे शारीरिक इजा होण्याची किंवा प्रकृतींत विघाड होण्याची शक्यता आहे अशा परिस्थितींत कामगाराला काम करायला लागूं नये ही गोष्ट मान्य करण्यांत आली आहे. तसेच कामाच्या गतींत विशिष्ट मर्यादेपलिकडे वाढ करण्यास देखील विरोध केला जातो. पण हे सर्व करतांना अपेक्षा इतकीच असते कीं, कामगारावर फार ताण पडूं नये व त्याच्या प्रकृतीला अपाय होऊं नये. काम करणे अधिक सुखकारक व्हावे अशी अपेक्षा केली जात नाहीं. कामाचे तास कमी करणे यांत कांही गैर आहे असे आपण मानत नाही. परंतु मनुष्य एकदां काम करूं लागला कीं, त्याने अधिक स्वस्थपणे काम करावे या गोष्टीला आपला विरोध असतो. आपल्या पारंपारिक कल्पना आपल्याला तसे करायला लावतात. माणसाने अंग राखून काम करावे ह्यांत कांहीतरी चुकते आहे असे आपल्याला वाटते कारण अंग मोडून काम करणे हा एक आर्थिक सद्गुण आहे असा आपला पूर्वापार समज आहे.

तार्किकदृष्ट्या पाहिले तर कामाचे तास कमी करणे हे जितके सयुक्तिक आहे तितकेच काम अधिक सुखकारक करणे हे देखील आहे. कामगाराच्या दृष्टीने चांगले घर असणे हे जितके महत्त्वाचे आहे तितकेच कारखान्यातील वातावरण प्रसन्न असणे हे देखील महत्त्वाचे आहे. खरे म्हणजे घरापासून त्याला दूर रहाता येणे शक्य आहे. परंतु कारखान्यांत मात्र त्याला जावेच लागते. अर्थात् कामाचा फार ताण न पडणे आणि कामाची टाळाटाळ करणे या गोष्टींत फरक आहे. शिवाय औद्योगिक क्षेत्रांत असे नित्य आढळून येते कीं, काम जितके मेहनतीचे व कंटाळवाणे असते तितकी ते करायला तयार असणाऱ्या माणसांची संख्या अधिक असते. कारण ते काम करायला फारसे कौशल्य अगर डोकें लागत नाहीं. अकुशल कामगारांच्या संख्येंत घट होणे हा या परिस्थितीवरील तोडगा आहे, हे आपण पुढे पहाणारच आहोत. परंतु एक गोष्ट मात्र निश्चितपणे खरी आहे. ती अशी कीं,

प्रथमदर्शनी तरी काम अधिक सुखकारक करणे हे कामाचे तास कमी करण्या-इतकेच सयुक्तिक आहे. उत्पादनक्षमतेवर होणारा परिणाम ही या बाबतींतील कसोटी नव्हे हे इथे पुन्हां एकदा सांगायला हवे. कामाचे तास कमी केल्यामुळे उत्पादनक्षमता वाढते असा युक्तिवाद कोणीच करीत नाहीं. प्रश्न इतकाच आहे कीं, कामाचे तास कमी करणे हें काम अधिक सुखकारक करण्यापेक्षां नेहमीच अधिक इष्ट असते का ?

[३]

सुबत्ता वाढली म्हणजे तिसरी एक गोष्ट करणे शक्य असते; ती म्हणजे कमी लोकांनीं काम करणे. खरे म्हणजे गेली कित्येक वर्षें असा प्रकार घडत आहे. मात्र त्याचीं स्वरूपें वेगवेगळीं आहेत. १८९० सालीं १० ते १५ वर्षें वयाच्या दर चार मुलांतला एक मुलगा पगारी काम करीत होता व त्या वयाच्या दर दहा मुलींपैकीं एक मुलगी तशाच प्रकारें मजूरी करीत होती. आतां ह्या अल्पवयीं कामगारांच्या संख्येंत फारच मोठी घट झाली आहे. परंतु त्याचवेळीं पगारी काम करणाऱ्या स्त्रियांच्या संख्येंत मात्र वाढ झाली आहे. १८९० सालीं १० किंवा अधिक वय असलेल्या स्त्रियांपैकीं १९·५ टक्के स्त्रिया पगारी काम करीत होत्या. १९५३ सालीं हें प्रमाण २९·७ टक्के होते.[1] परंतु हा फरक होण्याचे एक कारण असे कीं, अन्न शिजवणे व कपडे शिवणें किंवा मुलांची जोपासना करणे ही जी कामें पूर्वी घरांत केली जात असत तीं आतां पुष्कळशा प्रमाणांत बाहेर केली जातात. त्यामुळे पूर्वी ज्या स्त्रिया घरांत कामें करीत असत त्या आतां बाहेर कामें करूं लागल्या आहेत. बालसंगोपन गृहांत जी स्त्री काम करते ती आतां कामगार वर्गांत सामील झाली आहे. आणि ज्यांच्या मुलांचे ती संगोपन करते त्या देखील आतां काम करूं लागल्या आहेत.

गेली ७५ वर्षें दहाहून अधिक वय असलेल्या पुरुषांपैकीं ७५ टक्के पुरुष पगारी काम करीत आहेत. आतां काम करणाऱ्या अल्पवयीन पुरूषांची संख्या कमी झाली आहे त्याचप्रमाणे ६५ हून अधिक वय असलेल्या पुरुषांपैकीं थोडेच पुरूष आतां कामावर जातात. परंतु वीस ते पासष्ट इतकें वय असलेल्या लोकांच्या संख्येंत आतां वाढ झाली आहे. आणि या वयगटांतील लोकांत कामगारांचे प्रमाण खपूच मोठे असते.[2]

---

१ अमेरिकाज् नीडस् ॲण्ड रिसोर्सेस, पृष्ठें ७२६-२७.

२ अमेरिकाज् नीडस् ॲण्ड रिसोर्सेस्, पृष्ठें ७२५-२६.

वस्तूंची सीमागत गरज कमी झाल्यावर पहिल्याने म्हाताऱ्या व अल्पवयीन माणसांची कामांतून सुटका व्हावी हे तर्कसंगत आहे. परंतु ह्या प्रवृत्तीचा सुसंगतपणे व व्यापक दृष्टीने आपण अजून विचार केलेला नाहीं. निवृत्तीवयाच्या पलिकडे गेलेल्या लोकांच्या श्रमाची आतां आपल्याला गरज नाहीं. कारण ते ज्या वस्तूंचे उत्पादन करतात त्यांची तितकीशी निकड राहिलेली नाहीं. उलट दरिद्री समाजाला प्रत्येक माणसाकडून जास्तीतजास्त काम करून घ्यावे लागते. कामगारानां निवृत्त व्हायची जरी आपण आता संधी देत असलों तरी जे निवृत्त होतात त्यांचे उत्पन्न व रहाणीचे मान मात्र आपण एकदम कमी करून टाकतो. परंतु उत्पादनाचे महत्त्व कमी झाल्यामुळे जर आपण लोकांना विशिष्ट वयानंतर निवृत्त होण्याची संधी देऊ शकतो तर त्याच कारणास्तव आपण त्या निवृत्त कामगारांना चांगल्या प्रकारें रहाण्याची संधी दिली पाहिजे. त्याचप्रमाणे अल्पवयांत काम केले तर तें प्रकृतीला अपायकारक व कष्टदायक असते यासाठीं व मुलांना शिक्षण घेण्याची संधी देण्यासाठीं आपण अल्पवयीन कामगार जे उत्पादन करतात त्यावर पाणी सोडले असले तरी त्यांना पुरेसें व समाधानकारक शिक्षण मिळावे अशी व्यवस्था आपण केलेली नाहीं. अल्पवयीन कामगारांच्या उत्पादनावर पाणी सोडण्याइतके जर आपण सधन आहोत तर त्या कामा ऐवजी त्यांना शिक्षण देण्याइतकी देखील सुवत्ता आपल्या समाजांत आहे असा निष्कर्ष काढायलाही हरकत नाहीं.

अल्पवयीन व वृद्धलोकांना आपण कामांतून मुक्त केले आहेच. त्याचप्रमाणें आपल्या सर्व श्रमशक्तीचा आपण सर्वकाळ उपयोग करण्याची देखील आवश्यकता नाहीं, ह्या शक्यतेचा विचार आपण १७ व्या प्रकरणांत केलेला आहे. वस्तूंची सीमागत उपयुक्तता जर अल्प असेल तर शेवटल्या माणसाला किंवा शेवटल्या दहा लाख माणसांना आपण काम दिलेच पाहिजे अशांतला भाग नाहीं. अशी सवलत जर आपण स्वतःला दिली तर आपली अर्थव्यवस्था अशा एका पातळीवर कार्य करील कीं, जेथे उपलब्ध साधनांच्या द्वारें तिचे नियंत्रण करणे आपल्याला अधिक सोपें जाईल. आर्थिक उत्पादनांत अशा प्रकारें अधिक प्रमाणांत फेरफार करण्याची सवलत आपण घेणे इष्ट आहे. तसे केले कीं, मुद्रास्फितीला आळा बसेल व सामाजिक समतोलांत विघाड होण्याचे टळेल.

आपल्याला जर असे करायचे असेल तर अल्पकाळ बेकार रहाणाऱ्या लोकासाठीं आपण अधिक तरतूद करायला हवी. असे करणे शक्य आहे व ते स्थैर्याला पोषक आहे, हें आपण पाहिलेंच आहे. शिवाय बेकारीभत्त्याची अशी अधिक चांगली तरतूद करणे हे सध्याच्या परिस्थितीशी सुसंगत आहे. उत्पादनाची आपल्याला जर तितकीशी गरज नसेल व त्यामुळे आर्थिक स्थैर्यासाठीं थोडीफार बेकारी सहन करणे

जर आपल्याला शक्य असेल तर बेकारांना नेहमीसारखें जगतां यावे अशी तरतूद करणे देखील आपल्याला शक्य आहे. बेकार कामगार ज्या वस्तूंचे उत्पादन करतात त्यांच्यावांचून जर आपले अडत नसेल तर त्यांना नित्य लागणाऱ्या वस्तू पुरवणे देखील आपल्याला अशक्य नाहीं.

[४]

खरें म्हणजे आपल्याला आज एक मोठी संधी प्राप्त झाली आहे. श्रम करण्याच्या आवश्यकतेचे आर्थिक जीवनांतून उच्चाटन करणे आतां आपल्याला शक्य झाले आहे. वस्तुतः आपल्या समाजाने ते आपलें प्रधान आर्थिक उद्दिष्ट करायला हवे. हा आदर्श कांही अव्यवहार्य नाहीं. त्या दिशेने आपण खूपच प्रगति केली आहे. परंतु आपण आपली इतकी मोठी फसवणूक करून घेत आहोत कीं, त्यामुळे काय घडते आहे ते आपल्याला दिसूं शकत नाहीं.

सर्वकाळांतील सर्व समाजांत श्रममुक्त लोकांचा एक वर्ग असतो. या वर्गांतील माणसांना काम करावे लागत नाहीं. आधुनिक काळांत आणि विशेषतः युनायटेड स्टेस्टस्‌मध्ये हा श्रममुक्तवर्ग नष्ट झाला आहे. निदान त्या वर्गाचे अस्तित्व आपल्या नजरेस येत नाहीं. श्रम न करणे हे उपयुक्त असूं शकते हे आपण आतां मान्य करीत नाहीं. इतकेच नव्हे तर ते अप्रतिष्ठितपणाचें आहे असें आपण मानतो.

परंतु या श्रममुक्त वर्गाच्या जागीं आपल्या समाजांत असा एक फार मोठा वर्ग निर्माण झाला आहे कीं, ज्याला करावे लागणारे काम हे कष्टकारक व दमवणारे नसते. हा जो नवा वर्ग निर्माण झाला आहे त्याच्या अस्तित्वाची दखल आपण घेतलेली नाहीं. सामाजिक शास्त्रांतील एका अत्यंत भ्रामक समजूतीमुळे हे असे झाले आहे. ती समजूत अशी कीं, सर्व काम हे मूलतः सारखेंच असते. मग ते शारीरिक असो, मानसिक असो, कलात्मक असो किंवा संचालनाचे असो.

सगळे काम एकाच वर्गांत मोडते, असे सिद्ध करण्याचा हा जो प्रयत्न आहे त्याला वेगवेळ्या कारणासाठीं अनेक व भिन्न गटांचा पाठिंबा मिळाला आहे. असे मानल्यामुळे विषय सोपा होतो व नुकसान कांहीच होत नाहीं; अशी भूमिका अर्थशास्त्रज्ञांनी घेतली आहे. सर्व काम एकाच वर्गांत ढकलल्यामुळे त्यांना वेगवेगळ्या प्रकारच्या श्रमांचा एकत्रितपणे विचार करणे शक्य झाले आहे. तसेच मजूरी मिळवणाऱ्या सर्वांना लागूं पडेल अशी मजुरीची सर्वसमावेशक उपपत्ती देखील त्यांना मांडता आली आहे. या उपपत्तीबद्दल वेळोवेळीं शंका उपस्थित झाल्या. परंतु एक तर त्या दडपून टाकण्यांत आल्या किंवा कांही विशिष्ट बाबतींतच त्या

खऱ्या आहेत असे मानण्यांत आले.[१] सर्व प्रकारचें काम एकाच वर्गात मोडते, यावाबत भांडवलशाही तत्त्वज्ञान व कम्युनिस्ट तत्त्वज्ञान यांचे पूर्ण एकमत आहे. कारखान्यांत ज्या प्रकारचे काम केले जाते त्याच प्रकारचे काम आपल्या सुसज्ज कचेरींत आपण करतो ही भावना एखाद्या कॉर्पोरेशनच्या अध्यक्षाला मोठी सुखकारक वाटते. आपल्याला अधिक अवघड व जवाबदारीचे काम करावे लागते व म्हणून आपल्याला अधिक पगार मिळणे न्याय्य आहे असे तो मानतो कीं, कारखान्यांत अगर सामूहिक शेतावर ज्या प्रकारचे काम आपणहि करतो त्यामुळे तात्त्विकदृष्ट्या त्यांच्यात व आपल्यांत कोणताच भेद नाही. या दोन्ही समाजांतल्या वरीष्ट वर्गाची अशी इच्छा असते कीं, शारीरिक कष्टाचे काम करणाऱ्या वर्गाशीं आपण एकरूप व्हावे. लोकशाहीवरील श्रद्धेमुळे त्यांना असे वाटते आणि कामाच्या वरील व्याख्येमुळें त्यांची ही इच्छापूर्ण होते. ज्यांचे काम सुखकारक असते व उत्पन्न अधिक असते त्यांना आपण कांहीतरी गुन्हा करीत आहोत अशी एक सुप्त जाणीव असते. 'मी देखील एक कामगारच आहे' असे म्हणून ही जाणीव दडपून टाकतां येते; किंवा अधिक वीटाईने असे देखील म्हणतां येते कीं, 'शारीरिक श्रमापेक्षां वौद्धिक श्रमांचा ताण अधिक पडतो.' ह्या विधानाला कोणीच हरकत घेऊं शकत नाहीं. कारण जो मनुष्य शारीरिक श्रम करतो त्याच्या जवळ स्वतःचे काम व वौद्धिककष्ट करणाऱ्याचे काम यांची तुलना करण्याइतकी बुद्धि नसते.

खरे म्हणजे निरनिराळ्या लोकांचें काम अगदीं वेगळ्या प्रकारचे असते व त्याकडे ते अगदीं वेगळ्या दृष्टीने पहात असतात. बहुसंख्य लोकांच्या दृष्टीने काम हे डोक्यावर लादलेल्या ओझ्यासारखे असते. कांही न करण्यापेक्षां तें काम करणे अधिक चांगले असते हें खरें. विशेषतः उत्पादनाविषयीं समाजाचा जो सध्यांचा दृष्टीकोन आहे त्यामुळे काम करणे अधिक बरें असें या लोकांना वाटते. परंतु

---

१ मार्शलने कामाची व्याख्या पुढील प्रमाणे केली आहे. 'काम म्हणजे कांहीतरी फायदा करून घेण्याच्या दृष्टीने अंशतः किंवा पूर्णपणे केलेली शारीरिक किंवा मानसिक मेहनत. ती मेहनत करण्यापासूनच प्रत्यक्षपणे जे सुख होते त्याचा या फायद्यात समावेश होत नाहीं. (प्रिन्सिपल्स् ऑफ इकॉनॉमिक्स् पृष्ठ ६५). ह्या व्याख्येत असे मान्य केलेले आहे कीं, काम करण्यापासून मिळणारा आनंद हाच ज्यांना पुरेसा असतो असा माणसांचा एक वर्ग असतो. परंतु या वर्गाचे अस्तित्व एकदां मान्य केल्यानंतर त्याला मार्शलने आपल्या विवेचनांत अधिक स्थान दिलें नाहीं. त्या नंतरहि अर्थशास्त्रांत त्या वर्गाचा अभ्यास करण्यांत आलेला नाहीं.

त्यांच्या दृष्टीने हे काम कंटाळवाणे आणि दमविणारे असते. किमान पक्षी ते सुखकारक तरी नसतेच नसते. कामापासून जर कोणता लाभ होत असेल तर तो म्हणजे खिशांत पडणारा पगार.

हे लोक सोडले तर इतरांना जे काम करावे लागते ते अगदी वेगळ्या प्रकारचे असते. ते आनंददायक असणार हे मुळीं गृहीतच धरलेले असते. ते तसें नसलें तर त्या लोकांना तीव्र असमाधान वाटते, वैफल्याची भावना त्यांच्या मनांत निर्माण होते. जाहिराततज्ञ, श्रीमंत उद्योगचालक, कवि किंवा प्राध्यापक यापैकीं कोणालाहि आपले काम अर्थशून्य आहे असे वाटूं लागले तर तो मानसिक रोगांच्या डॉक्टराचा सल्ला घेतो. त्याने असे करावे यांत कोणालाच कांही गैर वाटत नाहीं. उद्योगचालक किंवा शास्त्रज्ञ यांचा आयुष्यांतील प्रधान हेतु पगार मिळवणे हा असतो असें म्हणणे हा त्यांचा अपमान आहे. पगाराला महत्त्व नसतें अशांतला भाग नाहीं. त्यामुळे अनेक फायदे होतात आणि मुख्यतः तो प्रतिष्ठेचा निदर्शक असतो. अशा प्रकारचे काम केल्यामुळे जे समाधान मिळते त्याचे एक महत्त्वाचे कारण म्हणजे त्यापासून प्राप्त होणारी प्रतिष्ठा. ते काम करणाऱ्या माणसाबद्दल इतरांना आकर्षण, कौतुक व आदर वाटत असतो. परंतु सामन्यपणे अशा प्रकारचे काम जे लोक करतात त्यांची अशी भावना असते कीं, लाभ होवो किंवा न होवो आपण आपले काम उत्कृष्ट प्रकारे करू. प्रत्यक्षांत असे नाहीं असें जर सुचवलें तर हे लोक फार अस्वस्थ होतील.[1]

नव्या वर्गाला करावे लागणारे काम हे अशा प्रकारचे असते. एखाद्या मध्ययुगीन उमरावाला आपले खास हक्क गेल्यामुळे जितके दुःख कधीहि झाले नसेल

१ प्राप्तीकराचा दर खूप वाढला आहे आणि त्यामुळें आर्थिक प्रोत्साहने दुर्बल होतील असा इषारा वारंवार देण्यांत येत असतो. परंतु तरी देखील प्राप्तीकराचा अनिष्ट परिणाम झालेला नाहीं. याचे एक महत्त्वाचे कारण आपल्याला वर निर्देशिलेल्या गोष्टींत सांपडते. जादा प्राप्तीकर या नवा वर्गांतील मंडळींना द्यावा लागतो. हे लोक पैशासाठीं काम करीत नाहीत. निदान प्राप्तीकराच्या अनिष्ट परिणामाबद्दल जेव्हा ते बोलत नसतात तेव्हा ते असे म्हणतात. यामुळे प्राप्तीकराचा आर्थिक प्रोत्साहनांवर अनिष्ट परिणाम होत नाहीं. प्राप्तीकरामुळे प्रतिष्ठेला बाधा येत नाहीं कारण प्राप्तीकर भरण्यापूर्वी माणसाचे जे उत्पन्न असते त्यावरून त्याची प्रतिष्ठा ठरते. मोटारीच्या कारखान्यांत काम करणाऱ्या कामगारांना जादा कामाबद्दल जो भत्ता मिळतो त्यावर जर जादा प्राप्तीकर बसवण्यांत आला तर ते कामगार जादा काम करायचे पुष्कळशा प्रमाणांत थांबतील. त्या क्षेत्रांत प्रोत्साहन म्हणून पगाराला महत्त्व असते.

तितके दुःख ज्यापासून केवळ पगार मिळतो असें साधे काम करावें लागले तर ह्या वर्गांतल्या माणसाला होईल. दुसऱ्या जागतिक युद्धानंतरच्या काळांत माध्यमिक शाळांतल्या कांहीं शिक्षकांनीं आपल्या नोकऱ्या सोडल्या आणि कारखान्यांत अधिक पगाराच्या नोकऱ्या धरल्या. ही वातमी वृत्तपत्रांत मोठे मथळे देऊन छापण्यांत आली कारण ज्यामुळे नव्या वर्गात समावेश होऊन प्रतिष्ठा प्राप्त होत होती असा व्यवसाय त्या शिक्षकांनी सोडून दिला होता. शाळेतल्या शिक्षकाच्या मानाने महाविद्यालयांतील प्राध्यापकाला या नव्या वर्गांत अधिक निश्चित स्थान आहे. आणि त्यामुळे आपला पगार कितीहि अपुरा आहे असे जरी त्याला वाटलें तरी तो अशा प्रकारे आपला व्यवसाय सोडून देणार नाहीं. विक्षिप्तपणा करायचा म्हणून देखील तो असे करणार नाहीं.

पूर्वीपासून उच्च वर्गीय लोक जें करीत आले आहेत तेंच करण्याचा प्रयत्न हा वर्ग देखील करीत असतो. म्हणजेच आपले अस्तित्व कायम टिकवण्यासाठीं तो धडपडत असतो. अधिक पैसे मिळावेत अशा प्रकारें आपल्या जीविताची आंखणी करण्यास ह्या वर्गांतली माणसे आपल्या मुलांना परवानगी देत नाहीत. (जीं मुलें-स्वतंत्र उद्योग सुरूं करतात त्यांच्या बाबतीत मात्र अपवाद करण्यांत येतो. त्याचे एक कारण असे कीं, उद्योगधंद्याच्या क्षेत्रांत उत्पन्न हे एका खास अर्थाने प्रतिष्ठेचे गमक असते.) परंतु अगदीं लहानपणापासून या वर्गांतील मुलांच्या मनावर असे ठसवले जाते कीं, ज्यापासून समाधान मिळेल अशा प्रकारचा व्यवसाय त्यांनी स्वतः करतां शोधून काढायला हवा. त्या व्यवसायांत ढोरमेहनत करायला लागता कामा नये, तर काम करणे हें आनंददायक असले पाहिजे. नव्या वर्गांतील माणसाचा मुलगा जर उच्च व्यवसायांत शिरूं शकला नाहीं आणि कंटाळवाणे आणि अर्थशून्य काम जर त्याच्या नशीबीं आले तर त्या माणसाला अतोनात दुःख होते. त्या वर्गांतल्या एखाद्या व्यक्तीवर जर असे दुर्दैव ओढवलें, म्हणजेच समजा एखाद्या शस्त्रवैद्याचा मुलगा मोटार दुरुस्तीच्या कारखान्यांत काम करायला लागला तर समाज त्याची कींव करतो. कांहींतरी भयानक घडलें आहे असे त्याला वाटते. परंतु आपल्यापैकीं कोणत्याहि व्यक्तीचे संरक्षण करण्याचे पुष्कळसे सामर्थ्य नव्या वर्गा जवळ असतें त्यामुळे प्रत्यक्षांत शस्त्रवैद्याचा मुलगा क्वचितच मोटार दुरुस्तीच्या कारखान्यांत काम धरतो. तो जरी कितीहि नालायक असला तरीदेखील कसाबसा आपल्या जातीला चिकटून राहूं शकतो. आणि जरी कदाचित् विजेता किंवा भांडवलाच्या निवेशाबाबतचा सल्लागार म्हणून तो जे काम करतो तें तितकेसे सुखदायक नसलें तरी ते सुखदायक आहे असे तो आग्रहपूर्वक सांगत असतो. असे सांगितल्यामुळे तो नव्यावर्गाचा सदस्य आहे हे सिद्ध होते.

[५]

नव्या वर्गाची दारें बंद केलेली नाहींत. तो वर्ग सोडून कोणी बाहेर जात नाही. परंतु दर वर्षी हजारो लोक त्या वर्गाला येऊन मिळत असतात. या वर्गाचा सदस्य होण्याची पात्रता मुख्यतः शिक्षणावरून ठरवली जाते.[१] जो मनुष्य कुमार वयांत असतांना त्याच्या शिक्षणावर पुरेसा पैसा व वेळ खर्च केला जातो व शाळा कॉलेजांतील अभ्यास पुरा करण्याइतकी बुद्धिमता ज्याच्या अंगी असते तो मनुष्य ह्या वर्गाचा होऊं शकतो. या वर्गात देखील चढत जाणाऱ्या श्रेणी असतात. इलेक्ट्रिकल एंजिनिअर झालेला कामगाराचा मुलगा जर विश्वविद्यालयांतील उच्च अभ्यासक्रम पुरा करून पदार्थविज्ञानशास्त्राचा प्राध्यापक झाला तर तो वरच्या श्रेणींत प्रवेश करतो. परंतु या दोन्ही बाबतींत शिक्षण हाच या नव्या वर्गांत प्रवेश करण्याचा गुप्त मंत्र असतो. गेल्या शंभर वर्षांत आणि विशेषतः गेल्या कांहीं दशकांत या नव्या वर्गातील लोकांची संख्या खूपच फुगली आहे यांत शंका नाहीं. एकोणिसाव्या शतकाच्या सुरवातीला इंग्लंडमध्यें किंवा युनायटेड स्टेस्टस्‌मध्यें हा वर्ग फार छोटा

---

१ राजकीय कतृत्वामुळे देखील ही पात्रता सिद्ध होते. शिक्षणाचे वय संपल्यानंतर ज्यांना या वर्गात प्रवेश करावा असे वाटते त्यांच्या दृष्टीने ही गोष्ट महत्वाची आहे. नगरपालिकेचे किंवा शिक्षणसमितीचे सदस्य होण्यासाठीं, शेरीफ म्हणून निवडून येण्यासाठीं किंवा अन्य स्थानिक राजकीय अधिकार स्थानें मिळवण्यासाठीं जी मोठी चुरशीची लढत चाललेली असते तिच्यामागे नव्या वर्गाचा सदस्य होण्याची इच्छा असते. राजकीय अधिकार स्थानावर नेमणूक व्हावी म्हणून जो सतत प्रयत्न चाललेला असतो त्याच्या मूळाशीं देखील हीच इच्छा असते. नव्या वर्गाचे जे आधींच सदस्य झालेले असतात त्यांना या अधिकारस्थानासाठीं इतकी धडपड कां व्हावी ते कळत नाहीं. कमी शिकलेल्या लोकांत ह्या अधिकारस्थानासाठीं जी चुरस लागलेली असते तिचा अर्थ या लोकांना कळूं शकत नाहीं. त्यांना हें कळत नाहीं कीं अशिक्षित लोकांना उपलब्ध असलेली सर्वांत मोठी संधी म्हणजे हीं अधिकारस्थाने मिळवण्याची शक्यता. स्थानिक कारभारांत ज्या पुष्कळशा चांगल्या गोष्टी (आणि कांहीं वाईट गोष्टी देखील) घडतात. त्या नव्या वर्गात प्रवेश करण्यासाठी धडपडणाऱ्या या माणसांच्या प्रयत्नांमुळे घडतात. राजकीय कतृत्व ज्याच्या अंगी आहे अशा व्यक्तीला संधी मिळण्याचे दुसरें स्थान म्हणजे कामगार संघटना या संदर्भात हार्वे स्वॅडॉस यांनी लिहिलेल्या ऑन द लाइन (वॉस्टन, ॲटलँटिक - लिटल्, ब्राऊन, १९५७) या पुस्तकांतील शब्दचित्रें पहावीत.

होता. श्रममुक्त वर्गापासून हा नवा वर्ग भिन्न होता. कारण कमावलेल्या उत्पन्नावर तो उपजीविका करीत असे. या वर्गात तेव्हा मूठभर शिक्षक व धर्मोपदेशक होते. आणि थोडेसे लेखक, पत्रकार व कलावंत देखील होते. १८५०च्या आसपास युनायटेड स्टेस्टस्‌मध्यें ह्या व तिील लोकांची संख्या कांही हजाराहून अधिक नव्हती. परंतु ज्यांना आपल्याला पगारापेक्षां आपले काम अधिक वाटते म्हणजेच जे नव्या वर्गाचे सदस्य आहेत असे लक्षावधि लोक आज आपल्या देशांत आहेत.

नव्या वर्गाच्या सदस्यत्वाचे इतके आकर्षण वाटण्याचे एक कारण असे कीं, त्या वर्गांत गेल्यामुळें आपण कोणीतरी उच्च आहोत असे माणसाला वाटते. वर्गभावनेचे हें एक गमक आहे. परंतु या वर्गाच्या सदस्यत्वाचे इतरहि अधिक महत्वाचे फायदे असतात. मग शारीरिक कष्ट करावे लागत नाहीत. कंटाळवाणे काम आणि आंखीव शिस्त यापासून सुटका होते. स्वच्छ आणि सुखकारक वातावरणांत आपले जीवन कंठता येते. आपले रोजचें काम करतांना बुद्धीचा उपयोग करण्याची थोडीफार संधी मिळते. या गोष्टी ज्यांना नित्य मिळत असतात त्यांना त्यांचे महत्व वाटत नाहीं, परंतु इतरांना अवश्य वाटते. आणि त्यामुळेच नव्या वर्गांतील लोकांची संख्या इतकी वाढली असून देखील त्याचा आकर्षकपणा कमी झालेला नाहीं.

वरील परिस्थितीवरून निष्कर्ष असा निघतो कीं, या वर्गाची वेगाने वाढ करणें हे समाजाचें एक प्रधान उद्दिष्ट झालें पाहिजे. शांतता टिकविणें व जिवंत रहाणे याच्या खालोखाल वरील उद्दिष्टच महत्त्वाचें आहे. ह्या वर्गाचा विकास शिक्षणावर अवलंबून असतो. तेव्हां शिक्षणांत किती भांडवल गुंतवले जाते हेंच सामाजिक प्रगतीचे मूलभूत गमक आहे असे आपण मानले पाहिजे. इथें शिक्षण घेणाऱ्यांच्या संख्येतील वाढ व गुणवत्तेंतील वाढ या दोन्हीहि अभिप्रेत आहेत. ह्या शिक्षणामुळें लोकांची एक फार मोठी आकांक्षा पुरी होऊं शकते. त्यामुळें सामाजिक विकास अशा प्रकारें घडवून आपणें यांत एक प्रकारची अंतर्गत सुसंगती आहे.

अलिकडच्या अनुभवावरून असे दिसून आले आहे कीं, उत्पन्न व सुबत्ता यांत वाढ झाली, कीं नव्या वर्गांत मोडणाऱ्या व्यवसायांत काम करणाऱ्या व्यक्तींची संख्या त्याहून अधिक प्रमाणांत वाढते. त्यामुळें नव्या वर्गांचा विकास करणे हे जर समाजाचे उद्दिष्ट असेल तर तें गाठण्यास वाढत्या सुबत्तेची फार मदत होईल. सुबत्ता वाढली कीं शिक्षणावर भर दिला जाईल आणि त्याचा अंतिम परिणाम म्हणून बौद्धिक, वाङ्मयीन, सांस्कृतिक व कलात्मक मागण्यांत वाढ होईल. त्याचवेळीं साधे कष्टप्रद काम करणाऱ्या लोकांची संख्या कमी होईल. पण असे झाले तर त्यांत गैर कांहींच नाहीं उलट ते इष्टच आहे. ढोरमेहनतीचें काम अन्य मार्गांनीं कसें करता येईल याचा शोध करणे हें नव्या वर्गाच्या कल्पकतेचें आणि बुद्धिमत्तेचें एक महत्त्वाचे कार्य असते.

असे काम करणारी माणसे मिळेनाशी झाली व त्यांना अधिक पगार द्यावा लागला कीं, त्यांची जागा अन्य साधनांनीं भरून काढण्याची प्रक्रिया अधिक वेगाने होऊं लागली. ढोरमेहनत करणाऱ्या लोकांची संख्या कमीं करणे व नव्या वर्गाचा विकास करणे ह्या गोष्टी मूलतः एकच आहेत.

ढोरमेहनत करणाऱ्या लोकांची संख्या जर कमी झाली तर त्यांत चिंता करण्यासारखें कांहींच नाहीं. आज असे काम करायला पुरेसे लोक मिळणार नाहींत याची आपल्याला काळजी वाटत नाहीं; तर अशा लोकांची संख्या आवश्यकतेपेक्षा अधिक असेल याची आपल्याला चिंता वाटते. नव्या वर्गातील लोकानी लावलेल्या शोधांमुळें स्वयंचलित यंत्रांचा आता इतका विकास झाला आहे व होणार आहे कीं, काम करायला तयार असलेल्या सर्व लोकांना काम देणे आपल्याला अशक्य होणार आहे. हाच धोका अधिक मोठा धोका आहे.

[६]

इथे मांडलेले विचार तर्कसंगत व व्यवहार्य आहेत असे सर्वसामान्य वाचकाला पटण्याची शक्यता अधिक आहे. उत्पन्न वाढविण्यासाठी जर निरस व कंटाळवाणें काम करावे लागत असेल तर ते वाढवण्यासाठी इतके धडपडण्यांत काय अर्थ आहे ? विशेषतः वस्तूंचे वैपुल्य असले व त्यांची गरज तितकीशी तीव्र नसली तर माणसांनीं ही धडपड कशाला करावी ? त्यापेक्षां दिवसांतले सगळे तास अधिक सुखांत जावे यासाठी त्यानीं कां प्रयत्न करूं नयेत ? समाजांतल्या सुबुद्ध माणसांची हीच आकांक्षा आहे हे उघड आहे. आणि या लोकांची संख्या वाढते आहे. मग समाजाने देखील हेंच आपले प्रधान उद्दिष्ट कां करूं नये ? या विवेचनांचा मतीतार्थ असा कीं, प्रगतीचा एक नवा आराखडा आपल्याला उपलब्ध झाला आहे. वस्तूरूप भांडवला ऐवजी शिक्षणांत वाढ करणे किंवा अधिक व्यापक भूमिका घ्यायची तर माणसांत गुंतविलेल्या भांडवलांत वाढ करणे हाच आतां प्रगतीचा खरा मार्ग आहे. परंतु सांकेतिक शहाणपणाच्या अधिक सुसंस्कृत पुरस्कर्त्यांना—दुर्दैवाने कांहीं व्यावसायीक अर्थशास्त्रज्ञांचा देखील यांत समावेश होतो—अशा प्रकारचे उद्दिष्ट समाजापुढें ठेवणे अत्यंत अयोग्य आहे असे वाटेल. गरज असो वा नसो वस्तूंच्या उत्पादनांत होणारी वाढ हें आपल्या प्रगतीचे सर्वमान्य परिमाण झाले आहे. हें उत्पादन आणि ते वाढवण्याची साधने ही डोळ्यांस दिसतात व त्यांची मोजदाद करता येते. आणि जें मोजतां येते ते अधिक चांगले असते, परंतु परंपरागत कष्टमय कामापासून लोकांची मुक्तता करून जर त्यांना अधिक सुखकारक काम करायला लावले तर त्या द्वारें आपण काय साधले याची मोजदाद करतां येत नाहीं. पोलदाच्या भट्टींत जर भांडवल

गुंतवले तर ते भांडवल आपल्याला दिसूं शकते व त्याचे मूल्य आपल्याला मोजतां येते. परंतु माणसांत भांडवल गुंतवले तर असे करता येत नाहीं. आणि म्हणून ते कमी प्रतीचे ठरते. या संदर्भात सांकेतिक शहाणपण एक मोठा मर्मभेदी शब्द प्रयोग करते. माणसांत गुंतवलेल्या भांडवलाची मोजदाद करता येत नसल्यामुळें एक सामाजिक उद्दिष्ट या नात्याने शिक्षण ही एक 'गोलमाल' गोष्ट आहे असे आरोप तें करते. हा आरोप प्राणघातक मानला जातो. सामान्यतः जें जुने व परिचित असतें त्याचें स्वरूप निश्चित असते. ते जुने व परिचित असल्यामुळेंच त्याची व्याख्या व मोजदाद करण्यांत आलेली असते. अशा रीतीने कोणत्याहि गोष्टीला निश्चितपणा हवा असा आग्रह धरून सांकेतिक शहाणपण स्वतःचे संरक्षण करीत असते. आणि हें शस्त्र प्रभावी असते यांत शंका नाहीं.

असें असलें तरी ज्यांना हे विवेचन सयुक्तिक आहे असे वाटत असेल त्यांनीं अगदींच निराश होण्याचे कारण नाहीं. कारण प्रस्तुत संदर्भात वस्तुस्थिती सांकेतिक शहाणपणाच्या पुष्कळच पुढें गेली आहे. नव्या वर्गाचे सदस्य होण्याचे प्रयत्न आज सर्व लोक करीत आहेत आणि त्या वर्गाचा विकास अत्यंत वेगानें होत आहे. म्हणून इथें मांडलेले आर्थिक व सामाजिक उद्दिष्ट कांहीं नवें नाहीं. आजच तें अप्रत्यक्षपणे बहुसंख्य लोकांनीं मान्य केलेले आहे. आपण फक्त त्याचें अस्तित्व उघड करीत आहोत. अशा परिस्थितींत सांकेतिक शहाणपण फार काळ प्रतिकार करीत राहूं शकणार नाहीं. सांकेतिक शहाणपणाचा अधिकृत पुरस्कर्ता असलेला अर्थशास्त्रज्ञ असें मानतो कीं, समाजाचें व व्यक्तीचें उत्पन्न कमाल मर्यादेपर्यन्त वाढविणें हेंच जीवनाचे प्रधान उद्दिष्ट आहे. परंतु ही कसोटी तो स्वतःच्या जीवनाला मात्र लावत नाहीं. नव्या वर्गाच्या म्हणून ज्या सर्व आकांक्षा आहेत त्या त्याच्या स्वतःच्या जीवनांत व्यक्त होत असतात. आपल्या मुलांना शिक्षण देतांना व उपदेश करतांना त्याच्या नजरे समोर एकच गोष्ट असते. त्यांनी जास्तीत जास्त उत्पन्न मिळवण्याचा प्रयत्न करावा अशी त्याची अपेक्षा नसते. तसें करणें त्याला घृणास्पद वाटतें. ज्यांत मन रमेल व ज्यापासून संतोष मिळेल असा व्यवसाय त्यांनीं करावा हीच त्याची मुख्य इच्छा असते. या बाबतींत आपल्या विद्वान् पित्याला तीं आदर्शवत मानतील अशी त्याला आशा असते.

प्रकरण पंचविसावें

संरक्षण आणि बचाव

खाजगी क्षेत्रातील वस्तूंच्या उत्पादनांतील वाढ हें सध्यां आपल्या समाजांत सामाजिक कर्तृत्वाचे मूलभूत गमक मानले जाते हें आपण पाहिलें आहे. या गोष्टीचें कारण अंशतः आपल्याला वैचारिक परंपरेत सांपडेल. ज्या जगांत जीवन हें उत्पादनावर अवलंबून होते त्या जगाला आजच्या जगाशीं जोडण्याचे कार्य ही परंपरेची सांखळी करीत असते. कांहीं अंशीं प्रस्थापित हितसंबंध वरील गोष्टीला जवाबदार आहेत. कांहीं अंशीं ग्राहकांच्या मागणीच्या आधुनिक उपपत्तींतील दोषांतून ती निर्माण झाली आहे. कांहीं अंशीं राष्ट्रीय संरक्षणाविषयींचा चुकीचा दृष्टीकोन त्या भूमिकेच्या मागें आहे. आणि उत्पादन व आर्थिक सुरक्षितता यांचे जें निकटचे नातें आहे त्यामुळें देखील उत्पादनाला महत्व देणें आपल्याला कांहीं अंशी भाग पडले आहे. परंतु आपण उत्पादनाला इतके कां महत्व देतो त्याची कारणें सांगा असा जर आग्रह धरला—बहुधा असा आग्रह धरला जात नाहीं—तर बहुतेक लोक असें म्हणतील कीं, उत्पादनामुळें बहुसंख्य स्त्री पुरुषांना सुख मिळतें आणि म्हणून तें महत्वाचे आहे. हें एवढें कारण त्यांना पुरेसें वाटतें.

सुखाचा शोध हे एक फार चांगले सामाजिक उद्दिष्ट आहे. परंतु सुख म्हणजे काय हें तात्विक दृष्टया निश्चित झालेलें नाही. सुख म्हणजे खरोखर काय असतें आणि तें कुठून प्राप्त होतें ह्या बाबतींत मुळींच एकमत नाहीं. 'जीवन प्रवाहाशीं स्वयंप्रेरणेने घडून आलेले गाढ मीलन'[1] म्हणजे सुख हें आपल्याला माहित आहे. परंतु कशाचे मीलन होते ते मात्र आपल्याला माहिती नाहीं. विद्वानांच्या चर्चेत जर शब्दांच्या निश्चित व्याख्या केलेल्या असल्या तर त्यामुळे विचारांच्या देवघेवीस जशी मदत होते त्याचप्रमाणे नकोसे वाटणारे विचार झिडकारून टाकण्यास देखील मदत होते. हे विचार निश्चित व स्पष्ट नाहीत असें म्हणून उत्पादनाला आपण जे सध्यां महत्व देत आहोत त्यामुळे आपल्या सुखांत भर पडत नाही असा जर साधा युक्तीवाद आपण केला असता तर त्यांतून कांहींच निष्पन्न झालें नसतें. कारण ज्या कल्पनांच्या सहाय्याने आपण हा युक्तिवाद केला असता त्या फार अस्पष्ट ठरल्या असत्या.

---

१ बट्रॉण्ड रसेल, द कॉन्क्वेस्ट ऑफ हॅपिनेस (लंडन, ॲलन् ॲण्ड अन्विन्, १९३०) पृष्ठ २४८.

उपभोग्य वस्तू आणि सुख यांच्या नात्यावर जर आपण सरळ सरळ हल्ला केला असता तर आणखी एक अडचण उपस्थित झालीं असती. स्पेन मधील वैलांवरोवरील झुंजीचे किंवा परंपरागत नृत्य नाट्याचे जसे कांहीं नियम असतात तसेच विद्वानातील चर्चेचे देखील नियम असतात आणि ते पाळावे लागतात. या वादविवादांत एखादा मनुष्य लोकांना मान्य असलेल्या मूल्यांवर हल्ला चढवून त्यांच्या जागीं स्वतःच्या मूल्यांची स्थापना करण्याचा प्रयत्न करीत आहे असें आढळून आलें तर त्यामुळे लोकमताचें पारडे त्या माणसाविरूद्ध झुकतें. तो अहंमन्य आहे असा आरोप त्याच्यावर करण्यांत येतो. पण हे केवळ तांत्रिक दृष्ट्यांच खरें असते. नियमांविषयीचे अज्ञान हा त्याचा खरा गुन्हा असतो. आणि त्याच्या गुन्ह्याला कांहीहि नांव दिले तरी वादविवादाच्या रिंगणांतून तो हद्दपार होतो. जडवाद आणि असंस्कृतपणा यांच्यावर ज्यांनी यापूर्वी हल्ला चढविला व सध्यांच्या आर्थिक उद्दिष्टांच्या ग्राह्यतेवद्दल शंका उपस्थित केल्या त्यांनी वादविवाद करतांना वरील चूक वारंवार केली. माणसाच्या सुखांत कशामुळे भर पडते यावद्दलचीं स्वतःचीं मते त्यांनी पुढें मांडली त्यामुळे त्यांच्यावर सहज असा आरोप करतां आला कीं, बहुसंख्य लोकांना मान्य असलेल्या साध्यासुध्या आर्थिक उद्दिष्टांच्या जागीं स्वतःला मान्य असलेल्या उच्च व सुसंकृत उद्दिष्टांची स्थापना करण्याचा प्रयत्न ते करीत आहेत. हा आरोप एकदां झाल्यावर वैचारिकदृष्ट्यां ते धुळीला मिळाले.

अशा प्रकारच्या हल्ल्यापासून प्रस्तापित विचारसरणीचा वचाव करण्यासाठीं उभारलेली तटवंदी किती कौशल्यानें वांधलेली आहे त्याची आतां वाचकाला कल्पना येईल. सुख म्हणजे काय आणि त्यांत कशामुळें भर पडते हा प्रश्नच मुळी टाळण्यांत आला आहे. इतक्या सहजपणे जे प्रश्न टाळतां येतात त्यांचीं उत्तरें फक्त गणितज्ञ किंवा रेडिओवरील प्रश्नोत्तरांच्या चढाओढींत भाग घेणारे लोक यांनाच द्यावीं लागतात. त्यामुळे प्रस्तुत विवेचनामध्यें एका विशिष्ट पद्धतीने विचारांची मांडणी करण्यांत आली आहे. वस्तूंच्या उत्पादनाला व अशाच इतर उद्दिष्टांना आपण आज जे महत्त्व देतो त्याला परंपरा व भ्रामक कल्पना कितपत कारणीभूत झाल्या आहेत त्याचा विचार इथें करण्यांत आला आहे. या भ्रामक कल्पनांतून आपण एकदां मुक्त झालो कीं, मग इतर कोणत्या गोष्टी करणे आपल्याला शक्य आहे त्याचा विचार आपल्याला मोकळेपणाने करता येतो. ह्या इतर गोष्टीचा माणसाच्या सुखाशी संबंध आहे असे मानायला पुरेशी जागा आहे. परंतु ह्या इतर गोष्टी व जीवन अधिक सुखदायक कशामुळे होते या विषयीच्या स्वतःच्या कल्पना यांची सांगड घालण्याचे काम वाचकाचे आहे. आणि अखेर तें काम लोकशाही जीवनपद्धतीचें आहे.

[२]

सुख आणि स्वास्थ निर्माण करण्यांत आणि कष्ट, ताण, दुःख व सार्वत्रिक अज्ञान या गोष्टी नष्ट करण्यांत आपण कितपत यशस्वी झालों आहोत याचा विचार करण्यापूर्वी समाजाने दुसरी एक अधिक महत्त्वाची गोष्ट करणें आवश्यक असतें. स्वतःचे अस्तित्व कायम रहावें यासाठीं शक्य तितकी तरतूद समाजाला करावी लागते.

या पुस्तकांत जे विचार मांडलेले आहेत त्यांचा या महत्त्वाच्या उद्दिष्टाशीं निकटचा संबंध आहे. ज्या गोष्टीमुळे समाजाचे अस्तित्व कायम ठेवणे इष्ट ठरते, त्याच गोष्टींवर ते अस्तित्व अवलंबून असते. याचे कारण अगदीं सोपें व निर्णायक आहे. ते असे कीं, भ्रामक कल्पना याच ह्या दोन्ही बाबतींत समजाच्या शत्रु असतात.

हा मुद्दा मांडणे तितकेसे अवघड नाहीं. आणि या पुस्तकांत जे इतर मुद्दे मांडलेले आहेत त्यांच्या मानाने हा मुद्दा पटवून देणे कदाचित् अधिक सोपें आहे. ह्या बाबतींत देखील सांकेतिक शहाणपणाचा पाया परिस्थितीने अत्यंत वेगाने भुसभुशीत करून ठेवला आहे.

राष्ट्रीयसंरक्षणाचे अर्थशास्त्र ज्यांत मांडलेले आहे ते बारावें प्रकरण लिहून झाल्याला आज (१९५७ सालची अखेर) दोन वर्षें झाली आहेत. सरसकट उत्पादनांतील वाढीचा राष्ट्रीयसंरक्षणाशीं तसा फारसा संबंध नाहीं, आणि या दोन गोष्टींचा तसा संबंध आहे असे मानणे निश्चितपणे विघातक आहे, हा विचार लोकांना इतक्या लवकर पटेल असा विश्वास त्यावेळीं वाटत नव्हता.

परंतु त्या नंतर शास्त्रीय व तांत्रिक क्षेत्रांत सोव्हिएट युनिअनने प्रचंड प्रगति केली आहे याचें आपल्याला प्रत्यंतर आले आहे. सरसकट राष्ट्रीय उत्पादन फार थोडें असल्यामुळें ह्या प्रगतींत अडथळा निर्माण झाला असे कोणीच म्हटलेलें नाहीं. किंवा म्हटलें असले तर फार थोड्या लोकांनीं म्हटलें आहे. जे लोक उत्पादनाचा पुरस्कार इतक्या खणखणीत आवाजांत करीत होते ते ह्या बाबतींत मूग गिळून बसले आहेत. इष्ट उद्दिष्टें गांठण्यासाठीं आवश्यक त्या साधनांचा योग्य प्रकारें उपयोग न केल्यामुळें आपण या बाबतींत मागें पडलो आहोत हें भातां स्पष्ट झालें आहे. ज्या आठवड्यांत रशियाने पहिला उपग्रह आकाशांत धाडला त्याच आठवड्यांत मोटारींच्या नव्या नमुन्यांची एक झगमगती मालिका आपण लोकांच्या पुढें ठेवली ह्या गोष्टीचा देखील कांहीं लोकांनीं उल्लेख केला आहे. परंतु यापासून जो धडा घ्यायचा तो मात्र आपण पुरतेपणी घेतलेला नाहीं. आपण अर्थसंकल्पांत केलेली चुकीची कपात, संरक्षण मंत्र्यांच्या व्यक्तीमत्वांतील दोष, सेनांच्या शाखांतील भांडणे

आणि कारभारांतील ढिलाई या तात्कालिक कारणांनाच प्रस्तुत संदर्भात फार महत्व देण्यांत आलें. या गोष्टीची कारणे अधिक खोलवर जाणारी आहेत हे अजून आपल्या ध्यानांत आलेले नाहीं. आपली अर्थव्यवस्था आणि तिचें स्वरूप स्पष्ट करून तिचे समर्थन करणारी आर्थिक मीमांसा यांत मोठे दोष आहेत. त्यामुळें आपलीं वरीचशीं उत्पादन साधनें खाजगी क्षेत्राच्या हातीं जातात. आणि त्यांच्या द्वारें जे उत्पादन होते त्याला राष्ट्रीय संरक्षणाच्या दृष्टीने कांहींच महत्व नसते. अर्थसंकल्पांत वाढ करून आपला प्रश्न सुटणार नाहीं. समाजाची उद्दिष्टे कोणती त्या बद्दलची आपली भूमिकाच बदलायला हवी. पण हें अजून आपल्या ध्यानांत आलेले नाहीं. खाजगी ग्राहकोपयोगी वस्तूंचे उत्पादन हेंच सर्वोच्च उद्दिष्ट आहे असे जो समाज मानतो त्याचा हा दृष्टिकोन त्याच्या सर्व सार्वजनिक निर्णयांत प्रतीत होतो. दुसरें कोणतेहि उद्दिष्ट पुढें ठेवणे हें अयोग्य व जहालपणाचे आहे असे मानणारी माणसे त्या समाजांत सार्वजनिक क्षेत्रांतील निर्णय घेत असतात. आपल्या एकंदर साधन संपत्तीची रास केवढी मोठी आहे यावर समाजाचे कतृत्व अवलंबून नसतें. त्या साधनसामुग्रीचा काळजीपूर्वक व सुबुद्धपणे उपयोग करणाऱ्यावर ते अवलंबून असते. पण ही गोष्ट देखील अजून आपल्या ध्यानांत आलेली नाहीं.

या युक्तीवादाला सांकेतिक शहाणपणाची एक शाखा कदाचित असे प्रत्युत्तर देईल कीं झगडयांनीं भरलेल्या जगांत अशा प्रकारचा युक्तिवाद अप्रस्तुत आहे. या शाखेचे अनुयायी असे म्हणतील कीं, उत्पादन हा आजहि आपल्या पुढचा प्रश्न आहे. आणि शीतयुद्ध चालूं असल्यामुळे तर तो अधिकच महत्वाचा झाला आहे. याचा अर्थ असा होतो कीं, आपण कोणत्या गोष्टींचे उत्पादन करीत आहोत त्याचा विचार आपण करतांकामा नये. आपली परिस्थिती इतकी आणीबाणीची आहे कीं, आपण आंधळेंच राहिले पाहिजे. कोणत्या गोष्टीमुळे आपल्या सुखांत भर पडेल याचा विचार करणे अप्रस्तुत आहे. ज्या गोष्टीमुळे आपल्या सुखांत भर पडत नाही त्या गोष्टी करण्यांत आपण आपल्या शक्ती वेचित राहिले पाहिजे. आपण आपल्या साधनसामुग्रीचा सध्यां जो उपयोग करीत आहोत तो राष्ट्राचे संरक्षण करण्यास व अस्तित्व कायम टिकवण्यास कितपत उपकारक आहे, याचा विचार आपण करतांकामा नये. कारण त्यामुळे ज्या गोष्टींची आपल्याला विशेषशी गरज नाहीं अशा गोष्टींच्या उत्पादनावरून आपले लक्ष विचलित होईल.

[३]

आपल्या साधनसामुग्रीची कोणत्या प्रकारें विभागणी केल्यास आपल्याला आपले अस्तित्व टिकवता येईल त्याचा अभ्यास या पुस्तकाच्या कक्षेत येत नाहीं.

कधी न संपणाऱ्या शस्त्रास्त्रांच्या चढाओढींवर जो सुरक्षितपणा अवलंबून असतो त्यावर माझी फारशी श्रद्धा नाहीं. शत्रूच्या शस्त्रास्त्रांना तोड म्हणून अधिक विनाशक शस्त्रे निर्माण करून आपला प्रश्न समाधानकारकपणे सुटणार नाहीं. शस्त्रास्त्रांवर अवलंबून रहाण्यापेक्षां वाटाघाटी व करार करण्यातले धोके पत्करावेत हेच मला अधिक इष्ट वाटते. शस्त्राच्या बाबतीत आपण अशी आशा करूंया कीं, त्यांचा उपयोग करण्याची भीति वाटावी इतकीं ती विनाशक आहेत.

परंतु आपले अस्तित्व कायम टिकवण्याचे मार्ग कोणतेहि असले तरी त्यामुळे आपल्या प्रश्नाचे स्वरूप बदलत नाहीं. उद्यां जरी रशियन लोक जगातून नष्ट झाले किंवा चर्चमधील उंदराइतके स्वभावाने वोटचेपे झाले तरी भुकेकंगाल आणि असमाधानी असे लक्षावधि लोक जगांत शिल्लक राहतीलच. उपासमार व दारिद्र्य यांच्यापासून त्यांची सुटका करण्याचे आश्वासन जो पर्यन्त त्यांना मिळणार नाहीं तो पर्यन्त जगातले अस्वाथ्य नष्ट होणार नाहीं. अशा प्रकारचें आश्वासन जर त्याना द्यायचे असेल तर ते पाळण्यासाठीं आपल्याजवळ साधनसामुग्री उपलब्ध असली पाहिजे. आणि ज्या जगामध्ये भिन्न आर्थिक व राजकीय व्यवस्थाची चढाओढ चाललेली आहे त्यांत तर या साधनसामुग्रीची विशेषच आवश्यकता आहे.

शस्त्रास्त्रांची चढाओढ कधींतरी थांबायलाच हवी. पण ती जरी थांवली तरी शास्त्रीय व तांत्रिक क्षेत्रांतील सरहद्दीचें आव्हान कायमच राहील. आंतरराष्ट्रीय स्पर्धेचा एक भाग म्हणून म्हणा किंवा नव्या शोधामुळें होणाऱ्या आनंदासाठीं व मिळणाऱ्या मान्यतेसाठीं म्हणा ही सरहद्द ओलांडून पलीकडे वसाहत करण्याची आपल्याला इच्छा होईल. ती ओलांडण्यांत आपण मागें पडूं नये असे आपल्याला वाटेल. ग्राहकांच्या गरजा भागवण्याच्या बाबतींत अमेरिकन अर्थव्यवस्था यशस्वी झाली आहे. या बाबतींत तिच्यांत कांहीं उणेपणा आहे असें दाखवणे अवघड आहे. परंतु एवढ्याने भागत नाहीं. ग्राहकोपयोगी खाजगी वस्तूंचे उत्पादन करण्यांत जी अर्थव्यवस्था गुंतलेली असते तिच्या ठिकाणी ही सरहद्द ओलांडण्यासाठीं लागणारे गुण फारच अल्प प्रमाणात असतात हे आपण आतां सर्वांनी मान्य करायला हवे. या अर्थव्यवस्थेंत जे संशोधन चालते त्याचा संबंध या ग्राहकोपयोगी वस्तूंशी असतो, ज्ञानाशी फारसा नसतो. परिस्थिती अशी नाहीं, असे सिद्ध करण्यासाठीं सांकेतिक शहाणपण मोठा प्रभावी युक्तीवाद करील. परंतु या युक्तीवादानें कोणीहि फसता कामा नये.

बाजार-यंत्रणा व खाजगी उद्योग यांच्या कक्षेंत पुष्कळसे आधुनिक शास्त्रीय संशोधन येऊं शकत नाहीं हे तर खरेंच. परंतु त्या शास्त्रीय ज्ञानाचा व्यवहारात

उपयोग करणे देखील वरेचसे त्यांच्या कक्षेबाहेर रहाते. अणुशक्तीचा शोध खाजगी उद्योगाने लावला नाहीं शिवाय विजेच्या निर्मितीसाठीं तिचा उपयोग करण्याच्या बाबतीत देखील खाजगी उद्योगाने विशेषसे लक्ष घातले नाहीं. त्याचे कारण असें कीं, उत्पादन खर्च आणि नफा याचे जे आर्थिक व्यवहारातील कोष्टक असतें त्यांत ही गोष्ट वसूं शकत नव्हती. युनायटेड स्टेस्टस् मधील प्रवासाच्या प्रश्नात जनरल मोटर्स ही अर्थसंस्था खूपच लक्ष घालते परंतु अवकाशातील प्रवासाच्या प्रश्नांत मात्र तिला फारशी रुची वाटत नाहीं.

आज परिस्थिती अशी आहे कीं, शास्त्रीय व तांत्रिक प्रगति करणें व तिचा मोठ्या प्रमाणावर व्यवहारात उपयोग करणे ह्या गोष्टीकडेच मुख्यतः लक्ष पुरवणाऱ्या संस्था आपल्या समाजात जवळ जवळ नाहींतच. अणुशक्तिपासून वीज निर्माण करणाऱ्या यंत्रांचा मोठ्या प्रमाणावर विकास करणारी किंवा व्यापारी उपयुक्ततेचा विचार न करता उताऱ्ंची वाहतुक करणाऱ्या विमानांचा विकास करणारी अशी मोठी संघटना आपल्या समाजांत नाहीं. व्यापारी दृष्टया जे तत्काल उपयुक्त ठरणार नाहीं असे पुष्कळसें संशोधन व विकास लष्करी गरजामुळे आपण केला आहे. ग्राहकोपयोगी वस्तूंचे उत्पादन करणाऱ्या अर्थव्यवस्थेंत कांही अंशी तांत्रिक प्रगति थांबते. यापासून आपला जर बचाव झाला असेल तर तो लष्करी गरजांमुळें. आपल्याला वाटते त्यापेक्षां पुष्कळच अधिक प्रमाणात आपण या बाबतीत लष्कराचे ऋणी आहोंत. परंतु लष्करी गरजांवर आपली तांत्रिक प्रगति अवलंबून ठेवणे धोक्याचे आहे. शिवाय असे केल्यामुळे शास्त्रीय प्रगतीच्या भोवती भीतीचे वातावरण निर्माण होते. . .

[४]

शिवाय इतक्यावरच भागत नाहीं. जगाचे आणि आपल्या समाजाचे प्रश्न कांही लवकर सुटणार नाहींत. हे प्रश्न कोणत्या प्रकारचे असतील याची आपणाला कल्पना नाहीं. त्यामुळे ते सोडवण्यासाठीं काय केले पाहिजे हे देखील आपल्याला आज सांगता येणार नाहीं. पण एका गोष्टीबद्दल मात्र खात्री बाळगायला हरकत नाहीं. कदाचित् वाढत्या लोकसंख्येच्या प्रश्नाला आपल्याला तोड द्यावे लागेल. आणि त्या लोकाना शांततेने आणि सुसंस्कृतपणे जगतां यावे यासाठीं नव्या भूप्रदेशांचा शोध करावा लागेल. पृथ्वीच्या उदरांतील धातूंचा उपयोग गेल्या शतकांत आपण प्रचंड प्रमाणांत केला आहे–त्यापूर्वीच्या सबंध मानवी इतिहासांत केला नसेल इतका केला आहे. ही धातूरूपी संपत्ती कदाचित् संपून जाईल व त्यामुळे निर्माण झालेल्या प्रश्नाना आपल्याला तोंड द्यावें लागेल. कदाचित् ग्राहको-

मराठी ग्रंथ संग्रहालय, दादर, मुंबई-२८
अनुक्रम...१५५५५८९ वि: निबंध...
दिनांक ...२०९ मे. दि २०१३/७

पयोगी वस्तूंच्या निर्मितीत गुंतलेले माणसाचे मन मुक्त झालें म्हणजे त्या मनाला नवे उद्योग देण्याचे कार्य आपल्याला करावे लागेल. परंतु यापैकी कोणतेहि कार्य आपल्याला करावे लागलें तरी त्यासाठीं मुख्यतः कर्तृत्व, बुद्धिमत्ता आणि शिक्षण या गोष्टींची आपल्याला गरज भासेल. ती कार्यें करण्यास वस्तूरूपी भांडवलापेक्षा माणसात गुंतविलेले भांडवल अधिक उपयुक्त ठरेल. आजकाल भव्य आणि सर्व-समावेशक विधाने सर्वंगपणे केली जात आहेत. परंतु हे जे विधान आहे तें खरे आहे अशी आपण खात्री वाळगायला हरकत नाहीं.

राष्ट्रीय संरक्षण किंवा परकीय राष्ट्राना केलेली मदत याप्रमाणेच शिक्षण देखील सार्वजनिक क्षेत्रांत मोडते. खाजगी व सार्वजनिक क्षेत्रांत साधनांची विभागणी करतांना ज्या अडचणी येतात त्या शिक्षणाच्या संदर्भात देखील उद्भवतात. तेव्हा जर आपल्याला स्वतःचे अस्तित्व टिकवायचें असेल, संरक्षण करायचे असेल व समाधानाने जगायचे असेल तर आपल्या साधनसामुग्रीचा उपयोग अधिक महत्त्वाच्या गरजा भागवण्यासाठीं आपण व्यवस्थितपणे केला पाहिजे.

रिकाम्या खोलींत बैठकीचे सामान आणून ठेवणे ही एक गोष्ट झाली; परंतु त्या खोलीची जमीन खचेपर्यन्त तींत बैठकीचे सामान कोंबित रहाणे ही अगदीं वेगळी गोष्ट आहे. वस्तूच्या उत्पादनाचा प्रश्न जर आपल्याला सोडवता आला नसता तर माणसाला भोवलेला दारिद्र्याचा प्राचीन शाप तसाच कायम राहिला असता. परंतु तो प्रश्न आपण सोडविला आहे, हे जर आपण ओळखले नाहीं आणि त्या नंतर उपस्थित झालेले प्रश्न सोडवण्यास जर आपण सुरवात केली नाहीं तर ती देखील तितकींच मोठी शोकांतिका ठरेल.



REFBK-0014387